ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३७ वे, अंक २४ वा, डिसेंबर, २०१९.

भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती विशेषांक

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

# मराठी समाजशास्त्र परिषद

(नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र/२७–८३ औरंगाबाद)

–: कार्यालय पत्ता :–

समाजशास्त्र विभाग,

महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर.

–: कार्यकारी मंडळ :–


अध्यक्ष : डॉ. सरोज आगलावे रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

सचिव : डॉ. दिपक पवार रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

खजिनदार : डॉ. राहुल भगत रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

सदस्य : प्रा. साहेबराव भालेराव स्वा. रा. ति. म. विद्यापीठ, नांदेड.

सदस्य : डॉ. ज्योती पोटे मुंबई विद्यापीठ, मुंबई.

सदस्य : डॉ. भरतसिंग पटले एस.एन.डी. टी. विद्यापीठ,मुंबई.

सदस्य : डॉ. चुडामन पगारे क. ब. चो. उ. म. विद्यापीठ, जळगाव.

सदस्य : डॉ. सतीश देसाई शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य : प्रा. नंदकिशोर राऊत सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती

सदस्य : डॉ. विकास शेवाळे सा. फा. फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

सदस्य : डॉ. अशोक सालोडकर गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

सदस्य : प्रा. प्रवीण घोडेस्वार य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक

सदस्य : डॉ. हनुमंत मिसाळ डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

सदस्य : डॉ. रामेश्वर मोरे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**ISSN 2230-7745**

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ३७ वे | अंक २४ वा | डिसेंबर, २०१९

मुख्य संपादक :—
**डॉ. सरोज आगलावे**

कार्यकारी संपादक :—
**डॉ. राहुल भगत**

संपादक समिती सदस्य :—
डॉ. दिपक पवार, डॉ. प्रदीप गजभिये,
प्रा. जयेन्द्र पेंडसे डॉ. प्रमोद पाटील,
प्रा. राजकुमार भगत, प्रा. विनोद शेंडे,

संपादकीय सल्लागार मंडळ :—
डॉ. प्रकाश बोबडे, डॉ. प्रदीप आगलावे,
डॉ. रमेश पांडे, डॉ. बी. के. स्वाई,
डॉ. मनोहर बुटे, डॉ. शेख शब्बीर.

संपर्क पत्ता :—
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा : समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन नागपूर
website :www.mspmonline.com E-mail : marathisocio@gmail.com

टंकण व मांडणी : श्री. मनीष पडोळे, दर्शन कम्प्यूटर्स, तुमसर जि. भंडारा.
मुद्रीत शोधक : डॉ. नलिनी बोरकर

**मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना अंक विनामूल्य.**

**सुचना** : या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.

**ISSN 2230-7745**

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ३७ वे | अंक २४ वा | डिसेंबर, २०१९

समकक्ष समिक्षा समिती (Peer Review Committee)

डॉ. श्रुती तांबे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

डॉ. जगन कराडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

डॉ. बालाजी केंद्रे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. धनराज पाटील, समाजशास्त्र विभाग प्रमुख, सोलापूर विद्यापीठ

डॉ. अ. रहीम अ. मुजीब, सोशल महाविद्यालय, सिध्देश्वर पेठ, सोलापूर.

डॉ. जयश्री महाजन, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव.

डॉ. एन. टी. कांबळे, अध्यक्ष, समाजशास्त्र अभ्यास मंडळ, स्वा. रा. तिर्थ विद्यापीठ, नांदेड.

डॉ. स्मृती भोसले, एल. जे. एन. जे. महिला महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई.

डॉ. संपत काळे, टाटा समाजविज्ञान संस्था, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

डॉ. संदीप चौधरी, स. भु. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद.

डॉ. संजय सावळे, के. टी. एच. एम. महाविद्यालय, गंगारपूर रोड, नाशिक.

प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना. औरंगाबाद

डॉ. प्रदीप मेश्राम, समाजशास्त्र विभाग प्रमुख, जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा.

डॉ. रंजना लाड, समाजशास्त्र विभाग प्रमुख, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर.

डॉ. रविंद्र वाघ, समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एस. व्ही. पी. एस. महाविद्यालय, धुळे.

डॉ. अरूण पौडमल, समाजशास्त्र विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण कॉलेज, गंगावेश कोल्हापूर.

डॉ. धनंयज सोनटक्के, प्रियदर्शनी महाविद्यालय, वर्धा (रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर)

डॉ. दिनकर उंबरकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, सिताबाई कला महाविद्यालय, अकोला.

डॉ. नलिनी बोरकर, समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेटोलपंप, जवाहरनगर जि. भंडारा.

डॉ. राजेन्द्र कांबळे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, इंदीरा गांधी महाविद्यालय, कळमेश्वर, जि. नागपूर.

# संपादकीय......

भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनास सुरूवात होवून एक शतक पूर्ण होत आहे. मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राचा एक स्वतंत्र विभाग प्रोफेसर पॅट्रीक गिडिस यांच्या मार्गदर्शनाखाली १९१९ मध्ये सुरू करण्यात आला होता. १९१९ हे वर्ष भारतात समाजशास्त्र विषयाच्या अध्ययनाचे वर्ष मानण्यात आले. २०१९ हे वर्ष भारतीय समाजशास्त्राचे शतकपूर्ती वर्ष होते. त्यामुळे मागील शंभर वर्षातील समाजशास्त्राचा आढावा घेणे अनिवार्य होते. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३० व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा मुख्य विषय भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती या अनुषंगाने ठेवण्यात आला. मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र असलेले समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा यावर्षीचा अंकदेखील 'भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती' याच विषयाला समर्पित केला आहे.

१९१९ ते २०१९ या शंभर वर्षातील समाजशास्त्राच्या विकासात समाजशास्त्रीय संशोधन, भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान, भारतीय समाजशास्त्राच्या विकासात मुंबई विद्यापीठाचे योगदान, भारतीय समाजाच्या विकासात आणि सामाजिक परिवर्तनांमध्ये समजशास्त्राची उपयोगीता, भारतातील सामाजिक चळवळी, भारतीय सामाजिक स्थिती आणि त्यामधील स्थित्यंतरे, सद्यस्थितीत समाजशास्त्रज्ञांपुढील आव्हाने इत्यादी विषयांवर शोधनिबंध लिहण्याचे आवाहन समाजशास्त्राच्या प्राध्यापक, संशोधक आणि मान्यवरांना केले होते.

प्रस्तुत अंकासाठी अनेक मान्यवरांनी आपले अभ्यासपूर्ण लेख व शोधनिबंध पाठविले आहेत. त्यात प्रामुख्याने डॉ. उत्तम भोईटे सरांचा उल्लेख करणे अगत्याचे आहे. कारण वयोमानानूसार लिखाणाचे कार्य कठीण असतांना त्यांनी आमच्या विनंतीला मान देवून लेख पाठविला. डॉ. भोईटे सरांनी आपल्या लेखात भारतातील समाजशास्त्राच्या उदयाचा व विकासाचा सखोल आढावा घेतलेला आहे. डॉ.पी.जी. जोगदंड यांनी समाजशास्त्राच्या शतकपूर्ती निमित्ताने समाजशास्त्राची स्थिती आणि स्थित्यंतरे याचा आढावा आपल्या लेखात घेतला आहे. डॉ. जगन कराडे यांनी महाराष्ट्रातील सामाजिक चिंतन या लेखात महाराष्ट्रातील सुरूवातीपासूनच्या सामाजिक चिंतनाचा आढावा घेतलेला आहे. डॉ. प्रदीप आगलावे यांनी आपल्या लेखात भारतातील सामाजिक चळवळीच्या समाजशास्त्रीय संशोधनाबाबत संशोधकात उदासीनता असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. डॉ शौनक कुलकर्णी यांनी मानवंशशास्त्राच्या अभ्यासक डॉ. इरावती कर्वे आणि त्यांचे मानववंशशास्त्रीय योगदान यावर प्रकाश टाकला आहे. प्रा. संदीप चौधरी यांनी कमला भसीन : एक दुर्लक्षित समाजशास्त्रज्ञ या लेखात कमला भसीन यांच्या समाजशास्त्रीय योगदानाची चर्चा केली आहे. डॉ. धनराज पाटील यांनी आपल्या लेखात शासतंत्रीय मनोवृत्तीचा आढावा घेतला आहे. प्रा. प्रियदर्शन भवरे यांनी आत्तापर्यंत झालेल्या दलित अभिजनासंबंधीच्या अभ्यासाचा मागोवा आपल्या लेखात घेतलेला आहे. डॉ. नारायण कांबळे यांनी स्वातंत्रोत्तर भारतातील निवडक समाजशास्त्रीय संशोधनाचा आढावा आपल्या लेखात घेतलेला आहे. प्रा. संजयकुमार कांबळे यांनी प्रा. शर्मिला रेगे यांचे समाजशास्त्रीय योगदान आपल्या लेखातून मांडले आहे. डॉ. स्मिता अवचार यांनी डॉ. सुधाताई काळदाते यांच्या कार्यावर आपल्या लेखातून प्रकाश टाकला आहे. डॉ. नारायण चौधरी यांनी पीएच. डी. संशोधनातील आजची निकड काय आहे? ते मांडले आहे. डॉ. श्रीकांत गायकवाड यांनी आपल्या लेखात समाजशास्त्राची स्थिती आणि स्थित्यंतरे दर्शविली आहेत. डॉ. बालाजी केंद्रे यांनी मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्राचा विकास आपल्या लेखात दर्शविला आहे. डॉ. सोंडगे व डॉ. मोटे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात समाजशास्त्राच्या विकासाचा आढावा आपल्या लेखात घेतला आहे. डॉ. बी. के. स्वांई यांनी रा. तु. म. नागपूर विद्यापीठातील समाजशास्त्राच्या विकासाचा आढावा घेतलेला आहे. डॉ. भगवान मनाळ यांनी आपल्या लेखात समाजशास्त्रापुढील आव्हाने कोणती? याचा उहापोह केलेला आहे. डॉ. कालीदास भांगे यांनी जागतिकीकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम दर्शविला आहे. डॉ. मोहन नगराळे यांनी प्रसार माध्यमे, सामाजिक परिवर्तन आणि लिंगभावाचे वास्तव आपल्या लेखात दर्शविले आहे. तसेच डॉ. दिपक पवार, डॉ. धारबा गणवीर, डॉ. राजेद्र बगाटे, डॉ. रामेश्वर मोरे, डॉ. रविंद्रं विखार, डॉ. प्रतिभा बिरादर, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. साहेबराव हिवाळे, डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ. प्रदीप गजभिये, डॉ. हेमंत सोनकांबळे, प्रा. मनोहर येरकलवार, डॉ. ज्योती पोटे, डॉ. श्रीराम खाडे, डॉ. नलिनी बोरकर या लेखकांनी सुध्दा आपल्या लेख/शोधनिबंधाच्या माध्यमातून भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती या निमित्ताने प्रकाशित होणा—या या अंकाच्या निर्मितीमध्ये आपले अभ्यासपूर्ण योगदान दिलेले आहे. एकंदरीत समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा २०१९ मधील हा अंक समाजशास्त्राच्या प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासकांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. प्रस्तुत अंकात समाजशास्त्राच्या शतकपूर्तीचा आढावा घेण्यात आला आहे. काही अभ्यासकांचे लेख निश्चितच दिशादर्शक ठरतील. संशोधकांनाही संदर्भ अंक म्हणून निश्चितच उपयुक्त ठरेल.

प्रस्तुत अंकाचे संपादन करतांना आम्हाला अनेक मान्यवरांचे सहकार्य मिळाले. संपादक समितीच्या सदस्यांचे आणि प्रस्तुत अंकाकरीता लेखन कार्य करणा—या सर्व लेखकांचे आम्ही आभारी आहोत. प्रस्तुत अंकाचे आपण सर्व निश्चितच स्वागत कराल अशी आमची अपेक्षा आहे. धन्यवाद!

मुख्य संपादक
**डॉ. सरोज आगलावे**

कार्यकारी संपादक
**डॉ. राहुल भगत**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शिर्षक | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारतातील समाजशास्त्र अध्ययन शतकपूर्ती | डॉ. उत्तम भोईटे | ...१ |
| २. | भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे | डॉ. पी. जी. जोगदंड | ... ४ |
| ३. | महाराष्ट्रातील सामाजिक चिंतन | डॉ. जगन कराडे | ... ६ |
| ४. | भारतातील सामाजिक चळवळीबाबत समाजशास्त्रीय संशोधकांची उदासीनता | डॉ. प्रदीप आगलावे | ...१२ |
| ५. | मानवशास्त्राची वाटचाल : महाराष्ट्रातील साहित्य आणि संशोधन परंपरा | डॉ. शौनक कुलकर्णी | ...१४ |
| ६. | कमला भसीन : एक दुर्लक्षित समाजशास्त्रज्ञ | प्रा. संदीप चौधरी | ... १८ |
| ७. | शासतंत्रीय मनोवृत्ती व अवकाशाचे राजकारण.... | डॉ. धनराज पाटील | ...२० |
| ८. | दलित अभिजनासंबंधीचा अभ्यास..... | प्रा. प्रियदर्शन भवरे | ...२५ |
| ९. | स्वात्यंत्रोत्तर भारतातील निवडक समाजशास्त्रीय संशोधने | डॉ. एन. टी. कांबळे | ...३४ |
| १०. | प्रा. शर्मिला रेगे यांचे समाजशास्त्रातील योगदान | प्रा. संजय कांबळे | ...४० |
| ११. | डॉ. सुधाताई काळदाते : चतुरस्त्र समाजशास्त्रज्ञ | डॉ. स्मिता अवचार | ...४९ |
| १२. | पीएच. डी. संशोधन पर्व : निकड बदलाची | डॉ. नारायण चौधरी | ...५१ |
| १३. | भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे | डॉ. श्रीकांत गायकवाड | ...५३ |
| १४. | भारतातील समाजशास्त्र विषयाची शताब्दी अवलोकन आणि वाटचाल | डॉ. बालाजी केंद्रे | ...५८ |
| १५. | मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाची वाटचाल | डॉ. सोंडगे, डॉ. मोटे | ...६० |
| १६. | समाजशास्त्राच्या विकासात रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे योगदान | डॉ. बी. के. स्वांई | ...६२ |
| १७. | भारतीय समाजशास्त्राचा विकास : आव्हाने आणि भवितव्य | डॉ. भगवान मनाळ | ...६४ |
| १८. | जागतिकीकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम | डॉ. कालीदास भांगे | ...६७ |
| १९. | प्रसार माध्यमे, सामाजिक परिवर्तन आणि लिंगभावाचे वास्तव... | डॉ. मोहन नगराळे | ...७१ |
| २०. | वर्तमानकाळात विवाहसंस्थे समोरील आव्हाने... | डॉ. दिपक पवार | ...७३ |
| २१. | भारतीय समाजशास्त्राच्या विकासात मुबंई विद्यापीठाचे योगदान | डॉ. धारबा गणवीर | ...७५ |
| २२. | वाडत जाणारी वृध्दांची लोकसंख्या: एक नवे आव्हान | डॉ. राजेद्र बगाटे | ...७७ |
| २३. | भारतात समाजशास्त्राचा विकास | डॉ. रामेश्वर मोरे | ...८० |
| २४. | ई—सिगारेट: सामाजिक समस्या | डॉ. रविंद्र विखार | ...८३ |
| २५. | भारतामधील समाजशास्त्राच्या विकासात समाजशास्त्रज्ञांचे योगदान | डॉ. प्रतिभा बिरादर | ...८५ |
| २६. | भटक्या—विमुक्त जमातींच्या चळवळींची विचारसरणी | डॉ. अर्जुन जाधव | ...८७ |
| २७. | ग्रामविकास कार्यक्रमविषयक स्थानिक प्रशासकीय यंत्रणेचा दृष्टिकोण | डॉ. साहेबराव हिवाळे | ...९३ |
| २८. | महाविद्यालयीन स्तरावरील समाजशास्त्र अभ्यासक्रमाविषयी शिक्षकांची ..... | डॉ. मंजुषा नळगीरकर | ..९७ |
| २९. | भारतीय प्रसारमाध्यमातील जातीवाद | डॉ. प्रदीप गजभिये | ..१०० |
| ३०. | बाधुनिक भारतातील स्त्रीभ्रूण हत्या | डॉ. हेमंत सोनकांबळे | ..१०२ |
| ३१. | आदिवासी जमातींचे बदलते स्वरूप | प्रा. मनोहर येरकलवार | ..१०५ |
| ३२. | सायबर गुन्हा आणि सायबर सुरक्षितता: उक अध्ययन | डॉ. ज्योती पोटे | ..१०८ |
| ३३. | भारतातील ग्रामीण विकास | डॉ. श्रीराम खाडे | ...१११ |
| ३४. | ई—साक्षरता : शिक्षण क्षेत्रातील नवप्रवाह | डॉ. नलिनी बोरकर | ..११३ |
| ३५. | समाजशास्त्रीय संशोधनाची प्रासंगिकता | डॉ. सरोज आगलावे | ..११६ |
| ३६. | २९ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल | डॉ. दिपक पवार | ...११९ |

# भारतातील समाजशास्त्र अध्ययन शतकपूर्ती

**डॉ. उत्तम भोईटे,** माजी कुलगुरू, भारती विद्यापीठ, पूणे. माजी अध्यक्ष, इंडीयन सोशिओलॉजिकल सोसायटी, दिल्ली.

इ. स. १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विभाग सुरू करण्यात आला आणि एक स्वतंत्र विषय म्हणून समाजशास्त्राच्या अध्यापन व अध्ययन कार्याची प्रथम सुरूवात झाली. २०१९ हे त्याचे शताब्दिपूर्तीचे वर्ष. त्या अगोदर १९१४ मध्ये मुंबई प्रांताच्या शासनाने हा विषय सुरू करण्यासाठी मुंबई विद्यापीठास विशेष अनुदान दिले होते. पॅट्रीक गिडीस यांनी हा विषय शिकविण्यास प्रथम सुरूवात केली. एक शहर नियोजन तंत्रज्ञ अशी त्यांची मूळची ओळख. पुढे १९२५ मध्ये या विद्यापीठात समाजशास्त्र विभाग सुरू करण्यात आला. आज भारतीय समाजशास्त्रज्ञ अशी त्यांची ओळख आणि ख्याती आहे, ते डॉ. सदाशिव गोविंद घुर्ये हे पहिले विभाग प्रमुख व प्रपाठक, प्रा. टुथी हे त्यांचे सहकारी होते.

समाजशास्त्र अध्यापन, अध्ययनाच्या शताब्दिपूर्तीच्या या स्मरणीय प्रसंगी भारतात समाजशास्त्र विषयाचा ज्यांनी पाया घातला व उभारणी केली त्या डॉ. घुर्ये यांनी भारतीय समाजशास्त्राला दिलेल्या योगदानाचे स्मरण करणे उचित ठरेल.

डॉ. घुर्ये हे मूळचे संस्कृत विषयाचे विद्यार्थी. हा विषय घेवून ते एम. ए. ची परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले होते. एल्फिस्टंन महाविद्यालयात व्याख्याता म्हणून काम करीत असतांना त्यांनी सादर केलेले ''शहरी वस्तीचे नियोजन'' या विषयावरचे टिपण पेट्रिक गेडेस यांना भावले. त्यांच्या शिफारशीवरून घुर्ये यांना इंग्लडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठात पीएच. डी. पदवीसाठी अभ्यासवृत्ती मिळाली. त्यांचे मार्गदर्शक प्रा.डब्ल्यु. एम. आर. रिव्हर्स यांचे निधन झाल्यामुळे घुर्ये यांनी केंब्रिज विद्यापीठात प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ डॉ. ए. सी. हॅडन यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट पदवी संपादन केली.

डॉ. घुर्ये यांनी मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख पद १९२५ ते १९५९ या कालखंडात समर्थपणे सांभाळले. समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक, संशोधक, लेखक व संशोधन मार्गदर्शक म्हणून डॉ. घुर्ये यांचे कर्तृत्व जबरदस्त असे होते. त्यामुळे त्यांना अपार अशी मान्यता मिळाली. त्यांनी लिहिलेल्या एकुण ३४ ग्रंथांचे विषय वैविध्य आणि आगळेवेगळे पण विस्मयकारक होते. त्यांमध्ये भारतीय जातीव्यवस्था, भारतातील आदिवासी, भारतीय साधु, भारतीय वेषभूषा, शिल्पकला, भारतीय लोकशाही असे विषय होतेच. त्याशिवाय, उत्तर पूर्व भारतातील उद्रेक आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न या सारख्या समकालिन विषयांवर ही त्यांनी ग्रंथ रचना केली. भारतीय समाजशास्त्रानी इतर समाजांविषयी लिखाण केल्याची उदाहरणे तुरळकच. डॉ. घुर्ये यानी आफ्रिकेतील निग्रोंचा प्रश्न तसेच अमेरिकन महिलांचे लैंगिक जीवन यांसारखे विषयही हाताळले आहेत. डॉ. घुर्ये यांनी एकंदर ५५ विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदवी संशोधनामध्ये मार्गदर्शन केले. ज्यांनी भारतात समाजशास्त्र विषयात अतिशय महत्वपूर्ण योगदान दिले व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली ते प्रा. श्रीनीवास, इरावती कर्वे, ए. आर. देसाई, के. एम. कपाडिया, वाय. बी. दामले, आंन्द्र बोते, एम. एस. गोरे व इतर नामवंत समाजशास्त्र डॉ. घुर्ये यांचे विद्यार्थी होते.

डॉ. घुर्ये यांच्या काळात समाजशास्त्रज्ञांच्या काही व्यावसायिक संघटना कार्यरत होत्या. त्या विसर्जित करून घुर्ये यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली १९५२ मध्ये 'इंडियन सोशिऑलाजिकल सोसायटी' ही संघटना स्थापन झाली. चार हजाराहून अधिक आजीव सदस्य असलेली ही संघटना सध्या विस्ताराने जगातील अशा प्रकारच्या संघटनामध्ये व्दितीय क्रमांकावर आहे. समाजशास्त्र विषयाचे ''दि इंडियन जर्नल ऑफ सोशिआलॉजी'' हे बडोदा येथील महाविद्यालयातील ए. जी. विडगेरी या ब्रिटीश प्राध्यापकाने १९२१ मध्ये सुरू केले होते. त्यांनतर लखनौ विद्यापीठातील आर. के. मुखर्जी यांच्या संपादकत्वाखाली ''इंडियन सोशिआलॉजी रिव्हू'' हे जर्नल १९३४ मध्ये सुरू झाले. ही दोन्ही प्रकाशने नंतर बंद झाली. नंतरच्या काळात घुर्ये यांच्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनाखाली इंडियन सोशिआलॉजीक सोसायटी चे 'सोशिऑलॉजीकल बुलेटिन' हे जर्नल १९५२ पासून प्रकाशित होवू लागले. ते सध्याही नियमितपणे प्रकाशित होत आहे.

डॉ. घुर्ये यांनी समाजशास्त्र विषयाचे अध्ययन, अध्यापन व संशोधन तसेच या विषयाची संस्थात्मक जडणघडण यासाठी जे मूलगामी आणि महत्वपूर्ण योगदान दिले त्यासाठी समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी त्यांचे ऋण मान्य करायला हवे.

डॉ. घुर्ये यांच्या लिखाणावर कांहीनी टीकास्वरूपी भाष्य केले आहे. घुर्ये यांनी आपले समाजशास्त्रीय लिखाण हिंदूच्या प्राचीन धार्मिक ग्रंथाच्या संदर्भात केलेल्या असत्यांने ते थोडेसे ब्राम्हणी वळणाने गेले आहे हे टीकाकारांचे म्हणणे तितकेच सयुक्तिक नाही. त्यांच्या विशेषत: जातीव्यवस्थेच्या संदर्भातील लेखणात विश्लेषणावर भर आहे. त्यांनी जाती व्यवहारामध्ये होणारी मानवी हक्कांची पायमल्ली, अन्याय, पिळवणूक यावर काही लिहिले नाही हे खरे आहे. परंतू त्यांच्या सर्वच लेखनाला ब्राम्हणी वळण आहे असे म्हणता येणार नाही. घुर्ये यांच्या लिखाणाला काहीअंशी ईंडोलॉजी वा विचारप्रणालीची पार्श्वभूमी होती हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्यासबंधी आपण नंतर चर्चा करू. घुर्ये यांनी आपल्या समाजशास्त्रीय विचारांची मांडणी करतांना सर्वमान्य अशा वैज्ञानिक संशोधन पद्धतीची चौकट स्वीकारलेली नाही त्यामुळे त्यांच्या लेखनातील शास्त्रीयत्वाला बाधा येते असाही आक्षेप घेतला जातो. हा आक्षेपही तितकासा बरोबर नाही. त्यांचे लिखाण वास्तवाची परीक्षा उत्तीर्ण करणे व ते वैचारिक ताक्रिकतेवर आधारलेले आहे हे ही लक्षात घ्यायला हवे. घुर्ये त्यांच्या संशोधनात empirical पद्धतीचा तसेच क्षेत्रीय सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला होता हे त्यांच्या काही लिखाणातून स्पष्ट होते. कोणत्याही वैचारिक लिखाणाचा तत्कालिन वैचारिक परंपरांचा संदर्भ असतो हे लक्षात घेवून घुर्ये यांच्या समाजशास्त्रीय योगदानाचे मुल्यमापन करणे यथोचित होईल असे वाटते. तसंच समाजशास्त्र विषयाच्या अध्यापनाच्या शताब्दि निमित्ताने भारतीय समाजशास्त्राच्या पूर्वपिठिकेचा विचार करणे सुसंगत होईल असे वाटते.

१७५७ च्या प्लासीच्या लढाईत इंग्रजांच्या सैन्याने विजय मिळविल्यावर ज्याचा उल्लेख 'कंपनी सरकार' (संदर्भ:ईस्ट इंडिया कंपनी) म्हणून केला जातो त्याची सत्ता बंगाल इलाख्यामध्ये स्थिरावली. येथील प्रशासन कार्य पाहण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीच्या लंडनमधील अधिकार मंडळाकडून नेमणूका होत असत. इंग्लडमधून आलेल्या या प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये निखळ सत्ता विस्तारवादी अधिकारी जसे होते तसेच कला, वाङ्:मय या सारख्या गोष्टींमध्ये स्वारस्य असणारेही होते. त्यांना चार हजाराहून अधिक वर्षाचा इतिहास असलेल्या भारतीय विविधांगी संस्कृतीविषयी कुतहुल व आदर होता. त्यांनी येथील प्राचिन धार्मिक वाङ्:मय, श्रद्धापद्धती, चालीरिती, जीवनपद्धती इत्यादींचा अभ्यास करून त्याविषयीचे ज्ञान संकलित करण्याची जी अध्ययन प्रणाली निर्माण झाली ती

'इंडोलॉजी' या नावाने ओळखली जाते. या पद्धतीने प्राचिन भारताचा व अलिकडच्या काळात विद्यमान भारताचा अभ्यास जर्मनी, रशिया, जपान इटली व अमेरिका इत्यादी देशामंध्ये आजही केला जात आहे. हे इंडोंलॉजीचे शास्त्र भारतीय समाजशास्त्राचे उगमस्थान आहे असे म्हणणे हे पूर्णपणे समर्थनीय आहे. १८ व्या शतकाच्या अखेरीला आणि १९ व्या शतकात अनेक इंग्रजी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी व अभ्यासकांनी आपल्या अभ्यासातून इंडोलॉजीचे क्षेत्र समृद्ध केले. त्याच्या आधारे डॉ. घुर्ये आणि त्यानंतरच्या समाजशास्त्रज्ञांना आपल्या समाजशास्त्रीय विचारांची उभारणी करणे सोयीचे झाले. त्या सर्वांच्या कार्याचा परामर्श इथे घेणे शक्य नाही. प्रतिनिधीक स्वरूपात बंगालचे पहिले गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टींग्ज व त्याचे समकालीन कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायधीश विल्यम जोन्स आणि १९ व्या शतकाच्या मध्याला भारतात आलेल्या हर्बट रिस्ले यांच्या योगदानाचा थोडक्यात उल्लेख करता येईल. वॉरन हेस्टींग्ज यांची प्रथम नेमणूक एक कनिष्ठ मदतनीस म्हणून झाली होती. स्वकर्तृत्वाने त्यांनी गव्हर्नर जनरल या पदापर्यंत मजल मारली होती. भारतीय सर्वांगी संस्कृति मध्ये त्यांना केवळ अभिरूची नव्हती तिचा त्यांना अभिमानही होता ती समजावून घेण्यासाठी त्यांनी उर्दू, पर्शियन संस्कृत या भाषांवर प्रभुत्व मिळविले. त्यांच्याच प्रेरणेने भगवत गीतेचे इंग्रजीत भाषांतर झाले. येथील समृद्ध विचार संपदा, वाङ्‌मयीन ऐश्वर्य व श्रद्धा, रीतिरिवाज याचे ज्ञान जगाला व्हावे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या पुढाकाराने आणि विल्येम जोन्स यांच्या प्रयत्नामुळे १७७९ मध्ये कलकत्याला 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' या संशोधन संस्थेची स्थापना झाली. विल्यम जोन्स हे न्यायाधिश होते. एतद्देशिय समुहांवर ब्रिटीश न्याय पद्धती लादणे अन्यायकारक होईल असे त्यांना वाटत होते म्हणून त्यांनी हिंदु, मुस्लिम व इतर समुहांच्या धार्मिक श्रद्धा, मूल्ये, चालीरिती, न्याय पद्धतीतील संकेत यांचा अभ्यास करण्यासाठी उत्तेजन दिले व स्वत:ही अभ्यास करून त्यासंबंधीची माहिती संकलित केली त्यासाठी त्यांनी संस्कृत, पर्शियन, उर्दू, बंगाली या भाषांवर प्रभुत्व मिळविले. ते भाषा कोविद होते. त्यांना एकंदर २७ भाषा अवगत होत्या. 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' या संशोधन संस्थेत सुरूवातीला विदेशी संशोधक विद्वनांना सदस्यत्व मिळत असे. नंतर त्या संस्थेची दारे एतद्देशिय विद्वत्तजनांसाठी मुक्त करण्यात आली त्या सर्वांनी भारताच्या सर्वांगीन संस्कृतीला प्रकाशात आणले.

१८५७ चा एतद्देशिय सैनिकांनी त्यांच्या ब्रिटीश अधिकाऱ्यांविरूद्ध केलेला उठाव हा ब्रिटीशांच्या साम्राज्यवाढीच्या प्रयत्नांना धक्का देणारा असा होता. या भूप्रदेशातील स्थानिक समुहांच्या संस्कृती व जीवन पद्धती विषयी सम्यक ज्ञान असल्याशिवाय येथे आपली सत्ता स्थिर होऊ शकणार नाही अशी ब्रिटीश राज्यकर्त्यांची खात्री झाली. त्यासाठी त्यांनी स्थानिक संस्कृती व जीवन पद्धती विषयी व्यापक स्वरूपाचा उपक्रम हाती घेतला. या उपक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्यांमध्ये हरबर्ट रिस्ले यांचे कार्य उल्लेखनिय असे होते. सिव्हिल सर्व्हिसमधील वरीष्ठ दर्जाचे अधिकारी असलेले रिस्ले १८७३ मध्ये भारतात आले. १८६९ मध्ये बंगालमधील जातीजमातींची आकडेवारीनिशी माहिती गोळा करण्यासाठी निर्यात केलेल्या स्टॅटिस्टीकल सर्व्हे ऑफ इंडिया च्या कार्यात ते सहभागी झाले. १८८५ मध्ये ''एथ्नॉग्रॉफिक सर्व्हे ऑफ इंडिया'' चे ते प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १८९१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'दी ट्राईब्ज अँड कास्टस् इन बेंगाल' या चार खंडामध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाच्या निर्मिती मध्ये त्यांचे महत्वपूर्ण असे योगदान होते. १९०१ मध्ये झालेल्या जनगणनेचे ते प्रमुख सुत्रधार होते. जनगणनेच्या माध्यमातून निरनिराळया जनसमुहांतील लोकांची संख्या, संस्कृती, केंद्रित माहिती व आंकडेवारी संकलीत करण्यासाठी एक ढाचा त्यांनी तयार केला. त्याच्या मदतीने त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी एतद्देशिय जनसमुहांबद्दल विपुल माहिती व आकडेवारी जमा केली. त्यांनी एका अर्थाने भारतीय मानवशास्त्र अभ्यासपद्धतीचा पाया घातला असे म्हणता येईल. ही माहिती ब्रिटीश सरकारचे हितसंबंध समोर ठेवून संकलित केल्याने ती काही प्रमाणात पूर्वग्रहदुषित होती. ही महिती पुढे भारतीय समाजशास्त्रज्ञांना अभ्यासासाठी मोठया प्रमाणात उपयोगी पडली.

ब्रिटीश अधिकाऱ्यांव्यतिरिक्त ख्रिश्चन धर्म प्रसारक, स्वतंत्र अभ्यासक अशानीही भारतातील विविध जनसमुहांच्या भाषा, उपभाषा, प्राचिन वाङ्‌मय, प्रथा चालीरिती, धार्मिक व आर्थिक जीवन पद्धती विषयी अभ्यासपूर्ण माहिती गोळा केली. त्यातील कांहीनी भारतीय खेडेगांवे, संयुक्त कुटुंब पद्धती, नातेवाईक संबंध, जातीव्यवस्था यांचा अभ्यासही केला होता. अशा प्रकारे जमा झालेली आंकडेवारी सिद्ध व वर्णनात्मक माहिती तसेच शासकीय यंत्रणाचे अहवाल, गॅझेटीअर्स इत्यादी मधून उपलब्ध होणारे भारतीय समाजाविषयाचे आकलन याचा उपयोग स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या काळातील समाजशास्त्रांच्या अभ्यासकांना मोठया प्रमाणात झाला. भारतीय समाजशास्त्रीय अभ्यासाची ही पूर्वपिठिका समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात समाजशास्त्राच्या अध्ययन, अध्यापन व संशोधनाची गती संथ अशी होती. १९१४ मध्ये मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राच्या अध्यापनाची सुरूवात झाली. त्यांनतर कलकत्ता आणि लखनौ विद्यापीठांमध्ये अनुक्रमे १९१७ आणि १९२१ मध्ये व त्यांनतर १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळेपर्यंत मैसूर, उस्मानिया आणि पुणे विद्यापीठांमध्ये या विषयाचे विभाग सुरू करण्यात आले. त्या काळात अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व इतिहास या विषयांना प्राधान्य देण्यात येत असे त्यामुळे समाजशास्त्राला आपले स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी खुप काळ वाट पहावी लागली. समाजशास्त्र विषयाला काही काळ अर्थशास्त्र (मुंबई व लखनौ विद्यापीठ), राज्यशास्त्र (कलकत्ता विद्यापीठ) अशा विषयांच्या छायेत राहावे लागले. त्यावेळच्या समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात इतर विषयांचा फारसा संबधीत नसलेला भाग समाविष्ट करण्यात आलेला असे. स्वातंत्र्योत्तर काळात ही परिस्थिती बदलली. विद्यापीठाच्या संख्येबरोबरच समाजशास्त्र विभागांची, प्राध्यापकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली. निरनिराळया विद्यापीठांमध्ये हा विषय पदवी व पदव्युत्तर पातळीवर शिकवला जावू लागला.

स्वातंत्र्योत्तरकाळात नियोजनाच्या प्रक्रियेतून समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये परिवर्तन पर्व सुरू झाले. नवीन क्षेत्रे निर्माण झालीत. पारंपारिक संस्थात्मक समाजरचना, अर्थरचना, स्तरिकरण यांत बदल होवू लागले. या परिवर्तित आणि नव्याने निर्माण झालेल्या वास्तवांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्राच्या तसेच औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकिय अशा अनेक अभ्यास शाखा निर्माण झाल्या. अभ्यासक्रमातील फापटपसारा जावून अभ्यासक्रम अधिकाधिक समाजशास्त्र केंद्रित होवू लागले.

स्वातंत्र्योत्तरकाळात समाजशास्त्र विषयाची संस्थास्वरूपी समृद्धी वाढली. इंडियन सोशिऑलॉजिकल सोसायटीच्या आजीव सदस्यांच्या संख्येत आणि रिसर्च कमेटयांच्या स्वरूपामध्ये कार्य विस्तरही वाढला. त्या शिवाय समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या प्रादेशिक सघंटनाची संख्या सातत्याने वाढते आहे. ग्रंथ प्रकाशनाचा विस्तार झाला. 'सोशिऑलाजीकल बुलेटिन' व्यतिरिक्त 'कॉन्ट्रिब्युशन टू इंडियन सोशिऑलाजी', 'इकॉनामिक अँड पोलिटीकल विकली' यांसारख्या विविध नियतकालिकांतून समाजशास्त्रीय लिखाणाला प्रसिद्धी मिळते आहे. या शिवाय 'नॅशनल इंन्स्टीटयुट ऑफ रूरल डेव्हलपमेंट' (हैद्राबाद) 'नॅशनल इंन्स्टीटयुट ऑफ अर्बन अफेअर्स' (नवी दिल्ली) यांसारख्या संशोधन संस्था स्थापन झाल्या.

स्वातंत्र्योत्तरकाळात समाजशास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रालाही बरीच समृद्धी प्राप्त झाली आहे. अमेरिका, इंग्लड, जर्मनी इत्यादी देशातील समाजशास्त्रीय विचारपद्धतींचा, विचारांचा आणि सैद्धांतिक भूमिकांच्या प्रभावामुळे व इतर ही घटकांमुळे भारतीय समाजशास्त्राने इंडॉलाजी, संस्कृती केंद्रित अभ्यास पद्धती व मानववंशशास्त्र यांच्या प्रभावातून मुक्तता संपादन केली आहे. १९५० नंतरच्या नजीकच्या काळात भारतीय समाजाची वैशिष्टये समजल्या जाणाऱ्या खेडेगांव, संयुक्त कुटुंब पद्धती व जाती व्यवस्था या विषयाच्या संशोधनावर समाजशास्त्रीय संशोधकांनी भर

दिला होता. भारतीय खेडयांचा अभ्यास करण्याची परंपरा ब्रिटीश आमदानीत सुरू झाली होती. हेन्री मेन, बेडेन पावेल, गिल्बर्ट स्लाटर या सारख्या अनेक विदेशी संशोधकांनी भारतीय खेडयांचा निरनिराळया दृष्टीकोणातून अभ्यास केला होता. विसाव्या शतकाच्या सुरूवातीला ना. गो. चाफेकर यांचे 'आमचा गाव बदलापूर' आणि आत्रे यांचे ''गावगाडा'' ही दोन अभ्यासपूर्ण पुस्तके प्रकाशित झाली. १९५० नंतर ग्रामीण समाज रचनेच्या अभ्यास परंपरेला चांगलीच बळकटी आली. शामाचरण दुबे यांचे 'इंडियन व्हिलेज आणि इंडियाज चेजिंग व्हिलेज' हे क्षेत्र पाहणीवर आधारलेले दोन ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्याच कालखंडात ए. आर. बिल्स, कॅथेलिन गॉफ, ऑस्कर लेव्हिस इत्यादी अमेरिकिन मानववंशशास्त्रज्ञांनी व श्रीनीवास, अॅन्ड्रे बेते इत्यादी भारतीय अभ्यासकांची ग्रामीण समुहांच्या अभ्यासाचे ''व्हिलेज इंडिया'' (संपा. मॅकिएम् मेरिएट) व 'इंडियाज व्हिलेजेस' (संपादक श्रीनीवास) हे ग्रंथ प्रसिद्ध झाले. एक वैशिष्टयपूर्ण सामाजिक संस्था म्हणून भारतीय संयुक्त कुटुंब पद्धतीचा अभ्यास ज्यांनी केला त्यांमध्ये के. एम. कपाडीया, आय. पी देसाई यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो.

स्वातंत्र्यानंतर भारतात स्थित्यंतराचे युग सुरू झाले जनसामान्यांच्या आशा आकांक्षा चा स्फोट झाला. त्यामुळे आर्थिक विकासाचे प्रकल्प हाती घेण्यात आले. लोकशाही शासन प्रणाली स्वीकारल्या मुळे सामाजिक जीवनातील असमानता व अन्याय दूर करण्यासाठी पुरोगामी स्वरूपाचे कायदे तयार करण्यात आले. आधुनिकता आणण्यासाठी व प्रबोधन घडवून आणण्यासाठी शिक्षण व इतर काही योजना कार्यान्वित करण्यात आल्या. व तत्सम इतर प्रयत्नांचा परिणाम म्हणून परिवर्तन प्रक्रियेला वेग आला. या बदललेल्या परिस्थितीचे भान समाजशास्त्रज्ञांना आले. त्यांतुन समाजशास्त्राच्या अभ्यासमुल्यांची पुनर्रचना करण्यास सुरूवात झाली. जातिव्यवस्था, कुटुंब व्यवस्था, ग्रामीण रचना यात होत असलेले बदल परिवर्तनासाठी उपयोजिलेल्या योजनांची फलनिष्पती पुरोगामी कायद्यांमुळे निर्माण झालेली वंचितामधील जागृती, सामाजीक आंदोलने, विकासाचा विशेष फायदा मिळालेल्या लोकांचा निर्माण झालेल्या मातब्बरांचा नवा वर्ग, परिवर्तनाचा अनपेक्षित परिस्थिती म्हणून निर्माण झालेल्या नियोजनशून्य नागरीकरणाची समस्या, वा इतर तत्सम समस्या तसेच सत्तेच्या विकेंद्रिकरणाच्या धोरणाचे परिणाम, दलित, आदिवासी, महिला यांच्यामध्ये नव्याने निर्माण झालेली हक्कासंबंधीची जागृती, हे व यांसारखे आणखी विषय समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या चिंतनाचे व अभ्यासाचे विषय झाले. आपल्या समाज परिवर्तनाच्या प्रयत्नांना मार्गदर्शक होईल असे समाजशास्त्रीय संशोधन व्हावे यासाठी शासनाने विद्यापीठ अनुदान मंडळ, इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सांयस रिसर्च या सारख्या संस्थाच्या माध्यमातून मदत निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे समाजशास्त्रीय संशोधनाला गती प्राप्त झाली. १९६० चे दशक आणि त्यानंतरच्या काळात समाज परिवर्तनाची समग्र प्रक्रिया, समाज परिवर्तन प्रयत्नांचे निरनिराळया समुहावर झालेले परिणाम, व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि उद्रेक यासारख्या विषयांवरच समाजशास्त्र अभ्यासकांचे लक्ष केंद्रित झाले त्यातुन विपुल समाजशास्त्राचे साहित्य निर्माण झाले. स्वातंत्र्योत्तरकाळात समाजशास्त्र विषयाचा भारतात लक्षणीय असा विकास झाला आहे ही वस्तूस्थिती आहे. परंतू झालेला विकास किती निकोप आहे हे पाहणेही तितकेच अगत्याचे आहे.

भारतात होणारे समाजशास्त्रीय संशोधन हे बहुतांशी शास्त्रशुद्ध संशोधन पद्धतीने होत नाही असा आक्षेप घेतला जातो. समाजशास्त्रीय संशोधनासाठी तथ्य गोळा करतांना प्रत्यक्ष क्षेत्रपाहणी आणि सहभागी निरिक्षण पद्धतीचा अवलंब करावा असा आग्रह काही जेष्ठ समाजशास्त्रज्ञांनी धरला असला तरी संशोधनात मोठया प्रमाणात प्रश्नावली पद्धतीने माहिती गोळा केली जाते. त्यात अनेक वैगुण्ये राहतात. संकलित केलेली माहिती विश्वासार्ह असेलच असे नाही. अर्धवट व चुकीच्या पद्धतीने केलेले तथ्य संकलन हे या संशोधनातील प्रमुख वैगुण्य आहे. याचा प्रत्यय अलिकडच्या काळात पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेल्या प्रबंधामध्ये प्रामुख्याने येतो. (हा विषय एका स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो).

सुरूवातीच्या भारतीय समाजशास्त्रावर पाश्चिमात्य समाजशास्त्रातील सैद्धांतिक विचारांचा प्रभाव मोठया प्रमाणात पडलेला होता त्यातील संरचनात्मक—कार्यात्मक पद्धतीचा वापर अनेक भारतीय समाजशास्त्रांनी आपल्या संशोधनपर लिखाणात केला असे म्हटले जाते. ही अभ्यासपद्धती सहज सोपी अशी आहे. ती कोणाची बौद्धिक मक्तेदारी नाही. भारतीय समाजशास्त्रज्ञांनी त्या पद्धतीचा वापर केला असे म्हणण्याऐवजी त्यांच्या संशोधनातून त्या पद्धतीला पुष्टी मिळाली असे म्हणता येईल. अनेक भारतीय समाजशास्त्रज्ञांनी पाश्चिमात्य सैद्धान्तिक प्रमाणाला विरोध केला असला तरी भारतीय समाजशास्त्र स्वत:चे असे सिद्धांत निर्माण करू शकले नाही ही वस्तुस्थिती आहे. श्रीनीवास यांनी प्रचलित केलेल्या 'संस्कृतीयझेशन' 'वेस्टलायझेशन' ही अध्यनयात्मक तुरळक उदाहरणे. असे कां घडले असावे याची ही कारण मीमांसा करणे शक्य आहे. भारतीय समाज प्रदीर्घ इतिहास असलेला, विविध प्रादेशिक भाषिक संकटामध्ये विभागलेल्या आदिवासी, ग्रामीण, शहरी असा संमिश्र स्वरूपांचा आहे. अशा समाजांचा अभ्यास कोणत्याही विशिष्ट अशा संशोधन पद्धतीचा अवलंब करून करणे आणि त्यातून सार्वत्रिक वापरासाठी योग्य अशा सैद्धांतिक संकल्पना निर्माण करणे हे जवळजवळ अशक्यप्राय. अगदी भारतीय खेडयाचे उदाहरण घेतले तरी भारतीय खेडयांच्या रचनामध्ये प्रचंड वैविध्य आहे. त्यांच्यात सारखेपणा नाही त्यामुळे भारतीय समाजाचे समाजशास्त्र हे प्राधान्याने विश्लेषणावर भर देणारे असल्याने सैद्धांतिक बांधणी दुरापास्त आहे.

भारतातील विविध विद्यापीठांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या पदवी व पदव्युत्तर परीक्षांच्या अभ्यासक्रमांमध्ये व पुरस्कृत केलेल्या दुर्मिळ पुस्तकांमध्ये तसेच संशोधनामध्ये प्रसिद्ध झालेल्या लिखाणांमध्ये अनेक वैगुण्ये आढळून येतात. इथे त्यासबंधी सविस्तर चर्चा करणे शक्य नाही. मी इथे एकच मुद्दा मांडतो.

प्रादेशिक भाषेच्या माध्यमातून शालेय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना समाजशास्त्र विषयाच्या आकलनात, अध्ययनात आणि त्या विषयासबंधी विचार यांच्यात येणाऱ्या अडचणी जशजशा प्रकट स्वरूपात मांडण्यात येवू लागल्या, तसतसा हा विषय पदवी पातळीवर शिकण्यासाठी इंग्रजी ऐवजी प्रादेशिक भाषेचा वापर वाढत्या प्रमाणात होवू लागला. हे विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीही प्रादेशिक भाषेच्या माध्यमातून मागणी करू लागले. महाराष्ट्रात बहुतेक सर्व विद्यापीठांमध्ये पदवी व पदव्युत्तर पातळयांवर पूर्णपणे अथवा अशंत: मराठी माध्यमाचा उपयोग केला जावू लागला. परिणामी इंग्रजीतील महत्वपूर्ण समाजशास्त्रीय ग्रंथांचा अध्ययन अध्यापनातील वापर कमी झाला. घाई घाईत लिहिलेली कोणतेही पूर्व मूल्यमापन न झालेली सदोष पुस्तके वापरात येवू लागली. समाजशास्त्रीय अध्ययन—अध्यापनाचा दर्जा नि:संशय घसरला. पीएच. डी. प्रबंधही मोठया प्रमाणात प्रादेशिक भाषांमध्ये लिहिले जावू लागले. संदर्भासाठी इंग्रजी भाषेतील ग्रंथाचा व लिखाणाचा होत असलेला वापर कमी झाला. प्रबंधाचे परीक्षकही प्रादेशिक भाषिकच. प्रादेशिक भाषेत लिहिलेल्या संशोधनपर लेखनाला प्रसिद्धीसाठी आवश्यक असलेल्या दर्जेदार नियतकालिकांची वानवा भासू लागली. हे सर्व होत असतांना इंग्रजी भाषेतून समाजशास्त्राचे अध्ययन, अध्यापन व संशोधन करणाऱ्या मातब्बर अशा समाजशास्त्रज्ञांच्या गटाचे वेगळेपण ठसठशीतपणे जाणवू लागले. सद्यस्थितीत समाजशास्त्राच्या अभ्यासकांमध्ये इंग्रजीतून अध्यापन, संशोधन, लेखन करणाऱ्या मातब्बरांचा एक वर्ग आणि प्रादेशिक भाषेतील अभ्यासकांचा एक वर्ग असे दोन वेगवेगळे पण जाणवण्याजोगे अस्तित्व असलेले गट निर्माण झाले आहेत. त्यांना जोडणारे दुवे निर्माण होणे अशक्य नसले तरी अवघड आहे. ही स्थिती समाजशास्त्राच्या सातत्य व समृद्धी यासाठी पोषक अशी नाही. ही स्थिती कशी बदलता येईल यासंबंधी सर्व संबंधितांनी अन्तर्मूख विचार करायला हवा.

# भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे

**डॉ. पी. जी. जोगदंड**, माजी, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई

भारतीय समाजशास्त्राच्या अध्ययनास शंभर वर्षे म्हणजे एक शतक पूर्ण झाले. शंभर वर्षाच्या कालावधीत कोणती संशोधनं झाली? समाजशास्त्राचा विकास कसा झाला? सद्य:स्थितीत समाजशास्त्रासमोर कोणती आव्हाने आहेत, याची चर्चा प्रस्तुत शोध निबंधामध्ये मी करणार आहे.

भारतात समाजशास्त्राची सुरूवात समजून घेण्यासाठी आपल्याला राधाकमल मुखर्जी, जी. एस. घुर्ये, धुरजाती प्रसाद मुखर्जी, बेलादत्त गुप्ता, एन. के. बोस, डी.एन. मजुमदार, एम. एन. श्रीनिवास व इतर समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या कार्याचा धांडोळा घ्यावा लागतो. खऱ्या अर्थाने भारतीय समाजशास्त्राची सुरूवात पेट्रीक गेडीस् यानी मुंबई विद्यापीठात केली आहे. ते मुंबई विद्यापीठात प्राध्यापक म्हणून १९१९ साली रूजू झाले व १९२४ सालापर्यंत कार्यरत राहीले. मानव्यविद्या, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, खाणकाम, स्थापत्यशास्त्र व समाजशास्त्र या विषयांचे त्याना ज्ञान होते. सिध्दांत, पध्दतीशास्त्र आणि संकल्पनात्मक चौकट साकारण्याचे काम या व्यक्तीने केले असे दिसते. सामाजिक वास्तव जाणून घेण्यासाठी नैतिक, सामुदायीक, वैश्विक व बहुविद्याशाखिय दृष्टिकोण असला पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. त्याकाळी पेट्रीक गेडीस् चा विचार मुंबई विद्यापीठातील 'सिनेट' ला रूचला नाही म्हणून सिनेट नी समाजशास्त्र विभागाची जबाबदारी जी. एस. घुर्ये यांच्याकडे सोपविली. घुर्ये संस्कृत व मानववंशशास्त्रात निष्णात होते. घुर्ये यांच्या नेतृत्वाखाली समाजशास्त्राच्या अध्यापनाची सुरूवात भारतप्राच्यविद्या (Indology) व अनुभवजन्यता (empiricist) अंगाने सुरू झाली. नंतर अभ्यासकांनी जातिव्यवस्था, नातेदारी, कुटुंब आणि धर्म या सामाजिक संस्थात होणाऱ्या परिवर्तनाचे संशोधन केले. Book view (Indology) प्राधान्य न देता Field view ला प्राधान्य दिले गेले. (empirical investigation) समुदायांचा अभ्यास करण्यासाठी प्रजातीकेंद्री (ethnographic) परिप्रेक्षांचा आधार घेऊन सहभागी निरीक्षणाचा अवलंब केला. परिणामी insider's perspective विकसित झाला.

आपल्या देशात 'समाजशास्त्र स्कूल' विकसीत करण्याचा प्रयत्न झाला पण खऱ्याअर्थाने समाजशास्त्र विभागांना स्कूल म्हणता येत नाही. सुसंगत सैध्दांतिक परिप्रेक्ष सामुदायीक पातळीवर निर्माण करून तो जोपासणे व त्यातून ज्ञानमीमांसा करणारा समुदाय (epistemic comunity) तयार करणे हे स्कुलच्या निर्मितीसाठी आवश्यक ठरते. उदा. शिकागो स्कुल व फ्रंकफर्ट स्कुल. म्हणून Bombay school वा Lucknow school संबोधन योग्य नाही. तथापि, ते संविधानिक विभाग (statutory departments) होते.

ए. आर. देसाई यानी भाारतीय समाजाचे विश्लेषण करताना मार्क्सवादी दृष्टिकोण वापरला. समाजातील बदल जाणून घेण्यासाठी या दृष्टिकोणाचा खुबीने वापर केला गेला. सामुदायिक संशोधनावर भर देवून नवीन अभ्यासक्रम तयार करण्यासाठी देसाई ने अनेक उपक्रम राबविले. नवीन तंत्र/पध्दतीची त्यांनी निर्मिती केली. त्यामुळे परंपरावादी दृष्टिकोणाचा मुकाबला करण्यासाठी संघर्ष सिध्दांताचे हत्यार हातासी आले. देसाई प्रमुख असतांना समाजशास्त्र विभागात 'culture of criticality' ला प्रोत्साहन मिळाले. मार्क्सवादी विचारप्रणालीवर वाद–विवादासाठी पोषक वातावरण त्यांनी तयार केले. इरावती कर्वे, वाय. बी. दामले, डी. एन. धनागरे व उत्तम भोईटे यांच्या नेतृत्वाखाली समाजशास्त्राचा विकास पुणे विद्यापीठात झाला. दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू विद्यापीठात योगेंद्र सिंग, टी. के. ओमन व इतर मंडळीनी सेंटर मध्ये culture of critical thinking निर्माण केली. समकालीन आव्हानांना भिडण्यासाठी नवीन terminology तयार केली. आधुनिक भारताकडे बघण्याची दृष्टी systemic perspective च्या माध्यमातून विकसीत केली.

१९६० च्या दशकात समाजशास्त्र बडोदा, जयपूर, म्हैसूर, चंदिगड इ. ठिकाणी नावारूपास आले. Delhi school of Economics येथे श्रीनीवास यांच्या योगदानाची चर्चा भारतात व भारताबाहेर आली. सांस्कृतीकरण, पाश्चिमात्यिकरण, प्रबळजात संकल्पना याची चर्चा खूप झाली.

लुई डयूमा व डी. एफ. पोकाक यांनी contributions to Indian sociology या नियतकालीकातून ठोस चर्चा घडऊन आणली. डयूमा यांनी 'पवित्र व अपवित्र' हे तत्व सामाजिक संबंध व इतर गतिविधि मध्ये अहंम भूमिका बजावतात असे प्रतिपादन केले. Home Hierarchicus (1970) या प्रसिध्द ग्रंथातून हिंदू समाज व भारतीय समाजशास्त्राची सखोल चर्चा केली आहे.

१९५० व १९६० या दशकात अनेक लघु अभ्यास झाले. उदा. जात, एकत्र कुटुंब पध्दती, खेडे इ. या स्टडीज मध्ये संशोधकांनी संरचनात्मक प्रकार्यात्मक परिप्रेक्षाचा अवलंब केला. आंतरजातीय संबंध व गतीशिलता यांचा अभ्यास करण्यासाठी सांस्कृतीकरण, पाश्चिमात्यिकरण, प्रबळजात या संकल्पनाचा आधार घेतला. खेडयांचा स्टडीज मध्ये स्तरीकरण, सामाजिक गतिशिलता, नेतृत्व, जजमानी पध्दत (दाता–याचक संबध), ग्रामीण व नागरी समुदायांचे वैशिष्टये व त्यांचे बाहेरील जगाशी संबंध यांचा अभ्यास केला.

२० व्या शतकात शेवटी संशोधनाचा कल प्रकार्यात्मक सिध्दांतापासून संघर्ष सिध्दांताकडे वळला. वुमन स्टडीज मोठया प्रमाणावर झाल्या. सामाजिक चळवळी, नागरी समाजशास्त्र. वैद्यकीय समाजशास्त्र, विधी समाजशास्त्र, औद्यौगिक संबंध यांची ही सुरूवात झाली. अगदी सुरूवातीपासून 'Indigenization of Sociology' OR 'Sociology for India' यावर खूप साधक–बाधक चर्चा झाली. वाद विवाद घडून आले. भारतीय समाजाची (विशिष्टता) जाणून घेण्यासाठी धर्मग्रंथ लेखन Scriptural writings पुरेसे आहेत. ही चर्चेची एक बाजु तर दुसऱ्या बाजुला पाश्चिमात्य संकल्पना, सिध्दांत व पध्दतीशास्त्र जाणून घेण्यासाठी अपुरे आहेत. तथापि, बहुतांश अभ्यासकांनी पाश्चिमात्य संकल्पनाचा, प्रारूपचा व वर्णनात्मक पध्दतीचा अंगीकार केला.

स्वातंत्र्यपूर्व समाजशास्त्र हे वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, विकासात्मक, तुलनात्मक आणि विशिष्टता यावर भर देणारे होते. तर स्वातंत्र्यानंतर प्रकार्यात्मक, तार्किक – तत्वज्ञानात्मक, तुलनात्मक ऐतिहासीक यावर फोकस राहीला.

योगेंद्र सिंग यांनी समाजशास्त्राच्या विकासाचे चार टप्पे अधोरेखीत केले आहेत. १. १९५२ ते १९६० तत्वज्ञानात्मक. २. १९६० ते १९६५ सांस्कृतिक. ३. १९६५ ते १९७० संरचनात्मक आणि ४. १९७० ते १९७७ ऐतिहासीक व्दंव्दात्मक.

संरचना प्रकार्यात्मक संयोगासाठी सिंग आग्रह धरतात. भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी रामकृष्ण मुखर्जीनी 'समकालीन' व 'निदान सूचक' परीपेक्ष चा आग्रह धरतात. अनुभवजन्यपध्दतीने What, how & why प्रश्न विचारून सामाजिक बदल व विकास यांचा योग्य अभ्यास करता येईल अशी त्यांची धारणा होती. निदान

सूचक (diagnostic perspective) परीप्रेक्षाचा आग्रह धरून खालील प्रकारचे प्रश्न उपस्थित केले. 1. What is it? (Enumeration of the phenomenon) 2. How is it? (Classification) 3. Why is it? (Causality) 4. What will it be? (Probability) 5. What should it be? (Desirability) These questions imply descriptive, explanatory, diagnostic and positivistic explanations.

७१२ संदर्भाच्या आधारे मुखर्जी यांनी सखोल अभ्यासाअंती समाजशास्त्रज्ञांची खालील प्रमाणे वर्गवारी केली आहे.

A) Pioneers - 1970 – 1940. B) Modernisers -1950. C) Insiders-1960. D) Pacemakers – 1970. E) Non-conformists -1970.

त्याचप्रमाणे योगेंद्र सिंग यांनी पण ७०० अभ्यासांच्या आधारे पाच प्रकारची सिध्दांतदर्शक वर्गवारी सूचविली आहे.

1. Structuralism. 2. Ethnosociology. 3. Structural. 4. Marxism. 5. Dimensional or systemic approach

अलीकडे टी. एन. मदन यांनी लखनौ विद्यापीठातील समाजशास्त्रज्ञांचा कालावधी पुढील प्रमाणे विषद केला आहे. राधाकमल मुखर्जी – १९८९ ते १९६८. डी. पी. मुखर्जी – १८९४ ते १९६१. डी. एन. मजुमदार – १९०३ ते १९६०. ए. के. सरन – १९२२ ते २००३.

१९९१ नंतर खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण संदर्भात खूप संशोधन – अध्यापन झाली. प्रामुख्याने सामाजिक गतिशिलता, स्थलांतर, वैश्विक डायस्पोरा, कल्याणकारी राज्याच्या मर्यादा, बाजार व व्यापार, नवीन सामाजिक चळवळी, नवीन असमानता इ. विषयावर खूप खल झाला.

त्याचप्रमाणे मागच्या ३० ते ४० वर्षात दलित, जेंडर, आदिवासी, सिमांतिक समुह Global - local यांचा जोरकसपणे अभ्यास होतांना आढळतो. LPG मुळे constitutional space कमी होत आहे असा ठोस निष्कर्ष समोर आला आहे.

भारतीय समाजशास्त्राचे सैध्दांतिकरण अनेक संशोधकांनी, अभ्यासकांनी केले पण भारतीय समाजाचे समग्र आकलन होण्यासाठी ठोस सिध्दांताची निर्मिती झाली नाही, हे वास्तव आहे. तथापी, संशोधनात अभ्यासक्रमाच्या प्रक्रियेत 'प्रबळ दृष्टिकोण' dominant perspective जाणीवपूर्वक निर्माण केल्याचे व तो राबविल्याचे अनेक दाखले मिळतात.

**ज्ञानाची निर्मिती करणारे व ज्ञानाचा प्रसार करणारे कोण मंडळी आहे?** : भारतीय समाजशास्त्राची एकमेव Legacy नसून अनेक Legacies आहेत. अगोदर म्हटल्याप्रमाणे समाजशास्त्र विभाग School नसून ते संविधानिक विभाग आहेत. अभ्यासात संरचना–प्रकार्यात्मक मुख्य विचारधारा मानली गेली म्हणून 'जैसे थे वादी' प्रवृत्ती जोपासली. या सर्व व्यवहाराला 'perspective from above' असे ही संबोधण्यात आले.

मागच्या ३०–४० वर्षात वरील परिप्रेक्षाला संशोधनात्मक प्रतिप्रश्न उपस्थित केले गेले. आपल्या समाजात core चा अभ्यास झाला, margin / periphery वरील समुहांचा प्रश्नांचा (issues) चा व त्यांच्या worldview चा अभ्यास झाला नाही. त्यांच्या विद्रोही चळवळी व अस्मिता निर्मितीचा अभ्यास झाला नाही. सिमांतीक समुहांचे चर्चाविदूव, ते पण ज्ञान निर्माते आहेत याला मान्यता मिळाली नाही. जाति निर्मुलन कार्यक्रमाला प्राधान्य मिळाले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाति निमूलनाच्या Annihilation of caste योगदानाची साधी दखल घेतली नाही. तथापि, सिमांतिक समुहांचा विचार victims म्हणून केला गेला. अभ्यासनिर्मितीच्या प्रक्रियेत Sociology of weaker sections, Marginalised communities, Dalit and Tribal studies इ. पेपर समाविष्ट केले ते ही ऐच्छिक म्हणून. core and periphery प्रमय व्यवहारात पण प्रतिबिंबीत झाले. परिणामी, आमचे प्रश्न, विचारप्रणाली, चर्चाविश्व icons यांना अभ्यासक्रमात स्थान न मिळाल्याने ही मंडळी नाराज झाली. आमचे विषय unaddressed राहीले म्हणून असंतुष्ट झाली.

या पार्श्वभुमीवर सैध्दांतिक व पध्दतीशास्त्र विकसीत करण्यासाठी प्रयत्न झाले. या प्रयत्नालाच 'perspective from below' किंवा ' Non-Brahminical perspective' असे संबोधण्यात आले.

'Dalit intellectuals collective' या विचारपिठातर्फे टिकात्मक चर्चाविश्व, counter culture तयार होतांना दिसत आहे. स्वत:च्या संकल्पना पध्दतीशास्त्र, जाति निर्मूलनाचा कार्यक्रम, अस्मितेचा प्रश्न, लोकशाही संस्थामध्ये प्रतिनिधीत्वाचा प्रश्न, वैज्ञानिक दृष्टी निर्माण करण्यासाठीचे प्रयत्न इ. प्रश्नाभोवती वरील परिप्रेक्षाची घडण होतांना दिसत आहे.

समाजशास्त्रात सिमांतीक समुहांचे प्रश्न वर्जित कां झाले? किती समाजशास्त्रज्ञांनी दलित वस्तीमध्ये राहून – जसे महारवाडा, मांगवाडा, चांभारवाडा, चेरी– संशोधन केले. म्हणूनच २४ टक्के समुहाचे विश्व आमच्या अभ्यासकाला माहित नाही असा अर्थ निघतो. खरे बघितले तर समग्र भारत देश समजाऊन घ्यायचा असेल तर perspective from below चे स्वागत केले पाहीजे All inclusive society निर्माण होणे अत्यावश्यक आहे.

"Culture of silence to culture of voice" असा या परिप्रेक्षाचा प्रवास आहे.

**आव्हाणे :–** १. भारतीय समाजशास्त्रज्ञानी देशा अंतर्गत निरंतर असमानता, नवीन असमानता याविषयी जागरूक असणे गरजेचे आहे. नवीन गरिबा विषयी (New poor) संवेदनशील असायला हवे. असमानतेच्या (why, how and whom) हे प्रश्न उभे करून कारणे, प्रक्रिया व अत्याचारपीडितांच्या प्रश्नावर भूमिका घेतली पाहिजे. २. समाजशास्त्र विषय (easy and soft) आहे असा गोड गैरसमज समाजात आला आहे. याची गांभीर्याने दखल घेऊन दर तीन वर्षांनी अभ्यासक्रम बदलने अत्यावश्यक आहे. ३. Theoretical Foundation फारच कमजोर आहे. ४. शंभर वर्षात सामाजिक संस्थामध्ये परिवर्तन होत आहे. उदा. जातिव्यवस्था. जात बदलत आहे. जातिची व्यवस्था (caste system) नाहिशी झाली आहे. जजमानी व्यवस्था विघटीत झाली आहे. From hierarchy to difference असा बदलाचा रोख आहे. प्रबळ जातीचे विघटन होऊन प्रबळ पृथक व्यक्ति निर्माण झाल्या आहेत. तसेच कुटुंब, विवाह संस्था, व धर्मसंस्था बदलल्या आहेत. नेमके काय बदलले व काय बदलत नाही याची चर्चा संशोधनात झाली पाहीजे. ५. Methods, Methodology व epistemology ची सांगड घालुन संशोधन झाले पाहिजे. ६. प्रादेशिक समाजशास्त्र मंडळ फक्त प्रादेशिक भाषाला व प्रश्नाला जास्त महत्व देतात. राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय विषयाची चर्चा होत नाही. प्रादेशिक साधनसामुग्री उपलब्ध नाही ही एक अडचण आहे. ७. आरक्षण धोरण, मानवी हक्क, दलित आदिवासींचे प्रश्न, जात–अस्पृश्यता, सिमांतिक समुह, सामाजिक वर्जन इ. विषयावर बहुतांश दलित अभ्यासक संशोधन करतांना दिसतात. ८. जागतिकिकरणाच्या झपाट्यात funding चा फार मोठा यक्ष प्रश्न तयार झाला आहे. ९. खाऊजा युगात हुशार व होतकरू विद्यार्थी समाजशास्त्र विषयाकडे फारसे येत नाहीत. त्याकरिता बाजार व व्यापाराची गरज लक्षात घेता नवनवीन अभ्यासक्रम तयार करणे काळाची गरज आहे. १०. सर्व समावेशक All inclusive sociology समाजशास्त्र निर्माण करावे लागेल.

*संदर्भसूची :–*


1. *Chaudhuri Maitrayee (Ed.) The Practice of Sociology, Orient Longman, Hyderabad, 2003.*
2. *Patel Sujata (Ed.) Doing Sociology in India, Oxford University Press, New Delhi, 2011.*
3. *Singh Yogendra Indian Sociology, Rawat Publications, 2017.*
4. *Sharma K.L. "Indian Sociology at the Threshold of the 21st Centaury: some observations" Sociological Bulletin, 68(1) 7-24, 2019.*
5. *Jogdand P.G. & Kamble Ramesh "The Sociological Traditions and Their Margins: The Bombay school of sociology and Dalits", Sociological Bulletin, 62(2) May-August 2013.*
6. *Oomment T.K. "Understanding the Indian society: The relevance of perspective from below" (Occasional Paper Series-4) Dept. of Sociology, University of Pune, 1990.*
7. *Vivek Kumar "Situating Dalits in Indian Sociology" Sociological Bulletin, 54(3), Sept. , Dec. 2005.*
8. *Vivek Kumar "A Perspective from below - viewing social sciences from a Dalit perspective" BIBLIO: Sept.-Oct. 2006.*

# महाराष्ट्रातील सामाजिक चिंतन

**डॉ. जगन कराडे**, प्रोफेसर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचीन कालखंडापासून ते ब्रिटीश अथवा वासाहातिक कालखंडापर्यंतच्या महाराष्ट्रातील सामाजिक चिंतनाच्या वारशाचा व्यापक इतिहास सहयाद्रीच्या कडेकपारीतून उमटतांना दिसतो. आंग्लपूर्वकाल व आधुनिककाल असे महाराष्ट्राच्या इतिहासाचे दोन कालखंड पडतात. पहिला कालखंड मोठा म्हणजे ७०० वर्षांचा असला तरी, समाजरचनेच्या दृष्टीने, समाज घटकांमधील परस्परासंबंधाच्या दृष्टीने आणि मुलतत्वाच्या दृष्टीने त्या कालखंडात फारसे परिवर्तन झााले नाही. राज्यक्रांत्या झाल्या, उत्कर्षापकर्ष झाले, पण समाज जीवनाच्या कोणत्याच अंगात परिवर्तन झाले नाही, क्रांती तर मुळीच नाही.[१] परंतु इसवी सन १८ व्या शतकापासून विशेषकरून महाराष्ट्राच्या समाजिक क्षेत्रात ज्या दृष्टीने जी वैचारीक क्रांती झाली आहे, त्या क्रांतीचा वेग हा विशेष उल्लेख करता येण्यासारखा असल्यामुळे प्रस्तुत लेखात केवळ आधुनिक महाराष्ट्राच्या संदर्भातच समाजशास्त्रीय चिंतनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आधुनिक महाराष्ट्र राज्याची वैचारीकदृष्टीने भारतातील विविध राज्यातील सामाजिक विचारांशी तुलना केली तर, 'महाराष्ट्र' हे राज्य अग्रेसर असलेले दिसून येते. वासाहतिक कालखंडात आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक सत्याग्रह आणि आंदोलने यांची मालिका अधिक प्रमाणात महाराष्ट्रामध्येच झालेली दिसून येते कारण स्वातंत्र्याचा अनुभव महाराष्ट्राने बराच काळ घेतला असल्यामुळे इंग्रजी अंमल दृढ झाल्यानंतर स्वातंत्र्यसंपादनासाठी इंग्रजिविरूद्ध झगडा देण्याची प्रक्रिया जेव्हा सुरू झाली. त्यामध्येही महाराष्ट्रानेच पुढाकार घेतला. एकोणिसाव्या शतकांत इंग्रजी सत्तेविरूद्ध असंतोष व्यक्त करण्याचे जे अनेक प्रयत्न झाले, त्या प्रयत्नामध्ये महाराष्ट्राचा मोठा सहभाग होताच हे तात्या टोपे, नानासाहेब किंवा राणी लक्ष्मीबाई यांच्या कामगिरीवरून उघड दिसते. त्याशिवाय संघटितरित्या इंग्रजी सत्तेबरोबर दोन हात करण्याचे अनेक प्रयत्न महाराष्ट्रामध्येच झाले. यामुळेच महाराष्ट्राला वैभवशाली इतिहास आहे असे मानले जाते. महाराष्ट्रास संताची भूमी म्हणूनही ओळखले जाते असे असले तरी, संताच्या कार्याच्या योगदानाचा विचार करीत असतांना, त्यांच्या कार्यांने भारतीय समाज व्यवस्थेमध्ये बलदंड असणाऱ्या 'धर्म' आणि 'जात' व्यवस्थेमध्ये रचनात्मक बदल घडला नाही हे मान्य केले तरी, त्यांच्या कार्याने परिवर्तनाचे बिज रूजविण्यासाठी कठीण असणाऱ्या 'धर्म' आणि 'जात' व्यवस्थेस किरकोळ प्रमाणात का होईना हादरे नक्की बसले.

मराठी सत्तेच्या उदयापुर्वी अत्यंत अस्थिर आणि अंदाधुदीची परिस्थिती असणाऱ्या मुसलमानी राजवटीत काही मराठी कर्तबगार सरदार मंडळी उदयास आली आणि त्यांनी या मुसलमानी सत्ताधिशांकडे चाकरी करणे पत्करले. उदाहरणार्थ, जाधव, भोसले, निंबांळकर, जेधे, मोरे, घाटगे, माने, डफळे, सावंत इत्यादी मातब्बर सरदार निजामशाही अथवा आदिलशाही चाकरी इमान–इतबारे करीत होती.[२] या काळात अनेक शेतकरी शेतीसाऱ्यावरून हवालदील झाले होते आणि या कारणामुळेच मुस्लिम राजवट जाचक आणि पिळवणुक करणारी ठरत असल्याने मुस्लिम सत्तेच्या जुलूमापासून समाजास मुक्त करण्याच्या इराद्याने शिवाजी महाराजानी स्वराज्य स्थापन करून अष्टप्रधानांच्यामार्फत राज्यकारभार चालविला. या सत्तेनंतर पेशव्यांचे राज्य झाले आणि जनतेची सेवा करण्याऐवजी विलासी जीवन जगण्याचा घाट पेशव्यानी घातला आणि पेशवाई बूडून गेली. यानंतरच्या काळात व्यापार करण्यासाठी भारतात आले. आपली सत्ता प्रस्थापित करीत असतांना प्रारंभीच्या काळात, अंतर्गत बाबीतीत कोणतीही ढवळाढवळ न करणे असेच धोरण ठेवले. त्यानुसार इथल्या सामाजिक, धार्मिक परंपरांना त्यांनी धक्का लावला नाही अथवा यावर कोणतेही भाष्यही केले नाही. काहीसे प्रभुत्व प्रस्थापित झाल्यानंतर मात्र, इथल्या समाजव्यवस्थेवर चिंतन करायला सुरूवात केली. त्यामध्ये १८५७ साली बंगालमध्ये भारतीय सेवेमध्ये प्रवेश करणारे मानववंशशास्त्रज्ञ हर्बर्ट रिस्ले यांनी केलेल्या संशोधनाअंती Caste and Tribes of Bengal (1991) हा ग्रंथ लिहून सामाजिक चिंतनास चालना दिली असे म्हणता येईल.

भारतीय समाजाचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे इथल्या जाती, उप–जातीनुसार सामाजाची विभागणी खूप मोठया प्रमाणात झालेली दिसून येते. यामुळेच त्यांच्यामध्ये रोटी–बेटी व्यवहार अथवा इतर सांस्कृतिक व्यवहार होत नव्हते व बहुतांशी आजही होतांना दिसत नाहीत. एकंदरीत भारतीय समाजाचे जातीव्यवस्थेमुळे अपरिमीत नुकसान झाले असल्यामुळे जातीव्यवस्थेवर शास्त्रीय दृष्टीकोणातून अनेक लेखक, संशोधकांनी प्रकाशझोत टाकला. याच जातीव्यवस्थेतून अनेक संघर्ष झालेले दिसून येतात, यासंदर्भात इंग्रज राज्याच्या प्रारंभकाळी सर्व अधिकाराच्या व प्रतिष्ठेच्या जागा ब्राम्हणांच्या हाती होत्या त्यामुळे ब्राम्हण हा बहुजनांचा शत्रु आहे असे दिसू लागले. पुढे या जागा मराठाच्या हाती येताच त्यांची जातीय भावना व जन्मनिष्ठतेचा अहंकार असाच उफाळून आला आणि त्यांनीही ब्राम्हणाच्या जागी येऊन तेच केले.[३]

जेव्हा जातीय प्रश्न समोर येवू लागला तेव्हा तेव्हा कळतनकळतपणे ग्रामीण आणि शहरी प्रश्नांचा वाद समोर येवू लागला. त्यामुळे एका बाजूने ग्रामीण तर दुसऱ्या बाजूने जातीय चळवळीचे चिंतन होवू लागले. ग्रामीण भागाच्या विकासातील अंर्तविरोध आणि अंर्तप्रेरणा यांचे मूल्यमापन यावर आधारीत सामाजिक चिंतन होवू लागले आणि एकाच खेडे गावाचा अभ्यास हा संशोधनाचा विषय घेवून थॉमस कोटस यानी 'लोणी' या गावाचा अभ्यास केला.[४] यानंतर मामलेदार असलेल्या त्र्यंबक नारायण अत्रे यांनी 'गांवगाडा' या ग्रंथात खेडे गावातील समाज रचना तसेच सामाजिक संबंधाचे विश्लेषण सदर ग्रंथात केले आहे. हे ग्रंथ प्रमाण मानूनच ग्रामीण समाजातील आत्ताचे परिवर्तन लक्षात घेतले जाते. तसेच भारतातील लोकसंख्येची माहिती संकलित करण्यात महत्वाची भुमिका असणारे J. H. Hutton यांनी भारतातील समाजव्यवस्थेसंबंधी सविस्तर लिखाण करणारे एन्थोवेन[५] अबे दुबे[६] हे विद्वत परकीय असले तरी, यांनी केलेल्या समाजशास्त्रीय चिंतनाचा आधार आजही प्रमाणभूत मानला जातो. यासारख्यांच्या लिखाणातून सामाजिक चिंतनाचा भाग असल्यामुळे भिन्न सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा घेवून आलेल्या समाजामध्ये कोणते परिवर्तन घडून येत आहे.? तसेच त्या परिवर्तनाची दिशा कोणती? एखाद्या घटनेमागे कोणकोणते दृष्टीकोन संबंधीत असतात? आणि विशेष करून सामाजिक दृष्टीकोन काय असू शकतो? हे जाणून घेण्यासाठी विविध सामाजिक शास्त्रामध्ये आंतरीक सहकार्य अपेक्षित असले तरी, तसे ते दिसून येत नव्हते. आणि विशेषत: समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून पहाणाऱ्यांच्या मतांकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. आजही त्यात फारसा बदल झालेला आहे असे वाटत नाही. याबाबतीत डॉ. द. ना. धनागरे म्हणतात की, 'प्रत्येक सामाजिक चळवळीस एक राजकिय बाजू किंवा अंग असते तसेच प्रत्येक राजकिय चळवळीत काहींना काही सामाजिक आशय असतो. शिवाय प्रत्येक चळवळीचे आपले अंतर्गत राजकारण असते'.[७] ही बाब जर विचारात घेतली तर, एखाद्या प्रश्नांचे विविध परिप्रेक्ष, आशय

विश्लेषण भिन्न असले तरी, त्या प्रश्नामागील आशय भाव लक्षात घेण्यासारखा असतो.

इंग्रजी सत्तेच्या कालावधीत असलेल्या स्थैर्यास समाज 'आदर्श व्यवस्था' असे समजून चालत होती. त्याचवेळी बदल अथवा परिवर्तन हा सुद्धा समाजव्यवस्थेचा स्थायी भाव असून शकतो हे समाजाने पूर्णपणे विसरले होते. त्यामुळे त्यावर कोणी समाजशास्त्रीय चिंतन करून नविन भाष्य करीत नव्हते तर, त्याकडे डोळेझाक करीत होते. ज्यांना–ज्यांना इंग्रजी शिक्षण मिळू लागले, त्यांना–त्यांना स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव या प्रकारच्या नवीन सामाजिक संकल्पनाची जाणीव होवू लागली. व्यक्तिला विचार–उच्चार–आचाराचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे असे मनोमनी वाटू लागले. यातूनच बालविवाह, पुर्नविवाहबंदी या रूढी नष्ट झाल्या पाहिजे, पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षण मिळाले पाहिजे. व्यक्तिला आपला इच्छेप्रमाणे कोणताही व्यवसाय करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. या तऱ्हेचे विचार हाच बहुतेकांच्या प्रतिपादनाचा सारांश होता. दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रम्हचारी, न्यामुर्ति रानडे आणि ज्योतीबा फुले हे या पिढीतले प्रमुख पंडित आणि कर्ते समाजसुधारक होते.[८] म्हणून गणले गेले. 'न्यायमुर्ती रानडे यांनी सुधारणेच्या क्षेत्रांत महाराष्ट्राला पहिला मोठा विचार शिकविला तो हा की, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण व समाजकारण ही समाजाची भिन्न अंगे परस्परांशी अगदी संबंधीत अशी आहेत'.[९] या विचारातुनच एखाद्या घटनेमध्ये विविध अंगे अथवा परिप्रेक्ष असतात आणि ती अंगे आपण तपासयला हवीत. यामुळेच नंतरच्या काळात सामाजिक शास्त्रामध्ये आंतरसंबंधीय संशोधनात मोकळीक मिळाली.

इंग्रजांनी स्थापन केलेली विद्यालये व विद्यापीठातून समाजसुधारणेला मोठीच चालना मिळाली. आणि त्यामुळेच क्रांतीच्या प्रणेत्यांची एक मोठी तेजस्वी परंपरा महाराष्ट्रांत निर्माण झाली होती असे दिसुन येते. सुरवातीचा उत्साही सुधारणावाद पुण्यात आणि मुंबईत केंद्रीत झाला होता आणि त्यामध्ये ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर असे दोघेही सामील झाले होते. वैचारीक पातळीवर, १८४८ मध्ये गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी या ब्राम्हणी घराण्यातील उमराव असलेल्या गृहस्थांनी धार्मिक अज्ञानाला कवटाळून राहण्याच्या वृत्तीवर कडाडून हल्ले चढविण्यास सुरवात केली आणि मुंबईचे भंडारी पुढारी तुकाराम तात्या पडवळ यांनी आपण स्वत: प्रसिद्ध करीत असलेल्या जातिभेद विवेकसार या नियतकालिकातून १८६१ साली जातिसंस्थेवर हल्ले करावयास सुरुवात केली. परंतु असे असुनही या सर्व चळवळीत एक फार मोठे वैगुण्य प्रारंभापासुनच होते आणि त्यामुळे महाराष्ट्रात अवश्य ती सामाजीक क्रांती होऊ शकली नाही. ते वैगुण्य म्हणजे या सामाजीक चळवळीच्या अग्रभागी सर्वत्र दादोबा पांडुरंग, ज्योतिबा फुले असे एक दोन नेते सोडले तर बाकीचे जांभेकर, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रम्हचारी, रानडे यासारखे ब्राम्हण समाजाचे लोक होते.[११]

खऱ्या अर्थाने आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण महात्मा जोतिराव फुले यांच्यापासून सुरू होते कारण सामाजिक सुधारणेच्या बाबतीत आज तो महाराष्ट्र अग्रेसर आहे त्याचे सर्व श्रेय जोतिबा फुले यांचेकडे जाते कारण जोतिबा फुले यांनी सुरू केलेले स्त्री शिक्षणाचे कार्य तत्कालिन रूढीवादी समाजाला रूचणारे नव्हते. स्त्रीशिक्षणाकरीता शाळा सुरू करणे, तसेच अस्पृश्यांना पिण्याच्या पाण्यासाठी आपला खाजगी हौद खुला करणे तसेच परितक्त्यांचा प्रश्न सामाजिक संरचनेमध्ये बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने १८७३ साली महात्मा फुले यांनी सत्यशोध समाजाची स्थापना केली व तेथूनच या चळवळीस प्रारंभ झाला. या जातीव्यवस्थेचे उच्चाटन करून ब्राम्हणेत्तर समाजाला ब्राम्हणी वर्चस्वातून मुक्त करावे असा त्यांचा हेतु होता. महात्मा जोतिबा फुले यांनी सुरू केलेल्या स्त्रिशिक्षणातून तीन वर्षे विद्यार्थिनी असणारी कु. मुक्ता साळवे (मांग) हिने वयाच्या १४ व्या वर्षी मांग–महाराच्या दु:खाविषयी निबंध लिहीला.[१२] या निबंधावरून हिंदू–धर्माच्या प्रभावाखाली कनिष्ठ मानल्या गेलेल्या लोकांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती व त्यांना देण्यात येणाऱ्या भोदभावाच्या वागणूकीची साक्ष मिळते. या निबंधानंतर स्त्रियांचे लेखन प्रसिद्ध होऊ लागले. या दरम्यान सुमित्र (१८५५), स्त्री भूषण (१८६४), स्त्री–ज्ञान प्रदीप (१८६९), स्त्री ज्ञानप्रबोध (१८७०) अबला मित्र (१८७६), आणि स्त्री बोध चिंतामणी (१८८१) ही नियतकालिके स्त्रियांच्यासाठी सुरू झालेली होती.[१३] यामधून प्रबोधन मोठया प्रमाणात सुरू होवून समाजव्यवस्थेतील स्त्री घटकास स्वातंत्र्याच्या दृष्टीकोणातून बळ मिळू लागले. या काळातच सावित्रीबाई फुले, पंडीता रमाबाई, रमाबाई रानडे असे अपवाद वगळले तर, मराठी स्त्रियांच्या उद्धाराकरीता त्यांचे बांधवच पुढे आले होते. सुधारकी विचारांच्या पुरूषांनी आपापल्या घरातील स्त्रियांना साक्षर केले, मुलीना शाळेत घातले. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या का होईना मुली कॉलेजात शिकू लागल्या. त्यातूनच काही मराठी लेखिका पुढे आल्या व त्यांनी स्त्रियांचे प्रश्न व दु:खे आपल्या लेखनातून मांडण्यास सुरूवात केली. सन १९ व्या शतकात ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री–पुरूष तुलना' या छोटया निबंधामध्ये सर्वसामान्य स्त्रियांच्यावरील धार्मिक बंधनाचे वर्चस्व आणि स्त्रियांचे सामाजिक प्रश्न किती भयानक होते याचे विस्तृतपणे वर्णन केलेले दिसून ये ते आजही दबलेल्या स्त्रियांना प्रेरणादायक आहे.

ज्या भारतीयांनी इंग्रजी शिक्षण घेण्यास सुरूवात केली, त्यांच्या मनात नव्या जाणीवा, नवे विचार रूजू लागले. या जाणीवांमुळे पाप–पुण्याच्या संकल्पना, धर्मकर्माच्या वल्गना व्रतवैकल्यांच्या पद्धती दुरू करावयास हव्यात अशी विचारसरणी पुढे येउ लागली. अशा तरूण समाजसुधारकांच्या पिढीने अज्ञान, सतीपद्धती, पडदापद्धती आदि अनेक रूढी बंद करण्यासाठी प्रयत्न केले. मुलींच्या श्क्षिणाचे पहिले प्रयोग इथे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केले. यातील एक भाग म्हणून पाहिले तर असे दिसून यते की, 'अमेरिकन ख्रिस्ती मिशनऱ्यांनी इ. स. १८२४ मध्ये मुंबईला मुलींची पहिली शाळा सुरू केली. अहमदनगरलाही त्यांनी मुलींच्या दोन शाळा व बोर्डींग सुरू केले. या काळात जातीभेद व शिवाशिवीच्या कल्पना तीव्र असल्यामुळे मुलींना या शाळांत पाठवित नसत. तेव्हा मुलींच्या शिक्षणाकरीता मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन अगत्याचे होते. १८३० मध्ये पेशव्यांच्या जुन्या वाडयात अशा एका शाळेचा गुप्त प्रयोग इंग्रज अधिऱ्यांच्या परवानगीने केल्याचा उल्लेख बार्टल फ्रिअर यांच्या एका भाषणात आहे.[१४] यानंतर मुलींच्या शाळेची खरी सुरूवात जोतिबा फुले यांनी १८४८ साली पुण्यात केली. ही शाळा वर्षाअखेरीस बंद पडली. त्यानंतर अनेक अडचणींशी सामना करीत त्यांनी १८५१ मध्ये पुन्हा स्त्री–शिक्षणाचे कार्य सुरू केले. शिक्षणाचे कार्य अखंडपणे सुरू राहावे यासाठी जोतिबांनी सावित्रीबाईंना शिकविले. इतर स्त्रियांना शिक्षण देण्यास प्रवृत्त केले त्यामुळे सावित्रीबाईंना खूप त्रास सहन करावा लागला. त्यांना शाळेत जाता येतांना लोक शिव्याश्याप देत. दगड–धोंडे मारीत. चिखल, शेण इ. अंगावर फेकीत. तरीही न डगमगता त्यांनी आपले शैक्षणिक कार्य सुरूच ठेवले. याबरोबरच त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. तर सावित्रीबाईच्या प्रेरणेमुळे ब्राम्हण विधवांच्या

केशवपनाविरूद्ध नारायण मेघाजी लोखंडे यांनी नाभीकांचा संप घडवून आणला होता. महात्मा जोतिबा व सावित्रीबाई फुले यांच्या सर्व कार्याचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, स्त्री विषयक प्रश्नास अनेक बाजू होत्या त्याचा विचार करून फुले दांपत्यांनी कृतिशिलतेची जोड दिल्याने स्त्री उद्धाराचा मार्ग मोकळा झाला.

बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाराज, दादोबा पांडूरंग तर्खडकर, लोकहितवादी, जगन्नाथ शंकरशेठ ही सारी पुरोगामी विचारसरणीची मंडळी फुल्यांच्या समकालीन असली तरी, हे सारे भूतदयावादी होते. जोतीराव फुले हे प्रामुख्याने मानवतावादी असल्याने त्यांच्या हातून जे विधायक समाजकार्य अथवा शिक्षणविषयक कार्य घडले ते कौतुकास्पद आहे. म्हणून त्यांचा जनतेकडून १८८८ साली उस्फुर्तपणे सत्कार होवून 'महात्मा' ही भारतीय पहिली पदवी अर्पण केली आणि भारताचे ते पहिले महात्मा बनले.

इ. स. १८८५ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसचा जन्म झाला असला तरी, पहिल्या कॉग्रेसचे अधिवेशन मुंबईत होऊनही या अधिवेशनात स्त्रियांची गैरहजेरीच होती. यानंतर पुन्हा मुंबईस दुसरी राष्ट्रीय सभा मि. ब्राडलॉ यांच्या हजेरीत झाली. या सभेस मि. ब्राडलॉ यांची सुचना होती की, तुमची राष्ट्रीय सभा अजून मोठी झाली नाही तोच स्त्री प्रतिनिधी त्यात घेण्याची व्यवस्था करा असे सुचविल्याने पंडीता रमाबाईंनी फार प्रयत्न करून सात–आठ प्रतिनिधी तयार केले.[१५] अशा त–हेने पंडीता रमाबाईच्या नेतृत्वाखाली कॉग्रेसच्या अधिवेशनाला स्त्रियांनी हजर राहण्याचा पायंडा पाडला.

इ. स. १८८९ साली मुंबई येथे 'पंडीता रमाबाई' यांनी विधवा स्त्रियांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने 'शारदा सदन' या संस्थेची स्थापना केली. याचबरोबर इ. स. १८९८ मध्ये पंडीताबाईनी स्त्री–शिक्षण व निराश्रित स्त्रियांचे कल्याण करावे या उद्देशाने कडेगांव येथे मुक्ती सदनाची स्थापना केली. बालविवाह, केशवपन यासारख्या दुष्ट रूढींचा जाहीर निषेध करून त्यांनी विधवांच्या जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यास स्वत:ला वाहून घेतले. याच शारदा सदन संस्थेमधील बालविधवा 'बाया' हिच्याबरोबर 'महर्षि धोडो कर्वे' यांनी पुनर्विवाह केला. त्यानंतर 'अनाथ बालिकाश्रमाची मंडळ' या संस्थेची स्थापना करून विधवांच्या शिक्षणाला वाहून घेतले. पुढे यांनीच १९१५ साली श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली.[१७] त्यांच्या या कृतिमुळेच या विद्यापिठातून अनेक स्त्रियां शिक्षण घेवून ताठ मानेने जगू लागल्या आहेत.

'मुंबईतील स्त्री शिक्षणाच्या चळवळीत मुंबईतील पुढारी जगन्नाथ शंकरशेठ, डॉ. भाऊ दाजी लाड, माणिकजी शेठजी यांनी मदत केली. या शाळेतून मुलींची तुकडी इ. स. १८९० मध्ये मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रीकच्या परीक्षेला बसली. रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, पंडीत ताराबाई, महर्षि कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रयत्नाने इंग्रजी व मराठी शिक्षणाला गती मिळाली. न्यायमुर्ती रानडे व गोपाळराव जोशी, यांनी स्वत: आपल्या पत्नींना शिकविले, गोपाळराव जोशींची पत्नी आनंदीबाई या अमेरिकेत जाऊन वैद्यकशास्त्रात एम. डी. पदवी मिळविणाऱ्या भारतीतील आणि विशेषत: महाराष्ट्रातील पहिलीच महिला होय.[१८]

परंतु काही सिमीत सुधारकांनी सामाजिक परिवर्तनाचा मर्यादित विचार केला. उदा. ज्यांच्या आया–बहिणी ज्या प्रश्नांना सामोऱ्या जातात त्यांच्या विचार आणि तीच खरी सामाजिक चळवळ असे मान्य करून वागू लागले होते. इतर समाजातील स्त्रीयांसदर्भात अशा समाजसुधारकांनी चर्चा केली नाही की, अन्य सामाजिक प्रश्नास हात घातला नाही. तरीही किमान त्यांच्या जात समुहातील स्त्री मुक्तीचा विचार केला तोही त्याकाळी काही कमी नव्हता हे नम्रपणे मान्य करावे लागेल.

इंग्रजांच्या काळातच समाजशास्त्रज्ञ, भाषाशास्त्रज्ञ, प्रशासक आणि अन्य अभ्यासकांनी दिर्घकालापासूनच महार, महाराष्ट्र या शब्दांचे मूळ आणि मराठा समाजातील महार जमातीचे स्थान या विषयांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये काही भारतीय आणि विशेष म्हणजे महाराष्ट्रीय इतिहासकांरानी इतिहासलेखन आणि विश्लेषण करण्यासाठी आपली हयात घालविली.

याविचाराबरोबरच राष्ट्रवादाची संकल्पना राजकिय असली तरी, त्यास विविध परिप्रेक्ष असून त्यातील विविध सामाजिक परिप्रेक्षकांना केवळ ब्राम्हणवादी विचारांनी गिळंकृत करण्याचा खूप मोठा प्रयत्नही झालेला दिसून येतो. जसे की, राजकिय स्वातंत्र्यांची चळवळ महत्वाची? की सामाजिक चळवळ महत्वाची? या विचारातून दोन गट पडले. अशावेळी ब्राम्हणेत्तर विविध संशोधक, समाजसुधारक आपापल्या परिने प्रयत्नशिल होते. वसाहतवादी व साम्राज्यवादी काळात जे–जे लढे उभारले गेलेत त्याचे परिक्षण केले तर, आपणास सामाजिक भेदभाव दिसून येईल आणि त्यावर लक्ष केंद्रीत करून ज्यांच्या जाणीवा संवेदनशील होत्या. त्यांनी–त्यांनी लोक लढे, आंदोलने, सत्याग्रह, निषेध केलेले दिसून येतात. इथे समतेचे महान तत्वज्ञान असलेल्या विचारांवर संख्येअभावी राजकिय स्वातंत्र्याच्या चळवळीने विजय मिळविला. अशावेळी राजकिय पराभूतांचादेखील व्यापक इतिहास असतो असे असूनही जातीप्रभूत्व अथवा श्रेष्ठत्वाद्यांनी मात्र पराभूतांच्या इतिहासांची नोंद ज्या प्रमाणात घ्यावयास हवी होती तितकीशी घेतलेली दिसून येत नाही. परंतु धर्म व जातीविरोध उठावाची लोकप्रिय महाराष्ट्रीय संस्कृति, की ज्यायोगे हिंदूमधील जातींच्या आणि अस्पृश्यांच्या चळवळींना चालना मिळाली. तिला आकार देण्यात आणि तिचा प्रसार होण्यास तमाशाने प्रमुख कामगिरी पार पाडली'.[१९]

कोल्हापूर संस्थानात शाहू महाराज यांनी समतेच्या दृष्टीने आरक्षणाचे तत्व भारतात प्रथमच सन १९०२ मध्ये आपल्या संस्थानात राबविण्यास सुरूवात केली. तसेच विसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थकात बॉबे प्रेसिडेंसी व कोल्हापूर संस्थान यात प्रामुख्याने महार–वतनाचा मुद्दा वारंवार चर्चिला गेला होता. भिन्न अशा कारणांवरून कोल्हापूर संस्थानच्या राजर्षि शाहू महाराजांनी जून १९१८ मध्ये कुलकर्णी वतन व १८ सप्टेंबर १९१८ मध्ये सरकारी आदेश काढून महार–वतन खालसा केले व गावाच्या सेवांच्या बदल्यात त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीच्या तुकडयांचे मालकी हक्क त्यांना बहाल केले. अशा प्रकारे महार हे गुलामगिरीमुक्त झाले व ही सुधारणा अंमलात आणणारे कोल्हापूर हे भारतातील पहिले संस्थान ठरले. तसेच कोल्हापूर येथे बहुजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रवृत्त करण्यासाठी त्या–त्या जातीच्या विद्यार्थ्यांकरीता प्रथमच वसतिगृहाचा उपक्रम राबवून शिक्षणाच्या प्रवाहामध्येही त्यांना समाविष्ठ करून घेतले. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर स्वातंत्र्य चळवळीची सर्व धुरा महात्मा गांधीजीकडे आली. स्वातंत्र्यासाठी गांधीजीकडून विविध राजकिय आंदोलने लढली गेली. या राजकिय आंदोलनातील सामाजिक चिंतनाचा भाग म्हणून पहिला तर, असे दिसून येते की, गांधीजीनी केलेल्या आंदोलनामध्ये महिलांना स्थान देण्यात आले, महिलांचा सहभाग लक्षणीय असल्याने या सामाजिक बदलाची नोंद आपणास घ्यावीच लागेल.

महाराष्ट्रातील दबलेल्या, पिचलेल्या समाजात सामाजिक बदल घडवून आणण्याकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुकनायक,

बहिष्कृत भारत, जनता, समता प्रबुद्ध भारत यासारख्या साप्ताहिकांमधून मांडलेले विचार शास्त्रीयदृष्टया जाती–अंतासाठी होते. या विचाराची नोंद घेतांना महात्मा गांधी म्हणताहेत की, ''कोणताही समाजसुधारक या भाषणांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. रूढीवाद्यांना हे (भाषण) वाचून फायदा होईल.''[२०] अशी नोंद करतात. त्यामुळे या चिंतनशील बाबीकडे लक्ष देण्याऱ्या चळवळीत केवळ अस्पृश्य समुदायातील लोकच अंर्तभुत होते असे नव्हेतर, अस्पृश्येत्तर समुदायातील लोक होते. असे असले तरी, दाईच्या आणि आईच्या सेवेत फरक असणारच हे देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर लक्षात आणून देतात.

याबरोबरच शेतकऱ्यांच्या असंतोषात झालेली प्रचंड वाढ आणि त्याच काळातील कॉंग्रेसला व्यापक सामाजिक परिषदेची वाटू लागलेली गरज, यामुळे शेतकऱ्यांच्या मागण्या राष्ट्रवादी पुढारीपणावर लादल्या गेल्या.[२१] याचवेळस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो समतेचा लढा सुरू केला होता. यामध्ये महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह, विविध मंदीराचा सत्याग्रह हे स्थानिकपातळीवरील लढे आणि सामाजिक आरक्षणाचा लढा लंडन येथील गोलमेज परिषदेपर्यंत पोहोचल्याने या लढयांना आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले होते आणि त्याचा शेवट पुणे कराराच्या माध्यमातून झालेला आपणास पहावयास मिळतो. आता तर अशी जातव्यवस्था पराकोटीला जावून पोहोचली आहे असे दिसून येते कारण पी. ए. इनामदार विरूद्ध महाराष्ट्र शासन आणि इतर या सर्वोच न्यायालयातील प्रकरणाच्या निकालपत्रात या प्रकरणातील न्यायाधिशांनी नोंदविल्याप्रमाणे भारतात एकूण ६४४६[२२] जाती आणि अनेक उपजाती आहेत आणि त्या एकमेकांबरोबर सामाजिक व सांस्कृतिक संबंध ठेवतांना दिसून येत नाही. इतकेच नव्हेतर जाती –जमातीमधला द्वेष संघर्ष आणि मत्सर अनेकवेळा किरकोळ कारणावरून उफाळून येतांना दिसतो आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अर्धशतकात भारतीय समाज–जीवन खूपच ढवळून निघाले होते. समाजरचना, सामाजिक संस्था, आणि मुख्य म्हणजे सांस्कृतिक मूल्य व्यवस्था या सगळयातच झपाटयाने बदल घडून येत असल्याचे जाणवते. देशातील नेतृत्वाने भारतीय समाजाच्या नवनिर्माणाचे स्वप्न उराशी बाळगून स्वातंत्र्य लढयाच्या अग्निकांडात आहूती दिली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील आर्थिक नियोजन, पंचवार्षिक योजना, त्यामागील मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण, आर्थिक विकास आणि समता, सामाजिक न्याय यांची सांगड घालतांना झालेली कसरत आणि ज्या पद्धतीने अनेकविध जनकल्याण्याच्या योजना प्रत्यक्ष राबविल्या गेल्या त्यांचा म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या अर्थकारणांचा आणि राजकारणाचा प्रभाव समाजकारणावर पर्यायाने सामाजिक बदलावर होणे अपेक्षितच होते.[२३] परंतु समाजातील धर्मव्यवस्था भक्कम स्वरूपात होती आणि जातीव्यवस्थेतील अस्पृश्यतेसारख्या प्रश्नांची सोडवणुक होत नव्हती यामुळेच महाराष्ट्रातील अस्पृश्यांच्या प्रश्नांप्रमाणेच इतर मागासलेल्या व वन्य जमातींचा प्रश्न समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत निकडीचा व जिव्हाळयाचा होता. त्या प्रश्नांचे गांभीर्य पाहून आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन एलिनार झेलिएट, गेल ऑमव्हेट, मॅक्स मूल्लर इत्यांदींनी महाराष्ट्रात येवून संशोधनाअंती केलेले लिखाण आपणास सामाजिक दृष्टीने महत्वाचे आहेत.

महाराष्ट्रातील भटक्या समाजात वंजारी भिल्ल, कातकरी, ठाकर, कैकाडी, पारधी, मांगगारूडी, रामोशी, गोंड, वारली, बेलदार, बेरड, भामटा, गरेला इ. अनेक जाती या वर्गात येतात आणि महाराष्ट्रापुरतीच यांची गणती केली तर यांची संख्या पंचविस लाखांपर्यंत आहे. ही लोकसंख्या ध्यानात घेतली म्हणजे ही समस्या केवढी बिकट आहे त्याची कल्पना येते. अशा या भटक्या किंवा विमुक्त जातीतील एकेका समुदायांचा अभ्यास होणे ही काळाची गरज आहे. यादृष्टीने आत्मकथने अथवा स्वकथेने यामधून मांडलेल्या दारिद्रयाची आणि गरीबीच्या झळा, त्याचबरोबर संधीची असमानता यावर बरेचसे भाष्य केलेले दिसून येते. यावरच लक्ष केंद्रीत करून डॉ. एस. पी. पुनाळेकर, डॉ. मनोहर जाधव यासारख्या विद्वानानी आपल्या संशोधनाचे क्षेत्र ठरविले. तसेच भटक्या समुदायांच्या सामाजिक जीवनावर आणि आजवर न झालेल्या समुदायांच्या परिचयावर पुण्यातील प्रा. रामनाथ चव्हाण यांनी लिहीलेले भटक्या जमातीवरील पाच संशोधन खंड उल्लेखणीय आहेत. त्यामुळे साहित्यांतील व्यापकता वाढली.

आज–काल ग्रामीण समाजातील व्यवस्थेकडे आजही जितक्या भावनिक बाजूने पाहिजे जाते तसे व्यावहारीक बाजूने पाहिले जात नाही. ग्रामीण सामाजातील 'जात' आणि 'धर्म' यावरून निर्माण होत असलेल्या प्रश्नांना संरचनात्मक बदल करण्याच्या हेतूने ऐरणीवर घेतले जात नाहीत. तसेच आजही बळीराजाकडे किंवा त्याच्या प्रश्नांकडे जितक्या जिव्हाळयाने पहायला हवे तितक्या जिव्हाळयाने पाहिले जात नाही. परिणामी विदर्भ आणि मराठवाडयातील शेतकरी आत्महत्येकडे झुकू लागला आहे. 'शेतकऱ्यांच्या दृष्टीने नवीन भूमीसुधार कायदे झाले, कुळांना संरक्षण देणे, कमाल भूधारण काय असावे हे ठरविले तरी, ज्यांचा प्रत्यक्ष शेती उत्पादन प्रक्रियेत सहभाग नसतो त्यांच्याकडून सामाजिक न्यायांच्या दृष्टीने फारसा प्रयत्न झालेला दिसून येत नाही. ग्रामीण महाराष्ट्रात नवा श्रीमंत बागाईतदार आणि सधन शेतकऱ्यांचा वर्ग त्याच कालावधीत वर आला ज्या कालावधीत भूमिहीन शेतमजूरांच्या संख्येत वाढ तर झाली पण दारिद्रयरेषेखाली असलेल्या लोकांचे प्रमाणही वाढले.[२४] यातच पुन्हा भूमिहीन शेतमजूरांचा प्रश्न गांभीर्यपूर्वक घेतला गेला नाही या संदर्भात राज्यपातळीवरील वस्तुस्थिती अधिक अस्वस्थ करणारी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशात घडून आलेले आर्थिक, राजकिय व सामाजिक परिवर्तन शेतीतील प्रगती, वाहतूक, दळणवळण, शिक्षणाचा प्रसार तसेच शेतमजूरांची वाढती संख्या या सर्व कारणांमुळे शेतमजुरांच्या संघटना निर्माण होण्यासाठी पोषक वातावरण आहे. मात्र शेतमजुरांची होणारी पिळवणूक बंद करण्यासाठी किंवा यांच्या प्रश्नांबाबत आवाज उठविण्यासाठी शेतमजूर संघटनांची निर्मीती न होणे म्हणजेच कामगार चळवळीची बीजे अजूनही ग्रामीण भागात रूजलीच नाहीत असे म्हटले तरी अयोग्य होणार नाही. आजपर्यंत राजकिय नेते, पक्ष तसेच शासन यांनी औद्योगीक कामगारांचे प्रश्न व त्यांचे संघटन करण्यासाठी आपला बहुमोल वेळ खर्ची घातला आहे व आजही घालवीत आहेत परंतु शेतमजुरांचे प्रश्न व त्यांचे संघटन यासाठी मात्र हे सर्व अत्यंत उदासीन असलेले दिसून येतात. इतकेच नव्हेतर, अभ्यासकांचेसुद्धा याकडे दुर्लक्ष होत आहे. याचा विचार आपण आताच केला नाही तर, भारतातील महाराष्ट्र राज्य हे गरीबांचे एक श्रीमंत राज्य आहे अशी ओळख निर्माण होईल. त्यामुळे हा विषय गंभीर्याने घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील केवळ ५–६ व्यक्ती आर्थिक दृष्टीने सुधारल्या म्हणजे सर्व आल–बेल आहे असे नव्हे तर, बहुतांशीच्या प्राथमिक गरजा पुर्ण होताना दिसत नाहीत. त्यामुळे असंघटीत क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व विकासाच्या मुख्याप्रवाहात नसणाऱ्या शेतमजूरांचा प्रश्न स्वातंत्र्यपूर्वकालापासून ते स्वातंत्र्याच्या ६५–६६ वर्षानंतरही अनुत्तरीतच रहतो आहे. अशा या निर्विवाद मनुष्य बळाचा उपयोग आपणास भविष्यकाळात करावयाचा झाल्यास या

प्रश्नांचा शेवट करावयासच हवा. तसेच सामाजिक दृष्टीने पाहता, परस्पराविरूद्ध तसेच टोकाची आर्थिक आणि सामाजिक परिस्थीती असणाऱ्या वर्गामधील विचारप्रवाहाचा प्रवास संघर्षास कारणीभूत ठरतो त्यामुळे त्यांची मने जुळलेली दिसून येत नाहीत.

स्वातंत्र्यापूर्वी विविध जाती–धर्मामध्ये विभागलेला समाज खऱ्या अर्थाने एका धाग्याने जोडले गेले आणि तो धागा म्हणजेच 'भारतीय राज्यघटना' होय असे आपणास म्हणता येईल. कारण राज्यघटनेच्या सर्व पानांवर सामाजिक तत्वांचा आणि समानतेचा उल्लेख केलेला आहे. यामुळे राज्यघटना ही सर्वप्रथम सामाजिक दस्तऐवज आहे हे मान्य केले पाहिजे. याचवेळी राजकिय तत्वज्ञानाने भारलेले 'एक व्यक्ति एक मूल्य' हे लोकशाहीच्या तत्वाला जोडले गेल्याने समता प्रस्थापित झालेली दिसेल. परंतु सामाजिक समतेच्या जाणीवेची उणीव भारतीय समाजात होती म्हणूनच समानतेच्या दृष्टीने सामाजिक अंर्तविरोधाची जाणीव दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली होती.

महाराष्ट्रामध्ये स्त्री समानतेच्या दृष्टीने समाजचिंतन झालेले पहावयास मिळते. या संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक म्हणून गणल्या गेलेल्या लॉर्ड रिपन यांनी मांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या धर्तीवर भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था काम करू लागल्या असल्या तरी १९२१ पर्यंत स्त्रियांना मतधिकार नव्हता. १९२२ सालच्या मुंबई महानगरपालीका अधिकाराने स्त्रियांना निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला. सन १९२४ मध्ये कराड नगरपालिकेने स्त्रीयांना निवडणूक लढविण्यासाठी परवानगी दिली असली तरी १९३८ पर्यंत एकही महिला हा अधिकार गाजविण्यास पुढे येत नव्हती. म्हणून स्त्रीयांकरीता फिरती जागा ठेवली. त्या जागेवर श्रीमती गंगाबाई जनार्दन गुणे ही पहिली महिला निवडून आली. तसेच १९२६ ते १९३८ पर्यंत सतत १२ वर्षे कोल्हापूर नगरपालिकेत नामनियुक्त सदस्या होत्या. तर १९४० साली सांगली नगरपालिकेत श्रीमती लक्ष्मीबाई अभ्यंकर या फिरत्या राखीव वॉर्डातून निवडून आल्या. अशा रितीने १९२३ ते १९४७ च्या दरम्यान महाराष्ट्रातील नगरपालिकामध्ये महिलांचा प्रवेश झालेला दिसून येतो.[२७]

या बाबी पाहिल्या असता, राजकारणाबात महाराष्ट्र पुढारलेला दिसत असला तरी, विविध बाबीविषयी गांभीर्याने समाजचिंतन होणे गरजेचे आहे कारण गर्भलिंगनिदानावरून केवळ स्त्री अर्भक म्हणून पृथ्वीतलावर येण्याआधिच त्यांना मारले जाते. या गंभीर बाबीमूळे समाजव्यवस्थेतील विविध सामाजिक संस्था उदा. कुटूंबसंस्था, विवाहसंस्था, धर्म, शिक्षण, आणि इतर संस्थावर विपरीत परिणाम घडून येणार आहेत असे असल्याने हा प्रश्न भविष्यकाळाच्या दृष्टीने गंभीर स्वरूपाचा आहे.

ग्रामीण भागातील मानवी समाजाच्या मूलभूत गरजांपैकी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न म्हणावा लागेल. त्यामुळे हा प्रश्न इतका जिव्हाळा असला तरी, दुष्काळ भागाविषयी शासनास जाणीव करून देण्यासाठी डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी 'पाणी परिषद' भरविली जाते. परंतु राजकिय नेत्यांना अथवा शासनास याचे गांभीर्य नसल्यासारखे दिसते. खरे पाहिले असता ७०० किलोमिटरचा समुद्राकिनारा महाराष्ट्रास जितका लाभलेला आहे. असा अन्य कोणत्याही राज्यास लाभलेला नाही. इतके असूनही त्याचा म्हणावा तितका फायदा आपण करून घेवू शकलो नाही हे विदारक सत्य आहे.

महाराष्ट्रातील काही शहरे उदा. मुंबई, नागपूर, पुणे, कोल्हापूर अशा शहरांना सामाजिक आशय प्राप्त झाला आहे. अशापैकी नागपूर शहारामध्ये धार्मिक अधिष्ठान प्रमाणभूत मानणारी संस्था म्हणून अग्रेसर असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संस्थेचे मुख्यालय असले तरी, धार्मिक अधिष्ठानापेक्षा मानव आणि मानवता हा विचार प्रमाणभूत मानून समतेची वाटचाल करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पाच लाख अनुनयांसमवेत स्विकारलेल्या बुद्ध धम्माचे केंद्र म्हणूनही नागपूरकडे पाहिले जाते. याप्रमाणेच असमानतेच्या विरोधात सांस्कृतिक विचारांच्या उठावाचे केंद्र म्हणून पुणे या शहाराकडे पाहिले जाते आणि शिक्षण हे समाज बदलाचे प्रमुख साधन आहे असे कितीतरी सुधारकांनी दाखवून दिले आहे. त्यांचा थेट संबंध महात्मा फुले यांच्याशी असल्याने आजदेखील पुण्याला शिक्षणाचे माहेरघर म्हणूनही ओळखण्यात येते. तरी कोल्हापूर येथे शाहू महाराजांनी उभ्या केलेल्या वसतिगृहाच्या उभारणीमागील आशयदेखील सामाजिक उत्थानाचा होता. महाराष्ट्रातील स्थलांतराचा प्रश्न विचारात घेता मुंबई या शहराचे नाव प्रथमत: लक्षात येते. इथे धारावी आणि दादर या भागातील झोपडपट्टीची नोंद आंतरराष्ट्रीय पातळीवर झाली आहे. येथील बहुतांशी लोक केवळ नोकरी आणि व्यापाराच्या निमित्ताने ग्रामीण भागातून स्थलांतरीत झालेले आहेत आणि त्यास अनुसरून विविध सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यावर समाजशास्त्रीय चिंतनातून स्थलांतरीतांचा अभ्यास झालेला दिसून येईल. येथील स्थलांतरासंबंधी डॉ. जी. एस. घुर्ये यांनी त्याकाळी नमूद केले होते की, केवळ २० टक्के रहिवासी मुळचे मुंबईचे आहेत उर्वरीत सर्व स्थलांतरीत आहेत. त्यामुळे शहरी जीवनातील समस्या औद्योगीक तसेच नागरीकरण आणि स्थलांतराच्या समस्या इत्यांदीचा अभ्यास होत असला तरी, विविध शासकिय आणि अशासकिय पातळीवर फायदा–तोटा डोळयासमोर ठेवून आर्थिक बाबींनाच महत्व दिले गेल्याने झोपटपट्टीतील सामाजिकता याकडे होत असणारे दुर्लक्ष भविष्यातील विकासाच्या दृष्टीने खूप घातक आहे. हे वेळीच विचारात घेणे गरजेचे आहे.

सन १९९१ पासून भारतात तर, नवीन आर्थीक धोरण सुरू झाल्याने त्याचा विपरीत परिणाम होवू पहात आहे उदाहरणार्थ महाराष्ट्र राज्यातील छोटे–छोटे उद्योगधंदे असणाऱ्या ठाणे–बेलापूर औद्योगीक पट्ट्यामध्ये जवळपास १८०० कारखान्यांपैकी साधरणपणे ७५० कारखाने गेल्या काही वर्षात बंद पडले आहेत. या कारणाने पन्नास हजारांपेक्षा जास्त कामगार बेकार झालेत.[२८] त्यामुळे असंख्य कामगारांच्या कुटूंबावरील आर्थिक आघात समाजमनावर होणार यात वादच नाही. म्हणून जागतिकीकरण हे आर्थिक बाबींशी संबंधीत असले तरी त्या सामाजिक परिणामांचा विचार होणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्राच्या व भारताच्या समाजकारणाचा यादृष्टीने आपण विचार केला तर, राजकारण किंवा अर्थकारण हे सोयीसाठी केलेले विभाग आहेत. प्रत्यक्षात त्याचा वेगवेगळा विचार करणे कधीही शक्य नाही. तसा केल्यास समाजाची अधोगती आहे हे महासत्य आहे. समाजातील भिन्न गटाचे परस्पर संबंध कसे आहेत? व्यक्ति व समाज यांचे सबंध कसे आहेत? यावरच समाज संघटित आहे की विघटित आहे? हे लक्षात येते. म्हणून महाराष्ट्राला ज्या ज्या सामाजिक बाबीमुळे उपेक्षा आली आहे त्या त्या आपण समूळ नष्ट करण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे तसे झाल्यास महाराष्ट्र राज्याची पूर्नघटना सुकर होवून अखिल भारतास आवश्यक असेल ते–ते निर्माण व्हावयास वेळ लागणार नाही.

विद्यापीठ अनुदान आयोग, आय. सी. एस. एस. आर., आय. सी. एच. आर. महाराष्ट्रातील जे. पी. नाईकांची इंडीयन इन्स्टिटयूट ऑफ एजुकेशन तसेच टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायस आणि

कर्वे इन्स्टिटयूट ऑफ सोशल सांयस यासारख्या संस्था तसेच अलिकडेच प्रशासकीय वर्ग–एक व दोनसाठी प्रशिक्षण देणारी 'यशदा' अशा संस्थामार्फत समाजाच्या विविध घडामोडीवर अभ्यास करीत आहेत.

तसेच सामाजिक समस्यांना अनुसरून सामाजिक चिंतन होवून त्यावर विविध उपाययोजना करण्यासाठी त्या प्रश्नावर संशोधनात्मक प्रकाश टाकण्यासाठी महाराष्ट्रात १९८६ साली डॉ. सुधा काळदाते, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. व्ही. व्ही. देशपांडे, डॉ. बी. एल जोशी, डॉ. एस. एन. पवार आणि इतर यांच्या संघटीत प्रयत्नाने महाराष्ट्रातील समाजशास्त्र विषयातील शिक्षक, संशोधकांच्यासाठी 'मराठी समाजशास्त्र परिषद' संस्थेची स्थापना केली. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणाऱ्या 'भारतीय समाजशास्त्र संस्था' संस्थेप्रमाणे महाराष्ट्रातील सामाजिक प्रश्नांशी संबंधीत चिंतन करण्याकरीता दरवर्षी परिषदेचे अधिवेशन भरविले जाते या परिषदेच्या चर्चेतून विविध प्रश्नांमधील सामाजिक परिप्रेक्षावर उहापोह केला जातो.

सारंशरूपाने आपणास असे म्हणता येईल की, आधुनिक महाराष्ट्रात मानवेंद्रीत कल्याण व अधिकारांना विचारात घेवून अनेक आंदोलने, मोर्चे इ. अधिक प्रमाणात झालेली आहेत. इथे धार्मिक, राजकिय, शैक्षणिक, आर्थिक सुधारणा करीत असतांना मूलभूत अशा सामाजिक विचारांवरच केंद्रीत करावे लागले. त्यामुळेच महाराष्ट्र ज्या पायावर उभा आहे तो पाया म्हणून समतेची विचारसरणी म्हणावे लागते. ही मानवकेंद्रीत समतेची विचारसरणी भविष्यकाळातही बहरत राहून केवळ भारतात नव्हे तर जगातील सर्व देशांना समतेच्या दृष्टीने महाराष्ट्र हे ठिकाण प्रेरणा मिळणारे ठरो हीच अपेक्षा.

*संदर्भ :–*

१. *पुरूषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे, १९६०, समाजकारण आधुनिक काल, गं.बा. सरदार संपादीत महाराष्ट्र जीवन– परंपरा, प्रगति आणि समस्या पृ. २११*
२. *कुलकर्णी अ.रा. २००८, महाराष्ट्र समाज आणि संस्कृति (मध्य आणि आधुनिक काल) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पान क्र. ४१*
३. *पुरूषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे १९६०, समाजकारण आधुनिक काल, गं.बा. सरदार संपादीत महाराष्ट्र'जीवन परंपरा, प्रगति आणि समस्या ३१८*
४. *Coats, Thomas, Account of the present State of the rownship a Lony: Literary Society of Bombay, Transactions VOL-III, Mumbai, 1923.*
५. *Enthoven R. E. 1990, The Tribes and Castes of Bombay, Vol. No. 1-4, Asian Educational Services, New Delhi.*
६. *Dubois Abbe, 1928, Hindu Manners, Custums and Ceremonies, Oxford Press, London.*
७. *धनागरे, द.ना.१९८४ मराठी सामाजशास्त्र परिषदेने २८ ते ३० जून या कालावधीत कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण*
८. *सहस्त्रबुद्धे, पुरूषोत्तम गणेश, समाजकारण आुधनिक काल १९६० गं.बा. सरदार महाराष्ट्र–जीवन परंपरा, प्रगति आणि समस्या २९५*
९. *सहस्त्रबुद्धे पुरूषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे समाजकारण आधुनिक काल १९६० गं.बा. सरदार महाराष्ट्र–जीवन परंपरा प्रगती आणि समस्या २९७–९८*
१०. *गेल ऑमव्हेट, १९९५, वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे पान क्र. ७२*
११. *पुरूषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे, १९६० समाजकारण आधुनिक काल गं.बा. सरदार संपादीत महाराष्ट्र–जीवन परंपरा प्रगती आणि समस्या ३१२*
१२. *मुक्ता साळवे, मांग महाराच्या दु:खविषयी निबंध, ज्ञानोदय १५ फेब्रुवारी १८५५ व १ मार्च १८५५ अंक, पुर्नमुद्राण प्रबोधन प्रकाशन ज्योती, इंचलकरंजी, महिला विशेषांक, वर्ष १९ वे, अंक दुसरा पृ.क्र. ५३–५६*
१३. *जाधव मयुरा, बिजले, मुक्ताबाई ते बरखा: महिला पत्रकारितेचा तेजस्वी प्रवास, प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, २००८ पृ.क्र. २३*
१४. *मंगुडकर मा.प. पुणे नगरसंस्था शताब्दी ग्रंथ पृ.क्र. ७८*
१५. *वैद्य सरोजिनी, १९८०, काशिताई कानिटकर यांचे चरित्र व आत्मचरित्र, पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृ.क्र. १६६.१६७*
१६. *Sengupta Padmini, The Story of Women of India, Indian Book Company, New Delhi, 1974, pp. 158-159.*
१७. *गवाणकर रोहिणी, मराठी स्त्रीशक्तीचे राजकारसणी रूपे, साधना प्रकाशन, मुंबई १९८६ पृ.क्र. १०.*
१८. *गवाणकर रोहिणी, मराठी स्त्रीशक्तीचे राजकारणी रूपे, साधना प्रकाशन मुंबई, १९८६ पृ.क्र. १२*
१९. *गेल ऑमव्हेट १९९५, वासाहातिक सामाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन पुणे पान क्र.२२३*
२०. *महात्मा गांधी, हरिजन साप्ताहिक दि. ११ जुलै १९३६*
२१. *गेल ऑमव्हेट, १९९५, वासाहातिक समाजिक सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे पान क्र. ३०४*
२२. *Judgement Supreme Court of P. A. Inamdar V/s Govt. of Maharashtra and Others, 2005.*
२३. *धनागरे, द.ना. १९८४ विकास प्रक्रियेतील अन्तर्विरोध आणि त्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण एक मागोवा, संपादक प्राचार्य नगोराव कुंभार, डॉ. आनंद अनभूले, संपादीत १९९९ महाराष्ट्रीाल समाजशास्त्रीय चिंतन पान क्र. १२४*
२४. *धनागरे द. ना. १९८४ मराठी समाजशास्त्र परिषदेचे २८ ते ३० जून या कालावधीत कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण*
२५. *गवाणकर रोहीणी १९८६ मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूपे, आदित्य प्रकाशन पृ. क्र. १५८*
२६. *कराड नगरपालिका शतसावस्तरिक ग्रंथ १८५५ ते १९५५ पृ.क्र. २४*
२७. *गवाणकर रोहीणी, १९८६, मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूपे, आदित्य प्रकाशन पृ. क्र. १५९.*
२८. *Minwala Shabnam & Khan Sameena, Times of India, 15.11.1998.*

# भारतातील सामाजिक चळवळीबाबत समाजशास्त्रीय संशोधकांची उदासीनता

**डॉ. प्रदीप आगलावे,** माजी प्रोफेसर आणि प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ.Mo. 9881262660

सामाजिक चळवळींचा समाजशास्त्रात अभ्यास केला जातो. मॅक्स वेबरच्या शब्दात सांगायचे झाल्यास सामाजिक चळवळी देखील सामाजिक क्रिया (Social Action) आहेत. सामाजिक चळवळीच्या माध्यमातून समाजात अनुकूल आणि प्रगतीच्या दिशेने परिवर्तन होत असते. कधी कधी प्रतिकूल देखील परिवर्तन होण्याची शक्यता असते. भारतासारख्या देशात येथील धार्मिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. ब्राह्मण समाजव्यवस्थेने देशात वर्णव्यवस्था प्रस्थापित करून तिला ऐनकेण प्रकारे त्या समाजव्यवस्थेला स्थीरत्त्व प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. परिणामत भारतीय समाजात विषमतेवर आधारीत समाजव्यवस्थेचे उदात्तीकरण करून त्या समाजव्यवस्थेचे गोडवे गाण्यात आले.

वर्णव्यवस्थेत भारतीय समाजाचे मुख्य चार प्रकारात विभाजन करण्यात आले होते. यामध्ये शूद्र वर्णाची लोकसंख्या जास्त होती. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णापेक्षा शूद्रांची लोकसंख्या जास्त असल्यामुळे वरील तीन वर्णाच्या लोकांना शूद्र लोकांकडून आव्हान देण्यात येत होते. शूद्र लोक वरील तीन वर्णाच्या विरूद्ध संघर्ष करायचे. शूद्रांची लोकसंख्या वरील तीन वर्णाच्या दृष्टीने घातक समस्या ठरत होती. म्हणून शूद्रांचे आणखी विभाजन करण्यासाठी योजनाबद्ध पद्धतीने भारतीय समाजव्यवस्थेत जातीव्यवस्था निर्माण करण्यात आली. जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजाचे असंख्य जातीत विभाजन करण्यात आले. हे विभाजन केवळ शूद्र वर्णाकरिताच नव्हे तर एकंदरीत भारतीय समाजाच्या दृष्टीने अतिशय घातक ठरले. भारतीय समाजाचे असंख्य जातीत विभाजन करून त्यांच्यात विषमता आणि द्वेष निर्माण करण्याचे कार्य येथील प्रस्थापित अर्थात ब्राह्मण वर्गाने केले. परिणामतः भारतीय समाजात प्रचंड प्रमाणात सामाजिक आणि सांस्कृतिक विषमता निर्माण झाली. विशेष म्हणजे धर्माच्या आधारावर ही विषमता निर्माण करण्यात आली होती. वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेनंतर अस्पृश्यता निर्माण करण्यात आली. विशेष म्हणजे वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यास धर्माचा आधार देण्यात आला. त्यामुळे वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यास विरोध अर्थात म्हणजे धर्मास विरोध धर्मविरोधी कृत्य असेच मानण्यात आले होते. जे कुणी या व्यवस्थेच्या विरोधात बोलतील त्यांची हत्या करणे हे देखील एक धार्मिक कृत्य मानले जायचे. परिणामतः भारतीय समाजाची प्रगती होऊ शकली नाही. त्यामुळे भारतीय समाज सतत स्थितीशील राहिला.

'सामाजिक चळवळ' ही अतिशय महत्त्वाची सामाजिक क्रिया आहे. चळवळीतूनच सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक प्रगतीची क्रिया अग्रेसर होत असते. अलिकडे 'सामाजिक चळवळ' हा समाजशास्त्रांचा एक महत्त्वाचा विषय आहे. सामाजिक चळवळीच्या संदर्भात विपूल संशोधन आणि लेखन होणे आवश्यक आहे. भारतीय समाजाच्या संदर्भात वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या संदर्भात अगदी संक्षिप्त आढावा प्रस्तूत लेखात घेतला आहे.

भारतात परिवर्तन आणि विकासाच्या संदर्भात काही प्रमाणात चळवळी झाल्यात. परंतु या चळवळीच्या संदर्भात विशेष असे समाजशास्त्रीय संशोधने झाली नाहीत. पूर्वीपासूनच या देशात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या विरोधात संघर्ष होत राहिला. परंतु या संघर्षाची वस्तूनिष्ठपणे नोंद घेण्यात आली नाही. त्या संघर्षाचे विपरीत महाकाव्य आणि पुराणात वर्णन करण्यात आले. भारतीय समाजातील सूर आणि असूर किंवा देव आणि दानव यांच्यातील संघर्ष सांगितला जातो. परंतु असूर, दानव किंवा राक्षस हे मानव समाजापेक्षा वेगळे होते. ते क्रूर होते. असेच त्यांच्याबद्द सांगण्यात आले. परंतु दानव किंवा राक्षस हे इतरांप्रमाणे माणसं होती. ते प्रस्थापितांना कोणत्या कारणांसाठी विरोध करीत होते. या सर्व गोष्टी लपविण्यात आल्यात. त्यामुळे देव आणि दानव यांच्यातील संघर्ष हे केवळ एक मिथक राहिले आहे. तात्पर्य, देशातील विषमतेच्या विरोधात आणि न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या लोकांचे विद्रूपीकरण करण्यात आलेत, असे आपल्या लक्षात येते.

इंग्रजांची सत्ता भारतात स्थापन झाल्यानंतर पाश्चात्य समाज आणि भारतीय समाज यांच्यातील विचारसरणी आणि रूढी, परंपरांच्या संदर्भातील फरक इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकांच्या लक्षात आला. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या वैश्विक मूल्याचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी भारतीय समाजातील विविध धार्मिक रूढी, परंपराना थोडा फार विरोध केला. धार्मिक रूढी, परंपरांना विरोध करणे देखील धर्मविरोधी कृत्य मानले जात होते. म्हणून ते या रूढी, परंपराच्या विरोधात लोकमत निर्माण करू शकले नाही. हे सत्य असले तरी इंग्रजाच्या आगमनानंतर त्यांनी या देशात कायद्याचे राज्य आणण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी विचारसरणी येथे रूजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे आधुनिक काळात भारतीयांना या मानवी मूल्यांची ओळख झाली. परंतु ज्यांना या मानवी मूल्यांची ओळख झाली आणि महत्व पटले. त्यांनी येथे या मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक चळवळ मात्र निर्माण केली नाही. जुजबी, असा वरवरचा थोडा फार प्रयत्न केला. परंतु भारतीय समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी मात्र कुणीही प्रयत्न केला नाही.

जोतीराव फुले हे आधुनिक काळातील पहिले सुधारकच नव्हे तर क्रांतीकारक होत. त्यांनी समतेच्या मूल्याचा आग्रह धरला. समतेच्या मूल्याचे भारतीय समाजाला वावडे होते. स्त्री–पुरुष विषमता आणि जातिभेद यावर फुलेंनी प्रखर विरोध केला. इतकेच नव्हे तर ज्या धर्माने आणि धर्मग्रंथांनी विषमतेचे समर्थन केले, त्या धर्म आणि धर्मग्रंथांनाच त्यांनी विरोध केला होता. फुले यांची चळवळ ही खऱ्या

अर्थाने भारतीय समाजात मानवी मूल्यांचे बीजारोपण करणारी सामाजिक चळवळ होती. परंतु त्यांच्या चळवळीस उच्चवर्णीय प्रस्थापित लोकांचा प्रचंड विरोध होता. अशाही परिस्थितीत त्यांनी वस्तूनिष्ठपणे सामाजिक परिस्थितीचे अवनोकन करून निर्भिडपणे आपले विचार पुस्तकरूपाने प्रकाशित केलेत. जर त्यावेळी इंग्रजाची सत्ता देशात नसती तर हे कार्य देखील फुले करू शकले नसते.

छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात काही महत्त्वपूर्ण कायदे करून सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना देखील प्रचंड विरोध करण्यात आला होता. विशेष म्हणजे टिळकांसारख्या राष्ट्रीय नेत्यांनी देखील त्यांच्या कार्यास प्रचंड विरोध केला होता. सामाजिक विषमता नष्ट करणे आणि शिक्षणाचे सार्वत्रिकरण या संदर्भात त्यांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. शिक्षण हे काही एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नाही. हे लक्षात घेऊन सर्व जाती–धर्माच्या लोकांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न विशेष महत्त्वाचा होता. परंतु त्यांच्या विरूद्ध अनेक कटकारस्थाने रचून त्यांच्या सुधारणांच्या कार्यांना विरोध करण्याचे श्रेय येथील प्रस्थपित तथाकथित उच्च वर्णीयांकडे जाते.

आधुनिक काळात मानवी मूल्यांच्या आधारावर सामाजिक चळवळी उभारण्याचे कार्य जोतीराव फुले यांनी केले. बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी केलेली चळवळ देखील विशेष महत्त्वाची आहे. त्यानंतर मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेकरिता संघटीत पद्धतीने सामाजिक चळवळ निर्माण करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. आज जगात सर्वत्र मानवी हक्काची चळवळ विशेष महत्त्वाची मानली जाते. डॉ. आंबेडकरांची चळवळ ही देखील मानवी हक्कांच्या संदर्भात होती. परंतु त्या चळवळीचा उल्लेख 'दलितांची चळवळ' असाच केला जातो. त्यामुळे त्यांची चळवळ ही केवळ दलितांपूरतीच मर्यादीत होती असे भासविले जाते. त्यांची चळवळ ही मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होती. त्या दृष्टीने या चळवळीचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले नाही.

भारतीय समाजाचे सुक्ष्म अवलोकन केल्यास असे आढळून येते की, भारतीय लोकांमध्ये वस्तूनिष्ठतेचा अभाव आहे. प्रत्येक गोष्टींचा वस्तूनिष्ठपणे विचार करूनच त्या संदर्भात आपले मत निर्माण करायला पाहिजे. परंतु सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक बाबत लोकांचे असंख्य पूर्वग्रह आहेत. त्यामुळे ते सामाजिक घटनांबाबत वस्तूनिष्ठ नसतात. ही बाब केवळ अशिक्षित लोकांमध्येच आढळून येते असे नाही. उच्च विद्याविभूषित आणि समाजशास्त्राचे अध्ययन –अध्यापन करणाऱ्या लोकांमध्ये देखील वस्तूनिष्ठतेचा अभाव आढळतो. ही खरी चिंतेची आणि अत्यंत धोकादायक बाब आहे. ही गोष्ट समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

भारतातील सामाजिक चळवळीच्या संदर्भात विशेष समाजशास्त्रीय अध्ययने झाली नाहीत. घनश्याम शहा यांनी या संदर्भात काही काम केले आहे. घनश्याम शहा यांचे 'Social Movements in India' हे पुस्तक २००४ मध्ये प्रथम प्रकाशित झाले. या पुस्तकात शहा यांनी भारतातील शेतकरी चळवळ, दलित चळवळ, आदिवासी चळवळ, मागासवर्गीय चळवळ, महिला चळवळ, औद्योगिक कर्मचाऱ्यांची वर्ग चळवळ, विद्यार्थी चळवळ, मध्यमवर्गीय चळवळ आणि मानवी अधिकार व पर्यावरण चळवळीचा आढावा घेतला आहे. एस. के. सक्सेना यांचे 'Social Movement In India' हे पुस्तक २०११ मध्ये प्रकाशित झाले.

एम. एस. ए. राव यांनी शेतकरी, मागासवर्गीय, आदिवासी आणि महिला चळवळीच्या संदर्भात १९८४ मध्ये 'Social Movements in India' या ग्रंथाचे संपादन केले होते. या व्यतिरिक्त 'Social Movements and the State in India : Deepening Democracy' (2002), 'Social Movements in India : Poverty, Power, and Politics' (2005) आणि 'Social Movements In Northeast India' (2019) ही संपादीत पुस्तके आहेत. याशिवाय सामाजिक चळवळीच्या संदर्भात अभ्यासक्रमाकरिता लिहिलेली काही पुस्तके आहेत. परंतु भारतातील सामाजिक चळवळीच्या संदर्भात समाजशास्त्रीय संशोधनाचा अभाव आढळतो. काही संशोधकांनी पीएच. डी. च्या शोधप्रबंधाकरिता सामाजिक चळवळीबाबत संशोधन केले असतील. परंतु त्यांचे ते संशोधन अप्रकाशितच असू शकेल.

भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनास सुरूवात होऊन शंभर वर्षे झालीत. परंतु सामाजिक चळवळीच्या संदर्भात अजून विशेष समाजशास्त्रीय संशोधने झाली नाहीत. सामाजिक चळवळी बाबत समाजशास्त्रात अनेक महत्वपूर्ण अध्ययने व्हायला पाहिजे होती. परंतु सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात समाजाचा असलेला प्रतिकूल दृष्टीकोन आणि सामाजिक चळवळीविषयी असलेली पूर्वग्रह दूषीत धारणा यामुळे सामाजिक चळवळीच्या संदर्भात सर्वसामान्य लोक आणि अभ्यासक देखील उदासीन आहेत.

फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ ही मानवी हक्काची चळवळ होती. ती अतिशय व्यापक अशी चळवळ होती. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीमुळे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजात आमूलाग्र असे क्रांतीकारक परिवर्तन घडून आले. धार्मिक, वैचारिक, मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक या सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडून आले. ही चळवळ एक क्रांतीकारी चळवळ होती. आजही या चळवळीचे परिणाम समाजजीवनात आढळून येतात. आंबेडकरी चळवळीचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून सर्वांगीण अभ्यास अजूनही झालेला नाही. अध्ययन आणि संशोधनाच्या क्षेत्रात देखील नको असणारी बाब भारतीय संशोधकांमध्ये आढळते. ती म्हणजे संशोधन विषयाच्या संदर्भातील पूर्वग्रह दूषीत दृष्टीकोन होय.

समाजशास्त्राचे ज्येष्ठ संशोधक डॉ. जी. एस. घूर्ये यांनी 'Caste and Race in India' (1932), 'Caste and Class in India' (1980) ही जातीच्या संदर्भात पुस्तके लिहिलीत. परंतु त्यांच्या काळात सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीच्या संदर्भात मात्र त्यांनी काहीही लिहीले नाही. त्यामुळे सामाजिक चळवळीच्या अध्ययनाबाबत संदर्भात सुरूवातीपासूनच समाजशास्त्रज्ञांची उदासीनता असल्याचे आढळून येते. खरं तर भारतीय सामाजिक चळवळीच्या संदर्भात समाजशास्त्रीय अध्ययने विपूल प्रमाणात व्हायला हवे होते. परंतु समाजशास्त्रांच्या उदासीनतेमुळे समाजशास्त्रीय अध्ययने होऊ शकली नाहीत. असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही.

# मानवशास्त्राची वाटचाल: महाराष्ट्रातील साहित्य आणि संशोधन परंपरा

**डॉ. शौनक कुलकर्णी**, प्राध्यापक व विभागप्रमुख, मानवशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मानवशास्त्र म्हणजे मानवाचा सर्वांगीण आणि सर्वव्यापी विचार करणारे शास्त्र. इंग्रजी मधील (Anthropology) ॲन्थ्रोपोलॉजी याचा अर्थ मानवशास्त्र असा आहे. Anthropos म्हणजे माणूस आणि logos म्हणजे शास्त्र या ग्रीक शब्दापासून हा शब्द बनला आहे. ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्ववेत्याने हा शब्द प्रथम वापरला.

ज्यावेळी युरोपिअन लोक जग पादाक्रांत करण्यासाठी युरोप बाहेर पडले त्यावेळी जगातील विविध मानवी समूह आणि समाज त्यांच्या दिसण्यातील, वागण्यातील, बोलण्यातील, भाषेतील, सांस्कृतिक, शारीरीक ठेवणीमधील विविधता त्यांना दिसली आणि मानवशास्त्रीय अभ्यासाची सुरुवात झाली. भारतात मानवशास्त्राच्या अभ्यासाचा पाया ब्रिटिशांनी घातला. वसाहत वादाबरोबरच वंश कल्पना उदयास आल्या आणि वाढल्या. माणसामाणसामधील विविधतेमुळे मानवी समुहांच्या अभ्यासाला सुरुवात झाली. भारतातील विविध मानव जाती जमाती, त्यांची संस्कृती, श्रध्दा, विधी, लोकाचार, रुढी, परंपरा, चालीरीती यांचा अभ्यास करण्यास ब्रिटिशांनी सुरुवात केली. आदिवासी समाज, संस्कृती यांचाही अभ्यास सुरु झाला.

या सर्वच बाबींचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने समाजशास्त्र या विषयाच्या अंतर्गत मानवशास्त्र या विषयाचा अभ्यास सुरु झाला. अनेक शास्त्रांच्या अभ्यासाला फार प्राचीन परंपरा आहेत पण मानवशास्त्र हे फक्त १९ व्या शतकात उदय पावलेले शास्त्र आहे. तरीही या शास्त्रातील प्रगतीला अलिकडे वेग आला आहे. ब्रिटिशांनी पाया घातलेली ही मानवशास्त्र अभ्यासप्रणाली सुरुवातीला पश्चिम बंगालमध्ये आणि तेथून भारतभर विकसित झाली.

भारताच्या संदर्भात सर हर्बर रिस्ले, ए. सी. हॅडान, हटन, गुहा अशा मानवशास्त्रज्ञांनी अभ्यास केला. सन १९२० साली कलकत्ता विद्यापीठात मानवशास्त्र विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम तयार करण्यात आला. मानवशास्त्र अभ्यासाची पदव्युत्तर शिक्षण परंपरा एक शतकभर भारतात कार्यरत आहे. अनंत कृष्ण अय्यर हे या पहिल्या मानवशास्त्र विभागाचे प्रमुख होते. महाराष्ट्रात मानवशास्त्र विषयाचा पाया घालण्याचे श्रेय जाते ते डॉ. इरावती कर्वे यांच्याकडे.

इरावती कर्वे यांचा जन्म १५ डिसेंबर १९०५ रोजी ब्रम्हदेशातील म्यिजान या ठिकाणी झाला. त्यांचे वडील गणेश हरी करमरकर हे ब्रम्हदेशातील एका कापड गिरणीत अधिकारी होते. बाईंचे नामकरण सुरुवातीला गंगा म्हणून झाले होते. परंतू त्यांच्याच नात्यात नुकत्याच एका मुलीचे नामकरण गंगा झाल्याचे समजल्यावरुन त्यांचे नाव इरावती असे ठेवण्यात आले. मराठी भाषा व संस्कृती अंगवळणी पडावी म्हणून वडीलांनी त्यांना पुण्यात पाठविले. पुण्यातील त्यांचे पालकत्व रँग्लर परांजपे यांच्याकडे होते. पुण्यातील हुजुरपागेतून त्यांचे शालेय शिक्षण झाले. १९२२ साली त्या मॅट्रीक झाल्या. सन १९२६ मध्ये तत्त्वज्ञान हा विषय घेऊन फर्ग्युसन महाविद्यालयातून त्या बी. ए. झाल्या. त्याचवर्षी ज्येष्ठ अभ्यासक रसायनशास्त्रज्ञ डी. डी. म्हणजे दिनकर धोंडो कर्वे यांच्याशी त्यांचे लग्न झाले. त्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे त्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला. तेथे प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपला एम. ए. चा प्रबंध केला. हे त्यांचे पहिले संशोधन. आणि त्यांचा विषय होता परशुरामाविषयी दंतकथा आणि चित्तपावन ब्राम्हण. १९२८ मध्ये त्या एम. ए. झाल्या. त्यानंतर लगेचच जर्मनीतील बर्लिन विद्यापीठात 'कैसर विल्यम इन्स्टिट्युट ऑफ ॲन्थ्रोपोलॉजी' या नामांकित संस्थेत आचार्य पदवी साठी प्रवेश मिळाला. त्यांचा संशोधनाचा विषय होता "Asymmetry of Human Skulls" म्हणजेच ''मानवी कवट्यांमधील असमानता.'' मानवी कवट्यांवर विविध मोजमापे घेऊन त्यामधील असमानता आणि कारणे त्यांनी अभ्यासली. त्यांचे पीएच. डी. चे गाईड होते डॉ. युजेन फिशर. हे गृहस्थ तत्कालीन जर्मनीमधील एक मोठे व्यक्तिमत्व होते आणि व्यवसायाने ते वैद्यकीय क्षेत्रात होते. आपली पीएच. डी. संपवून १९३० साली बाई भारतात आल्या. आत्तापर्यंतचा त्यांचा प्रवास संस्कृत, तत्त्वज्ञान, प्राणीशास्त्र, समाजशास्त्र आणि जीवशास्त्रीय मानवशास्त्र अशा विविध शाखांतून झाला होता.

ज्यावेळी बाई हिंदुस्थानात परत आल्या त्यावेळी येथील कुठल्याही विद्यापीठात मानवशास्त्र शिकण्याची अथवा शिकविण्याची सोय नव्हती. १९३५ साली एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या कुलसचिवपदी नियुक्ती झाल्यावर, ४–५ वर्षे त्यांनी हे काम सांभाळले. तसेच मुंबई विद्यापीठाच्या पदव्युत्तर वर्गासाठीही अध्यापन केले. १९३९ मध्ये डेक्कन कॉलेज पुन्हा नव्याने पदव्युत्तर शैक्षणिक संस्था म्हणून सुरु करण्यात आले. भाषाशास्त्र, वैदिक संस्कृत आणि इतिहास असे तीन विभाग या महाविद्यालयात सुरु झाले. त्याचवेळी डॉ. कर्वे इतिहास विभागात समाजशास्त्राच्या प्रपाठक म्हणून रुजू झाल्या. समाजशास्त्राच्या शिक्षक असल्या तरी इतिहास विभागात त्यांची नेमणूक असल्याने इतिहास—पुरातत्व या अंतर्गत येणारे उत्खनन वगैरे मध्येही त्या ओढल्या गेल्या. इतक्या विविध क्षेत्रातून वावरल्यामुळे त्यांचे जीवन व्यापक झाले. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून बघायला मिळते. जवळजवळ ३० वर्षे त्यांनी अध्यापन आणि संशोधन केले. ७० च्या वर शोधनिबंध लिहिले. ११ पुस्तके लिहिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९ विद्यार्थ्यांना डॉक्टरेट मिळाली. देशभर, जगभर त्या हिंडल्या. संशोधन केले. व्याख्याने दिली. अनेक मानसन्मान त्यांना मिळाले. १९४७ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या इंडियन सायन्स कॉंग्रेसच्या मानवशास्त्र विभागाच्या त्या अध्यक्षा होत्या. १९५९ मध्ये अमेरिकेतील कॅलिफोर्नियाच्या बर्कले विद्यापीठामध्ये त्यांना अतिथी प्राध्यापक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

डॉ. इरावती कर्वे या हाडाच्या मानवशास्त्रज्ञ होत्या. इतिहास आणि समाजशास्त्र याचा अभ्यास करतानाच या दोन्ही शाखांशी जवळच्या असणाऱ्या मानवशास्त्र अभ्यासप्रणालीस त्यांनी मूर्त स्वरुप दिले. बाईंची पदवी तत्त्वज्ञानाची, डॉक्टरेट जीवशास्त्रीय मानवशास्त्रातील, नेमणूक इतिहास विभागात आणि शिकवायचे समाजशास्त्र इतक्या विविध अभ्यासशाखेत वावरल्यामुळे मानवशास्त्रासारख्या आंतरशाखीय अभ्यासप्रणालीचा पाया त्या घालू शकल्या. त्यांचे साहित्य विविधांगी असले तरी त्याचे स्वरुप मानवशास्त्रीय आहे. त्यांच्या साहित्याचा विचार करण्यापूर्वी त्यांच्या डेक्कन कॉलेज मधील संशोधनकार्याचा विचार करावा लागेल कारण या सर्व साहित्याचा आशय त्यांच्या संशोधन कार्यात दडला आहे.

इरावती बाईंनी मानवशास्त्राचे पारंपारिक पुस्तकी स्वरुप बदलले. त्यांनी मानवशास्त्रीय संशोधन कसे आणि का म्हणजेच (What & Why) या प्रश्नांच्या चौकटीत आणले. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर What are we as Indians? Why are we as we? And From where are we? या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

जैविक आणि सांस्कृतिक विविधता हा त्यांच्या अभ्यासाचा मुख्य आशय होता. त्यांनी हाताळलेला सर्वात महत्वाचा आणि निर्णायक विषय म्हणजे हिंदु धर्मातील जाती संस्था. या विषयावर सखोल संशोधन करुन एक सिध्दांत मांडला.

एक सजीव प्राणी म्हणून जीवशास्त्रीय अंगाने तर एक सामाजिक प्राणी म्हणून सामाजिक अंगाने, सांस्कृतिक अंगाने मानवाच्या उत्पत्ती पासून आजपर्यंतच्या सर्वच गोष्टींचा उहापोह मानवशास्त्रात केला जातो आणि इतकेच नाही तर भविष्यातील त्याच्या बदलावरही विचार होतो. सर्वच सामाजिक आणि जीवशास्त्रीय अभ्यासप्रणालींपेक्षा मानवशास्त्र हा वेगळा विषय आहे. ज्यामध्ये आपण कोण आहोत? आपण कसे आहोत? आणि आपण जसे आहोत तसे का आहोत याचा विचार केला जातो. या ठिकाणी आपण म्हणजे 'माणूस' अपेक्षित आहे. मानवाची निर्मिती ही एकाच ठिकाणी होऊन तो जगभर स्थलांतरीत झाला असावा किंवा वेगवेगळ्या पूर्वजांपासून वेगवेगळ्या ठिकाणी उत्पन्न झाला असावा असे दोन सिध्दांत आहेत. विविध आधारभूत वैशिष्ट्यांनुसार मानवाचे विविध वंशात वर्गीकरण केले गेले. मानवशास्त्रात होणाऱ्या विविध मानवी समूहांच्या अथवा वंशांच्या सखोल अभ्यासामुळेच या शास्त्राला मानववंशशास्त्र असे म्हणले जाऊ लागले. तत्कालीन मानवशास्त्र या विषयाचा उल्लेख मानववंशशास्त्र असा केला जात असे.

मानवी उत्पत्ती विषयी डार्विन यांनी मानवाची उत्पत्ती आफ्रिकेत झाली असावी असा अंदाज केला होता. त्यानंतरच्या काळात त्या विषयी बरीच उलट–सुलट चर्चाही झाली मात्र रेण्वीय मानवशास्त्रात नव्याने झालेल्या संशोधनाचे आधारे मायटोकॉन्ड्रिअल इव्ह च्या संशोधनातून आजच्या हयात मानवाची म्हणजे होमो सेपिअनची मूळ आई ही आफ्रिकेतच उत्पन्न झाली होती. म्हणजेच आपले उत्पत्ती स्थान हे आफ्रिकाच होते यावर शिक्कामोर्तब होते. ज्याप्रमाणे मायटोकॉन्ड्रिअल इव्ह च्या निष्कर्षातून मातृवंशीय प्रवाह उलगडता येतो पुरुषाच्या ःश्र क्रोमोसोमच्या मार्गाने पितृवंशीय शाखेचा माग काढता येतो.

मानवी उत्क्रांतीच्या दृष्टीने ऑस्ट्रेलोपिथिकस, होमो इरेक्टस, निएंडरथल आणि होमो सेपिअन हे टप्पे नक्की आहेत. उत्क्रांती अवस्थेतील रामापिथिकस हा नमुना सुरुवातीच्या काळात मानवाचा पूर्वज म्हणून मानला गेला मात्र नविन संशोधनातून तो ओरांगउटन या आशियाई कपीचा पूर्वज आहे आणि मानवाचा पूर्वज नाही हे नक्की झाले आहे. जगभर मिळालेल्या मानवसदृश आणि मानवी जीवाश्मांच्या आधारे मानवी उत्क्रांतीचा अभ्यास झाला आहे.

**वंश कल्पना:** वंश कल्पना ही डार्विनच्या आधीपासून अस्तित्वात होती. वंश हे मानवजातीचे प्रमुख विभाजन असून जन्मजात शारीरीक वैशिष्ठ्यांच्या आधारे ते ओळखले जाते. हुटन यांच्या व्याख्येनुसार मानव मात्रांचे वर्गीकरण वंश या गटात केलेले असून प्रत्येक वंशातील प्रत्येक सदस्य जरी आपले वेगळेपण दाखवित असला तरीही वंशाच्या प्रत्येक सदस्यात काही गुणधर्म, रचना अथवा शारिरिक मोजमापे सामाईक असतात आणि ती पिढ्यापिढ्यांतून संक्रमित होत आलेली असतात. थोडक्यात समान शारीरीक लक्षणे असलेल्या लोकांचा वंश तयार होतो असे मानले गेले. वंश कल्पना ही राष्ट्रीयत्व, भाषा, धर्म, प्रांत अथवा भौगालिक घटकांपासून पूर्ण वेगळी आहे.

**वंश कल्पने विषयी युनेस्कोचे स्पष्टिकरण:** आजचा मानव हा होमो सेपियन असून 'होमो' या प्रजातीचा घटक आहे. एक प्रजात म्हणजेच त्यातील कोणत्याही विरुध्दलिंगी सदस्यात, जैविक संकर घडून निर्मितीक्षम प्रजा उत्पन्न होऊ शकते. याच जीवशास्त्रीय सिध्दांतामुळे वंश कल्पनेतील मर्यादा स्पष्ट होतात. दुसऱ्या महायुध्दाच्या परिणामांवर तोडगे शोधण्याच्या दृष्टीने युनेस्कोची स्थापना झाली. १९४९ मध्ये विविध देशांतील मानवशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांची परिषद भरविण्यात आली, त्यामध्ये वंश आणि वंशवाद यावर सखोल चिंतन झाल्यावर १९५० मध्ये त्यांनी एका निवेदनाव्दारे असे स्पष्ट केले की,

मानवजात ही सर्व एकच असून सर्व मानव होमो सेपियनचेच वंशज आहेत. निरनिराळया मानव गटात दिसणारे भेद हे भिन्न भौगोलिक परिस्थिती, भिन्न विकास प्रक्रिया यामुळे दिसतात. जीवशास्त्रीय दृष्ट्या विचार करता या मानवाच्या वेगवेगळ्या गटात दिसणारे गुण हे त्यांच्या अनुवांशिक रचनेमुळेच असतात. यात जरी फरक असले तरी साम्यही तितकेच असते. या मानवगटांत आंतरविवाह होणे सहज शक्य असले तरी भौगोलिक, सांस्कृतिक अडथळ्यांमुळे ते होऊ शकत नाहीत. केवळ त्यामुळेच भिन्न भिन्न शारीरीक लक्षणे आढळतात. प्रत्येक समूहाचा जैविक इतिहास भिन्न असल्यामुळे त्यांची लक्षणे अबाधित राहतात. वंश कल्पनेमुळे समान शारीरीक गुणधर्माचा मानव गट अपेक्षित असला तरीही हे गुणधर्म केवळ भौगोलिक, सांस्कृतिक विभिन्नतेमुळेच असतात. हे सर्व अगदी स्पष्ट आणि तर्कशुध्द आहे. तरीही लौकिकार्थाने वंश म्हणजे एखादा राष्ट्रीय, धार्मिक, प्रादेशिक, भाषिक गट असे मानले जाते. परंतू असा शब्दप्रयोग करणे चुकीचे आहे. त्यामुळे या गटांना वंश म्हणण्याऐवजी एथनिक ग्रुप (Ethnic Group) म्हणजेच वांशिक गट म्हणता येऊ शकेल.

मानसिक वैशिष्ट्य, स्वभाव वैशिष्ट्य, व्यक्तिमत्व, चारीत्र्य याचा वंशाशी काहीही संबंध नाही. जगात शुध्द असा वंश सापडणे अशक्य आहे कारण वंश मिश्रण हे अखंडपणे चालू आहे. अनुवांशिकतेव्दारे जरी गुणधर्मांचे जतन होत असले तरी वंश ही सामाजिक बाब आहे, जीवशास्त्रीय नाही. जीवशास्त्रीय दृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या मनुष्य हा इथून तिथून एकच आहे.

युनेस्कोच्या या ठरावामुळे वंश कल्पना ही वस्तुस्थितीस धरून नाही ती पोकळ आणि अवास्तव कल्पना आहे हे नक्की, म्हणूनच मानवाच्या या सर्वांगीण अभ्यासाला मानववंशशास्त्र असे न म्हणता मानवशास्त्र म्हणणेच संयुक्तिक आहे. मानवशास्त्र ही संज्ञा प्रचलित होणे आवश्यक आहे आणि गरजेचे आहे.

मानवशास्त्राच्या सुरुवातीच्या काळातील संशोधन हे एखाद्या समाजाचे, जाती जमातीचे, लोकसमुह शास्त्रीय विवेचन किंवा एथनोग्राफिक स्वरुपाचे होते किंवा समुहातील व्यक्तिंची शारीरीक मोजमापे घेणे, रूपिकिय घटक घेऊन वर्णनात्मक अहवाल देणे, दोन गटातील तुलना आणि साम्य अभ्यासणे असे स्वरुप होते. एखाद्या समाजातील लोकांच्या हाताचे बोटांचे ठसे घेऊन त्याच्या प्रकाराची वारंवारता पहाणे, त्याची अनुवांशिकता अभ्यासणे, त्याचे स्त्री–पुरुषातील प्रमाण पहाणे, डाव्या–उजव्या हातावरील साम्य व फरक पहाणे असा अभ्यास होत असे परंतू आता त्याचा उपयोग व्यक्ति परिचय अथवा गुन्हे अन्वेषण शास्त्र (Forensic Science) च्या दृष्टीने केला जातो. सुरुवातीच्या काळात विविध रक्तगटांचे एखाद्या समाजातील प्रमाण अभ्यासण्याची अभ्यासपरंपरा होती. रक्तातील जैवरासायनिक घटकांचा अभ्यास करुन त्यांचे अनुवांशिक संक्रमण, जीन्सची वारंवारता इत्यादींचा अभ्यास होत असे. दंतमानवशास्त्रासारखी अलिकडच्या काळात विकसित झालेल्या शाखेत मानवी दात त्याचे आकारमान, रूपिकिय स्वरुप, शेतीव्यवस्था, आहारपध्दतीचा दातावर झालेला परिणाम, उत्क्रांतीनुरुप

झालेले दातातील बदल यावरही संशोधन झाले आहे. मानवी शरीरातील दृष्य आणि अदृष्य म्हणजे जैवरासायनिक अशा सर्व प्रकारच्या विविधतेचे प्रकार त्यामागील अनुवांशिकता, त्याचे समाजातील प्रमाण यावर भरपूर मानवशास्त्रीय संशोधन झाले आहे.

**मानवशास्त्राची मराठी साहित्य परंपरा:** डॉ. इरावती कर्वे यांच्या मते मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरुप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृति होय. त्यांनी केलेल्या संस्कृतीविषयक लेखनामुळे डॉ. कर्वे यांची ओळख सामाजिक व सांस्कृतीक मानवशास्त्रज्ञ म्हणून झाली. संस्कृती, हिंदु समाजः एक अन्वयार्थ, मराठी लोकांची संस्कृती यांसारखे अनेक मराठी आणि इंग्रजी सुध्दा ग्रंथ त्यांनी लिहिले. हे सर्व लेखन समाजशास्त्रीय आणि मानवशास्त्रीय आहे. गंगाजल, परिपूर्ती हे साहित्य जरी ललीत स्वरुपाचे असले तरी मानवशास्त्राचा वारसा सांगणारेच आहे. महाभारताचे मानवशास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी त्यांनी युगांतची रचना केली. महाराष्ट्रात मानवशास्त्रीय परंपरा रूजविण्याचा, वाढविण्याचा आणि जोपासण्याचा शास्त्रीय प्रयत्न डॉ. इरावती कर्वे यांनी केला. त्याच्या बरोबर सुरु झालेल्या मानवशास्त्रीय परंपरेत बळकटी देण्यासाठी रा. ना. दांडेकर, डॉ. घुर्ये या सारख्या संशोधकांनी केलेल्या संशोधनातून मानवशास्त्र परंपरेस चालना मिळाली.

सर्वसामान्यांमध्ये मानवशास्त्राबद्दल अशीही एक समजुत आहे की, या शास्त्रात मानवी अस्थि आणि कवट्यांचाच अभ्यास चालतो प्रत्यक्षात उत्क्रांती विषयाला पूरक म्हणून मानवी अस्थिंची लांबी, रुंदी, जाडी उत्क्रांतीनुरुप फरक, विविधता, आजार यांच्याशीच संबंधीत आहे. शारिरीक मानवशास्त्राच्या जोडीनेच सामाजिक मानवशास्त्र ही शाखा विकसित झाली. सामाजिक आणि सांस्कृतिक मानवशास्त्रामध्ये य. श्री. मेहेंदळे, विलास संगवे आणि मधुसुदन शारंगपाणी या सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकांनीही मानवशास्त्राच्या विकासाला हातभार लावला. त्यांनी लिहिलेली 'मानवशास्त्र', 'सामाजिक मानवशास्त्र' ही पुस्तके फक्त मानवशास्त्राच्या प्रारंभिक अभ्यासासाठीच उपयुक्त नाहीत तर आवश्यक स्वरूपाचे संदर्भग्रंथही आहेत. सामाजिक, सांस्कृतिक मानवशास्त्राप्रमाणेच पुरातत्वीय मानवशास्त्र ही मानवशास्त्राची एक विशेष शाखा असून प्राचीन, प्रागैतिहासिक मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास त्यामध्ये केला जातो. मानवशास्त्राचीच एक उपशाखा या नात्याने त्यामध्ये झालेल्या संशोधनाच्या लेखनाचा उपयोग मानवशास्त्रासाठी झाला. डॉ. ह. धि. सांकलिया, डॉ. म. के. ढवळीकर, डॉ. म. श्री. माटे, डॉ. शां. भा. देव यांनी केलेले संशोधन आणि लेखन जरी पुरातत्व विषयाचे असले तरीही पुरातत्व व मानवशास्त्र या अभ्यासप्रणाली एकमेकांशी संबंधितच आहेत. शिवाय या सर्वातून आद्य मानव, त्याची संस्कृति यावर प्रकाश पडतो.

मानवशास्त्राविषयीचा दुसरा एक मतप्रवाह जनमानसात आहे तो म्हणजे या विषयात आदिवासींचा अभ्यास केला जातो. काही प्रमाणात ते खरेही असले तरी मानवशास्त्रचा अभ्यास हा केवळ आदिवासींपुरता मर्यादित नाही. आदिवासी संस्कृतिचे स्वरूप शहरी, ग्रामीण संस्कृतीपेक्षा खूपच भिन्न असल्याने आदिवासी संस्कृतीच्या अभ्यासास मानवशास्त्रात अनन्यसाधारण महत्व आहे. त्याच अनुषंगाने आदिवासीं विषयक साहित्य विपुल प्रमाणात निर्माण झाले आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या वतीने चालवले जाणारे 'हाकारा' हे त्रैमासिक किंवा 'संशोधन पत्रिका' आदिवासी जीवनाविषयीचे सर्व काही म्हणजे त्यांच्या पध्दती, जीवनमान, धर्म, त्यांचा विकास, त्यांचे प्रश्न मराठी भाषेमध्ये उपलब्ध करुन देते. या साठी जसे शहरी भागातील संशोधक, अभ्यासक लेखन करतात तसेच अगदी आदिवासी कार्यकर्त्यांसाठीही हे एक उपयुक्त साधन आहे. मानवशास्त्रीय परंपरेला धरुन आदिवासी विषयक साहित्य निर्माण करण्यामध्ये 'हाकारा' चे मोठे योगदान आहे. त्याचप्रमाणे आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (T.R.T.I) आदिवासी संशोधन पत्रिकेमधून जसे इंग्रजी संशोधन साहित्य निर्माण होते; तसेच मराठी संशोधन साहित्य देखील प्रकाशित केले जाते. 'परामर्श' या नियतकालीकातून सांस्कृतिक उत्क्रांतीवादावर लेखन प्रसिध्द झाले आहे. तसेच मानवशास्त्रास पूरक असे लेखनही झाले आहे. या शिवाय विचार शलाका, बायजा, श्री वाणी, संशोधक आणि विज्ञानयुग या संशोधन पत्रिका जरी फक्त मानवशास्त्र या विषयाशी निगडीत नसल्या तरी मानवशास्त्रीय साहित्याला या नियतकालिकांमधून वेळोवेळी प्रसिध्दी दिली जात असते. परंतू या नियतकालिकांमधून सांस्कृतिक आणि सामाजिक मानवशास्त्राशी निगडीत विषय मोठ्या प्रमाणावर मांडले जातात. जीवशास्त्रीय मानवशास्त्र (Biological Anthropology) विषयक साहित्य त्या मानाने कमी प्रमाणात आहे. याला कारण म्हणजे जीवशास्त्रीय मानवशास्त्र हे थोडे तांत्रिक (Technical) स्वरुपाचे असते. वैज्ञानिक इंग्रजी शब्दांना मराठी भाषेमध्ये अनुरुप अर्थ देणाऱ्या शब्दांची अथवा संज्ञांची गरज असते. शिवाय हा शब्द चपलख बसणारा आसवा. बोजड असू नये आणि बोलीभाषेतील असणे गरजेचे असते. हीच बाब पुरातत्वीय मानवशास्त्र या शाखेसाठी लेखन करतानाही लागू पडते.

संशोधन पत्रिका, मासिके, कथा, कादंबऱ्या आणि आकाशवाणीवरुन होणाऱ्या मानवशास्त्रीय लेखनाव्यतिरिक्त मानवशास्त्राची म्हणून लिहिली गेलेली पुस्तके आणि ज्या पुस्तकांचा समावेश अभ्यासक्रमासाठीही करण्यात आला ती पुस्तके म्हणजे डॉ. य. श्री. मेहेंदळे यांचे सामाजिक मानवशास्त्र, श्री. मधुसुदन शारंगपाणी यांचे मानवशास्त्र, दिपाली आठवले यांचे भारतीय समाजाचे मानवशास्त्र आणि विलास संगवे यांची पुस्तके सामाजिक सांस्कृतिक मानवशास्त्राची आहेत. डॉ. म. के. ढवळीकर यांचे पुरातत्वविद्या, ह. धी. सांकलिया आणि म. श्री. माटे संपादित महाराष्ट्रातील पुरातत्व या पुस्तकांमध्येही नामांकित लेखकांनी प्राचीन संस्कृतिवर प्रकाश टाकला आहे. तसेच डॉ. माटे, डॉ. देगलुरकर, डॉ. शां. भां. देव यांची पुस्तके जरी पुरातत्वशास्त्राची असली तरी प्राचीन मानवी संस्कृतीचे पुरावे आणि स्पष्टीकरण या मुळे पुरातत्वीय मानवशास्त्राचीच होतात. डॉ. वि. श्री. कुलकर्णी यांचे 'भौतिकी मानवशास्त्र' आणि 'भारतातील आदिवासीवंश' ही दोन्ही पुस्तके महाराष्ट्र संस्कृती मंडळाने प्रसिध्द करुन मानवशास्त्र विषयाची दखलच घेतली आहे असे म्हणावे लागेल. प्रस्तुत लेखकाचे 'आदिम' हे पुस्तक मानवशास्त्र, पुरामानवशास्त्र, मानवी उत्क्रांती आणि विविधता, मानवशास्त्राची क्षेत्र अभ्यास परंपरा या विषयी उहापोह करणारे आहे. संस्कृती, निसर्ग आणि जीवन शैली तसेच महाराष्ट्रातील आदिवासी हे संपूर्ण मानवशास्त्रीय लेखनच आहे. मराठी विश्वकोष संस्थेच्या वतीने मराठी विश्वकोषाचे डीजीटलायझेशनचे काम सुरु असून मानवशास्त्र विषयातील सर्व व्याख्या, परिभाषा, संकल्पना मराठीमध्ये लिहून प्रसिध्द करण्याचे काम सद्या चालू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्व मानवतावादी साहित्यास मानवशास्त्रीय विचारांची बैठक आहे. मानवशास्त्रज्ञांनी ज्याप्रमाणे मानवशास्त्र या विषयावर लेखन केले आहे त्याप्रमाणेच मानवशास्त्रज्ञ म्हणून ओळखले न जाणारे ज्येष्ठ साहित्यिक, अभ्यासक, तत्वज्ञ

यांनीही आपल्या अभ्यासातून मानवशास्त्रीय वाड्मय निर्माण केले आहे. डॉ. दुर्गाबाई भागवत यांनी आसाम, काश्मीर, गुजरात, दख्खन बंगाल, पंजाब, तामीळनाडू इत्यादी प्रांतांच्या लोककथांवर स्वतंत्र पुस्तके लिहिली आहेत. याशिवाय मध्यप्रदेशच्या वनकथा, धर्म आणि लोकसाहित्य, डांगच्या लोककथा, लोकसाहित्याची रुपरेखा या पुस्तकांतून त्यांच्या मानवशास्त्रीय अभ्यासाचा ठसा दिसून येतो. दूरवर दूर्गम भागात जेथे आपलीच संस्कृती परंपरा श्रध्दा आणि अंधश्रध्दा जपत आपल्या अस्तित्वाची जाणीव न करुन देणाऱ्या बस्तर येथील माडिया गोंडांमध्ये प्रत्यक्ष राहून त्यांच्या जीवनाचा अविष्कार 'महानदीच्या तीरावर' या पुस्तकावर साकारला आहे. 'आठवले तसे' या पुस्तकातून त्यांनी आपली परखड मते ही मांडली आहेत. श्री. व्यंकटेश माडगूळकर यांची माणदेशी माणसं काळी आई, गावाकडच्या गोष्टी, बाजार आणि बनगरवाडी या पुस्तकांतून मानवशास्त्रीय प्रतिभा फुललेली आहे. प्रभाकर संझगिरी यांनी मानवाची कहाणी हे पुस्तक, मानवी उत्पत्ती आणि उत्क्रांती या विषयी लिहिले आहे. डॉ. गोविद गारे यांनी तर महाराष्ट्रातील बहुतेक सर्व आदिवासी जमाती विषयी विषयी विपुल लेखन केले आहे. आदिवासी समस्या, प्रश्न आणि संस्कृतीवर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्याची यादी करणेही मोठे काम आहे. डॉ. धैर्यशील शिरोळे यांनी लिहिलेले 'आदिवासी कथा आणि व्यथा' हे पुस्तकही मानवशास्त्राचा वारसा सांगणारे आहे. रावसाहेब कसबे यांचे 'धर्माचे मानवशास्त्रीय स्वरुप', परुळेकर यांचे 'जेंव्हा माणूस जागा होतो' ही पुस्तके संपूर्ण मानवशास्त्रीयच आहेत. याशिवाय र. वा. दिघे, शरद पाटील, शंकरराव खरात यांच्या साहित्यकृती या मानवशास्त्राचे नाते सांगणाऱ्या आहेत.

गो. नी. दांडेकर, शांता शेळके आणि विद्याधर पुडलिक यांच्याही लेखनाची नोंद घ्यावी लागेल. डॉ. सरोजिनी बाबर यांचे आदिवासींचे सण, उत्सव, संस्कृती, कुलदैवत, कुळाचार हे सर्व साहित्य केवळ मानवशास्त्र विषयकच आहे. प्रा. भगवान भोईर यांनी संपादित केलेले 'उध्वस्त पाखरे' हे पुस्तक आदिवासींच्या विविध समस्या सांगणारे आहे. अगदी विनोदी लेखक आचार्य अत्रे यांनीही 'कऱ्हेचे पाणी' या पुस्तकाच्या खंडात 'वारली मुलखात मुशाफिरी' या नावाचे एक प्रकरण लिहिले आहे. यामध्ये अत्र्यांनी वारली जीवनपटच उघडून दाखवला आहे. ह. श्री. भावे यांची 'शिकार ते शेती' आणि 'मानवाचे पूर्वज' ही पुस्तके पुरातत्व, मानवी उत्क्रांती आणि जीवशास्त्रीय मानवशास्त्र यावर विवेचन करणारी आहेत. डॉ. मिलिंद बोकिल, श्री. अमोद वाघमारे, डॉ. गोविंद गारे यांचे आदिवासीविषयक साहित्य मानवशास्त्रीयच आहे.

हे सर्व दिग्गज मानवशास्त्रज्ञ म्हणून मानवशास्त्राच्या क्षेत्रात वावरत नसले तरी या सर्व अभ्यासकांनी निर्माण केलेल्या साहित्यातून मानवशास्त्राची आणि मराठी भाषेचीही सेवा केली आहे हे विसरता येणार नाही. साहित्यिक आपल्याला भावणारे लिहित असतात. मानवी जीवन, संस्कृती आणि परंपरा यामध्ये इतकी विविधता आहे की, संस्कारीत साहित्यिक मनाला याचे कुतुहल न वाटले तरच नवल आणि त्यातूनच अशा मानवशास्त्रातील साहित्यकृती निर्माण झाल्या आहेत. मानवशास्त्र हा विषयही इतका व्यापक आणि सखोल आहे की, मानवशास्त्रज्ञांशिवाय कित्येकांना या विषयाने आकृष्ट केले आहे. त्यातूनच मराठी भाषेमध्ये मानवशास्त्र विषयक साहित्य विपुल प्रमाणात निर्माण झाले आहे. ही मानवशास्त्राची मराठी भाषेतील साहित्य परंपरा आहे.

**महाराष्ट्रातील मानवशास्त्र विषयक अभ्यास संस्था:** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे की जेथे मानवशास्त्र विषयाचा पदव्युत्तर आणि संशोधन शोध अभ्यासक्रम चालत आहे. या शिवाय अलिकडे वर्धा येथील केंद्रिय विद्यापीठात मानवशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम चालू करण्यात आला आहे. डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठात पुरातत्व विषयांतर्गत मानवशास्त्र विषयक संशोधन चालते. पुण्यातील आदिवासी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था येथे आदिवासी विषयक मानवशास्त्रीय अभ्यास केला जातो. नागपूर येथे भारतीय मानवशास्त्र सर्वेक्षण संस्था ही राष्ट्रीय स्तरावरील मानवशास्त्र संस्था मानवशास्त्राच्या अभ्यासात मोठे योगदान देत आहे, त्याप्रमाणेच मुंबईच्या टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस आणि पुण्याची गोखले अर्थशास्त्र संस्था येथेही मानवशास्त्राला पुरक संशोधन चालते. या शिवाय पुणे येथील महाराष्ट्र मानवविज्ञान संस्था ही पूर्णपणे मानवशास्त्रीय संशोधन करणारी एक संस्था आहे. मानवी आरोग्य कुपोषण नागरी विकास शिक्षण या सारख्या विविध विषयात संशोधन करणाऱ्या खाजगी आणि निमसरकारी संस्था मानवशास्त्रीय संशोधन प्रकल्प राबवत असतात. शैक्षणिक, संशोधन करणाऱ्या असंख्य संस्था तेथे होणारे संशोधन आणि संशोधन साहित्याचे प्रकाशन यातून मानवशास्त्र अभ्यास आणि साहित्य परंपरा व्यापक झाली आहे.

**महाराष्ट्रातील मानवशास्त्रीय संशोधन परंपरा:** सर्वच मानवशास्त्रीय संशोधनाचा आढावा घेणे या ठिकाणी शक्य नसले तरी संशोधनाचे मुख्य विषय आणि शाखा याचा येथे थोडक्यात आढावा घेतला आहे. महाराष्ट्रातील मानवशास्त्रीय साहित्य परंपरे प्रमाणेच मानवशास्त्रीय संशोधन परंपराही प्रदिर्घ आहे. विविध जाती जमातींच्या लोकसमुहशास्त्र म्हणजेच एथनोग्राफिक अभ्यासाशिवाय सामाजिक, सांस्कृतीक आणि जीवशास्त्रीय मानवशास्त्रातील विविध संशोधन प्रकल्प आणि पीएच. डी. संशोधन विभागात झाले आहे. वैद्यकीय मानवशास्त्र, मुलांची शारीरीक वाढ, कुपोषण, आरोग्य, रोगराई, पर्यावरणचा आरोग्यावर होणारा परिणाम, तपकिर, तंबाखु, सिगारेट, बिडी यांचा आरोग्यावर विशेषत: गर्भवती आणि स्तनदा मातांच्या आरोग्यावर होणरे परिणाम, व्यसनाधीनता, मानवी वर्तन आणि आरोग्य, स्त्रीयांचे आरोग्य, मानवी डीएनए, रंगांधळेपणा, त्वचेचा रंग या सारख्या रेण्वीय जीवशास्त्रीय स्वरुपाच्या विषयांवर संशोधन झाले आहे. वृध्द नागरीक आणि वृध्दांच्या समस्या, खोट्या आदिवासींची समस्या, आदिवासी पुनर्वसन, वन कायदा, पेसा कायदा यासारख्या सामाजिक समस्या आणि त्या सोडवण्यासाठी धोरणात्मक आणि नियोजनात्मक उपाय योजना देण्याच्या दृष्टीने मानवशास्त्र संशोधन परंपरा काम करीत आहे. पारंपारीक वर्गीकरण अथवा नोंदणी स्वरुपाची अभ्यास परंपरा पूर्णपणे बंद होऊन मानवशास्त्राच्या विविध विषयांवर उपयोगित म्हणजे ॲप्लाईड स्वरुपाची संशोधन परंपरा मानवशास्त्राने अंगिकारली आहे.

# कमला भसीन : एक दुर्लक्षित समाजशास्त्रज्ञ

**प्रा. संदीप चौधरी**, समाजशास्त्र विभाग, स. भु. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद. भ्रमणध्वनी: ९८२२५१००४

लेखाचे शीर्षक वाचून थोडेसे आश्चर्य वाटेल परंतु कटू असले तरी हे सत्य आहे. तसे पाहिले तर कमला भसीन यांना ओळखणार नाही अशी व्यक्ती अकॅडेमीक क्षेत्रात शोधूनही सापडणार नाही. समाजशास्त्रात तर नाहीच नाही. मग कमला भसीन यांना एक दुर्लक्षित समाजशास्त्रज्ञ असे का म्हटले असावे. याचे कारण म्हणजे समाजशास्त्र ज्ञानशाखेने भसीन यांची एक समाजशास्त्रज्ञ म्हणून दखल घेतल्याचे दिसून येत नाही. अकादमिक क्षेत्रातील भसीन यांचे कार्य हे सैद्धांतिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही पातळींवर प्रभावीपणे सुरू असल्याचे दिसते. विशेषत: लिंगभाव समानता, मानव विकास आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांतील त्यांचे भरीव कार्य आहे. लिंगभाव आणि स्त्रीशक्तीकरण या विषयाशी निगडीत समृद्ध संकल्पनात्मक लेखन त्यांनी केले आहे. त्यांची विपुल ग्रंथसंपदा याची साक्ष आहे.

२४ एप्रिल १९४६ रोजी राजस्थानातील एका खेडेगावात जन्मलेल्या भसीन या वयाची सत्तरी पार केल्यानंतर देखील तरूणाईला लाजवेल असा उत्साह, जिदद् आणि कार्यप्रवणता या गुण वैशिष्टयांनी समृद्ध आहेत. कमला दीदी यांचे बालपण राजस्थानातील खेडयांमध्ये गेल्यामुळे त्यांना ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नांचा अतिशय जवळून परिचय झाला. ज्याचा उपयोग पुढे त्यांना भारतीय ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर हिरीरीने मांडण्यासाठी आणि स्त्रीवादी चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी झाला. भसीन यांनी राजस्थान विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर जर्मनी येथील प्रसिद्ध मन्स्टर विद्यापीठातुन 'विकासाचे समाजशास्त्र' या विषयात 'मास्टर ऑफ सायन्स' अभ्यासक्रम पूर्ण केला. बॅड होन्नेफ येथील 'जर्मन फाउंडेशन फॉर डेव्हलपिंग कंटीज उद्‌बोधन केंद्रात' सुमारे वर्षभर त्यांनी अध्यापन केले.

भारतात परतल्यानंतर त्या राजस्थानातील उदयपूर येथील 'सेवा मंदिर' या अशासकीय संस्थेच्या कामात सक्रिय सहभागी झाल्या. सेवा मंदिर प्रामुख्याने देशातील गरीब आणि वंचित घटकांच्या उत्थानासाठी कार्य करते. तेथे कार्यरत असतांना भसीन यांनी ग्रामीण भागातील गरीबांच्या सक्षमीकरणासाठी कृषी, आर्थिक आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यासाठी थेट काम केले. सेवा मंदिर च्या माध्यमातून काम करतांना भारतातील विषमतावादी जातीय व्यवस्थेचे त्यांना जवळून निरीक्षण करायला मिळाले. जातीय विषमतेची बीजे ही समाजात खोलवर रूजलेली आहेत तर त्याचे प्रतिबिंब राजकीय व्यवस्थेत आणि प्रशासकीय यंत्रणेत देखील उमटल्याचे त्यांना दिसून आले. शासकीय योजनांची भेद जनक अंमलबजावणी पाहून सामाजिक विकास आणि सामाजिक न्यायाला हरताळ फासला जात आहे हे पाहून त्या अस्वस्थ झाल्या. त्यातूनच विकासाचे समाजशास्त्र व्यवहारात आणायचे हे ठरवून त्यांनी विकासाचे प्रश्न सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून मांडण्यास सुरूवात केली. जातीय विषमता आणि स्त्रियांचे प्रश्न हे एकमेकांत गुंतलेल्या आहेत हे त्यांच्या लक्षात आले. पुढे विकासाच्या प्रश्नांशी दोन हात करतांना त्याला स्त्रीवादाची जोड देण्याचे महत्वपूर्ण कार्य त्यांनी केले. त्यांच्या कामाचा मुख्य भर हा लोकांना त्यांच्या स्वत:च्या विकासासाठी लोकांना प्रेरीत करणे हा राहिला. सेवा मंदिरच्या चार वर्षाच्या कार्यकाळात भसीन यांनी ग्रामीण वास्तवांवर तसेच ग्रामीण भागातील गरीब विकासाच्या कार्यक्रमांवर व धोरणांवर होणाऱ्या परिणामांवर विस्तृत लिखाण केले. १९७५ पासून, भसीन यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या एफएओकडे २७ वर्ष काम केले. सध्या भसीन संगत—ए फेमिनिस्ट नेटवक्र: जागोरी, महिला संसाधन आणि प्रशिक्षण केंद्र आणि जागोरी ग्रामीण चॅरिटेबल टस्ट मध्ये सक्रिय सदस्य म्हणून कार्यरत आहेत. तसेच दक्षिण एशियाई मानवाधिकार संघटनेचा सदस्य म्हणून योगदान देत आहेत. महिला आणि मुलींवरील हिंसाचार रोखण्यासाठी जगभरातील पीस वूमन ऑफ द ग्लोबल नेटवक्रच्या सह—अध्यक्ष आणि जागतिक वन बिलियन रायझिंग मोहिमेच्या दक्षिण आशिया समन्वयक म्हणून त्या काम करतात.

स्त्रीवाद ही पाश्चिमात्य संकल्पना असल्याचे त्या नाकारतात. उलटपक्षी भारतीय स्त्रीवाद हा भारतीय समाजातील अव्यवस्था आणि विषमतेचे फलित असल्याचे त्या मानतात. कमला दीदी स्वत: देखिल पाश्चिमात्य स्त्रीवादाचे अध्ययन करून स्त्रीवादी बनल्या नाहीत असे स्पष्ट करतात. त्या विकासवादी कार्यकर्त्या ते स्त्रीवादी विकास कार्यकर्त्या असा त्यांचा प्रवास हा भारतीय स्त्रीवादाला अनुसरून झाला आहे असे मानतात. समाजातील बहुतांश लोक हे स्त्रीवादाला विरोध करतात कारण स्त्रियांना स्वतंत्रता देण्यास त्यांच्या प्रथा, परंपरा, विचारसरणी विरोध करतात. स्त्रीवादी महिला या स्वातंत्र, समानता आणि बरोबरीचा सन्मान मागतात. स्त्रीवाद म्हणजे पुरूष आणि स्त्रियांमधील युद्ध नाही तर दोन विचारसरणींमधील लढाई आहे. एक जो पुरूषांना वर्चस्व गाजविण्याचे सामर्थ्य देतो आणि दुसरा, जो समानतेचा पुरस्कार करतो, असेही त्या स्पष्ट करतात. सामाजिक परिवर्तनासाठी स्त्रीवादी सिद्धांत आणि व्यावहारिक कृती यांच्यात समन्वय साधण्याची नितांत आवश्यकता आहे. स्त्रीवादी सिद्धांत हे वैचारिक अधिष्ठान निर्माण करतात त्या आधारावर व्यवहारात कृतीशील अंमलबजावणी करण्यास प्रेरणा मिळते. म्हणून सिद्धांताला कृतीची जोड देण्याची आवश्यकता असते यावर त्या भर देतात. त्यांचे सामाजिक कार्य आणि विविध प्रकारचे लिंगभाव संवेदनशीलतेचे प्रशिक्षण कार्यक्रम याची साक्ष देतात.

भांडवलवादी अर्थव्यवस्था ही शोषणावर आधारित असून स्त्रियांचे मानवी हक्क नाकारते. व्यक्ती म्हणून स्त्रीचे अस्तित्व नष्ट करून केवळ एक शरीर म्हणून स्त्रीकडे पाहिले जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जगभरात फोफावलेली 'पॉर्न इंडस्टी' आणि 'कॉस्मेटिक इंडस्टी' होय असे त्या स्पष्ट करतात. हे दोन्ही उद्योग स्त्री देहाशी संबंधित आहेत, दोन्ही अब्ज डॉलर्सचे उद्योग. आणि त्यातूनच स्त्रियांवरील अत्याचार अथवा स्त्रियां विरूद्धच्या हिंसेत वाढ होत आहे. भांडवलवादामध्ये प्रत्येक गोष्ट ही विक्रीयोग्य मानली जाते, अगदी हाडामांसाची व्यक्तीदेखील व्यक्ती म्हणून अस्तित्व गमावते आणि राहते केवळ एक 'सेलेबल' वस्तू. अर्थातच भांडवलवादी व्यवस्थेत नफा लोकांपेक्षा अधिक महत्वाचा असतो. याच दृष्टिकोणातून एक व्यवस्था म्हणून भांडवलवादाला त्या विरोध करतात. भांडवलवाद हा पितृसत्ताकवादाचा एजंट असल्याचे त्या म्हणतात. मालकी हक्क हा भांडवलवादाचा आत्मा आहे. स्त्रीवरील मालकी हक्काची कल्पना ही कुटुंबातच रूजविली जाते. म्हणून कुटुंबातच लिंगभाव समानता जाणीवपूर्वक रूजविण्याचे प्रयत्न व्हायला हवेत असे त्या आग्रहाने मांडतात.

स्त्रीवादी चळवळीत कार्यरत असतांना चळवळींना वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी कमला दीदी यांनी स्त्रीवादाचे अनेक पैलू उलगडून दाखविणाऱ्या साहित्याची निर्मिती केली. स्त्रीवादी गाणी लिहिण्याबरोबरच सैद्धांतिक आणि वैचारिक ग्रंथाचे

लेखनही त्यांनी केले ज्यातून स्त्रीवाद म्हणजे काय? स्त्रीवादाची दिशा नेमकी काय आहे? हे स्पष्ट केले आहे. 'अंडरस्टॅंडिंग जेंडर (२०००) या पुस्तकात लिंग आणि लिंगभाव यातील भेद स्पष्ट करतांनाच लिंगभावाचे सामाजिक आणि सांस्कृतिक पैलू उलगडून दाखविले आहेत. 'व्हाट इज पेटायरकी' (१९९३) या पुस्तकात पितृसत्ताकवादाचा उगम आणि व्यवहारातील त्याचे सामाजिक दुष्परिणाम यावर प्रकाश टाकला आहे. 'एक्सप्लोरिंग मस्कुलिनिटी' (१९९३) या पुस्तकात पुरूषत्वाची संकल्पना स्पष्ट करून लिंगभाव समानतेचे महत्व स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर विविध प्रकारच्या पुरूषत्वाचे विवेचन अतिशय विस्तृतपणे मांडलेले आहेत. वर्चस्ववादी पुरूषत्व, सैनिकी पुरूषत्व यासारख्या पुरूषत्वांच्या विविध छटा त्यांनी या पुस्तकात उद्धृत केलेल्या आहेत. सामाजिक व्यवहारातील व्यक्तींच्या वर्तनाचे सैद्धांतिक विश्लेषणे या पुस्तकात वाचावयास मिळते. 'बॉर्डर्स अॅंड बाउंडरीज: विमेन इन इंडियाज पार्टीशन' (१९९९८) हे कमला दीदी यांचे आणखी एक गाजलेले पुस्तक. हे पुस्तक त्यांनी रितू मेनन यांच्यासोबत मिळून लिहलेले आहे. भारताच्या फाळणीची दाहकता स्त्रियांच्या दृष्टिकोणातून त्यांनी यात मांडली आहे. १९४७ च्या भारत–पाकिस्तान फाळणीच्या बळी ठरलेल्या समस्त स्त्री वर्गावारील दुष्परिणाम, अत्याचार आणि एकूणच स्त्रियांविषयीची अनास्था यावर प्रकाश टाकला आहे. कोणत्याही देशाची फाळणी असो, युद्ध असो वा दंगल असो, स्त्रियांवर अत्याचार केले जातात आणि स्त्रियांचा बळी ठरतात, हा जगभरातील इतिहास आहे. अशाच विस्मृतीत जावू पाहणाऱ्या फाळणीच्या इतिहासाला स्त्रीवादी दृष्टिकोणातून जगासमोर त्यांनी मांडले आहे. फाळणीची झळ बसलेल्या स्त्रियांच्या अनुभवकथनातुन त्यांच्या वेदनांना उजेडात आणले आहे. त्यातील संदर्भ जुने असले तरी फाळणीग्रस्त स्त्रियांच्या वेदनेची दाहकता आजही कायम आहे, असे त्या स्पष्ट करतात.

'फेमिनिझम अॅंड इट्स रिलेव्हन्स इन साउथ एशिया' या पुस्तकात कमला दीदी यांनी दक्षिण आशियातील स्त्रीवादाची विविध रूपे उलगडून दाखविली आहेत. पाश्चिमात्य स्त्रीवादापेक्षा दक्षिण आशियाई स्त्रीवाद हा भिन्न असल्याचे त्या मानतात. कारण पाश्चिमात्य समाज यापेक्षा दक्षिण आशियाई समाज हा अधिक परंपरागत स्वरूपाचा आहे. पारंपरिक पितृसत्तावाद, सरंजामशाही आणि कुटुंबातून जोपासली जाणारी पुरूषप्रधानता ही दक्षिण आशियाई समाजाची ओळख आहे. म्हणून स्त्रीवादाची स्थानिक रूपे ही दक्षिण आशियाई देशांमधील समाजव्यवस्थेतील अव्यवस्थेमुळे दिसून येतात. दक्षिण आशियाई समाजातील महिला या सामाजिक दुयमत्व स्वत:वर लादून घेतात आणि पितृसत्ताक परंपरांचे पालन करतात. त्यामुळे या देशांमध्ये स्त्रीवाद अधिक परिणामकारकपणे राबविण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे हे भसीन यांनी मांडले आहे. दक्षिण आशियाई समाजातील स्त्रियांनी सांस्कृतिक दडपण झुगारून देवून स्वत:च्या हक्कांसाठी न्याय लढा द्यावा असेही त्या सुचवितात. शेवटी स्त्रीवाद शांततेसाठी आहे हे ही त्या स्पष्ट करतात. या पुस्तकातून भसीन यांनी दक्षिण आशियाई देशांमधीन विविध स्त्री संघटनांच्या कार्याची फलश्रुती स्पष्ट केली आहे.

'इफ ओन्ली समवन हॅंड ब्रोकन द सायलेन्स' या पुस्तकात कमला भसीन यांनी बालकांच्या लैंगिक शोषणावर प्रकाश टाकला आहे. सभ्य समाजातील ज्येष्ठ मंडळी असहाय आणि निरागस बालकांचे कशा पद्धतीने शोषण करतात याचे सोदाहरण विश्लेषण त्यांनी या पुस्तकात केले आहे. या पुस्तकाद्वारे त्यांनी देशातील एका भीषण वास्तवावर बोट ठेवले आहे. मुलगा असो की मुलगी या दोहोंनाही सारखाच धोका वाईट स्पर्शाचा असतो तोही परिचित व्यक्तीकडूनच अनेकदा घरातल्याच व्यक्तीकडून असे विदारक सत्य त्या सांगून जातात. बालकांना मार्गदर्शन करतांना 'गुड टच' आणि 'बॅड टच' यातील फरक समजावून सांगतात. जो स्पर्श तुम्हाला अस्वस्थ करेल तो 'बॅड टच' त्या विरूद्ध बालकांनी वाचा फोडली पाहिजे असा मोलाचा सल्लाही त्या देतात. तसेच पालकांना घरातील वातावरण सुसंवादी ठेवण्याचे आवाहन करतात. पुस्तकात कमला दीदी यांनी भारतातील लैंगिक अत्याचाराचे स्वरूप आणि तीव्रता आकडेवारीनिशी स्पष्ट केली आहे.

स्त्रीवादासारख्या अतिशय गंभीर सामाजिक विषयात काम करतांना विनोदाच्या माध्यमातून स्त्रीवाद समजावून सांगण्याचाही प्रयत्न त्या करतात. हे त्यांच्या स्वभावाचे वेगळेपण आहे. जगभरातील स्त्रीवादाशी संबंधित विनोदांचे संकलन करून त्यांनी 'लाफिंग मॅटर्स' (२००४) हे पुस्तक संपादित केले आहे. विनोदाच्या माध्यमातून स्त्रीवाद उलगडून दाखण्याचे कसब या पुस्तकात स्पष्टपणे जाणवते. पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्या म्हणतात, 'हे खरे नाही की स्त्रीवाद्यांना विनोदबुद्धी नसते. आम्ही विनोदाविना या पुरूषप्रधान आणि भयानक स्त्री–विरोधी जगात टिकून राहिलो असतो काय? खरे तर, आपण स्वत:वर हसतो जेंव्हा हसण्यासारखे कुणी नसते तेव्हा'. पुस्तकातील बिंदिया थापर यांची रेखाटने विनोदातील गहन अर्थ अधिक परिणामकारकपणे वाचकापर्यंत पोचवतात. स्त्रीवादाची अर्थपूर्णता गंभीरपणे या विनोदांच्या माध्यमातून कमला दीदी यांनी अधोरेखित केली आहे.

कमला भसीन यांनी अकादमिक क्षेत्रातील सिद्धांत मांडणी आणि विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघटनांमध्ये कार्यरत असतांना अनेक संशोधन अहवालांचे लेखन करण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. समाजशास्त्राच्या सिद्धांतांना व्यवहारात समाजहिताच्या अंगाने उपयोग करून 'सैद्धांतिक समाजशास्त्र' आणि 'उपयोजित समाजशास्त्र' यांच्यात कमालीचा समन्वय साधला आहे. याच अर्थाने त्या 'प्रॅक्टिसिंग सोशिऑलॉजिस्ट' अथवा 'कृतीशील समाजशास्त्रज्ञ' ठरतात. परंतु रूढ अर्थाने त्या अकादमिक क्षेत्रात समाजशास्त्रज्ञ म्हणून ओळखल्या जात नाहीत. याची खंत एक समाजशास्त्राचा अभ्यासक म्हणून कायम वाटत राहिली होती. भारतातील समाजशास्त्राच्या शतकमहोत्सावानिमित्ताने कमला भसीन यांच्या कार्याची एक समाजशास्त्रज्ञ म्हणून आपण दखल घेवू शकलो तर या लेखाचे सार्थक होईल.

# शासतंत्रीय मनोवृत्ती व अवकाशाचे राजकारण : भारतातील भटक्या व विमुक्त जमातींचे द्वंद्व

**डॉ. धनराज अ.पाटील,** प्राध्यापक व विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

१) **पार्श्वभूमी** :– जगातील अनेक समुदाय त्यांच्या जैव–अनुवंशीक गरजांच्या शोधात भटकत आहेत. प्राचीन काळापासून ते मानवी संस्कृती व सभ्यतेचे वाहक आहेत. जगभरातील असे वैशिष्ट्यपूर्ण पशूपालक, भटके–व्यापारी, करमणूक कलाकार आणि फिरस्ते समुदाय वैश्वीक पातळीवर भटक्या जमाती म्हणून लोकप्रीय आहेत. भारतीय समाज ही अशा भटक्या समुदायांच्या अतुलनीय संस्कृतीने संपन्न झाला आहे.

भारतातील या समुदायांच्या इतिहासाचे जर वस्तुनिष्ठ अवलोकन केले, तर असे स्पष्ट होते की, तत्कालीन राज्यकर्त्यांनी मुख्यत: ब्रिटीश शासन व्यवस्थेने अत्यंत व्युव्हरचनात्मकपणे या समुदायांना त्यांच्या प्राग–ऐतिहासीक काळापासून त्यांना प्राप्त झालेल्या सामाजिक–सांस्कृतिक आणि आर्थीक राजकीय स्वायत्तता व स्वातंत्र्यापासून वंचीत ठेवले (गुहा. २०१५; गायकवाड, १९९८ ; राधाकृष्णन, २००९; कपाडीया, १९५२).

ब्रिटीशांसोबत उदयास आलेली आधुनिक राज्य व्यवस्थेची संकल्पना आणि दमनात्मक वर्चस्ववादी मानसीकतेद्वारे भारतातील भटक्या जमातींना अपारंपारीक, भिन्न आणि असभ्य समुदायांच्या श्रेणीमध्ये निर्देशित केले जाऊ लागले. अभ्यासकांच्या मते (चॅटर्जी, २००४; देवी, २००२) भारतातील भटक्या जमाती या अत्यंत महान ऐतिहासिक वारसा लाभलेल्या समुदायांपैकी एक असुन सुध्दा वसाहतकारांच्या विभाजनवादी पक्षपाती वारशाच्या ऐतिहासीक विघटनाने ग्रस्त झालेले भारतीय सामाजीक संरचनेतील अति–उपेक्षीत समुह बनले आहेत.

**गुन्हेगारी जमाती कायदा (१८७१)** : व्यापाराचे खाजगीकरण, वनसंपत्तीवरील नियंत्रण, नव–वसाहतवादातील कायदेशीर व दंडात्मक संस्थाना नागरी मान्यता देण्यासाठी आणि भारताला युरोप प्रमाणे आधुनिक सभ्य राज्य म्हणून परिवर्तीत करण्याच्या मानसिकतेने ब्रिटीश राज्यकर्त्यांनी निर्दोष–निष्पाप भटक्या समुदायाला वंशपरंपरागत गुन्हेगार म्हणून १८७१ च्या गुन्हेगारी जमाती कायदा अंतर्गत घोषीत करण्याचा ऐतिहासीक सामाजिक गुन्हा केला.

या कायद्याचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, वंशपरंपरागत जन्माजात गुन्हेगार ही जी संकल्पना निर्माण करण्यात आली त्यास कोणताही 'जैव शास्त्रीय' आधार नव्हता. परंतु अशा प्रकारे या समुदायाला कलंकीत केला गेल्याचा नकारात्मक प्रभाव हा त्यांच्या मानवी हक्कांच्या व विकासाच्या शाश्वत प्रक्रीयेवर झालेला दिसुन येतो. ज्यामध्ये प्रामुख्याने: सामाजिक न्याय, उपजिवीकेची सुरक्षा, नैसर्गिक आधिवास, सांस्कृतिक सार्वभौमत्व आणि सर्वात निर्णायक, लोकशाही नागरीकत्वावर झालेला दिसुन येतो.

**शासतंत्रीय मनोवृत्ती व अवकाशाचे राजकारण** : स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जन्मावर आधारीत विषमतेच्या तत्वावर आधारलेली ही वसाहतीक शासकीय प्रथा, स्वतंत्र भारतीय समाजाच्या निर्मितीत पायाभूत मानले गेलेल्या सामाजिक समतेच्या तत्वाविरूध्द आहे, हे लक्षात आल्यामुळे ३१ ऑगस्ट १९५२ रोजी तो रद्द करण्यात आला. म्हणून या जमातीना 'डिनोटीफाइड' म्हणजेच विमुक्त जाती–जमाती या संज्ञेने ओळखण्यात येते. परंतु स्वातंत्र्य उत्तर कालखंडामध्ये लगेचच 'ह्याबिच्युअल ऑफेंडर ॲक्ट' (१९५८) हा नवीन शोषणाचा कायदा करून राजकारणाचे एक नवीन व्याकरण प्रस्थापीत व्यवस्थेने केलेले दिसुन येते. भारतातील या अती–वंचीत समुदायांचा इतिहास अभ्यासतांना असे स्पष्ट होते की, 'शासतंत्रीय मनोवृत्ती' आणि 'अवकाशाचे राजकारण' या दोन मुलभूत कारणांमुळे भटक्या व विमुक्त जमाती या विकास प्रक्रीयेतील सर्वाधिक शोषीत समुह ठरत आहेत. खेदजनकबाब म्हणजे वसाहतकालीन मानसिकता स्वातंत्र्य उत्तर कालखंडातही व्युव्हरचनात्मकपणे हस्तांतरीत होत आहे. या मनोवृत्तीमुळे लाखो निष्पाप भटक्या–विमुक्त समुदायांच्या आयुष्यातील 'केंद्र' बदलले, 'परिघ' सुध्दा पुसून गेले, या समुदायांच्या परिवर्तनाचा 'व्यास' ही खुंटीत झाला, इतकेच नव्हे तर, स्वतंत्र भारतातील अन्य भारतीय नागरीकांप्रमाणे विस्तारणारे विकासाचे, मानवी हक्कांचे व नैसर्गिक सन्मानाचे 'क्षितीज' ही कोमेजून जात आहे.

प्रस्तुत पार्श्वभुमीवर या लेखामध्ये पुढील दोन मुलभूत संशोधन प्रश्न उपस्थीत होतात. १) भटके व विमुक्त जमाती या लोकशाहीचे घटनादत्त नागरीक असुन सुध्दा त्यांना त्यांचे समान अवकाश प्राप्त करून दिले गेले नाही का? आणि २) हे समुदाय विकासाच्या अवकाशाचे व शासतंत्रीय मनोवृत्तीचे बळी ठरत आहेत का? सदर प्रश्नांची उकल करण्यासाठी, या समुदायांसोबत झालेल्या राजकारणाचे स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्यउत्तर या दोन्ही कालखंडाचे स्वतंत्रपणे विश्लेषण, मीशेल फुको (१९९१) आणि लिजफर्ट (१९७५) यांनी मांडलेल्या 'अवकाशाचे राजकारण' आणि 'शासतंत्रीय मनोवृत्ती' या दोन समाजशास्त्रीय सैध्दांतीक परिप्रेक्षातुन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखामध्ये केला गेला आहे.

२) **पध्दतीशास्त्रीय परिप्रेक्ष** :– समाजशास्त्रीय संशोधन परंपरेमध्ये भटक्या व विमुक्त जमातींसारख्या अति–उपेक्षीत व दुर्भाग्यपूर्ण समुदायांच्या अध्ययनासाठी काही विशिष्ट मान्यताप्राप्त गुणात्मक संशोधन पध्दती अस्तीत्वात आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी बोद्र्यु (१९९१); फुको (१९९१) व हेबरमास (१९९०) यांच्या पध्दतीशास्त्रीय परंपरेतील टिकात्मक संलाप विश्लेषण या पध्दतीचा अवलंब केला आहे. या पध्दतीचा मुख्य उद्देश हा सामाजिक तथ्यांचे ऐतिहासीक–समकालीन परिप्रेक्षातुन केलेली मांडणी पुन:मांडणी; तार्कीक परिवर्तन; अंत:विरोध, राजकारण व सत्ता संचिततेचे टिकात्मक परिक्षण करणे हा असतो. प्रस्तुत संशोधन पध्दतीसाठी आवश्यक असणारी प्राथमिक–दुय्यम तथ्ये प्रामुख्याने समुदाय केंद्रीत आत्मचरीत्र अनुभवात्मक ग्रंथ, समाजशास्त्रीय अभ्यास व निवडक असंरचित प्रतिनीधीक मुलाखती इत्यादी द्वारे संकलीत करण्यात आले आहे.

३) **सैध्दांतीक परिप्रेक्ष** : मिशेल फुको (१९९१) यांनी परिचलीत केलेली 'शासतंत्रीय मनोवृत्ती' ही प्रामुख्याने दोन परस्परपूरक शासन संस्थेच्या मनोवैचारीक कृती–वैशिष्ट्यांचे संयुक्तीक दृष्टीकोण सुचित करते. इंग्रजीमध्ये यास 'गव्हर्नमेंट्यालीटी' असे संबोधले जाते. यापैकी 'शासतंत्रीय' याचा अर्थ शासनकर्त्यांची राज्य करण्याची कला व कुटनितीक तंत्रे असा होतो. तर, 'मनोवृत्ती' ही प्रामुख्याने शासन व्यवस्थेच्या जडणघडणीतील दमनात्मक तंत्रांच्या उपयोजनाच्या मानसीकतेशी निगडीत आहे. 'शासतंत्रीय मनोवृत्ती' ही प्रामुख्याने राज्य व्यवस्थेच्या शासन निर्धारीत संचलनासाठी विशिष्ट समुदाय – संस्था व गटांना त्यांचे आचरण, वर्तनाचे मानदंड, संस्कृती व नियंत्रीत विकासात्मक बदलांसाठी व्युव्हरचनात्मक पध्दतीने राजनीतीक–तंत्रे, आचारसंहीता, संस्थात्मक धोरणात्मक बळांचा अवलंब करून त्यांना नियंत्रीत करणे व तसेच प्रस्तुत युक्तींना तर्कसंगत ठरविण्याच्या मानसिक प्रवृत्तीशी निगडीत आहे. उदा.

भटक्या जमातींना नियत्रींत करण्यासाठी 'गुन्हेगारी जमाती कायदा' ही ब्रिटीश शासन कर्त्यांची शासतंत्रीय मनोवृत्ती दर्शविते. त्याच प्रमाणे लिजफर्ट (१९७५) यांची 'अवकाशाचे राजकारण' ही संकल्पना विकास व पुर्न–उत्थानाच्या प्रक्रीयेत पुर्व आवश्यक असणाऱ्या नैसर्गीक घटनात्मक अवकाशापासून काही लक्षीत गट समुहांना उपेक्षीत, अलीप्त ठेवण्यासाठी अवलंबीलेल्या तडजोडीच्या राजकारणाशी सहसंबंधीत आहे.

**४) शासतंत्रीय मनोवृत्ती व अवकाशाचे राजकारण : टिकात्मक विश्लेषण :–** लेखाच्या या पहिल्या भागामध्ये भटक्या व विमुक्त जमातीच्या कल्याणासाठी स्वातंत्र पुर्व व उत्तर कालखंडातील शासकीय योजनांचा ऐतिहासीक कालक्रम अभ्यासुन त्याचे टिकात्मक विश्लेषण करण्याचा प्रयत्न समाविष्ट आहे. तर दुसऱ्या व तिसऱ्या भागामध्ये यापुर्वी उपस्थीत केलेल्या दोन मुलभूत संशोधन प्रश्नांवर आधारीत युक्तीवादांच्या मुख्य कार्यकारण संबंधाचा शोध सविस्तरपणे मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**४.१) कल्याणकारी योजनांचे राजकारण ::** १८७१ च्या गुन्हेगारी जमाती कायद्याच्या अस्तीत्वापर्यंत प्रस्तुत जमातींच्या कल्याणासाठी कोणतेही शासकीय योजना अस्तीत्वात नव्हत्या. त्यानंतर मात्र, कल्याणकारी उपक्रमांकरीता शासनकर्त्यांमध्ये एकमत झाले. तथापि, अभ्यासकांच्या (गीलबर्ट,२०१४; ब्राऊन,२०१३) व प्रत्यक्ष संवादकांच्या मुलाखतीद्वारे असे स्पष्ट होते की, या जमातींच्या कल्याणासाठी ज्या योजना, धोरणे राबविण्यात आले त्यामागे शासनकर्त्यांची दुरगामी रणनीतीक शासक मनोवृत्ती अस्तीत्वात होती. स्वातंत्र्यपुर्व काळापासून आजपर्यंत सुमारे १८ प्रमुख व साधारणत: ३६ लघु प्रकारच्या कमिशन, कमिटी आणि बोर्ड स्थापन केल्या गेल्या (पहा सारणी क्र.१). साल्वेशन आर्मीच्या पुनर्वसन कार्यासह १८९७ मधील सुधारणात्मक सेटलमेंट्सच्या स्थापनेसारखे काही प्रयत्न केले गेले. तथापि, शासनकर्त्यांचा यामागील हेतु हा या जमातींमध्ये नियंत्रणात्मक सुधारणा घडवून आणुन वसाहतीक अभिजनवादी दमानात्मक सभ्यता रूजविणे हा होता (फिशर २००५). अशा निराशाजनक परिस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा पहिल्या भारतीय समाज सुधारकांपैकी एक होते की ज्यांनी या गटांच्या कायदेशीर समायोजनासाठी मनापासून लढा दिला. यामध्ये प्रामुख्याने शिक्षणाचा हक्क ; मतदानाचा हक्क ; गतिशिलतेचा हक्क ; आणि अत्यंत महत्वाचे म्हणजे डिप्रेस्ड क्लासेस च्या सुचीमध्ये स्वतंत्रपणे समाविष्ट करण्याचा हक्क इत्यादीचा समावेश होतो. (पहा सारणी क्र.१). स्वातंत्र पुर्व काळ हा भटक्या व गुन्हेगारी जमातींच्या कल्याणकारी उपक्रमांचा पाया मानला होता. तथापि, नंतरच्या काळात या योजनाचे कुटीलफसवे स्वरूप स्पष्ट झाले. विरोधाभास म्हणजे स्वातंत्र्य उत्तर कालखंडामध्येही या समुदायासाठी स्थापन केलेल्या समित्या व योजनांसाठी स्वातंत्र्यपुर्व काळातील शासतंत्रीय दमनात्मक मनोवृत्ती ही मार्गदर्शक म्हणून मुळ धरून राहीली.

**सारणी क्र. १: भटक्या विमुक्त जमातींच्या कल्याणासाठी स्थापीत केलेल्या कमिशन व समित्यांचे कालक्रम (१९१८ ते २०१५).**

| अ. क्र. | समिती व कमिशनचे मुख्य आशय | वर्ष |
|---|---|---|
| १ | डॉ.आंबेडकर यांनी ब्रिटीश शासनाने नेमलेल्या पुढील प्रमुख समिती व कमिशन समोर या जमातीच्या न्याय हक्कासाठी कायदेशीर युक्तीवाद केले. १) साऊथनबोरो कमिशन (१९१८–१९) २) मुड्डीमन कमिशन (१९२४) ३) सायमन कमिशन (१९२८) ४) हार्टोग कमिशन (१९२८) ५) गुन्हेगारी जमाती व आदिवासींच्या न्यायीक तक्रारीची चौकशी समिती (१९२९) ६) श्री.स्टुअर्ट यांची गुन्हेगारी जमाती तक्रार निवारण समिती (१९२९) ७) लोथीयन समिती (१९३२) | १९१८–१९<br>१९२४,<br>१९२८<br>१९२८<br>१९२९<br>१९२९<br>१९३२ |
| २ | सर अलेक्झांडर कार्डयु यांच्या नेतृत्तवात गठीत, 'भारतीय जेल सुधार समिती' यांनी गुन्हेगारी जमातींना परंपरागत गुन्हेगार या श्रेणीमध्ये वर्गीकृत करता येणार नाही असे मत नोंदविले. | १९१९<br>१९२० |
| ३ | सन १९३७ मध्ये मुंबई सरकारने श्री.के.एम.मुंन्शी यांच्या अध्यक्षतेखाली गुन्हेगारी जमाती कायदा चौकशी समिती नेमली. | १९३७ |
| ४ | सन १९४७ साली 'गुन्हेगारी जमाती चौकशी समिती' नेमली. या समितीने, सवयीप्रदान गुन्हेगार आणि जागरूकता अधिनियम या तरतुदी सह तोडगा सुचविला. | १९४७ |
| ५ | श्री.अय्यंगार समिती (गुन्हेगारी कायदा चौकशी समिती) १९४९ –५० | १९४९–५० |
| ६ | डॉ.अंब्रोळीकर समिती–माजी गुन्हेगार जमाती पुनर्वसनाचा अहवाल समिती | १९५०–५१ |
| ७ | श्री.काकासाहेब कालेकर यांच्या अध्यक्षतेखालील प्रथम मागासवर्गीय आयोग | १९५३ |
| ८ | महाराष्ट्र शासनाने नेमलेले थाडे आयोग | १९६० |
| ९ | महाराष्ट्र शासनाने नेमलेले बी.डी.देशमुख आयोग | १९६१ |
| १० | न्यायमुर्ती लोकूर समिती | १९६५ |
| ११ | मंडल आयोग, यांनी विमुक्त व भटके जमातींना भारतातील उपेक्षीत मागास प्रवर्ग म्हणुन संदर्भीत केले | १९८० |
| १२ | महाराष्ट्र शासनाने स्थापीत केलेली दादा इधाते समिती | १९९७ |
| १३ | न्यायमुर्ती वेंकटचलीया आयोग, यांनी आर्थीक व शैक्षणिक विकास, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, सामाजिक मुक्ती व विमुक्त जमातींचे पुर्ण पुनर्वसन याची शिफारस केली. | २००२ |
| १४ | तांत्रीक सल्लागार गटाची शिफारस २००६ टेक्नीकल एडव्हाईजरी ग्रुप | २००६ |
| १५ | संयुक्त राष्ट्रसंघ समिती, यांनी भटक्या–विमुक्त जमातींच्या संदर्भातील भेदभाव दूर करण्यासाठी विशेष अहवाल दिला | २००७ |
| १६ | भारत सरकारने नेमलेले रेणके कमिशन | २००८ |
| १७ | नॅशनल ॲडव्हायझरी कॉन्सिलने, विमुक्त, भटके व अर्धभटके जमातींसाठी विशेष कार्य गट स्थापन केला. | २०११ |
| १८ | भारत सरकारने गठीत केलेले इधाते आयोग. | २०१५ |

**स्त्रोत :** लेखकाद्वारे विभीन्न स्त्रोतांद्वारे केलेल्या संकलनावर आधारीत

उपरोक्त सारणीवरून असे स्पष्ट होते की, स्वातंत्र्यपुर्व उत्तर कालखंडातील शासनकर्त्यांनी या जमातींच्या कल्याणासाठी अनेक धोरणात्मक समिती व आयोग नेमले होते व आहेत. तथापि, काही प्रमुख अभ्यास (पहा: दांडेकर २००९; राधाकृष्णन २००९; देवी व इतर, २००६) व या समुदायातील काही निवडक प्रातिनिधीक साहित्याद्वारे (भोसले, २००९; गायकवाड, १९९८; राठोड,२००३; माने, १९८०) या कल्याणकारी उपक्रमांच्या प्रत्यक्ष दृष्य परिणामांसदर्भात अत्यंत उदासीन निष्कर्ष नोंदविलेले आढळतात. यांच्या मते, भारतभरातील या जमातींची सर्वकश स्थिती सुधारण्यापेक्षा अबाधीत अंधकाराकडे जात असून मानवी विकासाची स्थिती उत्तरोउत्तर ढासळत आहे. या जमातींच्या कल्याणकारी योजना व आयोगाच्या (कयोआ) परिणामकारीकतेचे टिकात्मक विश्लेषन करण्यासाठी त्यांची स्थापना सामाजिक आर्थिक व राजकीय पाश्र्वभुमी अभ्यासकता असे स्पष्ट होते की, सदर सर्व (कयोआ) हे प्रामुख्याने तीन महत्वपुर्ण रचनात्मक कालखंडामध्ये स्थापीत व कार्यान्वीत केले असल्याने, त्यातील शासनतंत्रीय मनोवृत्ती व अवकाशाचे राजकरण इ.चे आयाम ही भिन्न–भिन्न आहेत. १) वसाहतवादी कालखंड २) वसाहत उत्तर व उदारीकरण पुर्व कालखंड ३) उदारीकरण प्रारंभ व संयुक्त शासनकर्त्यांचा कालखंड.

**१) वसाहतवादी कालखंड::** या कालखंडामध्ये वसाहतवादी शासन मनोवृत्तीचा या जमातींच्या कल्याणकारी धोरणांकडे

पाहण्याचा दृष्टीकोण हा प्रामुख्याने वसाहतवादी पुर्वग्रह दुषीत, नियंत्रीत विकासात्मक पध्दती व तंत्रावर होता. ज्यामध्ये प्रामुख्याने या जमातींना नियंत्रीत करण्यासाठी जाचक कायदे करणे, त्यांच्या सांस्कृतिक मानदंडाचे स्वरूप कृत्रीमपणे बदलणे व सुधारणे हा होता. ब्रिटीशांनी नेमलेले अनेक अधिकारी व समित्यांचे अध्यक्ष हे वसाहतकालीन सांस्कृतीक दमनतंत्रामध्ये प्रशिक्षित असल्याने या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये व्युव्हरचनात्मक राजकारण प्रतीत होते.

**२) वसाहत उत्तर व उदारीकरण पुर्व कालखंड**: स्वतंत्र भारताच्या उदयानंतरही वसाहतवादी अवकाशाच्या राजकारणाची मिश्र संस्कृती हस्तांतरीत झालेली दिसून येते. केवळ प्रतीनिधीक संस्था व्यक्ती बदलले संवेदना तीच राहीली. तथापी, समीती व आयोगाच्या सुचनावंर आधारीत काही कल्याणकारी योजना लागु केले गेले; परंतु त्यांची परिणामकारकता गंभीर नव्हती या जमांती संदर्भातील वसाहतकालीन पुर्वग्रह अजुनही संस्थात्मक पातळीवर जिवंत होते. महत्वाचे म्हणजे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव होता.

**३) उदारीकरण प्रारंभ व संयुक्त शासन कर्त्यांचा कालखंड::** १९९१ नंतरच्या या कालखंडामध्ये उदारीकरणाच्या स्विकृतीमुळे कल्यानकारी राज्याच्या मृत्युची घोषणा झालेली होती. तसेच मिश्र विचारसरणीच्या राजकीय पक्षांच्या सरकारच्या प्रभावाखाली प्रतिनिधीक लोकशाही व्यवस्थेमध्ये अ–प्रभुत्वशाली, राजकीयपणे असंघटीत असलेल्या भटक्या–विमुक्त जमाती सोबत राजकारणाचे नवीन व्याकरण सुरू झालेले दिसून येते.

**५.२) वसाहतकालीन राजकारणाचे आयाम** : पद्धतीशास्त्रीय विश्लेषणासाठी लेखातील या विभागामध्ये वसाहतकाळातील शासनकर्त्यांची मनोवृत्ती व अवकाशाचे राजकारण भटक्या–विमुक्त जमाती संदर्भात कसे कार्यान्वीत केले गेले त्याचे स्वतंत्र व सविस्तरपणे विश्लेषण केले आहे. पुढील चार प्रमुख तथ्यांत्मक दृष्टीकोणांच्या आधारे ते स्पष्ट केले आहे.

**१) वसाहतवादी आधुनिकीकरणाचा दृष्टीकोण**: कल्याणकारी योजनांच्या सुरूवातीच्या कालखंडामध्ये फेडरीक बुथ टकर यांच्या नेतृत्वात १८८१ साली साल्वेशन आर्मीने गुन्हेगारी जमांतीसाठी सुधारात्मक वसाहतींची (सेटलमेंट) स्थापना करून सोशल इंजिनिअरींगची प्रथा सुरू केली. परंतु हे पुर्ण सत्य नव्हते. ते फक्त आंशीक सत्य होते. संशोधक (ब्राऊन २०१३ व गिल्बर्ट २००७) यांच्या मते वसाहतवादी शासनकर्त्यांचा कल्याणकारी धोरणांचा मुख्य उद्देश हा या जमातींना आधुनिक युरोपीय सभ्यतेप्रमाणे प्रमाणीत व नियत्रीत करण्याचा होता. यासाठी सेटलमेंट व गुन्हेगारी जमाती कायदा हेतुपूरस्पर लादण्यात आला.

**२) अनैतीक भांडवली श्रमाची निर्मिती** :वसाहतकारांच्या शासतंत्रीय मनोवृत्तीचे आणखी एक मुलभुत व दुरगामी दृष्टीकोण म्हणजे, प्रस्तुत सुधारणांच्या शासकीय योजनांद्वारे भटक्या जमातींना प्रथम गुन्हेगार, असभ्य अशी कृत्रीम सामाजिक वास्तवता निर्माण करून त्याद्वारे भांडवली बाजारपेठेसाठी नव निःशुल्क व सहजसमायोजीत होणाऱ्या कामगार वर्गाची निर्मिती करणे हा होता. विशेषतः भारतातील औद्योगीक क्रांतीनंतर खाजगी अभिजन भारतीय जमीनदारांनी नव्याने सुरू केलेल्या उद्योगांसाठी गुन्हेगारी जमातींचा वापर नव–कामगार म्हणुन करून गुलामगीरीचा आधुनिक आयाम सुरू करणे हे ब्रिटीशांच्या शासतंत्रीय मनोवृत्तीचे उदिष्ट होते. त्यासाठी भटक्या जमातींना सेटलमेंटमध्ये बंदिस्त करून नव भांडवलवादी कौशल्याचे प्रशिक्षण मोफत दिले जात होते. जे त्यांच्या पारंपारीक सांस्कृतीक उपजिविकेशी अत्यंत विपरीत होते. अशाप्रकारच्या अनैतीक भांडवली श्रमाच्या निर्मितीचा सामाजिक करार ब्रिटीश व भारतातील अभिजन भांडवलदारांमध्ये झालेला दिसून येतो (पहा: हिरीडा,२००७).

**३) लादलेली सांस्कृतिक वर्चस्वता** : ब्रिटीशांचे भटक्या जमाती संदर्भातील अवकाशाच्या राजकारणाची परिसीमा अत्यंत खोलवर रूजलेली होती. त्यामुळे भटक्या जमातींना भविष्य काळातही विकासाच्या अवकाशापासून वंचित ठेवण्यासाठी वंशपरंपरागत गुन्हेगार म्हणुन आपली दमनात्मक सांस्कृतीक वर्चस्वता लादलेली दिसून येते. ब्रिटीश शासन कर्त्यांना भारतीय समाजात काही नवीन सामाजिक व्यवस्था निर्माण करावयाचे होते. त्यामुळे कुटील पद्धतीने वंशपरंपरागत गुन्हेगार अशी नव–सामाजिक संवेदना निर्माण केली गेली. या प्रकारच्या सांस्कृतीक वर्चस्ववादी मानसिकतेचा मुख्य उद्देश हा अशा प्रकारचे नव सामाजिक मुल्ये समाजातील व राज्य व्यवस्थेतील पोलीस, कायदा व न्याय व्यवस्था या सारख्या संस्थामध्ये रितसर पसरविण्याच्या व लादण्याचा होता. अशा सांस्कृतीक वर्चस्वतेचे दाहक परिणाम आजही या जमाती भोगत आहेत.

**४) जैव राजकारण::** मिशेल फुको यांच्या 'शासतंत्रीय मनोवृत्ती' या संकल्पनेतील उप संकल्पना म्हणजे 'जैव राजकारण' (बायो पॉलीटिक्स) होय. जैव राजकारण म्हणजे एखाद्या समुह व गटाच्या सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक व भौगोलीक प्रक्रियेवर प्रभाव पाडणे व त्याचे शासतंत्रीय मनोवृत्ती द्वारे नियंत्रण करणे असा होतो. ब्रिटीश शासन कर्त्यांना भटक्या जमाती संदर्भात पुढील दोन प्रकारे जैव राजकारण केलेलं दिसुन येते. पहिले, भटक्या जमातींचे जैव सांस्कृतीक संदर्भ आदीम होते व स्थीर झालेल्या धर्मव्यवस्थामध्ये संबधीत जातीव्यवस्थेत नसतांनाही त्यांचे वर्गीकरण 'जाती' प्रदान व्यवस्थेमध्ये हेतुपूरस्पर केले गेले. ज्यामुळे जाती प्रदान पारंपारीक अनुवांशिक व्यवसायाचा सिध्दांत भटक्या जमातींनाही लागु केला गेला. जन्मजात वंशपरंपरागत गुन्हेगार असा कलंक वसाहतकरांच्या जैव राजकारणाचा मुख्य गाभा होता. ज्याचा गंभीर प्रभाव स्वातंत्र्य उत्तर कालखंडामध्येही कायमस्वरूपी टिकून आहे. त्याच प्रमाणे जैव–राजकारणाची व्याप्ती ही एखाद्या समुह गटाच्या जैव–क्षेत्राशी सुध्दा संबंधीत आहे. या अंतर्गत वसाहतकारांनी अनियंत्रीत अशा भटक्या जमातींचे नियंत्रण व नियमन करण्यासाठी 'सेटलमेंट' या तथाकथीत नियंत्रीत सुधारणा क्षेत्रांची निर्मीती केली. अशा प्रतीबंधीत क्षेत्रामध्ये भटक्या जमातींच्या संपुर्ण कुटूंबासमवेत बंदिस्त करण्यात आले होते. अभ्यासकांच्या मते (गिलबर्ट,२०१४; गुहा,२०१५) सुमारे ३० लाख निष्पाप भटक्या जमातीतील सदस्यांना अशा सेटलमेंट मध्ये अत्यंत अमानवी अवस्थांमध्ये बंदीस्त केले होते. कालांतराने या सेटलमेंट्स शोषण, छळ व मानवी हक्कांचे दमन करणारे भारतीय इतिहासातील नव–केंद्र बनले. अभ्यासकांच्या मते (सिंग, १९७२; राधाकृष्ण,२००१) अशा सेटलमेंट मधील कल्याणकारी धोरणांचा फारसा विधायक प्रभाव या जमातींच्या विकासामध्ये घडून आला नाही. उलट बाह्य समाजातील त्यांचे अंतर अधिकच वाढत गेले. विकासाच्या मुख्य प्रवाहापासून ते उत्तरोत्तर वंचित होत गेले.

**५.२) स्वातंत्र्योत्तर कालीन राजकारणाचे आयाम** : स्वतंत्र भारताच्या उदयाबरोबरच भारतातील अनेक उत्पीडीत समुहांच्या जिवनामध्ये विकास व परिवर्तनाचा प्रारंभ झाला. परंतु भटक्या व वंशपरंपरागत गुन्हेगार अशा कलंकीत सामाजिक प्रतीमेसोबत जगणाऱ्या समुदायांच्या जिवनामध्ये मात्र विकासाच्या किरणांची व्याप्ती व क्षमता पोहचण्यास खुजी ठरलेली दिसून येते. प्रस्तुत

दाहकतेचे विश्लेषण पुढील चार प्रमुख तथ्यात्मक दृष्टीकोणाच्या आधारे पुढील प्रमाणे मांडण्यात आले आहे.

१) **केंद्रीकृत कल्याणकारी कृती** : स्वतंत्र भारतातील शासनकर्त्यांनी भटक्या व गुन्हेगारी जमातींच्या कल्याणासाठी केंद्रीकृत कल्याणकारी कृती कार्यक्रमाचे धोरण आखले. काही प्रमुख आयोग व समिती नेमण्यात आल्या. त्यांनी सुचविलेल्या काही योजनांचे स्वरूप व उद्देश अशत: योग्य होते. परंतु; त्यांची अंमलबजावणी मात्र पश्चिमात्य विशेषत: वसाहतवादी योजनांच्या भ्रमीत मानसिकतेवर आधारीत होती. भारतासारख्या बहुसांस्कृतीक क्लिष्ठ समाजामध्ये कल्याणकारी योजनांचे केंद्रीकृत परिचलनाचे परिणाम फसव्यास्वरूपाचे होते. ज्यामुळे भटक्या गुन्हेगारी जमाती ठरविल्या गेलेल्या, सामाजिक व शासकिय दृष्ट्या संवेदनशील व राजकीय दृष्ट्या गैर लागू समुदाय हा उपेक्षीत राहीलेला दिसून येतो. तथ्यावरून असे स्पष्ट होते की, कल्याणकारी योजनांच्या केंद्रीयकृत अंमलबजावणी मागील ज्ञान मीमांसाशास्त्र व पध्दतीशास्त्रच मुलत: भटक्या जमातींच्या जैव–सामाजिक व सांस्कृतीक वैशिष्ट्यांना न जुळणारे होते. आजही, स्वतंत्र भारतातील या समुदायांच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचे वसाहतीकरणच झालेले दिसून येते. याउलट, गरज आहे ती कल्याणकारी योजनांच्या भारतीयकरणांची आजही भटक्या विमुक्त जमाती अशा शासतंत्रीय मनोवृत्तीचे बळी ठरत असून, अभ्यासकांच्या मते (कन्नाविरन,२०१८; कोरा,२०१९) त्यांच्या सामाजिक सुरक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या विविध शासकिय दाखल्यांपासुन उदा. आधार कार्ड, जातीचा दाखला, रेशन कार्ड इत्यांदीपासुन ते वंचित आहेत. अतिमत: असे निर्देशीत होते की, या समुदायांच्या विकासाच्या अवकाशाच्या राजकारणाचे प्रारंभच मुलत: केंद्रीयकृत कल्याणकारी कृती धोरणांद्वारे स्वातंत्र्योउत्तर कालखंडामध्ये झालेले दिसून येते.

२) **वसाहतवादी मानसिकतेचा वारसा:**: प्रस्तुत दृष्टीकोण हा मीशेल फुको यांच्या 'शासतंत्रीय मनोवृत्तीचे' अत्यंत संयुक्तीक नमुना आहे. ज्या आधारे स्वातंत्र्योत्तर शासनकर्त्यांनी अत्यंत व्युव्हरचनात्मक पद्धतीने स्वयंपरिभाषीत अश्या भटक्या गुन्हेगारी जमातींचे कायदेशिर दृष्ट्या व्यवस्थापन करण्यासाठी नव शासनतंत्राचा अवलंब करून प्रथम गुन्हेगारी कायदा रद्द केला व त्यास पर्याय म्हणुन 'ह्याबिच्युअल ऑफेंडर अॅक्ट' अस्तित्वात आणला. या द्वारे दोन प्रमुख शासनतंत्रीय मनोवृत्तीचे दर्शन होते. पहिले, गुन्हेगारी जमाती कायदा संपुष्टात आणला तथापी या संदर्भात दुरगामी पर्यायी यंत्रणाचा अभाव राहीला. विशेषत: शाश्वत शिक्षण व उदरनिर्वाहाच्या साधनांचे पर्याप्त कालबध्द धोरण व नियोजन न करता केवळ 'विमुक्त' म्हणुन घोषीत करणे हे अवकाशाच्या विकासाच्या राजकारणाचे उत्तम उदाहरण ठरले. दुसरे, सद्य स्थितीत जगातील भारत हा एकमेव असा देश राहीला आहे की ज्या ठिकाणी अशा प्रकारचा अमानवी वसाहतकालीन कायदा अस्तित्वात आहे. यापुर्वीच संयुक्त राष्ट्रसंघाच्या २००७ साली नेमलेल्या समितीने व राष्ट्रीय मानव हक्क आयोगाचे हा कायदा तात्काळ रद्द करावा असे सुचविले आहे. असे असतांनाही भटक्या विमुक्त जमातींसारख्या सर्वहारा समुदायांच्या मुलभुत घटनात्मक हक्काचे उल्लंघन होत आहे. यातुन शासन व राज्यकर्त्यांची कृत्रीम व वसाहतकालीन मानसिकतेचा वारसा स्पष्ट होतो.

३) **राजकीय उदासिनता** : प्रस्तुत विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, आधुनिक भारताच्या प्रांरभी काळापासूनच या जमाती दुर्लक्षीत राहील्या आहेत. विशेषत: घटनात्मक अनुसूची मध्ये ही सुरूवातीपासून या जमाती वंचित राहील्या यांसंदर्भातील महत्वाच्या कारणांपैकी एक म्हणजे या जमातीबद्दलची राजकीय उदासीनता होय. अशा मुलभुत हक्कांच्या अवकाशाच्या राजकारणामुळे या जमातींना भारतीय समाजाच्या परिघावरच स्थानबध्दीत राहावे लागले.

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे असेही स्पष्ट होते की, स्वातंत्र्य उत्तर कालखंडातील भारतीय राज्य व शासन संस्था भटक्या जमातींचे भारतीय समाजाच्या जडणघडणीतील व लोकशाही प्रक्रीयेतील त्यांचे सर्वकश योगदान व इतिहास जाणुन घेण्यात अपयशी ठरलेली दिसतात. या पार्श्वभुमिवर भविष्यकालीन दृष्टीकोणातुन पुढील दोन निष्कर्ष स्पष्ट होतात. पहिले, उत्तरोत्तर या जमाती शासन व राज्य संस्था पासून अधिकाधीक अलिप्त होत जाऊन त्याचा विद्रोह तिव्र होईल. दुसरे, पर्यायाने या जमातींबद्दल असलेली राजकीय–शासकिय उदासीनतेची प्रक्रीया प्रतिनिधीक लोकशाहीच्या आदर्श प्रारूपांसाठी सर्वांत मोठी हानी मानली जाईल.

४) **प्राधांन्याचे व तुष्टीकरणाचे राजकारण** :सामाजिक शास्त्रज्ञ पॅथी (१९८४) यांच्या मते जगातील लोकशाही प्रदान देशापैकी भारत हा असा वैशिष्ट्यपुर्ण देश आहे की, ज्या ठिकाणी राज्य–शासन संस्थाद्वारे काही विशिष्ट परिभाषीत गट–समुहांना प्राधांन्याश्रय देण्याचा वारसा रूढ झालेला आहे. लोकशाही राजकारणाचा प्रवास हा प्रामुख्याने निवडणुकीय लाभांशीत गट–समुहांवर अवलंबुन असतो. त्यामुळे लोकशाही सत्ता–प्रणालीमध्ये राजकीय लाभांश (पॉलीटीकल डिव्हीडन्ट) असलेल्या सजातीय सामाजिक गट–समुहांना विशेष प्राधान्य दिल्याने राजकीय लाभांश नसलेले, असंघटीत, अ–प्रभुत्वशाली, व्होटबॅक श्रेणीत नसलेल्या भटक्या–विमुक्त जमाती या तुष्टीकरण व ध्रुविकरणाच्या राजकारणाचे प्राथमिक ग्राहक ठरतात. भारतासारख्या प्रतिनिधीक लोकशाही प्रक्रियेमधील राज्य–शासन संस्था व निवडणुकीय राजकारणाचे सहसंबंध चिंतनीय आहेत. ज्यामुळे, भटक्या–विमुक्तांसारख्या सामाजिक व राजकीय भांडवलापासुन वंचीत असलेल्या समुहांमध्ये विकासाची दिर्घ पोकळी निर्माण होत आहे. अवकाशाच्या या राजकारणामुळे ते आपल्या घटनात्मक हक्कांसाठी कित्येक वर्षापासुन झगडत आहेत. यामध्ये प्रामुख्याने १) घटनात्मक अनुसूचीमध्ये स्वतंत्र स्थान प्राप्त होणे. २) विशेष–स्वांतत्र आर्थिक तरतुद ३) अॅट्रासिटी कायद्याचे संरक्षण ४) वनहक्क कायद्याचे संरक्षण इत्यादींचा समावेश होतो. भारतीय लोकशाहीच्या समतोल, सम–न्यायीक व शाश्वत विकासासाठी भारतीय समाजातील विकास प्रक्रीयेच्या परिघावर असलेल्या भटक्या विमुक्त जमातींचे संमिलीकरण होणे महत्वाचे ठरते.

६) **निष्कर्ष::**– प्रस्तुत संशोधनातील तथ्यात्मक विश्लेषणातुन या दाव्यांना पुष्टीप्राप्त होते की, भटक्या–विमुक्त जमाती या शासतंत्रीय मनोवृत्ती व अवकाशाच्या राजकारणानी ग्रासलेले भारतीय समाजाच्या इतिहासातील अत्यंत दुर्भाग्यपुर्ण समुदाय ठरतात. विकासाच्या या राजकारणाचा प्रारंभ वसाहतकारांच्या प्रभावाखाली सुरू झाला असुन उपरोधिकपणे हा वारसा स्वातंत्र्य उत्तर कालखंडामध्येही हस्तांतरीत झालेला आढळतो. अभ्यासकांच्या मते, या जमातींची उपजत सांस्कृतिक जीवन पध्दती; जात–जमात, वर्ग–वंश, धर्म या प्रतीकासंदर्भातील कृत्रीम सामाजिक ओळख, व विखुरलेल्या चळवळी–संघर्ष, स्व–समुदायातील प्रखर राष्ट्रीय राजकीय नेतृत्वाचा अभाव, राजकीय–प्रशासकीय व सामाजिक अभिजन वर्गासमवेत रणनितीक युती–समन्वय साधण्यात आलेले अपयश इत्यादी अंतर्गत घटक तितकेच समर्पक ठरतात.

परंतु, भविष्यकालीन दृष्टीकोणानुसार या जमातींना उपरोक्त अंतर्गत घटकांचे निराकरण करण्यासाठी व शासतंत्रीय मनोवृत्ती

आणि अवकाशाचे राजकारण थोपविण्यासाठी प्रभावी कालबद्ध योजनांचे कृती धोरण आखावे लागेल. तसेच, व्युव्हरचनात्मक प्रतिविरोधी तंत्रांचा वापर करून बाह्य समाजाचा व घटनात्मक संस्थांचा पाठींबा मिळविण्यासाठी विधायक वातावरण तयार करावे लागेल.

तथापि, विकास समाजशास्त्राच्या सिध्दांतानुसार या जमातींना लोकशाही प्रक्रियेद्वारे विकासांच्या अवकाशामध्ये घटनात्मक हक्क प्राप्त करून देणे हे प्रामुख्याने राज्य व शासन संस्था तसेच पर्यायाने व्यापक समाज व्यवस्थेचे नैसर्गीक उत्तरदायीत्व असुन, या संदर्भात या संस्थाद्वारे भविष्यकाळात कशा प्रकारे निकोप निर्णायक वातावरण प्राप्त करून दिले जाते यावर ते आधारित असेल.

अंतिमत: ज्यांचा लोकशाही संरचनांवर विश्वास आहे त्यांनी या जमातींच्या न्यायीक व शाश्वत विकासाच्या अवकाशातील त्यांच्या स्थान निश्चिती संदर्भात आशा बाळगली पाहिजे. या जमातींचे सांस्कृतिक वेगळेपण, उपेक्षीतता व संघर्ष इत्यादी वास्तविकत: त्यांची बलस्थाने असुन केवळ काही कमिशन किंवा सामित्यांच्या धोरणापुरतेच त्यांच्या विकासाचे अवकाश मर्यादीत नाहीत, या उलट लोकशाही संरचनामध्ये घटनात्मक हक्कांसाठी सहभागी होण्याची ही एक द्वंद्वात्मक चळवळ आहे.

*संदर्भ :–:*


1. *Althusser, L. (2006): "Ideology and ideological state apparatuses (notes towards an investigation)", The anthropology of the state: A reader, Vol 9, No, 1, pp 86-98.*
2. *Bhosale, D. (2009): Chouda Mahene Tera Devas (English translation: Fourteen Months and Thirteen Days...), Solapur: Parammitra Prakashan.*
3. *Bourdieu, P. (1991): Language and Symbolic Power. Cambridge, UK: Polity*
4. *Brown, M. (2013): "Colonial history and theories of the present: some reflections upon penal history and theory", Crime and Empire, 1840-1940, Barry Godfrey(ed), London: Rutledge.*
5. *Chatterjee, P. (2004): The politics of the governed: reflections on popular politics in most of the world, Columbia University Press.*
6. *Dandekar, A. (2009): "Disenfranchised by History: The Tribes and their narratives", Mukt-Saad, Vol 6, pp 1-7.*
7. *Devy, G. N., Heredia, R., Dandekar, A., Radhakrishnan, M., Pandey, A., Patel, K., & Aslam, M (2006): Waiting for Freedom. Report of the Technical Advisory Group on Denotified, Nomadic and Semi Nomadic Tribes. The TAG Report.*
8. *Devi, M. (2002): The Book of the Hunter, Kolkata: Seagull Books.*
9. *Fisher, H. (2005): "Britain's Other Civilizing Mission: class prejudice, European 'loaferism' and the workhouse-system in colonial system in India", Indian Economic and Social History Review, Vol, 42, No.3.*
10. *Foucault, M. (1991): The Foucault effect: Studies in governmentality, University of Chicago Press.*
11. *Gaikwad, L. (1998): Uchalya. (English translation: The Branded), Pune: Shri Vidya Prakashan.*
12. *Gilbert, J. (2007): "Nomadic territories: A human rights approach to nomadic peoples' land rights", Human Rights Law Review, Vol 7, No 4, pp 681-716.*
13. *Gilbert, J. (2014): Nomadic peoples and human rights. Routledge.*
14. *Guha, A. (2015, February): How the past meets the present or the transition of the Lodhas from 'Criminal Tribe' through 'Denotified' to 'Primitive Tribal Group'. Indian Anthropological Congress, Bhubaneswar.*
15. *Habermas, J. (1990): The Theory of Communicative Action. Vol. 1. Reason and the Rationalization of Society. London: Heinemann.*
16. *Heredia, R. (2007): "Denotified and Nomadic Groups: The Challenge of Free and Equal Citizenship", Pune University: Occasional paper Series.*
17. *Kapadia, K. M. (1952): "The criminal tribes of India." Sociological Bulletin 1.2 99-125.*
18. *Kannabiran, K., Mishra, S.K., Vinayan, S. and Jafar, K., (2018): Education and Its Discontents: Investigating Barriers to Schooling among De-notified and Nomadic Communities. Journal of Social Inclusion Studies, 4(1), pp.80-103.*
19. *Korra, V. (2019): Forgotten Communities of Telangana and Andhra Pradesh: A Story of De-notified Tribes. Springer Nature.*
20. *Lijphart, A. (1975): The politics of accommodation: Pluralism and democracy in the Netherlands, California: Univ of California Press.*
21. *Mane, L. (1980): Upara. (English translation: The Outsider), Mumbai: Granthali Publications.*
22. *Pathy, J. (1984): Tribal peasantry dynamics of development, Stosius Inc/Advent Books Division.*
23. *Rathod, M. (2003): Guhnegar jamati Kayda aani Parinam (English translation: Criminal Tribes Act and Impact) Aurangabad: Art Creation, Paithan Gate.*
24. *Radhakrishna, M. (2009): Invented Pasts and Fabricated Presents: Indian Nomadic and Denotified Communities, Kunda Datar Memorial lecture, Gokhale Institute of Politics and Economics, Pune, pp1-17.*
25. *Radhakrishna, M. (2001): Dishonoured by History:" Criminal Tribes" and British Colonial Policy. Orient Blackswan, 2001.*
26. *Singh, K. (1972): "Proceedings of a Seminar on Tribal Situation in India." Simla: Indian Institute of Advanced Study*

# दलित अभिजनासंबंधीचा अभ्यास : भारतीय समाजशास्त्राला समृद्ध करणारा प्रवाह

**प्रा. प्रियदर्शन भवरे**, समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना. priyadarshan1971@gmail.com Mob. 9405913297

दलित साहित्याने ज्याप्रकारे मराठी साहित्यामध्ये मौलिक भर टाकली त्याचप्रमाणे दलित अभ्यासाने सुद्धा समाजशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण भर टाकली आहे. दलित अभ्यासामुळे अँकॅडमिशियन, संशोधक विद्यार्थ्यांना, जिज्ञासूंना व समाजाचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तींना एक नवे दालन निर्माण झाले आहे. दलितांच्या वेदना, त्यांचे प्रश्न त्यांची सामाजिक स्थिती, दलितांच्या पुनर्प्रस्थापनेच्या सामाजिक चळवळी या व अशा प्रकारच्या विविध पैलूंच्या अनुषंगाने दलितांच्या एकूणच सामाजिक सांस्कृतिक अभ्यासाकडे समाजशास्त्राने आपले लक्ष वेधले आहे. प्रस्तुत शोध निबंधात दलित अभिजनासंबंधीच्या अभ्यासासंदर्भात जे काही प्रमुख अभ्यास झाले आहेत. त्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे. तसे पाहता दलितांच्या एकूणच सामाजिक स्थिती, दर्जा, सामाजिक परिवर्तन, सामाजिक गतिमत्व, अस्पृश्यता, जातीयता, शिक्षण, राजकारण, युवक, स्त्रीया याबरोबरच शासनाने हाती घेतलेल्या विविध कल्याणकारी योजनाचा दलितांच्या सामाजिक जीवनावर झालेला परिणाम आदी विषयानुषंगे बऱ्याच प्रमाणात संशोधन झाले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात दलित अभ्यासाच्या अनुषंगाने समाजशास्त्रामध्ये काही महत्वपूर्ण व उल्लेखनीय असे अभ्यास दलितांच्या सामाजिक आर्थिक स्थितीच्या संदर्भात झाले आहे त्याचा थोडक्यात परामर्श येथे घेण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वच अभ्यासाचा यात समावेश करता आला नाही मात्र ज्यांची नोंद घेण्यासारखी आहे अशा अभ्यासाचाच समावेश प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

दलित अभ्यासासंदर्भात आजपर्यंत विपुल असे संशोधन झाले आहे. भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासाचा प्रारंभच मुळी भारतीय समाजव्यवस्था, जातिव्यवस्था, बहुसांस्कृतिकता, भारतीय खेडे, धर्म व्यवस्था इत्यादी समाज निगडीत पैलूच्या आधारावर झाला आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील महत्वपूर्ण घटक म्हणून दलित आणि वर्णव्यवस्था या समाज घटकाचा उल्लेख होतो. प्रस्तुत शोधनिबंधाच्या काही मर्यादा आहेत. दलित अभ्यासाच्या संदर्भातील निष्कर्ष हे समाजव्यवस्थेवर भाष्य करण्यासाठी व आत्मपरीक्षण करण्यासाठी विचारप्रवृत्त करतात दलित अभ्यासामध्ये विविध पैलूंच्या अनुषंगाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झालेला आहे. आज मोठ्या प्रमाणात दलितांच्या सामाजिक जीवनाचे अप्रकाशित पैलू पुढे आणण्याचा प्रयत्न केला जातो आहे. विविध प्रकारच्या सामाजिक संस्था सुद्धा दलित अभ्यासासाठी पुढे येत आहे. समाजातील महत्त्वपूर्ण घटक असून दलितांचा विकासासाठी सर्वांग परिपूर्ण प्रयत्न होणे गरजेचे आहे. दलित समाज घटकाच्या विकासाशिवाय सबंध समाज हा पुढे जाऊ शकणार नाही. त्यासाठी दलितांच्या सामाजिक जीवनाच्या संदर्भात सखोल अशा पद्धतीचे संशोधन होणे ही काळाची गरज आहे. भारतातील अनुसूचित जातीच्या संदर्भात वर म्हटल्याप्रमाणे विपुल संशोधन झाले असून समाजशास्त्रज्ञ, इतिहासतज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञानी अनुसूचित जातीच्या व्यापक प्रश्नाच्या संदर्भात विविध दृष्टिकोनातून त्यांच्या पद्धतीशास्त्रानुसार अभ्यास केलेला आहे. दलित अभ्यासाने समाजशास्त्राचा अभ्यास समृद्ध केला आहे. दलित अभ्यासामध्ये हे संशोधन उल्लेखनीय अशा पद्धतीचे झालेले आहे आहे व ज्याची नोंद घेण्यासारखी आहे अशाच संशोधनाचा प्रस्तुत शोधनिबंधात समावेश केला आहे. दलित अभ्यास हा समाजशास्त्रज्ञांमध्ये बौद्धिक चर्चेचा आणि विचारमंथनाचा विषय झालेला आहे. या चर्चेचे साद पडसाद सामाजिक सांस्कृतिक जीवनावर पडलेले आहेत. दलित अभ्यासाने स्वत:चे विशेष स्थान समाजशास्त्रांमध्ये निर्माण केले आहे. सामाजिक सांस्कृतिक जीवनामध्ये दलित अभ्यासाने एक महत्त्वाचे योगदान दिलेले आहे.

**वाय.बी. अब्बासायलू** (१९७८) यांनी ''शेड्युल कास्ट एलिट: अ स्टडी ऑफ शेड्युल कास्ट एलिट इन आंध्र प्रदेश'' या अभ्यासात आंध्र प्रदेशातील अनुसूचित जातीतील अभिजनांची भूमिका आणि त्यांचे स्वरुप या संदर्भात अभ्यास केला हे अभिजन राजकीय प्रशासकीय, बुद्धिवादी क्षेत्रातील असून ज्यात विद्यापीठातील प्राध्यापक, डॉक्टर, वकील, इंजिनिअर, न्यायमूर्ती, रजिस्टार, आय.ए.एस. अधिकारी तसेच विधानसभा व विधानपरिषदेतील आमदार यांचा समावेश होता या अभ्यासात उत्तरदात्याच्या तीन पिढ्यचा अभ्यास केला असून शिक्षण, व्यवसाय, कौटूंबिक पार्श्वभूमी आर्थिक दर्जा या विषयीची चर्चा केली आहे यातील काही निरिक्षणे असे आहेत की, या दलित अभिजनाच्या मुलांच्या अपेक्षा वाढल्या आहेत हे अभिजन आपल्या समूहातील इतर अभिजनांशी सुसंवाद ठेवतात तसेच त्यांच्या समूहासोबतही वारंवार संपर्क ही ठेवतात. समूहात जाणीव जागृती निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या समाजाचे प्रश्न सोडविण्यात मदत करतात आणि शासनाचे लक्ष त्याकडे वेधण्यासाठीही प्रयत्न करतात असे असले तरी काही अभिजन हे त्यांच्या समाजापासून दूर राहण्यात आनंद मानतात. स्वसमूह आणि इतर समूहाना हा वर्ग कशा प्रकारे मदत करतो वा त्यांच्या विकासात कोणत्या प्रकारे योगदान देतो याची चर्चा प्रस्तुत संशोधनात केली आहे. अन्य समाज घटकातील अभिजन हे अनुसूचित जातीतील अभिजनांशी कशी वर्तणूक करतात? हे अभिजन त्यांच्या जाती संघटनेचे सदस्य आहेत काय? हे जाती संघटन समाजाप्रती उत्तरदायित्वाचे पालन करतो काय? हे असे जर ते करत नसतील तर त्यांच्या भूमिकेपासून त्यांना दूर करण्यासाठी कोणते अडथळे आहेत? याची सविस्तर चर्चा यामध्ये केली आहे. २३६ उत्तरदात्यापैकी ११५ (४८.७३ टक्के) उत्तरदात्यांनी असे मत नोंदविलेली की ते त्यांच्या समूहाच्या प्रगतीसाठी जागरुक असून जाती संघटनाच्या माध्यमातून ते त्यांच्या समजाच्या उन्नतीसाठी झटत आहेत तसेच बहुसंख्येने उत्तरदाते हे त्याच्या जाती संघटनेचे क्रियाशील सदस्यही आहेत पहिल्या प्रकरणात अनुसूचित जातीचे भारतीय समाजव्यवस्थेतील स्थान या विषयीची चर्चा आहे दुसऱ्या प्रकरणात सामाजिक,आर्थिक व लोकसंख्यात्मक पैलू या संदर्भात चर्चा केली असून यात आंध्रप्रदेशातील लोकसंख्येमध्ये अनुसूचित जातीचे स्थान, येथील अस्पृश्यतेची चळवळ आणि विविध सामाजिक संघटनेचे योगदान तसेच हैद्राबाद संस्थानातील अनुसूचित जातीच्या बाबत घटनात्मक सुधारणा याविषयी आहे तिसऱ्या प्रकरणात अभ्यास पद्धती, चौथ्या प्रकरणात उत्तरदात्याची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी आहे. पाचव्या प्रकरणात अनुसूचित जातीमध्ये अभिजन वर्ग तयार होण्यासाठी जबाबदार असलेले विविध घटक याची चर्चा केली असून सहाव्या प्रकरणात व्यावसायिक गतिमत्वासंदर्भातील चर्चा असून यामध्ये आजोबाचे शिक्षण आणि त्यांचा व्यवसाय, वडिलांचे शिक्षण आणि त्यांचा व्यवसाय, त्यांच्या मुलांच्या संदर्भातल्या अपेक्षाचा परामर्श घेतला आहे सातव्या प्रकरणात अनुसूचित जातीच्या अभिजनांच्या

आंतरपिढीमधील आणि पिढीअंतर्गत गतिशिलता याचे विश्लेषण आहे. हा अभ्यास असे स्पष्ट करतो की, या दलित अभिजनांनी विविध प्रकारे स्वसमूहाच्या लोकांना मदत केली ८० (३३.९ टक्के) उत्तरदात्यांनी असे नमुद केले की, नोकरी, जमीनजुमला, शिक्षण इतर सुविधाच्या लाभ मिळवून देण्याकरिता त्यांनी शासनाला विनंती केली २७ (११.४४टक्के) उत्तरदात्यानी या संदर्भात काहीही मते व्यक्त केले नाही. ५४(२२.८८ ) च्या मते त्यांनी राज्यघटनेत नमुद केल्याप्रमाणे विविध सोयी सवलती वा त्याचा लाभ घेण्यासंदर्भात समाजामध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला.८.०५ टक्के उत्तरदाते असे म्हणतात की,अनुसूचित जातीच्या लोकांसाठी ते मोफत वैद्यकिय व कायदेविषयक सल्ला आणि आर्थिक मदतीसाठी ते प्रयत्न करतात ६.७८ टक्के उत्तरदाते म्हणतात की, आम्ही आमच्या कार्यालयाशी संबधित कामाकरिता पुरेपुर मदत करतो. ५.५१ टक्के उत्तरदाते म्हणतात ते लोकांना शिक्षित करण्याबरोबरच शासकीय सेवेत प्रवेश करण्यासाठी मदत करतो व गरजापूर्तीसाठी आम्ही त्यांना संघटित करतो. ४.६६ टक्के उत्तरदाते स्पष्ट करतात की स्वसमूहाचे त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही मदत करतो. ३. ८१ टक्के उत्तरदाते असे स्पष्ट करतात की ते करतात २.९७ टक्के उत्तरदाते असे म्हणतात की, अनुसूचित जातीच्या लोकांनी स्वत: प्रगतीसाठी पुढे यायला पाहिजे व त्यांनी संघर्ष करायला हवा म्हणून ते त्यांना मदत करायला पुढे येत नाही.

**सतिश सबरवाल** यांनी (१९९०) ''मोबाइल मेन: लिमिट टू सोशल चेंज इन अर्बन पंजाब'' या अभ्यासात मोदेलपूर या शहरातील आदिधर्मीज, वाल्मिकी आणि रामगिरह या तीन अनुसूचित जातीचा तुलनात्मक अभ्यास केला नागरिकरण आणि औद्योगिकरणामुळे आलेल्या सामाजिक गतिशीलतेचे विश्लेषण यात करण्यात आले आहे अनुसूचित जातीतील अभिजन हे त्या समाजासाठीचे प्रगतीसाठी एक निर्देशक असून या दलित अभिजनाची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी काय आहे ? ते या स्थानापर्यंत कसे पोहोचले ? त्यांनी त्यांच्या समाजबांधवाच्या प्रगती आणि विकासासाठी काय प्रयत्न केलेत ? ते आणि इतर जातीमधले अभिजन यांच्यात काय फरक आहे? या संदर्भाने चर्चा केली आहे सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी, व्यावसायिक गतिमत्व, नोकर भरती प्रक्रिया, आंतरगटातील आंतरक्रिया व घटक, अनुसूचित जातीच्या प्रगतीसाठी या अभिजनांची भूमिका. या संदर्भातही काही मुलभूत प्रश्नांचा वेध यामध्ये घेतला गेला आहे.

**निर्मल मुखर्जी** (१९८१) यांच्या मते अभिजनांचा उदय हे आरक्षण धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर नोकरीमध्ये प्रवेश केल्यामुळे स्वत:च्या विकासाबरोबरच स्वसमूहाच्या उध्दारासाठी प्रयत्न करणे हे सुध्दा यामध्ये अपेक्षित आहे. **कुल्के** (१९७६) यांनी आपल्या ''द स्टेटस् ऑफ अनटचेबल्स'' मध्ये स्वातंत्र्योतर भारतामध्ये आणल्या गेलेल्या आरक्षण धोरणांचे जे कोणी लाभार्थी आहे त्यांचा अभ्यास केला आणि यामधून एकात्मपणा, तुटलेपणा आणि नकार अशा तीन पातळयावरती अभ्यास केला आहे. हा सगळा संदर्भ भारतीय हिंदू समाज हा दलितांना कसे सामावून घेतो, त्यांना कशा प्रकारे वागवितो वा त्यांना कसा नकार देतो याविषयी आहे. **आयझॅक** यांनी (१९६५) ''इंडियाज एक्स अनटचबेल'' या अभ्यासात अनुसुचीत जातीतील शिक्षित आणि सुस्थितीत असलेल्यांचा अभ्यास केला. नवी दिल्ली, मुंबई, बंगलोर आणि म्हैसूर या शहरातील हे उत्तरदाते होते त्यांच्या अनुभवावरुन असे निदर्शनास आले की, शहरी भागात सुध्दा त्यांना व त्याच्या समाजाला भेदभावाला सामोरे जावे लागत आहे. **परांजपे अे.सी.** यांनी (१९७०) ''कास्ट प्रीज्युडाइज ॲण्ड द इंडिव्हिडयूअल'' या अभ्यासात पुण्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या जाती अभिवृत्ती, स्वप्रतिमा आणि आंतरजातीय संबंध या अनुषंगाने अभ्यास केला. अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना भेदभावाचे प्रसंग आणि अस्पृस्यतेचे पालन त्यांना वैयक्तिक व सामाजिकरित्या अनुभवास आले. **मायकेल एस.एम.** (१९९९) यांनी संपादित केलेल्या ''दलित इन मॉडर्न इंडिया:व्हिजन ॲड व्हॅल्यू'' या ग्रंथात दलितांच्या एकूण जीवन पैलूवर विविध दृष्टिकोनातून प्रकाश टाकला आहे. संबंधित क्षेत्रातील तज्ञाच्या लेखाचे संकलन प्रस्तुत ग्रंथात केले आहे. यातील लेख दलितांच्या विविध प्रश्नाच्या संदर्भात असून हा ग्रंथ चार भागात विभागला गेला आहे. पहिला भाग ऐतिहासिक पैलूंशी निगडीत आहे तर दुसऱ्या भागात भारतीय संस्कृतीतील अस्पृश्यतेचा उगम व विकास या संदर्भात चर्चा केली आहे. भारतीय समाजाकडे बघण्याची दलितांची दृष्टी ही उच्च हिंदु समाजाच्या दृष्टिपेक्षा वेगळी आहे. दुसऱ्या भागात महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलितांच्या विकासामध्ये असलेले योगदान या संदर्भात आहे. ज्यांनी दलितांच्या सामाजिक चळवळीची मुहूर्तमेढ रोवली व जे भारतीय सामाजिक क्रांतीच्या चळवळीचे प्रेरणा स्त्रोत आहे तिसऱ्या भागात सैद्धांतिक दृष्टिकोन आणि कार्यकारी पैलू यावर भर दिला आहे. यातील सर्व लेख हे आपल्याला पारंपारिक भारतीय समाजाचा चिकित्सक पैलू उपलब्ध करुन देतात की जे भारतीय समाजाकडे प्रामुख्याने सांस्कृतिक परिप्रेक्षातून पाहतात. यासगळ्या चिकित्सेमध्ये लेखक आपल्याला अशा एका पद्धतीचा उहापोह करतो जो हिंदु आणि भारतीय समाजाचे एकूणच गुंतागुंतीचे स्वरुप पाहता त्यांच्या अभ्यासाच्या संदर्भात एक पद्धती आपल्याला उपलब्ध करुन देते. **पद्मिनी नारायणन** (१९८६) यांनी ''रिजर्वेशन इन पॉलिटिक्स ॲड शेड्यूल कास्ट एलिट'' या अभ्यासात असे म्हटले आहे की, सध्याची राजकीय आरक्षणाच्या व्यवस्थेमुळे अनुसूचित जाती मधील अभिजनाचाच मोठा फायदा झाला आहे सर्वसामान्य दलितांचा नाही पुढे त्या म्हणतात की, दलितांचे प्रश्न व त्याच्या हितासाठी कार्य केले पाहिजे, तसे ते करुही शकतात परंतु अलिकडच्या काळात त्यांच्याकडून अनुसूचित जाती, जमातीना फारसा लाभ मिळत नाही. परिणामी दलितामधून अभिजन वर्ग उदयास आला आहे आणि ही व्यवस्था सर्वसामान्य अनुसूचित जाती,जमातीना त्यांच्या विकासासाठी प्रगतीसाठी फारसी पुढे येत नाही. अनुसूचित जातीतील नेते जे आरक्षित मतदारसंघातून निवडून आले ते ज्या पक्षामार्फत निवडून गेले त्या पक्षाच्या ध्येय धोरणावर ते अवलंबून असतात हे प्रतिनिधी दलित समूहाच्या हित संबंधाकडे लक्ष देत नाही. त्यांच्या हिताची वा कल्याणाची काळजी घेत नाही ते त्यांच्या पक्षीय हित संबंध व विचारसरणीशी अधिक बांधिलकी मानतात आणि उच्चजातीच्या हितासाठी अधिक प्रयत्न करतात जरी ते अनु जाती वर्गाचे प्रतिनिधित्व करत असले तरी अनुसूचित जातीच्या हितसंबंधाच्या दृष्टिने ते अधिक व उत्तम प्रकारचे कार्य करु शकत असले तरी सध्याची व्यवस्था यांच्या बाजूने फारशी अनुकूल नाही असे ते नमूद करतात. अशाप्रकारे राजकीय आरक्षणाचे फायदे व तोटे यासंदर्भात विश्लेषण नारायणन यांनी केले आहे.

**बंडोपाध्याय** (१९९९) आपल्या लेखात म्हणतात की, स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजातील दलित हा नेहमीच अभिजन वर्गाच्या शोषणाला बळी पडला आहे. आपल्या देशातीच्या प्रशासकीय यंत्रणेमधील सामाजिक उत्तरदायित्वाच्या कमतरतेमुळे समाज विकासाच्या संदर्भात निराशेचे चित्र आहे. ही व्यवस्थाच अशा पद्धतीची तयार झाली आहे की ते बऱ्याचदा लोकांप्रती बेजबाबदारपणे वागतात असे असले तरी लेखकाला अपेक्षा आहे

की, नवी पंचायत राज्यव्यवस्था ही स्थानिक पातळीवरील प्रशासनातील कमतरता दूर करण्याचा प्रयत्न करेल निवडून आलेल्या लोक प्रतिनिधीनी यावर कटाक्षाने लक्ष ठेवण्याची गरज आहे. तसेच शासकीय लोकावर सुद्धा त्यांनी नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. अभिजनांची लोकशाही ही सातत्याने दलितांच्या लोकशाही विरोधात असते असेही ते प्रतिपादन करतात.

**सुरेशकुमार** (१९९७) ''इंडिया ॲट फिफटी:दलित सिच्यूएशन'' या लेखात म्हणतात की, वर्षानुर्षे दलितांचे नागरी आणि मानवी हक्क हिरावून घेतले जात असून त्यांच्यावरील अन्याय अत्याचारांच्या घटनात दिवसेदिवस वाढच होत आहे. सामान्य लोकसमूहापेक्षा ते साक्षरता आणि शिक्षणाच्या क्षेत्रातही फार मागे पडले आहेत. दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्याचे प्रमाण दलितांमध्ये अधिक असून राज्याच्या संरक्षित भेदभाव धोरणाचा फारसा लाभ त्यांना मिळत नाही. परिणाम उच्च शिक्षकाच्या क्षेत्रातही ते मागे पडले आहेत. राज्याच्या सरंक्षित भेदभाव धोरणाच्या ज्या काही मर्यादा वा कमतरता आहे याला बाजूला करुन ते वेगवेगळ्या क्षेत्रात स्वंतत्र अस्मिता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. लेखकांच्या मते, दलितांमधील जागरुकता आणि प्रश्नाला वाचा फोडण्याची ताकद वाढत असून त्यामूळे ते सर्व दलितांना संघटित करण्याचा प्रयत्न करतात वेगवेगळ्या आघाड्यावरही ते लढतात संघटित अस्मितेमुळे ते रचता सामूहिक कृतीद्वारे जाब विचारण्याचा प्रयत्न करत आहेत.

**सच्चिदानंद** यांनी (१९७७) मध्ये बिहार राज्यातील अनुसुचित जातीतील अभिजनांचा व्यापक स्तरावर अभ्यास केला. त्यांचा हा अभ्यास हरिजन एलिट म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांनी त्यांच्या अभ्यासात चमार, दुसाध, मुसाहर, धोबी आणि पासी या महत्वपूर्ण जातीचा अंतर्भाव केला. सहेतूक नमुना निवडीच्या आणि कोटा सॅपलिंगच्या आधारे त्यांनी या जातीतील निवडक २०० शिक्षित अभिजनांची अभ्यासासाठी निवड केली. ज्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील नोकर (११७) सामाजिक कार्यकर्ते (६३) आमदार (२०) याचा सामावेश होता. सविस्तर मुलाखती, व्यष्टी अध्ययन आणि निरिक्षणाच्या आधारे त्यांनी आपल्या संशोधनांचे निष्कर्ष मांडले हा अभ्यास दलिताच्या सामाजिक शैक्षणिक पातळीच्या संदर्भात दलित अभिजनांनी केलेल्या प्रयत्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतो या दलित अभिजनानी समाजातील जाती विषमतेच्या विरोधात चालविलेला लढा तसेच दलितांच्या मुला मुलीसाठी त्यांनी केलेली मदत यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच बरोबर जाती एकात्मतेच्या संदर्भातील दलितांची आकांक्षा वाढाविली तसेच त्यांच्यात राजकीय जाणीवा रुजविण्याचा पेरण्याचा प्रयत्न ही केला. आधूनिक संसाधनाच्या वापराबद्दल आणि पारंपरिक वर्तनबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केलेत एकूणच दलिताच्या सामाजिक,राजकीय पुनरुत्थानाच्या संदर्भातील जाणीवा व आकांक्षा वृद्धिंगत करण्याचा या अभिजनानी प्रयत्न केलेला दिसून येतो दलितांच्या सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भाने या दलित अभिजनाचे कार्य अतिशय व उल्लेखनिय महत्वपूर्ण आहे असे हा अभ्यास सांगतो. लोकप्रतिनिधी /सामाजिक कार्यकर्त्यांपेक्षा सरकारी नोकर हे तुलनेने कमी प्रमाणात क्रियाशील आहेत याकडेही हा अभ्यास लक्ष वेधतो त्याच बरोबर दलित अभिजन आणि त्यांच्या सामाजिक समायोजना च्या संदर्भात ही लक्ष वेधतो विशिष्ट सामाजिक ध्येय प्राप्तीसाठी सामाजिक संपर्काचे स्वरुप आधुनिक दर्जा प्राप्तीसाठीचा प्रयत्न (स्वत:साठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी) आणि उच्चजातीच्या लोकांसोबत कशा प्रकारे संवाद साधला याकडे लक्ष दिले आहे. वैयक्तिक आणि सामाजिक गतिशिलतेच्या दृष्टिने त्यांनी केलेले अथक प्रयत्न यावरही सच्चिदानंदानी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. जाती संघटनाच्या मदतीने आणि जातीच्या कर्मचारी संघटनाच्या त्यांच्या आकांक्षा आणि त्यांचे झालेले सांस्कृतिक त्याबरोबरच पाश्चात्य मूल्यांचा त्यांनी केलेला स्वीकार कार्य करतांना दलित अभिजनांना आलेले समाज अनुभव याकडे ही त्यांनी लक्ष वेधले आहे.यासंदर्भात ते म्हणतात की *"Large number of the educated Harijan Elite oth in towns and in the villages show little active concern with bettering the Lot as their less fortunate caste fellows. Alienated from their own fase.... their major preoccupation appears to be that of meeting the needs of their immediate family and kin. Some of the elite who hape risen high in the serial hierarchy have cut their ties with their bleak past. They are out of tune with the mass of the community and seek alignment with status and power groups in the wider society."* (*The Harijan Educated elite, ICSSR Research Abstract Quarterly and (2 and 3) Jan- April. pp. 154-166.*)

**सुनंदा पटवर्धन** (१९७३) यांनी ''चेंज अमॉग इंडियाज हरिजन महाराष्ट्रा: अ केस स्टडी'' या अभ्यासात पुण्यातील अनुसूचित जातीच्या संदर्भात सामाजिक गतिमत्वाबाबत विश्लेषण केले. त्यांनी ३६० कुटूंबाचा ज्यात महार, मांग, चांभार, ढोर होलार या जाती समूहाचा अभ्यास केला. वर्णनात्मक आणि सामाजिक सांस्कृतिक पातळीवर जे बदल झाले त्याचे विश्लेषण केले. भौतिक पातळी मध्ये आणि मूल्यव्यवस्थेत झालेल्या बदलाचाही आढावा त्यांनी घेतला गेल्याकाही काळात भारतीय सामाजिक व्यवस्थेतंर्गत मूल्ये कशी बदलत गेली या मूलभूत प्रश्नाचे उत्तरे शोधण्याचा प्रयत्न पटवर्धन यांनी प्रस्तुत अभ्यासात केला. भारतीय सामाजिक जीवनात झालेले बदल हे नव्या तंत्रज्ञानामुळे आणि नव्या संधी निर्माण झाल्यामुळे झालेले आहेत/अस्पृष्यातील उर्ध्वगामी गतिमत्वाचे विश्लेषणही केले आहे. व्यावसायिक शिक्षण, राजकीय सहभाग सांस्कृतिक आणि धर्मांतर जाती संबंध यातील बदलामुळे नियोजित विकास, सार्वजनिक सेवेतील पदाचे आरक्षण शैक्षणिक संस्था वाढता राजकीय सहभाग यामुळे सामाजिक गतिशिलतेची प्रक्रिया अधिक लवचिक झाली ती अनुसुचित जाती मध्ये वाढली पटवर्धन यांच्या मते भारतीय समाजात फार काळ बंदीस्त व्यवस्था (जाती व्यवस्था) टिकणार नाही समाज व्यवस्थेतील व्यापक बदलामुळे अनुसूचित जाती वर याचा मोठा परिणाम झाला आहे जातीची शुद्ध अशुद्ध ह्य कल्पना फार महत्वाचा राहणार नाहीत त्या बदलणार असे असेले तरी काही स्वरुपात त्या राहणार एकूणच त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या घटकाचे सहअस्तित्व आणि सातत्य याचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. संरचनात्मक स्थिरता आणि ताण, सहकार्य आणि संघर्ष यांच्यातील संबंधही दाखवून दिले आहे. अनुसूचित जातीतील सामाजिक गतिशिल तो आणि परिवर्तनावरील अत्यंत सखोल असा परिपूर्ण अभ्यास या संशोधनाद्वारे त्यांनी केला आहे.

**श्री. वसंत देशपांडे** (१९७८) यांनी ''टूवार्डस् सोशल इंटिग्रेशन: प्रॉब्लेम ऑफ ॲडजेस्टमेंट ऑफ शेड्युल कास्ट एलिट'' या अभ्यासात अनुसूचित जातीतील अभिजनांना सामाजिक भेदभाव आणि त्यांना बदलत्या सामाजिक पर्यावरणात कशा प्रकारे जुळवून घ्यावे लागते या अनुषंगाने अभ्यास केला २९ उत्तरदात्यांच्या या अभ्यासातून त्यांनी मुख्यत: त्यांच्या जीवनाची वाटचाल करतांना समाजातून जे विविध अनुभव वा प्रसंग आले याचा परामर्श घेतला. त्याच बरोबर विविध सामाजिक प्रश्नाबददलच्या दृष्टिकोनाचाही अभ्यास केला. उत्तरदात्याच्या मुलाखतीद्वारे त्यांना आपल्या जातीमुळे कसे अपमान सहन करावे लागले विद्यार्थी जीवनात मिळालेली वागणूक याचेही त्यांनी विश्लेषण केले. फक्त एकाच उत्तरदात्याने असे सांगितले की, जातीमुळे त्यांना कोणत्याही प्रकारच्या सामाजिक

भेदभावाचा प्रत्यक्ष प्रसंग वा अनुभव कधीही आला नाही. कारण त्यांची उत्तम सामाजिक पार्श्वभूमी ही त्याला जबाबदार आहे. ही उत्तरदाती व्यवसायाने वैद्यकिय क्षेत्रातली होती आणि तीने ब्राम्हणपुरुषाशी विवाह केला होता. सर्वसामान्यपणे जातीच्या आधारावरील भेदभाव हा ग्रामीण भागापेक्षा शहरी भागामध्ये फारसा दिसून येत नाही. तथापि उच्च पदावरील उत्तरदात्यांना असे वाटते की, उच्चजातीतील लोकांनी त्यांच्या हाताखाली काम करु नये शासनातील आरक्षण धोरणामुळे उच्चजातीतील हिंदू आणि अनुसूचित जातीमध्ये वैरत्व वाढत आहे. उत्तरदात्यांची विविध राजकीय पक्षाशी निष्ठा आहे परंतु त्यापैकी अनेकजन विचार करतात की, राजकीय पक्ष हे जाती प्रथा नष्ट करण्याऐवजी त्यांची सत्ता कशी सुरक्षित वा अबाधित राहील याकडेच ते लक्ष देतात. अनेक उत्तरदात्यांनी त्यांना आलेले अनुभव, भेदभावाचे प्रसंग आदीच्या संदर्भाने माहिती दिली. प्राथमिक शाळेपासून ते अधिकारी स्तरांपर्यंत त्यांना आलेले अनुभव श्री. देशपांडे यांनी संकलित केले. काहीना त्यांच्या वर्गातील मित्रमंडळीपासून दूर बसविल्या गेले तर काहीना अतिशय हीनकस अशी वागणूक मिळाली.

**मेंडेल सोहम** (१९८३) यांनी मध्ये भारताच्या संसदेतील अनुसूचति जातीचे लोकप्रतिनिधी आणि बिहार राज्य विधीमंडळातील लोकप्रतिनिधी यांच्या संदर्भात अभ्यास केला आहे. ते आपल्या अभ्यासात काही निरीक्षणे नोंदवितात. ते म्हणतात की, अनुसूचित जातीतील संसद सदस्य हे त्यांच्यातील कार्यशुन्यतेमुळे आणि परिणामशुन्य भूमिकेमुळे ते प्रस्थापित हिंदू व्यवस्थेतील उच्चवर्णीय अभिजनांचे बाहूले बनले आहेत.

**सोरनसिंग** (१९८७) यांनी उत्तरप्रदेशातील जौनपूर जिल्ह्यतील अनुसूचित जातीची बदलती सामाजिक आर्थिक स्थिती यासंदर्भात अनुसूचित जातीच्या (४००) उत्तरदात्याचा अभ्यास केला. सामाजिक श्रेणी रचनेमध्ये अनुसूचित जातीची परिस्थिती लक्षणियरित्या सुधारली. त्याचप्रमाणे सामाजिक संपर्कातील सानिध्य आणि सामाजिक दृष्टिक्षेप व्यवसाय आर्थिक स्थिती, शिक्षण, आरोग्य, घरबांधणी यामध्येही आमुलाग्र बदल झाला आहे. या अभ्यासातील उत्तरदात्यापैकी अनेकांच्या त्यांच्या मुलांच्या नौकऱ्या संदर्भातील अपेक्षा ह्य उंचावल्या आहेत आणि त्यांची सामाजिक प्रतिष्ठा उंचावण्यासाठी ते प्रेरणास्त्रोत आहेत. **एस.एस.सिंग आणि श्री. सुंदरम** (१९८७) यांनी उत्तरप्रदेशातील वाराणशीतील अनुसूचित जातीतील शिक्षित आणि अशिक्षित अभिजनांचा अभ्यास केला शिक्षित अनुजातीतील ३८ उत्तरदाते हे तेथिल डिझेल लोकोमोटीव्ह या कंपनीत नोकरीला आहेत. १३ उत्तरदाते हे जीवन विमा निगम मध्ये तर ३ उत्तरदाते हे आयकर कार्यालयात व ४ उत्तरदाते हे विद्यापीठाच्या कार्यालयात आणि २१ उत्तरदाते हे ग्रामीण भागातील कृषिव्यवसायाशी निगडीत आहे. या अभ्यासातील निष्कर्ष असे सूचित करतात की सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये ग्रामीण अभिजनाचा अधिक सहभाग आहे तसेच नव्या पिढीतील अनुजातीचे अभिजन हे तुलनेने जुन्या पिढीतील अभिजनापेक्षा त्यांच्या समूहांशी अधिक प्रमाणात बांधिलकी जोपासतात वा समाजाप्रति अधिक उत्तरदायित्वाची भावना बाळगून असतात. **रामश्रेय रॉय आणि सींग व्ही.बी** (१९८७) यांनी ''बिट्विन टू वर्ल्ड : अ स्टडी ऑफ हरिजन एलिट'' मध्ये उत्तरप्रदेशातील आझमगढ जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील अभिजनाचा त्यांच्या स्वसमूहा प्रती बद्दलचा दृष्टिकोन या संदर्भात अभ्यास केला. ५५ उत्तरदात्याच्या मुलाखती घेउन समाजाप्रतीचे त्यांचे विविध अनुभव संकलित केले. या उत्तरदात्यामध्ये प्रामुख्याने राजकीय नेते, संबधित जातीचे पुढारी, नोकरदार, डॉक्टर, अभियंता, वकील, शिक्षक आणि व्यावसायिक यांचा समावेश होतो. या उत्तरदात्यांनी असे स्पष्ट केले की, त्यांचा सद्याचा जो दर्जा आहे तो प्राप्त करण्यासाठी त्यांचा सद्याचा जो दर्जा आहे तो प्राप्त करण्यासाठी त्यांची प्रतिकुल सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी हा प्रेरक शक्ती आहे. या अभ्यासातील असंख्य उत्तरदात्याची त्यांच्या कुटूंबाचा पारंपारिक व्यवसाय स्वीकारला नाही त्याऐवजी इतर व्यवसायाची निवड केली. परिणामी समाजातील त्यांचा एकूणच सामाजिक दर्जा उंचावला तसेच हे उत्तदाते त्यांच्या जातीच्या व्यक्तिकरिता जेकी अजूनही मागासलेले आहे त्यांच्या उत्थानासाठी मदतीसाठी कोणत्याही प्रकारची मदत (सल्ला देते देणे वा अन्य मदत) करत नाही. या अभ्यासात अनुसूचित जातीतील अभिजन, त्यांचे कुटूंबीय, सामाजिक गतिशिलता, स्वसमूहाच्या प्रश्नाबाबत जागरुकता, आरक्षणाबाबत दृष्टिकोण आणि समाजविकासाकरिता सामाजिक आणि राजकिय प्रयत्न आदी बाबीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

अे. एन. सिन्हा इन्स्टिट्युट ऑफ सोशल स्टडीज, पाटना या संशोधनात्मक पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थेने अभिजनाचा अभ्यास यावर लक्ष केंद्रीत केले होते. शेड्युल कास्ट एलिट, ट्रायबल एलिट, मुस्लिम एलिट याबाबतचे संशोधनात्मक कार्य येथे झाले. तत्कालीन काळाची ती गरज होती यावर आधारित या संस्थेने अभिजनांची विकासात भूमिका यावर एक चर्चासत्र आयोजित केले होते. वेगवेगळ्या सामाजिक व्यवस्थेतील अभिजन, त्यांची वैशिष्ट्ये वास्तव स्वरुप त्यांच्या कडूनच्या समाजाच्या अपेक्षा आणि प्रगती या मुख्य विषयावर आधारित हे चर्चासत्र होते. या चर्चासत्रात विविध समाजशास्त्रज्ञांनी आपले संशोधनात्मक लेख वाचले त्यातील महत्वपूर्ण लेखाचे संकलन **सच्चिदानंद आणि अे.के. लाल यांनी एलिट अॅड डेव्हलपमेंट** या पुस्तकात प्रसिद्ध केले या पुस्तकात एकूण १६ लेख आहेत. एल.एन.शर्मा यांनी अभिजन सिद्धांत महत्व आणि उपयोगिता, शेवकुमार लाल यांनी अभिजनांच्या ओळखी संदर्भातील दृष्टिकोन, विश्वनाथ प्रसाद वर्मा यांनी आधुनिक भारतीय अभिजनातील गतिशिलता, एन.के.सिंघी यांनी नोकरशाहीतील अभिजन तसेच थॉमस पानथम, सुब्रता मित्रा, व्ही.बी.सींग राम आहूजा, पी.सी देव, बी.के.अग्रवाल, बुद्धदेव चौधरी, सुरज सिंग शर्मा, सुरेंद्र गोपाल, हेतुकर झा, निरंजन पंत, अे.के लाल, मनोहर लाल, अे.सी.सिन्हा यांनी आपल्या संशोधनात्मक लेखाद्वारे अभिजनांच्या भूमिकेवर वेगवेगळ्या दृष्टिकोनातून प्रकाश टाकला. यातील ''द एज्यूकेटेड हरिजन अॅज एलिट'' हा त्यांचा शोध निबंध शिक्षित झालेल्या दलितांमधला नोकरदारवर्ग यांच्या संदर्भात आहे त्यांनी म्हटले आहे की, संख्येने अतिशय लहान असा हा वर्ग असून त्यांच्यावर त्यांना मिळालेली कामगिरी आणि समाजाच्या उन्नती संदर्भातील भूमिका यांची मोठी जबाबदारी आहे. राजकीय आणि सामाजिक जाणीवा ह्य शिक्षणाच्या विस्तारामुळेच समाजापर्यंत पोहचेल असेल त्यांना वाटते. सत्तारचनेमध्ये सक्रिय सहभाग हा शैक्षणिक विकासावर अवलंबून असून आर्थिक उन्नती, सबलता ही तुमची सामाजिक स्थान बळकट करते. याबरोबर अन्य सामाजिक,सांस्कृतिक घटकावर या लेखात प्रकाश टाकला आहे.

**रविप्रताप सिंह** (१९८९) यांनी ''अनुसूचित जाती के विधान मंडलीय अभिजन'' या अभ्यासात उत्तर प्रदेश, बिहार व मध्य प्रदेशातील अनुसूचित जातीच्या विधान मंडळातील सदस्यांचा अभ्यास केला. या अभिजनानी सामाजिक व राजकीय क्षेत्रात केलेली प्रगती, बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये त्यांची सांस्कतिक व धार्मिक कार्याप्रतीची संवेदनशीलता त्याचबरोबर स्वसमूहाच्या संदर्भातील त्यांची सामाजिक बांधिलकी या बाबतचे विश्लेषण केले आहे.

सामान्यत: अभिजन या श्रेणीपर्यंत आल्यानंतर हे अभिजन समाजापासून दूर जातात वा जेथून आपण आलो आहोत त्या परिस्थितीला विसरतात म्हणजेच ते स्वसमूहाप्रतीचे उत्तरदायित्व फारसे निभावत नाहीत. या अभ्यासात सिंह यांनी हे अभिजन बदलत्या सामाजिक सांस्कतिक परिस्थितीशी कशा प्रकारे जुळवून घेतात, त्यांची सामाजिक व व्यावसायिक गतिशीलता, नवी मूल्ये आणि राजकीय आकांक्षा यासोबतच शासनाची राष्ट्रीय कार्यक्रम नीति तथा विकास कार्य, अनुसूचित जातीच्या सक्षमीकरणासाठी असलेल्या विविध कार्यक्रमाची क्रियाशीलता याचेही सविस्तर विवेचन प्रस्तुत अभ्यासात केले आहे.

**नंदूराम** (१९८८) यांनी ''द मोबाइल शेड्युल कास्ट: राइज ऑफ अ मिडल क्लास'' या अभ्यासाद्वारे संरक्षित भेदभाव धोरणामुळे अनुसूचित जातीमधला संख्येने अगदी सुक्ष्म असा वर्ग जो की, मध्यमवर्ग म्हणून उदयास आला या संदर्भातले विवेचन केले आहे. नंदूराम यांनी उत्तर प्रदेशातील कानपूर शहरातील अनुसूचित जातीच्या २४० शासकीय नोकरदाराचा अभ्यास केला. ज्यात सामाजिक परिवर्तनाचे स्वरुप आणि अनुसूचित जातीतील सामाजिक गतिमत्वाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम याबाबत त्यांनी चर्चा केली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील अनुसूचित जातीतील नोकरदार हा आरक्षणाचा लाभ धारक असून त्यांची व्यापकता आणि समाजाप्रतीची समर्पकता याचे विचारमंथन या अभ्यासात त्यांनी केले आहे. पूर्वीच्या दलित समाजातील मध्यमवर्ग हा आधूनिक काळातील दलित मध्यमवर्गापेक्षा भिन्न स्वरुपाचा असून सामाजिक गतिमत्व आणि स्थान निश्चिती वा दर्जा ओळख या संदर्भात दलित नोकरदाराची जडण घडण या अभ्यासात विशद करण्यात आली आहे. त्यांच्या आक्षेप आणि आकांक्षा यावरही भाष्य करण्यात आले आहे. संरक्षित भेदभाव धोरणामुळे दलित मध्यम वर्गात आत्मविश्वास आला आणि त्यांचा सामाजिक आर्थिक दर्जा उंचावण्यातही मोठी मदत झाली असून रोजगारप्राप्ती मुळे नोकरदारवर्गात त्यांचे स्थान निश्चित झाले आहे. वर्गसंरचनेमध्ये त्यांनी उर्ध्वगामी गतिमत्वाकडे वाटचाल करण्याबरोबरच कामाच्या ठिकाणी सामाजिक संबधाचे नवे प्रारुप दलित अभिजनांनी हळूहळू आत्मसात केले आहे. या संदर्भातली चर्चा ही या अभ्यासात त्यांनी सविस्तरपणे केलेली आहे.

**पार्वतम्मा** (१९८९) यांनी ''शेड्यूल कास्टस् अॅट क्रॉस रोड'' या ग्रंथात भारतातील अनुसूचित जातीच्या संदर्भात अभ्यास करुन निरीक्षणे नोंदविली आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शासनाकडून अपेक्षित स्वरुपाची कामगिरी दलितांच्या संदर्भात झाली नाही व विकासाच्या बाबतीतील त्याचे प्रयत्न तुटपूंजेच राहिले. परिणामी सार्वत्रिकरित्या दलितांमध्ये शासनाकडूनच्या अपेक्षा मंदावल्या व त्यांच्यात निराशा आली. याबाबतचा लेखाजोगा त्यांनी विविध संशोधन प्रकल्प आणि ग्रंथातून घेतला आहे. त्या म्हणतात, कायद्याने अस्पृष्यता नष्ट झाली मात्र वास्तवात आजही याबाबतचे कटू अनुभव दलितांना येतात. दलित मध्यम वर्गाच्या भूमिकेचा परामर्श घेतांना त्या म्हणतात, कर्नाटकात आरक्षणामुळे अनुसूचित जातींना शासकीय दरबारी नोकरी मिळाली. त्यामुळे त्यांची आर्थिक सुबत्ता वाढली,मात्र आरक्षणाचा हा मुठभर लाभधारक समूह सर्वसामान्य दलितांपासून फार दूर गेला आहे. अनुसूचित जातीतील राजकीय पुढारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनता यांच्यात फार मोठी सामाजिक दरी निर्माण झाली आहे. परिस्थितीनुरुप दलितांमध्ये होणाऱ्या सामाजिक स्थित्यंतराची नोंद पार्वतम्मा यांनी घेतली आहे.

आरक्षणाचा लाभ घेतलेल्या अनुसूचित जाती आणि जमातीच्या सदस्यांमध्ये झालेल्या सामाजिक स्थित्यंतराचा अभ्यास **राजलक्ष्मी रथ** यांनी केला मुलाखत अनूसुचि आणि व्यष्टी अध्ययन पद्धतीद्वारे दोनशे लाभार्थ्यांचा संशोधनाच्या उदिदष्टानुसार अभ्यास केला आणि व्यापक स्वरुपातले निष्कर्ष आपल्या संशोधनाद्वारे मांडले हा अभ्यास ''रिजर्वेशन अॅड सोशल ट्रान्सफॉरमेशन अमॉग शेड्युल कास्ट अॅड शेड्युल ट्राइब्ज'' या नावाने प्रसिद्ध आहे. अे.एन सिन्हा इन्स्टिट्युट ऑफ सोशल स्टडीज, पाटना आणि आय.सी.एस.एस आर यांच्या सहकार्याने त्यांनी हा अभ्यास पूर्ण केला आरक्षण धोरणाचा परिणाम आणि त्याची परिणामकारक अंमलबजावणी या संदर्भातील विश्लेषन यात केले आहे नऊ प्रकरणामध्ये या संशोधनप्रकल्पाची विभागणी केली असून पहिल्या प्रकरणात उत्तरदात्याची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी, दुसऱ्या प्रकरणात आरक्षण धोरणाची सैद्धांतिक पार्श्वभूमी तसेच संशोधन पद्धती यांची चर्चा केली आहे तिसऱ्या प्रकरणात आरक्षण धोरणाची स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरची व्याप्ती तसेच आरक्षण धोरणाशी निगडीत राज्यघटनेत असलेल्या विविध तरतूदी याची सविस्तर चर्चा केली आहे. चौथ्या प्रकरणात उत्तरदात्याच्या सामाजिक.आर्थिक पार्श्वभूमी सोबत त्यांच्या वडीलाचे शिक्षण, पारंपरिक व्यवसाय आर्थिक स्थिती इ. संदर्भात चर्चा केली आहे. पाचव्या प्रकरणात उत्तरदात्याच्या उर्ध्वगामी गतिमत्वाची व्यापकता याचे विश्लेषण आहे. अनुसूचित जाती जमातीमधील नव अभिजन वर्गाचा उदय आणि त्याचे स्वसमूहाच्या विकासाप्रतीचे योगदान याची चर्चा सहाव्या प्रकरणात केली आहे. सातव्या प्रकरणामध्ये आरक्षण धोरणाच्या भवितव्यासंदर्भात आणि या धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणी बाबतच्या सूचना याचा अंतर्भाव केला आहे. आठव्या प्रकरणामध्ये संशोधनाच्या मुख्य उदिष्टानुसार सखोल विचार मंथन करणाऱ्या पाच व्यक्तिचा व्यष्टिअध्ययनाद्वारे अभ्यास केला असून विविध उदिष्टांच्या आधारे आरक्षण धोरणाची फलनिष्पतीचे परीक्षण करण्यात आले आहे. शेवटी सारांश मध्ये अभ्यासलेल्या संशोधन प्रश्नाची व्यापक स्वरुपातली वैशिष्ट्ये व निष्कर्ष प्रतिपादन केला आहे

**पांडे** (१९९१) यांनी ''प्रोटेक्टिव्ह डिस्क्रीमिनेशन अॅण्ड सोशल अपलिफ्ट अमाँग शेड्यूल कास्ट'' या अभ्यासात राज्य घटनेमध्ये अनुसूचित जातींना दिलेल्या संधी व सवलतीमुळे आधुनिक भारतातील दलितांमध्ये जी सामाजिक गतिशीलता आली आणि त्याचे सक्षमीकरण झाले. या अभ्यासात अनुसूचित जातीचा पारंपरिक सामाजिक व्यवस्थेमध्ये झालेला उदय व विकास, सामाजिक श्रेणी, सामाजिक स्थान, सामाजिक संस्थाच्या विरोधात चालविलेली चळवळ, वर्तनबंध प्रकार, जीवन जगण्याची शैली सामाजिक संपर्क आणि उच्च जातींशी त्याची जवळीकता यासंदर्भात चर्चा केली आहे.

**माजी खा. बुटासींग** (२००४) यांनी ''दलित अॅण्ड दलित अवेकनिंग इन इंडिया'' या ग्रंथात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडात दलितांच्या एकूणच सामाजिक, आर्थिक शैक्षणिक स्थितीमध्ये कशा प्रकारे बदल झाला याचा आढावा घेतला. या ग्रंथात त्यांनी जातींची उत्पत्ती, जातीव्यवस्था, अस्पृश्यता तसेच दलितांचा सर्वांगिण विकास आदी बाबींची सविस्तर चर्चा केली आहे. दलितांना प्राप्त परिस्थितीमध्ये केलेले प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेविरोधातला संघर्ष व यात त्यांना मिळालेले यश तसेच आधुनिक काळात दलितांनी केलेला सर्वांगिण क्षेत्रातील प्रवेश या पैलूचाही परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**जोशी बार्बरा** (१९८२) यांनी ''डेमोक्रसी इन सर्च ऑफ इक्वालिटी अनटचेबल पॉलिटिक्स अॅण्ड इंडियन सोशल चेंज'' या अभ्यासात अनुसूचित जातीचे विधान मंडळातील प्रतिनिधीची भूमिका आणि राजकीय क्षेत्रातील आरक्षणामुळे त्यांना मिळालेली संधी यांचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या असे लक्षात आले की, आरक्षणामुळे

मिळालेल्या राखीव जागा या अनुसूचित जातीच्या सहभागासाठी व त्यांच्या उध्दारासाठी तसेच त्यांच्या एकूण समाज विकासाच्या अनुषंगाने त्या अपुऱ्या आहेत. परिणामी समाजाला पुरेशे प्रतिनिधीत्व न मिळाल्याने हा वर्ग सर्वांगिण विकासापासून वंचित राहिला व जे कोणी प्रतिनिधीत्व करतात त्यांची सुध्दा समाजविकासातील भूमिका फारशी समाधानकारक राहिलेली नाही.

**डॉ. नरेंद्र गायकवाड** (२००१) यांनी ''न्यू बुध्दिस्ट एलिट : स्टडी ऑफ देअर रोल्स, स्टेट्स ॲण्ड मोबिलिटी'' या अप्रकाशित पीएच. डी. संशोधनात महाराष्ट्रातील विशेषत: मराठवाडा या विभगातील लातूर, नांदेड, औरंगाबाद विविध क्षेत्रातील बौध्द अभिजनाची ज्यामध्ये वकील, न्यायाधीश, प्राध्यापक, शासकीय अधिकारी, डॉक्टर, अभियंते, प्राचार्य आदींची सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी तसेच त्यांच्या भूमिका, स्थान आणि सामाजिक गतिशिलता या बाजूने अभ्यास केला आहे बौध्दिक क्षेत्रात कार्य करणारे ज्याला त्यांनी बुध्दिवंत असे संबोधले असे ५० उत्तरदाते, प्रशासकीय क्षेत्रातील ७४, व्यावसायिक क्षेत्रातील ४६, राजकीय क्षेत्रातील २१ आणि धार्मिक क्षेत्रातील ९ अशा एकूण २०० उत्तरदात्यांचा एप्रिल १९९७ ते नोव्हें. १९९८ या कालावधीत हा अभ्यास केला संपूर्ण संशोधन कार्याची मांडणी त्यांनी पुढीलप्रमाणे केली आहे पहिल्या प्रकरणात उत्तरदात्याची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी आणि दलित अभिजनाच्या अभ्यासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रकरण दोनमध्ये संशोधन पध्दतीशास्त्र ज्यात संशोधनाची उद्दिष्टे संशोधन आराखडा, विश्व, नमुना निवड, तथ्य संकलनाची उपयुक्त साधने, तसेच अभ्यासाचे महत्व यासंदर्भात चर्चा केली आहे. पुढील प्रकरणात बौध्द अभिजनाचे स्थान, समाजाप्रतीचे उत्तरदायित्व व सामाजिक गतिशीलतेच्या संदर्भात सविस्तर चर्चा केली आहे. आरक्षणाचा लाभ घेऊन या बौध्द अभिजनांनी समाजाप्रतीचे उत्तरदायित्व दुर्लक्षीले असून, हा वर्ग आत्मकेंद्रीत बनला आहे, असे असले तरी काही प्रमाणात शक्य तेवढी मदत करण्याची भूमिका ही या अभिजनांची आहे. या अभिजनांना सामाजिक व्यवस्थेत मिळालेल्या भेदभावाच्या वागणुकी संदर्भातही हा अभ्यास लक्ष केंद्रीत करतो. या अभ्यासातील निष्कर्ष असे आहेत की, हा अभिजन वर्ग सर्वसामान्य समाजापासून दूर जात असून त्यांच्यात आणि सामान्य दलितांमध्ये एक प्रकारची सामाजिक दरी पडली आहे. अभिजनाचे समाजापासून दूर राहणे ही वैश्विक घटना असून भारतातील अनुसूचित जमातीमधील अभिजन आणि अमेरिकेतील निग्रो अभिजन यांच्या सारखीच परिस्थिती दलित अभिजनामध्ये आहे.

**शंकर एल. गायकवाड** (१९९९) यांनी *Protective discrimination policy and social changes: An analytical study of state action on SCs in Aurangabad City* या ग्रंथात संरक्षणात्मक भेदभाव धोरणामुळे औरंगाबाद शहरातील अनसूचित जातींवर झालेल्या परिणामाची चर्चा केली आहे. हा अभ्यास महाराष्ट्राचे एक प्रातिनिधिक स्वरूप म्हणायला हरकत नसावी. आशयानुसार या ग्रंथाची विभागणी दहा प्रकरणात केली असून, व्यवस्थित असा सुलभपणा विषयानुषंगे आला आहे. प्रस्तावनेच्या प्रकरणात संरक्षणात्मक भेदभाव धोरणाच्या पार्श्वभूमीचे सविस्तर असे विश्लेषण केले असून भारतीय राज्य घटनेतील तरतुदी व तज्ञ धोरणकर्त्याच्या दृष्टीकोनातून याचा मागोवा घेतला आहे. समाज परिवर्तनाच्या दृष्टिने संरक्षणात्मक भेदभाव धोरण हे कसे उपयुक्त आहे तसेच अशा कोणत्या त्या बाबी वा घटक आहे ज्या विविध सोयी सवलतीच्या वा धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने अडथळे निर्माण करणाऱ्या आहेत याचे साक्षेपी मूल्यांकन लेखकाने केले आहे. हिंदू सवर्णाकडून होणारा भेदभावपूर्ण व्यवहार याबाबत अनुसूचित जातीच्या लोकांची अनुभुती वा प्रतिक्रिया घेण्याचाही प्रयत्न येथे करण्यात आला आहे त्याचबरोबर धोरण अंमलबजावणीतील परिणामकारकता व त्यामुळे अनु.जातीमध्ये झालेल्या आमुलाग्र बदलाची चर्चाही इथे केली आहे. आधुनिक भारतात दलितांना प्रतिष्ठित व्यवसाय, नोकरी, शिक्षणाची संधी मिळाली त्यामुळे त्यांच्यात आमुलाग्र असा बदल झाला. हा बदल घडवून आणण्याच्या बाबतीत संरक्षणात्मक भेदभाव धोरणाचे महत्वाचे असे योगदान आहे. या धोरणामुळे दलितांचे सर्वच प्रश्न सुटले आहे असे नाही तर त्यातून पुन्हा नव्या समस्या पुढे आलेल्या आहेत याची चर्चा या पुस्तकात केली आहे विशेषत: दलितात निर्माण झालेला सुशिक्षित मध्यमवर्गाचा उदय व या मध्यम वर्गाच्या समस्या यावर प्रकाश टाकलेला आहे. आरक्षण धोरणामुळे निर्माण झालेल्या दलित मध्यम वर्गाच्या आर्थिक समस्या सुटल्या असल्या तरी त्याला सांस्कृतिक व अस्मितेच्या समस्या अधिक तीव्रतेने जाणवत आहेत त्यांना आजही पक्षपात वा भेदभावाला सामोरे जावे लागते. जो पूर्वीचा स्पर्शासंदर्भातला नसून तो त्याला त्याच्या मूळ कनिष्ठ सामाजिक दर्जाची आठवण करहून देणारा आहे. त्यामुळे हा समुदाय विशिष्ट अशा मानसिक कोंडीत अडकला आहे. त्याने मिळविलेल्या नव्या दर्जाचे स्वागत होत नाही वा त्याला इतरांकडून मान्यताही मिळत नाही याची चर्चा प्रस्तुत ग्रंथात केली आहे. त्याचबरोबर दलित मध्यमवर्गाची जबाबदारी यावरही अधिक लक्ष केंद्रीत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

**सोमशेखरप्पा सी.ए.** यांनी *Dalit Employee: A Sociological study of interpersonal relations at work place* या ग्रंथाद्वारे दलित नोकरदार ज्या ठिकाणी काम करतात त्या ठिकाणच्या इतर लोकांशी त्यांचा असलेला आंतरसंबंध यावर लक्ष्य केंद्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटकातील मागासलेल्या अशा हुबळी – धारवाड शहरी परिसरातील खासगी निमखासगी, सार्वजनिक, निमसार्वजनिक संस्थांमध्ये त्याचबरोबर सहकार आणि स्थानिक मंडळे यात कार्य करत असणारा दलित नोकरदार हा आधुनिक व्यावसायिक क्षेत्रांमध्ये ज्यात वरिष्ठ जातीतले व्यवस्थापक मंडळ, इतर नोकरदारांसोबतचे त्याचे संबंध यांच्याशी तो कशाप्रकारे जुळवून घेतो याचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत पुस्तक हे सहा प्रकरणात विभागले आहे. पहिल्या प्रकरणात अभ्यास विषयाच्या व्याप्तीची चर्चा दुसरे व तिसरे प्रकरण हे अभ्यासक्षेत्र व पध्दतीशास्त्राशी निगडीत आहे. चौथ्या प्रकरण हे दलित नोकरदाराच्या व्यावसायिक पैलूविषयी आहे तर पाचवे प्रकरण हे कामाच्या ठिकाणी दलित नोकरदाराना आलेले अनुभव. सहाव्या प्रकरणात दलित नोकरदाराची अभिवृत्ती व अनुभूती जीवन विषयक कार्यसंघटन, नोकरीविषयक, सहकारी नोकरवर्ग, समूह आणि आयुष्यातील चढउतार तसेच सामुदायिक जीवनाशी संबंधित तर सातव्या प्रकरणात अभ्यासाचा सारांश असून निष्कर्षासह सूचनाही दर्शविल्या आहेत. तीनशे दलित नोकरदाराचा हा अनुभवजन्य अभ्यास समाजातील वास्तविकतेचे चित्र उभे करतो. ऐतिहासिकदृष्ट्य परंपरेने दलित हे अस्वच्छ व्यवसायात होते त्याचबरोबर त्यांना शिक्षणाचा हक्क नव्हता. संपत्तीच्या मालकीचे हक्क त्यांना नव्हते अनेक शतकापासून प्रस्थापित व्यवस्थेने त्यांचे विविध प्रकारे शोषण केले होते.मानहानिकारक, घाणेरड्य आणि कष्टप्रद व्यवसायात त्यांना ढकलेले होते. ब्रिटीशाच्या आगमनानंतर पाश्चिमात्यिकरण, औद्योगिकरण आणि शहरीकरणामुळे दलितांसमोरील एकूणच विकासाची क्षितिजे विस्तारली. ज्यामुळे त्यांना समाजातल्या मुख्य प्रवाहासोबत जुळवून घेता आले. दलितांना त्यांच्या वाट्याला आलेल्या व्यावसायिक चढउताराने कसे परिवर्तन

घडवून आणले याचाही परामर्श येथे घेतला आहे. स्वातंर्त्यानंतर भारतात राज्यघटनेच्या तरतुदीनुसार राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये त्यांना सहभाग घेता आल. सार्वजनिक जीवनात त्यांना मानसन्मानाचे जीवन तसेच सामाजिक न्यायाच्या आधारे विकासाची संधी मिळाली या काही जमेच्या बाजू आहेत.

शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रात विशेष सवलती दिल्या गेल्या असे असले तरी त्यांची प्रगती तुलनात्मकरिता फारशी समाधानकारक नाही मात्र एवढ्ढूणच बदलत्या प्रतिमानाच्या संदर्भाने हा समाज आपल्या व्यवसायात सुध्दा बदल करतो आहे. शिक्षणामुळे त्यांच्यात आमुलाग्र असा बदल झाला आहे व आपल्या इच्छेप्रमाणे आणि संधीप्रमाणे नवी नवी क्षेत्रे तो शोधू लागला आहे. परिणामी संघटित क्षेत्रातील त्याचे प्रतिनिधीत्व तो सुधारू शकला आहे. विशेष सवलती दिल्यामुळे त्यांच्यासोबत होणारा भेदभाव कमी झाला आहे. दलित व सवर्ण समाज यांच्यातील भेदभावाची सीमारेषा ही संपुष्टात आली आहे असे जरी असले तरी अजूनही हिंदूची पारंपरिक मानसिकता बदलायला तयार नाही. त्याचे व्यवहाराचे आकृतिबंध अजूनही विषमतेत खोलवर रुजलेले आहे याकडे हा अभ्यास लक्ष वेधतो. आधुनिक व्यावसायिक संघटनामधील ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता दलित नोकरदाराचा कामाच्या ठिकाणींचा व्यावसायिक प्रश्नांचा अभ्यास करण्यात आला आहे

**जगन कराडे** यांचे *''कास्ट डिस्क्रिमिनेशन''* हे इंग्रजी भाषेतील पुस्तक भारतातील प्रचलित जातीभेदभावाच्या विभिन्न स्वरूपांला तथ्याच्या आधारे समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण असे आहे. वास्तवात जातीयता ही केवळ हिंदू धर्मामध्ये आहे असे नाही तर मुस्लिम ख्रिश्चन आदी मध्ये सुद्धा दिसून येते. या पुस्तकामध्ये बारा विद्वानांनी अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेल्या लेखांचे संपादन केलेले आहे. उत्तरप्रदेश, गुजरात, कर्नाटक तथा महाराष्ट्रातील संशोधनावर आधारीत अनुभवजन्य तथ्यांवर आधारलेले आहे या राज्यात विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकला असून ही जातीयता भारतामध्ये कशी संस्थिकृत झाली आहे याचे संशोधनात्मक परिशिलन केलेले आहे. आधुनिक विचार आणि परंपरांच्या पारस्परिक प्रभावाने जातीय गतिशीलता मध्ये कशा प्रकारे परिवर्तन झाले आहे याचे स्पष्टीकरण जगन कराडे यांच्या पुस्तकात दिसून येते. आधुनिक काळात धर्मनिरपेक्ष जाती संघटनांनी मागास जातीच्या अस्तित्वासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. प्राचीन काळापासून जाती ह्या प्रदत्त प्रस्थितीवर आधारलेल्या आहेत जी व्यक्तीला मात्र जन्माच्या आधारावर प्राप्त होते. ज्यात कोणत्याही प्रकारच्या योग्यता, नैपुण्य आणि कष्ट करण्याची गरज पडत नाही. आधुनिकता आणि लोकशाही मूल्यनितिच्याद्वारे जाती आणि धर्माच्या प्रचलित आदिकालीन भावना व विचार हे आपोआप नष्ट होतील असा भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विश्वास होता. डिस्कव्हअरी ऑफ इंडिया या ग्रंथात याचे सविस्तर असे विवेचन केले असून जातीयता ही भारतीय समाजाच्या प्रगती व विकासाला अडथळा आणणारी आहे. सरदार वल्लभभाई पटेल, डॉ बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांनी आधुनिक राज्य, लोकशाही स्वातंत्र, समानता आणि बंधुत्वाचा पुरस्कार केला होता. आपल्या संविधानात जाती,वर्ग आणि लिंग आदीच्याव्दारे होणाऱ्या भेदभावाला दूर करण्यासाठी कायदे नियम बनविले आहे. त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीला न्यायाचा मौलिक अधिकार प्राप्त झालेला आहे.

हे पुस्तक वर्तमान साहित्यमध्ये जातिभेदाच्या महत्त्वपूर्ण प्रश्नावर समाधानपूर्वक चर्चा व तोडगा काढण्यासाठी विचाराचे संकलन आहे. हे पुस्तक भारतीय संस्कृतीच्या बहुविध पैलूचे दर्शन घडविते. जातीच्या संदर्भातील सखोल अभ्यास करण्यासाठी हे पुस्तक महत्त्वपूर्ण आहे. चार्वाक, बुद्धापासून ते महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून आजपर्यंत अनेकांनी जातीभेदाच्या रुढी परंपरेच्या विरोधात अनेकांनी बंड केले. चळवळी उभ्या केल्या. अनेक वर्षापासून भारतीय विद्वानांनी भारतीय सामाजिक व्यवस्थेतील जाती आणि अस्पृश्यतेच्या समस्यांवर संशोधन केले. सैद्धांतिक स्वरूपात जातीभेदाची समस्या हा वैश्विक मुद्दा ठरला.एक नवा आणि प्रभावशाली आधुनिक आणि प्रभावशाली सुसंवाद जातीयतेला संपविण्यासाठी सुरू झाला. या पार्श्वभूमीवर जातिभेदाच्या विविध मुद्द्यांवर या पुस्तकात चर्चा केली आहे. सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना व जिज्ञासूंना हा ग्रंथ म्हणजे एक वैचारिक पर्वणीच होय. जे.एन.यु.चे प्रोफेसर विवेक कुमार म्हणतात की, दलित शब्दाचा उल्लेख सर्वप्रथम १८३१ च्या मोल्सवर्थ शब्दकोशामध्ये दिसून येतो. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ह्या शब्दाचा उपयोग आपल्या भाषणामध्ये करावयास सुरुवात केली. काही जाणकार असे म्हणतात की, १९२१ ते १९२४ च्या दरम्यान दलित शब्दाचा वापर स्वामी श्रद्धानंद यांनी सुद्धा केला होता. दिल्लीमध्ये दलितोद्धारक सभेची स्थापना करून त्यांनी दलितांच्या सामाजिक स्वीकृतीला पाठिंबा दिला होता १९७२ मध्ये महाराष्ट्रातील दलित पॅंथरने एक सामाजीक राजकीय संघटन बनवले तेच नंतर एका आंदोलनात परिवर्तित झाले. नामदेव ढसाळ, राजा ढाले, अरुण कांबळे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. आफ्रिकी–अमेरिकी ब्लॅक पॅंथर आंदोलनापासून प्रेरणा घेऊन त्यांनी दलित पॅंथरची चळवळ उभी केली. येथूनच दलित शब्दाला सामाजिक स्वीकृती मिळाली तोपर्यंत दलित हा शब्द उत्तर भारतात प्रचलित नव्हता नंतर मा. कांशीराम यांनी डी.एस.फोर अर्थात दलित समाज संघर्ष समितीद्वारे दलित आंदोलन चालविले दलित शब्दाला खरी लोकमान्यता मात्र दलित पॅंथरने मिळवून दिली. डॉ. आंबेडकर हे डिप्रेस्ड क्लास या शब्दाचा अधिक वापर करायचे. ब्रिटिश सुद्धा याच शब्दाचा वापर करायचे त्यानंतर दलित शब्द लोकप्रिय झाला. दलित हा शब्द कोण्या एका जातीशी निगडीत नाही. त्यामुळे त्याची स्वीकृती समाजातून मोठ्य प्रमाणावर झाली.

दलित ही एक सामाजिक संकल्पना आहे समाजशास्त्रीय दृष्टिकोनानुसार जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीचे विविध सिद्धांत समाजशास्त्रज्ञांनी वेळोवेळी मांडले आहे. जसे की मुजुमदार यांचा जाती सिद्धांत, घुर्ये यांचा राजकीय सिद्धांत, नेसफिल्ड यांचा व्यावसायिक सिद्धांत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी *कास्ट इन इंडिया* या ग्रंथात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून जातिव्यवस्थेची चिकित्सा केली. ते म्हणतात, काही जातींनी स्वत:ला श्रेष्ठ सिद्ध करण्यासाठी वर्णव्यवस्थेचा आधार घेतला तर काही लोकांना ह्या वर्णव्यवस्थेच्या स्तरीकरणामध्ये सर्वात खालच्या स्तरावर ठेवले अथवा या काहीनां पूर्णत: बाहेर ठेवले. अशा प्रकारे एका बाजूला समाजातून निर्वासित अथवा बहिस्कृत लोकांमधून दलित जाती उत्पन्न झाल्या. सामाजिक विषमता, अत्याचार आणि अस्पृश्यतेच्या प्रथांनी या वर्गाच्या स्थितीला अधिकच दयनीय बनविले आणि या दयनियतेपासून दलन हा षब्द निर्माण झाला. आणि हाच शब्द काळानुसार प्रचलित झाला. शोषित समाजाचे दु:ख आणि वेदनेला हा शब्द पर्यायवाचक बनला आहे दलित हा शब्द दलित शब्दाच्या व्यवहाराच्या बाबतची वर्तमान परिस्थिती ही आहे की २००८ मध्ये राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने दलित या शब्दाच्या व्यवहारातील वापराबाबत निर्बंध आणले आणि त्याला दंडनीय मानले असे असले तरी त्या शब्दाचे व्यावहारिक प्रचलन कमी झाले नाही. दलित शब्द हा अस्पृश्यता

उपेक्षित समाजाची सामूहिक ओळख व अस्मितेचे प्रतिक बनला आहे. हा शब्द सर्वात खालच्या आणि मागासलेल्या जातींना एका धाग्यात बांधू शकतो.

**'कास्ट बेस्ड एक्स्क्लूजन'** या संशोधनावर आधारित या पुस्तकामध्ये **जगन कराडे** यांनी वर्तमान भारतामध्ये दलितांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनातील गुंतागुंतीचे विविध लेखकांनी विश्लेषण केले आहे. भारतातील जातीव्यवस्थेवर आधारित बहिष्काराशी संबंधित विविध मुद्दे आणि त्या मुद्दयाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखकाने केला आहे या इंग्रजी भाषेतील पुस्तकाने भारतीय समाजातील व्यापक गुंतागुंतीच्या जातीय मानसिकतेला उजागर करण्याचा प्रयत्न या पुस्तकामध्ये केला आहे. जातीव्यवस्थेवर आधारित बहिष्काराशी संबंधित एकूण अकरा लेखात हे पुस्तक विभागले आहे. पहिला लेख **प्रविण जाधव** यांनी दलितांचे अर्थशास्त्र आणि शैक्षणिक भेदभाव यावर लिहिला आहे. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा संदर्भ घेत त्यांनी आपली मांडणी केली आहे. आर्थिक असमानता ही जातिव्यवस्थेचे मूळ कारणं आहे याचा त्यांनी उल्लेख केला आहे तसेच गरिबी आणि वंचितता तिची जननी आहे. त्यांच्या मध्ये शासनाला यावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. अर्थशास्त्राच्या एका विशिष्ट शैक्षणिक शाखेचा विस्तार व्हावा जेणेकरून ती शाखा दलितांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून ती परिस्थिती सुधारण्यासाठी व त्याला एक नवी दिशा देण्यासाठी मार्गदर्शन व सूचना करेल अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. **रमेश कांबळे** यांनी दलित आंदोलनाचे स्वरूप समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या लेखात त्यांनी दलित आंदोलनाचे सिद्धांत व राजकारण आदी बाबींचा परामर्श घेत दलित चळवळीचं नेमकं स्वरूप त्यांनी मांडले आहे. दलितांवर होणारी जातीय हिंसा व त्याचे मूळ हे राजकीय व सामाजिक बहिष्कारात असून त्यांना समाजाच्या बरोबरीचा दर्जा दिल्या जात नाही हे त्यांनी मांडले आहे. तसेच आजच्या काळात दलितांची शैक्षणिक व आर्थिक गतिशीलता आहे ती पुढारलेल्या जातीच्या जातसत्तेला आव्हान देते हे वास्तव सांगतानाच त्यानी दलितकेंद्री राजकारणाचाही परामर्ष त्यांनी घेतला असतांनाच दलित चळवळी वर्तमानात कषा निष्प्रभ ठरताहेत हे वास्तवही त्यांनी मांडले आहे. **डॉ. शंकर गायकवाड** यांनी महाराष्ट्रातील अनुसूचित जातीवर होणाऱ्या अत्याचाराचे सखोल चिंतन केले आहे. त्यांच्यामते, समकालीन भारतामध्ये दलित वर्ग हा केवळ सामाजिक भेदाभेद आणि अन्यायाचा बळी तर आहेच पण त्याचबरोबर आपल्या मौलिक अधिकारापासून सुद्धा तो खूप दूर आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जातीवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रकार व त्याची कारणे याचाही परामर्श त्यांनी घेतला आहे. पुण्यातील माणुसकी आणि मानवी हक्क अभियान या स्वयंसेवी संस्थांच्या अहवालाचा आधार महाराष्ट्रातील अनुसूचित जाती वरील अत्याचाराबाबत त्यांनी नोंदविलेल्या काही निरीक्षणांना आहे. दलित वर्ग जेव्हा जातीच्या आधारे संघटित होऊन उच्चवर्णीयांच्या द्वारे होणाऱ्या अत्याचाराचा भेदभावाचा विरोध करतो तेव्हा परिस्थिती अधिकच हिंसक आणि गुंतागुंतीचे होते हेही त्यांनी प्रकर्षाने मांडले आहे.

चौथ्या लेखात **विभूतिभूषण मलिक** यांनी पूर्व उत्तर प्रदेशातील बनारसपल्याडच्या जिल्ह्यावर आधारित असून सामाजिक बहिष्कार व सामीलीकरण यावर त्यांनी भाष्य केले आहे. आपल्या अनुभवजन्य आकडेवारीच्या आधारे त्यांनी स्पष्ट केले की, जातीवर आधारित भेदभाव व बहिष्कार जो अनेक शतकापासून दलितांवर उच्चवर्णीयांकडून केला जात आहे तो खालावलेल्या मानसिक विकासामुळे. समावेशीकरण करण्यासाठी शासकीय स्तरावर केले गेलेले प्रयत्न आणि शासकीय धोरणातील बदल मात्र अत्यंत संथ गतीने आहे त्यासाठी नव्या धोरणाची आवश्यकता आहे जी वंचित वर्गातला समान हक्क व सामाजिक सामीलीकरणांमध्ये मदत होईल. पाचव्या लेखामध्ये **डॉ. विलास जाधव** यांनी महाराष्ट्रातील दलित व कमजोर वर्गाच्या शेती उत्पादन व त्याच्या विपणनाबाबतच्या प्रश्नांचा आढावा घेतला आहे. सूक्ष्म पातळीवरील आपल्या संशोधन लेखात त्यांनी महाराष्ट्रातील कमजोर वर्गाची कृषी विपणानासंबंधीच्या असणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सहाव्या लेखात मेहर **ज्योती सांगळे** यांनी महाराष्ट्राच्या अनुसूचित जाती–जमातीकरिता शासनाद्वारे तयार केलेल्या प्रमुख शासकीय योजनांचे मूल्यमापन केले असून विकासाच्या संदर्भात शैक्षणिक व आर्थिक तसेच शासकीय विलंब व सामाजिक उत्तरदायित्व पासून हा समाज कोसो दूर आहे. असे स्पश्ट केले आहे. त्यामुळे अनुसूचित जातीजमातीचा हा समूह कल्याणकारी योजनाचा अपेक्षित फायदा उठवू शकत नाही असे त्यांनी मांडले आहे.

सातव्या लेखात **बी.एस.वाघमारे** यांनी मराठवाड्यातील दलितांवर मागील पन्नास वर्षामध्ये झालेल्या अत्याचाराचे सविस्तर व सखोल चिंतन केले आहे. त्यांनी मराठवाड्यच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे त्याला जबाबदार असलेल्या कारणांचे सखोल विश्लेषण केले आहे. आठव्या लेखामध्ये **वाई. एस. अलोने** यांनी दलितांविरोधात होत असलेल्या दमण, शोषण आणि हिंसेच्या विरुद्ध जी भूमिका घेतली त्याचाही उल्लेख केलेला आहे. जो सामाजिक कायदे आणि संविधानिक नीतीमुळे शक्य झाला आहे या लेखात आलोने यांनी सार्वजनिक क्षेत्राच्या संदर्भात लिहिताना आंबेडकरांनी गांधींचा उल्लेख केला आहे. एखाद्या गोष्टीसाठी ही संकल्पना शतकानुशतके सामान्य लोकांच्या मनात असते तीच बघणाऱ्याच्या हे मनात असते निर्माण होते सामान्य लोकांची अंतर्दृष्टी ब्राम्हणवादाच्या आकृतिबंधानुसार बनली आहे भारतातील शिक्षण हे जातीवर आधारलेल्या आहे तथा सामान्य लोकांची दृष्टी सुद्धा ब्राह्मणवादी झाली आहे. लोकांचे व्यवहार व त्यांचा दृष्टिकोन या बाबी त्याचे जातीय स्थान ठरवितात. जगन कराडे यांनी आंतरजातीय विवाहाच्या आधारे होणार्या बहिष्काराच्या संदर्भातले विश्लेषण केले आहे. आंतरजातीय विवाहाचे प्रमाण हे आजही कमी असून खालच्या जाती शिक्षण व आर्थिक आधारावर होत असताना सुद्धा संस्कृती गोष्टी आजही परंपराप्रिय व झाले आहे त्यांची संख्या अधिक आहे. मणिपूर येथील अनुसूचित जाती वरील लेख विशाल जाधव यांनी केले आहे वर्गीकरणाच्या संपूर्ण देशाला प्रगत आणि मागास अल्पसंख्यांक नागरी व ग्रामीण क्षेत्रांमध्ये विभागले आहे. ज्यामुळे नागरिकत्व निर्धारित होते अशा प्रकारची वर आधारित ओळख आहे. जाधव यांनी स्थिती पुढे आणण्याचा प्रयत्न करते त्यांना सर्वसामान्य भारत सर्वसामान्य भारतीय नागरिक तिच्या अधिकारापासून सामाजिक जीवनात सुद्धा बहिष्कृत केले जाते हे सांगण्याचा प्रयत्न करते.

शेवटच्या लेखात **जसराज सभरवाल** यांनी हरयानामध्ये दलितांवर झालेल्या अत्याचाराचा समाजशास्त्रीय अभ्यास केला त्यांनी अशी निष्कर्ष काढले की जातीय हिंसा अत्याचार भेदभाव अजूनही भारतीय समाज आणि मानसिकतेमध्ये रुजले आहे सबरवाल पुढे म्हणतात की, दलित केवळ शारीरिक हिंसाचाराच्या बळी नाही तर सामाजिक आर्थिक भेदभावाची सुद्धा बळी आहेत हरियाणातील जाट व अन्य समाजांनी तेथील अनुसूचित जाती जमाती वर केलेल्या

अत्याचारांचा आढावा त्यांनी घेतला आहे या पुस्तकात जातीवर आधारित बहिष्काराच्या वेगवेगळ्या पैलूंची व्याख्या त्यांनी केली आहे. त्यामागील कारणांचाही सखोल अभ्यास व चिंतन त्यांनी केले आहे. त्यामुळे आजही समाजात जातिबहिष्कृत आता हे सामाजिक व एक कारण मानले आहे. जातीवर आधारित बहिष्काराची वर्तमान परिस्थिती आहे त्याला वाचकासमोर ठेवण्यासाठी विविध सामाजिक शास्त्रज्ञाने गंभीर व मजबूत प्रयत्न केले आहे. या समस्यांची सोडवणूक त्यांनी आपल्या लेखाद्वारे स्पष्ट केली आहे.

**कराडे** यांनी *Occupational Mobility Among The Scheduled Castes (2009)* या ग्रंथात अनुसूचित जातीतील व्यावसायिक गतीमत्वाबद्दलची चर्चा केली आहे. कोल्हापूर येथील अभ्यासात यांनी अनुसूचित जातीतील स्थित्यंतरे आणि भारतातील सामाजिक चळवळी यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. त्याचबरोबर अनुसूचित जातीतील विविध सामाजिक प्रश्न, सामाजिक स्थिती याबाबतही चिंतन व्यक्त केले आहे. अनुसूचित जातीच्या तीन पिढ्यांमधील अंतर पिढीतील व्यावसायिक गतिशीलतेच्या प्रवाहावर त्यांचा मुख्य भर आहे.वडिलांच्या पिढीशी तुलना करता अनुसूचित जातीमधील दुसरी पिढी ही खूप अधिक गतिशील आहे. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने पुरविलेल्या नोकरीच्या संधी आणि आरक्षण धोरणाच्या प्रभावाचे मापन सुद्धा अभ्यास करतो. याशिवाय अनुसूचित जातीमधील व्यावसायिक गतिशीलता आणण्यात जबाबदार मुख्य घटक यावर ही प्रकाश टाकतो. कराडे म्हणतात की, महाराष्ट्रातील इतर ५६ अनुसूचित जातीशी तुलना करता व्यावसायिक गतिशीलता व जागरुकता ही येथील धर्मांतरीत बौद्धांमध्ये खूप अधिक प्रमाणात आहे. सहा प्रकरणांमध्ये प्रस्तुत पुस्तकाची मांडणी केली आहे. अभ्यासाच्या दृष्टीने प्रकरण चार, पाच सहा हे महत्त्वपूर्ण आहे. शासनाच्या संरक्षित भेदभाव धोरणामुळे अनुसूचित जातींना उच्चशिक्षणाची संधी मिळाली त्याआधारे त्यांनी विविध नोकऱ्यांत मानाचे व उच्चदर्जाचे स्थान त्यांना मिळू शकले. शासकीय आणि अशासकीय क्षेत्रांमध्ये ह्या लाभार्थ्याच्या मधून नवा अभिजन वर्ग उदयास आला. तो बौद्धिक प्रशासकिय व्यावसायिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. हा खेड्यातील वर्ग शहरी भागात स्थानांतरित झाला उच्चजातीच्या समाजाच्या बरोबरीने तो राहू लागला व त्यांच्यासोबत व्यवहार करू लागला. याबरोबरच जाती श्रेणी रचनेमध्ये स्वत:चे स्थान तो उंचावू लागला. हा जो काही बदल आहे तो सामाजिक सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण आहे तसेच सामाजिक परिवर्तनाला ऊर्ध्वगामी दिशा देणारा हा प्रवास आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने सुद्धा याचे महत्त्व आहे. या अभिजनांनी सामाजिक सांस्कृतिक विविध बदल स्वीकारले तसेच पूर्वीपेक्षाही त्यांच्या वैयक्तिक पातळीवरच्या सामाजिक आंतरक्रिया बदललेल्या आहेत.

महाराष्ट्रातील शहरी भागातील अभ्यास अनुसूचित जातीच्या अभिजनांच्या अभिवृत्तीचे विश्लेषण करतो आणि त्याच्या सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आंतरक्रिया वरिष्ठ जातीचे लोक आणि इतर यांच्यातील आंतरक्रिया तसेच अनुसूचित जातीसह त्यांचे असणारे परस्परसंबंध याकडेही लक्ष वेधतो. हे उच्चशिक्षित अनुसूचित जातीतील वर्ग असून ते मात्र त्यांच्या नातेवाईकांपासून दूर गेलेले अलग पडलेले आहेत, नातेवाईक मात्र अजूनही दारिद्र्य रेषेखाली आहेत परिणामी त्यांचे सामाजिक मतभेद वाढत आहेत.

**जी.जी.वानखेडे** यांनी *Social Mobility and Scheduled Caste (1999)* या ग्रंथात त्यांनी दिल्ली येथे नोकरीनिमित्त राहत असलेल्या दिल्ली डिव्हलपमेंट ऑथॉरिटी हाउसिंग अंतर्गत विविध राज्यातील अनुसूचित जातीतील दीडशे उत्तरदात्यांचा अभ्यास करून आपले निष्कर्ष मांडले. यातील निष्कर्ष असे आहे की, अनुसूचित जातीतील लोकांचे शिक्षणामुळे शिक्षणाच्या योगदानामुळे सकारात्मक बदल झाले आहे. त्यांच्यात व्यावसायिक गतीमत्व वाढले आहे. आर्थिक विकास, राजकीय सत्ता, बौद्धिक सत्ता आणि धर्मांतर आदीबाबत त्यांनी विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. दिल्लीतील अनुसूचित जातीची संख्या आहे. वेगवेगळ्याप्रकारच्या ३६ जातीमध्ये विभागली गेली आहे. त्याचबरोबर या जातीच्या अंतर्गत ही व्यावसायिकावर आधारित फरक आहे.

**जगन कराडे** यांचा *Scheduled Caste Elites (2019)* हा शोधग्रंथ दलित अभिजन व त्यांच्या सामाजिक अभिवृत्ती आणि सामाजिक आंतरक्रियाबद्दल चर्चा करणारा आहे. ICSSR च्या सहकार्याने हा शोध प्रकल्प पूर्णत्वास आला. शासनाच्या संरक्षित भेदभाव धोरणाच्या फलश्रुतीमुळे दलितात नवमाध्यमवर्ग उदयास आला. तो शहरी भागात नोकरी निमित्त राहू लागला. या अशा पार्श्वभूमीवर हा अभिजन वर्ग उच्चजाति वर्गाशी कशाप्रकारे आंतरक्रिया करतो, त्याच्याशी होणारा भेदभाव, होणाऱ्या आंतरक्रिया व त्याच्या अस्मितेची ओळख यावर हा अभ्यास लक्ष वेधतो. या दलित अभिजन वर्गामध्ये उच्चजाति वर्गासोबत असलेले संबंध कसे आहेत. संमिश्र समाजामध्ये तो आपले अस्तित्व व ओळख कशी ठेवतो याची चर्चा यामध्ये केली आहे.

अशाप्रकारे विविध विद्यापीठात दलितांच्या सामाजिक प्रश्नावर विविध पैलूंचा दृष्टीने संशोधन होत आहे. याबरोबरच विविध संशोधन प्रकल्प हाती घेतले जात आहे, आय.सी.एस.एस.आर. व यूजीसीच्या माध्यमाद्वारे विविध अभिमत विद्यापीठे, सामाजिक कार्य महाविद्यालये, दलितांच्या संदर्भात अभ्यास करणाऱ्या संशोधन संस्था यांच्याद्वारे दलितांच्या संदर्भातील प्रकाशित पैलू पुढे आणण्याचा प्रयत्न केला जातो आहे. एक मोठे व्यापक दालन समाजशास्त्राच्या अभ्यासकांसमोर उघडले आहे.

# स्वातंत्र्योत्तर भारतातील निवडक समाजशास्त्रीय संशोधने

**नारायण तु. कांबळे,** प्रोफेसर, पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद जि.लातूर मो.९९२११५३१५९

**प्रस्तावना:—** भारतातील समाजशास्त्राच्या विकासाचा आढावा घेताना प्रभावी सैद्धांतिक संशोधने, पद्धतीशास्त्र आणि तंत्रातील बदल आणि त्याचा इतर विज्ञानांशी संबंध, त्याच्या व्यावसायिक रुपात पायाभूत सुविधा यातील योगदानाच्या प्रवृत्तीतून सार्वभौमीकरणाची ज्ञानशाखा म्हणून १९५२—१९७७ मधील विश्लेषण हे ज्ञानाच्या समाजशास्त्राच्या एका चौकटीशिवाय त्याचे अर्थपूर्ण आकलन शक्य नाही. भारतातील बौद्धिक आणि सांस्कृतिक परंपरा यांनी समाजशास्त्र आणि सामाजिक विज्ञानाच्या एका निश्चित स्तराला प्रभावित केले आहे. त्याने सैद्धांतिक, वैचारिक मूल्यमापनासाठी महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पार्श्वभूमी तयार केलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात उच्च किंवा विद्यापीठस्तरीय शिक्षणाचे स्वरूप संशोधन प्रधान असावे असे मत आज सर्वमान्य झाले आहे. भारतातील सर्वच विद्यापीठे विविध ज्ञानशाखांमध्ये संशोधनाचे शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. अशा पार्श्वभूमीवरच स्वातंत्र्योत्तर भारतात समाजशास्त्रातील संशोधने कशी विकसित होत गेली व त्याचा विस्तार कसा वाढत गेला यासंबंधाने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये काही निवडक संशोधनाचा आढावा घेतला आहे.

**सामाजिक संशोधनाचा पूर्व—इतिहास:—** एकंदरच पौर्वात्य समाज आणि संस्कृतीबद्दल अनेक युरोपियन, इंग्लिश, रशियन आणि चिनी प्रवाशांना शतकानुशतके कुतूहल वाटत आले आहे. विशेषत: भारतीय सामाजिक संस्था, प्रथा, परंपरा, जातिव्यवस्था, ग्रामरचना, अर्थव्यवस्था, भाषा, चालीरीती, इथले प्राचीन तसेच मध्ययुगीन मौलिक ग्रंथ या सगळयांना विलक्षण आकर्षणामुळे अनेक प्रवासी भारतात आले. त्यांची महत्वपूर्ण निरीक्षणे त्यांच्या प्रवासवर्णनांमध्ये नोंदविलेली आहेत. खरेतर, सामाजिक शास्त्रातील प्राथमिक स्वरूपाचे संशोधनच या विविध प्रवासवर्णनांच्या माध्यमातून सुरू झाले असे म्हणता येईल.

१५ व्या ते १७ व्या शतकांत अनेक युरोपीय प्रवासी भारतात आणि इतर पौर्वात्य देशांत आले. त्यांच्याबद्दलची विस्तृत माहिती आणि त्यांच्या निरीक्षणांचा आढवा ई. एफ. ओटेन यांनी त्यांच्या ग्रंथात घेतला आहे (ओटेन १९०९). विशेषत: १७ व्या शतकात शहाजहान आणि औरंगजेबच्या मोगल राजवटीत जे प्रवासी भारतात आले त्यांची प्रवासवर्णने मार्मिक निरीक्षणे आणि विश्लेषणाने परिपूर्ण आहेत (पाहा बेरनिए १८९१: कॅरे १८४७—४८: फ्राएर १९०९). त्यापैकी ज्यांच्या ग्रंथांचा व प्रवासवर्णनांचा पुढे ब्रिटिश राजवटीतील प्रशासकीय यंत्रणेच्या अंतर्गत झालेल्या, विशेषत: सामाजिक/सांस्कृतिक मानवशास्त्रीय, संशोधनावर प्रभाव पडला त्यापैकी वानगीदाखल दोनच प्रवासवर्णनांचा येथे तपशील देणे अप्रस्तुत होणार नाही.

बेरनिए आणि टॅव्हर्निए हे दोघे फ्रेंच प्रवासी १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात आले. बेरनिएने आपल्या प्रवास वर्णनात अनेक प्रकारच्या घटनांचा तपशील दिला आहे. आपण ‘प्रवासवर्णन’ म्हणून जरी दस्तावेज तयार करीत असलो तरी त्यातील प्रत्येक घटनेच्या निरीक्षणाला ऐतिहासिक महत्व आहे हे बेरनिए जाणून होता आणि म्हणून मोठया जबाबदारीच्या भावनेने काही गोष्टी तो विस्ताराने सांगत होता. यात त्याची एक प्रकारची तटस्थ वृत्ती दिसून येते. असा तटस्थपणा शास्त्रीय संशोधनाची एक पूर्वअट मानली जाते. या अर्थाने बेरनिएच्या संशोधनाची एक पूर्वअट मानली जाते. या अर्थाने बेरनिएचे प्रवासवर्णन संशोधनाधिष्ठितच आहे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. पण बेरनिएच्या वर्णनातील ज्या भागाचा पुढे सामाजिक शास्त्रातील सैद्धांतिक चर्चेवर विशेष प्रभाव पडला तो भाग भारतातील कष्टकरी शेतकऱ्याच्या परिस्थितीशी संबंधित आहे. त्याच्या मते, ‘‘कार्ल मार्क्सच्या विवेचनात, विशेषत: १८४४ मध्ये त्यांनी लिहिलेल्या इकॉनॉमिक अँड फिलॉसॉफिक मॅन्युस्क्रिप्टस् मध्ये, ‘अशियाई उत्पादन पद्धतीवर बरीच चर्चा आहे. ‘गुलामगिरी, सरंजामशाही आणि भांडवलशाही अशा तीन उत्पादन व्यवस्थांबरोबरच वेगळी पण न बदलनारी अशी अशियाई पद्धती असते, हे मार्क्सचे मते, ज्या संदर्भग्रंथांचा आधार घेऊन बनले त्यात बेरनिएचे प्रवासवर्णन हा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ होता.

दुसरे महत्त्वाचे प्रवासवर्णन टॅव्हर्निएचे आहे. राजस्थानमधून प्रवास करताना त्याने सती जाण्याचा प्रकार प्रत्यक्ष पाहिला होता. टॅव्हर्निए म्हणतो, ‘जी स्त्री पती निधनानंतर सती जात असते तिला वाजतगाजत मिरवणुकीने स्मशान भूमीवर नेले जाते.’ पतीच्या निधनासारखा दु:खद प्रसंग असूनही ढोल, ताशे नगारे इ. वाद्यांच्या कर्णकर्कश आवाजात का बरं सतीची मिरवणूक काढली जाते? या प्रश्नांचे उत्तर देताना टॅव्हर्निए म्हणतो की, बहुतेक विधवा स्त्रियांवर सती प्रथा लादली जाते आणि अनिच्छेने विधवेला पतीच्या शवासोबत जाळले जाते. अशा सती जाणाऱ्या स्त्रीचा आक्रोश कोणाला ऐकू येऊ नये म्हणून वाद्यांचा गजर आणि मिरवणुकीचा घाट घातला जातो. हे सतीप्रथेवर, प्रत्यक्ष निरीक्षणाव्दारे, टॅव्हर्निएने मोठे विदारक भाष्य केले आहे (पाहा १२५; बेरनिए १८९१: ११३,४७१—४३). अशा प्रकारच्या प्रवासवर्णनातून व तटस्थ राहून एखाद्या गोष्टीचे अध्ययन यातून केले जात होते. एकंदरीत त्यामध्ये बरीच तटस्थता असली तरी संशोधनातील वस्तुनिष्ठता लक्षात घेण्यासारखी आहे. अशा प्रकारची संशोधने पूर्वी झालेली दिसून येतात. आज मात्र संशोधने विविध पातळीवरून केली जात आहेत. त्यापैकी विद्यापीठांतर्गत होत असलेले संशोधने ही स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजात कमी प्रमाणात होताना दिसून येतात. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील संशोधन :—** १८५७ च्या उठावानंतर उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या स्थापनेला प्रारंभ झाला. अर्थात, पुण्यातील डेक्कन कॉलेजची सुरूवात १९४२ मधली आहे. प्राच्यविद्या, पुरातत्वशास्त्र, संस्कृत, पाली—प्राकृत, भाषाशास्त्र इ. विषयांवर या संस्थेत संशोधन सुरू झाले. त्यासाठी सरकारने निधी उपलब्ध करून दिला. कारण एकंदरच ब्रिटिश राजवटीत भारतातील उच्च शिक्षण प्रसाराबद्दल शासनाचे सावध धोरण होते. १८५७ — १९४७ या नव्वद वर्षात फक्त २५—२६ विद्यापीठं स्थापन केली गेली. त्यातसुद्धा, पगाराव्यतिरिक्त, शासनाने संशोधनासाठी विशेष आर्थिक तरतूद केल्याचे कागदोपत्री उल्लेख फारसे आढळत नाहीत.

परकीय सत्तेच्या संशोधनाबाबतच्या या औदासिन्याची दोन कारणे असावीत, एक, लोककल्याणकारी विकास कामांसाठी त्या काळी निधी नेहमीच अपुरा पडत असे. जो निधी उपलब्ध व्हायचा त्यात इमारतीचे बांधकाम, ग्रंथालय व कर्मचाऱ्यांचे पगार या पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर असे. आणि दोन, विद्यापीठातून शिकून पदवी प्राप्त केलेल्या नव्या तरुण पिढीत स्वातंत्र्य चळवळीचे आकर्षण विशेष वाढत होते. नैसर्गिक विज्ञानाव्यतिरिक्त इतर सामाजिक व मानव्यशास्त्रांमधल्या संशोधनासाठी ब्रिटिश शासन फार औदार्य दाखवेल अशी राजकीय परिस्थिती नव्हती.

याचा अर्थ स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील विद्यापीठांतून सामाजिक शास्त्रांमध्ये फारसे संशोधन झालेच नाही असा होत नाही. उलट, शासनाने पाठ फिरवलेली असतानाही काही चांगले संशोधनपर लेखन हया काळात मुंबई, कलकत्ता, मद्रास, लाहोर, अलाहाबाद इ. विद्यापीठांतून झाले कारण या काळात लोकाश्रयातून बरीच अध्यासने निर्माण केली गेली, ज्याव्दारे संशोधनाला चालना मिळाली. उदाहरणार्थ, मुंबई विद्यापीठाला अर्थशास्त्रासाठी सहा, राज्यशास्त्रासाठी दोन व वाणिज्य आणि तत्वज्ञानासाठी प्रत्येकी एक अध्यासन स्थापन करण्यासाठी विविध उद्योगपती, बँका सामाजिक व धर्मदाय संस्थापकडून देणग्या मिळाल्या.

सामाजिक शास्त्रांत भारतीय विद्यापीठांतून जे संशोधन झाले त्याचा भर भारतीय आर्थिक व सामाजिक समस्या, कृषी अर्थव्यवस्था, धर्म, जातिव्यवस्था, विवाह–कुटुंब–नातेसंबंध यासारख्या सामाजिक संस्था आणि आदिवासी – प्रजातीय गटांच्या अभ्यासांवर विशेष होता. मुंबई विद्यापीठाचे जी.एस. घुर्ये, पुण्याच्या डेक्कन कॉलेजात इरावती कर्वे, मद्रास विद्यापीठात एल.के. अनंतकृष्ण अय्यर, ए. अयप्पन, लखनौ विद्यापीठात डी. एन. मुजुमदार, कलकत्यात बी.एन. सरकार व एस. सी. रॉय हया संशोधकांचा उल्लेख करावा लागेल. अर्थशास्त्रात मुंबईला सी.एन. वकील, प्रा. दांतवाला व प्रा. लकडावाला आणि लखनऊमध्ये राधाकमल मुखर्जी, डी.पी. मुखर्जी यांच्या संशोधनाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली होती.

त्या काळातील सामाजिक शास्त्राच्या प्राध्यापकांवर, त्यांच्या लेखन व संशोधनावर स्वातंत्र्य चळवळीचा, विशेषत: त्यातील वेगवेळया वैचारिक प्रवाहांचा, प्रभाव पडलेला होता. पहिले महायुद्ध आणि रशियन राज्यक्रांती नंतर 'सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक, संशोधक आणि विचारवंत हे सगळे भांडवलदारी अर्थव्यवस्था, साम्राज्यवाद व वसाहतवादाचे खंडन करणारे, खच्चीकरण करणारे परिवर्तनवादी समीक्षक असत' तर युरोप व अमेरिकेतसुद्धा 'प्रस्थापित व्यवस्थेचे पुरस्कर्ते एकीकडे तर दुसरीकडे 'सत्तारचनेत बदल घडवून आणू इच्छिणारे समीक्षक' असे सामाजिक शास्त्रज्ञांमध्ये तट पडलेले दिसतात. याचाही परिणाम स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये सामाजिक संशोधनावर झालेला दिसून येतो. स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक संशोधनाला फारसा वाव मिळाला नाही हे स्पष्ट होते. तेव्हा स्वातंत्र्यानंतर संशोधनाला कशी चालना मिळाली हे पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**स्वातंत्र्योत्तर भारतातील समाजशास्त्राचे संशोधन:–** स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये समाजशास्त्राचा विकास अधिक विस्ताराने झाला. अनेक भारतीय विद्यापीठांमध्ये समाजशास्त्रातून अध्ययन, अध्यापन आणि संशोधनासाठी वेगवेगळे विभाग सुरू झाले. अध्यापन हे विषय विकासाचे द्योतक आहे. म्हणजेच पाठ्यक्रमाचे अध्यापन हे संशोधन कार्याचे निर्धारण असते. दुसऱ्या शब्दात अध्ययन–अध्यापन आणि संशोधन हे एकाच वेळी चालत असते. संशोधन हे अध्यापनाचे अभिन्न अंग असते. अध्यापन आणि संशोधन या दोन्हींची विषयाच्या विस्तारीत ज्ञानासाठी आवश्यकता असते. संशोधन ही एक अध्यापनाची सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि अध्यापन हीदेखील संशोधनाची प्रक्रिया आहे. संशोधन प्रक्रियेला गती मिळावी यासाठी स्वातंत्र्योत्तर भारतात प्रगत अध्ययन व संशोधनाचे केंद्र स्थापन झाले. भारतात ICSSR ही संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक विकासाची संस्था स्थापन झाली. सेंटर फॉर दी स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज् (दिल्ली), इन्स्टिटयूट फॉर स्टडी ऑफ सोशल ॲड इकॉनॉमिक चेंज (बंगलोर), सेंटर फॉर दी स्टडी ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज (तिरूअनंतपुरम्), मद्रास इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज (चेन्नई) इ. संशोधन संस्था स्थापन झाल्या. विद्यापीठ अनुदान आयोगमार्फत सामाजिक संशोधकांना संशोधनासाठी आर्थिक तरतूद केली. विविध विद्यापीठांमार्फत अध्यापकांना संशोधनासाठी सहाय्य तसेच शासकीय संस्था आणि स्वायत्त संशोधन संस्थेव्दारे संशोधनासाठी प्रोत्साहन मिळाले. यामुळे समाजशास्त्रामध्ये संशोधन अनुदानाच्या उपलब्धतेमध्ये वृद्धी झाली. सातत्यपूर्ण विभिन्न दृष्टिकोण आणि पद्धतीमधून क्षेत्रकार्याच्या वादविवादातून समाजशास्त्रीय संशोधन हाताळली गेली. प्रारंभी आदिम वा आदिवासी समुदायाच्या अध्ययनात भारतीय मानवशास्त्रज्ञांनी अनुभविक अध्ययन केले. तसे १९५० मध्ये पाश्चात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञांनी गावांचे अध्ययन बृहत पातळीवर हताळले. भारतीय सामाजिक संशोधकांनी 'खेडे अध्ययनाच्या' (village study) माध्यमातून क्षेत्रकार्य (field work) अध्ययनाचे महत्व वाढविले. सामाजिक संशोधकांना भारतीय समाजाची सामाजिक वास्तवत: समूहीकृत करण्यामध्ये क्षेत्रकार्य सहाय्यक ठरले. त्यांनी लोकांच्या दैनंदिन जीवनाचे अध्ययन केले. आता भारतीय समाजावरील ग्रांथिक दृष्टिकोनाच्या (book view) विरोधी क्षेत्रिय दृष्टिकोनाचा (field view) उदय झाला या विषयीचा फरक एम. एन. श्रीनिवास यांनी केला आहे. भारतीय सामाजिक वास्तवतेच्या अध्यनात समाजशास्त्रज्ञांनी क्षेत्रकार्य दृष्टिकोन स्वीकारला.

स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजशास्त्रामध्ये संशोधनाचे क्षेत्र विकसित होत गेले. १९५० पासून ते १९७० पर्यंत भारतातील समाजशास्त्र उत्तरोत्तर जमाती व जाती समुदायाच्या संशोधनामध्ये प्रभावी ठरले. १९५० च्या दशकात समाजशास्त्र व सामाजिक मानवशास्त्रामध्ये खेडयांचे अध्ययनामध्ये क्षेत्रिय कार्य बृहतपणे लोकप्रिय ठरले. क्षेत्रकार्याने प्राथमिक ज्ञानावर (First hand Information/Knowledge) अधिक भर दिला गेला. जाती व खेडे यांचे अध्ययन हे भारतीय समाज व सभ्यता अध्ययनाच्या परंपरेपेक्षा वेगळी होती.

गावाच्या अध्ययनात प्रारंभी 'गाव समुदाय' हे पृथक व स्वावलंबी होते. गावांच्या क्षेत्रकार्य अध्ययनाआधारे शहर आणि भारतीय समाजातील व्यापक स्वरूपाच्या संबंधाचा एक भाग (परस्पर संबंधित व परस्पर परावलंबी) आहेत असे अध्ययनातून स्पष्ट केले. खेडयांच्या जीवनावर बाहय कारकांचा प्रभाव असतो यातून गावांचे आकलन केले पाहिजे. यातून क्षेत्रकार्यावर आधारित भारतीय खेडयांच्या अध्ययनात सूक्ष्म अध्ययनावर भर देण्यात सुरूवात झाली. या खेडयांचे अध्ययन हे ग्रामीण समाजाच्या विशेषतेशी संबंधित होते. यातील काही जसे ग्रामीण सामाजिक–आर्थिक जीवनातील परिवर्तन, जाती, राजकीय शक्ती इ. तसेच ग्रामीण समाजावरील शासकीय कार्यक्रमाचा व राजकारणाचा प्रभाव यावर भर दिला.

एस. सी. दुबे यांनी १९५५ मध्ये भारतीय खेडयावरील अनुभवजन्य अध्ययनाच्या आधारे भारतीय खेडे (Indian Village) या पुस्तकाचे प्रकाशन केले. डी. एन. मुजुमदार यांनी ग्रामीण प्रोफाइल (Rural Profile) या पुस्तकाचे संपादन केले. मॅकिम मेरियट यांनी भारतातील खेडे (Village in India) पुस्तक संपादित केले. श्रीनिवास यांनी भारताची खेडे (India's Village) हे पुस्तक संपादित केले १९५० पूर्वी इतर काही पुस्तके प्रकाशित झाली त्यात श्रीनिवास यांचे कुर्गमधील समाज, दुबे यांचे भारताची बदलती गावे, मजुमदार यांचे भारतीय गावातील जात आणि संप्रेषण, ऑस्कर लेविस यांचे उत्तर भारतातील ग्रामीण जीवन, बेली यांचे जात आणि

आर्थिक, जात हे संशोधनाचे महत्वाचे क्षेत्र होते. १९६२ मध्ये श्रीनिवास हे वर्ण आणि जातीवरील अध्ययनातून जातीच्या अध्ययनाकडे वळले. श्रीनिवास यांच्या अध्ययनातील घटक हा वर्ण नसून जात होता. जात हा एक सामाजिक संवर्ग आहे. श्रीनिवास यांनी गाव पातळीवर जातीमधील संघर्षाच्या अस्तित्वापेक्षा एकतेच्या व्यवस्थेवर (harmonious System) जातीला शोधण्याचा प्रयत्न जाती अध्ययनातून केला असे लक्षात येते. लोकशाहीच्या राजकारणामध्ये जातीच्या भूमिकेतून संशोधन केले आहे. या अध्ययनात आप्तसंबंध, आर्थिक, राजकीय संस्थेतील संरचना आणि परिवर्तन क्षेत्राला सुद्धा लक्षात घेतले आहे. या अध्ययनातून भारतीय समाज व संस्कृतीवरील पूर्ण ज्ञान मिळते तसेच कुटुंब आणि विवाह परिवर्तनावरील काही गैरसमज याचे ज्ञान होते.

ए.एम. शाह यांच्या मते, भारतातील हिंदू कुटुंबे काही लहान आकाराची होती आणि काही संयुक्त होती. आय.पी. देसाई यांनी भारतात संयुक्ताधीन भावनेचे अध्ययन केले. रामकृष्ण मुखर्जी यांनी समकालीन भारतातील विविध प्रकारच्या कुटुंबाच्या रचनेचे सर्वेक्षणातून विश्लेषण केले आहे. यात आप्तसंबंध व विवाहावर अधिक संशोधने आयोजित केली. के.एम. कपाडिया यांनी शहरी परिवेशातील कुटुंब व विवाहाचे अध्ययन केले. टी. एन. मदन यांनी काश्मीरच्या पंडितांमधील कुटुंब व आप्तसंबंधाचे अध्ययन केले. इरावती कर्वे यांनी भारतातील आप्तसंबंध संघटेचे अध्ययन केले. मेयर यांचे जात, उप–जात संबंधाचे अध्ययन इ. श्रीनिवास यांचे कुर्ग समाजावर आधारित धर्माचे एक महत्वपूर्ण समाजशास्त्रीय अध्ययन होते. दक्षिण भारतातील कुर्गमधील धार्मिक श्रद्धा आणि कर्मकांड यामधील परस्पर संबंधाचे परीक्षण केले. श्रीनिवास यांनी जातिव्यवस्थेच्या गतिशीलतेवर प्रकाश टाकला आहे. त्यांनी प्रबळ जात, संस्कृतीकरण, पाश्चिमात्यीकरण व धर्मनिरपेक्षीकरणातून आंतरजातीय संबंध त्यातील गतिशीलतेच्या अध्ययनाचा प्रस्ताव ठेवला. वाय.बी. दामले यांनी जाती गतिशीलतेच्या अध्ययनात जातीच्या संदर्भसमूह सिद्धांताला प्रोत्साहन दिले. १९७० मध्ये प्रकाशित भ्वउव भ्पमततंबीपबने या पुस्तकातून लुई डयूमॉ यांनी जाती अध्ययनामध्ये रुची दाखविली. डयूमॉ यांनी जातीच विचारप्रणालीचे आकलन करण्याच्या अवश्यकतेवर भर दिला. डयूमॉ यांनी अभिजात ग्रंथाच्या (classical Text) आधारे भारतविद्या आणि संरचनात्मक दृष्टिकोनातून जातिव्यवस्था आणि गावांच्या अध्ययनाचा सल्ला दिला.

पंचायत राज आणि लोकशाही विकेंद्रीकरण याकडे भारतातील राजकीय विकासाकडे समाजशास्त्रज्ञांचे लक्ष आकर्षित झाले त्यांनी खेडयाची ग्रामीण संरचना आणि ग्रामीण जीवनावरील प्रभावाचे अध्ययन केले. संशोधनाच्या इतर क्षेत्रात विभिन्न जाती, स्तरीकरणाचे अध्ययन आणि सामाजिक परिवर्तनाच्या अध्ययनामधील सामाजिक गतिशीलता अंतर्भूत आहे. यामध्ये आर. एस. खरे, सुनंदा पटवर्धन आणि के.सी. अलेक्झांडर यांचा संशोधनात रुची घेतली. इतर संशोधनाच्या क्षेत्रामध्ये आदिवासी समाज, आदिवासी गावे व त्यांची आर्थिक, विवाह, कुटुंब आणि आप्तसंबंध संरचना, प्रथा व परंपरा आणि लोककला इ. यातून शासनाव्दारे आदिवासी समाजातील परिवर्तनामुळे आधुनिक राजकीय विकास व कल्याण कार्यक्रमाच्या उपायांचा प्रभाव हे एक संशोधनाचे क्षेत्र तयार झाले.

औद्योगिकीकरणाचा विकास आणि जलद गतीने वाढणारे शहरीकरण हे अनेक समाजशास्त्रज्ञांसाठी अध्ययन व संशोधनाचे एक नवीन क्षेत्र बनले. एन. आर. सेठ यांनी १९६८ मध्ये सामाजिक संबंधातून कारखान्यात काम करणाऱ्या लोकांमधील संबंधाच्या संरचनेचे विश्लेषण केले. बी.एस बावीस्कर यांनी एका सहकारी साखर कराखान्याच्या संघटनात्मक चौकटीतून राजकीय शक्ती संरचनेतील जातीच्या भूमिकेवर अध्ययन केले. औद्यौगिक समाजशास्त्राच्या क्षेत्रामधील इतर संशोधनाच्या कार्यात औद्यौगिकीकरण, कामगारांची बांधिलकी, कामगार व्यवस्थापन संबंध, व्यवसायातील समाधान, कामाच्या संबंधातील औपचारिक व अनौपचारिक समूह, उत्पादकता आणि व्यापारी अध्ययनामध्ये पी.एस. पुनाळेकर, एस.एम. पांडे आणि रामास्वामी यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. काही विद्यापीठांच्या विभागामध्ये एम. ए. आणि एम. फिल. स्तरावर औद्यौगिक समाजशास्त्राचे अध्यापन, अध्ययन केले जाते. भारत खेडयांचा देश आहे असे मानून शहरी समाजशास्त्राला चुकीच्या पद्धतीने दुर्लक्ष केले जात होते; परंतु १९७० च्या दशकात त्याला महत्व दिले गेले. ग्रामीण–शहरी स्थलांतर, शहरी विकास आणि झोपडपट्टीच्या समस्यामुळे समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रांचे लक्ष आकर्षित केले. शहरी समाजशास्त्राच्या पैलूंचे अध्ययन केले गेले. यात ग्रामीण–शहरी स्थलांतर, लोकसंख्या आणि शेजारी, झोपडपट्टी, सामाजिक स्तरीकरण, शिक्षण, जाती संघर्ष इ.चे अध्ययन समाविष्ट आहे (एम.एस.ए. राव, सब्बरवाल, सिल्विया व रिचर्ड फॉक्स). शहरी झोपडपट्टीने यांचे लक्ष वेधले गेले (ए.आर. देसाई व पिल्लाई, बेबी व अल्फ्रेड डिसुजा इ.)

शहरी अध्ययन हे एक वेगळे संशोधनाचे महत्वपूर्ण क्षेत्र आहे. घुर्ये, राधाकमल मुखर्जी, चट्टोपाध्याय आणि इतरांनी शहरांचे अध्ययन केले. काही शहरांची विशेष वाढ आणि विकासावरील अध्ययनात विभिन्न प्रदेशातील शहरीकरणाच्या प्रक्रियेचे त्यामध्ये बलसारा, सोवनी, एन.के. बोस, मित्रा, डिसुजा आणि इतरांचा समावेश होतो. शहरीकरणाचा सामाजिक–सांस्कृतिक प्रभाव, शहरांच्या आधुनिकीकरणाचा ग्रामीण जीवनावरील प्रभाव याचे अध्ययन बी. वाय. दामले यांनी केले. सच्चिदानंद, विद्यार्थी आणि इतरांनी जमाती आणि जाती गावावरील शहरीकरणाच्या प्रभावाचे अध्ययन केले.

शिक्षणाचे समाजशास्त्राचा विकास १९५० नंतर झाला. विकासातील शिक्षणाची भूमिका आणि सामाजिक परिवर्तन माध्यमांच्या वाढत्या जाणिवेसाठी शिक्षणाने नेतृत्व केले. काही संशोधकांनी शिक्षकांची भूमिका आणि सामाजिक परिवर्तन माध्यमांच्या वाढत्या जाणिवेसाठी शिक्षणाने नेतृत्व केले. काही संशोधकांची भूमिका, विद्यार्थ्यांची सामाजिक पार्श्वभूमी, दुर्बल घटकांमधील शिक्षणाचे नेतृत्व केले. काही संशोधकांनी शिक्षकांची भूमिका, विद्यार्थ्यांची सामाजिक पार्श्वभूमी, दुर्बल घटकांमधील शिक्षणाचे प्रश्न इ. वर भर दिला. एम.एस. गोरे, सुमा चिटणीस व आय पी. देसाई यांचे या क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय राहिले. आर्थिक विकासात्मक अध्ययने सुद्धा केली आहेत. यामधील अध्ययनात आर्थिक विकासातील अभिजनांची भूमिका, समुदाय विकास कार्यक्रमातील भूमिका, आर्थिक विकासामधील प्रभावाचा सांस्कृतिक कल आणि इतर घटक सामाविष्ट आहेत.

गुन्हा, सामाजिक विचलन व बालगुन्हेगारी हे सुध्दा संशोधनाचे क्षेत्र राहिले आहे. शहरात वाढत जाणारी गुन्हेगारी प्रवत्ती, नैतिक व्यवस्थेचा ऱ्हास, शहरी तरूणामधील वाढती गुन्हेगारी इ. समाजशास्त्राज्ञांसाठी चिंतेचे विषय आहेत. कायद्याचे समाजशास्त्र, वैद्यकीय समाजशास्त्र अध्ययने आणि लिंगभाव अध्ययने अधिक महत्वपूर्ण संशोधन क्षेत्रे आहेत. यासंदर्भात डॉ.सुधा काळदाते, डॉ. शुभांगी गोटे यांचे संशोधन महत्त्वाचे राहिले आहे.

पारंपरिक लिंगभेदावर आधारित श्रमविभाजन, पितृसत्तेचे स्वरूप, पती—पत्नी संबंधातील कायदे व प्रथांचे पालन, वारसा हक्कांचे नियम, कर्मकांडीय भूमिका, पुरूष मुलांसाठीची पसंती, मुलांमुलींचे भेदमूलक सामाजीकरण, विवाहविषय सादरीकरण आणि हुंडा, स्त्रियांचे विभाजन व पृथकता, तसेच विविध व्यवसायातील स्त्रियांची कामाची स्थिती, विविध वांशिक व धार्मिक समूहांतील विभिन्नता, स्त्रियांविरोधी गुन्हे यासारख्या विषयात संशोधने हाताळली गेली. जागतिकीकरणाचा प्रभाव व माहिती तंत्रज्ञानासारख्या विषयात संशोधने राहिले. समाजशास्त्रातील संशोधनात हे एक विशाल क्षेत्र अंतर्भूत झाले. समाजशास्त्रातील संशोधनाचा विकास पुस्तक व विविध नियतकालिकमधील वाढीबरोबर नेहमीच वृद्धिंगत होत गेला. सर्वात जुने नियतकालिक श्डंद पद प्दकपंश हे १९२२ मध्ये सुरू झाले. ज्याच्यात शारीरिक व सांस्कृतिक मानवशास्त्रज्ञ तसेच समाजशास्त्रज्ञ यांनी विविधतापूर्ण लेखन केले. १९५१ पासून इंडियन सोशिऑलॉजिकल सोयसाटीने (Indian Sociological Society) समाजशास्त्रीय बुलेटिन (Sociological Bulletin) नावाची नियतकालिके सुरू केली.

**१९५० आणि १९६० च्या दशकातील संशोधनाचा विस्तार:—** स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये सुनियोजित विकास सुरू झाला आणि योजना आयोगाच्या स्थापनेमुळे समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्राच्या वृद्धी आणि विकासामध्ये महत्वपूर्ण बदल होण्यास सुरूवात झाली. राज्यांव्दारे गठित सुचनांची मागणी, त्यांच्या कार्यप्रणालीचे विश्लेषण आणि मूल्यमापनासाठी भारतामध्ये संशोधन आणि प्रशिक्षण संस्थांच्या संख्यात काही अधिक वृद्धी झाली. या काळात सरकारी संस्थाबरोबर विभिन्न संस्थांच्या व्यवस्थांच्या व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित लोकांची आवश्यकता भासू लागली. नियोजन आणि विकासाशी संबंधित सामाजिक विज्ञान संशोधनाच्या वित्तीय साहाय्यतेसाठी योजना आयोगाव्दारे एक संशोधन कार्यक्रम समितीचे स्थापना केली गेली. योजना आयोगामध्ये एक कार्यक्रम मूल्यांकन बोर्डाची निर्मिती केली गेली. प्रत्येक राज्यांमध्ये त्याच्या शाखा होण्याच्या कारणामध्ये समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञांसाठी रोजगाराचे सृजन केले गेले. या विकासाबरोबर इतर महत्वपूर्ण विकास झाले ज्यातून शिक्षित लोकांमध्ये नियोजनाची प्रक्रिया आणि सामाजिक विज्ञानाच्या प्रति जागरूकतेमध्ये वृद्धी झाली. याची पुष्टी १९६६ मध्ये योजना आयोगाच्या प्रशस्तीमधून दिसते ज्यातून भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषदेची (ICSSR) १९६९ मध्ये अस्तित्वात आली.

स्वतंत्र भारतामध्ये शिक्षित बुद्धिजीवी लोक आणि सरकारी अधिकारी तसेच नीति— निर्मात्यांमध्ये समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्राच्या प्रासंगकितेसंदर्भात वाढत्या जागरूकतेला विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) नवीन विभाग सुरू करणे अथवा विद्यापीठांमध्ये वर्तमान विभांचे विस्तार करण्यासाठी अनुदान दिले. डी. एन. धनागरे यांच्या मते, १९५० नंतर भारताच्या विद्यापीठामध्ये समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्राचे संस्थात्मक स्वरूप आणि विस्तार 'विकास' अनुभव केला जाऊ शकतो. विस्ताराला सुकर बनविण्यासाठी यू.जी.सी. या संस्थेने पंचवार्षिक अनुदानाच्या माध्यमातून भारताच्या विभिन्न विद्यापीठांत नवीन पदांची निर्मिती केली. विशेषत: १९५० च्या नंतर भारतीय समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्रावर ब्रिटनव्यतिरिक्त अमेरिकी ग्रामीण समाजशास्त्राचा प्रभाव दिसतो. त्याचे मुख्य कारण अमेरिकेबरोबरील वाढता संपर्क होता. यात मुख्यत्वे फोर्ड फाऊंडेशनची भुमिका महत्वपूर्ण होती. भारत सरकारव्दारे अमेरिकेची विचारप्रणाली आणि सामुदायिक विकासाच्या कार्यक्रमाला स्वीकार करणे हेही त्याचे एक कारण होते.

भारतामध्ये १९५१ आणि १९७० च्या दरम्यान फोर्ड फाऊंडेशनाला भारतीय योजनामधील समुदाय विकासाच्या विचारप्रणालीमध्ये परिवर्तन आणण्यामध्ये यशस्विता प्राप्त झाली. सामाजिक पुनर्निर्मितीचे एक महत्वपूर्ण साधन आणि विकासाची संस्था म्हणून त्याची महत्वपूर्ण भूमिका सरकारने स्वीकारली. डी. एन. धनागरे यांच्या मते, समुदाय विकासाच्या योजनेने भारतीय सामाजिक संशोधकांसाठी साधारणपणे आणि समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञांसाठी विशेष स्वरूपात रोजगाराची संधी निर्माण केली. भारतीय गावांच्या अध्ययनासाठी संशोधन योजना, गावांवरील समुदाय विकास कार्यक्रमाच्या प्रभावाचे अन्वेषण करणे आणि कार्यक्रमाप्रती त्याची प्रतिक्रिया ज्ञात करण्यासाठी ते अनुदान प्राप्त करू शकत होते. प्रशासकीय उद्देशाने सामुदायिक विकास कार्यक्रमाच्या प्रभावाचे आकलन आणि मूल्यांकन करण्यासाठी मोठया प्रमाणावर सर्वेक्षण केली गेली. त्यासाठी भारतीय समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञांना पश्चिमी आणि विशेष करून अमेरिकेमध्ये विकसित आधुनिक सर्वेक्षण संशोधन तंत्रे आणि साम्राज्यवादी सामाजिक विज्ञानाने परिचित होणे अनिवार्य होते. या गरजेला पूर्ण करण्यासाठी भारतामध्ये समाजशास्त्र आणि समाजिक मानवशास्त्राच्या अभ्यासक्रमामध्ये संशोधन आधारित तंत्रावर पाठयक्रम सुरू केले.

डी.एन. धनागरे यांच्या मते, मुख्यत: सरकारी संरक्षण आणि फोर्ड फाउंडेशनच्या उदारतेमुळे अनेक समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञांना या अध्ययन क्षेत्राकडे आकर्षित केले. १९६० आणि १९७० च्या दशकात मुंबई विद्यापीठ आणि सागर विद्यापीठ (मध्य प्रदेश) सोडून उर्वरित सर्व भारतीय विद्यापीठांत समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्रामध्ये पृथ्ककरणची प्रवृत्ती स्पष्ट रूपात दिसले. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (दिल्ली), नेहू (शिलॉग) आणि हैदराबाद नवीन केंद्रीय विद्यापीठाने समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्राचा संयुक्त विभाग स्थापन करण्याची परंपरा कायम ठेवली. दिल्ली विद्यापीठाने मात्र सुरूवातीपासून अजूनही समाजशास्त्र विभागाने मानवशास्त्रावर भर दिला.

**१९७० च्या दशकानंतरची काही प्रमुख संशोधने:—** १९७० च्या दशकामध्ये संशोधन आणि शिक्षण रूची आणि विशेषतेचा सतत विकास झाला आणि त्यात विविधता आली. एम.एस.ए. राव यांच्या मते १९६० च्या दशकामध्ये ग्रामीण समुदाय संशोधनाचा प्रमुख विषय होता; परंतु नंतर कृषक संबंध, भूमी—सुधारणा, कृषक, कृषि श्रामिक, अनुसूचित जाती आणि जमातीच्या समस्यांनी समाजशास्त्रज्ञ आणि सामाजिक मानवशास्त्रज्ञांचे लक्ष वेधले. या काळात कृषक अध्ययन आणि कृषी सामाजिक संरचना एक विशेष संशोधन अभिरूचीच्या स्वरूपात समोर आला. या अध्ययनाने पूर्वीच्या ग्रामीण समुदायाच्या अध्ययनाला बाजूला करून जती आणि ग्रामिण बंधुभावावर अधिक भर दिला; परंतु ग्रामीण अध्ययनाप्रति अजूनही काही समाजशास्त्राज्ञांचे आकर्षण कायम आहे.

शेतकरी चळवळींचे अध्ययन हे कृषी क्षेत्राशी जोडले होते. ज्याने काही समाजशास्त्रज्ञांचे लक्ष आकर्षित केले. या समाजशास्त्रज्ञांमध्ये धनागरे, रंगाराव, पी.एन. मुखर्जी, राजेंद्र सिंह आणि ए. आर. देसाई आहेत. ए.आर. देसाई यांनी भारतीय राष्ट्रीय चळवळ आणि त्याच्या सामाजिक पार्श्वभूमीवर केलेल्या अध्ययनामध्ये वर्गसंरचना आणि अस्तित्वात विरोधाभासाचे अध्ययन केले आहे. कृषक चळवळीशी संबंधित अध्ययने सामान्यपणे

सामाजिक चळवळीचा एक भाग होता. त्याच पार्श्वभूमीवर भारतातील दलित चळवळीकडे समाजशास्त्रज्ञांचे लक्ष वेधले गेले. त्यांनी चळवळीच्या अध्ययनाच्या संबंधाने सामाजिक दृष्टिकोनातून दलित पँथर, दलित चळवळ या संबंधाने डॉ.लता मुरुगकर, पी.जी. जोगदंड, गोपाळ गुरू यांची मौलिक संशोधने विचारात घेणे गरजेचे आहे. या व्यतिरिक्त समाजशास्त्रात औद्यौगिक समाजशास्त्र, शहरी समाजशास्त्र व सामाजिक स्तरीकरण या अनुषंगानेही संशोधने झालेली दिसून येतात.

१९७० च्या दशकात दुसऱ्या महत्वपूर्ण विषयाचे क्षेत्र सामाजिक स्तरीकरण होते या काळात मोठया संख्यामध्ये संशोधने प्रकाशित झाली. यात आंद्रे बेत्ते, योगेंद्र सिंह व व्हिक्टर डिसुजा यांचे प्रयत्न मोठे होते. विशिष्ट वर्गाची अनेक अध्ययने या काळात अस्तित्वात आली. सामाजिक स्तरीकरणाचे पाठयक्रम सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये जवळपास समाजशास्त्राच्या अध्यापनाचा भाग बनला. या काळात विशेषत: विकासाचे समाजशास्त्र, व्यवसायाचे समाजशास्त्र, संघटनाचे समाजशास्त्र, वैद्यकीय समाजशास्त्र आणि स्त्रियांचे समाजशास्त्र इ. अनेक नवीन विषयांची निर्मिती झाली.

डी. एन. धनागरे यांच्या मते १९५० नंतर समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्राच्या क्षेत्रामध्ये बदल होण्याबरोबरच सर्व संशोधन कार्याची निरंतरता अधिक विकसित झाली. नवीन प्रवृत्ती उदयास आली. यात जाती व स्तरीकरण,कुटुंब व आप्तसंबंध, धर्म व विधी ग्रामीण स्तरीकरण इ. प्रमुख विषय उदयास आले. हे सर्व विषय समाजशास्त्र अणि सामाजिक मानवशास्त्राचे प्रमुख्य केंद्रबिंदू होते. जाती आणि स्तरीकरण हे भारतीय समाजाचे संरचनात्मक वास्तव होते यातून समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञांना निरंतर आकर्षित केले. श्रीनिवास यांच्या जाती आणि धर्माशी संबंधित अध्ययनाने संरचनात्मक–प्रकार्यात्मक प्रवृत्तीलाच नाही तर भारताच्या गावांमधील जातिव्यवस्थेला अधोरेखित केले गेले. त्यांनी संस्कृतीकरण व पाश्चिमात्यीकरण सारख्या पैलूंमधून **प्रबळ जाती**ची संकल्पना ही गावांच्या शक्तीसंबंधाला आकलन करण्यासाठी संकल्पनात्मक साधन म्हणून विकसित केली. वाय. बी. दामले यांनी जाती गतिशीलतेच्या विश्लेषणासाठी संदर्भ समूहाच संकल्पनेवर भर दिला. आंद्रे बेत्ते यांनी तंजोर गावामधील जाती, वर्ग आणि शक्तीचे अध्ययन करण्यासाठी मॅक्स वेबर यांच्या वर्ग, दर्जा आणि शक्तीच्या संकल्पनांचा आधार घेतला.

फ्रान्सिसी समाजशास्त्रज्ञ लुई डयूमॉ यांनी संरचनात्मक पद्धतीचा अवलंब करून भारतामधील जातीचे अध्ययन केले त्यांनी १९७० च्या दशकात जाती अध्ययनाला पुन:निर्मित केले. त्यांनी हिंदू वेद आणि प्राचीन ग्रंथ, पुराणमध्ये वर्णन केलेल्या जाती विचारप्रणालीला अकलन करण्याच्या आवश्कतेवर भर दिला. त्यांनी भारताच्या जातिव्यवस्था आणि ग्रामीण सामाजिक संरचना अध्ययनासाठी भारततविद्या आणि संरचनात्मक दृष्टिकोनाचा अवलंब केला. जातिव्यवस्था आणि स्तरीकरणाच्या विभिन्न पैलूंनी समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञांचे लक्ष आकर्षित केले. भारतामध्ये राजकीय विकास,सामुदायीक विकास कार्यक्रमांचा प्रभाव, पंचायत राज व्यवस्था लोकशाही विकेंद्रीकरण आणि १९५० च्या दशकात अनेक इतर घटकांचे दूरगामी परिणाम समोर आले. भारतीय समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञ हे भारतीय समाज आणि ग्रामीण समाजिक संरचनेवरील या परिवर्तनाच्या प्रभावाच्या अध्ययनाने चिंतित होते. ग्रामीण समाजातील जाती आणि शक्ती संरचनावर केले गेलेल्या अध्ययनाने यात अधिक सुस्थिती निर्माण केली.

१९६० आणि १९७० च्या दशकांत ग्रामीण समाजशास्त्राच्या क्षेत्रामध्ये एका नवीन प्रवृत्तीचा विकास झाला. या नवीन प्रवत्तीने आणि अभिरूचीन स्वातंत्र्योत्तर भूमी–सुधारणेच्या उपायातून ग्रामीण सामाजिक संरचनेमध्ये झालेल्या मूलभूत परिर्वतनाकडे लक्ष वेधले. या नवीन प्रवृत्तीने कृषकांमध्ये वर्ग निर्मिती, विभिन्न ग्रामीण स्तरांमध्ये सामाजिक गतिशीलता आणि ग्रामीण समाजामध्ये नवीन विरोधाभास निर्मितीवर लक्ष केंद्रित केले. सूक्ष्म स्तरावरील या नवीन प्रवृत्तीने बृहत स्तरावर विश्लेषणात्मक कार्य केले.

१९७० ते १९८० च्या दशकानंतर काही संशोधने झाली. ती एकूण ग्रामीण समाजव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाच्या संदर्भात केलेली दिसून आली. जसे की, सुधा काळदाते यांनी औरंगाबाद शहरातील बालगुन्हेगार व न्यायव्यवस्था यावर हे संशोधन असून यासाठी प्रस्तूत संशोधकांने ३५५ बालगुन्हेगाराचे नमूने अभ्यासिले आहेत. डॉ. अनभुले आल. यांनी (१९८९) ग्रामीण समाज रचनेवर आकाशवाणीचा परिणाम प्रस्तुत प्रबंधात आकाशवाणीचा माध्यमातून सर्वसाधारण कार्यक्रम शेती व शेतकरी यावर कार्यक्रमाचा खूप बारकाईने अभ्यास केला आहे. खान मसूद अली (१९७९) औरंगाबाद शहरातील अंदाजे ३०० मुस्लिम कुटुंबाची प्रस्तुत प्रबंधात यादी असून या समाजात सामाजिक बदल झाला आहे अथवा होत आहे याचा संशोधकाने अभ्यास केल आहे. खेरडे, रमेश (१९८९) औरंगाबाद शहरातील आंतरजातीय विवाहीताची समाजशास्त्रीय पाहणी संशोधकांनी सुरूवातीची समाजव्यवस्था हिंदू विवाह संस्था, जात, भाषा, शिक्षण, कुंदबाची प्रतिक्रिया, यावर तर अभ्यास केला आहेच. यातून सामाजिक अतिक्रमण कसे होत आहे हे दाखविले आहे. जोशी जयंत वसंतराव (१९९०) ग्रामीण विकास योजना व प्रादेशिक ग्रामीण बँका हा संशोधकाचा विषय असून मराठवाडा ग्रामीण बॅकेवर संशोधन क्रेंद्रित केले आहे. जोशी, बी. एल. (१९७८) जायकवाडी धरणाचा ग्रामीण जनतेवर ठाम परिणाम झाला. या धरणामध्ये ज्यांची जमीनी व गावं गेलीत व नंतर त्यांना इतर ठिकाणी पर्यायी जागा दिल्यात त्यामुळे पूर्वीचे व आताचे जीवन यातील बदलाचा बारकाईने अभ्यास केला आहे. बिलावर आर.बी. (१९८४) औरंगाबाद शहरातील औद्योगिक भागात ज्या स्त्री कर्मचारी काम करीत आहेत त्यांचा गर्भक्षमता व कुटुंब नियोजन या अनुषंगाने अभ्यास केला आहे. राम वाघ (१९८४) यांनी ग्रामीण भागात शहरीकरण व औद्योगिकीकरणाचा परिणाम याचा अभ्यास केला आहे. सुरेश वाघमारे (१९८८) यांनी मराठवाड्यातील महार समाजाच्या परंपरा व आधुनिकता यावर हे संशोधन आहे. यात महार समाजाचा इतिहास, चळवळी, सामाजिक संबंध, त्यांच्या संघटना, शिक्षण, राखीव जागा, धर्मांतर वगैरे बाबीचे संशोधन केले आहे. यासाठी संशोधकाने राजमार्गावरील एक गाव व राजमार्गापासून खूप दूर असे गाव आहे याचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. सारांश रुपात ग्रामीण भाग प्रगतीशील होण्यास रेल्वेमार्ग व राजमार्गही साह्यभूत आहेत असे सूचित केले आहे.

**सारांश :–** स्वातंत्र्योत्तर भारतात समाजशास्त्राचा विकास अधिक विस्ताराने झाला. अनेक विद्यापीठातून समाजशास्त्राचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाला चालना मिळाली. प्रगत अध्ययन व संशोधनाचे केंद्र निर्माण केलीत. विद्यापीठामार्फत संशोधकांना संशोधनासाठी अर्थसहाय्य दिले जाऊ लागले. भारत सरकारने संशोधनासाठी आर्थिक तरतूद मोठ्या प्रमाणात केली. आज समाजशास्त्रामध्ये संशोधन विकसित होण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोन आणि पद्धतीशास्त्राच्या समाजशास्त्रीय संशोधनासाठी वापर केला. १९५० नंतर समाजशास्त्राच्या संशोधन क्षेत्रामध्ये बदल होण्याबरोबरच

सर्व संशोधन कार्याची निरंतरता अधिक विकसित झाली. ग्रामीण समाजशास्त्राच्या क्षेत्रामध्ये एक नवीन प्रवृत्तीचा विकास झाला. या नवीन प्रवृत्तीने आणि अभिरुचीने स्वातंत्र्योत्तर काळात भूमी सुधारणेच्या उपायांतून ग्रामीण सामाजिक संकल्पनेमध्ये झालेल्या मूलभूत परिवर्तनाकडे लक्ष वेधले. विशेषत: स्वातंत्र्योत्तर भारतात आजपावेतो समाजशास्त्रीय चिंतनास स्पष्ट अशी दिशा मिळालेली नाही. पाश्चात्त्य सिद्धांताच्या व पाश्चात्यांच्या विचारांतून भारतीय समाजव्यवस्थेचे आकलन व चिंतन करण्याची प्रवृत्ती गेलेली दिसून येत नाही. म्हणून भारतीय समाजशास्त्राचे अध्ययन अपेक्षित अशा विकासाकडे पोहोचू शकलेले नाही. कोल्हापूर विद्यापीठाने सुद्धा समाजशास्त्रीय विचार परंपरेमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. यामध्ये प्रामुख्याने डॉ.विलास संगवे, डॉ. एस.एन.पवार, डॉ. आंबेकर, डॉ.सर्जेराव साळुंखे, डॉ.राजेंद्र पाटील, डॉ.जगन कराडे आदींचा विशेष उल्लेख करता येईल नागपूर विद्यापीठाच्याद्वारे सुध्दा डॉ. पु.ल. भांडारकर, डॉ. प्रकाश बोबडे, डॉ. प्रदीप आगलावे यांच्यासह आदींचे महत्वपूर्ण योगदान आहे. औरंगाबाद येथील डॉ. सुधाताई काळदाते, डॉ. आर. बी. बिलावर, डॉ. विजय देशपांडे, डॉ. शंकर गायकवाड, डॉ. शुभांगी गोटे गव्हाणे यांच्यासह इत्यादी.

मुंबई विद्यापीठातील डॉ. बाळा भोसले, डॉ. प्रल्हाद जोगदंड, डॉ. पी. विवेक, डॉ. एस. एम. मायकेल आदी प्राध्यापकांचा समावेश होतो. पुणे विद्यापीठातील डॉ. गेल ऑम्वेट, डॉ. उत्तम भोईटे, डॉ. तारा पटेल, डॉ. शर्मिला रेगे, डॉ. विद्युत भागवत, डॉ. श्रुती तांबे यांनीही विशेष असे योगदान दिले आहे. याचबरोबर डॉ. गजेंद्रगड, डॉ. प्रभाकर द्राक्षे यांच्यासह असंख्य अभ्यासकांनी आपापल्या क्षमतेनुसार समाजशास्त्राच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भर टाकली व समाजशास्त्रीय विचार पुढे नेण्याचा प्रयत्न केला.

समाजशास्त्राच्या अध्ययन आणि अध्यापनाच्या विकासामध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे. अपवाद वगळता दरवर्षी एक विविध सामाजिक विषय घेऊन त्यानुसार विचारमंथन करणे सोबतच समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचे अंकही प्रसिद्ध करणे व समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न करणे यासारख्या अनेक बाबी मराठी समाजशास्त्र परिषदेने केले आहेत. अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेची दरवर्षी विविध विषयांवर आधारित अधिवेशने होतात व त्यातून समग्र विचार मंथन होते. वेगवेगळ्या विद्यापीठामध्ये ही अधिवेशन होत असल्यामुळे त्या त्या परिसरातील लोकजीवन समाजशास्त्राच्या अभ्यासकांना अभ्यासता येते. बहुसांस्कृतिक जीवनाचे ते प्रतिबिंब असते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्याद्वारे तसेच अखिल भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन याद्वारे विविध प्रकारचे प्रकल्प हाती घेतल्या जातात त्याचबरोबर विविध फेलोशिप दिल्या जातात. समाजशास्त्राच्या विकासाचा आढावा घेत असताना त्याची दुसरी बाजूही तपासणे गरजेचे आहे. समाजशास्त्राचा संशोधनात्मक पातळीवर दर्जा अपवाद वगळता खालावत असताना दिसून येतो. नोकरीतील पदोन्नतीसाठी पी.एच.डी. आवश्यक केल्यामुळे कसल्याही प्रकारचे संशोधन हाती घेऊन शोधप्रबंध सादर केला जातो. मूलभूत संशोधनाकडे व त्याच्या संशोधन पद्धतीकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जाते. अनेकांच्या शोधप्रबंधावर नजर टाकली तर हे आपल्या लक्षात येईल. चर्चा, वादविवाद, सुसंवादही सामाजिक शास्त्राच्या विकासासाठी महत्त्वाची बाब आहे मात्र व्यक्तीमधील अहंकार व आपमतलबीवृत्तीमुळे अशा बाबींची कमतरता जाणवते. त्यामुळे कुठे, कोणते, कशावर संशोधन चालले आहे याचा थांगपत्ता लागत नाही. खरेतर जीवनाचे क्षेत्र आज प्रचंड व्यापक व ताणतणावाचे झाले असताना त्यानुसार आपणही स्वत:मध्ये बदल केला पाहिजे.

नव्याचा शोध घेताना जुन्यापासून योग्य तो बोध घेणे महत्त्वाचे आहे. मजबूत विचारा शिवाय कोणतीही गोष्ट ख—या अर्थाने उभी राहू शकत नाही वा ती टिकत नाही म्हणून विविध सामाजिक प्रश्नात खोलवर उतरण्याची क्षमता आपल्यात आली पाहिजे सबंध जीवन कमालीचे अस्थिर झाल्याने माणूस आज संभ्रमावस्थेत आहे. या अशा पार्श्वभूमीवर समाजशास्त्राच्या अभ्यासकांपुढे विविध आव्हाने उभी आहेत. वर्तमान स्मार्ट तंत्रज्ञानाच्या युगात आपणही स्वत:मध्ये बदल करून घेणे गरजेचे आहे. ''हे मला जमणार नाही'' असे म्हणून आता चालणार नाही. स्मार्टफोन, व्हॉट्सएॅप, फेसबुक, इंस्टाग्राम आदी सामाजिक प्रसार माध्यमाद्वारे सामाजिक आंतरक्रियाचा वेग प्रचंड वाढतो आहे. अशावेळी विविध सामाजिक प्रश्नात चिंतनात खोलवर उतरण्याची क्षमता व व्यापकता आपल्या अंगी आणली पाहिजे वरवरचे वा थातूरमातूर केलेले संशोधन हे चिरकालीन टिकणारे नाही. पीएचडीच्या विद्यार्थ्यांची संख्या मार्गदर्शकाने वाढविण्याऐवजी मोजकेच परंतु चिंतनशील अभ्यासू व ज्ञानार्थी विद्यार्थी निर्माण केले तर ते मोठे योगदान समाजशास्त्राला देऊ शकतील. ज्ञानाच्या पातळीवर दखल घेण्याजोगी संशोधन माझ्या विद्यार्थ्यांने केले पाहिजे. हे संशोधन समाजाभिमुख असले पाहिजे. हा आग्रह पीएचडीच्या मार्गदर्शकाचा असला पाहिजे. विविध नियतकालिके, मासिके, नवे ग्रंथ यांच्या वाचनाबरोबरच इंग्रजीचे वाचनही वाढविले पाहिजे. इंग्रजी मजबूत असल्याशिवाय सामाजिक शास्त्रामध्ये आपल्याला प्रगती करता येणार नाही. इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली, सेमिनार, सोशल ॲक्शन, समाजप्रबोधन पत्रिका इत्यादी वैचारिक मासिकाचे सखोल वाचनही यासाठी प्राध्यापकांनी करायला हवे काळाची पाऊले ओळखून आपण वाटचाल केली नाही तर समाजशास्त्र कालसुसंगत होणार नाही व त्याची लोकप्रियताही वाढणार नाही असे वाटते. विस्तार भयास्तव प्रस्तुत लेखाची मांडणी नेमकी व काटेकोरपणे केली आहे.

# प्रा. शर्मिला रेगे यांचे समाजशास्त्रातील योगदान

**प्रा. संजयकुमार कांबळे,** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–७ भ्र. ९८८१५५९०४३

महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरच्याही परिवर्तनवादी ब सामाजिक बांधिलकी माणणाऱ्या दोन पिढयांवर प्रा. शर्मिला रेगे यांचा प्रभाव आहे. सभ्यता, नीतिमत्ता आणि चांगल्या शैक्षणिक संस्कृतीचे त्या प्रतिक होत्या. त्या विद्वान अभ्यासक, लेखक आणि शिक्षक म्हणून श्रेष्ठ आहेतच, पण अनेकांचे मित्र म्हणून त्यांनी पेरलेली मैत्री प्रत्येक स्नेह्यांच्या अंतस्थ श्रेष्ठ ठेवा आहे. स्वत:च्या वैचारिक जाणीवांशी प्रामाणिक राहून त्यानी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांसाठी समर्पित केले. तर्कशुद्ध विचार, नर्मविनोद, विनम्र स्वभाव, भूमिकेतील सच्चेपणा आणि कमालीचे सामंजस्य या गुणांनी परिपूर्ण असलेल्या रेगे मेडम दलितांसह दलितेत्तर समाजात प्रसिद्ध होत्या. त्यांच्याविषयीची आत्मियता हा अनेकांच्या अभिमान व समाधानाचा कायम विषय आहे.

**ज्ञानार्जन, अजित ज्ञानाचे नव्या अभ्यासातून वितरण व डाव्या चळवळीचे वैचारिककरण, पुनर्भरण** : विचार व लेखनासाठी मिळालेल्या अल्प कालावधीत त्यांनी ज्ञानाच्या क्षेत्रात माइलस्टोन ठरतील अशा ग्रंथांचे लेखन केले. विद्यार्थी दशेपासून संशोधनाचा पिंड असणाऱ्या शर्मिला रेगे यांनी १९८७ मध्ये समाजशास्त्रात एम. ए. पदवी संपादन केली. १९८९ मध्ये एम. फिल पदविकेसाठी लघुशोधनिबंध त्यांनी "Sati: A Sociological Analysis" या विषयावर लिहिला. १९८७ पासून त्यांनी लिंगभावाचे समाजशास्त्र आणि संस्कृतीचे समाजशास्त्र या विषयांतर्गत लेखन केली आहे. महाराष्ट्रातील लोकप्रिय संस्कृतींच्या अभ्यासाकडे त्यांचा ओढा होता. संस्कृती अभ्यासात नवीन दृष्टीकोनाचा विकास करण्याच्या हेतूने 'Histories from the below of the events in the Ambedkarite Calaender during the period 2001-2002: A report and audio-visual documentation of the Ambedkarite Countepublic in Maharashtra' या विषयावर अनुभवजन्य (emperical) अभ्यास करण्यासाठी सराई (Sarai) या दिल्लीतील संस्थेने संशोधन प्रकल्प मंजूर केला होता. या विषयावर त्या कोलकाता येथील साम्या प्रकाशनामार्फत 'Caste Identity and Public Sphere : Music and Print Cultures of the Ambedkarite Counter Publics,', या नावाने प्रकाशित होणार होते.

त्यांनी पीएच. डी. चे संशोधन नोव्हेंबर १९९० ते ऑगस्ट १९९४ या दरम्यान प्रा. डॉ. डी. एन. धनागरे या विचारवंत अभ्यासकाकडे पूर्ण केले. १९९५ ते १९९८ दरम्यान त्यांनी Researching and Documenting Popular Cultural Practices in Maharashtra – Lavani,' Tamasha,' Powada,' Satyashodhak and Ganesh Melas मराठीत समाज प्रबोधन पत्रिकेतून प्रकाशित झाले. या संशोधनावर पुणे विद्यापीठातील काही प्राध्यापकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले. परंतु हा एक महत्वाचा समाजशास्त्रीय अभ्यास लोकांपुढे येऊन सांस्कृतिक राजकारणाच्या अभ्यासाकडे लक्ष देण्याची आवश्यकता अधोरेखित झाली.

१९९५ मध्ये 'From Malestream Sociology to a Gender sensitive sociology' या विषयावर पीएच. डी. चा प्रबंध सादर करुन समाजशास्त्राची स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून चिकित्सा केली. त्यानंतर Sociology of Gender (empirical)2003),' writing caste,' writing Gender: Narrating Dalit Women's testimonios (empirical)2006) Education as a tritiya ratna towards Phule- Ambedkarite feminist Pedagogical practice (empirical) (2009) स्त्रीवाद जागतिक आणि स्थानिक द्वैतांच्या पलिकडे (२०११) लोकप्रिय संस्कृती व भारतातील आधुनिकता लिंगभाव परिप्रेक्षातून (२०१२) Against the madness of Manu: (empirical)B.R. Ambedkar's writings on Brahmanical patriarchy (empirical),' (२०१३), इ.स. २००३ मध्ये शर्मिला रेगे यांचे लिंगभावाचे समाजशास्त्र, स्त्रीवादी समाजशास्त्रीय ज्ञानाने दिलेले आव्हान, या नावाचे संपादित पुस्तक इंग्रजीमधून प्रसिद्ध झाले. भारतीय समाजशास्त्राला स्त्रीवादी विचारातून कसा शह दिला जात आहे याची अतिशय शिस्तशीर मांडणी या पुस्तकाच्या परिचयामध्ये शर्मिला रेगे यांनी केली आहे.

जात आणि लिंगभावाच्या अभ्यासाबाबत नविन संशोधन दृ ष्टीकोनासंदर्भात 'Developing Standpoint Epistemologies in India'– A Project theorising Dalit Feminist Standpoint (empirical) 1997-98) हे संशोधन प्रकाशित झाले. या संशोधनाचा महत्वाचा भाग विकल्प, सेमिनार आणि EPW मध्ये प्रकाशित झाले. काळा स्त्रीवादी भूमीदृष्टीतून अमेरिकेत बरेच अभ्यास करण्यात आले आहेत परंतु भारतात दलित स्त्रीवादी भूमीदृष्टीचा विचार शर्मिला रेगे यांच्या अगोदर कोणीही समाजशास्त्रीय संशोधनाच्या पातळीवर मांडलेला नव्हता. ते मांडण्याचे काम शर्मिला रेगे यांनी केले आहे. लिंगभाव विषयक संशोधनाचा ज्ञानशाखांच्या संस्था, संघटना आणि अध्यापनाच्या पातळीवर कोणता परिणाम झाला आहे याबाबत त्यांनी युजीसीचा 'The Classroom as a site of interrogation : A study of the teaching of sociology in seven universities in Maharashtra' या विषयावरील संशोधन प्रकल्प पूर्ण करुन तो समाज प्रबोधन पत्रिका या मराठी संशोधन नियतकालीकात प्रकाशित करण्यात आला होता. यामध्ये समाजशास्त्रात ज्यांना महत्त्वाचे संशोधन समजले जाते त्या घुर्ये, केतकर, श्रीनिवासन यांच्या संशोधनांची चिकित्सा करुन त्यांचा दृष्टीकोन हा उच्च जात वर्गाला पूरक कसा होता ते मांडले. त्याचसोबत गेल्या पन्नास वर्षात प्रकाशित झालेल्या "Indian Sociological Society" च्या नियतकालीकांचा लिंगभाव संवेदनशील दृष्टीकोनातूनच 'Sociology of Gender (empirical)Sage,' 2003) या पुस्तकाची पार्श्वभूमी तयार झाली होती.

गुजरातमध्ये २००२ च्या काळात हिंदु–मुस्लिम संघर्षाला तेथील राज्यव्यवस्थेकडून चालना मिळाली. स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात या दंग्यांमध्ये बळी गेला. याचा अभ्यास शर्मिला रेगे यांनी 'Gender and Communal Riots' या विकास अध्ययन केंद्र, मुंबई या संशोधन संस्थेने या प्रकल्पाला मदत केली आणि प्रकाशन सुद्धा केले होते.

**प्रा. शर्मिला रेगे यांचे समाजशास्त्रीय योगदान:–** समाजशास्त्र नावाची ज्ञानशाखा १९६० आणि १९७० या दशकांमध्ये स्त्रीवादी चौकटी आणि अभ्यास यामुळे कशी बदलली हे सांगताना रेगे यांनी जागतिक पातळीवर स्त्रीवादी प्रबोधन कसे घडले याची मांडणी केलेली दिसते. प्रस्थापित समाजशास्त्राची ज्ञानशाखा, समाजविज्ञानाचे खुले होणे या गोष्टीकडे कशाप्रकारे पाहत होती आणि स्त्री अभ्यासाकडे स्त्रियांनी, स्त्रियांसाठी, स्त्रियांपुरते केलेले ज्ञान एवढयाच चोकटीत कसे गोठवून टाकत होते, हे डॉ. रेगे यांनी दाखवून दिले. आधीच्या अहवालांचा स्वत:च्या पद्धतीने आढावा घेऊन, दलित आणि स्त्रीवादी चळवळ आणि चळवळीतून आलेले ज्ञान समाजशास्त्रीय ज्ञानाच्या दरवाजावर कसे धडका देत होते याचे

मार्गदर्शन त्यांनी केले आहे. शर्मिला रेगे म्हणत की, आपल्या समाजाचा विचार व तद्नुरुप कृती करावयाची झाल्यास जात, वर्ग आणि लिंगभावाचे संदर्भ विसरुन चालणार नाही. पुणे विद्यापीठातील समाजशास्त्र आणि स्त्री अभ्यासाच्या विद्यार्थ्यांना शिकविताना त्यांनी सिद्धांत, संकल्पना आणि विश्लेषणाकडे पाहण्याची जागृत दृष्टी दिली आणि विश्लेषण करीत असताना बाजू घेण्याचे आवाहन केले. इतर विद्यापीठ आणि महाविद्यालयातील संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञानाचा, व्यासंगाचा, मार्गदर्शनाचा नेहमीच फायदा झालेला आहे. समाजातील गुंतागुत, कोणत्याही प्रश्नाची व्यमिश्रता आणि वास्तवाचे विविधांगी पैलू हे नजरेआड केले जाऊ नयेत असा त्यांचा आग्रह असे. भुमिका घेताना व्यक्तींना वा संघटनांना ठामपणा लागतो तो असलाच पाहिजे पण याचा अर्थ ठोकळेबाज भूमिका घेणे असा होता कामा नये असे ते आग्रहाने मांडत.

शर्मिला रेगे यांच्या संशोधनाचे समाजशास्त्रीय वैशिष्टे शोधतांना भारतातील समाजशास्त्राच्या विकासाचे सखोल मुल्यमापन आणि विश्लेषण आपोआपच होते. वसाहतीच्या काळात, देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांना स्थानिक प्रतिसाद म्हणून भारतात समाजशास्त्र हळूहळू उदयाला आले. वसाहत राज्यकर्त्यांनी मात्र त्यास प्रशासकीय पुरवणी म्हणून कामकाजात रोवले होते. जेव्हा आपल्या सांस्कृतिक विद्वानांनी आपला देश आणि राष्ट्रीयत्व, लोकसंख्या आणि तिची वैशिष्टे याबाबतच्या ब्रिटीश आकलनावर टीका केली तेव्हा समाजशास्त्राचा भारतात उदय झाला.

भारतीय समाजाला त्याच्या व्यामिश्रतेसह, गुंतागुंतीसह समजून घ्यावे लागते. तर समाजशास्त्राच्या विद्याशाखेस आखून दिलेले क्षेत्र नसते आणि म्हणून ती समाजाचे समग्र स्वरुपात आणि एकमेकांशी संबंध असलेल्या विविध समाजाच्या भागांचे किंवा संस्थांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करते. भारतीय समाज ही जटील आणि वैविध्य असलेली संस्था आहे. तरी सुध्दा ती समग्र स्वरुपात कार्यरत आहे. तसेच त्यांचे समाजातील भाग परस्परसंबंधित आहेत. समकालीन भारतात सामाजिकशास्त्रे आणि सामाजिक शास्त्रज्ञांची भूमिका काय असायला हवी याची चर्चा होत असते. मुलभूतरित्या बोलायचे तर सामाजिक शास्त्रज्ञांची समाजाप्रती असलेली जबाबदारी आणि सामाजिक शास्त्राप्रती असलेली जबाबदारी यात काही संघर्ष नाही. खरेतर, जर सामाजिक शास्त्रज्ञ हे समाजाने आणि त्यांच्या जमान्याने त्यांच्या समोर उभ्या केलेल्या समस्यांना प्रतिसाद देणारे नसतील तर कोणतेही अस्सल सामाजिक शास्त्र उदयाला येऊ शकणार नाही. किंवा आजपर्यंत उदयाला आले नाही. आधुनिक काळात आपण भारतीय समाजातील संरचनेचे तीन टप्पे, म्हणजेच, भारतात ब्रिटिश वसाहतवादी राजवटीची स्थापना आणि एत्तदेशीय राजवटींचे विखंडन, राष्ट्रीयत्वाच्या जाणीवेचा आणि वसाहतविरोधी संघर्षाचा उदय, स्वातंत्र्य मिळणे आणि त्या पाठोपाठ राष्ट्र उभारणी व सामाजिक पुनर्बांधणीसाठी प्रेरणा हे सहज ओळखू शकतो. (योगेंद्र सिंह, सोशिओलॉजिकल बुलेटीन, अंक २२ (१)) भारतातील समाजशास्त्राचा इतिहास हा या प्रकारे, भारताच्या इतिहासाशी अगदी जवळून जोडलेला होता.

भारतातील समाजशास्त्र समाजशास्त्रांच्या व्यावसायिक कामांशी संबंधित आहे. तर देशातील आधुनिकतेचा आणि भारताच्या समाजशास्त्रावरील चर्चेचा संबंध मात्र भारतीय समाजाच्या अभ्यासाचे जे मार्ग आहेत त्यांच्याशी स्थळ आणि काळाचा भाग म्हणून संबंधित आहे. भारताकरीता असलेल्या समाजशास्त्राबाबत, भारतीय सामाजिक वास्तवाचा अभ्यास करण्यास अनुरुप असणारा संकल्पना आणि सिध्दांताचा एक संच गृहीत धरण्यातून असा प्रयत्न होताना दिसतो.

काही समाजशास्त्रज्ञ जे भारताकडे एक वैशिष्टयपूर्ण समाज, संस्कृती किंवा शिष्ट समाज म्हणून पाहतात त्यायोगे ते भारतीय समाजाच्या वैशिष्टयपूर्णतेवर लक्ष केंद्रीत करण्याच्या गरजेवर जोर देत असतात. त्यालाच अनुसरुन, भारतीय समाजाचा एका पूर्णरुपात अभ्यास करणे गरजेचे असल्याचा युक्तीवाद करतात. त्यामुळे भारतविद्या आणि प्राचीन इतिहास यातून भारताच्या पुरातन भुतकाळाच्या खोलात शिरणे अपरिहार्य ठरते असे परंपरावादी समाजशास्त्रज्ञांना वाटते. परंपरावादी, राष्ट्रवादी, एत्तदेशीय, विश्वबंधुत्वतावादी आणि मुलगामी विचारप्रवाहातील समाजशास्त्रज्ञानी भारतीय समाजाच्या अभ्यासाच्या वेगवेगळया कप्पेबंद हेतू लक्षात घेऊन मांडणी केली. भारतात (तसे तर कोठेही) समाजशास्त्र विकसित का होऊ शकले नाही याचे एक कारण मुख्यत्वे प्राचीन अथवा समकालीन ग्रंथांच्या विश्लेषणावर आधारलेले आहे. परंतु भूतकाळाच्या आकलनासाठी समाजशास्त्रज्ञास कितपत आस्था आहे, हे वर्तमानकाळ समजून घेण्यात त्याला किती रस आहे. यावर अवलंबून असते आणि इतिहासाचा जो चिकित्सक भाग आहे. त्यात त्याने काही कमी जास्त नाही तर जेवढा अपेक्षित आहे. तेवढा रस घेणे आवश्यक आहे. भारतीय समाजशास्त्र हे प्रामुख्याने पाश्चात्य सिध्दांत आणि संकल्पनांच्या प्रभावात वाढले. त्याला प्रतिसाद देताना हिंदुत्ववादाच्या प्रभावात त्याची मांडणी करण्यात आली. परंतु प्रा. शर्मिला रेगे यांनी तळाकडून समाजशास्त्राची मांडणी केली. म्हणून शर्मिला रेगे यांची मांडणी वास्तविक समाजशास्त्र ठरते. अभिजनवादी समाजशास्त्राला आव्हान देऊन केलेली मांडणी पुढे स्त्रीवादी चळवळ व इतर शोषितांच्या चळवळी गतीमान करण्यासाठी उपयोगी ठरली.

गेल ऑम्व्हेट, उमा चक्रवर्ती, व्ही. गीथा, गोपाळ गुरु, उमेश बगाडे इ. संशोधक प्राध्यापकांचे संशोधन हे ज्या प्रकारे आंतरविद्याशाखीय राहीले त्या प्रमाणे शर्मिला रेगे यांचे साहित्य राहिल्याचे दिसते. त्यांचे एम .ए., एम. फिल., पीएच. डी. हे समाजशास्त्राची चिकित्सा हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्टे दिसते. त्यांनी व्दैताच्या पलिकडे विचार करुन संशोधन केल्यामुळे इतर समाजशास्त्रज्ञांपेक्षा त्यांचे संशोधन वेगळे ठरते. परंतु व्दैताच्या पलिकडे जाताना शोषणाचा अंत करणे हे त्यांचे उदिष्ट होते.

आपल्या देशात समाजशास्त्रीय सिध्दांताचा विकास न होण्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे, तर्कशुध्द युक्तीवादाच्या साहाय्याने ज्यावर प्रक्रिया केली जाऊ शकेल अशा भारतीय परिस्थितीवरील पुरेशा शास्त्रशुध्द माहितीची कमतरता हे आहे. अशी माहिती आपणास भारतीय सामाजिक घटनांबाबत सुयोग्य अंतर्दृष्टी प्रात करुन घेण्यात उपयुक्त ठरली असती. दुसरी बाब म्हणजे विभिन्न स्त्रोतांतून एकत्रित करता येईल अशा दुय्यम माहितीची दखल घेण्याची आपण पर्वा केली नाही. पण या सगळयांना शर्मिला रेगे अपवाद असल्याचे दिसतात. शर्मिला रेगे यांनी दलित आणि शोषितांच्या चळवळीच्या ऐतिहासिक व प्राथमिक आणि दुय्यम साधानांचा वापर करुन समाजशास्त्रीय संशोधन केल्याचे दिसते. यामधून समाजशास्त्राला सामाजिकशास्त्रात क्रांती करु शकणारा एक गंभीर विषय म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न केला. भारतातील परिघाबाहेर टाकलेले गट आणि विषमता याविषयी जे अभ्यास झाले त्याला चालना देण्याचे काम सबाल्टर्न चौकटीत झालेल्या विचाराने केले. विशेषत: भारतीय समाजात सततच असणारा तणाव आणि संघर्ष समजण्यासाठी जे दडपले गेलेले वर्ग आहेत, जे गरीब आणि शोषित आहेत त्यांचे प्रस्थापित, सामाजिक व्यवस्थेबद्दलचे भ्रमनिरास कोणते आहेत, याविषयी या अभ्यासातून विचार झाला. या दृष्टीकोनाने संरचनात्मक कार्यवादी दृष्टीकोनाला मोडीत काढले.

भारतीय समाजाचा अभ्यास आणखी एका चौकटीत केला गेला, तो म्हणजे मार्क्सवादी परिप्रेक्ष्य मार्क्सवादात सामाजिक संस्थांचे आकलन आणि विश्लेषण दडपलेल्या, गुलाम केलेल्या आणि शोषित वर्गाच्या दृष्टीने केले गेले. या परिप्रेक्ष्याने जात, वर्ग आणि जमीन मालकी संबंधातील संबंध, तसेच उत्पादन पध्दतीचे स्वरुप आणि कामगाराच्या वर्गीय चळवळी, तसेच शेतकरी समाज आणि कष्टकरी वर्ग यांचे संबंध याबद्दल उत्कृष्ठ विवेचन केले आहे. असे असले तरी या परिप्रेक्ष्याचेही पाय भविष्यातील घडामोडींचे अंदाज वर्तवताना डळमळतात. म्हणजे जुन्या सामाजिक आणि आर्थिक संरचना कोलमडून पडतील आणि आधुनिक तंत्रज्ञान, नव्या संस्था आणि पुरोगामी कायदा या सगळयांच्या वजनामुळे जात समाजसुध्दा वर्ग समाज होईल असे ते मांडतात.

परंतु भारतीय समाजातील वास्तब बहुविध अस्मिता आणि बहुविध मार्गाने होणाऱ्या दुय्यमत्वाच्या प्रक्रिया आणि दडपणुकीने बनलेले आहे. भारतीय समाजात दलित स्त्री ही बहुविध शोषिततेचे अभिजात उदाहरण आहे. एकीकडे दलित स्त्री म्हणूनही दडपली जाते आणि त्याचवेळी तिचे सोसणे आणि दु:ख ती दलित जातीतील असल्यामुळे अधिकच संमिश्रही होते. सामाजिकदृष्टया कनिष्ठ स्थानावर असल्याने तसेच आर्थिक परावलंबन आणि लिंगभावरचना यातून अशा स्त्रीयांची बहुविध स्वरुपात शोषणाची प्रक्रिया घडते. भारतामध्ये सामाजिक चौकटीत वगळले जाणे याची चर्चा आणि विवाद दोन पातळयांवर केळे जातात. १) सामाजिक शास्त्राचे चर्चाविश्व आणि २) प्रशासकीय आणि विकासविषयक धोरणांच्या क्षेत्रांमध्ये सामाजिकशास्त्राच्या चर्चाविश्वामध्ये ही शब्दसंहिता उतरंडीच्या आणि स्तरीकरण झालेल्या भारतीय समाजाची गतीशीळता आकलन करण्यासाठी केली जाते. तसेच भारतासारख्या समाजामध्ये सामाजिक संबंधसुध्दा उतरंडीच्या तत्वांच्या संचाने बांधले जातात आणि विषमता घडविणाऱ्या सामाजिक आणि सांस्कृतिक आदर्श, मूल्ये आणि व्यवहार यांच्या आधाराने केले जातात. म्हणजे पिढयानपिढया असे वगळले जाणे हे जणूकाही देवदत्त चालूच राहातात असे मानले जाते.

पाश्चात्य समाजाच्या अनुभवांमध्ये जेंव्हा सामाजिक वगळले जाणे या प्रक्रियेकडे पाहिले जाते तेंव्हा व्यक्ती आणि समाज या दोहोंच्या सामाजिक संबंधांमध्ये येणारी खंडितता असे तरी पाहिले जाते किंवा एखाद्या क्षेत्रामध्ये जेंव्हा सामाजिक क्षेत्र आणि त्यांच्या नियमांचे अयोग्य असे उपयोजन केले जाणे किंवा मुक्त संचारासाठी आणि भिन्न क्षेत्रांचा मधील विनिमयाच्या दृष्टीने अडथळा असे पाहिले जाते. परंतु पाशचिमात्यांपेक्षा भारतातील सामाजिक वगळले जाण्याची समस्या ही अधिक स्वातंत्र्याला नकार, स्वातंत्र्य, समता, संसाधने आणि संधी यांच्या समान वाटपाला नकार, अशा स्वरुपात असते. म्हणजे पाश्चिमात्य समाजामध्ये सामाजिक वगळले जाणे हे समाजाच्या एकात्मतेच्या उत्तरकाळात घडलेली घटना असते. पाश्चिमात्य जगात वगळले जाणे ही कमी–अधिक प्रमाणात मूळ प्रवाहापासून विचलित होणे, अनियमित आणि काही काळापुरती असते. तर भारतामध्ये मोठया प्रमाणात संरचनात्मक, कर्मठ आणि धोरणच्या चौकटीत हस्तक्षेप करण्यास दुर्लभ असे असते. सामाजिक वगळले जाण्याची प्रक्रिया कर्मठ ठरते कारण मानवी जीवनाची रचनाच अशा समाजात उतरंडीची केली जाते आणि या उतरंडीतूनच सामाजिक, सांस्कृतिक व्यवहार, निष्ठा आणि मूल्ये ठरत असतात.

प्रा. शर्मिला रेगे यांनी मुक्तीच्या भाषेत, मुक्तीसाठी वैश्विक भाषा वापरली आणि आधुनिक काळाच्या दृष्टीने सर्व माणसांना नैसर्गिक न्याय, समता आणि संरक्षण मिळाले पाहिजे असा आग्रह धरला. दलितांची जोरकस मांडणी आणि चळवळ आता स्वतंत्र अस्मितेची मागणी करत राजकारणामध्ये, शैक्षणिक क्षेत्रात, कलेमध्ये आणि अगदी व्यवसाय, अर्थव्यवस्था यामध्येही दिसते. या नव्या चळवळीच्या सामाजिक पायापाशी उदयाला येणारे शिक्षित आणि दलित तरुण वेगवेगळया विद्यापीठांत दिसत आहेत. त्यांना शर्मिला रेगे यांचे साहित्य प्रेरक ठरु शकते. समाजशास्त्राच्या अभ्यासांमध्ये जात हा प्रश्न आवडीचा विषय म्हणून हाताळला गेला असला तरी, जातिव्यवस्थेवरचे सिध्दांतन मात्र त्यातून विकसित झाले नाही. आणि याचे कारण असे आहे की, समाजशास्त्र चौकटीत जो अभ्यास झाला, त्या अभ्यासाचा सांधा आर्थिक, राजकीय वास्तवापासून आणि जातीव्यवस्थेच्या विचारप्रणालीपासून निखळलेला होता.

लुई डयूमाँ यांनी होमो हायरॅकिकस या आपल्या अत्यंत प्रभावी समाजशास्त्रीय अभ्यासातून जातीव्यवस्थेवर मांडणी केली आहे. या पुस्तकाने खूप मोठया प्रमाणात विविध अभ्यासकांना चालना दिली. शुध्दता आणि अशुध्दता या दोन मुद्यांच्या आधारे त्यांनी जातीचे विश्लेषण केले. डयूमाँसारख्या समाजशास्त्रज्ञांची चिकित्सा करुन जातीविषयक नवीन सैध्दांतिक विश्लेषण करण्याचे श्रेय समाजशास्त्रात शर्मिला रेगे यांना जाते.

शर्मिला रेगे म्हणतात स्त्रीवाद्यांनी डॉ. आंबेडकरांच्या राजकीय योगदानाकडे आपल्या सोयीनुसार निवड करुन, मांडून स्त्रीवादी नकाराची विसंगती स्पष्ट होते. आणि अतिशय चुकीच्या पध्दतीने खाजगी, क्षेत्राकडे पाहणे घडते. दुसरे असे की, सार्वजनिक आणि खाजगी या क्षेत्रांच्या बद्दल असणाऱ्या भिन्न अर्थांची चर्चासुध्दा खुली करणे महत्वाचे आहे. आंबेडकरी चळवळीने ज्या प्रकारे घरदार आणि समाज यांचे अवकाश मांडले आणि त्यातून अधिक मुक्तीदायी अशी आधुनिक भारताची कल्पना केली ते पाहणे महत्वाचे आहे. प्रा. शर्मिला रेगे यांचे समाजशास्त्रीय विचार पाहताना लिंगभावाचे समाजशास्त्र, स्त्रीवाद, जागतिक आणि स्थानिक व्दैताच्या पलिकडे, मॅडनेस ऑफ मनू या त्यांच्या ग्रंथांचा विचार करावा लागतो. तसेच त्यांनी अनेक महत्वाच्या नियतकालीकातील लेखनावेध घ्यावा लागतो. या सगळयांतून त्यांनी समाजशास्त्र आणि स्त्रीअभ्यास या ज्ञानशाखांना दिशा देण्याचा प्रयत्न केला. शर्मिला रेगे यांनी केवळ भारतातील जात आणि लिंगभावाचा विचार न करता काळा स्त्रीवादविषयक सत्यशोधक नियतकालिकात एक प्रदीर्घ लेखमाला लिहिली त्याचे नंतर पुस्तिकेत रुपांतर झाले. या साहित्यातून Black feminist standpoint. वरुन (दलित फेमिनिस्ट स्टँडपॉइंड) दलित स्त्रीवादी भूमीदृष्टीचा सिध्दांत विकसित केला. दलित फेमिनिस्ट स्टँडपॉइंड मांडताना पर्यावरणवादी स्त्रीवाद्यांची चिकित्सा केली. यात त्यांनी शोषिततेचा अनुभव, सामाजिक स्थान आणि दर्जा यांच्यातून निर्माण होणाऱ्या सिध्दांतनाचा वेध घेतला. तर Writing caste,' writing gender संपादकीय मांडणी करताना दलित स्त्रीयांची स्वकथने ही सामाजिक शोषणाचा साक्षवजा दस्ताऐवज असल्याचे दाखवितात. दलित चळवळ आणि स्त्रीवादी चळवळीचा वेध घेताना चळवळीतून निर्माण झालेल्या साहित्याचा विचाराची नोंद शर्मिला रेगे यांनी घेतल्याचे दिसते. या पध्दतीची मांडणी करताना सामाजिक आणि मानव्य शास्त्रातील ज्ञानशाखांना स्पर्श करताना शर्मिला रेगे यांचे साहित्य आंतरविद्याशाखीय पध्दतीने विकसित होताना दिसते.

प्रा. शर्मिला रेगे या अशा अभ्यासक आहेत ज्यांच्या संशोधनातून जात आणि पुरुषसत्तेतील आंतरसंबंध स्पष्ट करताना भारतातील समाजशास्त्र आणि स्त्री अभ्यासाला दिशा देण्याचे काम केले. सामाजिक चळवळीचा इतिहास आणि राजकारण विशेषत:

जातीअंताच्या संघर्षाला अधोरेखित करीत समाजशास्त्रीय मांडणी करण्याचे श्रेय शर्मिला रेगे यांना जाते.

शर्मिला रेगे यांचा 'Institutional Alliance between sociology and gender studies' : story of the crocodile and monkey 'Economic and political weekly' मधील लेख हा प्रामुख्याने 'Recasting sociology : The changing contours of the Discipline ; (empirical) 1997) या राष्ट्रीय चर्चासत्रात प्रस्तुत केलेला शोधनिबंध आहे. या शोधनिबंधाची सुरुवात शर्मिला रेगे यांनी पंचतंत्रातील मगर (Crocodile) आणि माकडाच्या गोष्टीपासून केली आहे. यामधून समाजशास्त्र हा विषय थकलेली ज्ञानशाखा झाला आहे. तर स्त्री अभ्यास ही एक गतीमान ज्ञानशाखा म्हणून उदयास आली आहे. १९८० च्या दशकातील समाजशास्त्रात स्त्रीवादी साहित्य आणि स्त्रीयांची चळवळीचा परिचय विद्यार्थ्यांना करुन देण्यात आला. यामधून सामाजिकशास्त्राला राजकीयदृष्टया जागृत करण्याच्या शक्यता निर्माण झाल्या. परतु त्याचसोबत स्त्री अभ्यासाला समाजशास्त्रात समाविष्ट करुन घ्यायचे की ती एक स्वायत्त ज्ञानशाखा आहे. याविषयीचे वादविवाद झाले. शर्मिला रेगे याबाबत मार्सिया वेस्टकॉट यांचा संदर्भ देताना म्हणतात की the personal struggle of being both an insider and an outsider is not only a source of knowledge and insight but also a source of self criticism.

शर्मिला रेगे म्हणतात, की स्त्रीवाद्यांनी प्रमुख प्रवाही, समाजशास्त्रात केलेली हस्तक्षेप, आशय ज्ञानमिमांसा आणि पध्दतीची चिकित्सा ही नव्या दिशा दर्शविणारी होती. कारण समाजशास्त्राने वस्तूनिष्ठ आणि मुल्यनिरपेक्ष समाजशास्त्राला महत्व दिले होते.

यानंतर रेगे यांनी समाजशास्त्रातील अध्यापन आणि संशोधनातील crisis ला अधोरेखित केले आहे. समाजशास्त्रीय समुदायाचा सामुदायिक अपरिणामकारकत्वाला कारणीभूत घटकांचा वेध घेताना त्या म्हणतात की १९८० च्या दशकातील गटबाजी, सांप्रदायीकता, जातीयवाद सारख्या प्रमुख सामाजिक प्रश्नावर भूमिका घेतली नसल्याचा परिणाम असल्याचे अधोरेखित करतात. लोकांना समाजशास्त्रातील पदवी ही एक 'soft partime option' वाटतो. त्यासोबत पूर्णवेळ रोजगारपण मिळू शकतो म्हणजेच peculiar enrollment pattern, upcoming colleges' both in urban and mofussil areas' , receiving partial grants do not give priority to sociology इ. सोबत इतर अनेक कारणांचा उल्लेख शर्मिला रेगे यांनी केला आहे. शेवटी समाजशास्त्राची अब्राम्हणी संकल्पना, फुले–आंबेडकरी विचारांचे महत्व समाजशास्त्राला लक्षात घ्यावे लागेल असे त्या म्हणतात. 'Feminist pedagory and sociology for emancipation in India. या १९९५ साली Sociological Bulletin मधील लेखात शर्मिला रेगे स्त्रीवादी अध्ययन पध्दती conscious praxis in the class room ला महत्व देते असे सांगून 'pedagogy of the oppressed' या ग्रंथाचा उल्लेख करतात. पहिल्या भागात स्त्रीवादी अध्यापनपध्दतीची संकल्पना आणि परस्परसंबंधीत छळवणुकीची चर्चा करण्यात आली. तर दुसऱ्या भागात भारतातील समाजशास्त्रातील चर्चाविश्वाचा आढावा घेतला आहे.

स्त्रीवादी अध्यापनशास्त्राचे खाजगी आणि सार्वजनिक, विवेक आणि भावना यातील फरक करण्याच्या लोकप्रिय आकलनाला छेद देताना व्यक्तीगत अनुभव ही सुध्दा बौध्दीक कृती असल्याचे सांगून तीला अधिमान्यता दिले. शर्मिला रेगे यांनी स्त्रीवादी पध्दतीशास्त्राविषयक कोणकोणते अभ्यास आजपर्यंत झाले आहेत. याचा वेध घेऊन स्त्रीवादी अध्यापन पध्दतीशास्त्राने ज्ञानाची निर्मिती कशाप्रकारे केली जाते, ती कोणासाठी केली जाते, ती कोण करते आणि ती करण्याचा हेतू काय असतो याचा सखोल विचार केला आहे. शर्मिला रेगे म्हणतात की, Feminist pedagogical practices pose a major challenge to the weariness that is manifest in the discipline and could be a step in indigenizing, decentralizing and revitalizing sociological discource.

'Histories from the borderlands' हा लेख शर्मिला रेगे चा सेमिनार या नियतकालीकात प्रकाशित झाला होता. त्या म्हणतात, Academic borderlands are the territories that lie between the academy and activism, sociology and gender studies, metropolitanism and regionalism, disciplinary boundaries and identities and interdisciplinary capacities. The 'borderlands' are themselves no doubt a contested zone, co-inhabited as they are by people of different castes, classes, languages, ethnicities sexualities and politics more importantly, in the academy, these socially contested borderlands are epistemological borderlands' constituting the interface between different claims to knowledge.

शर्मिला रेगे यांनी वेगवेगळया कालखंडात समाजशास्त्रात कोणकोणते विचारप्रवाह, प्रश्न आणि संकल्पनांचा प्रभाव राहीला याचा वेध घेतला आहे. या सगळयात स्त्रीवाद्यांनी समाजशास्त्राची केलेली चिकित्सा दुर्लक्षित साहित्याचे दिसते असे म्हटले आहे.

शर्मिला रेगे यांच्या एकूण संशोधनातून समाजशास्त्राचा paradigm shift करण्याचा प्रयत्न केला. शोषितांचे आवाज मुख्यप्रवाही, केले. समाजशास्त्रात नवीन अवकाश निर्माण करण्याचे श्रेय शर्मिला रेगे यांना जाते. मुक्तीदायी ज्ञानावर आधारित राजकारण करण्याला शर्मिला रेगे यांनी महत्व दिले. त्यांनी ज्ञानासाठी ज्ञानापेक्षा परिवर्तनासाठी ज्ञानाला महत्व दिले. बाबासाहेबांचा शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे आणि शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा विचार शैक्षणिक क्षेत्रातून पुढे मांडण्याचा प्रयत्न केला. शर्मिला रेगे यांचे अगेन्स्ट द मेडनेस ओफ मनू असे पुस्तक खरे तर यापूर्वीच यायला हवे होते. आंबेडकरांचे विचार त्यांची ऐतिहासिकता व समकालीनता, त्यांच्या विचारांतून दिसणारी दिशा यांचे प्राथमिक दिग्दर्शन या पुस्तकातून होते. शर्मिला रेगे म्हणतात त्याप्रमाणे दलित स्त्रीवाद, दलित चळवळीतील कार्यकर्ते आणि दलितेत्तर स्त्रीवाद यांना एकत्र आणणारी भूमी ही आंबेडकरांच्या सिध्दांतनाची आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील दोन महत्वाच्या मुद्दयांचा उल्लेख करण्यासाठी त्यांचे म्हणणे उद्धृत करतो. त्या म्हणतात, ''आपल्या राजकीय भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील (ही उदाहरणे) स्त्रियांचे हक्क आणि दलित जातींचे हक्क यांच्यात इतिहासातून प्रस्थापित केला गेलेला विरोध समोर आणतात. त्यातून भारतातील जात आणि लिंगभाव यांच्या टकरावाला व्यवस्थितपणे हाताळले जाण्याची गरज अधोरेखित होते. त्यातूनच मग आंबेडकरांच्या विचारांचे स्त्रीवादी वाचन करण्याची निकड लक्षात येते.'' (पान १८)

''२००६ मधील खैरलांजी येथे घडलेल्या घटनेने हे परत एकदा सिध्द केले आहे की, जात आणि लिंगभाव यांच्यातील दुव्यांवर पुरेसे लक्ष केंद्रित न केल्यामुळे दलित स्त्रीवरील अत्याचार हा जातीय गुन्हा म्हणून अथवा लैंगिक अत्याचार म्हणून नोंदविला जातो. त्यामुळेच आंबेडकरांच्या सिध्दांतनाचा वारसा नव्याने प्रस्थापित करण्याचे आव्हान (आपल्यासमोर) आहे. त्यांनी जात आणि लिंगभाव (सुटे सुटे बघितले नाहीत तर) एकमेकांत गुंतलेले असे बघितले. त्यांना एकाच प्रतलावर मांडता येणार नाही याची जाणीव त्यांना होती आणि त्याचबरोबर सारखेपणातील फरक अशा व्दिध्रुवात्मक रचनेपलिकडे त्यांची मांडणी जाते. पुरुष सत्ता या संज्ञेला केवळ अनेकवचनी करुन काही साधणार नाही जाति व्यवस्थेतील

पुरुषसत्ताकतेतील विषमतेच्या उतरंडीत स्त्री नावाची परत परत घडवली जाते याचा व्यवस्थित नकाशा तयार करण्याची गरज आहे. !''(पान–२०)

आजवरची आपली वाटचाल गोपाळ गुरु आणि शर्मिला रेगे म्हणतात तशी भंगलेल्या आधुनिकतेची वाटचाल आहे. त्यात राष्ट्रवाद आणि इतर प्रागतिक मूल्ये हे दोन्हीही हातात हात घालून गेळे असते तर चित्र वेगळे दिसले असते. गवसळलेली आधुनिक मूल्ये कोणासाठी व कशासाठी महत्वाची आहेत हे ठरवण्यातले राजकारण आपल्या सांस्कृतिक भूमीला दुभंगत गेले त्याचा साकल्याने विचार करणारी आपल्याला उपलब्ध असणारी परंपराही आपण नाकारली. हया मर्मावर आंबेडकरांनी नेमके बोट ठेवले आहे. तेव्हा आता पर्यायी आधुनिकता निर्माण करायची तर या सर्वांची दखल सर्वांनीच घेणे गरजेचे आहे.

**प्रा. शर्मिला रेगे यांची ''काळ्या स्त्रियांचा विचार लढा'' ही लेखमाला:–** डॉ. शर्मिला रेगे या दलित स्त्रीवादी, विद्यार्थी, इ. पुरोगामी चळवळीशी ग्रामशीच्या जैविकरित्या जुळलेल्या होत्या. १९९० च्या दशकात भारतामध्ये दलित आणि स्त्री चळवळीपुढे उभी राहिलेला सैद्धांतिक आव्हानांना त्यांनी पाठ न दाखवता ती आव्हाने पेलली, स्त्रीवादाची कठोर चिकित्सा करीत एकीकडे भारतातील दलित आणि स्त्री प्रश्नाची गुंतागुंत उकलण्याचा प्रयत्न केलाय तर दुसरीकडे भारतीय व पाश्चात्य असे कप्पेबंद विभाजन करण्यातील धोके ही अधोरेखित केले.

प्रा. शर्मिला रेगे यांची ''काळया स्त्रियांचा विचार लढा'' ही लेखमाला ऑक्टोबर २००३ पासून सत्यशोधक संघटकमध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. सत्यशोधक संघटक हे मासिक महाराष्ट्रातील चळवळीच्या मुख्यपत्रांपैकी एक अग्रगण्य व महत्वपूर्ण मासिक असल्याने याच मासिकात ''काळया स्त्रियांचा विचार व लढा'' ही लेखमाला प्रसिद्ध व्हावी असा डॉ. शर्मिला रेगे यांचा आग्रह होता. काळ्या स्त्रीवादाबद्दल त्या लिहितात कारण या अभ्यासातून आजमितीला भारतातील स्त्री प्रश्नांची गुंतागुंत समजवून घेण्यास व तिची सोडवणूक करण्यास हातभर लागेल अशी त्यांची भूमिका होती. दलित स्त्रियांचा स्वतंत्र लढा उभा रहात असण्याच्या पार्श्वभूमीवर, विद्यापीठ अनुदान आयोगाने स्त्री अभ्यासाचे रुपांतर ''कुटुंब अभ्यास केंद्रात'' करण्याच्या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाच्या युगात सुट्या सुट्या पद्धतीने प्रश्नांकडे बघण्याची मानसिकता घडवली जाण्याच्या धोक्याच्या पार्श्वभूमी शर्मिला रेगे यांचे लिखाण विशेष महत्वाचे ठरते. या लेखमालेमध्ये काळ्या स्त्रियांच्या लढ्याचे स्वरुप त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या सैद्धांतिक भूमिका, लढ्यामधील प्रत्यक्ष संघर्षरत असणाऱ्या व वैचारिक योगदान देणाऱ्या स्त्रिया व पुरुषांचे योगदानही त्यांनी अधोरेखित केले. पहिल्या टप्प्यानंतर काळ्या स्त्रीवादाचा दुसरा टप्पा, काळे साहित्य, त्यांनी केलेला सैद्धांतिक मक्तेदारीविरुद्ध संघर्ष आणि तिहेरी शोषणाच्या चौकटीपलिकडे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

वर्णभेद, साम्राज्यवाद व पुरुषसत्ताक व्यवस्थेचे गुंतागुंतीचे संबंध स्पष्ट करणाऱ्या काळ्या स्त्रीवादी विचारवंताची मांडणी भारतातील दलित–बहुजन, आदिवासी स्त्रीवादाशी संवाद करणारी आहे. काळ्या स्त्रियांच्या मांडणीतून तिसऱ्या जगातील कष्टकरी स्त्रियांबरोबर एकजूट करण्याचे स्वप्नही दिसते. आपल्या गाण्यांमधून ह्या वर्णभेदामुळे अमेरिकेत त्यांचे होणारे शोषण काळ्या स्त्रीवादी नमूद करतात. पण ह्या बरोबरच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अमेरिकेतील आपल्या वास्तव्यामुळे तिसऱ्या जगातील स्त्रियांच्या स्वस्त श्रमाचा फायदाही कसा मिळतो हे ही त्या सांगतात, इतका सुंदर शर्ट मला केवळ तीन डॉलरला खरेदी करता येतो तेंव्हा त्या कलाकुसरीमध्ये स्वस्त किंमतीमागे दक्षिण कोरिया–बांग्लादेश भारतातील माझ्या कष्टकरी बहिणींचे श्रम व शोषण दडलेले आहे. याची मला जाणीव आहे असेही काळ्या स्त्रीवादी म्हणतात.

शर्मिला रेगे म्हणतात, सत्ताधारी गटांचे जागतिकीकरण हे भांडवलाचे, वस्तूचे, बाजरपेठांचे जागतिकीकरण आहे. बाजारपेठ खुल्या करणारे विचारांच्या देवाण–घेवाणीवर मात्र 'पाश्चात्य' असा शिक्का मारुन बंदी घालतात. या लेखनमालेतून काळ्या स्त्रीवादी विचारांशी योजलेला संवाद हा पर्यायी मुक्तीदायी जागतिकीकरणाच्या दिशेने जाणारा आहे. (मासिक सत्यशोधक संघटक, ऑक्टोबर, २००३)

**दलित अध्ययन वैशीक विचारांचे शास्त्र:–** शर्मिला रेगे यांनी त्यांच्या ''भारतातील दलित अध्ययन ब्राम्हण गल्लीतील समावेशक अवकाशाला नकार'' या सत्यशोधक जागरमध्ये (मार्च रू २०१२) प्रकाशित झालेल्या लेखात म्हणतात, विद्यापीठे ही आधुनिक भारताला घडविणारी महत्वाची संस्था आहे. तसेच या आधुनिक विद्यापीठांचा उगम व प्राथमिक विकास वसाहत काळात झाला हे ही लक्षात घेणे गरजेचे आहे. वसाहतवादातून उदयाला आलेल्या आधुनिकतेमध्ये अनेक सामाजिक, सांस्कृतिक विसंगती आढळतात आणि याच विसंगती पुढे शिक्षण प्रक्रियेत आलेल्या दिसतात. अशा या वसाहत काळातच भारतातल्या आधुनिक सामाजिक शास्त्रांची जडणघडण झाली व या प्रक्रियेत ज्ञानाच्या स्वरुप व कार्यावरुन अनेक वादविवाद पुढे आले. ज्ञान कशाला म्हणायचे, ज्ञान निर्मिती कोणासाठी व कशासाठी यावरुन १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या सुरुवातीला बरेच वादविवाद झालेले दिसतात. या वादविवादातून जी सामाजिकशास्त्रांची जडणघडण झाली त्यातून फुले–आंबेडकरी दृष्टीकोनाला पुसून टाकण्यात आले. सामाजिक शास्त्रांच्या विकासाच्या विविध टप्प्यांवर दलित विचार व सिद्धांतनाला पुसून टाकण्याचा, त्यात वेगळे काहीच नाही असे म्हणून नाकारण्याचा, हा विचार 'आमच्या' विचाराच्या विरोधातला असल्यामुळे तो तसाच घेता येत नाही, असे म्हणून तर काही तोंडदेखला या विचाराचा संदर्भ घेऊन दलित सिद्धांतनाला खोडून टाकण्याचा प्रयत्न झाला. या लेखामध्ये प्रमुख प्रवाही सामाजिक शास्त्रे व दलित विचार व सिद्धांतन यांच्यामधील व्दंदाचे तीन टप्पे सांगण्याचा प्रथम प्रयत्न शर्मिला रेगे यांनी केला आहे. मग आजच्या म्हणजेच तिसऱ्या टप्प्यावर विद्यापीठ अनुदान आयोगासारख्या यंत्रणेने दलित स्टडीज, आंबेडकर स्टडीज केंद्रे प्रस्थापित करण्याचा निर्णय घेतल्यानंतर विद्याशाखीय पातळीवर याबाबत जे विविध प्रतिसाद उमटताना दिसतात. त्या प्रतिसादांचे या लेखाच्या शेवटी तीन प्रवाहात वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच शिक्षक म्हणून या सर्व घडामोडींचा अध्यापन शास्त्राच्या पातळीवर अर्थ कसा लावावा यावर विचार मांडण्याचाही प्रयत्न केलेला आहे. शर्मिला रेगे यांनी या लेखातून दलित अध्ययनाकडे फक्त एक Topic म्हणून बघितले नाही. तसेच दलित परिप्रेक्ष्याला दिले जाणारे प्राधान्य हे अपराधी भावनेतून किंवा दया करुणेच्या दृष्टीकोनातून दिले नाही. या उलट त्यांना दलित अध्ययनाचे दावेही अधिक वस्तूनिष्ठ आहेत कारण त्यांचे परिणाम हे अधिक सार्वत्रिक आहेत असे त्यांना वाटे. कारण ज्या प्रमाणे प्रमुख प्रवाही ब्राम्हणी सामाजिकशास्त्रे ही विशिष्ट गटांच्या स्वानुभावापुरती मर्यादित असतात त्याप्रमाणे दलित अध्ययन होताना दिसत नाही. अर्थातच दलित अध्ययन हे अधिकच वस्तुनिष्ठेतेच्या दिशेने प्रवास करणारे शास्त्र आहे आणि म्हणूनच ज्या प्रमाणे कोणत्याही सामाजिक व ऐतिहासिक अन्वेषणाचे मूल्यमापन

होते तसेच दलित अध्ययनाचे देखील व्हावे अशी त्यांची भूमिका होती.

गेल्या २० वर्षात स्त्री हा कोटीक्रम स्त्रीवादी सिद्धांतनामध्ये प्रश्नचिन्हांकित झाला आणि या कोटिक्रमातून जे एकसाचीकरण होते, त्याकडे त्यांनी लक्ष वेधले. आधुनिकोत्तर स्त्रीवादामधून आलेली टीका म्हणजे 'स्त्री' नावाचा कोटीक्रम स्त्रियांच्या जगण्याचे एकसत्वीकरण करतो, हा मुद्दा शर्मिला रेगे यांनी ठामपेण मांडला. काळ्या स्त्रिया, तिसऱ्या जगातील स्त्रिया यांनी मांडलेला स्त्रीवाद आणि त्यातून ऐतिहासिकदृष्ट्या त्यांच्या स्त्रीच्या लैंगिकतेबद्दलचे आकलन तसेच वर्गीय, राष्ट्रविषयक वंशविषयक आणि जातविषयक असणाऱ्या आकलनांमधील भिन्नता त्यांनी अधोरेखित केली.

दलित स्त्रियांचा साक्षवजा दस्ताऐवजांचा विचार, त्यांच्या स्वकथनातून कसा येतो हे दाखविताना डॉ. शर्मिला रेगे यांनी 'जात' आणि 'लिंगभाव' घेऊन दलित स्त्रियांची आत्मकथने वाचली तर कोणता आशय समोर येतो, त्याचे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाशी काय नाते आहे हे दाखवून दिले. १९९० च्या दशकानंतरच्या काळात दलित प्रश्नाच्या अभ्यासकांनी आणि चळवळीतील नेतृत्वाने शैक्षणिक चौकटीत मानदंड कसे ठरतात आणि अभ्यासक्रमात कोणाला सामावले जाते याविषयी प्रश्न उभे केले. हीच चौकट पुढे नेत शर्मिला रेगे यांनी दलित स्त्रियांच्या स्वकथनांचे एकत्रित संकलन—संपादित करुन २००६ साली जुबान या दिल्ली येथील प्रकाशनामार्फत ग्रंथ प्रकाशित केला. ज्ञाननिर्मिती करणाऱ्या आणि नव्या विचाराच्या वाहक म्हणून दलित स्त्रियांना लक्षात घेतले गेले नाही, हे जाणवून हा ग्रंथ सिद्ध केला.

शर्मिला रेगे यांच्या मते, दलित स्त्रियांच्या जीवनाच्या कथनांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या साक्षवजा दस्तऐवज दिसतात आणि असे करुन त्यांनी दलित समाजाचा एकसाची करणाऱ्या चौकटीतील विचार फोडून काढला. आठ स्व—कथनांमधून त्यांनी दाखवून दिले की, ही स्व—कथने सार्वजनिक क्षेत्रात कोणत्या वाटा शोधत होती. आपले घरदार, आपल्या पोटापाण्याची व्यवस्था समुदायाशी, जातीशी, श्रमाशी, शिक्षणाची असणारे नाते यात उलगडून दाखविले आहे. दलित स्त्रियांच्या स्व—कथनात येणारे अपमानाचे, हिंसाचाराचे प्रतिकाराचे आणि समूहात्म संघर्षाचे कथन रेगे यांनी अधोरेखित केले.

अगदी अलिकडे म्हणजे, सन २०१३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्राम्हणी पुरुषसत्ताक व्यवस्थेसंदर्भातील लेखन निवडून डॉ. शर्मिला रेगे यांनी एक उत्कृष्ठ ग्रंथ सिद्ध केला. मनूवादी विचारसरणीच्या माथेफिरु चौकटीला शह देण्याचे काम बाबासाहेबांनी कसे केले, हे त्यांनी आपल्या अभ्यासातून दाखवून दिले. आंबेडकरी चौकटीतील शाहीर मंडळी, गायन पार्ट्या, अभ्यासक आणि कार्यकर्ते या सगळ्यांकडून फुले, आंबेडकरी चळवळीविषयी जाणून घेऊन बाबासाहेबांच्या लेखनाचा हा अभ्यास आणि त्यांच्या लेखनाचे रेगे यांनी लावलेले अन्वयार्थ मुळातूनच वाचण्यासारखे आहेत. इतकेच नाही तर, पुणे विद्यापीठात अभ्यासक्रम आखताना, दलित आणि सार्वजनिक क्षेत्र आणि लिंगभाव आणि जात इतिहास आणि स्मरण असे अभ्यासक्रम कसोशीने शिकवून रेगे यांनी लिहिलेला प्रास्ताविकाचा आशय वाचकांनी आवर्जून वाचावा. सिद्धांतनाच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकून जात आणि स्त्रीवादी प्रश्न यांच्या सीमारेषा एकमेकांना कशा छेदतात हे दाखवून दिले. प्रमुखप्रवाही स्त्रीवादाने त्या अर्थाने जातीचा प्रश्न महत्वाचा मानला नाही हे लक्षात घेता, हे योगदान महत्वाचे वाटते.

फुले—आंबेडकरवादी म्हणून घेत असताना त्या प्रज्ञा, मैत्री, करुणा आणि न्याय या तत्वाचा अवलंब करुन इतरांशी संवाद साधायच्या याच गुणांचा अवलंब करुन १९९५ मध्ये स्त्रीवादी पद्धतीशास्त्र विकसित केल्यानंतर २००८ च्या नंतर अध्यापन पद्धतीत फुले—आंबेडकरवादी पद्धतीशास्त्रीय परिप्रेक्षयाचा अवलंब करुन प्रज्ञा म्हणजे चिकित्सक आकलन करुणा म्हणजे सहभावनावादी प्रेम आणि स्वात स्वातंत्र्याचा स्वीकार करायच्या.

प्रा. शर्मिला रेगे यांची जिज्ञासा, विद्वत्ता व बांधिलकी ही निव्वळ विद्यापीठीय नव्हती. केवळ बोद्धीक औत्सुक्य वा कसरत हा तिचा पाया नव्हता. त्यांच्या सर्व वैचारिक व बौद्धिक प्रयासांमागे सामाजिक संबंधातील मुलभूत परिवर्तनाची प्रेरणा होती. जीवनाला अर्थप्राप्त करुन द्यावयाचा असेल तर व्यक्तीवादावर आणि स्वार्थावरचा त्याग करुन व्यक्तीगत व सामाजिक संबंध पूर्णत: बदलायला हवेत, ही त्यांची धारणा होती. हे बदल व्हायचे तर आधी सामाजिक समता, न्याय, लोकशाही स्थापन व्हायला हवेत. वर्ग, धर्म, जात, लिंग यावर आधारलेले सर्वभेद मिटायला हवेत, हे त्या मानत असत. यासाठी वर्गीय, वर्णीय, जातीय, धार्मिक व पुरुषसत्ता मिटवायची असेल तर सामाजिक—राजकीय संघर्षाला पर्याय नाही, हे ही ते मानत होत्या. चळवळी उभ्या करताना, मोर्चे—आंदोलन संघटित करताना त्याला ज्ञानाचा पाया असतो आणि ज्ञान निर्मितीचीही एक चळवळ असते. चळवळ आणि अभ्यास सिध्दांतन आणि व्यवहार यांच्यातील फारकत त्यांनी मान्य केली नाही. सिद्धांत आणि व्यवहार याचा सहसंबंध त्यांनी केवळ लिखाणापुरता लावला नव्हता तर जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये अंगिकारला होता. सत्यशोधक, विद्रोही, दलित—बहुजनवादी चळवळी व विद्यापीठीय सर्वच ज्ञानशाखांना वैचारिक ऊर्जा देणारे केंद्र बनवणे हे डॉ. शर्मिला रेगे यांचे खरे योगदान होते.

त्या काही चॅरिटेबल ट्रस्ट नसतानांही इतरांना प्रोत्साहन देण्याचा भाग म्हणून त्या स्वत:च्या खिशातील पैसे खर्च करायच्या अशी मदत करताना त्यांनी कोणालाही शर्मिला रेगे यांचे ऐकले पाहिजे किंवा त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणेच काम केले पाहिजे असा कोणताही उपकाराचा हेतू नसायचा. त्यांच्या मृत्यूनंतर सुद्धा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मदत व्हावी म्हणून तशी तरतूद केली आणि त्याबद्दल अनिल सैनी या जीवनसाथी सोबत मृत्यूपूर्वी चर्चा केली होती. एखादी प्रशासकीय भुमिका बजावत असताना ती किती लोकशाहीवादी आणि पारदर्शक बनवू शकता याचा अनुभव समाजशास्त्र आणि स्त्री अभ्यासातील आम्हा सगळ्या रेगे मॅडमच्या सहकार्यांना आणि विद्यार्थ्यांना आहे.

सर्वसाधारणपणे नव्या कल्पना, नवे उपक्रम, नवे कार्यक्रम यांचे शर्मिला रेगे उत्साहाने स्वागत करीत. रेगे मॅडम यांनी खाजगी मालमत्ता अथवा संकुचित, वैयक्तिक महत्वाकांक्षा यांची तमा त्यांनी कधीही बाळगली नाही. शैक्षणिक क्षेत्रातील आव्हाने स्वीकारायला त्यांना फार आवडायचे लोकसंग्रह व एकांत, बहुआयामी वक्तृत्व व एकजिनसी लेखन, तसेच वास्तववाद व स्वप्नदर्शित्व यातील कोणत्याही एका ध्रुवावर अढळ न राहता दोन्ही ध्रुवांना स्पर्श करण्याची किमया शर्मिला रेगे यांनी साधली होती.

शर्मिला रेगे बाबासाहेब आंबेडकरांचा विचार जगत होत्या. त्या म्हणत बाबासाहेबांचे माझ्या वडिलांवर व आम्हा सर्व कुटुंबियांवर अनंत उपकार आहेत. माझे वडील मॅट्रीक झाल्यानंतर नोकरीला लागले. परंतु त्यांची पुढे शिकण्याची इच्छा होती. त्यावेळी त्यांनी मुंबईतील सगळी महाविद्यालये पालथी घातली. परंतु नोकरी करीत असल्याने ते महाविद्यालयात हजर राहू शकणार नाहीत या भीतीने

त्यांना कोणत्याही महाविद्यालयाने प्रवेश दिला नाही. अखेर ते बाबासाहेबांकडे गेले. बाबासाहेबांनी त्यावेळी सिद्धार्थ महाविद्यालय नुकतेच सुरु केले होते. त्यांनी वडिलांची अडचण शांतपणे ऐकूण घेतली व म्हणाले, तुम्ही तुमचा अभ्यास सुरु ठेवा. महाविद्यालयामार्फत तुमचा फॉर्म पाठविण्याची मी व्यवस्था करतो असे सांगून त्यांनी रेगे मॅडमच्या वडीलांना सिद्धार्थ महाविद्यालयात प्रवेश दिला. बाबासाहेबांमुळेच आमचे वडील ग्रॅज्युएट होऊ शकले व त्यामुळे त्यांना चांगल्या पगाराची नोकरी मिळू शकली व आमचे कुटुंब मोठे असूनही आम्हा सर्व बहिणी–भावांचे चांगले शिक्षण होऊ शकले. केवळ त्यांच्यामुळेच मी आज पुणे विद्यापीठात प्राध्यापिका आहे. अशा प्रकारे आमच्यावर बाबासाहेबांचे अनंत व न फिटणारे उपकार आहेत. त्याबद्दल ह्या नेहमीच कृतज्ञ असत. त्या वेगवेगळ्या प्रकारे कृतज्ञता व्यक्त करीत त्यांचा ड्रायव्हर, घरकाम करणारी स्त्री ही मांग समाजातील होती व त्यांना वर्षाच्या १२ पगारांव्यतिरिक्त एक बोनस पगार १४ एप्रिल या बाबासाहेबांच्या जयंती निमित्त देत असत.

शर्मिला रेगे यांना एखादी गोष्ट पटली नाही वा एखाद्या गोष्टीविषयी नापसंती दाखवायची असेल तर त्या संयमाने पण ठामपणे आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत. नापसंतीचा चढा सूर ते लावत नसत. प्रतिक्रियेतून अहंकार प्रकट होत नसे. उलट ज्याच्या बद्दल तक्रार आहे ती व्यक्तीदेखील त्यांच्या एकूण प्रतिक्रियेबद्दल नाराज होत नसे. संबंधात कटूता न येऊ देता आपले म्हणणे मांडण्याचे कसब त्यांच्याजवळ होते. माणसांशी संबंध जोडणे आणि ते टिकविणे याकडे त्यांचा कल होता. आपल्यामुळे कुणी दुखावला जाऊ नये याची काळजी ते घेत. प्रसंग पाहून निर्णय घेत. आपण मोठे विद्वान अभ्यासक आहोत, आपली बडदास्त ठेवली गेली पाहिजे, असा आग्रह नसायचा. मात्र आपला आत्मसन्मान दुखावला जाऊ नये याचीही काळजी त्या घेत असत. अशा परिस्थितीचे भान असणाऱ्या त्या प्रज्ञावंत होत्या.

प्रा. शर्मिला रेगे यांचा व्यासंग, चिंतन व वाचन थक्क करणारे होते. विशेषज्ञांच्या व अतिविशेषज्ञांच्या काळात विशिष्ट विषयातील ज्ञानाची खोली वाढत गेली तरी अनेकदा क्षितीजांची व्याप्ती व विविध ज्ञानशाखांच्या परस्परसंबंधांची जाण कधी कधी संकुचित होते. जीवन, समाज व विश्व यांचे मग एक सम्यक तत्वज्ञान निर्माण होण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. नेमकी ही जाणीव प्रा. शर्मिला रेगे यांना नेहमीच होती व म्हणूनच विविध ज्ञानशाखातील घडामोडी व त्यांचा समाज जीवनावर होणारा परिणाम याबाबत त्या नेहमीच जागरुक असायच्या. त्यामुळे त्यांनी लिंगभाव अभ्यास आणि समाजशास्त्र, लिंगभाव अभ्यास आणि संस्कृती अभ्यास, लिंगभाव आणि दलित अध्ययन आणि या सगळ्यांची अभ्यासपद्धती (Pedegogy) काय असली पाहिजे याचे सदैव चिंतन केले आणि विविध अभ्यासविषयात सांगड घालण्याचा प्रयत्न केला.

**नव्या पिढीशी संवाद आणि जुन्या मंडळीशी स्नेह:–** शर्मिला रेगे केवळ विद्यार्थ्यांचीच आस्थेने विचारपूस करीत नसत तर ते त्यांच्या कुटूंबीयांची सुद्धा तशीच विचारपूस करीत. आपल्यामुळे समोरच्या व्यक्तींची कोणती ही गैरसोय वा अडचण होऊ नये याची ते दक्षता घेत. त्यांच्या या स्वभाववैशिष्ट्यामुळे तर संबंध अधिकच स्नेहपूर्ण होत असत. नव्या पिढीशी संवाद आणि जुन्या मंडळीशी स्नेह हे शर्मिला रेगे यांच्या व्यक्तीमत्वाचे वैशिष्ट्य होते. त्यांचा लोकसंग्रह ही मोठा होता. आपल्या संयमी, मृदू स्वभावामुळे त्यांनी अनेक माणसे जोडली होती. त्यांच्याकरीता त्यांच्या सानिध्यातील प्रत्येक जण हा स्वत:ला त्यांच्यासाठी विशिष्ट व्यक्ती वाटायची हा भाव फक्त काहीच लोकांना साधता येतो.

ज्ञानार्जन, अजित ज्ञानाचे नव्या अभ्यासातून वितरण व डाव्या चळवळीचे वैचारिकीकरण, पुनर्भरण हेच त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. आयुष्यभर हे काम त्या सातत्याने करीत राहिल्या. विद्यार्थ्यांना शिकविणारा शिक्षक सतत अभ्यासत असावा लागतो, याची जाण त्यांनी सांभाळली. त्यांचा परिवर्तनाच्या एकाच एक मार्गावर विश्वास नव्हता. त्यामुळे दलित चळवळ, स्त्रीवादी आणि मार्क्सवादी चळवळींच्या माध्यमातून परिस्थितीतील गुंतागुंत कशी जाणून घेता येईल आणि ती सोडवता पण येईल याचा त्या विचार करीत असत. भावी समाजाच्या जडणघडणीसाठी ''शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे'' या बाबासाहेबांच्या विचारांवर लक्ष केंद्रित करुन (Class room) हेच परिवर्तनाचा लक्ष्य गट त्यांना वाटत होता. त्यांनी शिकवायचे म्हणून कधी शिकविले नाही. विद्यार्थ्यांपुढे एखाद्या प्रश्नाच्या किती बाजू असू शकतात, त्या प्रश्नाचा विकास कसा झाला आहे, आता तो प्रश्न कोणत्या अवस्थेत आहे. त्यावर कोणकोणती संशोधने झाली आहेत या सगळ्याचा त्या संदर्भ द्यायच्या.

त्यांच्या अध्यापन पद्धतीचे (Pedegogy) वैशिष्ट्य म्हणजे त्या वर्गात चलचित्रपट, माहितीपट इ. सारख्या दृश्य माध्यमांच्या द्वारे विद्यार्थ्यांना त्या विषयाची माहिती द्यायच्या. त्यांचे तास मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांतून होत असत. त्यांचे अध्यापन घड्याळी अडीच तास ते चार तास चालत असे. त्यांनी वर्गात अध्यापन सहाय्यक तयार केले होते. प्रत्येक तासाला हे अध्यापन सहाय्यक वर्गात उपस्थित राहत असे. मी ज्यावेळी त्यांचा अध्यापन सहाय्यक होतो त्यावेळी वर्गात त्यांना प्रश्न विचारल्यानंतर त्या प्रश्नाचे एका सेकंदाच्या आत त्या विशिष्ट भुमिका घेऊन सखोल उत्तर द्यायला सुरुवात करायच्या ही अनुभव घ्यायची संधी मला मिळाली.

शर्मिला रेगे यांनी ब्रीज कोर्सची निर्मिती केली आणि त्यामाध्यमातून ज्ञान आणि कौशल्य यात सांगड घालण्याचे काम केले. ग्रामीण आणि शहरी व मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांना वेगवेगळी कौशल्य आणि ज्ञान असते त्यांचे एकमेकांना आदान–प्रदान केले तर ते परस्परांना पुरक राहिल आणि त्यात दोघांचाही फायदा होईल असे वाटे.

बदलत्या सामाजिक परिस्थितीनुरुप वर्गातील शिकण्या–शिकविण्याचे व्यवहार बदलताना अत्यंत आधुनिक, जगण्याशी भिडू शकणारा अभ्यासक्रम, वर्गातील बदलेला सामाजिक चेहरा समजून घेऊन स्वहित, अहंकार पासून मुक्त होऊन स्वचिकित्सा करणारी अध्यापन पद्धती शर्मिला रेगे यांनी स्वीकारली होती. त्यामुळे आमच्यापैकी अनेकांचे स्त्री अभ्यासाशी नाते जुळू लागले. रेगे मॅडम वर्गात प्रत्येकवेळी वेळेवर उपस्थित रहायच्या दोन तासाचे लेक्चर असेल तर त्यासाठी त्या सात ते आठ तास वाचन करीत असत. प्रत्येक वेळी नवीनच लेक्चर नोट्स काढत पण त्या कधीही पॉइंट पाहून शिकवित नसत. विचारांचे जग काय आहे, किती वेगवेगळ्या प्रकारे जगाला, समाजाला समजून घेण्याचा व बदलण्याचा मानवी प्रयत्नाचा इतिहास, संकल्पना पद्धतीशास्त्र आणि दलित स्त्रीवादी दृष्टिकोनाच्या माध्यमातून त्या उलगडून दाखवित. जणूकाही संपूर्ण विचारांच्या जगातून फिरवून आणले असेच आम्हाला वाटायचे. सामाजिक शास्त्रातील प्रस्थापित सिद्धांत्वाचे मुंडके पकडून आपल्या अनुभव परिस्थितीतून त्याला प्रश्न विचारले पाहिजेत, हा आत्मविश्वास निर्माण करुन भुमीदृष्टी आणि सिद्धांत रचण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. कोणत्याही प्रश्नांचा, घटनांचा विचार करताना मुलगामीपणे विचार करणे, समग्रतेत विचार करणे, अभ्यासांचे, विचारांचे परिवर्तनवादी विचारांशी, चळवळीशी घनिष्ट

नाते असले पाहिजे, तसेच सार्वजनिक जीवनात योग्य वैचारिक हस्तक्षेप केला पाहिजे, हेच सुत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिले.

संशोधन करताना लिहिलेला प्रत्येक शब्द वाचून आणि त्या विद्यार्थ्यांचे शांतपणे ऐकूण त्याला अजून काही गोष्टी, मुद्दे, पुस्तके सुचवित असत. टाकावू गोष्टीला टिकावूत रुपांतर करण्याचा प्रयत्न करीत असत. संशोधनाबाबत मोकळेपणाने, खुलेपणाने आणि स्पष्टपणे चर्चा किंवा महत्वाच्या सुचना करीत असत. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय पातळीवरील अभ्यासकांच्या ज्ञानाचा आणि कामाचा परिचय व्हावा म्हणून त्या अशा अभ्यासकांना वर्गात आणि चर्चासत्रात बोलण्याकरीता बोलावित असत. इतकेच नव्हे तर विविध चळवळीतील नेते, कार्यकर्ते यांनाही त्या बोलावत. विद्यार्थ्यांना विविध मार्गातून ज्ञान देऊन कसे समृद्ध करता येईल याचाच ध्यास त्यांनी घेतलेला होता.

स्त्री अभ्यासाचे मराठी ज्ञानविश्व समदृध करुन मराठी वाचकाला त्याचा उपयोग करता यावा म्हणून त्यांनी इंग्रजीतील महत्वाच्या साहित्याचा मराठीत अनुवाद केला. तर इंग्रजीत सुद्धा ज्या विषयांची चर्चा करण्यात आली नाही पण ती मराठीत केली असेल तर त्याचाही इंग्रजीत अनुवाद त्यांनी केला. यासंदर्भात प्रतिमा परदेशी आणि Writing caste/Writing Gender या पुस्तकातील लेखिकांच्या साहित्याचा त्यांनी केलेला अनुवाद महत्वाचा ठरतो. शिक्षणाच्या प्रक्रियेला एका उच्च पातळीवर नेऊन ठेवले. विद्यार्थ्यांना संशोधक म्हणून तयार करण्याकरीता त्यांना विविध विषयांवर लिहायला सांगून त्यांची रेगे मॅडमनी पुस्तके तयार केली. आतापर्यंत अशा सहा पुस्तकांची निर्मिती झाली आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना क्षेत्रअभ्यासाकरीता दरवर्षी त्यांची सहल काढली जाते. त्यामध्ये लवासा येथील आदिवासींच्या जमीनीचा प्रश्न तर बीड येथील एकनाथ आव्हाड यांच्या मानव हक्क अभियानाद्वारे दलितांच्या हक्कासाठी कशा प्रकारचे काम करण्यात आले याचीही ओळख व्हावी म्हणून त्या संस्थेला भेट देण्यात आली. अध्यापनाचा दर्जा उंचविण्यासाठी त्यांनी प्रत्येक तासाची उदिष्टे, त्याचे विश्लेषण कसे करण्यात येणार आहे, त्यात कोणते मुद्दे संकल्पना आणि उदाहरणे आहेत या संदर्भात कोणते वाचनसाहित्य स्वत:साठी आणि विद्यार्थ्यासाठी देणार आहोत याची यादी तासाच्या काही दिवस अगोदर सादर करण्यास सांगितले जायचे.

५ सप्टेंबर या सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती ऐवजी २८ नोव्हेंबर हा शिक्षण दिन साजरा करण्यात यावा म्हणून त्या विद्यार्थ्यांना प्रेरित करीत असत. रेगे मॅडमला वर्गात विविध जात—वर्ग, ग्रामीण—शहरी, अशा विविध शोषित घटकातील असतील याबाबत त्या जागरुक होत्या त्याकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाकडे अशा विद्यार्थ्यांना मदत मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करणार होत्या. त्यांनी मागच्या दोन वर्षात आदिवासी, पारधी, वडार, घिसाडी, दलित या जात गटातील मुलामुलींना शिक्षणाकरीता स्त्री अभ्यास केंद्रात कसे आणता येईल याकरीता मला अशा विद्यार्थ्यांचा शोध घेण्याची विशेष जबाबदारी सोपविली होती.

दलित स्त्रीवाद आणि लोकप्रिय संस्कृती आणि उच्च शिक्षण हा त्यांच्या विशेष आवडीचा विषय असे. त्यांच्या दलित स्त्रीवादी भुमीदृष्टी या विचारावर बरीच टिकासुद्धा झाली. त्या मार्च २०१३ च्या EPW च्या स्त्री अभ्यासाविषयीच्या विशेषांकाच्या त्या संपादक मंडळीत होत्या. त्यांच्या संपादकीय लेखनावर विषारी टिका देखील करण्यात आली. त्यात असे म्हटले गेले की हे संपादकीय ''दलित स्त्रियांचा आवाज चोरत आहे.'' परंतु संपादक मंडळातील लेखिका जन्माने जरी दलित नसल्या तरी त्यांनी दलित स्त्रीबादी दृष्टीकोन स्वीकारुन त्याचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. जन्माने दलित नसणाऱ्यांवर अशा टिका करणे सोपे असते. हे टिका करणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. १९९७ दिवाळी अंकात शर्मिला रेगे म्हणतात, एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर दलितातील दलित स्त्रियांच्या लढयातून आणि कार्यक्रमातून तयार होणारा स्त्रीवादी जागतिक दृष्टीकोन हा एकमेव मुक्तीदायक दृष्टीकोन ठरेल. (संदर्भ— स्त्री, असलेला, घडवलेली आणि दाखवलेली.)

महाराष्ट्रातील दलित लेखिकांविषयी उर्मिला पवार यांना पुस्तक लिहायला सांगून त्या पुस्तकाच्या प्रकाशन आणि लेखिकांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात रेगे मॅडमने पुढाकार घेतला आणि त्या कार्यशाळेचा सह—समन्वयक मला केले. महाराष्ट्राच्या इतिहासात या सगळ्या दलित लेखिका पहिल्यांदाच एकत्र येत होत्या. अनेक दलित लेखिकांनी पहिल्यांदाच पुणे विद्यापीठ पाहिले होते. या कार्यशाळेत या लेखिकांना बोलण्यास संधी मिळाली पाहिजे म्हणून या कार्यशाळेत त्या काहीही बोलल्या नाहीत. या कार्यशाळेत रावसाहेब कसबे, विद्युत भागवत, प्रज्ञा दया पवार आणि मनोहर जाधव व सर्व दलित लेखिकांना बोलण्याची संधी देण्यात आली. इतकेच नाही तर दलित लेखिकांच्या पुस्तकाला प्रस्तावणा सुद्धा त्यांनी स्वत: न लिहिता उर्मिला पवार या लेखिका आहेत त्यांनीच लिहिली पाहिजे असा आग्रह धरला. ज्यावेळी छाया दातार यांनी 'Non-Brahmin Renderings of Feminism in Maharashtra : Is it a more Emancipatory force?' (empirical) EPW,' Oct 9,' हा लेख लिहून दलित स्त्रीवादासंदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आणि पर्यावरणवादी स्त्रीवाद हा दलित स्त्रीवादापेक्षा महत्वाचा आहे असा दावा केला तेव्हा शर्मिला रेगे यांनी त्याला विरोध करुन 'Real Feminism' and Dalit Women : scripts of Denial and Accusation' हा लेख लिहून प्रबळ असे प्रत्युत्तर दिले. शर्मिला रेगे यांनी दलित स्त्रीवादी भूमीदृष्टीचा महत्वाचा विचार पुढे मांडला.

शर्मिला रेगे म्हणतात, वसाहतकालीन समाजसुधारणा चळवळीने जातीअंताच्या न्यायव्यवस्थेचा आधार घेऊन शोषित गटांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केलला होता. उत्तर वसाहतवादी दृष्टीकोनाचा अवलंब करणाया स्त्रीवादी अभ्यासक या महत्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष करुन सर्वच सुधारणा कशा पाश्चात्य होत्या हे अधोरेखित करतात. या सैद्धांतिक बैठकीतील अभ्यासक मग ओघानेच वसाहतकाळातील फुले—आंबेडकरी चळवळीच्या अभ्यासाकडे वळलेले दिसत नाहीत. अलीकडे दलित स्त्रियांनी केलेल्या मांडणीकडे मग ते एक नवा, वेगळा व विभिन्न आवाज म्हणून पाहताना दिसतात. दलित स्त्रीयांच्या या आवाजाला उत्तर—आधुनिकतेच्या छायेतील विभिन्नत्याआड चौकटीत बसवणे चूक ठरेल असे शर्मिला रेगे यांना वाटते.

भारतातील मुलभूत बदलाचा प्रश्न, जात, वर्ग आणि स्त्रीदास्यत्वाचा प्रश्न आज अडगळीत पडलेला आहे. जात आणि पुरुषसत्ताक व्यवस्था खिळखिळी होण्याऐवजी अधिकच प्रखर झालेली दिसत आहे. जात, वर्ग आणि पुरुषसत्ताकतेच्या आधारे होणारे सत्तासंस्था, अधिकारांचे नियंत्रण, जातीवर आधारित संसाधनाची मालकी, सांस्कृतिक संस्थांवरचे प्रभुत्व, जातीय अहंकार व एवढेच नव्हे तर जातीच्या आधारे ठरणारे नातेसंबंध, प्रेम व विवाह हे आजच्या भारतीय समाजाचे स्वरुप आहे. जात ही फक्त सामाजिक उतरंडीची व्यवस्था नाही तर भारतीय समाजातील आर्थिक शोषण, स्त्रीहक्कांची पायमल्ली यांचे मुळ जातव्यवस्थेमध्ये आहे. म्हणून पारंपारिक मार्क्सवादी चळवळीने व स्त्रीवादी चळवळीने जातीच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले असले, तो प्रश्न गौण मानला असला तरी आर्थिक शोषणाविरुद्ध व स्त्रीहक्काची लढाई जातीव्यवस्थेच्या

निर्मूलनाशी निगडीत आहे म्हणून परिवर्तनवादी चळवळीसमोर जात हे मोठे आव्हान आहेय तसेच नफ्याच्या संस्कृतीवर आधारलेल्या आर्थिक, सामाजिक व्यवस्था व त्यामुळे निर्माण होणारी भयानक टोकाची विषमता, मुलभूत गरजा व हक्कांची होणारी पायमल्ली, मुठभरांच्या हितांसाठी सामान्यांच्या जगण्याच्या हक्कांवर सतत होणारे आक्रमण तसेच पुरुषसत्तावादाचे अत्यंत हिंस्त्र स्वरूप एकूण जीवनाचे वस्तुकरण व लैंगिकीकरण लैंगिकतेचे जागतिक बाजारीकरण ही आव्हाने दलित आणि स्त्रीवादी चळवळीसमोर आहेत असे त्यांना वाटते.

जातिनिहाय जनगणनेचे समर्थक आणि विरोधक आपापल्या भुमिका प्रखरपणे मांडत होते. यावर प्रसारमाध्यमांतूनही चर्चा घडत होत्या. त्यामुळे या विषयावर चिकित्सकपणे लिहिणे आवश्यक होते. ती आवश्यकता लक्षात घेऊन जात आणि जनगणनेच्या संदर्भातील ऐतिहासिक आणि समकालीन पैलूंचा समाजशास्त्रीय आढावा घेणारे लेखन करण्याकरीता रेगे मॅडम यांनी मला प्रेरित केले. त्यासाठी त्यांनी नवबाजबाई रतन टाटा ट्रस्टची फेलोशिपसुद्धा दिली.या फेलोशिपचा उद्देश शिक्षक आणि विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापनासाठी दर्जेदार वाचनसाहित्य उपलब्ध व्हावे असा होता. तसेच पुरोगामी चळवळींना गतिमानता प्रदान करण्यासाठी पुरक साहित्याची आवश्यकता लक्षात घेऊन सदर पुस्तक लिहिण्यात आले होते.

जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्पर्धात्मक युगात झपाट्याने बदलत असलेल्या समाज व्यवस्थेत, जात, वर्ग आणि पुरुषप्रधानतेने नवीन प्रश्न, त्यापुढे हतबल झालेल्या प्रागतिक चळवळींची विघटनात्मक व पृथक पृथक परिस्थिती पाहता आज पुन्हा एकदा नव्या जोमाने विज्ञानवादी, बुद्धीप्रामाण्यवादी व धर्मनिरपेक्ष लोकशाहीला पुरक असलेल्या बुद्धधर्माची तत्वे अंगिकारली तर हितकारकच होईल विशेषत: ढासळलेली नितीमुल्ये, वाढत चाललेला चंगळवाद, भ्रष्टाचार, दहशतवाद, निस्तेज झालेल्या परंपरा व रुढी यांनी ग्रस्त झालेल्या समाजास बौद्धधर्म तत्वज्ञान प्रकाश देऊ शकते, उत्तर होऊ शकते असे त्यांना वाटे.

जमातवादाला विरोध आणि दलित स्त्रीवादाचा स्वीकार त्या करायच्या. हिंदुत्ववादी संघटनांनी पुरोगामी पक्षाच्या, संघटनांच्या मागण्या गिळकृत करण्यामागील दुतोंडीपणा स्पष्ट करुन त्याच्या आणि आपल्या भूमिकांमधील फरक स्पष्ट करायला हवा. चळवळीअंतर्गत नकळतपणे आलेला पण असणारा जमातवाद, जातीयता यातून बाहेर पडण्याचा हेतुपुरस्पर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. दलित, आदिवासी स्त्रियांच्या दृष्टीने विचारप्रणालीची, चळवळीच्या वैचारिक भूमिकेची पुनर्मांडणी करणे गरजेचे आहे असे शर्मिला रेगे यांना वाटते. स्त्रीवादी संघटनांना पोखरण्याची जमातवादी संघटनांची चलाख खेळी (रविवार, ४ मार्च २००१, ८ मार्च या जागतिक महिला दिना निमित्त, दैनिक लोकमत, अक्षररंग) या लेखात म्हणतात, मुलतत्ववादी संघटनांच्या महिला आघाडींच्या स्त्रीवादी अभ्यासकांकडून अभ्यास होतच असतो पण धर्मनिरपेक्षतेचा आव आणणाऱ्या संस्थांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण अशा छुप्या–खुल्या मुलतत्ववादी संघटनांचे वर्चस्व, ज्ञान, न्याय आणि संस्कृतीच्या क्षेत्रात वाढत चालले असल्याचे अनेक घटनांमधून सिद्ध झाले आहे. जमातवादाला तोंड देताना लिंगभावाचे राजकारण करताना आपल्याला कक्षा किती काटेकोरपणे आखाव्या लागतील हेच अधोरेखित होते.

एके दिवशी अचानकच विभागातून रेगे मॅडम आजारी असल्याचा फोन आला. त्यांच्या आजाराचे फार उशिरा निदान झाले. असाध्य अशा आजाराला त्या शांतपणे सामोरे गेल्या दि. १३ जुलै (शनिवार) २०१३ रोजी त्यांचे निधन झाले. स्त्रीवादावर भक्कम मांड असूनही किंचितही पुरुषद्वेष्टी नसलेल्या, रेगे मॅडम त्या माझ्या एक मित्र, तत्वज्ञ आणि मार्गदर्शक होत्या.

स्वत:ची जात सोडून बाहेर पडणे ही फार कठीण गोष्ट खूपच मोजक्या लोकांना हे जमले त्यापैकी शर्मिला रेगे हया एक होत. त्यांच्या निधनाने दलित–बहुजन स्त्रीवाद, अब्राह्मणी वैचारिक ज्ञानसंघर्ष, क्रांतिकारी पर्यायी संस्कृतीच्या क्षेत्रात न भरुन येणारे नुकसान झाले आहे.

# डॉ सुधाताई काळदाते : चतुरस्त्र समाजशास्त्रज्ञ

**प्रा.डॉ. स्मिता अवचार,** प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा व्रिपीठ, औरंगाबाद मो.न. ०९४२२६१२१२७

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती या विषयावर मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा विशेष अंक प्रकाशित करण्याचा उपक्रम निश्चितच अभिनंदनीय आहे. यानिमित्ताने महाराष्ट्रभातील एकूणच समाजशास्त्राच्या वाढ विकास आणि विस्तार याचा लेखाजोखा मांडला जाणे सुस्थितीत आवश्यक आहे. शंभर वर्षापूर्वी ज्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पा}र्वभूमी वर समाजशास्त्र विषय शिकवण्यास सुरूवात झाली त्यामध्ये आज अमूलाग्र बदल झालेला आहे. सामाजिक शास्त्रांमध्ये सुध्दा अनेक नवीन शाखांच्या अध्ययन अध्यापनास विद्यापीठ स्तरावर सुरुवात झालेली आहे. त्याचप्रमाणे जुन्या सामाजिक शास्त्रांमधील उपयोजित ज्ञानशाखांच्या अध्ययनास अधिक महत्व देण्याची एक स्पर्धा सुरु झालेली आहे. अशावेळी मूलभूत सामाजिक शास्त्रांमध्ये अध्ययन अध्यापन आणि संशोधन करण्याची आवश्यकता पुन्हा एकदा प्रस्थापित करण्याची वेळ आलेली असतांना एखाद्या सामाजिक शास्त्राच्या अध्यापनात १०० वर्ष झालेली असतांना त्याच्या वाढीचा विस्ताराचा आढावा घेणे म्हणूनच अभिनंदनीय ठरते. या वर्षी महाराष्ट्रातील दोन विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागास समाजशास्त्र सुरु होउन पन्नास वर्षे झालेली आहेत त्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा व्रिपीठ हे एक आहे. या विद्यापीठात आतापर्यंत ७९ पीएच. डी. शोध प्रबंध आणि २०८ एम. फिल. पदवी साठीचे लघु शोध प्रबंध अभ्यासकांनी यशस्वीरित्या सादर केलेले आहेत. विद्यापीठाच्या समृध्द शैक्षणिक परंपरेचा विस्तारपूर्वक आढावा स्वतंत्रपणे घेता येईलच परंतु डॉ. सुधाताई काळदाते यांनी विभागाला दिलेले योगदान जरी अभ्यासले तरी एक मोठा कालखंड अभ्यासता येईल. कारण डॉ. सुधाताई काळदाते या विभागाच्या सुरुवातीपासून म्हणजे १९६८–६९ पासून ते १९९६ त्यांच्या सेवानिवृत्ती पर्यंत विभागात कार्यरत होत्या. त्या पैकी १९८४ ते १९९१ या काळात त्या विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होत्या, तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अकॅडमिक स्टाफ कॉलेजच्या पहिल्या संचालक म्हणून सुध्दा जबाबदारी व्यवस्थितपणे पार पडली, याशिवाय त्यांनी विद्यापीठाच्या वेगवेगळया महत्वाच्या समित्यांवरही काम केले आहे.

महाराष्ट्रात समाजशास्त्र विषय विद्यापीठ स्तरावर शिकवण्यास सुरुवात झाली असताना ज्या काही मोजक्या समाजशास्त्रज्ञांनी महत्वाची भुमिका बजावली त्यापैकी डॉ. सुधाताई काळदाते एक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा व्रिपीठ, औरंगाबाद च्या कार्यकक्षेत देवगिरी महाविद्यालयात १९६० साली प्रथम समाजशास्त्र विषय शिकविण्यास सुरुवात झाली, ती डॉ. सुधाताई काळदाते यांच्या सक्षम नेतृत्वाखाली. १९६६ ला देवगिरी महाविद्यालयातच पदव्युत्तर स्तरावर समाजशास्त्र विषय शिकविण्यास सुरुवात झाली. पुढे १९६७ साली तत्कालीन मराठवाडा विद्यापीठात समाजशास्त्र विभाग सुरु झाला आणि त्या विभागात अध्यापन करण्यासाठी डॉ. सुधाताई काळदाते यांची नियुक्ती केल्या गेली. त्यानंतर काही दिवसातच डॉ. एम. जी कुलकर्णी हे विभागात रुजू झाले. डॉ. कुलकर्णी हे त्यापूर्वी डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या हाताखाली संशोधक सहाय्यक म्हणून काम करत होते आणि तेथून ते औरंगाबादला आले. डॉ. एम. जी. कुलकर्णी यांच्यामुळे तत्कालीन समाजशास्त्र विभागाचा संबंध डॉ. जी. एस. घूर्ये यांच्या विचारधारेशी जोडला गेला, तर डॉ. सुधाताई काळदाते यांच्यामुळे पुणे विद्यापीठात त्यावेळी कार्यरत असलेल्या डॉ. वाय. दामले आणि इरावती कर्वे यांच्या वैचारिक परंपरेशी हा विभाग जोडला गेला असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. कालांतराने डॉ. आर. बी. बिलावर, डॉ. व्ही. व्ही. देशपांडे हेही विभागात अध्यापक म्हणून रूजू झाले. त्याचवेळी विभागाच्या पहिल्या बेंचचे विद्यार्थी डॉ. बी. एल. जोशी हे संशोधक सहाय्यक म्हणून विभागात रुजु झाले. परभणीच्या शिवाजी महाविद्यालयात त्यावेळी डॉ. उत्तम भोईटे आणि डॉ. अनुराधा भोईटे या कार्यरत होत्या. हे दोघेही नंतर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विषयाच्या अध्ययन अध्यापन आणि संशोधनात महत्वाची भूमिका बजावत राहिले. १९७९ ला डॉ. उत्तमराव भोईटे पुणे विद्यापीठात अध्यापन करण्यासाठी गेले आणि त्यानंतर १९८२ मध्ये डॉ. अनुराधा भोईटे पुणे विद्यापीठात गेल्या तोपर्यंत विद्यापीठ विभागाचा एक प्रकारचा दबदबा संशोधन क्षेत्रात निर्माण झालेला होता. डॉ. सुधाताई काळदाते या तत्कालीन औरंगाबाद मध्ये पुण्याहून आलेल्या आणि पुरोगामी विचारांच्या अध्यापनाबरोबरच सामाजिक क्षेत्रात विशेषत: समाजकार्यात सहजगत्या वावरणा–या म्हणून सततच लोकांच्या कुतूहलाचा विषय ठरल्या होत्या. कारण मराठवाडयाचे त्यावेळचे वातावरण हे पुण्याच्या तुलनेत अतिशय प्रतिगामी, स्त्रियांच्या संदर्भात अतिशय जुनाट बुरसटलेल्या विचारांचा प्रभाव असलेले होते. अशावेळी पुण्याहून आलेली एक तरुणी अध्यापनात आणि औरंगाबादच्या सामाजिक जीवनात आपल्या स्वतंत्र प्रज्ञेने सहजगत्या सहभागी होणारी, स्वत:च्या स्वतंत्रपणे घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणारी असू शकते हे अनेकांना समजावून घेणेच अवघड होते. मराठवाडा विद्यापीठाच्या एकंदरीत वाढ आणि विस्ताराचा हा कालखंड होता. अनेक नवीन महाविद्यालय त्यावेळी सुरु होत होती. नवनवीन अभ्यासक्रम आणि ज्ञानशाखा यांची सुरुवात होत होती. अशावेळी डॉ. सुधाताई काळदाते यांनी केवळ समाजशास्त्र नाही तर इतर अनेक नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात महत्वाची भूमिका बजावली. नवीन कला महाविद्यालयात समाजशास्त्र विषय सुरु होईल याची दक्षता डॉ. सुधाताई काळदाते घेत असत त्यामुळे आज मराठवाडा विभागाच्या त्या काळात सुरु झालेल्या प्रत्येक महाविद्यालयात समाजशास्त्र विषय सुरु झालेला दिसतो. त्यामुळे आज समाजशास्त्र विषयाची मुळे अगदी खोलवर रुजलेली दिसतात. मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळाच्या सदस्य म्हणून मॅडमनी अनेक वर्षे काम केले. समाजशास्त्र विषयाच्या नवीन नवीन ज्ञानशाखांचा अभ्यासक्रमात समावेश झालाच पाहीजे हा आग्रह त्यांचा सातत्याने असे, त्यामुळे गुन्हेगारीशास्त्र वैद्यकीय समाजशास्त्र इ. शाखा महाराष्ट्रात रुजण्यास त्यांची भूमिका महत्वाची ठरली आहे. डॉ. सुधाताई काळदाते यांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे ते केवळ नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याविषयी आग्रह नसत, तर मराठवाडयातील विद्यार्थी हया नवीन शाखेचा अभ्यास कसा करु शकेल? हा त्यांच्या चिंतनाचा विषय असे. त्यामुळे नवीन विषयाचा चांगला संदर्भग्रंथ निर्माण करण्याचे किंवा लिहिण्याचे काम त्या विषयाला उपलब्ध नाही असे होत नसे. ग्रंथलेखन करत असताना त्या विषयाचा संपूर्णपणे स्वत: अभ्यास करुन अतिशय सोप्या पध्दतीने परंतू, समाजशास्त्रीय संकल्पनांचा परिपूर्ण वापर करुन एक समृध्द ग्रंथ तयार होईल, यावर त्यांचा कटाक्ष असे. अनेक समाजशास्त्रज्ञ आपापल्या मातृभाषेत लिखाण करण्यास कमी दर्जाचे

समजत असतानाचा हा कालखंड होता. इंग्रजी भाषेत लिखाण करणे हे त्या काळातही लेखकाला एक प्रकारे उच्चस्थान मिळण्यासाठीचे एक साधन होते परंतु डॉ. सुधाताई काळदाते मॅडमनी जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांशी असलेल्या आपल्या जबाबदारीतून मराठीतून दर्जेदार ग्रंथ निर्मिती करण्यास अधिक महत्व दिले आजही त्याकाळात लिहिलेले त्यांचे ग्रंथ उपयुक्त ठरतात. संदर्भ ग्रंथ लिहिण्याचे त्यांचे काम अविरतपणे त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही सुरुच राहिलेले दिसते. ग्रंथ लिहीत असताना त्यांनी आपल्या सहका—यांना तसेच नंतर आपल्या संशोधक विद्यार्थ्यांना हया कामात सहभागी करुन घेतलेले दिसते. त्यांचे एकूण ३० संदर्भग्रंथ प्रकाशित झालेले दिसतात. विभागांमध्ये अध्यापन करणे हा त्यांच्या कामाचा एक भाग होताच. परंतु, व्रिार्थ्यांसाठी तो एक आनंददायी असा अनूभव असे. मी विभागात १९७९ पासुन व्रिद्यार्थिनी होते त्यावेळी मॅडम विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणे तसेच समित्यांवर काम करत होत्या त्यांच्या व्यस्त दिनचर्येतही कधी तास न झालेला मला आठवत नाही. वेळेवर वर्गात येणा—या तासाला काय शिकवायचे याचे टिपण घेऊनच त्या तासाला येत असत. वर्गातल्या प्रत्येक व्रिद्यार्थ्याला आपण मांडलेला विषय समजलेला आहे याची खात्री करुनच वर्गातून बाहेर पडत असत. प्रत्येक विद्यार्थ्याचा इतिहास त्यांना माहिती असे, विद्यार्थी कोणत्या सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीतून आला आहे हे त्यांना माहिती असे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी प्रसंगी चाकोरीबाहेर जाऊनही मदत केलेली आहे. पण केलेल्या मदतीचा कधीही त्यांनी खाजगीतही उच्चार केला नाही. त्यांचे घर हे गरीब व्रिद्यार्थ्यांसाठी तर हक्काचा आधार होते. त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत किती विद्यार्थी तिथे राहून गेले याची गणतीच नाही. संशोधन हा एक त्यांच्या व्यक्तिमत्वाचा पैलु आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९ विद्यार्थ्यांनी विद्यावाचस्पती आणि २५ विद्यार्थ्यांनी एम. फिल., पदवी प्राप्त केली आहे, या संशोधनासाठी विद्यार्थ्यांमार्फत हाताळल्या गेलेल्या विषयांकडे नजर टाकली, तर समाजशास्त्र विषयाच्या विविध ज्ञानशाखा मध्ये संशोधनाचे काम मॅडमच्या मार्गदर्शनाखाली झालेले आढळून येते.

शिबिरार्थीची शिबिरातील वर्तणूक आणि वाटचालीची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहणी करणे तसेच अहवाल लेखनातील सहाय्य करण्याची जबाबदारीही त्यांनी पार पाडली. या अहवालावरील ग्रंथ आय. एल. ओ. ने १९८० पर्यंत प्रकाशित केला, या ग्रंथाला मिर्दाल यांची प्रस्तावना आहे. तसेच काळदाते मॅडमच्या मार्गदर्शनाखाली यु. एस. आय. डी. अमेरिकन आरोग्य संघटनेने महाराष्ट्रातील आरोग्य सेवांच्यादृष्टीने कमकुवत म्हणून पायाभूत पाहण्यासाठी उस्मानाबाद आणि परभणी हे दोन जिल्हे निवडले होते, त्यातील प्रत्येकी ४० गावातून प्रत्येकी ५० कुटुंबाची पाहणी करुन दिली. यामध्ये सोळा विद्यार्थी विद्यार्थिनींनीसह सहा महिने पाहणी आणि दोन महिने संकलीत केलेल्या तथ्यांचे कोडींग करुन देण्याचे काम महत्वाचे होते. संशोधनाबरोबरच डॉ. काळदाते मॅडम यांनी मराठीमध्ये समाजशास्त्रीय लिखाणाची मोठी जबाबदारी पार पडलेली दिसते. विकेंद्रित लोकशाही हे त्यांनी अनुवादीत केलेले १९६२ चे पहिले पुस्तक, ते जीवन सुधा हे २००८ मध्ये लिहिलेले आत्मचरित्र अशी जवळपास तीस पुस्तके लिहिलेली दिसतात समाजशास्त्र विषयातल्या विविध ज्ञानशाखा मध्ये समाजशास्त्रीय परिभाषेतील दर्जेदार ग्रंथनिर्मिती त्यांनी केलेली दिसते. याव्यतिरिक्त जवळपास २५ लेख विविध विषयांवर लिहिलेले दिसतात. त्यामध्ये सोशॅलॉजिकल बुलेटिन पासून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यपिठाच्या विद्यापीठ पत्रिके पर्यंत विविध पत्रिकांचा समावेश आहे. वाई येथून प्रकाशित होण्या—या मराठी विश्व कोशांमध्ये त्यांनी अनेक विषयांवर सविस्तर नोंदी केलेल्या आढळतात.

डॉ. सुधाताई काळदाते यांनी १९७४ ते १९९० पर्यंत अनेक देशांमध्ये समाजशास्त्र विषयाच्या अनुषंगाने अनेक दिवस वास्तव्य केले. त्यामध्ये आय. एल. ओ. ने आयोजित केलेल्या कामगार पुढा—यांच्या कार्यशाळेत समुपदेशनाचे काम करण्यासाठी डेन्मार्क, स्वीडन, ऑस्ट्रिया, जर्मनी, इटली आणि स्वित्झर्लंड या देशांमध्ये दोन महिने वास्तव्य केलेले. तसेच १९८१ मध्ये ग्रीसमध्ये दहा दिवसांचा दौरा केला तर १९८३—८४ मध्ये त्यांना यूजीसीच्या पीएच. डी. नंतरच्या संशोधनासाठी दहा महिन्यांची शिष्यवृत्ती मिळाली होती ती सार्वजनिक आरोग्य या विषयावर काम करण्यासाठी यु. सी. एल. ए. लॉस एंजेल्स, हॉपकिन्स विद्यापीठ, बाल्टिमोर, स्ट्रगलर्स विद्यापीठ, ब्रनस्विक आणि बोस्टन विद्यापीठात त्यांनी या शिष्यवृत्ती अंतर्गत काम केले. १९८७—८८ मध्ये मलेशिया थायलंड सिंगापूर आणि १९९० मध्ये त्या ऑस्ट्रेलियातील पर्थ आणि सिडनी येथेही जाऊन आल्या.

डॉ. सूधाताई काळदाते ह्या समाजशास्त्रज्ञ, अभ्यासक आणि लेखन कार्यात गुंतलेल्या एक यशस्वी लेखिका ह्या पलीकडेही एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक महत्वाचा पैलू आहे. औरगांबाद शहरातील अनेक सामाजिक संस्थ्यांशी त्यांचा जवळचा संबंध होता प्रेरणा ट्रस्ट ह्या साठी काम करणाऱ्या संस्थेशी त्या जोडलेल्या होत्या. तसेच १९९४ मध्ये औरगांबाद शहरात आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या परितक्त्या परिषदेतून नारी विकास प्रतिष्ठान या संस्थेची सुरुवात झाली त्यामध्येही त्यांची मुख्य भूमिका होती. १९९४ ते २००१ पर्यंत या संस्थेचे कार्य त्यांच्याच घरातून सुरु होते. १९७३ पासून अनाथ मुलांमुलींसाठी बालग्राम ही संस्था सुरु झाली या संस्थेशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. त्यांच्या आवडीचे आणखीन एक काम म्हणजे सदस्य म्हणून आणि नंतर चेअर पर्सन म्हणून एथिक्स कमिटी वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद येथील काम होय. याबरोबरच शांतता मंडळ औरंगाबाद, जिल्हा दक्षता समिती अशा अनेक समित्यांवर त्यांनी काम केले.

समाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांनी समाजाला केवळ आपले श्रम दिले नाहीत तर महाराष्ट्रातील जवळपास ३५ संस्थांना सुमारे अकरा लाखांच्या देणग्या १९९० ते २००७ या कालखंडात त्यांनी दिलेल्या आहेत, याची नोंद त्यांच्या आत्मचरित्रात आढळते, परंतू त्यांच्या संपर्कात आलेल्या कोणत्याही व्यक्ती याची साक्ष देईल की कोणतेही सामाजिक काम जर निधी कमी पडला तर मॅडम सर्वात प्रथम मदत करत असत. त्यामुळे त्यांनी समाजाला परत केलेला निधी कितीतरी मोठा नक्कीच असणार आहे.

आयुष्यभर अध्ययन, अध्यापन, संशोधन, लिखाण आणि सामाजिक कार्यात सतत गुंतलेल्या मॅडमना पाहणं हा आम्हा विद्यार्थ्यांसाठी अभ्यास होता. सेवानिवृत्तीनंतरही वेळेचे काटेकोर नियोजन त्यांनी केलेले असे, एकाच दिवशी जर तीन—चार मीटिंग असतील तर त्या मीटिंग पूर्वी झालेल्या मिटिंगच्या नोंदी असलेल्या वह्या टेबलवर ओळीने मांडून ठेवलेल्या असत. प्रत्येक मीटिंगमध्ये मागे काय झालं हे तपासून आता काय करायचे याचा आराखडा तयार असे. संपूर्ण दिवसभरात काय काम करायचे आहेत याची नोंद केलेली असे त्यामुळे मी विसरले, मला वेळ झाला नाही, अशी कोणतीही कारणे कधी त्यांनी दिली नाहीत किंवा त्यांच्या विद्यार्थ्यांनी दिलेली त्यांना चालली नाहीत. विद्यार्थ्याची अडचण असेल तर त्याला पुढे येऊन कोणतीही मदत करण्यास त्यांनी कधी विलंब केला नाही, पण विद्यार्थी काम करण्यास विलंब लावतो आहे हे त्यांना कधीही सहन झाले नाही त्यामुळे आजही त्यांच्या आठवणी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरत आहेत. एवढे मात्र खरे कि अगदी शेवटीही त्यांचा मरणोत्तर देहदान करण्याचा निर्णय आयुष्यभर त्यांनी ज्या मूल्यांची जोपासना केली त्यां मुल्यांना सुसंगत असाच होता. ज्या पुणे शहराने त्यांना घडवले त्या शहरातच त्यांना मृत्यू येणार आणि तेथील वैद्यकिय महाविद्यालयाला त्यांचा देह दान स्वरुपात परत जाणं हा एक विलक्षण योगायोग आहे. औरंगाबाद ही त्यांची कर्मभूमी त्या कर्मभूमी ला त्यांनी सढळहस्ते अनेक परीने अनेक रुपाने मदतच केली, त्यामानाने औरंगाबादने त्यांना कमी मानसन्मान दिला असे वाटते. डॉ. सुधाताई काळदाते ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरु झाल्या असत्या तर त्यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा नवीन आयाम निर्माण केला असता हे मात्र नक्की खरे.

# पीएच. डी. संशोधन पर्व : निकड बदलाची

**डॉ. नारायण चौधरी**, निवृत्त प्राध्यापक (सामाजिकशास्त्रे) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२.

एकविसाव्या शतकातील दुसरे शतक पूर्ण होण्यासाठी फार थोडा कालावधी आहे तरीही आजपर्यंत मी मूल्यमापन केलेल्या ५२ पीएच. डी. प्रबंधातून मला एकच 'सर्वेक्षणांतील टक्केवारी' असा कल आढळला. यु. जी. सी. च्या अपेक्षेप्रमाणे आपणांस प्रबंधांमध्ये गुणवत्ता आणणे आवश्यक आहे. ही गुणवत्ता म्हणजे नेमके काय करणे अपेक्षित आहे? याचा उहापोह या लेखनांतून मी करणार आहे. मी तपासलेले प्रबंध हे महाराष्ट्रातील विधानसभेने मान्य केलेल्या विद्यापीठातील आहेत, त्यांत बहुतांश प्रबंध हे विदर्भातील आहेत.

प्रथमत: आपल्याला एक गोष्ट मान्य करावी लागेल, जी मीशेल जी. डी. याने 'समाजशास्त्राची शंभर वर्षे' हया पुस्तकातून वर्तविली आहे. '' समाजशास्त्र अजूनही तत्वज्ञानात्मक आणि व्यवहारात्मक कृती आहे. या दोन्ही गोष्टी सामान्यपणे आणि त्याच्या विशेषभागातून किंवा दृष्टीकोणातून मानवी समाज जिवनाशी निगडीत असतात. त्यामुळे ते एन्सायक्लोपिडीक आणि तुकडयांतुकडयांमध्ये सामावलेले आढळते'' असे मीशेल ने १९६८ साली म्हणजे दीडशे वर्षापूर्वी म्हटले होते. आजपर्यंत आपला कल हा व्यवहारात्मक कृतीकडे जास्त आहे. त्यास फारच क्वचित तत्वज्ञानात्मक जोड दिली जाते. यास प्रमुख कारण म्हणजे आपण ढोबळ मार्गाने समस्या मांडतो व त्यावर सर्व्हेक्षण करून सामग्रीचे विश्लेषण करतो. तेही सांख्यिकीमध्ये फक्त टक्केवारीची मांडणी करून. आपण फक्त टक्केवारीचा कमी जास्तपणा त्या—त्या रकान्यातील गुणवाचक दर्शविलेल्या शब्दांसाठी करतो. थोडक्यांत, टक्केवारीत कमी—जास्तपणा त्या—त्या रकान्यांत कां असतो किंवा आहे याचे विश्लेषण केले तर आपणांस ढोबळ एक—चल वारंवारिता देतांना व्दिचल (क्रॉसटॅब) वारंवारिता कोठे देता येईल याचा अंदाज घेता येईल. उदाहरणार्थ आर्थिक उत्पन्नाचा एक चल देतांना जर कमी—जास्त टक्केवारी आढळली तर ती कशामुळे येते यावर जास्त विचार करून त्याची समाजशास्त्रीय कारणे शोधता येतात. ही आर्थिक उत्पन्नातील तफावत शिक्षण—दर्जामुळे असू शकेल किंवा जातीय विषमतेमुळे असू शकेल. तेव्हा व्दिचल तक्ता/कोष्टक देवून आपण प्रत्यक्ष कारणही शोधू शकतो. एखादा चल जर संख्यात्मक असेल, जसे कुटुंबातील मुले किंवा प्रतिसादकांचे वय किंवा आर्थिक उत्पन्न असेल तर आपणांस मुलांची सरासरी/सरासरी वय/सरासरी आर्थिक उत्पन्न देणे आवश्यक ठरते. माझ्या परीक्षणांतून असे फक्त ४ ते ५ टक्के प्रबंधांमध्येच मला आढळले. व्दिचल कोष्टक यातून समाजशास्त्रीय विश्लेषनाची गुणात्मकता वाढते. ही एकचल कोष्टके किंवा व्दिचल कोष्टके नंतर सांख्यीकीय चाचणीसाठी वापरता येतात. त्यांवरून त्या चलांचे सांखिकीय महत्व/सिग्नीफिकन्स काढता येतो. ह्या विषयी आपण पुढील गुणात्मक विवेचनांतून बघणार आहोत.

**पीएच. डी. चा विषय कसा निवडावा? :—** ह्यावर लिहिण्याचे मुख्य कारण म्हणजे समाजशास्त्रातील संशोधनासाठी पीएच. डी. ला विषय हे ढोबळ मार्गाने निवडले जातात. चांगला विषय निवडण्याचे कष्ट कांही वेगळेच असतात. खरं म्हणजे आपल्या मार्गदर्शक प्राध्यापकाचे समाजशास्त्रातील वाचन जास्त असते. तेव्हां ते आपल्याला चांगला विषय देवू शकतात. कारण त्यांनी दिलेल्या विषयांवरचे संदर्भही ते निटपणे देवू शकतात. थोडक्यात तूम्ही जी समस्या मांडता त्या समस्येपर्यंत पोहचण्यासाठीचे संदर्भ हे आपले मार्गदर्शक आपणास देतात. ह्या पध्दतीने समाजशास्त्रीय समस्या मांडण्याचे कष्ट हे सुलभ होतात. पण ढोबळ मार्गाने निवडलेल्या विषयासाठी आपणांस त्या संदर्भातील वाचन कोणते करायचे हे शोधावे लागते. त्यासाठी गुगल सर्च सगळयात सोपा मार्ग अथवा त्या विषयावरील तज्ञांसोबत चर्चा करून विशेष संदर्भ घेवून ते वाचावे ह्यांस थोडा वेळ जास्त द्यावा लागतो. थोडक्यांत समस्येची रूपरेषा मांडण्याचे काम फार जिकरिचे असते.

**नमुना निवड :—** नमुना निवड करतांना प्रत्येक संशोधक हा यादृच्छीक नमुना निवड करायचा प्रयत्न करीत असतो. परंतु फार कमी संशोधक त्याची पूर्ण प्रक्रिया प्रबंधात मांडत असतात. नमुना निवड ही विषयाला धरून असावी. आपणांस जेव्हा नमुना निवडीवरून संपूर्ण लोकसंख्येचे भाकीत द्यायचे असते तेव्हांच आपण यादृच्छिक नमुना निवड करावी, असे भाकीत द्यायचे नसेल तर आपण हेतूनुसार (परपझीव्ह) नमुना निवड करावी. नमुना निवड केल्यावर बऱ्याचदा असे आढळते कि नमुना आकार हा २००, ३००, ४०० किंवा ५०० असा असतो. तेव्हां शंका येते कि सर्व्हेक्षण करतांना प्रतिसाद न देणारे व्यक्ति ह्या संशोधकाला आढळलेच नाही कां? म्हणून प्रबंध लिहितांना निवडलेला नमुना आकार आणि त्यांतून प्रतिसाद न देणारे किती ह्याचे स्पष्टीकरण करावे व प्रत्यक्ष प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या सामग्री पृथाकरणासाठी घ्यावी.

**सामग्री पृथ:करण (ॲनालिसीस) :—** सामग्रीचे पृथ:करण करतांना आपण एस. पी. एस. ह्या सॉफ्टवेअरचा वापर केला आहे का नाही हे लिहावे. जर मॅन्युअली सामग्री ॲनालीसीस केले असेल तर तसे लिहावे. कारण मॅन्युअल सामग्री ॲनालीसीस केले असेल तर तसे लिहावे. कारण मॅन्युअल सामग्री ॲनालीसीस हे सर्वसाधारण एकचल वारंवारीता करण्यास सुलभ असते. तर एस. पी. एस. एस. पॅकेज आपण क्रॉसटॅब म्हणजे व्दिचल ॲनालीसीस साठी सहजपणे वापरू शकतो. व त्याचप्रमाणे साख्यंकी चाचणीसाठी सुध्दा ते सुलभ ठरते.

सामग्री पृथ:करणात सर्वसाधारणपणे टक्केवारीचा वापर सर्वात जास्त प्रमाणांत आढळतो. ही टक्केवारी जो यादुच्छिक नुमना निवडीसाठीच्या सामग्रीसाठी वापरली असेल तर आपण सांख्यीकी सिग्नीफिकन्स, काई स्वेअर चाचणी वापरून देवू शकता. हे देतांना प्रबंधात फक्त काई स्क्वेअर मूल्य, डिग्री ऑफ फ्रिडम आणि प्रोबॅबिली लेव्हल ऑफ सिग्निफीकन्स लिहावा. आपली नमुना निवड जरी हेतुपूर्वक (परपझीव्ह) असली तरीही आपण नॉन—पॅरामेट्रीक

चांचणी काई–वर्ग चाचणी वापरू शकता. दोनही नमुना निवडीसाठी काई वर्ग देण्यासाठीचे गणित/फॉर्म्युला सारखाच असतो. तसेच आपण गृप–डेटा डिस्ट्रीब्युशन दिले असेल तर योग्य पध्दतीने त्या चलाची सरासरी संख्या देवून त्याचे विश्लेषण करणे ओपेक्षित असते.

काई वर्ग प्रमाणेच आपण इतरही चांचणी सामग्रीच्या गुण–विशेषांनुसार वापरू शकता. जसे टी टेस्ट आणि झेड–टेस्ट. आपली नमुना निवड जर यादृच्छिक नसेल तर आपण सांख्यीकी चांचणीचा वापर किंवा उच्चश्रेणी सांख्यीकी पध्दतीचा वापर करू शकत नाही असा गैरसमज काही संशोधकांमध्ये आढळतो परंतू हेतूपुर्वक निवडलेल्या साम्रगीसाठी सुध्दा नॉन पॅरामॅटीक सांख्यिकी पध्दतीचा आपण वापर करून चांगले साम्रगी पृथ:करण देवू शकतो.

सामग्री पृथ:करण देतांना सर्वसाधारणपणे आपण उद्देशांचे ॲनालीसीस कोष्टके ही प्रबंधकाच्या उद्दीष्टांनुसार वर्गीकरण करून द्यावी व प्रत्येक उद्दीष्ट त्या कोष्टकांनुसार कशी निष्कर्षाला पोहचली ह्याचे विवेचन करावे.

कांही प्रबंधामध्ये उद्दीष्टे आणि गृहीतके ह्या दोन्ही गोष्टी दिलेल्या असतात. त्यात बऱ्याचदा एखादे उद्दीष्टांसाठी ओढून–ताणून गृहीतक देण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक उद्दीष्टाएवढे असतात असे नाही. आपण उद्दीष्टांनुसार सुध्दा आपले सामग्री पृथ:करण करू शकतो. सर्वसाधारणपणे गृहीतक देतांना स्वतंत्र चल (इंडीपेडेंट चल) अवलंबिता चल (डिपेंडेट चल) ह्यांचे संबंध (रिलेशन) द्यायचे असतात. उदाहरणार्थ सिगारेट किंवा बिडी ओढण्याच्या सवयीने कॅन्सर होतो. ह्या गृहीतकांत सिगारेट किंवा बिडी स्वतंत्र चल (इंडीपेडेंट चल) आहे. व कॅसर हे अवलंबविता चल (डिपेंडेट चल) आहे. परिणाम हा अवलंबविता चल (डिपेंडेट चल) असतो. ज्यामुळे हा परिणाम होतो ते कारण म्हणजे स्वतंत्र चल (डिपेंडेट चल) असतो.

कांही प्रबंधामध्ये सामग्री कोष्टके आणि त्यावरील लेखही (ग्राफ) दिले जातात. फक्त जेथे आवश्यक आहे तेथेच आलेख द्यावा. उदाहरणार्थ शहर व ग्रामीण भागातील बीडी/सिगारेट पिणाऱ्यांचा व्याप जर दर्शवायचा असेल तर आलेख देण्यास हरकत नाही. एखाद्या गोष्टीवर ठळकपणे जोर देवून स्पष्ट करायचे असल्यास आलेख आवश्यक ठरतो.

आपण परिशिष्ठांमध्ये शेडूल किंवा प्रश्नावली देत असतो परंतू त्या सर्व प्रश्नांतील प्रतिसादाचे आपण प्रत्यक्ष प्रबंधन विश्लेषण केलेले आहे किंवा नाही हे संशोधकाने नेहमी तपासून पाहावे.

सामग्री–पृथ:करणाचे विवेचन करतांना आपण इतरांनी केलेल्या अभ्यासाचा संदर्भ देणे उचित ठरते. आपण केलेल्या पृथ:करणाचा विषय इतरांनी सुध्दा हाताळलेला असतो तेव्हां त्याचा संदर्भ आपल्या प्रबंधाच्या निष्कर्ष विवेचनांत येणे आवश्यक आहे. कारण समाजशास्त्रातील संशोधन हे क्वचितच युनिक असते.

# भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे

**प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड,** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर मो. ९४२३३४५५४५

मराठी समाजशास्त्र परिषद आणि तिची वार्षिक अधिवेशने त्यातून होणारी चर्चा, केली जाणारी मांडणी, होणारी अंतर्मुखता, जबाबदारीची जाणीव कार्यप्रवण बनवणारी ठरते. विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन केंद्रे, पदवी व पदव्युत्तर विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्याद्वारे केले जाणारे संशोधन, अध्यापन, अध्ययन याबाबत समाजशास्त्र सतत आगेकुच करीत आहे. परंतु या सर्व कार्यप्रवणतेत गुणवत्ता कितपत व कशी आहे याचे सिंहावलोकन अधूनमधून आणि तेही नि:पक्षपणे घडून यावे म्हणून भारतातील समाजशास्त्राच्या अध्ययनाला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त भारतातील समाजशास्त्राची इतकपूर्ती हा विशेषांक प्रकाशित होत आहे. त्याबद्दल परिषदेचे अत:करणपूर्वक अभिनंदन करु या मुल्यांकन हेच कोणत्याही प्रगतीचे मुख्य लक्षण असते. आपला विषय, त्यातील संशोधन, लेखन, अध्यापन, अध्ययन या सर्व बाबींकडे शैक्षणिक, सामाजिक जबाबदारीने, नव्या जाणीवेने पाहण्याचा दृष्टीकोन विकसित होवू शकला तर हाती घेतलेला हा उपक्रम खऱ्या अर्थाने सार्थक झाला असे मानता येईल.

समाजशास्त्र हे समाजाचा अभ्यास करणारे आणि समग्र समाज व्यवस्थेला दिशा देणारे शास्त्र आहे. 'समाजशास्त्रीय ज्ञान घेण्यासाठी आत या आणि सामाजिक संवेदनशीलतेच्या समृध्दीनंतर सेवेसाठी बाहेर पडा' असा आश्वासक समाजशास्त्रीय ज्ञानव्यवहार आपल्याला विकसित करावा लागेल. समाजशास्त्रीय अभ्यासकाची 'सामाजिक भूमिका' कशी असावी याबाबत जितके आपण अंतर्मूख होवू तितकी समाजशास्त्रीय अध्ययन विश्वाला योग्य दिशा, प्रेरणा मिळू शकेल. सामाजिक विचाराला चालना देता आली जनमानस प्रगमनशील, प्रोत्साहित करता आले तरच आपली समाजातील नैतिक उंची उंचावू शकेल.

खरेतर कोणत्याही शास्त्राचा प्रारंभ शून्यातून होत नाही. म्हणूनच बियरस्टेड म्हणतात, 'Sociology has a long past but only a short history' समाजशास्त्राला खूप मोठा भूतकाळ लाभला आहे परंतु त्याचा इतिहास मात्र खूप छोटा आहे. भारतीय समाजशास्त्राचा आरंभीचा काळ १९१९ ते १९४७ हा समाजशास्त्रीय विचार दृष्टीकोनाच्या रुजवणूकीचा राहिला आहे. १९४७ ते १९६६ हा कालंखड समाजशास्त्राच्या अभिवृध्दीचा ठरतो. १९४७ मध्ये Indian Sociological Society ची स्थापना झाली ही बाब समाजशास्त्रीय विकासाला वरदानात्मक ठरली. Sociological Bulletin, Contributions to Indian Sociology, समाजशास्त्र संशोधन पत्रिका, समाजशास्त्र परिभाषाकोष यामुळे या शास्त्राच्या विचारदृष्टीला प्रेरणा मिळाली. १९६६ ते १९९१ या काळात प्रादेशिक भाषा हेच उच्च शिक्षणाचे माध्यम बनण्यास सुरवात झाली विस्ताराबरोबर काही प्रमाणात दर्जाची घसरण होवू लागली. १९९१ पासून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने समग्र समाज जीवनात मूलगामी उलथापालथ घडून येण्यास सुरुवात झाली. आजचे समाज जीवन झपाटलेपणाने ध्रुतगतीने, सर्वस्पर्शी, बहुआयामी, विस्मयजनक स्वरुपात परिवर्तीत होत आहे. या बदलत्या प्रक्रियेचा अन्वयार्थ कसा लावावा हे तुम्हा आम्हा समोरील आव्हान आहे. आपल्या समाजात बदल होतानाच जातीभाव, लिंग भेदभावही बदलत्या पध्दतीने जोपासला जात आहे. म्हणूनच दिपंकार गुप्ता 'Mistaken Modernity : India Between world'. या ग्रंथात आपल्या देशातील लोकांच्या संबंधाची तऱ्हाच आधुनिक नाही. आधुनिकता आणि पारंपारिकता यांचे बेमालूम मिश्रण आपल्या जीवनशैलीत आढळते असा निष्कर्षात्मक सूर काढतात. 'The Mirror of Production' उत्पादनाचा आरसा या ग्रंथात जीन बॉड्रीलार्ड म्हणतात, 'आपण उत्पादनाचे व प्रेरणांचे गुलाम बनत आहोत.' समाजाचे Societal स्वरुप प्रभावहीन होत जावून सामाजिकतावादी, सांस्कृतिकतावादी समाज उपभोक्तावादी बनत आहे. म्हणूनच ते Society ला Consumer System तर व्यक्तीत Commercial Animal म्हणणे पसंद करतात. नागरी समुदायातील उच्चभ्रु वर्ग 'Hyper reality word' अतिवास्तव जगात प्रवेशीत होत आहे. प्रसार माध्यमे काही घटनांचे विपर्यासात्मक प्रक्षेपण करण्यात प्रभावी ठरत आहेत. त्यामुळे काही प्रमाणात प्रेक्षक, श्रोतेही वास्तवतेपेक्षा अतिवास्तवतेने प्रभावीत होत आहेत. त्यातून वास्तवात गौण वाटत जाते या विचित्र स्थितीचे वास्तवादी व शास्त्रशुध्द विश्लेषण करणे गरजेचे आहे.

समाजशास्त्रावर साधारणपणे १९६५ पर्यंत संरचनात्मक प्रकार्यवादाचा बराच प्रभाव होता. समाज ही एक व्यवस्था, संरचना आहे असे म्हणतानाच कळत नकळत या तत्वाशी बांधिलकी निर्माण झाली त्यातून स्थैर्य हाच संरचनेचा गाभा असतो. असे आम्ही मानू लागलो. त्याचबरोबर स्थैर्य हेच व्यवस्थेचे अंतिम उद्दिष्ट असते असा आदर्शवादही उराशी बाळगू लागलो. त्यामुळे परिवर्तनशीलतेचा विसर पडू लागला. सुदैवाने आज समाजशास्त्रीय अध्ययनाचे स्वरुप बदलत आहे. अनेकजन सामाजिक, राजकीय चळवळीच्या संशोधनाकडे वळत आहेत. अनेक चळवळी संपल्या आहेत असे म्हटले जात असताना चळवळी सर्वार्थाने केव्हाही संपत नसतात. चळवळीला अनेक चैंमे असतात. चळवळी केव्हा संपतात जेव्हा नेतृत्व, विचारसरणी, संघटन नसते, फारसे अनुयायी नसतात तेव्हाच. या सर्व बाबी असताना चळवळी संपल्या आहेत. असा दावा करता येत नाही. समाजशास्त्रात अनेक चळवळीचा अभ्यास होत आहे ही बाब या शास्त्राच्या विकासाला पोषक ठरते. भारतीय समाजाचा अनेक परिप्रेक्ष्यातून अभ्यास होत आहे.

प्राच्यविद्या, ग्रांथीक परिप्रेक्ष्याद्वारे भारतीय सामाजिक वास्तवता सुक्ष्मपणे समजून घेताना प्राचीन ग्रंथातील विचाराची मीमांसा केली जाते. भारतीय समाज, संस्कृतीला मोठा ऐतिहासिक वारसा आहे. तो जाणून घेण्यासाठी संस्कृत, पाली भाषेतील ग्रंथ महत्वपूर्ण स्त्रोत ठरतात. समाजशास्त्र, मानवशास्त्राच्या आरंभीच्या काळात ब्रिजेद्रनाथ सील, बी. के. सरकार, जी. एस. घुर्ये, इरावती कर्वे, लुई डयूमा यांनी जातीच्या अध्ययनात प्राच्यविद्या परिप्रेक्ष्याचे समर्थन केले. वर्तमानकालीन घटनांचे अध्ययन करताना भूतकाळ समजने गरजेचे बनते. विशेषत: सामाजिक संस्थांची संरचनात्मकता, व्यवस्थात्मकता, सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी लक्षात घेण्यासाठी वर्तमान काळाबरोबर भूतकाळाशी तुलना करण्यासाठी हा परिप्रेक्ष्य विशेष उपयोगी पडतो. डॉ. ए. आर. देसाई यांनी भारतीय राष्ट्रवादाची पार्श्वभूमी, योगेंद्रसिंह यांनी भारतीय परंपराचे आधुनिकीकरण, सतीश सबरवाल यांनी नागरिकरणाची प्रक्रिया विश्लेषीत करण्यासाठी ऐतिहासिक परिप्रेक्ष्याचा स्वीकार केला आहे. उपेक्षित समुदायाच्या अध्ययनातही हा परिप्रेक्ष्य उपयुक्त ठरतो.

ब्रिटिशांच्या सामाजिक मानवशास्त्रातून संरचनात्मक प्रकार्यात्मक परिप्रेक्ष्य उदयास आला आहे. सखोल क्षेत्रकार्य निरीक्षण पध्दती हे या परिप्रेक्ष्याचे केंद्रस्थळ आहे. डॉ. डी. एन. धनागरे यांना हा

परिप्रेक्ष्य भारतीय समाजशास्त्राचा विकास साधण्यात महत्वपुर्ण ठरला आहे असे वाटते. डॉ. डी. एन. मजुमदार यांनी भारतातील भिन्न वंश व संस्कृतीचे, एम. एन. श्रीनिवास यांनी धार्मिक श्रध्दा, विधी, कर्मकांड याद्वारे भिन्न समुहात एकता कशी संमीश्रपणे दृढ बनते, याबाबत या दृष्टीकोनाआधारे विश्लेषण केले आहे. एस. सी. दुबे यांनी Indian Village या ग्रंथात हाच दृष्टीकोन स्वीकारला आहे. परंतु या परिप्रेक्ष्याने ऐतिहासिक परिप्रेक्ष्याकडे दुर्लक्ष केले आहे. खरेतर भारतीय समाजाला, संस्कृती, संस्थांना फारमोठा इतिहास आहे. परंतु हा परिप्रेक्ष्य केवळ वर्तमान संरचना आणि घटकामध्ये असलेल्या प्रकार्यात्मक परस्परावलंबना पर्यंतच मर्यादित आहे.

भारतीय समाजशास्त्राच्या जडणघडणीत मार्क्सवादी परिप्रेक्ष्यही महत्वपुर्ण ठरतो. डी. पी. मुखर्जी, ए. आर. देसाई, रामकृष्ण मुखर्जी हे मार्क्सवादी समाजशास्त्रज्ञ आहेत. डी. पी. मुखर्जी यांनी वसाहतवादी काळातील भारतीय परंपरा आणि संस्कृतीचा द्वद्वात्मक विश्लेषणाद्वारे अन्वयार्थ लावला ए. आर. देसाई यांनी कृषक समाजातील संबंध समजून घेण्यासाठी हा परिप्रेक्ष्य स्वीकारला. उत्पादन संबंध, शोषण, भांडवली विकास, वर्गीय स्थिती, संघर्ष, प्रतिरोध अंतर्विरोध, क्रांती या अनुषंगाने हा परिप्रेक्ष्य विचार करतो.

अभिजनवादी लेखन परंपरा प्रभावशाली, न्यायपूर्ण ठरत नाही म्हणून शोषित अंकीत जन, ठरावात्मक परिप्रेक्ष्याने समाजशास्त्राला नवीन आयाम दिला. नवमार्क्सवादाचा उद्गाता अन्तोनिओ ग्रामसी हे या दष्टीकोनाचे आद्य प्रणेते मानले जातात. ते म्हणतात, कोणत्याही समाजाचा इतिहास केवळ अभिजनवर्गाचा असू शकत नाही. डेव्हिड हर्डिमन यांनी भारतीय समाजाची मूलगामी चिकित्सा करताना गुजरातमधील खेडा जिल्हयातील शेतकरी चळवळ, पाटीदार जात, देसाई, पटेल, गोपालदास समुहाचा या परिप्रेक्ष्याद्वारेच अभ्यास केला. Changing Pattern of Domination and Subordination समजून घेतले. Domination hegemony द्वारे समाजातील एक वर्ग प्रभावशाली जीवन जगतो तर उपेक्षित समुदाय प्रभुत्व समाजाच्या अधिनस्त असतो ही वास्तवता निदर्शनास आणून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी Who were the Shudras, The Untouchables, Annhilation of caste, Brokan men theory mechanism of caste चे विश्लेषण या परिप्रेक्ष्याआधारेच केले. म्हणूनच हा प्ररिप्रेक्ष्य भारतीय समाजशास्त्रीय विकासात महत्वपूर्ण ठरत आहे.

निर्मल कुमार बोस, सुरजित सिन्हा हे सभ्यतात्मक प्ररिप्रेक्ष्याचे प्रणेते मानले जातात. हा प्ररिप्रेक्ष्य बृहत आणि लघु परंपरेच्या जटील संरचनेवर भर देतो. लोकसंस्कृति व लोकज्ञान मौखिक परंपरेतून चालत आले आहे.बाह्य, सामाजिक, सांस्कृतिक प्रभावाला आत्मसात करण्याच्या प्रक्रियेत एतदेशीय सांस्कृतिक लक्षणाच्या जतनाकडे हा परिप्रेक्ष्य लक्ष देतो. जतनाच्या माध्यमातून विकास Development throush conservation हे एक महत्वपूर्ण सूत्र ठरते. संस्कृति संघर्ष टाळून संस्कृति संगम साधण्यास उपयुक्त ठरणारा समन्वयात्मक प्ररिप्रेक्ष्य Sunthesis prespective चा आधार इरावर्ती कर्वे, अरविंद एम. शहा यांनी घेतला. या भिन्न परिप्रेक्ष्याद्वारे भारतीय समाजशास्त्राच्या अध्ययन, अध्यापन, संशोधन विश्वाला प्रगल्भ, अर्थवाही, मर्मग्राही बनविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

ग्रामीण समाज जीवनाचा सूक्ष्म पातळीवरुन अभ्यास कसा करावा हा आपल्या समोरील महत्वपूर्ण प्रश्न आहे. श्यामाचरण दुबे यांनी तेलंगनातील शमीरपेटचा, एम. एन. श्रीनिवास यांनी रामपूरचा, आन्द्रे बेतीय यांनी तंजोर जिल्हयातील श्रीपूरम खेडयाचा, गोरंग चटोपाध्याय यांनी रंजना नावाच्या खेडयाचा जसा समाजशास्त्रीय दृष्टीकानातून अभ्यास केला. त्या धरतीवर महाराष्ट्रातील एखाद्या खेडयाच्या अभ्यासावर महत्वपूर्ण पुस्तक आढळत नाही. त्रि. ना. अत्रे सरकारी कर्मचारी असूनही समाजशास्त्रीय अवलोकन करीत असत. त्यांचे 'गावगाडा' हे पुस्तक आधारभूत ठरते. इरावती कर्वे यांचा Group Relations हा ग्रंथही महत्वपूर्ण आहे. परंतु त्याचा प्रभाव पुढे फारसा राहिला नाही. खेडयाची बदलती रचना, बलुतेदारी, अलुतेदारीचे परिवर्तनशील स्वरुप, जात, जातीय जाणीवा, ताणतणाव, राजकारण याबाबतचे विश्लेषण करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. महाराष्ट्रातील जाती, जातीय राजकारणावर संशोधन करता येण्यासारखे आहे. प्रा. बाबुराव बावीसकरांचा Politics of Development हा ग्रंथ तसेच प्रा. जयंत लेले यांचा Elite Political हा ग्रंथ महत्वपूर्ण ठरतो. खेडयात केवळ नवे वर्गच निर्माण झाले नाहीत तर बदलती अर्थव्यवस्था, उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणारे संबंध, जातीय जाणीवा, परस्पर संबंध यांचा अर्थपूर्ण स्वरुपात अभ्यास होत गेल्यास समाजशास्त्रीय अभ्यासकांच्या संशोधनात्मक जाणीवा प्रबळ आहेत. हे दाखवून देता येईल. समाजातील दारिद्र्य, बेरोजगारी, गुन्हेगारी, लिंगभेदभाव यासारख्या ज्वलंत प्रश्नांवर आपल्याला लक्ष केंद्रित करावे लागेल. अशा परिषदांच्या माध्यमातून वातावरण निर्मिती होईल. महाराष्ढातील समाजशास्त्राला गौरवशाली परंपरा आहे या बौध्दिक परंपरेत खंड पडू नये याची आपण काळजी घ्यावयास हवी एवढेच.

आपला समाज, आपले प्रश्न आपण आपल्या पध्दतीने जाणून घ्यावयास हवेत. स्वतंत्रता प्राप्तीनंतर जी सत्ता आली तिने भांडवलदार, सरंजामदार, सावकार, व्यापारी या आर्थिकदृष्टया संपन्न वर्गास मुख्य प्रवाहात सामावून घेतले. अगदी तळातल्या आदिवासीच्या वाट्याला मात्र तीव्र शोषण, उपासमार, बकाल दारिद्र्य आले. जमीन, जंगल व शोषण हे आदिवासींचे ज्वलंत प्रश्न आहेत. आदिवासीच्या सांस्कृतिकतेवर अतिक्रमन होवून त्यांच्या मुळ संस्कृतीचे उच्चारण होतानाच त्यांच्या वाट्याला वंचितता, उपेक्षितता येत आहे. सापेक्ष वंचिता सिध्दाता आधारे आदिवासींची वंचितता विश्लेषीत करता येते. 'आहे रे' आणि 'नाही रे' हे प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. लाभधारक आणि लाभवंचित वर्ग यांच्या वाट्याला आलेली सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यात तफावत असते. वंचित वर्ग एकत्रीत येवून समान उपलब्धीसाठी चळवळी उभा करतो. त्या चळवळींचा परामर्श घेणे गरजेचे ठरते. चळवळीबाबत नकारात्मक भाव बाळगता कामा नये. याबाबत सुरजित सिन्हा म्हणतात, 'आदिवासींच्या चळवळीबद्दल धोक्याचा इशारा देण्यापेक्षा खऱ्याखुऱ्या एकात्मतेच्या चळवळीचे आपण स्वागत केले पाहिजे. तसेच अशा चळवळी सुरु होणार असतील तर त्यांना मदतच केली पाहिजे. आपण कोठपर्यंत खऱ्याखुऱ्या आदिवासी चळवळी शोधून काढू शकतो आणि त्यांना खऱ्याखुऱ्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेने आपल्यात समावून घेऊ शकतो हे महत्त्वाचे आहे.' धरणे, कालवे, खणी, औष्णीक वीज निर्मिती केंद्रे, वन्यजीव अभयारण्ये उद्योगधंदे, कारखाने यामूळे आदिवासींचे अस्तित्वच धोक्यात आले आहे त्यांची जीवन संस्कृती अस्थिर, विस्कळीत, असुरक्षित होत आहे. आजचे हे भृमित करणारे वास्तव कसे समजून घ्यावे हा आपल्या समोरचा प्रश्न आहे.

सरंजामी समाजाच्या भग्न अवशेषातून आधुनिक भांडवलवादी समाज उदयास आला आहे. पण त्यामूळे वर्ग–विरोध मात्र नष्ट झाले नाहीत. फरक एवढाच आहे की, जुने वर्ग गांजवणूकीची जुनी परिस्थिती, लढ्याचे जुने प्रकार जाऊन त्याऐवजी नवे वर्ग, नवी गांजवणूकीची परिस्थिती, लढ्याचे नवे प्रकार अस्तित्वात आले. सध्याच्या बदलत्या जगामध्ये होणारी भौतीक प्रगती स्वागतार्हय

असली तरी दुसऱ्या बाजूला माणसे मात्र एकमेकांना दुरावू लागली आहेत. कुटुंबाची घडी विस्कटू लागली आहे. निखळ मैत्रीची जागा स्वार्थी व्यवहाराने घेतल्याची उदाहरणे वाढत आहेत. या अनुषंगाने डॉ.गोपाळ गुरु म्हणतात, 'जो वर्ग राष्ट्रहीन (Stateless) बनला आहे परिघाच्या बाहेर फेकला गेला आहे तो बेघर (Homeless) बनला आहे त्याची अस्मिता लूप्त झाली आहे. ते बिनचेहऱ्याचे बनले आहेत.' अशा स्थितीत समाजशास्त्राचे अभ्यासक म्हणून आपण कशी आश्वासक स्थिती निर्माण करु शकू हा मोठा प्रश्न आहे. जागतीकीकरणाच्या माध्यमातून जे कार्पोरेट जग निर्माण होत आहे ते विराट आहे. प्रत्येक गोष्ट महाकाय असावी असे त्याला वाटत आहे. कदाचित एकविसाव्या शतकाच्या शेवटी जागतीकीकरणाची जागा ब्रम्हांडीकरण Cosmolization घेईल हे विश्व Global Village ऐवजी Cosmic Village बनेल या जागतीकीकरणाला मानवी चेहरा Human face कसा द्यावा याबाबत आपण अभिव्यक्त व्हावयास हवे. पीर सिंगर या लेखकाने One world; The Ethics of Globalization या ग्रंथात जागतीकीकरणातील आदर्श समाजाचे Utopia Society चे चित्र उभे केले आहे. एक जग, एक वातावरण, एक अर्थव्यवस्था, एक कायदा, एक समुदाय सहअस्तित्वाच्या Co-existence आधारावर जागतिक महासंघराज्याची संकल्पना साकार होईल हे भाकीत निव्वळ कपोकल्पीत ठरत नाही. या व्यवस्थेत जो वंचित, उपेक्षित, आदिवासी आहे त्यांचे काय स्थान राहील. हा खरा प्रश्न आहे.

Conventional Sociology परंपरागत समाजशास्त्राची अभिरुची सत्तधारी व धनवान लोकांपुरती मर्यादित राहीली म्हणून Radical Sociology उदयास आली. ज्ञानाचा उपयोग शोषित, पीडीतांच्या उत्थानासाठी व्हावा असे तिला वाटले. Applied sociology सामाजिक समस्यांची मिमांसा करुन त्या सोडविण्यासाठी उपाय सुचविण्यात अभिरुची घेते. Marginalised Sociology उपेक्षितांचा सर्वांगीण अभ्यास करण्यावर भर देते. या भिन्न विचारदृष्टीला अनुसरुन समाजशास्त्रीय विकास होणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात समाजशास्त्रीय ज्ञान संशोधनाच्या उपयुक्ततेवरच समाजशास्त्राचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. त्यादृष्टीने आपल्याद्वारे अध्ययन, अध्यापन, संशोधन, लिखान, विचाकृती घडून यावयास हवी.

बुध्दिनिष्ठता व तार्किकतेच्या आधारावर गौतम बुध्दाने जी विचारसरणी प्रतिपादन केली त्याने प्रभावित होवून अल्बर्ट आइनस्टाईन म्हणतात, बुध्दाने सर्वप्रथम वैज्ञानिक पद्धतीने विचार केला ते एक महान वैज्ञानिक ठरतात. माझ्या सापेक्षतावादी सिद्धांताचे श्रेय त्यांच्या पतित्यसमुत्पाद सिध्दांताला जाते. मध्ययुगीन काळातील धर्मसुधारणा चळवळ, पुररुजीवनवादी चळवळीमुळे माणूस हा विचार विश्वाचा केंद्रबिंदू बनला. व्यवस्थेची विचारप्रणाली Order Ideology आणि प्रागतिक विचारप्रणाली Progressive Ideology यांच्यातील Inter-relation मधून आधुनिक सामाजिक शास्त्रांचा उदय झाला आहे. Philosophical and Ideological Perspective मधून मुक्त होवून ती वास्तववादी बनत आहेत. Satisfied Elite Class ऐवजी ती आता Deprivied Marginalised General Class च्या अध्ययनात अभिरुची घेत आहेत. त्यात समाजशास्त्र आघाडीवर आहे. जगातील सर्वच मानवी समाजात कमी अधिक प्रमाणात Basic Sociatal Model of Domination मुलभूत दबाव संरचनात्मक व्यवस्था म्हणून पितृसत्ताक व्यवस्थेच्या अस्तित्वावरच आज समाजशास्त्राने प्रश्नचिन्ह उभे केले आहे. ते आता पुरुषी विचार दृष्टिकोनातून मुक्त होत आहे. स्त्री.पुरुष छळवादी नाते संपुष्टात येवून सममितीय संबंध प्रस्थापित होण्यास स्त्रीवादी परिप्रेक्ष्यामूळे प्रेरणा मिळत आहे. समाजशास्त्रात महिला दर्शन Womens representation होत आहे. ते उत्तरोत्तर अधिक प्रभावशाली, अर्थपूर्ण बनावयास हवे. Academic Culture च्या दृष्टीने अध्ययन विश्वासी संबंधीत पैलू संकलीत करणे, त्यातील अंतरसंबंधाचे अर्थपूर्ण विश्लेषण करणे यातच समाजशास्त्रीय विकास सामावला आहे.

व्यक्ती आणि समाजात सतत आंतरक्रिया घडून येते. या आंतरक्रीयेतून समाजात एका बाजूला समन्वय, समायोजन, समावेशन, एकात्मीकरण दृढीकृत होते तर दुसऱ्या बाजूला विसंवाद, विघटन, विपधगमन, संघर्ष उद्भवतो. समाजशास्त्र या प्रक्रियेचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करते त्यातून ज्ञान व आकलनाच्या जोरावर ते स्वत: घडत जाते तसेच समाजालाही दिशादर्शक प्रेरणा देते, हीच समाजशास्त्राची सार्थकता आहे.

समाज हीच समाजशास्त्राची प्रयोगशाळा आहे. पर्यावरणाचा बळी देऊन आर्थिक विकास होता कामा नये. पर्यावरण ही एक निसर्गाची अनमोल देणगी आहे. पर्यावरणाचा नाश म्हणजे पर्यायाने आपलाच विनाश या जाणीवेतून पर्यावरण संरक्षण संवर्धनाची जाणीव विकसित करण्याकामी पर्यावरणीय समाजशास्त्राला अधिक सक्षमपणे कार्यप्रवण बनावे लागणार आहे. केवळ सैध्दातिक, पध्दती शास्त्रात्मक, संकल्पनात्मक परिप्रेक्षात्मक अभिरुची घेवून चालणार नाही तर या ज्ञानाचा वापर प्रत्यक्ष समाजातील ज्वलंत प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी झाला पाहिजे या Applied stage ला समाजशास्त्र प्रवेशित झाले आहे. Community based research, participatory-action research, Translation research, sociological practice या बाबी आता महत्वपूर्ण ठरत आहेत. समाजशास्त्रीय सिद्धांत, पद्धती, संकल्पना, परिप्रेक्ष्य, साधने ।चचसपबंइसम पद्धतीने उपयोगात आणली जात आहेत. व्यावसायिक क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यास समाजशास्त्रीय ज्ञानव्यवहार उपयुक्त ठरत आहे. Consultancy ला महत्व येत आहे. प्रायोजकता Sponsors आणि गरजात्मकतेच्या आधारावर संशोधन घटक निर्धारीत होत आहेत. To create new social policies आणि Social planning च्या अनुषंगाने Social Engineering प्रक्रिया सक्रिय बनत आहे.

समाजशास्त्राला संधीची दारे खुली होत आहेत. त्यासाठी तुम्हीआम्ही सर्वांनी आपली Ability, Capacity, Efficiency, Communication Skill विकसीत करणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात Application of Sociological knowledge चे महत्व वाढत जाणार आहे. समाज जीवनाच्या बदलत्या गतीबरोबर भारतीय समाजशास्त्रीय अध्ययन विकसीत होत आहे ही बाब कौतुकास्पद ठरते. हे अध्ययन बहुआयामी, सर्वांगपरिपूर्ण बनले तरच या शास्त्राच्या अध्ययनात जीवंतपणा निर्माण होवू शकेल. भारतीय समाजशास्त्रीय अभ्यासकांनी सामाजिक संघर्ष, सामाजिक परिवर्तन, सामाजिक चळवळी, आधुनिकता यासारख्या अध्ययनाकडे लक्ष द्यावयास हवे. आर्थिक प्रगती, बदलणारी उत्पादन पद्धती, तंत्रज्ञान इत्यादीचा भारतीय समाज जीवनावर व सामाजिक संबंधावर कसा परिणाम होत आहे. याचा शोध घेणाऱ्या बौद्धिक परंपरेचे आपण वारसदार बनताना ती परंपरा एकुणच त्या गुंतागुंतीच्या आणि विलक्षण विरोधांनी व्यापलेल्या भविष्याला कसे सामोरे जाणार? हा खरा प्रश्न आहे. अशा स्थितीत गतिमान समाज जीवनाची समाजशास्त्रीय उकल करताना या शास्त्राच्या अध्ययन कर्त्यांना समाज विकास, समाज सुधारणा, समाजकल्याण इत्यादींसाठी महत्वपूर्ण भूमिका वठवावी लागेल. तरच समाजशास्त्रीय अध्ययन कर्त्यांचा समाजातील दर्जा उंचावू शकेल.

समकालीन स्थितीत समाजशास्त्रीय अध्ययनात आंतरक्रियात्मक दृष्टिकोन महत्वाचा ठरत आहे. या दृष्टीकोनाअंतर्गत प्रतिकात्मक आंतरक्रियावाद, प्रघटन शास्त्रीय समाजशास्त्र—Phenomenological Sociology, लोकजीवन पद्धतीशास्त्र—Ethanomethodology, वास्तवतेची सामाजिक बांधणी—Social Construction of Reality या अध्ययन पद्धती विकसीत होत आहेत. मानवी वर्तनाची सुक्ष्म दृष्टीकोणातून उकल करण्याचे कार्य समाजशास्त्रात प्रभावीपणे व नाविण्यपूर्ण पद्धतीने होत आहे. त्यातून समाजशास्त्रीय अंध्ययनात नवीन कल, प्रवाह उदयास येत आहेत. या बदलत्या अध्ययन पैलूंना अनुसरुन आपल्याला कार्यप्रवण बनावे लागेल. तरच समाजशास्त्राला समृद्ध व मुलगामी चेहरा मिळवून देण्यात आपण यशस्वी होवू शकू. संपूर्ण जग जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडले आहे. भिन्न देशातील समाजाबरोबरच भारतीय समाजावर त्याचे परिणाम होत आहेत. त्याचा व्यापक दृष्टीकोणातून अभ्यास होणे गरजेचे आहे. त्यासाठी विविध संचार माध्यमांचा, संगणकादि साधनांचा वापर केला पाहिजे. आपले अध्ययन वाढविणे आणि विद्यार्थ्यांची द्रुतगतीने होत असलेल्या परिवर्तनाला आवश्यक अशी स्वयं अध्ययनाची तयारी करुन घेणे गरजेचे झाले आहे.

भारतात एकोणीसाव्या आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी झालेले समाजचिंतन आणि प्रबोधन हे आपल्या दृष्टीने महत्वाचे आहे. यासंदर्भात डॉ. डी. एन. धनागरे म्हणतात, 'मुंबई विद्यापीठात आधुनिक समाजशास्त्र विषय तसा १९१९—२० मध्ये सुरु झाला असला तरी समाजशास्त्रपूर्व अवस्थेतील विचार व संकल्पना (Tought and concepts) ज्याला प्रा. रामकृष्ण मुकर्जी Pre-Sociological reference group म्हणतात. याचा वारसा जेवढा समकालीन समाजशास्त्राने घ्यायला हवा तेवढा घेतला नाही. किंबहुना त्यामुळेच आजच्या महाराष्ट्रातील समाज, यांच्या समस्या, त्यातून घडून येणारे बदल, त्यामागच्या अन्त:प्रेरणा आणि त्यातील अन्तर्विरोध ह्या सगळ्यांशी विद्यापीठे आणि महाविद्यालये यातून चाललेल्या समाजशास्त्र अध्ययन संशोधनाचा तिळमात्र संबंध नाही, असा जो एक समज जनसामान्यात आढळून येतो तो सर्वथा गैर आहे. असे म्हणता येणार नाही. जसे संशोधन झाले आहे त्यापेक्षा कमी लेखन प्रकाशीत होत आहे. ही बाब खटकणारी आहे. आपले अध्ययन, संशोधनाचा संबंध लोकांच्या जीवनाशी, त्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांशी असल्यास ती गोष्ट उपयूक्त ठरते.

भारतीय समाजशास्त्रीय अभ्यासक आपला समाज, आपली संस्कृती, परंपरा आणि एतदेशीय विचाराच्या संग्रहाशी सुसंवाद साधण्यावर भर देत आहेत. ही बाब आपल्या समाजशास्त्रीय विचार विश्वाच्या विकासाला चालना देणारी ठरते. या अनुषंगाने डॉ. लीला दुबे म्हणतात, 'एतदेशी दृष्टिकोणाचा उपयोग, एतदेशी विचारधारांचे योग्य परिशीलन तसेच घटना, वस्तू, कृती यांचा लोक कसा अन्वयार्थ लावतात यावर विशेष भर देण्यात येत आहे. माहितीचा योग्य उपयोग, तथ्यांचे विश्लेषण आणि संशोधन याद्वारे निष्कर्ष सादर करणाऱ्या काही विशेष पद्धती विकसीत केल्या जात आहेत. समाजाचे सखोल आणि निकोप आकलन होण्याच्या दृष्टीने त्यांचे महत्व आहे जसा दावा केला जातो किंवा निदान तसे समजले तरी जाते. एतदेशीकरणाच्या प्रक्रियेच्या संदर्भात त्याचे विशेष महत्व आहे. म्हणून त्यांचे परीक्षण करणे आवश्यक आहे. या संदर्भात सत्य जाणण्यासाठी उपयुक्त अशी माहिती आणि साधन सामग्रीची निवड व उपयोग करण्याची पद्धती, अन्वयाची मांडणी या मुद्यावर लक्ष केंद्रित करणे अगत्याचे आहे. तरच भारतीय समाजशास्त्राचा सर्वांग परिपूर्ण विकास साधता येईल.

समाजशास्त्राचे एतदेशीयकरण, भारतासाठी समाजशास्त्र, भारतीय समाजशास्त्र याविषयांच्या प्रासंगिकतेच्या आवश्यकतेसंदर्भात सद्य:कालीन वादविवाद सुरु आहे. भारतीय समाजशास्त्र विकसनात डॉ. गोविंद धुर्ये, राधाकमल मुखर्जी, डी. पी. मुखर्जी, ए. आर. देसाई, के. एम. कपाडिया, एम. एन. श्रीनिवास, रामकृष्ण मुखर्जी, आय. पी. देसाई, टी. एन. मदन, योगेंद्र सिंह, आंद्रे बेते, आदिंचे मौलिक योगदान आहे. परंतू आता भारतीय समाजशास्त्राचे स्वरुप, संकल्पना, सिध्दांत, पध्दतीशास्त्र यासंबंधी प्रश्न निर्माण झाला आहे. भारतीय समाजशास्त्र इतर देशातील समाजशास्त्रापेक्षा वेगळे असू शकते का? भारतीय समाजशास्त्रातील विचारप्रणाली, परिप्रेक्ष्य, सिध्दांत, प्रत्यक्षवादी परंपरेची निष्पती काय आहे? या अनुषंगाने अंतर्मूख होवून आकलन करुन घेणे महत्वाचे मानले जाते. समाजशास्त्राच्या प्रारंभिच्या काळात डॉ.गोविंद धुर्ये यांनी प्राच्याविद्या परिप्रेक्ष्याआधारे तत्वमिमांसात्मक अभिमुखतेद्वारे (Ontological orientation) भारतीय समाजातील वास्तवता समजुन घेतली. परंतू त्यांची सैध्दांतिक दृष्टिकोण आणि पध्दतीशस्त्रीय अभिमुखतेबाबत फारसी स्पष्ट भूमिका नव्हती. त्यांनी अनेक संशोधक विद्यार्थ्यांना भिन्न विषयात संशोधन करण्याचे प्रेत्साहन दिले. त्यातून विविधांगी संशोधन घडून आले. भारतीय समाजशास्त्राची मूलभूत, व्यापक पायाभरणी घडून आली. दुसऱ्या बाजूला राधाकमल मुखर्जी यांना समाजशास्त्र हे सार्वभौमिक, इतर शास्त्राची संबंधीत असले पाहिजे असे वाटत होते. त्यांनी लोकशाही प्रतिकृती, मार्क्सवादी प्रारुपातील उणिवा आणि गुणात्मकतेला अनुसरुन समाज वास्तव समजून घेण्याचा प्रयत्न केला. ते बृहत वैज्ञानिक, बृहत मानवशास्त्रीय समाज विज्ञान प्रारुपास एकीकृत करताना दिसून येतात. त्यांच्या विश्लेषणाची पध्दती निगमनात्मक युक्तीवादावर आधारीत राहिली आहे. योगेंद्र सिंह यांना स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय समाजशास्त्रात प्रत्यक्षवादाचा अभाव जाणवतो. भारतीय समाजशास्त्राची व्याप्ती, दृष्टिकोन आणि कार्यपध्दती मर्यादित स्वरुपाची वाटते.

भारतातील समाजशास्त्राचा Sociology in India समाजशास्त्राच्या व्यावसायिक कार्याशी संबंध येतो. भारतीय समाजशास्त्राचा Sociology of India चा संबंध अध्ययन विषयाचा काळ, स्थळ अध्ययनाबाबतचे भिन्न परिप्रेक्ष्याशी येतो, भारतासाठी समाजशास्त्र Sociology for India ही उपशाखा भारतीय सामाजिक वास्तवतेच्या अध्ययनात संकल्पना आणि सुयोग्य सिध्दांताच्या आधारभूत तत्वाशी संबंधीत आहे. टी. के. ओमन यांनी भारतातील संदर्भीयकरणाबाबत Contextualization महत्वपूर्ण विचार मांडले आहेत. परंपरावादी विचारानुसार भारतीय समाजाकडे एक आद्वितीय समाज, संस्कृती व सभ्यता म्हणून पाहिले जाते. राष्ट्रवादी विचारानुसार आंतरराष्ट्रीय संदर्भ प्रतिकृतिला महत्व न देता राष्ट्राची प्रासंगिकता प्रस्तुत करण्याच्या गरजेवर भर दिला जातो. देशीय Nativists विचारानुसार स्थानिक इतिहास आणि परंपराच्या अध्ययनावर भर देण्यात येतो. देशीय संकल्पना आणि संवर्गाचा उपयोग करुन लोकांच्या अनुभवातून सामाजिक वास्तवतेची पुनर्रचना करणे विचारात घेतले जाते. अमुलाग्र परिवर्तनवादी विचारानुसार जागृत मानवीय हस्तक्षेपाच्या माध्यमातून समाजाचे अधिक तीव्र गतीने परिवर्तन घडवून आणण्यावर विश्वास ठेवला जातो. भारतीय समाजशास्त्राच्या विकासासाठी उचित संशोधन साधने, नियोजन आणि प्रतिकृती research tools, designs and models विकसीत करणे गरजेचे आहे. लुई ड्युमा यांना भारताचे समाजशास्त्र हे समाजशास्त्र आणि प्राच्याविद्या यांच्या संगम बिंदूवर उभे आहे. अस्तित्व व

परंपरागत उच्च प्रभाव, संस्कृती, सभ्यता यात कोणत्याही प्रश्नाशिवाय भारतात एकता आढळते ती केवळ प्रदर्शनीय नसून संघटनात्मक आहे हे निदर्शनास येते.

भारतीय समाजशास्त्रातील ज्ञानस्थितीची पोकळी भरुन काढण्याचे कार्य पश्चिमी सिध्दांत आणि पध्दतीशास्त्राच्या प्रभावातून झाले आहे. येणाऱ्या काळात एतदेशीय ज्ञान व्यवस्था विकसीत करावी लागेल. याबाबत अभ्यासकात एकवाक्यता आढळते. असे असले तरी आंतरराष्ट्रीय प्रतिकृतीला नाकारण्याचा आग्रह धरणे शैक्षणिक राष्ट्रवादाचे अति समर्थन करणे संयुक्तीक ठरत नाही. भारतीय समाजशास्त्र आणि पाश्चात्य समाजशास्त्र यामध्ये उचित सहसंबंध, परस्परावलंबन प्रस्थपित करणे योग्य ठरते. देशीय आणि पाश्चात्य Native and Western संकल्पनांचा वापर अध्ययन संदर्भातील उपयुक्ता लक्षात घेवून करावयास हवा. भारतीय समाजशास्त्राच्या विश्लेषणात पाश्चात सिध्दांत पध्दती स्विकारावी की नाकारावी हे महत्वाचे नसून अध्ययन विश्वाला अनुसरुन सुयोग्य पध्दती निवडणे, त्यात सुधारणा करणे महत्वाचे मानावे लागेल. या अनुषंगाने आपल्या अध्ययन विषयानुरुप, उद्देशानुरुप संकल्पना नव्याने परिभाषित कराव्या लागतील. समाजशास्त्र विद्याशाखा सैध्दांतिक पध्दतीशास्त्रीयदृष्ट्या बहुतत्ववादी आहे तसेच ती एक बहुप्रारुपात्मकही Multi-paradigmatic आहे. त्यामुळे या शास्त्रात भिन्न सैध्दांतिक व पध्दतीशास्त्रीय परिप्रेक्ष्यांचा स्विकार केला जातो.

भारतीय समाजशास्त्राच्या एतदेशीकरणाची प्रक्रिया पाश्चात्य सिध्दांत, पध्दती, अनुभव, उपयोजिततेला नाकारत नसून त्यातील तत्वमिमांसा Ontology, ज्ञानमीमांसा epistemology, पध्दतीशास्त्र Methodology, ऐतिहासिक तथ्य Historical data यामध्ये सुधारणा, फेरबदल करुन त्याचे एतदेशीयकरण करण्याला महत्व देते. यासंदर्भात योगेंद्र सिंह भारतीय समाजशास्त्राच्या विद्याशाखात्मक विकासाच्या पैलूंची प्रासंगिकता आधोरेखित करतात. ते म्हणजे देशाची बदलती ऐतिहासीक–राजकीय स्थिती, पाश्चात्य बौध्दिक संपर्काचे आणि त्याच्या स्थित्यंतराचे बदलते स्वरुप, समाजशास्त्रज्ञाकडून उदयोन्मुख एतदेशीय बौध्दिक परंपरेचा होत असलेला विकास यामधून भारतीय समाजशास्त्रात तुलनात्मक – ऐतिहासीक, तत्वज्ञानात्मक – समाजशास्त्रीय, तार्किक – तत्वज्ञानात्मक, संख्यात्मक– प्रत्यक्षवादी दृष्टिकोन समृध्द होत आहे. भारतीय समाजशास्त्रात सामान्यत्व आणि विशिष्टत्वाचे समन्वय आणि दृढीकरण घडून आल्यास त्यातून एतदेशीय ज्ञानव्यवस्था अधिक पर्याप्त बनू शकेल असे वाटते. बृहत व सूक्ष्म अध्ययन विश्लेषण हा एक विवादाचा पैलू आहे. टी.के. ओमन यांच्या मते हा विवादच मूळात अयोग्य आहे. भारत एक राष्ट्र आहे परंतू एक संस्कृती नाही. सांस्कृतिकतेवर आधारीत क्षेत्रिय, समुहात्मक विविधता आहे. संस्कृतिकतेची अनेकता, विविधता असली तरी एका राजकीय व्यवस्थेअंतर्गत सहअस्तित्व आहे. त्यामूळे बृहत व सुक्ष्म अध्ययनाची तुलना करण्यात येवू नये. खेडेगावचे अध्ययन, क्षेत्रीय अध्ययन, संपूर्ण देशाला समाविष्टीत करणारे अध्ययन या भिन्न अध्ययन स्तरावर लक्ष केंद्रित करुन गुणात्मक विश्लेषण करावयास हवे. तरच समाजशास्त्र सर्वांगपरिपूर्ण समृध्द बनू शकेल.

समकालीन विवादामध्ये समाजशास्त्राच्या सार्वभौमीकरणाऐवजी एकाधिकारवादीकरण आणि एतदेशीकरणाचे स्थानियीकरण होत आहे. हा पैलू चर्चिला जातो. मानवाची संस्कृती, मनोवृत्ती, सभ्यता, परंपरामध्ये समाजपरत्वे व क्षेत्रीय स्थानपरत्वे भिन्नता असली तरी जागतीकीकरण, वेगवान संपर्कमाध्यमे यामूळे एकसारखेपणा प्रस्थापित होत आहे. त्यामूळे समाजशास्त्राच्या एतदेशीकरणाची हटवादी, अनावश्यक विचार प्रवृती अयोग्य मानली जाते. पिओटर स्टोम्पका Piotr Sztompka यांनी One Sociology or Many या लेखात एतदेशीय समाजशास्त्र, पश्चिमी पध्दती व सिध्दांताचे दमणकारी स्वरुप आणि इंग्रजी भाषेच्या साम्राज्यवादासंबंधी मूलगामी चर्चा केली आहे. बौध्दिक विश्वात समाजशास्त्राच्या आंतरराष्ट्रीयीकरणाची भूमिका घेतली जात आहे. आंद्रे बेत्ते यांच्या मते, तुलनात्मक समाजशास्त्र हेच समाजशास्त्राच्या आंतरराष्ट्रीयीकरणाचे मुख्य प्रवेशद्वार आहे. समाजशास्त्रीय सिध्दांत, परिप्रेक्ष्य, पध्दती विचारातील चिकित्सक वैचारिक तणावात्मक पर्याय समाजशास्त्रीय विकासाची प्रेरणाशक्ती आहे. ज्ञानाची नवी क्षितीजे उलगडणारी परिपक्व बौध्दिकता विश्लेषीत होत जाण्यातून भारतीय समाजशास्त्र संपन्न बनत जाणार आहे.

समाजशास्त्रीय ज्ञानव्यवहारात आपण आपला विषय, अध्ययन, अध्यापन, संशोधन, लेखनाकडे नव्या जाणीवेतून पाहू लागल्यास 'भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती: स्थिती आणि स्थित्यंतरे' यांचा भिन्न पैलूंना अनुसरुन उलगडा होईल. मराठी समाजशास्त्र परिषदेने हाती घेतलेला उपक्रम तडीस नेता येईल.....

*संदर्भ :–*


१. *Hasnain Nadeem (2010)- Indian Society and Calture, New Royal Book Co. Lucknow.*
२. *Collins randall (Edited-1993)- Four Sociological traditions, oxford University pess.*
३. *Johnson M.Harry (1968). Sociology: A systematic Introduction Allied Publishers , New Delhi.*
४. *Singh Yogendra (2016)-Modernization of Indian Tradition, Rawat Publications, Jaipur.*
५. *Ahuja ram (2016)- Society in India Concepts, Theories and recent Trends, Rawat Publications, Jaipur.*
६. *Das Veena (2014)- Oxford handbook of Indian Sociology.*
७. *सिंधी नरेन्द्र कुमार (२००२)– समाजशास्त्रीय सिध्दान्त, रावत पब्लीकेशन्स, जयपूर*
८. *दोषी एस.एल. (२०१०)– आधुनिकता, उत्तर आधुनिकता एवं नव– समाजशास्त्रीय सिध्दांत, रावत पब्लीकेशनस जयपूर.*
९. *अमर कुमार (२००५)– योगेन्द्र सिंह का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन्स, जयपूर*
१०. *कुलकर्णी पी.के. (२०१२)– प्रगत समाजशास्त्रीय सिध्दांत श्री मंगेश प्रकाशन, नागपूर*
११. *कुलकर्णी पी.के. (२००६)– समाजशास्त्रातील सैध्दांतीक दृष्टिकोन, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.*
१२. *सहारे पद्माकर (२०१५)– भारतीय समाजविषयक दृष्टिकोन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.*
१३. *कुंभार नागोराव (संपा.) (२००७)– विसाव्या शतकातील पाश्चात्य समाजशास्त्रज्ञ प्रबोधन प्रकाशन लातूर.*
१४. *कुंभार नागोराव (संपा.) (१९९९)– महाराष्ट्रातील समाजशास्त्रीय चिंतन महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.*
१५. *गजेंद्रगड व्ही.एन. मारुलकर विजय (२०००)–समकालीन भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर.*

# भारतातील समाजशास्त्र विषयाची शताब्दी अवलोकन आणि वाटचाल.

**डॉ. बालाजी केंद्रे**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रस्तावना**:— भारतातील समाजशास्त्र विषयांच्या अध्यनाची आणि अध्यापनाची सुरुवात सर्वात प्रथम १८५७ मध्ये स्थापन झालेल्या तत्कालीन बाम्बे विद्यापीठाच्या आणि सध्याच्या मुंबई विद्यापीठाच्या नागरिकशास्त्र आणि अर्थशास्त्र विभागात स्वंतत्र विषय म्हणून १९१९ मध्ये सर पेट्रिक गिडीस या ब्रिटिश समाजशास्त्रज्ञाच्या पुढाकाराने झाली. सर पेट्रिक गिडीस यांना समाजशास्त्र विषयांचा प्रथम विभागप्रमुख होण्याची संधी मिळाल्याने त्यांनी समाजशास्त्र विषयांचा पाया रचला म्हणण्यास हरकत नाही.

समाजशास्त्र विषयांच्या अध्ययनाला भारतात सुरु होण्याच्या कार्यकाळाला शंभर वर्षे २०१९ मध्ये पूर्ण झाले आहेत. भारतातील समाजशास्त्र विषयांची शताब्दी ही ऐतिहासिक घटना आहे. त्या निमित्ताने समाजशास्त्र विषयाच्या प्रवासाचे अवलोकन आणि वाटचाल जाणुन घेणे महत्वाचे आहे.

सर पेट्रिक गिडीस हे सुप्रसिद्ध व अग्रणी नगर रचनाकर, जिवशास्त्रज्ञ, भुगोलतज्ञ, नगर नियोजनकार होते. गिडस यांचे समाजशास्त्राच्या विकासासाठी बहुआयामी योगदान आहे. पेट्रिक गिडीस हे ब्रिटीश समाजशास्त्रज्ञ होते. त्यांनी नियोजन आणि वास्तुरचना शास्त्रामध्ये प्रदेश ही संकल्पना विकसित केली. आणि कॉनुरबेशन ही संकल्पना सर्वात प्रथम मांडली. गिडस यांचे समाजशास्त्रातील भरीव योगदान हे प्रामुख्याने विकासाचे समाजशास्त्र, पर्यावरण समाजशास्त्र आणि नागरी समाजशास्त्र या क्षेत्रात असल्याचे सत्य आहे. गिडीस यांनी उत्क्रांती, शहरे, प्रस्तावना नागरिकशास्त्र हे उपयोजित समाजशास्त्र, वनस्पती शास्त्रातील प्रकरणे, शहरांचा विकास आणि मानवी सबंध अशी संशोधनपर पुस्तके लिहीली आहेत.

संशोधन पद्धतीच्या क्षेत्रामध्ये गिडीस यांनी क्षेत्रकार्य या संकल्पनेला सर्वात जास्त महत्व दिल्याचे दिसुन येते की जी आजही सर्वात उपयुक्त पद्धतीशास्त्र म्हणुन समाजशास्त्रज्ञ वापरतात. गिडीस यांनी भारतात आणि आशिया खंडात समाजशास्त्राचा प्रचार, प्रसार आणि विस्तार करण्याचा प्रयत्न केला. १९२४ मध्ये त्यांच्या सेवानिवृतीनंतर त्यांनी पुढे महत्वाची पुस्तके लिहीली.

डॉ. जी. एस. घुर्ये यांची १९२४ मध्ये मुंबई विद्यापिठाच्या समाजशास्त्र विभागात प्रपाठक आणि विभागप्रमुख म्हणुन नियुक्ती झाली. डॉ. घुर्ये हे संस्कृत पंडित आणि प्राच्यविद्या क्षेत्रातील तज्ञ होते. याच बरोबर त्यांच्यावर सर पेट्रिक गिडीस यांच्या कार्याचा प्रभाव होता. सुस्वातीच्या काळात घुर्ये यांचे प्रशिक्षण गिडस यांच्या मार्गदर्शनाखाली झाले होते. परंतु नंतर त्यांनी केंब्रिज विद्यापिठातील डब्लु. एच. आर. रिव्हर यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाचे कार्य केले. त्यांच्या एकुण लिखाणात प्राच्यविद्या आणि मानववंशशास्त्रीय पद्धती आणि दृष्टीकोनाचा प्रभाव दिसुन येतो. डॉ. घुर्ये यांनी त्यांच्या एकुण संशोधनात भारतातील जातीव्यवस्था, वंश, आदिवासी जिवनपद्धती, शहरी जिवन आणि संस्कृती या विषयांवर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसुन येते. याच बरोबर समाजशास्त्राच्या रचनात्मक बांधणीमध्ये महत्वाची भुमीका पार पाडण्याचा 'भारतीय समाजशास्त्र परिषद' (Indian Sociological Society) ची स्थापना डॉ. जी. एस. घुर्ये यांनी १९५१ मध्ये करुन Sociological Bulletin चालु केले. निवृत्तीनंतर मुंबई विद्यापीठाने त्यांची एमीरट्स प्रोफेसर म्हणूनही नेमणुक केली. संशोधन क्षेत्रात नवी पिढी निर्माण करुन देशभर पसरवण्याचे कार्य त्यांनी केले. या सर्व बाबी लक्षात घेऊन डॉ. घूर्ये यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणुन ओळखले जाते.

डॉ. जी. एस. घुर्ये यांनी आपल्या कार्यकाळात एकुण ५५ विद्यार्थ्याला पदवी साठी मार्गदर्शन केले. त्यामुळे भारतात समाजशास्त्राची व्याप्ती वाढविण्यास मदत झाली. यामध्ये प्रामुख्याने डॉ. इरावती कर्वे, डॉ. वाय. बी. दामले यांनी पुणे विद्यापीठामध्ये समाजशास्त्र विषय सुरु केला आणि वाढवला. तर डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी गुजरात आणि नंतर दिल्ली येथे विषयांची व्याप्ती वाढवली. एम. एस. ए. राव यांनी दिल्ली विद्यापिठात अध्ययन, अध्यापन संशोधन आदी योगदान दिले. तर डॉ. ए. आर. देसाई आणि डी. नरेन यांनी घुर्ये यांचा वारसा मुंबई विद्यापिठातील समाजशास्त्र विभागात पुढे नेण्याचा प्रयत्न केला. डॉ. घुर्ये यांचे संशोधक विद्यार्थी डॉ. एम. एस. गोरे यांनी टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोसल सायसेंस येथे संचालक व नंतर मुंबई विद्यापिठाचे कुलगुरु म्हणून योगदान दिले. पुढें घुर्ये यांच्या संशोधक विद्यार्थीनी डॉ. सुमा चिटणिस यांनी नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापिठ, मुंबई येथे कुलगुरु म्हणून जवाबदारी पार पाडली. याच बरोबर डॉ. व्हिक्टर डिसोझा यांनी पंजाब विद्यापिठातील समाजशास्त्र विषयांचे विभागप्रमुख म्हणून अध्यापन आणि संशोधन पुढे चालु ठेवले.

लखनौ स्कुल :— लखनौ विद्यापिठात समाजशास्त्र विषय पुढे नेण्याचे कार्य डि. पी. मुखर्जी यांनी केले.

डॉ. जी. एस. घुर्ये हे १९२४ ते १९५९ सेवानिवृत्तीपर्यंत समाजशास्त्र विभागाचे दुसरे विभाग प्रमुख कार्यरत होते. सेवानिवृती नंतर १९६० मध्ये मुंबई विद्यापिठाला समाजशास्त्र विभागाचे तिसरे विभाग प्रमुख म्हणुन डॉ. के. एम. कपाडिया यांची नेमणुक करण्यात आली होती. कपाडीया यांचे योगदान हे प्रामुख्याने आप्तसंबंध, कुटूंब व्सवस्था, आणि विवाहसंस्था या क्षेत्रात होते. त्यांचे भारतातील कुटूंब आणि विवाह हे पुस्तक खुपच प्रसिद्ध आहे की या क्षेत्रात हा संशोधन करण्याची अतिशय उपयुक्त आहे.

डॉ. के. एस. कपाडीया यांचा मुंबई विद्यापीठातील विभाग प्रमुख आणि शिक्षक हा काळ त्यांच्या अचानक मुत्युमुळे १९६७ मध्ये संपुष्टात आला. आणि त्यांच्या ठिकाणी डॉ. ए. आर. देसाई यांची नेमणुक १९६७ मध्ये करण्यात आली. ए. आर. देसाई यांनी समाजशास्त्र विषयाच्या विकासात मोलाची भर टाकल्याचे दिसुन येते. त्यांनी लिहलेल्या राजकिय समाजशास्त्र, ग्रामीण समाजशास्त्र, शेतकऱ्यांचा संघर्ष आणि संघटना, चळवळी या क्षेत्रात अध्यापन आणि संशोधन केले आहे. डॉ. ए. आर. देसाई यांचे भारतीय राष्ट्रवादाची पार्श्वभुमी, भारतातील ग्रामिण समाजशास्त्र, शेतकऱ्यांचा संघर्ष ही पुस्तके आजही देशभर समाजशास्त्राच्या अध्ययनात आणि संशोधनात महत्वाचे संदर्भ ग्रंथ म्हणून वापरली जातात.

डॉ. एस. आर. देसाई १९७६ मध्ये सेवानिवृत्त झाले. परंतु त्यांनी समाजशास्त्र विषयाच्या संरचानात्मक बांधणी मध्ये भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या माध्यमातुन आपले योगदान दिले. ए. आर. देसाई हे भारतीय समाजशास्त्र परिषदेचे १९७९ मध्ये अध्यक्ष होते.

डॉ. जे. व्ही. फरेरा यांनी १९७६ मध्ये डॉ. ए. आर. देसाई यांच्या सेवानिवृतीनंतर समाजशास्त्र विभागाचे पाचवे विभाग प्रमुख म्हणून जवाबदारी घेतली. जे. व्ही. फरेरा यांनी मुंबई विद्यापिठातील समाजशास्त्र विभागात मानवशास्त्र आणि समाजशास्त्र या दोन्ही विषयांना अध्ययन, अध्यापन आणि संशोधन क्षेत्रात मजबुत

करण्याचा प्रयत्न केला. यांचे टोटेमीझम इन इंडिया हे पुस्तक अतिशय प्रसिद्ध मानले जाते. १९८२ मध्ये सेवानिवृत झाल्यानंतरही आपले बहुमोल योगदान समाजशास्त्राच्या विभागासाठी दिले आहे.

डॉ. धिरेन्द्र नरेन हे मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे सहावे विभागप्रमुख म्हणुन १९९२ मध्ये डॉ. जे. व्ही. फरेरा यांच्यानंतर रुजू झाले. ते आपल्या सेवानिवृती १९९१ पर्यंत कार्यरत होते. डॉ. नरेन हे डॉ. घुर्ये यांचे विद्यार्थी होते. त्यांनी 'हिंदु चारित्र्य' हा ग्रंथ लिहीला आहे.

यानंतर प्रामुख्याने डॉ. ए.आर. मोमीन, संस्कृती मानववंशशास्त्रज्ञ हे १९९१ ते १९८९ पर्यंत विभाग प्रमुख होते. यांच्यानंतर १९९९ ते २००२ या कालावधीत भारतीय समाजातील श्रमीक, अनौपचारीक क्षेत्रातील श्रमीक या क्षेत्रात मोलाचे कार्य करणारे डॉ. शर्यत भौमीक हे विभागप्रमुख होते. त्यांनी भारतातील चहाच्या मळयात काम करणारे मजुर, रस्त्यावरिल विक्रेते आणि जागतिक शहरी अर्थव्यवस्था या क्षेत्रात संशोधन केल्याचे दिसुन येते.

डॉ. पी. जी. जोगदंड हे २००२ ते २००५ आणि २०१० ते २०१६ या कालावधीत समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणुन कार्यरत होते. त्यांनी प्रामुख्याने महाराष्ट्रातील दलित चळवळ, दलित स्त्रियांचे प्रश्न आणि दृष्टीकोन, नविन आर्थिक धोरण आणि दलीत जागतिकीकरण आणि सामाजीक चळवळी, मानव समाजासाठी संघर्ष या क्षेत्रात मोलाचे संशोधन केले आहे जे भारतातील सिमांतीक समुहाच्या अध्यनासाठी आजही उपयुक्त आहे.

डॉ. इंदिरा मुन्सी यांनी २००९ ते २००७ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात विभागप्रमुखाची जवाबदारी सांभाळली आणि आदिवासी अध्ययन, पर्यावरणाचे समाजशास्त्र, पर्यावरण आणि भारतीय समाजातील अंर्तविरोध या क्षेत्रात मोलाचे संशोधन केले आहे.

कमला गणेश या २००७ ते २०१० या कालावधीत मुंबई समाजशास्त्र विभागात विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होत्या. कमला गणेश यांनी स्त्रिवादी पद्धतीशास्त्र, लिंगभाव, आप्तसंबंध व्यवस्था, ओळख आणि संस्कृति, भारतिय परदेशस्त नागरीक या क्षेत्रात भरीव संशोधन करून नविन दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. बी. व्ही. भोसले २०१५ ते २०१८ या कालावधीत विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. डॉ. भोसले यांनी श्रम बाजार, सिमांकींत समुह, दलित अध्ययन या क्षेत्रात संशोधन केले आहे आणि सध्या ते युजीसी सॅप डिआर एस. ३ चे समन्वयक आहेत.

डॉ. रमेश कांबळे (पीएच.डी समकक्ष संशोधन क्षेत्रकार्य) २०१८ ते २०१९ या काळात मुंबई विद्यापीठाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख होते. रमेश कांबळे हे समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी आणि शिक्षक होते. रमेश कांबळे यांनी समाजशास्त्रीय सिद्धांत, लिंगभाव अध्ययन या क्षेत्रात अध्यापन आणि संशोधन केले आहे. रमेश कांबळे यांनी मुंबई विद्यापिठातील समाजशास्त्र विभागाकडे दुर्लक्षीत ठेवलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचे भान समाजशास्त्रात आणले आणि सिमांकीत समुहाचे समाजशास्त्रीय योगदान स्पष्ट केले.

दि. १ स्पटेंबर २०१९ पासून डॉ. बालाजी केंद्रे (मी स्वत:) १०० वर्षे पुर्ण झालेल्या मुंबई विद्यापिठातील समाजशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहे.

**भारतातील समाजशास्त्राची शताब्दी निमित्त वाटचाल** :– समाजशास्त्र विभागात मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे खालील पद्धतीने शैक्षणिक आणि संशोधन उपक्रम सातत्याने समाजशास्त्र विभागाच्या वाढीसाठी राबवले जातात. मुंबई विद्यापिठातील समाजशास्त्र विभाग हा युजीसी सॅप डिआर एस.३ प्रायोजित आहे.

१) सध्या ३०० पेक्षा अधिक संशोधक विद्यार्थ्यांनी एम. फिल. पदवी मिळवली असून ४० विद्यार्थी विद्यावाचस्पती पदवीसाठी नोंदणी झालेले आहेत. विभागात ९ संशोधन मार्गदर्शक आहेत.

२) समाजशास्त्रातील संशोधन व अध्यापन याला चालना मिळावी, नविन विचारांची भर घालण्यासाठी दरवर्षी सर पेद्रीक गिडीस, डॉ जी. एस. घुर्ये, डॉ. ए. आर देसाई आणि डॉ. इरावती कर्वे यांच्या स्मरनार्थ व्याख्यानमाला चालवली जाते ज्यामध्ये भारतातील समाजशास्त्राच्या संशोधनात योगदान देणाऱ्या तज्ञाला आमंत्रीत केले जाते आणि नंतर त्यांचे भाषण प्रकाशित केले जाते.

३) मुंबई विद्यापिठात प्राध्यापक शिक्षक नियुक्ती मध्ये समाजातील सर्व घटकांचे प्रतिनिधित्व मिळाल्याचे स्पष्ट होते. जसे (अनुसुचीत जाती, जमाती, भटके विमुक्त इतर मागासवर्गीय आणि स्त्रीयां)

४) शताब्दी साजरी करावयाचा भाग म्हणून मुंबई विद्यापिठाचा समाजशास्त्र विभाग 'भारतीय समाजशास्त्र परिषदेची' ४६ वी परिषद मुंबई विद्यापिठ मुंबई येथे आयोजित करीत आहे. यामध्ये भारतातील समाजशास्त्राच्या अध्यापनाला आणि संशोधनाला १०० वर्षे पुर्ण झाल्याबदद्ल विचारमंथन, चिकित्सा यावर सखोल चर्चा होणे अपेक्षीत आहे. अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेचे ४६ वे अधिवेशन डिसेंबर २०२० मध्ये मोठया वैभवाने पार पडेल अशी अपेक्षा आपण ठेवू. आणि भारतातील सामाजशास्त्राचे अध्ययन, अध्यापन, संशोधन भारतीय समाजाला आदर्श देश आणि आदर्श समाज बनविण्यासाठी योगदान देउया.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाची वाटचाल

**डॉ. सोंडगे ता.प.**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव जि.बीड tpsondge@gmail.com 9834518480
**प्राचार्य डॉ. दादासाहेब उ. मोटे**, माजी सचिव मराठी समाजशास्त्र परिषद, dada.mote77@gmail.com 9423732424

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने या वर्षी म्हणजे २०१९ मध्ये 'भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती' या विषयावर मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिकेसाठीचा अंक प्रकाशित करण्याचे ठरविले आहे, त्याबद्दल प्रथमत: मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीचे अभिनंदन.

व्यक्ती जेंव्हापासून समाजाचा विचार करु लागली तेंव्हा पासून सामाजिक तत्वज्ञान निर्माण होऊ लागले असे मानले जाते. नाव आणि अभ्यास विषयातील सारखेपणा यामुळे सामाजिक तत्वज्ञान व समाजशास्त्र ही अत्यंत जवळची शास्त्रे आहेत असेही म्हणता येईल. नव्हे तर १८ व्या शतकापर्यंत सामाजिक तत्वज्ञानामध्येच समाजाचा आणि सामाजिक विचारांचा अभ्यास केला जात असे. याचा अर्थ असा होतो की, समाजशास्त्र हे सामाजिक तत्वज्ञानाचाच एक भाग होते, परंतु मानवी विचारांची बैठक जस–जशी व्यापक होत गेली तसतशी सामाजिक जिवनाचा अभ्यास करणाऱ्या सामाजिक तत्वज्ञानापेक्षा वेगळया शास्त्राची गरज भासू लागली आणि त्यातूनच समाजशास्त्राचा उदय झाला. असे असले तरी भारतात समाजशास्त्रीय अभ्यासाची कल्पना खूप प्राचीन आहे. वेद, उपनिषेद, रामायण, महाभारत, मनुस्मृती, सूत्रे व पुराणे या सारख्या धार्मिक ग्रंथामध्ये सामाजिक जिवनाची सांगोपांग चर्चा आढळते तसेच चाणक्य लिखीत 'अर्थशास्त्र' व शुक्राचार्याचे 'नितीसार' या ग्रंथात व्यवहारिक सामाजिक कल्पना व समाज, शासन, निती इत्यादी विषयाची चर्चा आढळते. अबुल फजलच्या 'ऐनी अकबरी' या ग्रंथात तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थितीचे वर्णन आढळते. याशिवाय विविध ग्रंथकारांनी धार्मिक ग्रंथाद्वारे चांगल्या आचरणाचे नियम सांगितलेले आहेत. यासारख्या बाबीवरुन असे म्हणता येईल की, भारतात धर्मशास्त्रातच समाजशास्त्राचा अंतर्भाव करण्यात आलेला होता.

भारतामध्ये सर्वप्रथम इ.स. १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण देण्यासाठी प्रा. पेट्रीक गेंडिस यांच्या अध्यक्षतेखाली समाजशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली. तेंव्हापासूनच लौकिक अर्थाने भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनाची सुरुवात झाली. इ.स. १९२४ मध्ये डॉ. गो.स. घुर्ये हे समाजशास्त्र विभागाचे अध्यक्ष झाले व त्यानंतरच्या काळातच समाजशास्त्राच्या अभ्यासाला व संशोधनाला भारतातील वेगवेगळया विद्यापीठात महत्वाचे स्थान प्राप्त झाले. आज महाराष्ट्रातील जवळपास सर्वच विद्यापीठे आणि या विद्यापीठांशी संलग्नीत असणाऱ्या बहुतांशी महाविद्यालयातून समाजशास्त्र हा विषय अभ्यासला जात असून विद्यार्थीही या विषयाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ देखील अपवाद नाही.

१९५८ मध्ये ज्यावेळेस मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली त्यावेळेस या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, नांदेड आणि परभणी असे पाच (०५) जिल्हे होते. पुढे मराठवाड्यात जालना, लातूर व हिंगोली असे नवीन तीन जिल्हे अस्तित्वात आले. प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने नांदेड येथे या विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यात आले. इ. स. १९७८ नंतरच्या काळात मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या निमित्ताने उद्‌भवलेले आंदोलन आणि नंतरच्या काळात त्याचा सतत झालेला पाठपुरावा व प्रयत्न यामधून १९९४ मध्ये मराठवाडा विद्यापीठाचे विभाजन होऊन औरंगाबाद, जालना, बीड आणि उस्मानाबाद या चार जिल्हयासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या चार जिल्हयासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अशी दोन स्वतंत्र विद्यापीठे मराठवाड्यामध्ये अस्तित्वात आली. पुढे प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे उपकेंद्र उस्मानाबाद येथे इ. स. २००४ मध्ये तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे उपकेंद्र २००७–०८ मध्ये लातूर येथे स्थापन करण्यात आले.

मराठवाडा विद्यापीठाची स्थापना जरी १९५८ मध्ये झालेली असली तरी विद्यापीठामध्ये समाजशास्त्र हा विषय अध्ययनासाठी स्वतंत्रपणे उपलब्ध नव्हता. प्रथमत: देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद येथे हा विषय अध्ययनासाठी उपलब्ध करुन दिला गेला. त्यानंतर १९६७ मध्ये समाजशास्त्र हा विषय पदव्युत्तर पातळीवर तत्कालिन मराठवाडा विद्यापीठात अध्ययनासाठी उपलब्ध झाला. सुरुवातीच्या काळात डॉ. एम. जी.कुलकर्णी, डॉ. सुधाताई काळदाते, डॉ. विजय देशपांडे, डॉ. आर. बी. बिलावर, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. अनुराधा भोईटे अशी दिग्गज मंडळी या विषयाच्या अध्ययनासाठी उपलब्ध झाली. विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते विद्यापीठांतर्गत या विषयाच्या पदव्युत्तर पातळीवरील अध्ययनाला सुरुवात होण्यापासूनचा इतिहास मांडण्याचा हेतू एवढाच की, एकतर नवीन पिढीला या संदर्भातील तितकीशी माहिती नाही आणि दुसरे म्हणजे विद्यापीठामध्ये अध्ययनासाठी उपलब्ध असणाऱ्या पहिल्या पिढीतील मंडळींनी मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत असणाऱ्या आठही जिल्हयातील विविध महाविद्यालयांना प्रत्येक्ष भेटी देऊन प्राचार्य व संस्थाचालक यांच्याशी विचार विनिमय करुन समाजशास्त्र हा विषय महाविद्यालयीन पातळीवर पदवी आणि पद्व्युत्तर अध्ययनासाठी सूरु करण्याकरीता जे परिश्रम घेतले त्यास तोड नाही. त्यांच्या परिश्रमाचाच परिपाठ म्हणून आज बहुतांशी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना किमान पदवी पातळीवर व काही मोठ्या महाविद्यालयामधून पदव्युत्तर पातळीवर हा विषय अध्ययनासाठी उपलब्ध झालेला आहे. सद्य:स्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्गत जवळपास १२५ हून अधिक महाविद्यालयामधून समाजशास्त्र हा विषय शिकविला जात आहे.

'भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती' या विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या अंतर्गत विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधून समाजशास्त्र विषयाची वाटचाल या संदर्भातील मराठवाडा विद्यापीठाचे योगदान विविध अंगाने महत्वपूर्ण राहिलेले आहे. याची माहिती नवीन पिढीला व्हावी या उद्‌देशाने आम्ही खालील मुद्‌द्यांची सविस्तरपणे मांडणी करु इच्छितो.

१) ज्या मराठी समाजशास्त्र परिषदेने हा विषय संशोधन पत्रिकेच्या लेखासाठी उपलब्ध करुन दिला त्या परिषदेची पायाभरणी तथा स्थापना याच विद्यापीठामध्ये झाली. डॉ. एम. जी. कुलकर्णी, डॉ. सुधा काळदाते, डॉ. विजय देशपांडे, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. आर. बी. बिलावर, डॉ. अनुराधा भोईटे, डॉ. बा. ल. जोशी, डॉ. पु. ल. भांडारकर (नागपूर विद्यापीठ), डॉ. विलास संगवे आणि डॉ. एस. एन. पवार (शिवाजी विद्यापीठ), डॉ. वाय. बी. दामले (पुणे विद्यापीठ), डॉ. शैलेजा जोशी, डॉ. धीरेंद्र नारायण या सर्वांनी मिळून मराठी समाजशास्त्र परिषदेची स्थापना इ. स. १९८१ मध्ये केली. मराठी समाजशास्त्र परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. एम. जी. कुलकर्णी यांची निवड झाली आणि त्यांच्याच अध्यक्षतेखालील कार्यकारिणीने दि. २७ जून १९८३ रोजी धर्मादाय आयुक्ताकडून परिषदेच्या नोंदणीचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले. त्यापूर्वी १२ ते १४ फेब्रुवारी १९८१ मध्ये डॉ. सुधाताई काळदाते यांच्या नेतृत्वाखाली समाजशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय पातळीवरील 'Indian Society of Criminology' चे अधिवेशन घेण्यात आले होते. सदरील अधिवेशनाचे नेटके नियोजन, उपस्थित प्रतिनिधी आणि एकुणच अधिवेशनाची यशस्वीता याच बळावर मराठी समाजशास्त्र परिषदेची स्वतंत्रपणे स्थापना झाली. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सुरुवातीच्या चार (०४) अधिवेशनामध्ये प्रतिनिधींचा सहभाग जरी कमी प्रमाणामध्ये जाणवला असला तरी त्यावेळी महाविद्यालयांची संख्याही मर्यादीत होती हे लक्षात घेतले पाहिजे. मराठी समाजशास्त्र परिषदेचे ५ वे अधिवेशन समाजशास्त्र विभागाच्या वतीने पैठण जिल्हा औरंगाबाद येथे 'कडा' च्या सहकार्याने घेण्यात आले. त्यास प्रतिसादही चांगला मिळाला. त्यानंतर मात्र परिषदेला

मागे वळून पाहण्याची आवश्यकता भासली नाही. आज मराठी समाजशास्त्र परिषदेचे एक हजाराच्या (१०००) वर अजिव सभासद असून परिषदेचे सद्य:स्थितीत वटवृक्षामध्ये रुपांतर झालेले दिसते. यामध्ये पूर्वाश्रमीच्या समाजशास्त्राच्या अभ्यासकांचे मोठे योगदान आहे.

२) मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अर्थात, आजचे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड) अंतर्गत समाजशास्त्र विषयाच्या प्रसारासाठी या विद्यापीठातील विभागाने प्रयत्नपूर्वक जिद्दीने काम केले. महाविद्यालयीन पातळीवर केवळ विषयाची सुरुवातच नाही तर महाविद्यालयीन पातळीवर कार्यरत असणारा व्याख्यात्यांचा वर्ग अधिक व्यासंगी बनावा, तयार व्हावा, यादृष्टीनेही खूप मेहनत घेतली. संशोधनाच्या दृष्टीने जाणिवपूर्वक प्रयत्नही केले. 'संशोधन पध्दती' या विषयावर विद्यापीठ पातळीवर व्याख्यात्यांची दोन दिवशीय कार्यशाळा यु.जी.सी. च्या सहकार्याने घेऊन त्यातून संशोधन पध्दती च्या बाबत व्याख्यात्याकडून प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करुन घेतली. याचा परिणाम म्हणून समाजशास्त्र विभागांतर्गत गुणवत्तापूर्ण तथा दर्जेदार संशोधन कार्याच्या वाढीस चालना मिळण्यास मदत झाली. उदाहरणच द्यायचे झाल्यास डॉ. सुधाताई काळदाते यांच्या मार्गदर्शनाखाली औद्योगिक समाजशास्त्राच्या अंतर्गत डॉ. कातखेडे यांनी 'Human Relations in industries' या विषयावरील त्यांच्या संशोधन कार्यामुळे डॉ. कातखेडे यांची 'झालानी टुल्स इंडस्ट्रीमध्ये' जनरल मॅनेजर म्हणून निवड झाली. सध्या रोहयामध्ये त्यांची स्वत: ची स्वतंत्र इंडस्ट्री आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या वेळेस तत्कालिन महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक डॉ. अय्यंगार यांनी स्वत: औरंगाबाद येथे येऊन डॉ. सुधाताई काळदाते यांच्याशी चर्चा करुन डॉ. दादासाहेब मोटे यांचा एम. फिल. पदवीचा प्रबंध मराठवाड्यात सुरक्षेच्या दृष्टीने झेरॉक्स करुन घेऊन गेले होते. अशा प्रकारे मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागांतर्गत झालेल्या संशोधन कार्याने अत्यंत मोलाची भूमिका पार पाडली असल्याचे वेळोवेळी निदर्शनास येत गेलेले आहे. याविषयी दुमत असण्याचे कारण नाही.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाच्या वाटचालीच्या अनुषंगाने आणखी एक महत्वाचा जो भाग वाटतो तो म्हणजे यु.जी.सी. च्या आर्थिक सहाय्याने ULP (University Leadership Programme) प्रकल्प मराठवाड्यातील बहुतांश महाविद्यालयामध्ये राबविला गेला. या प्रकल्पाच्या माध्यमातून विभागातील सर्व प्राध्यापकांनी विविध महाविद्यालयामध्ये विद्यार्थी आणि व्याख्याते यांच्यासमोर व्याख्याने दिली. त्यामुळे विषयाचे विद्यार्थी अधिक सजग होण्यास मदत झाली. यु.जी.सी. च्या याच अनुदानामधून महाविद्यालय पातळीवर पदवीसाठी असणारा 'भारतीय समाज : पारंपारिक आणि आधुनिक' या पेपरवरील उत्कृष्ट ग्रंथ प्रकाशित करुन अत्यल्प किंमतीमध्ये महाविद्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आला. आजही हा ग्रंथ उपयोगी ठरतो आहे.

४) विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचा आणखी एक महत्वकांक्षी प्रकल्प म्हणजे US AID आणि IIPS देवनार, मुंबई यांच्या सहकार्याने उस्मानाबाद आणि परभणी जिल्हयामधील शासकीय आरोग्यविषयक सुविधा या संदर्भातील सर्व्हे, हा सर्व्हे १३ ऑक्टोबर १९८२ ते ३१ मार्च १९८३ या सहा महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात आला. या प्रकल्पाला मान्यता मिळाण्यापूर्वी लातूरचा समावेश उस्मानाबाद जिल्हयात तर हिंगोलीचा समावेश परभणी जिल्हयात होता. या संपूर्ण प्रकल्पाला US AID कडून अनुदान प्राप्त झालेले होते. या Base Line Survey चा परिणाम म्हणून उस्मानाबाद आणि परभणी जिल्हयामध्ये आरोग्यविषयक सेवासुविधा उपलब्ध करुन देण्यास मदत झाली.

५) इ.स. १९८१ मध्ये ज्या विद्यापीठात मराठी समाजशास्त्र परिषदेची स्थापना झाली. त्याच विद्यापीठाच्या अंतर्गत ३ वेळा परिषदेची सूत्रे हाती आली आणि प्रत्येक वेळेस मराठी समाजशास्त्र परिषदेला आर्थिकदृष्ट्या समृध्द बनविण्याचा प्रयत्न केला गेला. सद्य:स्थितीमध्ये मराठी समाजशास्त्र परिषद जोमाने कार्यरत असून तिची अजीव सभासद संख्या ही वाढत आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेद्वारे नवनवीन उपक्रम हाती घेतले जात आहेत. अलिकडच्या काळात मराठी समाजशास्त्र परिषद महाराष्ट्रा बाहेर परिषदांचे तथा अधिवेशनांचे यशस्वीरित्या आयोजन करु लागली आहे.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत विविध महाविद्यालयामधील समाजशास्त्राच्या अभ्यासकांची विद्यापीठातील विभागाशी नाळ जोडण्यामध्ये विभागातील पहिली पिढी जितकी प्रभावी आणि परिणामकारक राहिली ती परंपरा ती नाळ जोडण्यामध्ये, कायम ठेवण्यामध्ये दुसऱ्या, तिसऱ्या पिढीला तितकेसे यश आलेले नाही. या मागील कारणेही वेगवेगळ्या प्रकारचे असू शकतील. जसे की, काळाच्या ओघामध्ये स्थानिक पातळीवरील महाविद्यालयांमध्ये उपलब्ध झालेल्या पदव्युत्तर शिक्षणाच्या सेवा सुविधा यामुळे महाविद्यालयीन शिक्षकांचा अभ्यासकांचा विद्यापीठातील विभागाशी असणारा संपर्क कमी होत गेला. विद्यार्थी देखील स्थानिक महाविद्यालयाला पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी प्राधान्य देऊ लागले. यामधून विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाशी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचा संपर्क कमी होत गेला असला तरी समाजशास्त्र विषयाची घोडदौड सातत्याने होत राहिली, ही निश्चितच आनंददायी बाब मानता येईल.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत बहुतांशी महाविद्यालयामधून समाजशास्त्र हा विषय शिकविला जात असला व हा विषय बहुतांशी विद्यार्थी अध्ययनासाठी निवडत असले तरी औरंगाबाद शहर वगळता विद्यापीठांतर्गत येणाऱ्या जालना, बीड, उस्मानाबाद या जिल्हयांमधील कोणत्याही महाविद्यालयामध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेची अधिवेशने होऊ शकली नाहीत. एवढेच नव्हे तर विद्यापीठाचा समाजशास्त्र विभाग देखील मराठी समाजशास्त्र परिषदेचे अधिवेशन घेऊ शकलेला नाही. यानंतरच्या काळामध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेची अधिवेशने विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये व्हावीत अशी अपेक्षा करण्यात हरकत नाही.

८) विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने चर्चासत्र, कार्यशाळा यासारखे उपक्रम आजही राबविले जात आहेत. विभागाचा या कामी सतत पुढाकार राहिलेला आहे. अलिकडील काळात महाविद्यालयीन पातळीवर राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र, कार्यशाळा आणि परिषदांचे आयोजन केले जात आहे. यामधून प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो आहे. त्यामुळे समाजशास्त्र हा विषय आणि समाशास्त्रीय संशोधन अधिकाधिक विद्यार्थी, वाचकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होत आहे.

९) सद्य:स्थितीमध्ये विद्यापीठाच्या अंतर्गत समाजशास्त्र विषयाच्या वाढीमध्ये आपले योगदान देणाऱ्यांपैकी पहिल्या पिढीतील डॉ. उत्तमराव भोईटे आणि डॉ. बी. एल. जोशी वगळता अन्य कोणी हस्ती हयात असल्याचे आढळत नाही. सर्वच काळाच्या पडद्याआड गेलेले आहेत. या विद्यापीठाच्या अंतर्गत या पहिल्या पिढीने जो पाया घातला त्या पायावर विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाची आणि या विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागांची वाटचाल यशस्वीपणे सुरु आहे.

**सारांश** : 'भारतातील समाजशास्त्र विषयाची शतकपूर्ती' या मुख्य विषयाच्या अनुषंगाने एकीकडे समाजशास्त्र विषयाची वाटचाल आणि दुसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाची वाटचाल या दोन्ही बाबींचा वेध घेता यावा व त्याचबरोबरीने नवीन पिढीला याची थोडीफार माहिती व्हावी या उद्देशाने या लेखाची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नवीन पिढी समाजशास्त्र विषयाची आणि मराठी समाजशास्त्र परिषदेची यशस्वी घोडदौड अशीच पुढे चालू ठेवेल व समाजशास्त्र हा विषय अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवेल अशी आम्ही अपेक्षा व्यक्त करुन या लेखापुरता हा लेखन प्रपंच थांबवतो.

# समाजशास्त्राच्या विकासात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे योगदान

**डॉ. बी. के. स्वांई,** पदव्यूत्तर समाजशास्त्र विभाग प्रमुख, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रख्यात विद्वान आणि भारतीय समाजशास्त्रावर नैपुण्यप्राप्त असणाऱ्या प्रा. बी. जी. मोहोनी यांच्या संस्थापक विभागप्रमुख पदासह नागपूर विद्यापीठात १९६४ साली समाजशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९६५ साली डॉ. इरावती कर्वे यांचे विद्यार्थी आणि अभिजात समाजशास्त्रीय परंपरेवर प्राविण्यप्राप्त असणाऱ्या भारतीय समाजशास्त्रातील एक पायाभूत व्यक्तित्व डॉ. टी. एन. वाळूंजकर यांनी प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून प्राध्यापक मोहोनी यांच्याकडून विभागाचा प्रभार स्वीकारला. १९८३ साली पुणे विद्यापीठात स्थानांतरीत होण्यापूर्वी त्यांनी १८ वर्षे विभागाचे पालनपोषण केले आणि विभागाची काळजी वाहिली. एक बुध्दीमान अभ्यासक आणि प्रशंसनिय लेखक, समाजशास्त्रीय सिध्दांताच्या सर्व शाखा आणि प्रवाहातील तज्ञ, संशोधन पद्धतीशास्त्रातील विशेषज्ञ, एक उत्कृष्ट शिक्षक आणि बहुविद्याशाखीय क्षेत्रातील तीक्ष्ण संशोधक असणाऱ्या, जे पुढे १९९० मध्ये नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू झाले, अशा डॉ. पी. एल. भांडारकर यांनी प्राध्यापक आणि विभागप्रमुखाची १९८५ ला जबाबदारी स्विकार करण्यापर्यंत प्राध्यापक बी. जी. मोहोनी यांनी पुन्हा विभागाला सांभाळले.

एक विद्यार्थी म्हणून समाजशास्त्राचे अध्ययन करतांनां डॉ. भांडारकर यांनी त्यांच्या सुरूवातीच्या काळात सिध्दांत आणि पद्धतीशास्त्राचे मर्मभेदक आकलन प्राप्त केले. समाजशास्त्राचे एक अध्यापक म्हणून स्थापित होतांना अगदी अल्पावधीतच त्यांनी पद्धतीशास्त्रावर पुस्तक लिहिण्याकरिता स्व–विचारांची योजना करणे सुरू केले जे त्यांच्या सिध्दांत आणि सिध्दांत व संशोधन यांतील परस्पर प्रभाव किंवा परस्परक्रिया यांवरील दृष्टीकोणाला तीक्ष्णतेने प्रतिबिंबित करतील. अंमिमत: त्यांनी 'रिसर्च मेथेडोलॉजी ॲड टेक्निक्स ऑफ सोशल सायन्स रिसर्च' या शीर्षकाचे पुस्तक लिहिले, जे सामाजिक शास्त्रांच्या संशोधनाच्या क्षेत्रात एक मैलाचा दगड ठरले. डॉ. भांडारकरांच्या या पुस्तकाचे जगभर स्वागत केल्या गेले व वाचले गेले आणि विश्वातील संपूर्ण सामाजिक शास्त्रांच्या जगतात त्यांना सामाजिक शास्त्रज्ञ म्हणून प्रसिध्दी व सन्मान प्राप्त झाला. ते एक जिज्ञासू आणि समर्पित संशोधक होते जे नेहमीच विविध सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीकरीता रणनीतीच्या आखणीसाठी आपल्या संशोधनाद्वारे त्या सामाजिक प्रश्नांमध्ये स्वत:ला गुंतवूण घेत असत. विषयातील त्यांची खोली आणि बौध्दिक प्रभावामुळे ते समाजशास्त्रातील सैध्दांतिक, पद्धतीशास्त्रीय आणि व्यावहारिक मुद्यांवरील परिसंवाद, कार्यशाळा आणि चर्चासत्राकरीत युजीसी किंवा आय. सी. एस. एस. आर. सारख्या शैक्षणिक संस्थाकडून अगदी सहजपणे निधीचे व्यवस्थापन करीत होते. समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणून रूजू झाल्यानंतर अगदी लगेचच त्यांनी 'सिध्दांत आणि पद्धतीशास्त्रामधील अलीकडील प्रगतीवरील युजीसी प्रगत संस्था' या शीर्षकाच्या अंतर्गत एकेवीस दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले, ज्यात नागपूर विद्यापीठाव्यतिरिक्त मध्य भारतातील अन्य भागातील राज्य विद्यापीठांतील समाजशास्त्राच्या अध्यापनाशी संबंधित १०० च्या वर वरिष्ठ प्राध्यापकांनी सहभाग नोंदिविला होता. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ आणि दिल्ली विद्यापीठासहीत देशभरातील विविध विद्यापीठांतील जवळपास ५० प्रख्यात प्राध्यापकांना साधन–व्यक्ती म्हणून निमंत्रित केले होते. सामाजिक संशोधन आयोजनातील पद्धतीशास्त्रासह समाजशास्त्रातील दोन मुलभूत घटक असलेल्या सिध्दांत आणि संशोधन यांतील नवीनतम प्रगती, ज्याशिवाय सामाजिक घटती किंवा सामाजिक समस्यांचे आकलन अपूर्ण राहील, त्यांची समाजशास्त्रांच्या अध्यापकांना ओळख करूण देणे हा या दीर्घकालीन कार्यशाळेचा हेतू होता. समाजशास्त्र ज्यामुळे नेहमीच एक शास्त्र आकारास येवू शकते, अशा समाजशास्त्राच्या दोन्ही सैध्दांतिक आणि अनुभवजन्य वैशिष्टयांना समजून घेण्याच्या दृष्टिने या कार्यशाळेने समाजशास्त्राच्या अध्यापकांना मदत केली. समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात सैध्दांतिक व पद्धतीशास्त्र या दोन्ही विषयांचा समावेश करण्याची नवी परंपरा सुरू करून ही कार्यशाळा नागपूर विद्यापीठातील समाजशास्त्र शिकविण्याच्या इतिहासामध्ये बदल करतांना दिसली. १९९० मधील या कार्यशाळेपासून, नागपूर विद्यापीठातील समाजशास्त्र विषयाने विकासाकडे एक नवीन वळण घेतले, ज्यामुळे केवळ नागपूर विद्यापीठाच्याच नव्हे तर संपूर्ण मध्य भारतातील अध्यापकांमध्ये लोकप्रियता आणि महत्त्व प्राप्त झाले.

नागपूर विद्यापीठात समाजशास्त्राला विकसित करणे आणि या विषयाला एका नव्या उंचीवर आणण्याचे श्रेय डॉ. पी. एल. भांडारकर यांना जाते. प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून यांच्या कार्यकाळात विभागाने शैक्षणिक उत्कृष्ठतेचे सुगीचे दिवस बघितले. डॉ. भांडारकर यांनी विद्यार्थ्यांच्या तत्कालीन शैक्षणिक गरजा आणि सामाजिक मागणीच्या अनुषंगाने समाजशास्त्रात अनुरूप सुधारणांची सुरूवात केली. ते या विभागाचे असे पहिले प्राध्यापक होते ज्यांनी विभागात कार्यशाळा, परिसंवाद आणि परिषदांचे आयोजन करण्याची परंपरा निर्माण केली. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी आणि संशोधक अधिछात्र यांनी विभागात शिक्षणाचा आनंद उपभोगला आणि विविध शैक्षणिक उपक्रमात सहभागी करून उच्च समाधान प्राप्त केले. १९८८ साली तत्कालीन कुलगुरूंनी डॉ. भांडारकर यांना अकॅडेमिक स्टॉफ कॉलेज चे संचालक पद देवू केल्यानंतर, हा विभाग डॉ. टी. जी. मेश्राम यांनी सांभाळला. तद्नंतर हिस्लॉप महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. पी. एस. बोबडे, जे विविध सामाजिकदृष्टया महत्त्वपूर्ण विषयांवर सातत्यपूर्ण विपुल लेखन करणारे एक सृजनशील लेखक म्हणून ओळखले जातात, ते १९९६ साली विभागात प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून रूजू झाले. त्यांनी डॉ. पी. एल. भांडारकर यांनी विभागासाठी घालुन दिलेल्या शैक्षणिक मानदंडाला सातत्य प्रदान करण्यासाठी प्रतिबध्दता आणि समर्पणाच्या सखोल भावनेने अपवादात्मक परिश्रम घेतले. डॉ. बोबडे यांनी आपल्या नियमित अध्यापनाची जबाबदारी व प्रशासकीय जबाबदारी वगळता संशोधनासाठी बराच वेळ दिला. त्यांनीच यूजीसीच्या बृहत आणि लघु शोध प्रकल्पांची परंपरा विभागात सुरू केली. त्यांनी स्वत: आदिवासींच्या आधुनिकीकरणाशी संबंधित एक मोठा प्रकल्प हाती घेतला. समाजशास्त्राच्या क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानामध्ये त्यांची १. श्रमिक संघटन आणि राजकारण, २. भारतीय समाजशास्त्र आणि ३. आर्थिक विकासाचे सामाजिक पैलू, या प्रकाशित पुस्तकांचा समावेश आहे. त्यांच्या विभागप्रमुख पदाखाली समाजशास्त्र विभागाने 'विकासाचे सामाजिक–आर्थिक आणि राजकीय आयाम' या विषयावर मराठी समाजशास्त्र परिषदेची दोन दिवसांची राज्य परिषद आयोजिक केली, ज्यात डॉ. सुधा काळदाते, डॉ. पी. एल. भांडारकर, डॉ. डी. एन. धनागरे, डॉ. विलास संगवे, डॉ. एस. एन. पवार, डॉ. उत्तम भोईटे, डॉ. बाविस्कर, डॉ. अनुराधा

भोईटे, डॉ. विजय देशपांडे, डॉ. बी. के. खडसे आणि इतर अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली. 'महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीची गतिशीलता' या विषयावर त्यांनी दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित केले, यामध्ये राज्यभरातील अनेक विद्वानांना सामाजिक चळवळवी व त्यावरील गतिविधीशी संबंधित अनेक मुद्यांवर चर्चा आणि संवाद करण्याची संधी देण्यात आली. डॉ. बोबडे यांनी समाजशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून आपल्या चार वर्षाच्या अल्प कालावधीत घेतलेल्या कार्यशाळा, चर्चासत्रे, परिसंवाद आणि संशोधन प्रकल्पांद्वारे समाजशास्त्राला वर्गखोल्यांच्या चार भिंतीच्या पलीकडे समाजापर्यंत नेले. सहभागी समाजशास्त्र विकसित करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे ज्यामुळे आता नागपूर विद्यापीठातील अध्यापक, विद्वान आणि विद्यार्थी थेट क्षेत्र परिस्थितीत समाजशास्त्र समजतात, परस्पर आदानप्रदान आणि अनुभव घेतात.

२००१ साली डॉ. बोबडेंच्या सेवानिवृत्तीनंतर, डॉ. भांडारकर आणि प्राध्यापक बी. जी. मोहोनी यांचे विद्यार्थी डॉ. बी. के. स्वाईन यांनी विभागाचे प्रमुखपद ग्रहण केले. तेंव्हापासून प्राध्यापक डॉ. स्वाई विभागाला सांभाळत आहेत आणि त्याची काळजी वाहत आहेत. डॉ. स्वाई यांच्या शैक्षणिक योगदानामध्ये पहिले, हिमालय पब्लिशिंग हाउस, मुंबर्द द्वारा प्रकाशित 'भारतातील विदर्भातील बदलती व्यावसायिक संरचना' या आणि दुसरे, दत्तसन्स, नागपूर द्वारा प्रकाशित 'भारतातील बाल कामगार' या विषयांवरील दोन संशोधन पुस्तकांचे प्रकाशन समाविष्ट आहे. त्यांच्या योगदानामध्ये दोन यूजीसी प्रकल्प आणि वयस्कता, महिला आणि आदिवासींचे अध्ययन, फावल्या वेळेचे समाजशास्त्र, शिक्षणाचे समाजशास्त्र, परिवर्तन आणि विकासाच्या समाजशास्त्रातील विस्तृत क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवर अनेक संशोधन पत्रांचे प्रकाशन देखील समाविष्ट आहे. आत्तापर्यंत, त्यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्रातील विविध समस्या क्षेत्रांवर पंधरा अभ्यासकांनी यापूर्वीच आचार्य पदवी प्राप्त केली आहे. डॉ. स्वांई यांनी स्वीडनमधील गोटेनबर्ग येथे २०१० मध्ये आंतरराष्ट्रीय समाजशास्त्र संघटनेच्या वर्ल्ड कॉग्रेस ऑफ सोशियॉलॉजी येथे आणि २०११ मध्ये इटलीच्या पलेर्मो विद्यापीठामध्ये आंर्तराष्ट्रीय परिषदेत दोन संशोधन पेपर सादर केले आहेत.

डॉ. स्वाई यांनी विभागाचा कार्यभार अशा काळात स्वीकारला जेंव्हा विद्यार्थ्यांची नावनोंदणी आणि प्राध्यापकांची संख्या या दोहोंच्या बाबतीतही विभाग जवळजवळ खराब स्थितीत होता, तरी त्यांनी शैक्षणिक स्तर अभंग राखला आहे. डॉ. भांडारकर यांच्या काळापासून अध्ययनाचा अभ्यासक्रम तसाच होता व तो जुन्यापद्धतीचा झालेला होता आणि म्हणूनच वेगवेगळया भागधारकांची आवश्यकता लक्षात घेऊन तो अप्रासंगिक झाला होता. या व्यतिरिक्त, प्रभावी शिक्षण आणि अध्यापन प्रक्रियेसाठी हळूहळू प्रासंगिक ठरणाऱ्या आधुनिक अध्यापन, वस्तू, साधने, उपकरणांची मागणी वाढत होती. डॉ.स्वाई यांच्यापुढे ही मोठी आव्हाने होती जी समाजशास्त्र विषयाचा अपेक्षित विकास आणि विभागाचा विस्तार सुनिश्चित करणाऱ्या त्यांच्या प्रयत्नांना अपयशी करू शकत होती. म्हणून पहिल्या दिवसांपासून त्यांनी त्यांच्या स्तरावर अशाप्रकारे अधिक चांगले कार्य करण्याचा प्रयत्न केला की वरील सर्व आव्हानांना यशस्वीरित्या पराभूत करून विषयाची प्रगती व विभागाचा विस्तार सुलभ होण्यासाठी मार्ग तयार करता आला.

विभागाच्या विस्ताराच्या दिशेने पहिल्या पाऊलाच्या स्वरूपात स्थानिक वृत्तपत्रांतून सतत जाहिरात आणि प्रसिध्दीद्वारे विद्यार्थ्यांची नावनोंदणी २०—३० पासून ६० पर्यंत, जी आताची प्रवेश क्षमता आहे, वाढविली. समकालीन काळासाठी वाढत्या प्रासंगिकतेसह या विषयाचे उदयोन्मुख व्याप्ती आणि महत्त्व यासंबंधीचा संदेश संभाव्य विद्यार्थ्यापर्यंत पाहोचविण्यासाठी विद्यापीठाच्या वेबसाइटद्वारे प्रसारित करण्यात आला. स्वीकारले गेलेले पाऊल इतके प्रभावी ठरले की आता आवश्यक प्रवेश क्षमतेपेक्षाही अधिक विद्यार्थ्यांचा ओघ वाढला आहे. विद्यापीठातील विभाग आणि तिच्याशी संबंधित महाविद्यालये यांतील अध्यापन तंत्र, सहाय्यक साधने आणि उपकरणे यांतील सुधार आणि विषयाचा अभ्यासक्रम अद्यावत करणे यासाठी पुढील पाऊल उचलण्यात आले. वरील सर्व प्राध्यापक आणि विभागप्रमुखांनी त्यांच्या क्षमतेनुसार त्याच्या वृध्दी व विकासासाठी विभागाला शैक्षणिक नेतृत्व प्रदान करण्याचे अत्युत्तम प्रयत्न केले. अनेक वर्षापासून हा विभाग अध्यापन, संशोधन आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या भवितव्य निर्धारण व प्रगतीच्या क्षेत्रात आपल्या उत्कृष्ठ परंपरेचे पालन करीत आहे. या विभागातील ४००० पेक्षा अधिक विद्यार्थी या देशात आणि देशाबाहेर विविध व्यावसायिक, प्रशासकीय, व्यापारिक, अध्यापन व संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत.

विभागाने १९६४ पासूनच पारंपारिक किंवा वार्षिक प्रतीमानावर आधारित द्विवार्षिक स्नातकोत्तर अभ्यासक्रम सुरू केला. सुरूवातीला प्रत्येक वर्षी चार या प्रमाणे आठ पेपरचा अभ्यासक्रमात समावेश केला होता. फक्त अनिवार्य पेपर किंवा विषय शिकविण्याच्या पद्धतीने समाजशास्त्राची व्याप्ती काही निवडक विषयक्षेत्रांपुरती मर्यादित केली आणि त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या विभिन्न आणि वैविध्यपूर्ण आवडीच्या क्षेत्रात प्रवेश करण्यास २००१ पर्यंत मज्जाव होता. २०१२ साली, जेंव्हा विद्यापीठाने सत्र प्रतिमान परीक्षेची सुरवात आणि अंमलबजावणी केली, जी आजा विकल्प आधारित श्रेयांक व्यवस्था आहे, तेंव्हा समाजशास्त्राच्या क्षेत्राती नवीनतम उन्नत अशा घटकांना सामावून घेण्याच्या दिशेने विभागाचा अभ्यासक्रम लक्षणीय बदलाला सामोरा गेला. प्रत्येक सत्रात दोन अनिवार्य पेपर आणि तीन पेपरचा एक समूह असणारे वैकल्पिक पेपरचे दोन समूह सामील असतात, अशाप्रकारे विद्यार्थ्यांना त्यांच्या रूचीप्रमाणे पेपर निवडण्यासाठी अधिकाधिक संधी उपलब्ध होते.

कालानुरूप, वर्गखोली प्रणालीवर आधारित अध्यापनाबरोबरच आता संशोधनावर अधिक भर दिला जात आहे. आता अध्यापक अध्यापनाला अधिक प्रभावी आणि फलप्रद करण्यासाठी वर्गातील आंतरक्रियाशील फलक आणि पॉवरपॉईंट प्रस्तुतीकरण यासारख्या सुविधांचा अधिक व्यापकपणे उपयोग करीत आहेत. त्याशिवाय, समाजाशी संबंधित विद्यार्थ्यांना उदयान्वित मुद्दे आणि प्रश्न यांच्या संपर्कात ठेवण्यासाठी विभाग स्तरावर विविध कार्यशाळा, विद्यार्थी परिसंवाद आणि आमंत्रित अतिथी व्याख्याने आयोजित केली जातात. आत्तापर्यंत विभागाने विविध आंतरविद्याशाखीय संबंधित मुदद्यावर अनेक राज्य, राष्ट्रीय, आणि आंतरराष्ट्रीय स्तरांचे परिसंवाद आणि परिषदा, अतिथी प्राध्यापक आणि इतर अतिथी अधिव्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित केले आहेत आणि विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे स्विकृत बृहत आणि लघु शोध प्रकल्प प्राप्त केले आहेत. डॉ. बी. के. स्वांई आणि डॉ. ए. टी. बोरकर हे केवळ दोन नियमित प्राध्यापक, एक वार्षिक कंत्राटी आधारावर नियुक्त केलेला प्राध्यापक आणि तीन तासिका तत्वावरील प्राध्यापक यांच्या बळावर पूर्ववर्तीनी निर्धारित केलेले शिक्षण व संशोधनाचे ध्येय साकार करण्यासाठी विभाग शक्यतो प्रयत्न करीत आहे.

# भारतीय समाजशास्त्राचा विकास, आव्हाने आणि भवितव्य

**डॉ.भगवान सुरेश मनाळ,** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर जि. औरंगाबाद

**प्रास्तविक :–** समाजविषयक ज्ञान मिळविण्याचा एक मार्ग समाजशास्त्र होय. समाजातील विविध घटकांच्या घडामोडीविषयी समाजशास्त्रीय ज्ञानाची प्रत्यक्ष उपयोगिता व महत्व वाढतच असल्याचे दिसून येते. भारतीय समाजापुढे असणाऱ्या विविध समस्या समजावून घेणे आणि वास्तवतेच्या आधारावर त्यांची सोडवणूक करणे ही आता काळाची गरज बनत आहे. सामाजिक विज्ञानात समाजशास्त्राने महत्वाचे स्थान निर्माण केले आहे. समाजशास्त्रीय संशोधनाला राष्ट्रीय विकासाच्या दृष्टिकोनातून समाजशास्त्राचे योगदान खरे असले तरी बदलत्या काळाच्या अनुषंगाने समाजशास्त्रीय अध्यापन व संशोधनात काही समस्याही समाजशास्त्रापुढे निर्माण होत आहेत. सद्यस्थितीत इतर सामाजिक विज्ञानाच्या तुलनेत आणि ज्ञानाच्या मागणीचा व ज्ञानाचा प्रत्यक्ष सामाजिक विनियोग आणि वापर याबाबतीत समाजशास्त्र विशेषत: भारतीय समाजशास्त्र कुठे तरी कमी पडते आहे, सामाजिक घटनांच्या ज्ञान निर्मिती प्रक्रियेतील आपले स्थान पाहता गेल्या सुमारे पाऊणशे वर्षामध्ये भारतीय समाजशास्त्राने एक वेगळा दर्जा आणि मान्यता प्राप्त केली आहे, हे ही तेवढेच महत्वाचे आहे; त्यामुळे साहजिकच, नकळत एक वाद विषय भारतीय समाजशास्त्राच्या क्षेत्रात निर्माण झालेला पाहायला मिळतो; तो म्हणजे एकीकडे भारतीय समाजशास्त्र हे प्रगतीशील आहे, गतिमान आहे, नवीन आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य त्यामध्ये आहे तर दुसरीकडे असाही दृष्टिकोन दिसून येतो की, भारतात समाजशास्त्राचे स्थान, महत्व हे घसरत जात आहे. त्याची व्यावसायिक उपयोगिता कमी होत चालली आहे. संशोधनाचा दर्जा घसरत चालला आहे. समाजशास्त्रीय ज्ञान, संशोधन या विषयीचे आकर्षण कमी होत चालले आहे की काय अशी शंका उत्पन्न होत आहे. समाजव्यवस्थेतील वास्तविक घटनांच्या बाबतीतील समस्या आणि त्यातील परिवर्तन या विषयीच्या समाजशास्त्राच्या ज्ञानास, समाजशास्त्रीय संशोधनास पाहिजे तो प्रतिसाद अपुरा वाटतो.

**अभ्यासपध्दती :–** प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून सद्यकालीन भारतीय समाजशास्त्राची कार्यप्रणाली, संशोधन क्षेत्र, अभ्यासपध्दती, आणि यात्द्वारे समाजविषयीची ज्ञान निर्मिती व त्याचा समाजासाठीचा उपयोग याचा खऱ्या अर्थाने समाजशास्त्राच्या अभ्यासकांसमोर उलगडा होणे गरजेचे आहे. याबाबत प्रस्तुत शोध निबंधाच्या आधारे संशोधकाने वापरलेली अभ्यासपध्दती ही भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासावर आधारीत दुय्यम तथ्यसामग्रीवर आधारित आहे. ज्यासाठी संदर्भ ग्रंथाचा वापर या बरोबरच सद्यकालीन भारतीय समाजशास्त्रातील समकालीन संशोधन संस्था आणि त्यांच्या कार्याचा आढावा स्पष्ट करण्यात आला आहे. याखेरीज भारतीय समाजशास्त्रापुढील आव्हाने आणि भारतीय समाजशास्त्राचे भवितव्य यांचा उल्लेख ही सदर लघुशोध निबंधाव्दारे करण्यात आला आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये:–** १) भारतीय समाजशास्त्राच्या विकासातील समाजशास्त्रीय संशोधन आणि विकासासाठी निर्माण झालेल्या संस्थांचे योगदान अभ्यासणे. २) भारतीय समाजशास्त्रापुढील आव्हाने आणि भवितव्य यांचा अभ्यास करणे.

**भारतीय समाजशास्त्राच्या विकासातील सामाजिक संशोधन संस्थांचे योगदान:–** १९८६ साली नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या अकराव्या जागतिक समाजशास्त्र कॉंग्रेसच्या अधिवेशनापासून भारतातील समाजशास्त्रीय विकासाला एक नवी दिशा प्राप्त झाली आहे. समाजजीवनात वाढत जाणाऱ्या गुंतागुंतीचा, समस्यांचा अभ्यास करण्याची संधी भारतातील समाजशास्त्रज्ञांना प्राप्त होत आहे. सामाजिक वास्तवतेतील जटिलता जाणून घेण्यासाठी तरूण समाजशास्त्रज्ञांचे योगदान ही वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय समाजशास्त्रातील समस्या कोणत्या आहेत? त्यांचे भवितव्य किती उज्वल आहे? त्यात नवीन प्रवृत्ती व विचारसरणीचे योगदान किती प्रमाणात साधले जात आहे? या गोष्टीं बरोबरच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांचे त्यातील स्थान कोणते आहे? अध्ययनाचा दृष्टिकोन कसा बदलत जात आहे? जागतिकीकरण आणि भारतीय समाजशास्त्राचा विकास यात कसा परस्परसंबंध आहे? या सर्वांचा मागोवा घेणे महत्वाचे ठरते. अध्यापन आणि संशोधनाला ज्या संस्थांनी समाजशास्त्राच्या क्षेत्रात महत्वाचे योगदान दिले आहे, त्यांची भूमिका लक्षात घेणे हे देखील महत्वाचे आहे. यातील काही महत्वाच्या संस्थांचा उल्लेख प्रस्तुत शोध निबंधाव्दारे करण्यात आला आहे.

१) **आंतरराष्ट्रीय समाजशास्त्रीय मंडळ** (International Sociological Association) जागतिक स्तरावर समाजशास्त्रीय विचारांची देवाण–घेवाण करण्याच्या उद्देशाने आणि समाजशास्त्रीय संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने १९४९ साली 'International Sociological Association' ची स्थापना करण्यात आली.

२) **जागतिक समाजशास्त्रीय परिषद** (World Congress of Sociology): झुरिच स्वित्झर्लंड या ठिकाणी १९५० साली पहिल्या जागतिक समाजशास्त्र परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. विचारांचे आदानप्रदान, व्यक्तिगत संबंध वाढविणे, नवीन संशोधन विषयांवर चर्चा करणे आणि क्रियाशील अशा समुहांशी संवाद साधने या हेतूसाठी या सामाजिक परिषदेचे आयोजन करण्याची भूमिका संयोजकांची असते.

३) **मुखपत्र:** International Sociological Association चे मुखपत्र किंवा नियतकालिक म्हणून Current Sociology, International Sociology आणि Sage Studies In International Sociology चा उल्लेख महत्वाचा आहे. या तीन नियतकालिकांतून समाजशास्त्रीय संशोधनाची अद्ययावत माहिती जागतिक स्वरूपात उपलब्ध होऊ शकते.

४) **भारतीय समाजशास्त्रीय संख्या** (Indian Sociological Society) : इंडियन सोशिऑलॉजिकल सोसायटी ही भारतातील समाजशास्त्रांची एक व्यावसायिक संघटना आहे. स्वतंत्र भारतातील समाजशास्त्रीय अध्ययन व संशोधनाला गती प्राप्त करून देण्यासाठी व दर्जेदार समाजशास्त्रीय विचारांना राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये यांच्या अथक प्रयत्नातून 'Indian Sociological Society' ची दि. ११ डिसेंबर १९५१ रोजी मुंबईत स्थापना करण्यात आली. ही संस्था 'International Sociological Association' ची संलग्न संस्था आहे.

५) **अखिल भारतीय समाजशास्त्रीय परिषद** (All India Sociological Conference): Indain Sociological Society ही एक औपचारिक नोंदणीकृत आणि लिखीत घटना असलेली एक संस्था आहे व या संस्थेची भगिनी संस्था म्हणून अखिल भारतीय समाजशास्त्रीय परिषद ही १९५५ साली सुरू करण्यात आली. प्रा. आर.एन.सक्सेना, धुर्जटीप्रसाद मुखर्जी, राधाकमल मुखर्जी, डी.एन. मुजुमदार यांच्या नेतृत्वाखाली ही परिषद कार्यरत होती.

समाजशास्त्रज्ञांची राष्ट्रीय परिषद संघटित करावी हा मूळ उद्देश त्यामागे होता.

६) **Sociological Bulletins:** Sociological Bulletin हे 'Indian Sociological Society' या संस्थेचे पहिले नियतकालिक मार्च.१९५२ मध्ये प्रकाशित करण्यात आले. वर्षातून दोनदा, मार्च व सप्टेंबर असे हे सहामाही नियतकालिक प्रकाशित होत असते. समाजशास्त्रीय संशोधकांना त्याचे निष्कर्ष प्रकाशित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी हे नियतकालिक उपयुक्त ठरले आहे.

७) **Ethnographic and Folk Culture Societies:** ही संस्था राष्ट्रीय पातळीवर समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्राची व्यावसायिक संघटना म्हणून कार्यरत आहे. लखनौ या ठिकाणी १९४७ साली डी. एन. मुजुमदार यांनी या संस्थेची स्थापना केली. आंतरराष्ट्रीय दर्जाचे Eastern Anthropologist हे तिमाही नियतकालिक या संस्थेमार्फत नियमितपणे प्रकाशित केले जाते. समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्र क्षेत्रात या संस्थेचे योगदान महत्वपूर्ण आहे.

८) **Indian Anthropological Association:** या संस्थेची स्थापना एल.पी. विद्यार्थी यांनी केली. 'Indian Anthropologist' या नावाचे नियतकालिक या संस्थेतर्फे प्रकाशित केले आहे.

९) **भारतीय सामाजिकशास्त्र संशोधन समिती** (Indian Council of Social Science Research): भारत सरकारने १५ एप्रिल १९६९ रोजी आय. सी. एस. एस. आर. ची स्थापना केली. सामाजिकशास्त्रातील व्यावसायिक संघटनांना ही संस्था मदत करते. सामाजिक क्षेत्रातील संशोधनाला गती आणि चालना देण्यासाठी सामाजिकशास्त्र विषयक संस्था व सामाजिकशास्त्रज्ञांकडून आलेल्या संशोधन प्रस्तावांना (Research Proposals) अर्थसाहाय्य देणे, शिष्यवृत्या (Fellowships) देणे, संशोधनासाठी अनुदान देणे, संशोधन प्रकल्पांना (Research Projects) अनुदान देणे यासाठी ही संस्था महत्वपूर्ण कार्य करते.

अलिकडील काळात आय. सी. एस. एस. आर. कडून प्राधान्यक्रमाने काही समाजशास्त्रीय विषयातील संशोधनाला विशेष गती देण्यात आली आहे. त्यामध्ये स्त्री विषयक अभ्यास, लोकसंख्या, दुर्बल घटक, पर्यावरण, अनुसूचित जाती, जमाती, प्रसारमाध्यमे, महिला आणि बालकल्याण जागतिकीकरण, एडस्, राष्ट्रीय एकात्मता, ग्रामीण व नागरी समस्या व विकास यावर विशेष भर देण्यात येत आहे.

१०) **विद्यापीठ अनुदान मंडळ** (University Grants Commission): देशातील सर्व विद्यापीठांची ही एक केंद्रीय संस्था आहे. यु.जी.सी. या नावाने ही संस्था परिचित असून १९६३–६४ मध्ये या संस्थेमार्फत विशेष करून मानव्यशास्त्र (Humanities)आणि सामाजिकशास्त्रे (Social Science) अशा विद्यापीठ आणि महाविद्यालयीन स्तरावर संशोधनाचे कार्य करणाऱ्या संशोधक प्राध्यापकांना उत्तेजन देण्यासाठी आणि त्यांना आर्थिक अनुदान देण्यासाठी एक महत्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली.

**११) मराठी समाजशास्त्र परिषद:** १६ एप्रिल १९८३ रोजी सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० अन्वये 'मराठी समाजशास्त्र परिषद' ची अधिकृतपणे नोंदणी करण्यात आली. परिषदेची घटनाही तयार करण्यात आली आणि लिखित घटनेच्या आधारे महाराष्ट्रात 'मसप' चे कार्य सुरू झाले. या संस्थेच्या उद्देशानुसार, घटनेनुसार समाजशास्त्र विषयक शास्त्रीय दृष्टीकोण व विचार मराठीतून प्रकाशित करणे, भारतीय समाजव्यवस्थेच्या समस्यांसंबंधी व त्यांच्या संदर्भात महाराष्ट्राच्या सामाजिक प्रश्नांसंबंधी विवेचन व प्रबोधन करणे. या कार्यासोबतच परिषदेचे उद्देश साधण्यासाठी, व्याख्याने व चर्चा घडवून आणणे. नियतकालिके काढणे व ग्रंथनिर्मिती करणे, ठिकठिकाणी मराठी समाजशास्त्र विषयक सभा संमेलनांचे व अधिवेशनाचे आयोजन करणे.

**१२) नियतकालिक व प्रकाशन:(समाजशास्त्र संशोधन पत्रिका)** मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्याचा आढावा घेणे, तसेच मराठीतून समाजशास्त्रीय वाङमय प्रकाशित करणे, त्यासाठी १९८७ या वर्षात मसपच्या 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' या नियतकालिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. आजपर्यंत या नियतकालिकांचे अनेक अंक प्रकाशित झाले. या संशोधन पत्रिकेतून आजवर महाराष्ट्रातील समाजशास्त्राचा विकास, सामाजिक संरचना, शेतकरी संघटना व पक्षीय राजकारण, महाराष्ट्रातील आर्थिक चळवळी, दलित, दलित चळवळीचे समाजशास्त्रीय विश्लेषण, आदिवासी विकास, ज्ञान आणि परिवर्तन, विकास प्रक्रिया, समाजशास्त्राचे अध्ययन अध्यापन आणि संशोधन विकास, दारिद्रय, महिला आणि राजकारण, आरक्षण, ग्रामीण औद्योगिकीकरण, नवे आर्थिक धोरण, विदर्भ विकास, मराठवाड्यातील आर्थिक विकास अशा विविध विषयांवर मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी आपले योगदान दिल आहे.

**भारतीय समाजशास्त्रापुढील आव्हाने व भवितव्य:–**

सद्यकालीन गतिमान समाजाशी एकरूप होऊ शकतील असे समाजशास्त्रीय विचारांचे स्वरूपही गतिमान असले पाहिजे. केवळ पारंपारिक अभ्यासक्रम, पारंपारिक दृष्टिकोण आणि सिध्दांत यांना चिकटून न राहता आधुनिक, वैश्विक दृष्टिकोणातून समाजशास्त्राकडे पाहिले जावे, यासाठी काही बदलत्या आधुनिक विचारसरणीचे निर्णय समाजशास्त्राज्ञांकडून अपेक्षित आहेत. गतिमान अभ्यासक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करणे, हे समाजशास्त्रज्ञांपुढील एक मोठे आव्हान आहे. त्यामुळे वेगाने बदलणाऱ्या जागतिक घडामोडींशी तितक्याच सहजतेने सामोरे जाण्याचे आव्हान समाजशास्त्रज्ञांनी स्वीकारणे अधिक उचित ठरणार आहे. सद्यस्थितीत भारतीय समाजशास्त्रांपुढील महत्वांच्या आव्हांनाविषयी विचार करता पुढीलप्रमाणे याबाबत थोडक्यात मांडणी करण्यात आली आहे.

**१. बौध्दिक पातळीवरील आव्हाने:–** मुळातच समाजशास्त्र हा पाश्चात्य देशांकडून विकसीत झालेला असून वसाहतवाद्यांमार्फत धर्मप्रसार आणि प्रशासन हे हेतु साध्य करण्यासाठी ते परदेशातून भारतात आलेले समाजशास्त्र आहे. साहजिकच भारतातील समाजशास्त्रांवर या पाश्चात्य समाजशास्त्राचा पगडा मोठा आहे. या पाश्चात्य बौध्दिकवादाचा प्रभाव स्वातंत्र्यानंतरही भारतातील समाजशास्त्रावर झालेला जाणवतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर समाजशास्त्राच्या क्षेत्रात जे बौध्दिक परिवर्तन होत होते त्याचा भारतातील समाजशास्त्राच्या क्षेत्रावर परिणाम होतच राहिला. पाश्चात्य समाजशास्त्रातील सैध्दांतिक आणि पध्दतीशास्त्रीय गोष्टी भारतीय समाजशास्त्रात अग्रक्रमाने प्रवाहित झाल्या. अभ्यासक्रम, अध्यापन आणि संशोधन यात हा प्रभाव मोठया प्रमाणात निर्माण झाला. भारतीय समाजशास्त्राच्या विकासात हे पाश्चात्य प्रतिमान किती महत्वाचे मानायचे, त्याचा प्रभाव किती प्रमाणात स्वीकारायचा आणि ते किती प्रमाणात उपयुक्त आहे हे प्रश्न भारतीय समाजशास्त्रज्ञांपुढे एक आव्हानच आहे. त्यामुळे भारतीय समाजशास्त्राचे भारतीयीकरण करणे हे एक तातडीचे बौध्दिक आव्हान आपल्या समोर आहे.

**२. शैक्षणिक पातळीवरील आव्हाने:–** भारतातील समाजशास्त्र या विषयाचे महत्व पाहता उच्च माध्यमिक स्तरावर समाजशास्त्राल

हा एक अभ्यासक्रमातील महत्वाचा विषय बनलेला आहे. निरनिराळया स्पर्धा परिक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्यात हा विषय आवडीचा बनलेला आहे. परंतु पदवी आणि पदव्युत्तर यासाठी महाविद्यालये आणि विद्यापीठात समाजशास्त्र या विषयाला विद्यार्थ्यांची पहिली पंसती मात्र मिळत नाही, हे आता प्रकर्षाने जाणवते. पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील या विषयाचे स्वरूप विद्यार्थ्यांना पटकन आकर्षित करून घेईल असे घडत नाही. जे विद्यार्थी समाजशास्त्राकडे वळतात ते केवळ एक सौम्य विकल्प, पर्यायी विषय म्हणून निवडतात आणि तशी समाजशास्त्राविषयीची धारणा झाली आहे, कुंटुंब, जात, सामाजिक समस्या, नागरी –ग्रामीण समाज म्हणजेच समाजशास्त्राचा अभ्यास अशी समाजशास्त्राची दुय्यम प्रतिमा तयार झाली आहे. ही परिस्थिती बदलण्याचे आणि समाजशास्त्राचे अर्थपूर्ण अध्यापन करण्याचे, त्याच्या विषयी विद्यार्थ्यांच्या मनात आवड निर्माण करण्याचे फार मोठे शैक्षणिक आव्हान आपल्या समोर आहे. विद्यार्थ्यांच्या मनात समाजशास्त्र विषयीचा संभ्रम आणि गैरसमज दूर करणे आणि समाजशास्त्राच्या समाजविषयक आणि व्यावसायाभिमुख अभ्यासाला प्रवृत्त करणे. ही एक फार मोठी जबाबदारी आहे. विषयाचा आशय, साधने, पध्दतीशास्त्र, अध्यापनतंत्र आणि विद्यार्थ्यांच्या प्रवृत्तीत या विषयाच्या अनुरोधाने फार मोठे शैक्षणिक परिवर्तन आपल्याला घडवून आणले पाहिजे. सामाजिकशास्त्रातील एक महत्वाचे विज्ञान म्हणून ते अभ्यासकांपर्यंत नेण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे.

**३. व्यावसायिक पातळीवरील आव्हाने:–** व्यावसायिक पातळीवरील समाजशास्त्राचा विकास तसा भरभराटीचा आणि चांगल्या दर्जाचा ठरलेला आहे. 'Indian Sociological Society' च्या स्थापनेपासून भारतीय समाजशास्त्रातील विविध व्यावसायिक संशोधन संस्थांचे कार्य आणि योगदान हे महत्वाचे ठरले आहे. परंतु नियोजन मंडळाने मात्र समाजशास्त्रज्ञांच्या संशोधनांकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते. नियोजनविषयक इतर संस्था, नियोजन विषयक ध्येयधोरणाकडे यापासूनही समाजशास्त्रज्ञांना दूरच ठेवले आहे. समाजशास्त्रज्ञांचे मत, त्यांच्या प्रतिक्रिया गंभीरपणे विचारात घेतल्या जात नाहीत. सामाजिक ते आर्थिक स्वरूपाची माहिती गोळा करण्यासाठी समाजशास्त्रज्ञेत्तर (Non-Sociologists) यांचीच मदत घेतली जाते. अर्थात यासाठी समाजशास्त्राचे अभ्यासक म्हणून एखाद्या समस्येच्या बाबतीत दीर्घकालीन उपाययोजना सूचविण्यात आपण कुठे कमी पडतो याचाही विचार त्यांनी केला पाहिजे. सामाजिक वास्तवता आणि सामाजिक समस्या या विषयी नाविन्य किंवा उपयुक्त अशी माहिती समाजशास्त्रज्ञ का देऊ शकत नाहीत याचा ही व्यावसायिक पातळीवर विचार करणे गरजेचे आहे. बदलत्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत समर्पक समाजशास्त्राची (Relevant Sociology) निर्मिती करणे आवश्यक बनत आहे. त्यामुळे व्यावसायिक पातळीवर समाजशास्त्रज्ञांना हे एक फार मोठे आव्हान आहे. आणि ते गंभीरपणे स्विकारणेही आवश्यक आहे.

**समारोप:–** स्वातंत्र्यपुर्व कालखंडात भारतातील समाजशास्त्राची पायाभरणी जरी झालेली असली तरी ती स्वातंत्र्योत्तर काळातील विकासाला मिळालेली चालना महत्वाची ठरते. गेल्या पाउणशे वर्षातील भारतीय समाजशास्त्राच्या प्रगतीमध्ये प्रस्तुत शोध निबंधाच्या सुरूवातीलाच उल्लेख करण्यात आलेल्या विविध समाजशास्त्रीय संशोधन संस्थांचा वाटा यात प्रामुख्याने महत्वाचा ठरतो. तसेच भारतातील नियोजनबध्द विकास योजनांमुळे गेल्या सत्तर वर्षात अनेक नवीन विद्यापीठे, त्यातून नवीन समाजशास्त्राचे विभाग या विद्यापीठात उघडण्यात आले. भारतात दिवसेंदिवस सामाजिकशास्त्रात व समाजशास्त्रात अध्ययन व संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची व संशोधकांची संख्याही वाढत आहे. सामाजिकशास्त्रांतील संशोधन संख्या आणि व्यावसायिक संघटनांची संख्या ही वाढत आहे. या सर्व बाबी जरी खऱ्या असल्या तरी बदलती वैश्विक परिस्थिती आणि भारतीय समाजशास्त्राची यातील भूमिका पाहता भारतीय समाजशास्त्राला आता कात टाकणे अत्यावश्यक बनले आहे. जगाच्या पाठीवर आज अनेक घडामोडी चालू आहेत, त्यामध्ये काही घडामोडी जगाला तारक आहेत, जागतिक विकासाला पोषकही आहेत. तर काही घडामोडी जगाला, समाजाला मारक ठरत आहेत, जागतिक व सामाजिक विकासाला अडथळा निर्माण करत आहेत. जगापुढे नवनवीन संकटे आव्हाने निर्माण करीत आहेत. या बदलत्या वैश्विक परिस्थितीचा परिणाम हा मानव समाजावर पर्यावरणावर कमी–अधिक प्रमाणात चांगला–वाईट परिणाम घडत आहे. त्यामुळे या सर्व घटनांचा संबंध मानवी जीवनाशी असल्याने अपरिहार्यपणे समाजशास्त्राला त्याची दखल घ्यावी लागत आहे. या सर्व वैश्विक परिवर्तनाची जागतिक घटकांची नोंद घेणे गरजेचे वाटते. कारण या सर्व घटनांचा भारतावर, भारतीय समाजावर किती व कसा परिणाम होत आहे, त्याला भारत किती समर्थपणे तोंड देत आहे, जागतिक पातळीवरील भारताचे स्थान या सर्व बाबींचा समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करणे क्रमप्राप्तच ठरते. या सर्व घटनाचां भारतीय समाजाशी जवळून संबंध येत असल्याने या सर्व प्रश्नांची दखल, सर्व घडामोडींची नोंद भारतीय समाजशास्त्राला घ्यावीच लागत आहे. त्यामुळे यासाठी भारतीय समाजशास्त्राच्या विकासाला मदत होऊ शकेल. यासाठी भारतीय समाजशास्त्रात अस्तित्वात असणाऱ्या सिध्दांत, संकल्पना, पध्दती, संशोधनतंत्र यांना पर्याय शोधण्याचा प्रयत्न सतत होणे गरजेचे आहे. तसेच समाजशास्त्रीय ज्ञानाची निर्मिती गुणात्मकतेवर झाली पाहिजे व समाजशास्त्रीय अभ्यासकांनी येणाऱ्या पिढीला आदर्श घालून देणे गरजेचे आहे. व्यासंग, वाढविणे गरजेचे आहे. भावीकाळातील विद्यार्थी वर्गाचा, संशोधकांचा जिज्ञासूपणा गृहीत धरून त्यांना अधिक गतिमान करण्यासाठी आपल्याला प्रयत्नशील राहणे आवश्यक ठरणार आहे.


***संदर्भ ग्रंथ सूची:***

*१. आहुजा राम, आहुजा मुकेश (२००८), 'समाजशास्त्र विवेचना एवं परिप्रेक्ष्य', कोल्हापूर, फडके प्रकाशन.*

*२. कोंडेकर ए.वाय., मारूलकर विजय, (२००९), 'भारतीय समाज संरचना व परिवर्तन', कोल्हापुर, फडके प्रकाशन.*

*३. गजेंद्रगड व्ही.एल., मारूलकर व्ही.एस.(२०००), 'समकालीन भारतीय समाजशास्त्र', फडके प्रकाशन.*

*४. दोषी एस.एल.(२०१०), 'भारतीय सामाजिक विचारक', जयपुर, रावत पब्लिकेशन्स.*

*५. रावत हरिकृष्ण (२०११),'उच्चतर समाजशास्त्रीय विश्वकोश', जयपुर, रावत पब्लिकेशन्स.*

*६. व्यास दिनेश (२०१४), 'सामाजिक सांस्कृतिक निरन्तरता एवं परिवर्तन', जयपुर, रावत पब्लिकेशन्स.*

# जागतिकीकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम

**डॉ. कालिदास मारुती भांगे,** सहयोगी प्राध्यापक, श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगांव (रं.) ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

**प्रास्ताविक :—** भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये इ.स. १९९१ मध्ये क्रांतिकारी परिवर्तन झाले असे म्हणता येईल. तत्कालीन केंद्र सरकारने एक नवी आर्थिक निती लागू केली. या घोषणांच्या माध्यमातून स्वातंत्र्योत्तर ४० वर्षांतील मिश्रअर्थव्यवस्थेच्या स्वरुपात क्रांतिकारी परिवर्तन झाले हे झालेले परिवर्तन काही नवी घटना नव्हती परंतु तो प्रयत्न, अनुभव चांगले राहिले नाहीत. जागतिकीकरणामुळे संपूर्ण भारतीय समाज ढवळून निघाला. कमी—अधिक प्रमाणात सर्वसामान्य बहुजन समाजावर, शेतकरी, शेतमजूर, कामगार, अल्पभुधारक, नोकरदार, कुटीर उद्योजक व उद्योग यावर अवलंबून असणारे कारागीर, थोडक्यात बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार यांच्यावर खोलवर म्हणजेच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, रोजगार भाषा, संस्कृती यांच्यावर परिणाम काही अशी चांगला तर बहुतांशी विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. सार्वजनिक क्षेत्रात आणि औदयोगिक क्षेत्रात तर नकारात्मक राहिल्याचे स्पष्ट झाले. असे असले तरी या कारणांमुळे भारताला खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खाउजा) करावे लागले असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

जगतिकीकरणाचा अर्थ आंतरराजकीयकरण आणि उदारीकरण या प्रक्रियेला वृध्दींगत करणारा आहे. स्टिंग्लीटज यांच्यामते जागतिकरणाच्या माध्यामातून विश्वातील वेगवेगळे लोक आणि देश यांच्यामध्ये विचार विनिमयाची देवाणघेवाण होत आहे. वाहतूक आणि दळणवळण यांच्याद्वारे वस्तू व सेवाच्या मानव निर्मित मार्गातील अडथळयांना दुरकरुन दोन राष्ट्रांच्या सिमेधील अंतर सिथिल होउन लोकांच्या येण्याजाण्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. जागतिकीकरणाचा प्रतिकूल परिणाम अल्पविकसित देशांवर अधिक व विकसित देशावर कमी झालेला दिसून येतो. जागितिकीकरणाने संपन्न आणि शक्तीशाली देशांतील शेतकऱ्यांना कृषी संबसिडीच्या माध्यमातून मोठा लाभ मिळालेला आहे म्हणजेच जागतिकीकरणाच्या प्रवाहात मोठा शेतकरी तग धरत असून अल्पसुधारक लहान शेतकरी प्रवाहाच्या बाहेर टाकले जात आहेत. ॲथनी गिडेन्स यांच्यामते जागतिकीकरणाच्या संदर्भात अविकसित व विकसित देश असा भोकरदन अविकसित देशांवर या स्थितीमुळे अनेक वाईटपरिणाम होत आहेत व अविकसित देशांची पिळवणूक होवून विकसित देशांकडून आर्थिक शोषन होत आहे. त्यामुळे विकसित देश श्रीमंत होत आहेत. अशी ओरड केली जात आहे. परंतु दोन्ही प्रकारांच्या देशांमध्ये बरेवाईट परिणाम होत आहेत. याच दृष्टिकोनातून उदारीकरणाच्या नव्या धोरणाच्या पैलूमधून जागतिकीकरण ही प्रक्रिया पुढे आलेली आहे. एक आर्थिक म्हणून जागतीकीकरणाची जरी सुरवात झाली असली तरी, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये हस्तक्षेप करणारी ही प्रक्रिया आहे. असे वर्तमानात सिध्द झाले आहे. आता टेलिफेज संपूर्ण जागतिकीकरणाच्या दुसऱ्या पिढीविषयी चर्चा सुरु आहे. मागील १८ वर्षातील परिणाम अज दृष्टीस पडत आहेत. जवळपास दोन दशकांत पोहचलेली झळ आणि झालेला लाभ लपून राहिलेला नाही असे अभ्यासकांनी सिध्द केले आहे.

**संशोधनपध्दती :—** प्रस्तुत संशोधनाचे स्वरूप व आशयाचे आकलन होण्यासाठी शोधनिबंधक शास्त्रीय बैठक बसावी यासाठी संशोधानाची उद्दिष्टये गृहीतके समोर ठेवून शोधनिबंध संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. सदरील संशोधन हे वर्णनात्माक संशोधन आराखडा आणि दुय्यम तथ्यांवर आधारित आहे.

**उद्दिष्टये :—** कोणतेही संशोधन करत असताना काही ठळक उद्दिष्टये समोर ठेवून संशोधन करावे लागते. प्रस्तुत अध्ययनाची पुढील उदिद्ष्टे निश्चित केली होती. १. जागतिकीकरण संकल्पनांचा समाजावरिल परिणाम अभ्यासणे. २. जागतिकीकरणाचा भारतीय समाजवरील परिणाम अभ्यासणे. ३. जागतिकीकरण आणि ग्रामीण समाजावरील परिणाम अभ्यासणे.

**गृहीतकृत्ये :—** संशोधकाला संशोधनाची दिशा निश्चित करताना काही गृहितकृत्ये समोर ठेवून संशोधन करावे लागते. म्हणून तीही सदरील संशोधन करताना काही गृहीतकृत्ये समोर ठेवलेली आहेत. ती पुढील प्रमाणे होत. १. जागतिकीकरण ही संकल्पना वर—वर चांगली वाटत असली तरी ती शोषणाची व्यवस्था आहे. २. जागतिकीकरणामुळे लघु उदयोजक, लहान शेतकरी यांच्यावर विपरित परिणाम झालेत. ३. जागतिकीरणामुळे समाजात सामाजिक तेढ निर्माण होत आहे.

**जागतिकीकरण संकल्पना :—** जागतिकीकरण खासगीकरण आणि उदारीकरण या संकल्पना एकमेकांशी संबंधित असून एक दुसऱ्यांना वेगळेकरता येत नाही. जागतिकीकरणाचे धोरण, अमलंबजावणी व जागतिक मुक्त अर्थव्यवस्था, सार्वजनिक उदयोगांचे खाजगीकरण, आयात निर्यात धोरणात बदलकरुन आयातीवरील कर कमी करणे निर्यातीस प्रोत्साहन देणे, तसेच आयात व निर्यात धोरणांवरिल शासनाचे नियंत्रण हाटवीणे, मुक्त व्यापार करण्यास प्रोत्सहान असणे अपेक्षित आहे. थोडक्यात परकिय भांडवलासाठी आपल्या देशाची अर्थव्यवस्था खुली करणे मुक्त करणे महत्त्वाचे मानले जाते.

जागतिकीकरणच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण विश्व एक खेडे बनले. परिणामी शहरच नव्हे तर ग्रामीण व आदिवासी समाजही यामुळे प्रभावित झाला दिसून येतो. जगातील प्रत्येक राष्ट्राची अर्थव्यवस्था आंतराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत रुपांतरीत होवून विकसित, अल्पविकसीत, विकसनशील आणि अविकसित राष्ट्रांच्या अर्थव्यस्थांवर परिणाम चांगला वाईट झाालेला दिसून येतो. यामध्ये भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांनी मित्र अर्थव्यवस्था सोडून खुले धोरण स्वीकारले स्विकारावे लागले आणि खाजगी व विदेशी गुतवणुकीवरील निर्बंध उठवल्यामुळे भारतीय बाजारपेठ, जागतिक बाजार पेठेला जोडल्यामुळे भारतासारख्या जगातील मोठी लोकशाहीचा प्रभाव वाढून विकसनशील व अविकसित राष्ट्रांवर पाश्चात्य सांस्कृतिक, शैक्षणिक, अर्थव्यवस्थेचे आक्रमण होवून आर्थिक सार्वभौमत्व पायदळी तुडविले जावू लागले. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे लोकांच्या सांस्कृतिक, राहणीमान इत्यादी आकृतिबंध बदलला आणि खानपान इत्यादी ग्रामीण व आदिवासी भागापर्यंत पोहचले. माहिती तंत्रज्ञान, दूरदर्शन, विविध चॅनल्स, वर्तमानपत्रे, गुगल, मोबाईल इत्यादीमुळे धुम्रपान, नशापान या सारख्या व्यसनांनी भारतीय समस्यांच्या विळख्यात अडकली आहे. जागतिकीकरणामुळे भारतीय शिक्षण व्यवस्थाही समस्यांच्या विळख्यात आहे. एकूणच जागतिकीकरणामुळे भारतीय समाजावर सर्वबाजूंनी समस्यांत वाढ झालेली दिसून येत आहे.

जागतिकीकरणाच्या परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेतील परिवर्तन, दैनंदिन जीवन पद्धती आणि एकंदरीत सामाजिक संरचनेवर विशेष प्रभाव पडला आहे. कठोर परिश्रम आणि उदार आर्थिक दृष्टिकोन समोर ठेवून अधिक पैसा मिळाला हे आजच्या जागतिकीकरणाचे मुख्य सुत्र आहे. भांडवलवाद आणि महत्तम नफा हाच जागतिकीकरणाचा केंद्रबिंदू आहे. जागतिकीकरणामधील आर्थिक प्रेरणाभोवती माणूस, अधिकाधिक केंद्रित होत आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात भावभावना, अर्थहीन ठरल्या आहेत. त्याचा प्रत्यक्ष परिणाम मानवी वर्तनावर अर्थात सामाजिक संबंधांवर होत आहे. सामाजिक संबंधातील जिव्हाळा प्रेम, आपुलकी व स्नेह या सर्व गोष्टी दुर्लभ होताना दिसत आहेत. याउलट जागतिकीकरणाचा सकारात्मक दृष्टिकोन विचार केला असता विश्वामध्ये एका क्षेत्रातील व्यक्ती दुसऱ्या क्षेत्रातील व्यक्तीशी संपर्क स्थापित करुन एक असा अनुभव करतो की, जसे आपण गावातील व्यक्तीबरोबर संवाद करत आहे. ज्याप्रमाणे एका गावातील सर्व व्यक्ती एक दुसऱ्यास ओळखतात आणि परस्परांच्या मानवनिर्मित आपत्ती किंवा नैसर्गिक आपत्ती (पुर, भूकंप, दुष्काळ, दंगल, युद्ध) या संदर्भात सर्व विश्वाचा एक विचार बनत आहे. वैश्विक खेडयाची ही संकल्पना जागतिकीकरणाच्या व्यापक संकल्पनेचा एक भाग आहे. ही संकल्पना आधुनिक दळणवळण साधनांच्या माध्यमातून उत्पन्न झालेल्या एका नवीन सांस्कृतिक स्थितीचा संकेत देत आहे.

जागतिकीकरण ही जशी वैचारिक परंपरा आहे, ती नेहमी वैज्ञानिक दावा करणाऱ्या मार्क्सवादाविरुद्ध आरोप करीत आलेली आहे. आणि त्यामुळे त्याबाबतीत अस्वस्थता असणे स्वभाविक आहे. ऐतिहासिक सत्य हे आहे की, या वैचारिक परंपरेचा कल पूर्णत: मार्क्सवाद समाजवाद–साम्यवाद या क्रांतिकारी वैचारिक प्रवृत्तीच्या विरुद्ध राहिलेला आहे. म्हणून जागतिकीकरणाची तात्विक भूमिका ही या क्रांतिकारी प्रणालीच्या वैचारिक भूमिकेशी सर्वस्वी विपरित आहे.

जागतिकीकरणामुळे संयुक्त कुटुंबसंस्थेप्रमाणेच ग्रामीण समाजातील जाती संस्थेतही परिवर्तन घडून येत आहे. ग्रामीण आणि आदिम सामाजिक संरचना ही पूर्णपणे जातीसंस्थेवर आधारीत होती. जातीमध्ये व्यक्तीचे व्यवसायातील विभागणी ही स्वीकार्य नाही. तरीही व्यक्तीचे व्यवसाय, दर्जा व आचरण ठरत असे. परंतु वर्तमान समाज जीवनात जातीला तितकेसे स्थान नाही. व्यवसाय निवडीसाठी जातीचा आधार घेण्याची आज गरज नाही. बलुतेदारी व्यवस्था जवळ–जवळ संपुष्टात आलेली आहे. रोटी–बेटी व्यवहार यावर फारसी जातीची बंधने राहिलेली नाहीत. पण मुक्त झालेली आहेत, असे म्हणणे धाडसाचे होईल. आज जातीवाद जरी कमी झाला नसला तरी जातीचे महत्त्व मात्र निश्चित कमी झालेले आहे.

ग्रामीण समाजातील लोकांच्या मनोरंजनविषयक स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसते की, पूर्वी मनोरंजनाचे प्रमुख केंद्र कुटुंबच होते. भजन, कीर्तन, प्रवचने, लोकगीते, नृत्य, कुस्त्या, बैलाच्या झुंजी, शर्यती आणि तमाशा इत्यादी मनोरंजनाची स्थाने व साधने होती. या प्रादेशिक मनोरंजनाचे महत्त्व कमी होत गेले आणि एक तिसरा पर्याय अस्तित्वात येउ पाहत आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहामुळे जाणिवांच्या वा जीवन जगण्याच्या पातळीवर जग एकरुप होत असतानाच विशिष्टतेच्या प्रादेशिक जाणिवांचा व अस्मितांचा प्रश्न महत्त्वाचा ठरु लागला आहे. प्रवाहामध्ये ही विशिष्ट स्व–अस्मितेची ओळख सांस्कृतिकदृष्टया व जाणिवांच्या पातळीवर उपभोक्ता (ब्वदेनउमत) म्हणून होत असतानाच स्वत:च्या विशिष्ट प्रादेशिक संस्कृतीचे संवर्धन व त्यांच्या नव्याने होत असलेला वापर आपल्याला लोकल व ग्लोबल यांच्या गतिशिलतेमध्ये पाहता येतो. या जागतिक आणि प्रादेशिक विविधतेमध्ये अभिजनांच्या वर्चस्ववादी संस्कृतीला सुरुंग लावण्यासाठी जागतिकीकरणाच्या ऐक्यासंबंधी (न्दपजंतल) व विखंडनासंबंधी (थ्तंहउमदजंतल) सांस्कृतीकरणाला मिळालेल्या मान्यतेमुळे लोकपरंपरांना पुन्हा नव्याने मान्यता प्राप्त होवू लागली आहे. त्याचा नव्याने शोध न घेण्याचे, पुनर्प्रस्थापित करण्याचे व पुन:आर्स्वादाचे प्रयत्न सामाजिक पातळीवर नव्हे तर उच्च शिक्षणात देखील व्हायला लागले आहेत.

**ग्रामीण समाजावरील परिणाम :–** जागतिकीकरणाचा सर्वात मोठा परिणाम ग्रामीण समुदायावर सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही बाजुंनी झालेला दिसून येतो. यामध्ये ग्रामीण समुदायात दूरचित्रवाणी, संगणक, दूरध्वनी, मोबाईल यांचा वापर वाढलेला दिसून येतो. मोबाईलवर एसएमएस द्वारे कृषीबाजारभाव वर्तमान पत्रांतून उपलब्ध होत आहेत. म्हणजेच परंपरागत संबंधात बदल होत असून रुपयाला महत्व प्राप्त झालेले आहे. व्यक्तीवाद शहरी जीवनाबरोबर ग्रामीण समुदायातही दिसून येत आहे. आदिवासी आणि अल्पसंख्याकामध्ये नव–जीवन निर्माण झालेले आहे. कारण त्यांना व्यापक प्रमाणात संधी उपलब्ध होत आहेत. सामाजिक संबंधात अप्रत्यक्ष, औपचारिक साधन मात्र आणि करार प्रधान संबंध वाढलेले आहेत. बाजारातील अवलंबन प्रकर्षाने दिसून येत आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी कारणीभूत ठरला आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा तसेच विविध क्षेत्रे खुली होताना दिसत असून मानसन्मान, समान संधीही उपलब्ध होताना दिसत आहेत. सद्यस्थितीत मुलीही अभियांत्रिकी, वैद्यकीय, स्थापत्य, माहिती तंत्रज्ञान, संगणकीय शिक्षण आणि पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. मुली–मुलांसमवेत स्पर्धा करत आहेत. नव्हे त्यांच्या पुढे जात आहेत. या बाबतीत सकारात्मक परिणाम झाालेला दिसून येत असला तरी भारतीय संविधानाची अमलबजावणी हाच या बदलामागे आहे असेच म्हणता येईल.

**भारतीय कृषी आणि जागतिकीकरण :–** कृषी व्यवसाय हा मानवी समूहाचा मुख्य व्यवसाय आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या (५० टक्के) कृषी क्षेत्रात काम करते व त्यावर अवलंबित्वही सर्वाधिक आहे. जगातील काही ठळक राष्ट्रांचा उल्लेख करता त्यापुढील टक्केवारीत लोक कृषी व्यवसायात गुंतलेले आहेत. संयुक्त संस्थान १० टक्के, फ्रान्स २० टक्के, चीन ७० टक्के, तुर्कस्थान ७० टक्के, इंग्लंड ०६ टक्के, रशिया ५० टक्के, जपान ३६ टक्के, जर्मनी १० टक्के, आणि भारतात ६८ टक्के, लोकसंख्या कृषी व्यवसायात गुंतलेले असून भारताच्या एकूण उत्पादनाच्या जवळपास ५० टक्के वाटा हा कृषीचा आहे. हे उत्पादन मानवी श्रमशक्तीद्वारेच उत्पादित केले जाते. देशातील अधिकांश लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात. त्या सर्वांचा कृषी हेच उपजीविकेचे महत्त्वाचे स्रोत असून तो कृषीच्या सर्वांगीण विकासाशिवाय आर्थिक क्षेत्रात प्रगती करु शकत नाही. परंपरागत आणि विकसनशील देशांच्या समोर मुख्य समस्या आहे. ती आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायाची, भारत हा आशिया खंडातील एक विकसनशील देश म्हणून गणला जातो आहे. जो नियोजन आणि विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वांगीण विकासाशिवाय आर्थिक क्षेत्रात प्रगती करु शकत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात देशात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण पुन:निर्माणाला प्राधान्य दिलेले आहे. येथे कृषी क्षेत्रात हरित क्रांती घडवून मोठया प्रमाणात धान्य व कडधान्य उत्पादन वाढवून वाढत्या लोकसंख्येला अन्न–धान्याच्याबाबत स्वयंपूर्ण राष्ट्र बनले. त्याचबरोबर

भूमीसुधारणांच्या माध्यमातून कृषकांनाही सुधारण्यांचा प्रयत्न झाला. परंतु जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्रात दिले जाणारे अनुदान पूर्णत: बंद करुन रासायनिक खते, संकरित बी—बियाणे यांच्या किमती वाटेल त्या पद्धतीने वाढवून मोठया प्रमाणात शोषण होत आहे. पिकवलेला कृषी मालाला भाव न मिळाल्याने शेतकरी तोटा सहन करत मेटाकुटीला आलेला दिसून येतो. त्यातूनच उत्पादन कमी व खर्च अधिक यातून कर्जबाजारीपणा आणि त्यातून आत्महत्या या दुष्टचक्रांत शेतकरी अडकलेला आहे. हा जागतिकीकरणाचा नकारापत्मक परिणाम आहे.

ग्रामविकासाचे महत्त्व आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना लोकशाही मार्गाने साध्य करण्यासाठी सरकारने नियोजनबदद्ध विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आणि त्या दृष्टीने विविध योजना राबविलेल्या आहेत. या योजनांची व्यापकता वाढविण्याच्या प्रयत्नात भारत सरकारने खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खाउजा) खुले आम प्रोत्साहन दिले आहे. त्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर, प्रसार माध्यमांचा अतिरेकी वापर, प्रदुषण, कुपोषण, बेरोजगारी, सर्वच क्षेत्रात प्रचंड स्पर्धा, पाश्चिमात्यीकरण त्यामुळे सांस्कृतिक अंध:पतन यासारख्या समस्यांनी ग्रामीण समाज पूर्णत: ढवळून निघालेला दिसत आहे.

जागतिकीकरणाच्या धोरणानुसार एक कृषिविषयक करार झाला तो करार भारतीय शासनाने खूपच गुप्त ठेवला होता कारण या करारानुसार अमेरिकेतील श्रीमंत शेतकऱ्यांना खूप फायदा देणारा होता, तो आजही होत आहे, कारण या करारानुसार विदेशी शेतमालाचा भारतीय आयातीवर जे निर्बंध होते ते उठविण्यात आले. त्यामुळे भारतीय बाजारात विदेशीमाल खुले आम आला आणि भारतातील गरीब शेतकरी या बाजाराच्या स्पर्धेत टिकाव धरु शकत नाही. पर्यायाने भारतीय शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यांना अमेरिकन शेतकऱ्यांशी स्पर्धा करावी लागत आहे. अमेरिकन शेतकऱ्यांच्याप्रमाणे भारतीय शेतकऱ्यांना सोई—सुविधा नाहीत. त्यांची आर्थिक स्थितीही बिकट आहे. ही वास्तविकता आपण विचारात घेतली पाहिजे. त्याचे विपरित परिणाम शेतकरी कर्जबाजारीपणा व शेतकरी आत्महत्येत होताहेत.

जागतिकीकरणाचे भारतीय कृषी क्षेत्राच्या अनुषंगाने वरवर काही बदल हे सकारात्मक दिसत असले तरी या बदलातून भारतीय कृषी व्यवस्थेचे मोठया प्रमाणात नुकसानच झालेले आहे. कारण भारतामध्ये अल्पभूधारक शेतकरी मोठया प्रमाणात आहेत. त्याचप्रमाणे कृषीसाठी लागणाऱ्या प्राथमिक सोयी—सुविधा देखील उपलब्ध होत नाहीत. भारतीय शेतकऱ्यांना जागतिकीकरणाच्या स्पर्धेत ढकलणे निश्चितच धोकेदायक ठरणारे होते. हे कळत असतानाही हे घडले की घडविले हा भाग वेगळा परंतु त्याची वाईट फळे येथील शेतकरी भोगत आहे हे निश्चित.

**पर्यावरण आणि जागतिकीरण :—** मानव व पर्यावरण यांचे संबंध घनिष्ठ असून ते दुहेरी स्वरुपाचे असते. म्हणजेच मानवाच्या कृतीचा पर्यावरणावर चांगला वाईट परिणाम जसा होतो तसाच पर्यावरणाच्या संतुलन, असंतुलनाचेही परिणाम मानवावर चांगले—वाईट होतात मात्र मानवाच्या बेजबाबदार कृतीचे पर्यावरणावर निश्चितच मोठया प्रमाणात दुष्परिणाम होतात व झालेलेही आहेत. मानव प्राणी व मानवतेवर प्राणी अतिशय निकटचा संबंध येणारे पर्यावरणीय घटक म्हणजे जमीन, पाणी, वायु व वृक्ष संपदा (वनसंपदा) या चार घटकांवर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रचंड विपरित परिणाम आणि आघात केलेले आहेत. त्यामुळे जागतिक पर्यावरणाला हादरे बसताना दिसून येत असून भारत, चीन यासारख्या राष्ट्रांना हवा शुद्ध करण्याच्या यंत्राची आवश्यकता भासत आहे.

**जमीन** : जागतिक स्तरावरील सतत वाढत जाणारी लोकसंख्या वाढते, नागरीकरण यामुळे मर्यादित असलेल्या जमिनीवर वाढत्या प्रमाणात भार पडत चालला आहे. कृषी योग्य व उपयुक्त असणाऱ्या जमिनीचे प्रमाण अशा नागरिकरणामुळे, औद्योगिकरणामुळे कमी—कमी होत चालले आहे. त्यातही ज्या भागातील नैसर्गिक व मानवनिर्मित सोयी—सुविधा अधिक उपलब्ध असतात तेथे अतिरिक्त नागरिकरण होते. लोकसंख्येची घनता ही येथे दाट असते. शिवाय काही नैसर्गिक कारणांमुळे उदा. अवर्षण, जमिनीची धूप, पडीक जमीन, वाळवंट इत्यादी प्रश्न काळाच्या ओघात निर्माण झालेले आहेत. परंपरागत लागवड पद्धतीच्या जागी यांत्रिक लागवड पद्धतीचा अनियंत्रित वापर करण्यामुळे जमिनीचा सुपीक पोत बिघडल्याचे बऱ्याच ठिकाणी निदर्शनास आले आहे. रासायनिक खतांच्या अतिरेकी वापरामुळेही जमिनीची सुपिकता कमी होत आहे असे दिसून येते. रासायनिक औषधींच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीचा कस कमी होतच आहे, असे दिसून येते. मानवी आहारातून खाद्यान्नांतून विषारी द्रव्यांचा प्रवेश होवून विविध आजारांना आमंत्रण मिळत आहे. त्यामुळे मानवी आणि मानवेत्तर जीवनावरही विपरीत परिणाम होत आहे.

**पाणी** : पृथ्वीवरील सजीवसृष्टी ही केवळ पाण्यामुळेच जीवंत आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जीवंत राहू शकत नाही. म्हणूनच पाण्याला जीवन असेही संबोधले जाते. मानवी शरीरातही ७० टक्के पाणीच आहे. हे प्रमाण कमी झाल्यास मानवाला पाण्याची नितांत आवश्यकता असते. एवढे पाण्याचे महत्त्व मानव काय आणि मानवेतर पशुपक्षी काय पाण्याशिवाय जीवंत राहूच शकत नाही. त्यामुळे पूर्वीपासून मानवाने आपली वस्ती नदीपासून जवळ किंवा पाण्याचे स्रोत असलेल्या ठिकाणी वसवलेली दिसून येते. त्यामुळे पिण्याचे पाणी, वापरण्यासाठीचे पाणी तसेच कृषी, शेतीला पाणी, उद्योग धंद्यांना विजनिर्मिती यासाठी देखील पाण्याचा वापर मोठया प्रमाणात होतो. वाढती लोकसंख्या, नागरीकरण, औद्योगिकीकरण इत्यादीमुळे पाण्याचा वापर मोठया प्रमाणात होवू लागला आहे. याउलट भविष्यकाळात पाण्याचा काटकसरीने, पुनर्वापर करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे जल नियोजनाला अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे. अन्यथा भीषण समस्येला सामोरे जाण्यास वेळ लागणार नाही.

**हवा** : मानव आणि मानवी प्राण्याला जमीन, हवा, पाणी यांची नितांत आवश्यकता आहे. त्याशिवाय जीवंतही राहू शकत नाहीत. म्हणूनच हवेला प्राणवायू म्हणतात. पृथ्वीच्या भोवती हवेचे आवरण असून यात प्राणवायू व्यतिरिक्त अनेक वायू जसे कार्बनडायऑक्साईड, नायट्रोजन, पाण्याची वाफ इत्यादींचा समावेश असतो. शिवाय यांचे प्रमाणही निश्चित असते. उदा. नायट्रोजनचे प्रमाण ७८ टक्के आहे. या हवेच्या वातावरणात विविध कारणांनी अशुद्ध वायू मिसळत असतोत्र मात्र अशुद्ध वायू शुद्ध करण्याची नैसर्गिक यंत्रणा वातावरणातच कार्यान्वित असते. व ती यंत्रणा वायू मंडल शुद्ध करीत असते व वातावरणातील विविध वायू घटकांचा समतोल बिघडू देत नाही. तथापि मानवी क्रियांद्वारे यात ढवळाढवळ घडून येते व वातावरणाचा समतोल बिघडतो. परंतु वाढते ते औद्योगिकीकरणामुळे अनेक घातक वायू पर्यावरणात सोडले जातात. त्यामुळे हवा होत जावून श्वसनाचे अनेकविकास मानव तसेच मानवेत्तर प्राण्यांनाही होताना दिसत आहेत. प्राणवायुंचे प्रमाण कमी

होत आहे त्यासाठी प्राणवायू केंद्राची निर्मिती केंद्रे देखील निर्माण करण्याची वेळ आलेली आहे.

**जंगले** : नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये निसर्गाने मानवाला व नव्हे सजीव सृष्टीला सर्वात मोठी देगणी दिलेली आहे. ती म्हणजे जंगले त्यामुळे पृथ्वीतलावरील जीवनचक्र सुरळीत चालू आहे. म्हणूनच वृक्षवल्ली आम्हा सोयरे अशा शब्दांत संतांनी मानवी जीवनात वनसंपदेचे गुणगान केलेले आहेत. मानवाला हितकारक असे झाडे, वनसंपत्ती, वेली इत्यादींचे विविध गुणधर्म यामुळे श्री संत तुकारामांनी वरील वाक्यात जंगलांचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. तसेच मानवी जीवन आणि जंगल यांचे किती निकटचे नाते आहे हे स्पष्टपणे सांगितलेले आहे. परंतु जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मानवाने अनेक विकासाचे प्रकल्प आखले त्यामुळे जंगलाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. वाढती लोकसंख्या, तिच्या गरजा, औद्योगिकीकरण, धरणे, सेझ, राष्ट्रीय महामार्ग यासाठी सातत्याने होत जाणारी जंगलतोड परंतु त्या प्रमाणात नव्याने वृक्षांची लागवड होत नाही. परिणामी जंगल संपदा धोक्यात आल्याने पृथ्वीतलावरील जीवसृष्टीच धोक्यात येत आहे.

**सारांश** :— जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरणांच्या प्रक्रियेने पर्यावरणाकडे, मानवी जीवनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष होताना दिसत आहे. जग हे फक्त भौतिक विकासाचे मागे लागले आहे. हे शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरणाचा परिणाम आहे. त्यामुळे दलित, आदिवासी, उपेक्षित, कष्टकरी, शेतकरी, कामगार, लघु उद्योजक, व्यापारी हा वर्ग अस्थिरतेच्या गर्तेत अडकल्याने निराश होवून आत्महत्येचा मार्ग स्वीकारताना दिसून येतो. कारण जागतिकीकरणाच्या स्पर्धेत व आव्हानांना तोंड देण्यात कमी पडत आहे. नव्हे असमर्थ ठरल्याने काही अंशी गुन्हेगारी जगताकडे व सुडाच्या भावनेने पेटला तर नवल वाटू नये. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे औद्योगिक क्षेत्रातील कामगार कपातीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी शिक्षण घेवून काय होणार हा गंभीर प्रश्न आजच्या तरुणांसमोर उभा आहे. हितसंबंध जोपासणारी भ्रष्टव्यवस्था दिवसेंदिवस कार्यक्षम बनत गेल्यामुळे आणि जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्रात काही अनुकूल व प्रतिकूल बदल होताना दिसत आहेत. जागतिकीकरणामुळे बाजारपेठेचा विस्तार झालेला असून विक्रीसाठी संपूर्ण जग बाजारपेठेसारखे असले तरी हीच व्यवस्था नव्या सरंजामशाहीला जन्म देत आहे. विकसित राष्ट्रे, अविकसित, अल्पविकसित, विकसनशील देशांतील बाजारपेठांवर कब्जा मिळवून त्या राष्ट्रांचे शोषण करत आहेत. त्याचेही चांगले—वाईट परिणाम भारतीय समाजव्यवस्थेवर होताना दिसत आहेत.

*संदर्भ*


१. *प्रा. विजय बोधनकर, भारतीय शेती व्यवस्था, यश पब्लिकेशन, नागपूर.*
२. *के. सागर, भारतीय अर्थव्यवस्था व नियोजन, सागर पब्लिकेशन, पुणे.*
३. *डॉ. तेलतुंबडे आनंद, सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण, मुंबई : लोकवाङ्मयगृह.*
४. *www.globalchange.org/campaing/wto/-28k.*
५. *www.google.co.in/search?a=dohatmeeting&hl=en*
६. *डॉ. राम आहुजा, सामाजिक सर्वेक्षण एवं अनुसंधान, रावत पब्लिकेशन, जयपूर.*
७. *गौरी राणे व के. पी. चौधरी, पर्यावरण, हिमालया बुक्स प्रा.लि. मुंबई.*
८. *डॉ. श्यामसुंदर चौहान, वैश्वीकरण आणि निर्धनता, प्रतियोगितादर्शन मासिक—३२, अंक—१.*
९. *पदमाकर दुभाषी, जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण, श्री विद्या प्रकाशन, पुणे.*
१०. *गजानन खावू, जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन, मुंबई.*
११. *डॉ. भागवत विष्णु, जागतिकीकरण नवीन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर.*

# प्रसारमाध्यमे, सामाजिक परिवर्तन आणि लिंगभावाचे वास्तव : एक समाजषास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. मोहन नगराळे**, सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, आर.एस. मुंडले धरमपेठ कला वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

सारांश :– वर्तमानकाळात जनसंवादाचा एक प्रभावी प्रकार म्हणून समाजमाध्यमे समाजाच्या सर्वच स्तरात लोकप्रिय होऊ लागले आहे. समाजमाध्यमाद्वारे व्यक्तीला आपली मते, विचार, भावना व्यक्त करण्याचे हे सहज सोपे माध्यम बनले. यातून समाज जीवनावर खोलवर परिणाम होऊन समाजाच्या संरचनेत परिवर्तन घडवून आणले आहे. दक्षिण आशियामध्ये लिंगभेदाची समस्या एक आव्हान झाले आहे. भारतातील विशेषत: ग्रामीण समुदायातील या समस्येने सामाजिक, राजकीय विचारवंतांचे लक्ष वेधून घेतले आहे. समाज माध्यमांच्या वापराने लिंगभेदाची समस्या कमी होऊन त्यामुळे स्त्रीचे सशक्तीकरण होईल असे वाटते. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये प्रसारमाध्यमे आणि सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आणि लिंगभाव, लिंगभेदभाव आणि स्त्री सशक्तीकरण याच्यामधील पारस्पारिक संबंध तपासाच्या प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना** : २१ व्या शतकाला जागतिकीकरणाचे शतक म्हणावे लागेल. युरोप आणि आशिया खंडातील विकसनशील समाजावर या जागतिकीकरणांचा चांगलाच प्रभाव दिसून येतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना देण्यात माहिती आणि सूचना क्रांतीने बरीच मदत केली आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात माहिती क्रांतीने प्रवेश केला आहे. प्रसारमाध्यमांची विशालता आणि विस्तारता याच माहिती क्रांतीने वाढविली आहे. लोकशाही, भांडवलवाद, अति विवेकवाद, मानवता ही मूल्ये सर्वच समाजात मान्य होऊ लागली. या मूल्यांचा प्रसार–प्रचार करण्यास शासनाने प्रसार–माध्यमांचा जोरकसपणे वापर केला आहे. आजची प्रसार–माध्यमे, जनसंवाद माध्यमे पूर्वीपेक्षा अधिक वेगवान होऊ लागली. या माध्यमातून मिळणारी माहिती किंवा ज्ञान व्यक्तींना अधिक शक्तिशाली बनवित आहेत. ज्ञान आणि सत्ता यांचा कसा सहसंबंध आहे हे मिशेल फुको या विचारवंतांनी स्पष्ट केला आहे.

१९९० नंतरच्या अवकाशात माहिती तंत्रज्ञान क्रांती, स्त्री सशक्तीकरण यासारखे विषय चर्चा विश्वात अनेकांचे लक्ष वेधून घेत आहे. प्रसार–माध्यमांमध्ये या विषयाची चर्चा तुलनेने वाढलेली आहे. यातून माहिती तंत्रज्ञान क्रांती, स्त्री सशक्तीकरण याबाबत जनमानसात लोकप्रियता आणि जनजागृती वाढली आहे. देशाच्या विकासासाठी स्त्रियांच्या सशक्तीकरणाची कशी गरज आहे. स्त्री विषमता, स्त्रियांवरील हिंसा, स्त्रियांचे दारिद्रीकरण ;थ्मतउपद्रंजपवद वि च्वअमतलद्धहे मुद्दे मानवी विकासातील मोठे अडथळे आहे. या विषयाच्या जाणिवा आता तीव्र होऊ लागल्या आहेत. स्त्री–पुरुषांमधील विषमता एक निर्णायक विषमता म्हणून अनेक समाजांमध्ये विशेषत: भारतामध्ये अस्तित्वात आहे. (अमर्त्य सेन) समतावादी, लोकशाही समाजामध्ये स्त्रियांची ही स्थिती सामाजिक विदारकता दर्शविणारी आहे. अनेक अभ्यासकांचे असे निरीक्षण आहे की, भारताचे अविकसिकतेकडून विकसिकतेकडून, आधुनिकतेकडून उत्तर–आधुनिकतेकडे, कृषीक्रांतीकडून औद्योगिक क्रांतीकडे स्थित्यंतर होत असले तरी पारंपारिक भारतातील स्त्रियांच्या दुर्बलतेकडून तिच्या सबलीकरणाकडचे स्थित्यंतर अजूनपर्यंत तरी पहायला मिळाले नाही. समाजातील सर्व सत्तास्थानांमध्ये पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांचा सहभाग वाढू शकला नाही. अर्थकारण, राजकारण, शिक्षण, धर्म यासारख्या क्षेत्रात स्त्री अल्पसंख्याक आणि वंचितच राहिली आहे.

स्त्री सशक्तीकरणाचा संदभ अशा सामाजिक परिस्थितीच्या निर्मितीशी आहे, ज्यात महिला आपल्या आणि समाजाच्या हिताकरिता स्वत: निर्णय घेतील. समाजातील असे अनुकूल वातावरण ज्यात महिला सर्व क्षेत्रात आपली मते, निर्णय याचे समाजात शिक्कामोर्तब करतील असे स्वतंत्र वातावरण स्त्री सशक्तीकरणास पोषक ठरेल. भारतात पुरुष मानसिकतेत, त्यांच्या परंपरावादी मनोवृत्तीत, त्यांच्या पुरुष अभिनिवेशच्या भावनेत बदल घडवून आणण्यासही बरेच सामूहिक प्रयत्न करावे लागतील. समाजमाध्यमे ही आधुनिक समाजातील शिक्षणाचे साधन आहे. समाजमाध्यमांचा योग्य विचारपूर्वक व विवेकशील वापर हा यावर एक चांगला उपाय ठरू शकते. आज समाजमाध्यमांच्या द्वारा एखाद्या वाईट प्रथा, वर्तन प्रकाराचा निषेध करणे, त्याविरुद्ध जनमत निर्माण करणे आज सहज सोपे झाले आहे. श्री. अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचाराविरुद्धचे आंदोलन या समाजमाध्यमाच्या वापराने यशस्वी झाले होते. जनतेला प्रेरित करून एखाद्या सामूहिक कृतीकरिता एकत्र करणे, समाजमाध्यमे परिणामकारकपणे कार्य करू श्शकते म्हणून सामाजिक परिवर्तनाचे समाजमाध्यम हे एक प्रभावी साधन म्हणून समाजात लोकप्रिय होऊ लागले आहे.

अत्याधुनिक प्रसार–माध्यमे जसे टी.व्ही., वर्तमानपत्रे, फेसबुक, ट्विट्र हे इंटरनेटद्वारे संचालित होतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे या प्रसार माध्यमातून व्यक्त होत असते. या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला किती मोकळीक द्यायची हे सरकार शिताफीने ठरवत असते. इंटरनेट सेवा बंद करून दिल्यास जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होत असतो. त्यामुळे प्रसार–माध्यमे यांचा वापर सरकारच्याच हिताचा होत असल्याचे दिसते.

राजकारणातील महिलांच्या सहभागाचा अपेक्षेप्रमाणे असलेला अभाव त्यांना शक्तीहिन करून लिंग विषमतेत भर पाडणारा असतो. भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग, त्यांचे राजकीय सामाजिकरण, राजकीय निर्णय निर्धारणामध्ये, कायद्यांच्या निर्मितीमध्ये पुरुष नेत्यांच्या बरोबरीने स्त्रियांचे नेतृत्व वाढले पाहिजे. याकरिता त्यांना जनसंवाद माध्यमांचा योग्य वापर करण्याची क्षमता संपादित करावी लागेल. कारण जनसंवाद, प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे यांचा प्रभावी वापर त्यांच्या अनेक विषमतांवर परिणामकारक इलाज होऊ शकतो. (मालिथी सुबमण्यम).

१९९० नंतरच्या काळापासून भारतात नव–उदारवादाने जन्म घेतला. यातून भांडवलशाहीचा नवीन चेहरा दिसून आला. या भांडवलशाहीने भारतातील श्रीमंत–गरीब यांच्यात मोठी दरी तर वाढविली. परंतु त्यातून जातीव्यवस्था आणि पुरुषसत्ता या अधिक मजबूत केल्या. याचा परिणाम हा स्त्रियांवरील हिंसेच्या घटनेत पूर्वीपेक्षा वाढ होऊ लागली. ज्या समाजात जाती आणि पुरुषसत्ता अस्तित्वात असते तेथे समता, स्वातंत्र्य, लोकशाही ही मूल्ये रुजू शकत नाही. स्त्री सशक्तीकरणातील जाती आणि पुरुषसत्ता या दोन्ही मोठा अडसर ठरला आहे. (सुरेंद्रसिंग जोधका)

सबरीमला मंदिरातील महिलांच्या प्रवेशाबाबतचा विवाद हा कट्टर सनातनी पुरुषसत्तेचा परिणाम आहे. आपण आधुनिक झालो असे म्हणत असताना जवळजवळ हे खरे आहे की, आपल्यावर पुरुषसत्तेच्या प्रभावाचा पगडा आजही सर्व क्षेत्रातील, सर्व स्तरातील जनमानसात पक्का असल्याचे दिसून येते. तसेच 'मी–टू' कॅम्पेन या

स्त्री चळवळीतही पुरुषसत्तावादी मनोवृत्तीचा विरोध करण्यासाठीच सुरू झाली आहे. या दोन्ही घटना लिंगभेदभावाची भावना कशी प्रखरपणे सर्व जनतेच्या मनोभूमीत रुजली आहे हेच दर्शविणा—या आहेत. (सतीश देशपांडे)

**प्रस्तुत अध्ययनाचे उद्दिष्ट्ये** :— १) सामाजिक परिवर्तनाचे एक साधन म्हणून समाज माध्यमांची भूमिका जाणून घेणे. २) भारतातील लिंगभावाची वर्तमान स्थिती समजून घेणे. ३) भारतीय महिलांच्या प्रमुख समस्या म्हणून स्त्री—पुरुष विषमता, स्त्रियांचे सिमांतीकरण, स्त्रियांप्रती हिंसा, त्यांचा लैंगिक छळ, घरगुती हिंसा या समस्यांचे अध्ययन करणे.

**प्रस्तुत अध्ययनाचे पद्धतीशास्त्र** :— 'प्रसारमाध्यमे, सामाजिक परिवर्तन आणि लिंगभावाचे वास्तव' या विषयाचा संशोधन पेपराच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी तथ्य संकलनाची पद्धत म्हणून दुय्यम साधने यांचा वापर केला गेलेला आहे. प्रस्तुत विषयावर आजवर जे अभ्यास झाले त्यामधील निरीक्षणाचा उपयोग यात करण्यात आला आहे. तसेच काही नियतकालिकांमधील या विषयाची माहिती गोळा करून या अभ्यासासाठी त्याचा वापर केला आहे. अभ्यासकर्त्यांच्या व अभ्यासाच्या उद्दिष्टांच्या दृष्टीने उपयोगी अशी तथ्य संकलनाची पद्धती वापरली आहे.

**समाजमाध्यम आणि सामाजिक परिवर्तन** : वर्तमानकाळात Social Media ही संकल्पना सर्वत्र वापरली जात आहे. युवकांमध्ये तर समाजमाध्यमे ही फार लोकप्रिय झालेली दिसते. समाजमाध्यम म्हणजे इंटरनेट तथा कोठेही देता—घेता येऊ शकतो असा मोबाईल फोन यावर आधारित असे उपयोजन आणि साधन होय, जे लोकांमध्ये माहिती प्रसारित केली जाऊ श्शकते. समाजमाध्यमात फेसबुक, व्हॉटअॅप, ट्विटर यासारख्या नेटवर्किंग संकेतस्थळांचा समावेश होतो. माहिती तंत्रज्ञान क्रांतीने ज्ञान आणि माहितीच्या क्षेत्राला प्रचंड गतिमान केले आहे. जागतिकीकरणाचा एक आधार म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा शोध लावला. त्यामुळे सर्व जग एक खेडे बनले. एका देशातील माहिती, घटना दुसऱ्या देशात तत्काळ पोहचण्याची किमया या तंत्रज्ञानाने करून दाखविली. सर्व जग जवळ येऊ लागले. एकाच समाजात बहुसंस्कृतीचे वातावरण तयार झाले. विविध संस्कृती एकत्र नांदू लागल्या. तसेच सांस्कृतिक संघर्षही होऊ लागले. यातून समाजाच्या कुटुंबप्रणाली, विवाहपद्धती, शिक्षण, भाषा, व्यवसाय यात बरेच बदल दिसू लागले. समाजमाध्यमाच्या वापराने पर—संस्कृतीचे अनुकरण होण्यास मदत झाली. भारतात तर या समाजमाध्यमाने पूर्वीच्या श्रद्धा, विश्वास, समजुती, धारणा, प्रथा—परंपरा यांना नवे रूप दिलेले दिसते. ऑन लाईनद्वारे खरेदी—विक्री, विवाह जोडीदाराचा शोध, सत्यनारायणाची पूजा होऊ लागली आहे. हा फार मोठा सांस्कृतिक बदल म्हणावा लागेल.

समाजमाध्यमाने ग्रामीण भारतातही आपला जम बसविला. ग्रामीण युवकांजवळ मोबाईल फोन दिसून लागले. त्यांना नवनव्या रोजगाराच्या संधी मिळू लागल्या. त्यामुळे कृषी व्यवसाय आपली अंतिम घटिका मोजत असल्याचा भास होत आहे. माहिती तंत्रज्ञान आणि भारतातील सामाजिक परिवर्तनाबाबतचे हे निरीक्षण सर्वत्र आढळले आहे. कृषी व्यवसायाची झालेली हानी ग्रामीण समुदायातील शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना जन्म देत आहे. शेतकरी समस्या आजच्या चर्चा विश्वात मध्यवर्ती ठिकाणी असल्याचे जनसंवाद माध्यमात दिसत आहे. अनेक ग्रामीण समस्यांचे हे तंत्रज्ञान एक प्रभावी कारण ठरले आहे.

**भारतातील लिंगभावाची वर्तमान स्थिती** : लिंग आणि लिंगभाव या दोन वेगवेगळ्या संज्ञा आहेत. लिंग हे नैसर्गिक, अनुवांशिक व अपरिवर्तनीय असते. तर लिंगभाव हे सामाजिक, सांस्कृतिक आणि परिवर्तनीय अशी घटना आहे. लिंगभावात नर आणि मादी यांचे पुरुषीपणा किंवा बाईपणा हा एका विशिष्ट समाजात घडविला जातो. यात नराला पुरुषाप्रमाणे व मादीला स्त्रीप्रमाणे निर्माण केले जाते याला लिंगभाव म्हटल्या जाते. पण असे असताना मादीला स्त्री बनवित/घडवित असताना तिला नरापेक्षा असमान वागणूक दिली जाते. त्याचे आणि तिचे घरातील आणि बाहेरची कार्ये वेगवेगळी होऊ लागतात. त्यातून समाजात स्त्रीला पुरुषापेक्षा प्रतिष्ठा, अधिकार आणि सत्ता व संपत्ती कमी प्रमाणात दिली जाते. तेथे लिंग विषमता अस्तित्वात येते. लिंगभावाची सुरवात कुटुंबातून होत असते. आपल्या सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून मुलाने वडिलांची आणि मुलींनी आईची कामे करावी. त्यांच्याप्रमाणे वागावे हे शिकविले जाते. कोणत्याही समाजातील कुटुंब हे समग्र संस्कृतीचा एक घटक भाग असल्याने संस्कृतीच्या अनुषंगाने कुटुंब प्रणालीचे कार्य चालत असते.

आजच्या बहुसंख्य साक्षर झालेल्या भारतीय समाजातील कुटुंबामध्ये ही विषमता दर्शन लिंगभाव आढळतो. कुटुंबाची दृढ झालेली परंपरावादी वृत्ती तसेच धर्माचा पगडा आजही तिच्यावर कायम आहे आणि ते लिंगभावाच्याद्वारे दिसून येते. लिंगभावातील स्त्री—पुरुष विषमतेची विचारसरणी रद्द झाल्याशिवाय स्त्री—पुरुष समानता आणि त्या माध्यमातून स्त्री सशक्तीकरण होणार नाही असे अनेक स्त्रीवादी अभ्यासकांना वाटते. (सीमॉन बी)

**निष्कर्ष** : भारतातील लिंग भेदभावाची समस्या संपुष्टात आणण्यासाठी जुन्या व पारंपारिक मोजपट्ट्याचा पुर्नविचार करण्याची गरज आहे. समाजमाध्यमांचा रचनात्मक व विधायक उपयोग केला गेला तर स्त्री सशक्तीकरणाला एक सकारात्मक दिशा मिळू शकते. समाजात होत जाणाऱ्या सामाजिक परिवर्तनाशीही स्त्री सशक्तीकरणाने समन्वय साधला पाहिजे. लिंगभेद दर्शविणा—या काही धार्मिक प्रथांचे उच्चाटन करून स्त्रीला बरोबरीचा हक्क व अधिकार दिला गेला पाहिजे.

**संदर्भ** :—


१. *Subra maniam Malathi, 'Women in Indian Politics : Participation and Representation in Women's Studies in India', (ed), Malashri Lla and Sukria Paul Kumar, Indian Institute of advanced study, Shimla 2002, p. 242*

२. *जोधका सुरेंद्रसिंग, 'बराबरी की संस्कृती से ही टूटेगी जकडन' (लेख), आऊटलूक, जानेवारी २०१९, पृ.क्र. ६४*

३. *Simon B., 'Rethinking Empowerment, Journal of Progressive Human Service', Vol. No. 1, 1990*

४. *Sahay Sushma, 'Women and Empowerment', Approaches and Strategies, Discover Publicationing House, New Delhi 1998*

५. *तांबे श्रुती, 'लिंगभाव समजून घेताना', लोकवाङ्मय प्रकाशन, पुणे, २०१४*

# वर्तमानकाळात विवाह संस्थेसमोरील आव्हाने—एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ.दीपक कृष्णराव पवार,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट ॲन्ड कॉमर्स, ३१०—ब, नविन नंदनवन, नागपूर—०९.

**प्रस्तावना :—** जगातील सर्व मानवी समाजाच्या मुलभूत गरजा या सार्वत्रिक स्वरुपाच्या आहेत. त्या गरजांच्या पुर्ततेकरिता निर्माण झालेल्या संस्था सर्व समाजामध्ये दिसून येतात. अशा सार्वत्रिक स्वरुपाच्या सामाजिक संस्थांमध्ये कुटुंब, विवाह, राज्य, अर्थ, शिक्षण आणि धर्मसंस्था यांचा समावेश होतो. या सर्व संस्था जगातल्या कोणत्याही मानवी समाजात आढळून येतात. त्याचे स्वरुप भिन्न—भिन्न असू शकते, त्यामुळे सामाजिक संस्थांचे स्वरुप व्यापक आहे. सामाजिक संस्थांचा संबंध हा समाजाच्या मुलभूत गरजांशी असतो. उदा. कुटुंब या संस्थेची संरचना आई—वडील, मुलगा—मुलगी, भाऊ—बहिण आणि नातवंड अशा संबंधांनी मिळून बनलेली असते. समाजाच्या व व्यक्तीच्या सर्वसाधारण व आवश्यक गरजा पूर्ण करण्याच्या हेतूने एकत्रित करण्यात आलेल्या संस्थीकृत सामाजिक संबंधाचा स्थिर असा समुच्चय म्हणजे सामाजिक संस्था होय.[१]

**विवाह ही एक सामाजिक संस्था :—** 'विवाह' ही एक महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था असून आत्मसंरक्षण, वंशवृध्दीचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी विवाह संस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. विवाहाद्वारे व्यक्ती ही संततीच्या माध्यमातून, समाजमान्य पद्धतीने मानवी जीवनाचे सातत्य टिकवून ठेवते. मानवी समाजात विवाहाच्या अनेक पद्धती प्रमाणित असून काळपरत्वे त्यात बदल होत आहे. गिलीन आणि गिलीनच्या मते, ''विवाहसंस्था संतती जन्माला घालून कुटुंबाला स्थापित करण्याची समाजाद्वारा स्वीकृत पद्धती आहे. तर वेस्टर मार्कच्या मते, ''एक वा अधिक पुरुषांचा एक वा अधिक स्त्रियांसोबत असे संबंध की ने रीतीरिवाज किंवा कायद्याद्वारे मान्य झालेले असतात आणि त्यातून विवाह करण्याऱ्या स्त्रीपुरुषांना परस्परांच्या बाबतीत व त्यांना होणाऱ्या संततीच्या बाबतीत असलेल्या हक्काचा व कर्तव्याचा समावेश होतो.[२]

विवाह संस्थेच्या माध्यमातून समाज केवळ लैंगिक संबंधालाच परवागनी देत नाही तर अपत्यांचे पालन पोषण याचीही जबाबदारी सोपविते. त्यामुळे विवाह संस्था ही सार्वत्रिक व सर्वव्यापी आहे. विवाह संस्थेचे कामवासनेची तृप्ती, धर्मपालन, संततीची निर्मिती, कुटुंबाची निर्मिती, समाजसातत्य, इत्यादी उद्देश आहेत. विवाह संस्थेला काही मूल्य प्रमाणकांच्या बाबतीत सामाजिक मान्यता व अधिकार प्राप्त झालेले असतात. विवाहाची सामाजिक मान्यता व अधिकार प्राप्त झालेले असतात. विवाहाची काही प्रतिके असतात ती प्रतिक संबंधित विश्वास व श्रध्दांचे प्रतिनिधित्व करतात. जसे हिंदु समाजात कुंकू, मंगळसूत्र, हिरव्या बांगड्या ही विवाहाची प्रतिके आहेत. या प्रतिकांच्या आधारावर स्त्री ही विवाहीत आहे की अविवाहीत ते कळते.

समाजामध्ये सामाजिक संस्थांची एक व्यवस्था असते. सर्व संस्था या परस्परांशी संबंधित असतात. एक संस्थेत बदल झाला की इतर अनेक संस्थेत आपोआप बदल घडून येतो. तसेच समाजाच्या सामाजिक संरचनेत बदल झाला की त्याचाही परिणाम होऊन सामाजिक संस्थामध्ये बदल होतो. त्याच बरोबर समाजाच्या संघटनात्मक चौकटीतील बदलाचा परिणाम सामाजिक संस्थांवर होतो. त्याचप्रमाणे लोकसंख्येतील बदल देखील परिणाम करते. भारतातील लोकसंख्येत स्त्री—पुरुषांच्या प्रमाणात अलीकडच्या दोन दशकात मोठया प्रमाणात असमानता निर्माण झाली आहे. त्याचा दुरागामी परिणाम संपूर्ण भारतीय समाजावर आणि सामाजिक संस्थांवर पडला आहे. त्याचबरोबर विशेषरुपाने उपवर मुलांमुलींमधील लोकसंख्येतील तफावत लक्षणीय आहे. तेव्हा भारतीय लोकसंख्येतील स्त्री—पुरुष असमानतेचा व शेती व ग्रामीण क्षेत्राची झालेली विपन्नावस्था याचा परिणाम विवाह संस्थेवर कसा पडला याचा अभ्यास समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून येथे विशद केला आहे.

**विवाहसंस्थेची वैशिष्टये :—** भारतीय समाजात विवाह करणे हे केवळ सामाजिक आणि नैतिक कर्तव्य नाही तर धार्मिक कर्तव्य देखिल समजले जाते. समाजातील रुढी, परंपरा प्रमाणे धार्मिक पध्दतीने किंवा कायद्यानुसार नोंदणी पद्धतीने किंवा अशा कोणत्याही पद्धतीने झालेल्या स्त्री—पुरुषांच्या विवाहास समाजाची मान्यता असणे आवश्यक समजले जाते. विवाह अनेक कारणांनी दिर्घकाळ टिकवून राहणे आवश्यक असते. विवाहितांनी एकत्र राहण्यानेच कुटुंब अस्तित्वात येते. कुटुंब अस्तित्वात येण्यासाठी विवाह कारणीभूत नाही तर मुलांच्या पालनपोषणासाठी व इतर कर्तव्यासाठी कुटुंब स्थापून कर्तव्य पार पाडणे आवश्यक समजले जाते. वेस्टरमार्कच्या मतानुसार, ''कुटुंबाचा उदय विवाहामुळे झाला नसून विवाहाचे मूळ कुटुंबात आहे.'' विवाहासबंधीत काही नियम असून त्याला विधी निषेध म्हणून ओळखले जातात. यात १) अंतर्विवाह ;म्दकवहंउलद्ध २) बहिर्विवाह ;म्गवहंउलद्ध — बहिर्विवाहात अ) गोत्र बहिर्विवाह ब) सप्रवर बहिर्विवाह क) सपिंड बहिर्विवाह ड) अनुलोम विवाह इ) प्रतिलोम विवाह हे प्रकार आहेत. आजही यात काळानुसार खूप बदल झाले तरी हे प्रकार कालसापेक्ष असल्याने आजही अनुभवाला येतात.

**जोडीदार निवडीच्या पद्धती :—** विवाहसंस्थेत औद्योगीकरण, नागरीकरण, आधुनिक शिक्षण, आधुनिक विचारसरणी, नवीन कायदे, स्त्री—पुरुष समानता, स्त्रियांना वाढलेला दर्जा, पालकांचा बदललेला पाल्यांप्रती दृष्टिकोण, उच्च शिक्षण, प्रौढ विवाह, धर्माचा व जातीचा कमी झालेला प्रभाव इत्यादी अनेक कारणांमुळे विवाह संस्थेत खूप परिवर्तन झालेले आहे. वरवधू निवडीच्या पद्धती आणि आवडीमध्येही बदल खूप घडून आले आहेत. जोडीदार निवडीसाठी योग्य शिक्षण, सहवास, आर्थिक स्थिती, सुंदरता आणि स्वभाव या गुणवैशिष्ट्यांना महत्त्व येऊन आजच्या आधुनिक काळात जाती—उपजाती, प्रतिष्ठा, कुटुंब यांच्याही सीमा पार झालेल्या आहेत. निवडीचे क्षेत्र व्यापक झाले असून वर—वधु परिचय मेळावे व सुचक मंडळे, मासिक व वृत्तपत्रातील जाहिराती, इंटरनेट, डंजतपउवदपंसे कवजणबवउ च्या माध्यमातून केली जात आहे. भाषा, प्रांत, देश या सीमा पण कमी झालेल्या आहेत. प्रगत तंत्रज्ञानामुळे व उपलब्ध सुविधेतून जोडीदार निवडीच्या पारंपारिक पद्धती व साधनात बदल होऊन व्यापकता व सुलभता आली आहे. असे सर्व काळानुरुप बदल होऊन विवाह संस्थेत सकारात्मक परिवर्तनातून कालसापेक्षातून जोडीदार निवडणे, विज्ञानाच्या शोधामुळे सुलभ झाले होते पण याच विज्ञानाने किंवा प्रगत तंत्रज्ञानाने विवाह संस्थेवर मोठा आघात करुन समाजासमोर आव्हान निर्माण केले आहे. ते म्हणजे एका १९८० नंतर काळात 'गर्भजल' चाचणी केंद्रा मुळे स्त्री भृण हत्या मोठ्या प्रमाणात झाल्याने पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी होवून स्त्री—पुरुष असमतोल निर्माण झाला आहे. त्याचबरोबर शेती व ग्रामीण क्षेत्राची झालेली विपन्नावस्था ही दोन कारणाने विवाह संस्थेचे मोठे आव्हान निर्माण करून त्याचा परिणाम समाजावर पडला आहे.

**वर्तमानकाळातील आव्हाने :—** भारतीय विवाहसंस्थेवर वर्तमानकाळात दोन मोठ्या आव्हांनानी घेरलेली आहे. भारताच्या ग्रामीण आणि शहरी या दोन्ही क्षेत्रात लग्नाळू कोणी आहे का? अशी विचारणा केली तर प्रत्येक गल्लीत चार दोन मुल तरी 'ओ' देतील अशी वस्तूस्थिती आहे आणि दरवर्षी यात भर पडत आहे. आज ग्रामीण भागात

टि.व्ही., इंटरनेट, फेसबुक, चित्रपट, आधुनिक शिक्षण, शिक्षणात मुलींचे वाढलेले प्रमाण, वाहतूक व दळणवळणाच्या साधनात झालेली प्रचंड वाढ, त्यातून नागरी—ग्रामीण सातत्य यातून जीवनाच्या व जगणाऱ्या वाढलेल्या आशा—आकांक्षा शेती व शेतीसंबंधित व्यवसाय हे कष्टाचे, मेहनतीचे आणि जगण्याची छान—शौकी नसणारे आहे. त्यातूनच शेती आणि त्यावर आधारित उद्योग—व्यवसायाची वाताहात झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक उपवर मुलीला आम्ही तिच्या आईवडिलाला नोकरी करणारा मुलगा, उपवर हवा आहे. त्यातून नोकरी नाही तर छोकरी कोण देणार आणि कोणती छोकरी वरणार हा ग्रामीण भागातील बहुतेक घराचा प्रश्न आज आहे. अगदी वयाची पस्तीशी ओलांडली तरी वधू संशोधन सुरू असल्याचे चित्र गरीब व मध्यमवर्गीय घरात सर्वत्र दिसत आहे. या प्रश्नाचे गांभीर्य मोठे आहे पण समाजाचे लक्ष नाही. गेल्या दशकापूर्वी ज्या समाजाने मुलगा जन्माला यावा कारण तो वंशाचा दिवा आहे असे मानले, त्याच समाजात अपेक्षित स्थळ नसल्याने मुलाला मुलगी देण्यास नकार देण्याचे प्रमाण वाढले आहे. याला केवळ आर्थिक सामाजिक परिस्थिती कारणीभूत नसून बदललेली मानसिकता देखील आहे.

मुली अलीकडल्या काळात 'आईबापाने दिल्या घरी' समाधानाने संसार करणे, अपेक्षांचे ओझे मनात ठेवणे या गोष्टी टाळून स्वत:हाचे मत तयार करू लागल्या आहेत. यातुन चौकौनी कुटुंबाचा आग्रह, शहरी वातावरणाची आवड, फॅशनेबल राहणे व याकरिता योग्य व कायमस्वरुपी नोकरदार पती असावा, त्याचे घर व घरात सुखसुविधा असाव्यात, अक्षा अपेक्षा मुलींच्या आहेत. शेतातील उन्हातान्हातील राबता व जनावरांची उसावर करण्याचा सक्ती नको आहे. यामुळे अपेक्षेप्रमाणे स्थळ दुर्लभ झाल्याने स्थळ नाकारण्याचे प्रमाण मुलींमध्ये वाढले आहे. परिणाम अशा स्थितीत ;छवतउेद्ध न बसणाऱ्या लग्नाळू मुलींच्या संख्या वाढते आहे.

दुसऱ्या बाजूला गेल्या तीन ते चार दशकापासून वैद्यकीय क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे 'गर्भजल' परीक्षणाचे तंत्र आले यामुळे माता मृत्यूचे प्रमाण आमुलाग्र कमी होवून याचा फायदा खूप चांगला झाला पण यातून स्त्रीच्या गर्भातील भृण, मुलगा की मुलगी हे कळू लागले. भारतीय लोकांची मानसिकता पुरुष प्रधानता व स्त्री नकारात्मक असल्याने, स्त्री मुल जन्माला येण्याअगोदरच मारल्या जावून मोठ्या प्रमाणात स्त्री भृणहत्या झाल्या. त्याचा परिणाम या दशकात दिसून आला आहे. आज उपवरांमध्ये १००० उपवर मुलांच्या मागे फक्त ९२५ ते ९४० उपवर मुली आहेत. लोकसंख्येत लग्नायोग्य मुला—मुलींची तफावर आणि उपवर मुलींमधील बदललेली (नोकरी करणारा व सुखस्वरुप मुलगाचा हवा) मानसिकता यामुळे ग्रामीणच भागातील विवाहयोग्य मुलांचे साफ गणित बिघडले आहे. उपवर मुलगी हे काही वस्तू नाही जी कमी आहे म्हणून दुसऱ्या देशातून आयात केली जाईल किंवा कारखान्यातून उत्पादन वाढवून मागणी—पुरवठयाचे संतुलन केले जाईल?.

**परिणाम :—** १) मुलींचा नकार येत असल्याने मुलींकडे हुंडा मागण्याची पध्दती जवळ—जवळ बंद झाली असून आज गुपचूप वरपिते वधुपित्यांना हुंडा (सरळ किंवा आडमार्गाने) देवून आपल्या मुलांकरिता मुलगी मिळवत आहे. २) उपवर मुला—मुलींमधील संख्येची तफावत काही विशिष्ट श्रीमंत व सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या जातीत सोनोग्राफीच्या गैरवापराच्या तंत्रज्ञानामुळे जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे जातीअंतर्गत मुलाला—मुलगी मिळण अशक्य झाल्याने त्याची पूर्तता इतर जातीतून किंवा कनिष्ठ जातीतील मुलगी मिळून केली जात आहे. त्यामुळे जातीपातीचीही बंधने लग्नाळू तरुणांमुळे गळून पडू लागली आहे. ३) दोन—चार एकर द्राक्षबाग, संत्राबाग किंवा ऊस बागायतदार असो व घरात सर्व सुखसुविधा, आधुनिक मोटारगाड्या व पैसा असून मुलाला नोकरी नाही. या कारणावरून स्थळे नाकारली जात आहे. ४) घरातील छोट्या पडद्यावर दिसणारे छानछोकी जीवन वास्तवात असू शकत नाही. याची जाणीव मुलींना आईवडिलांकडून दिली जात नाही. त्यामुळे टि.व्ही. व चित्रपटाच्या कल्पनेतील जगात मुली गुंतत जातात व अपेक्षाभंग होतो. त्यामुळे एकीकडे मुलींची अवस्था देखील बिकट होते. कारण अपेक्षित किंवा स्वपनातील स्थळ लवकर मिळेल याची खात्री नाही. प्रतिक्षा करून मिळालेल्या घरात मनातील कल्पना सत्यात उतरतील याची शास्वती काय? त्यामुळे आयुष्यातील कोंडमारा व शेवटी नैराश्य पदरी येत आहे. नैराश्याचा परिणाम कुटुंब विघटन आणि घटस्फोटापर्यंत जात आहे. ५) या समस्येवर उपाय म्हणून गुपचूप एजंट किंवा छुपे लग्न जुळविणारे तयार झाले आहे. लग्नाळू तरुणांना मुली मिळवून देणारा नवीन व्यवसाय उदयास आला आहे. आज महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, कर्नाटक इत्यादी राज्यातून उपवर मुलांना भरमसाठ पैशाच्या मोबदल्यात मुली मिळून देण्याचे या दलालाचे रॅकेट आहेत. गरजू मुला—मुलींचे कुटुंब हेरुन कमीशन घेवून लग्न जुळविण्याचा व्यवसाय तेजीत आहे. फसवणुक झाली तर काही घटना उघडकीस येतात मग ज्यांची फसवणूक झाली त्याच्या आयुष्याची फरफट होते.[४] ६) लग्नाकरिता नोकरदार मुलांना मुली अग्रहक्काने पसंती देत आहेत ही बाब हेरून घरात सुबत्ता व नोकरचाकर असतांनाही एखाद्या सहकारी संस्था, शिक्षण संस्था, कारखान्यात किंवा कार्पोरेट फर्ममध्ये काम पत्करतात आणि लग्न जुळवितात व कालांतराने नोकरी सोडून देतात असे घडत आहे.

एकूणच आजच्या स्थितीत वर्तमान विवाह संस्था या नविन आव्हानातून जात असून विवाह ही मुलांकरिता सहज आणि वधूपक्षाकडून हुंडा मिळविणारी बाब राहिली नसून ती आता उलटया दिशेने प्रवास करीत आहे.

### संदर्भ ग्रंथ सूची


१. बोबडे प्रकाश (१९९६): 'सामाजिक संस्था, संकल्पना स्वरुप', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.५
२. भिडे विद्याधर (१९८५): 'नागरी समाजशास्त्र', प्राची प्रकाशन, मुंबई,, पृ.७१
३. फरकाडे/गोंगे (१९९९): 'विवाह आणि कौटुंबिक संबंध', विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१
४. शिंदे दिगंबर : 'लग्नाच्या बाजारात' — दैनिक लोकसत्ता, दिनांक ७ फेब्रुवारी २०१९, पृ.६

# भारतीय समाजशास्त्राच्या विकासात मुंबई विद्यापीठाचे योगदान

**डॉ. धारबा यादवराव रणविर,** वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड. मो. न. ९७६३९८७५१२

स. न. १८५७ साली मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे विद्यापीठाची स्थापना करण्याचे धोरण स्वीकारले. ब्रिटिश सरकारच्या शिक्षणविषयक धोरणामुळे प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासक्रमात नैसर्गिक शास्त्रांतर्गत अभ्यास विषयाव्यतिरिक्त सामाजिक शास्त्रांतर्गत अनेक विषयाचा अंतर्भाव केल्यामुळे विज्ञाननिष्ठता, बुध्दीनिष्ठता, तर्कशुध्दता आणि वस्तुनिष्ठता या वैज्ञानिक मुल्यांचा प्रचार व प्रसार होण्यास मदत झाली. एकखांद्या नैसर्गिक अथवा सामाजिक घटनेचे किंवा समस्येचे अध्ययन कसे करावे याबाबतचे पध्दती शास्त्र सर्व स्तरावर, विकसित होऊ लागले. समाजशास्त्राचा अभ्यास विषय, त्याची व्याप्ती, समाजशास्त्र एक विज्ञान, समाजिक समस्यांशी कारणमिमांसा इत्यादी बाबतचे ज्ञान पदवी व पदव्यूत्तर पातळीवर अभ्यासकांना मिळू लागले. विशेषत: समाजशास्त्राच्या अभ्यासाकडे अभ्यासकांचे लक्ष आकर्षित करून घेण्यासाठी या कालखंडात विषेष प्रयत्न केले जाऊ लागले. मात्र संशोधनात्मक अध्ययनाची विद्यापीठ पातळीवर सुरूवातीस तरतुद नसल्याने भारतीय अभ्यायासकांना त्यासाठी विलायतेला जावे लागले. परंतु या अभ्यासकांनी भारतीय समाजव्यवस्थेशी निगडीत असणारे अनेक विषय आपलया संशोधनात्मक अध्ययनासाठी निवडले व जेंव्हा आपले संशोधनात्मक अध्ययन पूर्ण केल्यानंतर भारतीय अभ्यासक परत जेंव्हा भारतातील विद्यापीठातील समाजशास्त्राचे अध्ययन व अध्यापन करू लागले. तेंव्हा त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक अभ्यासकांनी संशोधन कार्याकडे विशेष लक्ष देण्यास सुरूवात केली. व तेंव्हापासून भारतीय समाजशास्त्राच्या विकासाला खरी चालना मिळण्यास सुरूवात झाली.

१७७३ ते १९०० पर्यंत कालखंडात हिंदू समाजशास्त्र, भारतीय प्राच्यविद्या व मानववंशशास्त्र, मानवशास्त्र, लोकसंख्याशास्त्र विभिन्न जातीधर्मीय समुदायाचे प्रयत्न इत्यादी विषयाच्या अध्यायनाला प्रारंभ झाालेला होता. व या सर्व विषयाचा भारतीय समाजशास्त्राशी अत्यंत निकटचा संबंध असल्याने १९०१ ते १९५० या कालखंडात भारतीय समाजशास्त्राच्या विकासाला चालना मिळू लागली. प्रामुख्याने या कालखंडात भारतीय विचारवंतांनी व समाजशास्त्राज्ञांनी विशेष प्रयत्न केले.

भारतीय समाजशास्त्राला 'विज्ञाननिष्ठतेचा' चा दर्जा प्राप्त करून देणारा हा कालखंड मानला जातो. या कालखंडात संशोधनाचा विषय कोणताही जरी असला तरी अभ्यास विषयाकडे अभ्यासकांचा पाहण्याचा दृष्टीकोण कोणताही जरी असला तरी संशोधनात्मक अध्ययनासाठी आवश्यक असणारी वस्तुनिष्ठ स्वरूपाची माहिती मिळविण्यासाठी मुलाखत, प्रश्नावली, नमुना निवड, अनुसूचि व सांख्यिकी यापैकी अनेक तंत्राचा कुशलपणे वापर करण्यावर मार्गदर्शकांनी भर देण्यास सुरूवात केली.

१९५७ साली जरी मुंबई विद्यापिठाची स्थापना झालेली असली तरी या विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी विशेष जबाबदारी स्वीकारली. पेट्रीक गेडिस यांच्या शिफारशीमुळेच जी. एस. घुर्ये यांना संशोधनपर अध्ययनासाठी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या संस्थेत प्रवेश मिळाला होता.

या कालखंडात भारतात स्थापन करण्यात आलेल्या अनेक विद्यापीठातून समाजशास्त्राच्या अध्ययनाला, अध्यापनाला व संशोधन कार्याला जसजसी चालना मिळू लागली. तसतसी भारतीय समाजशास्त्राच्या विकासाला अधिक गती मिळू लागली. १८५७ साली मुंबई या ठिकाणी विद्यापीठ स्थापन करण्याचा ब्रिटिश सरकारने जरी निर्णय घेतलेला असला तरी विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून समाजशास्त्र हा विषय पदवीपूर्व पातळीवर ऐच्छिक, व पदवी पातळीवर विशेष स्वरूपातून अभ्यासक्रमात अंतर्भूत करण्यात आला.

डॉ. जी. एस. घुर्ये, राधाकमल मुखर्जी, डॉ. अशुतोष मुखर्जी, डॉ. बी.एन. सील डॉ. ए. आर. वाडिया, डॉ. इरावती कर्वे इत्यादी भारतीय समाजशास्त्रज्ञानी आपआपल्या विद्यापीठात समाजशास्त्राचे विभागप्रमुख म्हणून जेंव्हा जबाबदारी स्वीकारली, तेंव्हापासून त्यांनी भारतीय समाजाच्या अध्ययनाकडे विशेष लक्ष देण्यास सुरूवात केली. व त्यामूळेच भारतीय समाजशास्त्राच्या विकासाला अधिकाधिक गती मिळू लागली. म्हणून विभिन्न विद्यापीठात समाजशास्त्राचा विकास कसकसा होत गेला. याचा संक्षिप्त आढावा घेणे जरूरीचे आहे.

१९१४ साली ब्रिटिश सरकारने मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र हा विषय सुरू करण्यास प्रशासकीय व आर्थिक स्वरूपाची मान्यता दिली व प्रत्यक्षात १९१९ साली पेट्रीक गेडिस या नगररचनाकाराच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र व नागरिकशास्त्र अशा संयुक्त विषयाचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला. १९१९ ते १९३० पर्यंतच्या कालखंडात समाजशास्त्र व अर्थशास्त्र, समाजशास्त्र व नागरिकशास्त्र, असे संयुक्त विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पातळीवर प्रवेश देण्यात येऊ लागला. संयुक्त विषय पध्दतीत दोन्हीं विषयांचे चार–चार पेपर्स शिकविण्याची तरतूद करण्यात येत असे. परंतु १९३० नंतर पदव्युत्तर पातळीवर विशेष स्तरावर समाजशास्त्राचा अंतर्भाव करण्यात आला. पेट्रीक गेडिस हे स्वत: नगररचनाकार जरी असले तरी 'नागर समाजशास्त्र व संस्कृती आणि पर्यावरण' या विषयात त्यांनी विशेष प्राविण्य संपादन केलेले होते. मुंबईच्या औद्योगिकदृष्ट्या, व्यापारीदृष्ट्या, दळणवळण शिक्षण, इत्यादी क्षेत्रात जसजसी प्रगती होऊ लागली तसतसे नागरीकरणांचा वेग अधिक झपाट्याने वाढु लागला. व त्यातून संभाव्य स्वरूपाच्या गलिच्छ वस्त्या, प्रदूषण, दाटीवाटीची लोकवस्ती, लोकसंख्येची घनता, गुन्हेगारी, वेश्या व्यवसाय, बालमजूर, प्रभावी जनसंपर्काच्या माध्यमातून प्रदशित होणारे पाश्चात्य संस्कृतीचे दर्शन, भौतिकवाद, आत्मकेंद्रितपणा, कौटूंबिकपणा, अस्थिरता इत्यादी अनेक समस्यांच्या अध्यनाकडे गेडिस यांनी लक्ष देण्यास सुरूवात केली. त्यांमूळे

पदव्युत्तर पातळीवर जी. एस. घुर्ये, एन. ए. टुथी, राधाकमल मुखर्जी इत्यादी अनेक विद्यार्थी समाजशास्त्राच्या अध्यनाकडे आकर्षित होऊ लागले.

घुर्ये यांच्या पदव्युत्तर शिक्षणानंतर संशोधनात्मक अध्यनासाठी त्यांना 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' येथे प्रवेश घेण्यास गेडिस यांनी विशेष मार्गदर्शन केले. इंग्रजी व संस्कृत या विषयात घुर्येनी पदवी संपादन केलेली असली तरी त्यांच्या चिकित्सक बुध्दीमुळे शिष्यवृत्ती बहाल करण्यात गेडिस यांचे प्रयत्न विशेष कारणीभूत ठरले. नंतर घुर्ये यांनी क्रेबिज विद्यापीठात येऊन डब्लू. एच. रिव्हर्स यांच्या मार्गदर्शनाखाली Ethnic Theory of Caste यावर जो प्रबंध सादर केला त्याला केंब्रिज विद्यापीठाने घुर्ये यांना १९२३ साली पीएच. डी. ही पदवी बहाल केली.

समाजिक मानवशास्त्र ही समाजशास्त्राची स्वतंत्र शाखा म्हणून विकसित करण्याच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञ यांच्यात मतभेद निर्माण झालेले दिसून येतात. डॉ. घुर्ये यांच्या मते, मानवशास्त्र ही समाजशास्त्राचीच एक उपशाखा आहे. असे मानून मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राच्या अंतर्गत मानवशास्त्राचा समावेश केला तर डॉ. डी. एन. मुजूमदार यांच्या मते, मानवशास्त्र ही समाजशास्त्राला पूरक ठरणारी शाखा जरी असली तरी मानवसमाजाच्या उत्क्रांतिचा किंवा स्थित्यंतराचा अभ्यास, ऐतिहासिक दाखले, उत्खननात सापडलेले अवशेष, ताम्रपट, शिल्पकला, प्राचीन अवजारे, नाणी, मुर्ती व वस्तु यांच्या आधारे करण्याच्या माणवशास्त्र प्रयत्न करीत असते. त्यामुळे भारतात अनेक विद्यापीठात समाजशास्त्राव्यतिरिक्त माणवशास्त्र ही स्वतंत्र शाखा विकसीत करण्याकडे प्रयत्न केले जाऊ लागले.

म्हणूनच मुंबई विद्यापीठाने घुर्येना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठविण्याची शिफारश समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. पेट्रिक गेडिस यांनी केली. या शिफारशीमुळे त्यांना 'लंडन स्कूल ऑफ इक्नॉमिक्स' या संस्थेत प्रवेश मिळाला. पहिल्या सत्रात हॉबहाऊस व युरविक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले अध्ययन कार्य सुरू केले. पहिल्या सत्रानंतर त्यांनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेऊन प्रा. रिव्हर्स व हॅडन यांचे मार्गदर्शन घेतले. १९२३ च्या सुमारास 'इथीनिक थेरी ऑफ कास्ट' या प्रबंधाबद्दल केंब्रिज विद्यापीठाने त्यांना पीएच. डी. पदवी बहाल केली. उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९२४ च्या सुमारास घुर्ये यांचे भारतात आगमन झाले. मुंबई विद्यापीठात प्रा. पेट्रिक गेडिस यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्ये करण्यास प्रा. घुर्येनी प्रारंभ केला. समाजशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी जेंव्हा जबाबदारी स्वीकारली. तेंव्हापासून त्यांनी पदव्युत्तर पातळीपर्यंतच्या अभ्यासक्रमात समाजशास्त्रात स्वतंत्र विभाग स्थापन करून परिक्षेकरीता आठ पेपरची तरतूद केली, शिवाय समाजशास्त्रीय अध्ययनाचे संशोधन केंद्र मुंबई विद्यापीठात १९३६ पासून सुरू केले. आणि मार्गदर्शनाची जबाबदारी स्वत:कडे घेतली. १९३८ साली मुंबई विद्यपीठाची पहिली समाजशास्त्रातील पीएच.डी ही पदवी श्री एम. सी. प्रधान यांना त्यांच्या 'न्दजवनबींइसमे पद ठवउइंल' या प्रबंधाबद्दल देण्यात आली. १९३६ ते १९६८ पर्यंतच्या काळात जवळजवळ ३६ प्रबंधाना मुंबई विद्यापीठाने पीएच.डी. ना मान्यता दिली. त्यापैकी जास्तीत जास्त प्रबंध नागर समाजातिल विविध समस्यांशी निगडीत होते.

भारतीय समाजशास्त्राचा दर्जा संपादन केलेल्या डॉ. एम.एन. श्रीनिवास, के.एम. कपाडिया, पंढरीनाथ प्रभू, करंदीकर, इरावती कर्वे इत्यादीने आपल्या संशोधनात्मक अध्ययनात डॉ. घुर्ये चे मार्गदर्शन घेतले. आपल्या संशोधनात्मक अध्ययनतंत्रात त्यांनी तुलनात्मक व ऐतिहासिक पध्दतीचा पुरस्कार करण्याकडे भर दिला. भारतीय समाजशास्त्राला विशिष्ट दिशा व गती देण्याच्या उद्देशातून मुंबईत १९५२ साली 'जैम प्दकपंद ैवबपवसवहपबंस ैवबपमजल' या संस्थेची स्थापना करण्यात घुर्येनी विशेष पुढाकार घेतला. एवढेच नव्हे तर या संस्थेच्या माध्यमातून, समाजशास्त्रीय प्रत्रिका 'ैवबपवसवहपबंस ठनससमजपद' हे नियतकालीक प्रकाशित करण्यास सुरूवात केले. फक्त महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण भारतात मुंबई विद्यापीठ हे समाजशास्त्राचे अध्यापण करणारे प्रमुख केंद्र म्हणून विकसित करण्यात त्यांचा वाटा अग्रगण्य आहे. 'दि इंडियन सोशालॉजिकल सोसायटी' ही संस्था समाजशास्त्रीय अभ्यासकांना एकत्रित करणारी अखिल भारतीय स्तरावर कार्य करणारी एक महत्त्वाची संस्था म्हणून ओळखली जाते. व या संस्थेच्या माध्यमातून प्रतिवर्षी देशाच्या कोणत्याही भागात समाजशास्त्रीय परिषदा भरविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

डॉ. घुर्ये यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान ही त्यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथातून व वेगवेगळ्या लेखातून अधिक स्पष्ट तर होतेच त्याही पेक्षा भारतीय समाजशास्त्रज्ञांची मोठी मालिका तयार करण्याच्या प्रक्रियेतूनही सिध्द होते.

*संदर्भ ग्रंथ :*

*१. प्रा. व्ही. एन. गजेंद्रगड, प्रा. व्हि. एस. मारूलकर, 'समकालीन भारतीय समाजशास्त्र' फडके प्रकाशन कोल्हापूर.*

*२. प्रा. संजयकुमार कांबळे, 'जातिअंताचे समाजशास्त्र', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१८*

# वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या : एक नवे आव्हान

**डॉ. राजेंद्र बगाटे,** पोस्ट डॉक्टोरल फेलो, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. 09960103582

**प्रस्तावना** : वृध्दत्व ही मानवी जीवनातील अंतिम, अटळ आणि सार्वत्रिक स्वरुपाची घटना आहे. सातत्याने वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या हे जागतिक लोकसंख्येचे वैशिष्टये आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढत जात आहे तसतशी वृध्दांच्या लोकसंख्येतही वाढ होत आहे. घटता जन्मदर व मृत्यूदर यामुळे वृध्दांचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या वृध्दांच्या लोकसंख्येमुळे वृध्द ही समस्या निर्माण झाली आहे. "एकविसाव्या शतकाची सगळ्यात मोठी खूण म्हणजे हे शतक वयोवर्धनाचे आहे."[१] "संयुक्त राष्ट्र संघाने केलेल्या पाहणीनुसार भारतात इ.स. २०२५ साली ज्येष्ठ लोकांची संख्या १७ कोटी ७४ लाख होईल. ही संख्या जगातील ज्येष्ठ लोकांच्या १५ टक्के इतकी असेल. आता जगातील ६० टक्के ज्येष्ठ नागरिक विकसनशील देशात राहतात."[२] लोकसंख्या संक्रमणामुळे देशाला जसा लोकसांख्यिकी लाभांशाचा फायदा होतो, अगदी तसेच कालांतराने नवीन आव्हानांना देखिल सामोरे जावे लागते. या अनेक आव्हानांपैकी लोकसंख्येतील वृध्दांचे वाढते प्रमाण हे एक महत्वाचे आव्हान आहे. "आज जगात एकूण ५८ कोटी वृद्ध लोक राहत आहेत. त्यापैकी ३८ कोटी वृद्ध हे विकसनशील देशातील आहेत. याचाच अर्थ म्हणजे आज वृध्दांची संख्या १० टक्के आहे. इ. स. २०२० मध्ये जगात एकूण १०० कोटी वृद्ध असतील. त्यापैकी ७० कोटी हे विकसनशील देशातील असणार आहेत. आज आरोग्याच्या दृष्टीने आपन अनेक रोगावर मात केलेली आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आज मनुष्याचे आयुर्मान वाढलेले आढळते."[३] एकीकडे ही जरी चांगली बाब असली तरी आज नव्याने वृध्दत्व ही समस्या निर्माण झाली आहे. कारण वृध्दापकाळी या वृध्दांची सुश्रुषा कोण करणार? त्यांची काळजी कोण घेणार? हा मोठा प्रश्न आज सर्वासमोर निर्माण झाला आहे. यामुळे कुटुंबामध्ये सतत वाद होऊन वृध्दांना वाइट वागणूकीला सामोरे जावे लागत आहे. त्यांचबरोबर वृध्दत्वातून वृध्दांच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. यातूनच ते एकलकोंडे जिवन जगतात किंवा घरदार सोडून त्यांना वृध्दाश्रमात राहावे लागत आहे. "इ. स. १९५० मध्ये भारतात मनुष्याचे आयुर्मान हे ४१ वर्ष होते. १९९० मध्ये ते ६२ वर्षापर्यत वाढलेले असून इ.स. २०२० मध्ये ७० वर्षापर्यत जाईल. सध्या जगातील एकूण २० देशातील मनुष्याचे आयुर्मान हे ७२ वर्ष आहे. यामध्ये श्रीलंकेचासुध्दा समावेश आहे. आजच काही प्रगत राष्ट्रांतील वृध्दांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या २० टक्क्यांपर्यत वाढलेली आहे."[४] त्यामुळे वृध्दांचा प्रश्न, त्यांच्या समस्या गंभीर होत आहेत. त्या सोडविण्याकडे लक्ष जावे आणि वृध्दांचे आयुष्य आनंदमय चौतन्यमय व्हावे यासाठी प्रत्येक राष्ट्राने, त्या दिशेने कार्य करण्याची गरज आहे.

**संशोधनाचे उद्देश:** प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील उद्देश समोर ठेवले होते. १. वृध्दांची वाढत जाणारी लोकसंख्या जाणून घेणे. २. वृध्दांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या वृध्दांच्या समस्यांचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती** : प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने व्दितीयक स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला असून यासाठी विविध ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, दैनिके, विविध अहवाल, इंटरनेट इत्यादींचा आधार घेण्यात आलेला आहे.

वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या आणि यातून निर्माण होणाऱ्या त्यांच्या समस्यांचा आढावा घेत असतांना सर्वप्रथम त्यांची लोकसंख्या जाणून घ्यावी लागेल. ''१९९५ मध्ये, जगातील वृध्दांची लोकसंख्या ५.६८७ अब्ज होती आणि ती २१५० पर्यंत १०.८०६ अब्जापर्यंत वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. म्हणजेच १९५० ते २१५० याकाळात वृध्दांची लोकसंख्या ही चौपटीने वाढेल."[५] जागतीक वृध्द लोकसंख्येच्या वाढत्या कलाबद्दल २०५० पर्यंतचा अंदाज पुढील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे

१९९० मध्ये जगातील एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के वृध्द होते तर विकसनशील देशातील एकूण लोकसंख्येच्या ७.० टक्के वृध्द होते तसेच विकसीत देशातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात वृध्दांचे प्रमाण १७.१ टक्के होते. ते २००० मध्ये ९.९ टक्के एवढे वाढले तर विसनशील व विकसीत देशातील अनुक्रमे ७.६ टक्के व १८.७ टक्के एवढे वाढले. तसेच ते २०२५ मध्ये अनुक्रमे १४.४ टक्के, १२.० टक्के, व २६.६ टक्के व २०५० पर्यत अनुक्रमे २०.३ टक्के, १८.८ टक्के, आणि २९.६ टक्के एवढी वृध्दांची लोकसंख्या होईल असा अंदाज आहे. म्हणजेच १९९० पासून जागतीक वृध्दांची टक्केवारी वाढतांनाच दिसते.

''२००१ च्या जनगणनेप्रमाणे भारतातील ज्येष्ठ नागरिकांची (६०+) लोकसंख्या ७०.६ दशलक्ष होती, ही लोकसंख्या २०२६ साली १७३ दशलक्षाच्या पुढे जाण्याचा संभव आहे."[७] लोकसंख्येच्या वाढीचा अंदाज बांधणाऱ्या यंत्रणेने २००६ पासून २०२६ पर्यंत जो अंदाज केला गेला त्यानुसार, भारतातील ६०+ वृध्दांची लोकसंख्या २००६ मध्ये ७.५ टक्के होती ती ८.३ टक्के इतकी वाढली तर ती २०२६ पर्यंत वाढत जाऊन १२.४ टक्के होईल असा अंदाज नोंदविलेला दिसून येतो. म्हणजेच २००६ पासून २०२६ पर्यंत भारतातील वृध्दांची लोकसंख्या ही वाढतच आहे असे स्पष्टपणे म्हणता येईल.

भारतातील ज्येष्ठांच्या परावलंबित्वाचे प्रमाण किती असेल हे पाहताना दर १०० लोकांच्या मागे ६० वर्षाच्या वर किती लोक आहेत हे प्रमाण गेली तीन दशके वाढतच आहे. १९८१ मध्ये भारतात ११.८ टक्के ज्येष्ठ नागरिक परावलंबी होते पुढे हे प्रमाण वाढून १९९१ मध्ये १२.२ टक्के एवढे झाले तर २००१ मध्ये ते १२. ४ टक्के झालेले दिसून येते. याचाच अर्थ असा की भारतामध्ये ज्येष्ठ नागरिक परावलंबीत्वाचे प्रमाण सतत वाढतांना दिसते.

**लोकसंख्या संक्रमण व वाढते वृध्दांचे प्रमाण:—** ''१९०१ साली भारतामध्ये जे साठ वर्षाच्या वरचे लोक होते त्यांची लोकसंख्या १२ दशलक्ष इतकी होती. १९१९ साली हीच संख्या २० दशलक्ष झाली आणि १९४७ साली १ कोटी ९० लाख वृध्द लोकसंख्या होती. १९९१ साली ती ५७ दशलक्षावर पोचली. २००१ च्या जनगणनेनुसार ही लोकसंख्या वाढून ७ कोटी ६० लाख एवढी झाली. लोकसंख्येच्या वाढीचा अदांज करणारा युनोमधील जो गट आहे, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे २०१३ सालापर्यंत ही संख्या १०० दशलक्षावर गेली आहे. याच गटाने अदांज असा केला आहे की, भारतात २०३० साली १९८ दशलक्ष लोक ६० वर्षाच्या वर असतील आणि २०५० मध्ये ३२६ दशलक्ष असतील. युनोच्या अदांजाप्रमाणे २०५० मध्ये एकूण भारतीय लोकसंख्येपौकी २१ टक्के लोक ६० वर्षाच्या पुढचे असतील."[१०] "जगामध्ये चीन नंतर सर्वात जास्त वृध्दांची लोकसंख्या भारतामध्ये आहे. डेव्हीड ई. ब्लूम यांच्या अदांजानुसार भारतातील वृध्दांची लोकसंख्या येत्या चार दशकांमध्ये

३१ कोटी ६० लाखांवर पोहचण्याची शक्यता आहे व चीनला भारत २०३० पर्यंत मागे टाकून प्रथम क्रमांक प्राप्त करेल."[११]

''राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ६० व्या फेरीच्या उपलब्ध आकडेवारीनुसार (२००५–२००६) ५० टक्के पेक्षा जास्त 'वृध्द पुरूष' स्वावलंबी जीवन जगतात; परंतु महिलांमध्ये हे प्रमाण ५० टक्के पेक्षा कमी आहे. वृध्द प्रामुख्याने स्वत:च्या मुलांवर अवलंबून असतात. वैधव्याचे प्रमाण महिलामध्येच जास्त आढळते. जसे ६४ टक्के वृध्द महिला ह्या विधवा आहेत तर फक्त १९.४ टक्के वृध्द पुरूष हे विधूर आहेत. वृध्द त्यांच्या विविध गरजांसाठी दुसऱ्यावर विसंबून असतात. या गरजाच त्यांच्या प्रमुख समस्या होत."[१२] ''सन २०११ मध्ये भारतात ९८ दशलक्ष ज्येष्ठ नागरिक होते. हीच संख्या २०२१मध्ये १४३ दशलक्षापर्यंत वाढणार आहे. यामध्ये ५१ टक्के स्त्रिया आहेत."[१३] ''सरासरी आयुर्मान वाढल्यामुळे अतिवृध्द (८०+) ज्येष्ठांची संख्या खूप झपाटपाने वाढते आहे. २००६ ते २०५० या कालावधीत भारताच्या लोकसंख्येत ४० टक्के वाढ होईल. परंतु ६०+ या वयोगटात २७० टक्के वाढ होईल आणि ८०+ या वयोगटात ५०० टक्के वाढ होणार आहे. ८०+ या वयोगटातील बहुतेक अतिवृध्द ग्रामीण भागात आहेत. वाढत्या वयाबरोबर त्यांच्या गरजांमध्ये खूप फरक होत आहेत. विशेषत: वैद्यकीय आणि आर्थिक गरजांचा वाढणारा बोजा त्यांना झेपत नाही. त्यामुळे या अतिवृध्दांच्या (८०+) गरजांचा विचार भारताच्या नव्या धोरणात प्रथमच केला जात आहे."[१४] ''आज भारतात सरासरी आर्युमान ७३ वर्षाचे आहे."[१५] ''केरळमध्ये वृध्दांची संख्या जास्त असल्याने तेथे वृध्द परावलंबित्वाचे प्रमाण अधिक आहे. राष्ट्रीय सरासरीपेक्षा परावलंबित्व जास्त असणारी राज्ये पंजाब, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, तामिळनाडू, उत्तराखंड, उत्तरप्रदेश, हरियाणा व मध्य प्रदेश ही होत.[१६]

**भारतातील वृध्दांची स्थिती आणि परिस्थिती :–** ''युरोपातील जी लहान राष्ट्रे आहेत, यातल्या काही राष्ट्रातील लोकसंख्येएवढी आपल्याकडच्या मध्यमवर्गीय ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या आहे."[१७] ''वैद्यकीय प्रगतीमुळे जगण्याचे वय वाढले आहे, काम करण्याची उमेद आहे, पण निवृत्तीची अट वयाशी जोडली गेल्यामुळे अकाली वृध्दत्व लादले जाते."[१८] आरोग्यसुविधांमुळे आयुष्याची मार्यादा वाढते आहे व मृत्यूचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे देशाच्या उत्पन्नावर वृध्दांचा भार पडत आहे. अशा उत्पन्नाचे प्रमाण जास्त असेल तर त्याचा अर्थ लोकसंख्येत वृध्दांचे प्रमाण जास्त असा अनुभव आहे. "युनोच्या अभ्यासाप्रमाणे जागतिक लोकसंख्येत ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण संख्येने वाढणार आहे. म्हणजे येणाऱ्या शतकात ज्येष्ठांचे प्रमाण ही गंभीर बाब ठरण्याची शक्यता आहे. युनोच्या अभ्यासानुसार १९८० च्या दरम्यान ज्येष्ठांचे एकूण लोकसंख्येत असलेले प्रमाण ५.९ वरून २०२५ साली ९.७ होईल. विकसनशील देशात ते प्रमाण जास्त राहणार आहे. २००० साली जागतीक लोकसंख्येच्या ४.९ टक्के होते तर विकसनशील देशात ते लोकसंख्येच्या ८.३ टक्के असेल. शेतकीप्रधान देशांत या अधिक प्रमाणाचा भार शेतीवर पडणार आहे."[१९] महाराष्ट्रात वृध्दांची संख्या ८५ लक्ष इतकी आहे. त्यात दरवर्षी २ लाख वृध्दांची भर पडत असते.[२०]

जगाच्या लोकसंख्येचा अभ्यास केला असता ''इ. स. १९५० मध्ये जगात वृध्दांची संख्या २ कोटी १४ लक्ष होती. इ. स. २०१५ मध्ये जगात वृध्दांची संख्या इतकी वाढेल की जगातील प्रत्येक सात व्यक्तीमागे एक वृध्द व्यक्ती (६५ वर्षे) असेल असा अंदाज लोकसंख्येचे अभ्यासक मांडत आहेत. २००६ सालच्या मानव विकास अहवालात एकूण १६६ देशांची पुढील प्रमाणे क्रमवारी लावण्यात आली आहे आणि मागची काही वर्ष ९ टक्के व त्यापेक्षा अधिक दराने आर्थिक प्रगती करणारा भारत हा या यादीत १२७ व्या क्रमांकावर आहे."[२१] या अहवालात विविध देशांची २०१५ सालची अपेक्षित स्थिती संख्याशास्त्रीय अभ्यास करून मांडली आहे. ''प्रगत पाश्चिमात्य राष्ट्रातील लोकसंख्या वाढीचे अति नियंत्रीत दर आणि वाढते आयुर्मान यामुळे २०१५ साली अशा बहुतेक देशात ६५ वर्षावरील वृध्दांची संख्या २० टक्के च्या आसपास असेल. जपानमध्ये अशा वृध्दांची संख्या २६.० टक्के वर जाण्याचा अदांज आहे. अशा वेळी भारतातील ६५ वर्षावरील वृध्दांची संख्या केवळ ६.२ टक्के असणार आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येत वृध्दांचे प्रमाण ७ टक्क्यापेक्षा जास्त असेल तर त्या देशातील लोकसंख्येला 'वृध्द' असे संबोधन करणे रास्त ठरेल असा अभिप्राय संयुक्त राष्ट्रसंघातील लोकसंख्येच्या तज्ञ अभ्यासकांनी व्यक्त केला आहे."[२२] वृध्दांच्या सामाजिक समस्येकडे सर्वाचे लक्ष केंद्रित करणे हा या मागील मुख्य उद्देश असू शकतो.

**वृध्दांची वाढती संख्या :–** ''२० व्या शतकाच्या अखेरीस शंभरपेक्षा जास्त वर्षे जगणाऱ्या अमेरिकनांची संख्या चौपट होईल. या वृध्दीमुळे राष्ट्राला नव्या समस्यांना तोंड द्यावे लागेल असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे. 'अमेरिकेतील शतायुषी' या अहवालात असे म्हटले आहे की, 'आयुर्मयादा वाढल्यामुळे आर्थिक आणि शारीरिकदृष्टया सक्षम असणाऱ्या लोकांच्या संख्येत सतत वाढ होईल त्याचप्रमाणे सतत आजारी असणाऱ्या आणि परावलंबी माणसांच्या संख्येतही वाढ होईल'. शंभर आणि त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या अमेरिकन लोकांची संख्या १९८६ मध्ये २५,००० होती, परंतु इ. स. २००० मध्ये ती सहज १,००,००० पेक्षा अधिक होईल."[२३]

''हाँगकाँगमधील १५ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांचे प्रमाण आणखी २० वर्षांनी तुलनेने १/३ पेक्षा कमी होईल, तर ६५ आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांचे प्रमाण ५० टक्यांनी वाढेल असे एका सरकारी अहवालावरून दिसून येते."[२४] "हाँगकाँगची लोकसंख्या जी १९८६ मध्ये ५५ लाख आहे ती १९९६ मध्ये ६१ लाख आणि २००१ मध्ये ६५ लाख होईल. ६५ आणि त्यापेक्षा जास्त वय असलेल्या लोकांचे प्रमाण जे आज १९८६ मध्ये ८ टक्के आहे ते २००६ मध्ये १२ टक्के एवढे होईल."[२५]

**८० वर्षावरील ज्येष्ठांचा प्रश्न :–** ''श्री मौनी सबरवाल यांनी लोकसंख्येच्या नव्या अभ्यासानुसार ज्येष्ठ नागरिकांचा प्रश्न विशेषत: ८० वर्षानंतरच्या वृध्दांचा प्रश्न किती महत्वाचा आहे, हे सांगितले. या गटाची वाढ दरवर्षी ७०० टक्के इतक्या मोठया प्रमाणावर होत असल्यामुळे हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला आहे आणि विशेषत: अशा वृध्दत्तर अवस्थेमध्ये त्यांची इंद्रियशक्ती जसे डोळे, कान, स्पर्श, चव, इत्यादी शक्ती विकल होऊ लागतात, त्याचप्रमाणे त्यांच्या मेंदूची शक्तीही विकल होऊ लागते आणि त्यामुळे या लोकसंख्येत डिमेन्शिया आणि त्याचाच एक प्रकार म्हणजे अल्झायमर याचा प्रादुर्भाव होत असतो. त्यामुळे या गटाकडे नव्या धोरणाने अधिक लक्ष देण्याची गरज आहे, असे ते म्हणतात."[२६]

**अतिवृध्दांचे प्रश्न :–** ''ऐंशी वर्षावरील ज्येष्ठांच्या पुढे असणारा सगळ्यात महत्वाचा प्रश्न म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनामधील कराव्या लागणाऱ्या गोष्टी त्यांना दुसऱ्याच्या मदतीशिवाय आणि स्वतंत्रपणाने कशा करता येतील? शरीराची अशक्तता, क्वचित येणारी अपंगता यामुळे ज्येष्ठांच्या हालचालीवर, अगदी घरातल्या घरात हिंडण्यावरसुध्दा बंधने येऊ लागतात, म्हणून ज्यांना आपण अतीवृध्द म्हणतो किंवा जे वयाच्या ऐंशी वर्षापुढे गेलेले आहेत, अशा ज्येष्ठांना आपल्या हालचालीवर मर्यादा आल्याने आपल्याकडे कुणी लक्ष देत नाही, असे वाटू लागते. इतकेच नव्हे तर त्यांच्यावर एक मानसिक दडपण येते. त्यांना वाटते की कुटुंबातील

माणसे आपल्याबरोबर वेळ घालवायला बहुधा तयार नसतात. या अतिवृध्दांना आपल्याला घरात पुरेशी जागा नाही, नि आपल्याला साह्य करण्यासाठी कोणीच उत्सुक दिसत नाहीत असे वाटत राहते. नवरा आणि बायको दोघांपैकी एकच जिवंत असेल तर त्यांना आवश्यक असणारा भावनात्मक पाठिंबा कोठेच मिळत नाही. कुटुंबातील कोणचेच आपल्याकडे लक्ष नसतेच, असे त्या मागे राहिलेल्या माणसाला सतत वाटत राहते. अतिवृध्दांच्या आरोग्याचाच विचार करायचा तर त्यांच्यासाठी पुढील प्रश्न महत्वाचे ठरतात. पहिला प्रश्न असा आहे की, बहुतेक अतिवृध्द ज्यांचे खाणे, जेवणे आरोग्याच्या दृष्टीने पुरेसे किंवा पोषक नसते. जरी ते घरात आपल्या कुटुंबासोबत राहत असले तरीही कुटुंबातील कोणाचेच त्यांच्या खाण्या–पिण्याकडे फारसे लक्ष नसते. जर ज्येष्ठांना पेन्शन किंवा सामाजिक सुरक्षेची मदत मिळत असेत तर पुष्कळदा हे पैसे काढून घेतले जातात आणि त्यामुळे त्यांना स्वत:च्या औषधपाण्यासाठी लागणारा खर्च कुटुंबाकडून दया म्हणून मागावा लागतो. यातूनच या ज्येष्ठ वृध्दांच्यावर दुसऱ्या कोणाच्यातरी दयेवर अवलंबून राहण्याचे दुर्दैव ओढवते.

एकविसावे शतक हे ज्येष्ठांचे शतक आणि ज्येष्ठ सेवेचे अद्गात शतक असे म्हटले जाते. पण याच शतकात ज्येष्ठांचा ज्येष्ठपणा जास्त वाढीला लागण्याचे अनुभव अनेक देशांना येत आहेत, याचा अर्थ असा की, वाढत्या वयाच्या वयोगटामध्ये लोकसंख्यावाढीचे प्रमाण वेगाने वाढतांना दिसते. आपण जर ८० पेक्षा अधिक वयाच्या लोकांचा गट घेतला तर असे दिसते, की ६० ते ७९ पेक्षा ८०+ वयोगटामध्ये वाढीच्या वेगाचे प्रमाण जास्त आहे. २०५५ सालापर्यंत ८०+ लोकसंख्या ही एकूण जगातील ज्येष्ठ लोकसंख्येच्या एकपंचमांश इतकी असेल आणि यापुढील दशकात हेच प्रमाण अतिशय वेगाने वाढत राहील.

संख्याशास्त्राच्या अनुमानाप्रमाणे जगात ३९४ दशलक्ष किंवा २० टक्के ज्येष्ठ नागरिक हे वयाच्या ऐंशी वर्षापुढे गेलेले असतील. आपण जर ६० ते ७९ वयाचा विचार केला तर त्यातील जनसंख्येला ज्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते, त्यापेक्षा ८०+ जनसंख्येला अधिक वेगळ्या आणि अधिक काळजी निर्माण करणाऱ्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते."[२७] "आज वार्धक्यासंबंधी नियोजन करणारे आणि त्याविषयीचे धोरण ठरवणारे ६० वर्षाच्या वरील सर्वच लोकांना वृध्द समजतात आणि त्यामुळे सर्वच वृध्दांचे प्रश्न सारखेच आहेत, असेही त्यांना वाटू लागते. खरे तर वस्तुस्थिती अशी आहे की, ६० ते ८० या गटाचे प्रश्न, ८०+ च्या लोकसंख्येच्या अगदी वेगळे आहेत. म्हणूनच अतिवृध्दांचे प्रश्न किंवा ८०+ या गटाचे प्रश्न यांचा विचार स्वतंत्रपणे करून त्यांच्यासाठी वेगळे धोरण आणि वेगळे नियोजन करणे खूप गरजेचे आहे. हे जर घडले नाही तर जगातील अतिवृध्दांना आयुष्य अनेक प्रकारे दु:खात आणि दु:स्थितीत घालवावे लागेल.

आरोग्यविषयक आकडेवारीचा विचार केला तर असे चित्र दिसते की, या अतिवृध्द जनसंख्येपैकी ८० टक्के लोकांना पुष्कळदा एका किंवा अनेक रोगांना बळी जायला लागते. यापैकी काही रोग हे दीर्घकालीन चालणारे असतात तर काही रोगामुळे रोग्यांच्या दैनंदिन आयुष्यावर अनेक बंधने येऊ शकतात. त्यांचे जेवणखाण त्यांच्या हालचाली, त्यांचे दैनंदिन कार्यक्रम या सर्वावर इतकी बंधने येतात की , त्यांना जीवन नकोसे वाटू लागते. त्याच्यापैकी २० टक्के लोकांना काणत्या ना कोणत्या प्रकारची शारीरिक अपंगता येते, त्यांच्यापैकी ३० टक्के लोकांना घरातच कोंडून राहावे लागते. २० टक्के लोक अंथरूणाला खिळून असतात आणि उरलेल्या लोकांपैकी बहुतेकांना कोणत्या ना कोणत्या प्रकारचे विकलमतित्व किंवा डिमेन्शिया झालेला असतो."[२८]

**निष्कर्ष** : प्रस्तुत अध्ययनामधून असे स्पष्ट होते की, घटता जन्मदर व मृत्यूदर यामुळे वृध्दांचे प्रमाण वाढत आहे. आज वृध्दांची संख्या १० टक्के आहे. आज आरोग्याच्या दृष्टीने आपन अनेक रोगावर मात केलेली आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आज मनुष्याचे आयुर्मान वाढलेले आढळते. यामुळे कुटुंबामध्ये सतत वाढ होऊन वृध्दांना वाइट वागणूकीला सामोरे जावे लागत आहे. त्यांचबरोबर वृध्दत्वातून वृध्दांच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. यातूनच ते एकलकोंडे जिवन जगतात किंवा घरदार सोडून त्यांना वृध्दाश्रमात राहावे लागत आहे. सध्या जगातील एकूण २० देशातील मनुष्याचे आयुर्मान हे ७२ वर्ष आहे. आजच काही प्रगत राष्ट्रांतील वृध्दांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या २० टक्क्यांपर्यंत वाढलेली आहे. भारतातील ज्येष्ठ नागरिकांची (६०+) लोकसंख्या २०२६ साली १७३ दशलक्षाच्या पुढे जाण्याचा संभव आहे. जगामध्ये चीन नंतर सर्वात जास्त वृध्दांची लोकसंख्या भारतामध्ये आहे. सरासरी आयुर्मान वाढल्यामुळे अतिवृध्द (८०+) ज्येष्ठांची संख्या खूप झपाट्याने वाढते आहे. ८०+ या वयोगटातील बहुतेक अतिवृध्द ग्रामीण भागात आहेत. वाढत्या वयाबरोबर त्यांच्या गरजांमध्ये खूप फरक होत आहेत. विशेषत: वैद्यकीय आणि आर्थिक गरजांचा वाढणारा बोजा त्यांना झेपत नाही.

भारतामध्ये ज्येष्ठ नागरिक परावलंबीत्वाचे प्रमाण सतत वाढतांना दिसते. आज भारतात सरासरी आर्युमान ७३ वर्षाचे आहे. केरळमध्ये वृध्दांची संख्या जास्त असल्याने तेथे वृध्द परावलंबित्वाचे प्रमाणअधिक आहे. महाराष्ट्रात वृध्दांची संख्या ८५ लक्ष इतकी आहे. त्यात दरवर्षी २ लाख वृध्दांची भर पडत असते.

वृध्दतर अवस्थेमध्ये त्यांची इंद्रियशक्ती जसे डोळे, कान, स्पर्श, चव, इत्यादी शक्ती विकल होऊ लागतात, त्याचप्रमाणे त्यांच्या मेंदूची शक्तीही विकल होऊ लागते आणि त्यामुळे या लोकसंख्येत डिम्नेन्शिया आणि त्याचाच एक प्रकार म्हणजे अल्झायमर याचा प्रादुर्भाव होत असतो.

६० ते ७९ पेक्षा ८०+ वयोगटामध्ये वाढीच्या वेगाचे प्रमाण जास्त आहे. अतिवृध्द जनसंख्येपैकी ८० टक्के लोकांना पुष्कळदा एका किंवा अनेक रोगांना बळी जायला लागते. त्याच्यापैकी २० टक्के लोकांना काणत्या ना कोणत्या प्रकारची शारीरिक अपंगता येते, त्यांच्यापैकी ३० टक्के लोकांना घरातच कोंडून राहावे लागते. २० टक्के लोक अंथरूणाला खिळून असतात आणि उरलेल्या लोकांपैकी बहुतेकांना कोणत्या ना कोणत्या प्रकारचे विकलमतित्व किंवा डिमेन्शिया झालेला असतो.

**संदर्भग्रंथ :**


१. गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशौली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन,पृ.४५.
२. खडसे भा. कि., (२००४), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ. क्र. १४६
३. लिमकर सुधाकर, (२००५), 'आरोग्य संवाद', औरंगाबाद, संवाद प्रकाशन, पृ. क्र. ६१
४. कित्ता पृ. क्र. ६१
५. सोनवणे प्रशांत,'वंचिततेचा नवा पौलू : वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या', समाजशास्त्र संशोधन पत्रिका, अंक ११ वा, डिसेंबर २०१०, पृ. क्र. ३२.
६. गोखले शरच्चंद्र, (२०१२), समाधानी वार्धक्य, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ८७
७. गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशौली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ.४५
८. कित्ता पृ. क्र. ४६
९. कित्ता पृ. क्र. ४६
१०. कित्ता पृ. क्र. ४५
११. जाधव तुकाराम (सपा.), (डिसें. २०१३), युनिक बुलेटिन (मासिक), पुणे, द युनिक ॲकॅडमी, पा. न. ३४.
१२. कित्ता पृ. क्र. ३४.
१३. गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशौली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ.७२
१४. कित्ता पृ. क्र. ७३
१५. गोखले शरच्चंद्र, (२०१२), समाधानी वार्धक्य, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. १०५
१६. वाघमारे बी. एस., (२०१३), 'मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार', नवी दिल्ली, प्रीझन, पृ.क्र. ३०८.
१७. नागपूरकर पद्माकर, मुत्तगी पी. के., (२००९), 'वृध्दत्व–देशोदेशी', मुंबई, ग्रंथाली–ज्ञानयज्ञ प्रकाशन, पृ. क्र..६५
१८. कित्ता पृ. क्र. ६६
१९. कित्ता पृ. क्र. ७१
२०. हडप गोविंद नी., जोशी अरविंद द., (२००७), 'वृध्दांच्या सामाजिक समस्या आणि ज्येष्ठांचे समुपदेशन', नागपूर, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, पृ. क्र..०३
२१. कित्ता पृ. क्र..०३
२२. कित्ता पृ. क्र. ०४
२३. लिमये विनायक राजाराम, (१९८९), 'जगायचे की मरायचे ? माणसाला हक्क हवा निवड करण्याचा', पुणे, उन्मेष प्रकाशन, पृ. क्र. ३४८
२४. कित्ता पृ. क्र. ३५४
२५. कित्ता पृ. क्र. ३५५
२६. गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशौली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. १११
२७. कित्ता पृ. क्र.१४२
२८. कित्ता पृ. क्र.१४३

# भारतात समाजशास्त्राचा विकास

**प्रा. डॉ. रामेश्वर एम. मोरे,** समाजशास्त्र विभाग, संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप जि.सोलापूर मो.९८५०८२८१०४

**प्रस्तावना :—** समाजशास्त्र हे अलिकडील काळात उदयाला आलेले एक आधुनिक सामाजिक शास्त्र आहे. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास या शास्त्रासारखा समाजशास्त्राला फार मोठा इतिहास नाही. केवळ पावणे दोनशे वर्षाचा इतिहास समाजशास्त्राला आहे. तरीदेखील एक विकसीत व लोकप्रिय शास्त्र म्हणून या शास्त्राचा उल्लेख केला जात आहे. समाजशास्त्र हे शास्त्र अलिकडील काळात उदयाला आलेले असले तरी समाजाचे अध्ययन प्राचीन काळापासूनच झालेले दिसून येते. परंतु या अध्ययनात शास्त्रीय दृष्टीकोन नव्हता. त्यामुळे त्या अध्ययनाचा समावेश समाजशास्त्रीय विचारात केला जात नाही. म्हणून खऱ्या अर्थाने शास्त्रीय दृष्टीकोनातून समाजशास्त्राचा उदय १९ व्या शतकात झाला. १७ व्या व १८ व्या शतकात युरोपमध्ये बौध्दीक, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन घडून आले. या काळात लोकांवरील धर्माचा प्रभाव कमी झाला. लोक प्रत्येक घटनेकडे वैज्ञानिक दृष्टीकोणातून पाहू लागले. त्याचबरोबर फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगीक क्रांती, नागरीकरण, भांडवलशाहीचा साम्राज्यवादाचा उदय यामुळे समाज जीवनात प्रचंड बदल झाले. या बदलत्या समाज जीवनाचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास करण्यासाठी एक स्वतंत्र शास्त्र असावे असे विचारवंताना वाटू लागले. त्यातुनच १९ व्या शतकात 'समाजशास्त्र' या शास्त्राचा उदय झाला.

फ्रेंच तज्ञ ऑगस्ट कॉम्ट यांनी समाजाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करणाऱ्या शास्त्रास सुरूवातीस 'सामाजिक भौतिकशास्त्र' 'Social Physics' हे नाव दिले. परंतु त्याच काळात ॲडॉल्फ क्विटलेट या बेल्जीयम तज्ञाने त्याच्या एका निबंधाला 'An Essay on Social Physics' हे शिर्षक दिले होते. त्यामुळे कॉम्टनी एका नावाची दोन शास्त्र होतात म्हणून १८३८ मध्ये 'पॉझीटीव्ह फिलॉसॉफी' 'Positive Philosophy' या ग्रंथाच्या चौथ्या खंडात 'सामाजिक भौतिकशास्त्र' 'Social Physics' ऐवजी समाजशास्त्र 'Sociology' असे नाव दिले. तेव्हा 'समाजशास्त्र' या नवीन ज्ञानशाखेचा उदय झाला. ऑगस्ट कॉम्टनी 'समाजशास्त्र' ही संज्ञा सर्वप्रथम वापरली तसेच समाजशास्त्राला महत्वपूर्ण योगदान दिले म्हणून त्यांना 'समाजशास्त्राचे जनक' असे म्हणतात.

समाजशास्त्राचा एक विषय म्हणून अभ्यास सर्वप्रथम अमेरिकेतील येल विद्यापीठात १८७६ पासून सुरू झाला. त्यानंतर फ्रान्समध्ये १८८९ तर इंग्लंडमध्ये १९०७ पासून समाजशास्त्र विषय शिकविण्यास सुरूवात झाली. त्यानंतर १९१४ मध्ये भारत, १९२० मध्ये पोलंड, १९४७ मध्ये स्वीडन आणि श्रीलंकेत हा विषय शिकवण्यास सुरूवात झाली. आज जगातील अनेक देशामध्ये समाजशास्त्राचे अध्ययन व अध्यापन केले जाते. त्यामुळे या शास्त्राचा विकास फार जलद गतीने होत आहे. वर्तमानस्थितीत या शास्त्राच्या अनेक शाखा निर्माण झालेल्या आहेत. त्या शाखातुन विविध बाबींचे सखोल अध्ययन केले जात आहे. समाजशास्त्राला केवळ पावणे दोनशे वर्षांचा इतिहास असला तरी हे एक विकसीत शास्त्र म्हणून नावारूपाला येत आहे. आधुनिक समाज हा अधिक गुंतागुंतीचा होत चालल्यामुळे समाजशास्त्राच्या अभ्यासाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

**उद्देश :—** १) भारतातील समाजशास्त्राच्या विकासात भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान अभ्यासणे. २) भारतातील समाजशास्त्राचा विकास जाणून घेणे.

**संशोधन पध्दती :—** प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम तथ्यांवर आधारीत असून यासाठी प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथाचा आधार घेतला आहे व त्याद्वारे भारतातील समाजशास्त्राचा विकास स्पष्ट केला आहे.

**भारतात समाजशास्त्राचा विकास :—** भारतात प्राचीन काळापासूनच समाजाचा अभ्यास झालेला दिसून येतो. पण भारतात समाजशास्त्राची औपचारिक एक विषय म्हणून शिकवण्यास सुरूवात १९१४ मध्ये मुंबई विद्यापीठात झाली. परंतु स्वतंत्र समाजशास्त्र विभागाची स्थापना १९१९ मध्ये प्रो. पेट्रीक गेड्डीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. १९२४ पासुन डॉ. जी. एस. घुर्ये यांची विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर १९२१ मध्ये लखनौ विद्यापीठात डॉ. राधाकमल मुखर्जीच्या अध्यक्षतेखाली समाजशास्त्र विभाग सुरू झाला. १९२१ मध्येच काशी विद्यापीठ तर १९२३ मध्ये म्हैसूर विद्यापीठ आणि आंध्र विद्यापीठात समाजशास्त्र विषयाच्या अध्यापनास सुरूवात झाली. त्यानंतर स्वातंत्र्यापूर्वी भारतात या विषयाचा विस्तार वाढलेला नाही.

स्वातंत्र्यानंतर मात्र भारतात समाजशास्त्राचा विकास फार जलद गतीने झाला. भारतातील आग्रा, मेरठ, कानपूर, गोरखपूर, गढवाल, अलीगढ, अवध, रूहेलखंड, बुंदेलखंड, विक्रम, शिवाजी, रविशंकर अवधेश प्रतापसिंह, रायपूर, इंदौर, सागर, जबलपूर, भोपाळ, राजस्थान, उदयपूर, जोधपूर, मुजफ्फरपूर, रांची, पाटना, दिल्ली, गुजरात, उस्मानिया, बडौदा, कर्नाटक, पंजाब, मद्रास, कुरूक्षेत्र, उत्कल, पुणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर, शिवाजी कोल्हापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर औरंगाबाद, संत गाडगेबाबा अमरावती, स्वामी रामानंद तीर्थ नांदेड, उत्तर महाराष्ट्र जळगाव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली इत्यादी अनेक विद्यापीठात समाजशास्त्र विषयाचे अध्ययन—अध्यापन केले जात आहे. तसेच टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई, टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस आग्रा, जे.के. इन्स्टिटयुट ऑफ सोशियोलॉजी ॲन्ड सोशल वर्क्स लखनौ इत्यादी अनेक संस्थातही अध्ययन व संशोधनाला चालना दिली जात आहे.

भारतात समाजशास्त्राच्या विकासात अनेक तज्ञांनी योगदान दिलेले आहे.

**डॉ. जी. एस. घुर्ये —** डॉ. घुर्ये यांनी भारतातील जातीव्यवस्थेचा सखोल अभ्यास केला. त्यांनी जातीची व्याख्या केली नाही परंतु

जातीची प्रमुख सहा वैशिष्टये सांगितली. ती म्हणजे (१) समाजाचे खंडात्मक विभाजन (२) श्रेष्ठ–कनिष्ठता (३) सामाजिक व धार्मिक अयोग्यता आणि विशेषाधिकार (४) खानपान विषयक व सामाजिक संबंधावरील निर्बंध (५) व्यवसायविषयक निर्बंध (६) विवाहविषयक निर्बंध इत्यादी होय.

डॉ. घुर्येनी आदिवासी समाजाचाही अभ्यास केला. आदिवासी लोक हे स्वत:ला हिंदू समजतात. म्हणून डॉ. घुर्येनी आदिवासींना 'मागासलेले हिंदू' (Backward Hindu) अशी संज्ञा दिली आहे. त्याचबरोबर घुर्येनी ग्रामीण समाजाचा, समाजातील सामाजिक ताण. तणावांचा अभ्यास केलेला आहे. डॉ. घुर्येनी Caste and Race in India-1932, Sex Habits of Middle Class People-1938, The Aborigines-'So Called' and Their future 1943, Culture and society-1945, Caste, class and occupation-1961, Family and Kin in Indo-European Culture-1962, Cities and Civilization-1962, The Scheduled Tribes-1963, Anatomy of A Ruruban Community-1963, The Indian Sadhus-1964, Social Tensions in India-1968 इत्यादी अनेक ग्रंथाचे लेखन केले आहे. भारतातील समाजशास्त्राच्या विकासात त्यांच्या या अमूल्य योगदानामुळे त्यांना 'भारतातील समाजशास्त्राचे जनक' म्हणून संबोधले जाते.

**डॉ. राधाकमल मुकर्जी –** डॉ. मुकर्जी यांनी सामाजिक मूल्य आणि सामाजिक परिस्थीती संबंधी महत्वपूर्ण विचार मांडले आहेत. मानवी समाजावर नैतिक मूल्याचा प्रभाव कसा पडतो याचे त्यांनी सखोल अध्ययन केले. डॉ. मुकर्जीच्या मते मूल्य धर्मापर्यंत मर्यादित राहत नाही तर वेगवेगळया क्षेत्रात वेगवेगळी मूल्य असतात. डॉ. मुकर्जी यांनी The Social Structure of Values-1949, The Dynamics of Morals-1951, The Dimensions of Human values-1964, The Sickness of Vivilization-1964 इत्यादी अनेक ग्रंथातुन समाजशास्त्राच्या विकासात मोलाची भर टाकली आहे.

**डॉ. एम.एन. श्रीनिवास –** डॉ. श्रीनिवास यांनी भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास केला. त्यांनी भारतातील सामाजिक परिवर्तन स्पष्ट करताना 'संस्कृतीकरण' आणि 'पाश्चिमात्यीकरण' या महत्वपूर्ण संकल्पना मांडल्या. तसेच त्यांनी जातीच्या अध्ययनातून 'प्रभावी जात' ही संकल्पना देखील मांडली आहे. डॉ. श्रीनिवासांनी Religion and Society Among the Coorgs of South India-1952, India's Village-1955, Social Change in Modern India-1966, The Remembered Village-1976, The Dominant Caste and Other Essays-1986 इत्यादी अनेक ग्रंथातून समाजशस्त्राला महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

**डॉ. एस.सी. दुबे –** डॉ. दुबे यांनी मध्यप्रदेशातील स्थलांतरीत शेती करणाऱ्या कमार जमातीचा अभ्यास करुन समाजशास्त्रात प्रवेश केला. डॉ. दुबेनी ग्रामीण जीवन, सामुदायीक विकास, आधुनिकीकीरण, परिवर्तन इत्यादी प्रमुख विषयावर लेखन केलेले आहे. डॉ. दुबे यांचा शमीरपेठ गावाचा केलेला अभ्यास खुप गाजला. त्यांनी या अभ्यासाव्दारे भारतीय गावातील ऐतिहासीक, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक इत्यादी विविध रुपाचे व त्यातील बदलाचे स्परुप स्पष्ट केले आहे. डॉ. दुबेंनी प्रभावी जातीसंबंधी श्रीनिवासांच्या विचाराला विरोध केला. डॉ. दुबेंनी राजकीय शक्ती संपूर्ण जातीमध्ये नसते तर जातीतील काही व्यक्तीत असते असे सांगितले. त्याचबरोबर डॉ. दुबेंनी The Kamar – 1954, Indian Village – 1955, India`s Changing Village – 1958, Contempoary India and its Modernization 1973, Indian Society – 1992 इत्यादी ग्रंथसंपदेच्या माध्यमातून समाजशास्त्राला महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

**डॉ. इरावती कर्वे –** डॉ. इरावती कर्वे यांनी संस्कृती, संयुक्त कुटुंब, जात, नातेदारी इत्यादी घटकांचे सखोल अध्ययन केले आहे. त्यांच्या मते मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरुप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय. तसेच त्यांनी जात म्हणजे अंतर्विवाही गट होय असे सांगितले. त्यावबरोबर एकाच घरात राहणाऱ्या, एकाच स्वयंपाकघरात शिजवलेले अन्न खाणाऱ्या, संपत्ती बाबतीत समान मालकी असणाऱ्या व धार्मिक कार्यात सामुहिकपणे सहभागी होणाऱ्या रक्तसंबंधीयाचा समुह म्हणजे संयुक्त कुटुंब होय असे प्रतिपादित केले. डॉ. कर्वे यांनी मराठी लोकांची संस्कृती – १९५१, Kinship Organization In India – 1953, Hindu Society – 1961 इत्यादी ग्रंथातुनही समाजशस्त्राला विकसित करण्यात योगदान दिले.

**डॉ. ए.आर. देसाई –** डॉ. ए.आर. देसाई यांनी भारतीय समाजाचे अध्ययन मार्क्सवादी दृष्टिकोनातून केले आहे. देसाई यांनी भारतातील राष्ट्रवादाच्या विकासात सामाजिक व धार्मिक चळवळीचे मुल्यमापन केले आहे. तसेच देसाई यांनी भारतीय राज्य, कृषक समाजव्यवस्था, लोकशाहीत अधिकार, नागरीकरण, कृषक आंदोलन इत्यादी विषयावर महात्वपूर्ण लेखन केले आहे. त्यांनी Social Background of Indian Nationalism – 1979 इत्यादी अनेक ग्रंथाचे लिखान करुन समाजशास्त्राला समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे.

**डॉ.डी.पी.मुकर्जी –** डॉ. मुकर्जी यांनी भारतीय इतिहासाचे व्दंव्दात्मक प्रक्रियेव्दारे विश्लेषण केले. डॉ. मुकर्जी मार्क्सवादी होते. त्यांच्या अध्ययनाचा केंद्रबिंदू परंपराचे अध्ययन हा होता. त्यांनी परंपरेचे प्रकार, स्तर व परिवर्तनाचे समर्पक विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, भारतीय समाजाच्या अध्ययनाची परंपरा अध्ययन करणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी आधुनिकीकरणाचे अध्ययन केले आहे. मुकर्जी यांनी परंपरा व आधुनिकतेला परस्परपूरक मानले आहे. डॉ. मुकर्जी यांनी Basic Concepts in Sociology – 1932, Modern Indian Culture – 1942, Problems Of Indian Youth – 1946, Diversities – 1958 या ग्रंथाव्दारे ही समाजशास्त्राला महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

**डॉ. के. एम. कपाडीया –** डॉ. कपाडीया यांनी हिंदू विवाह, कुटुंब व नातेदारीच्या संदर्भात अध्ययन केले आहे. त्यांनी Marriage and Family in Indian – 1955 `E Hindu Kiship – 1947 हे दोन महत्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. डॉ. कपाडीया यांनी हिंदु विवाहाला संस्कार रुपात मानले. तसेच त्यांनी दक्षिण गुजरातच्या

खेड्यामधील विकासाची प्रक्रिया व जातीमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचे अध्ययन करुन समाजशास्त्राच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिले.

वरील तज्ञांसोबतच भारतात समाजशास्त्राचा विकास करण्यात डॉ. एस. व्ही. केतकर, डॉ. बी. आर. आंबेडकर, डॉ. एम. एस. गोरे, डॉ. टी. के. एन. उन्नीयन, डॉ. योगेंद्र सिंग, प्रो. आय. पी. देसाई, प्रो. रामनारायण सक्सेना, डॉ. वाय. बी. दामले, प्रो. योगेश अटल, प्रो.योगेंद्रसिंह, प्रो. एस. पी. नागेंद्र, प्रो. इंद्रदेव, प्रो. सुरजित सिन्हा, डॉ. पंढरीनाथ प्रभू, डॉ. विलास संगवे, डॉ. पु. ल. भांडारकर, डॉ. सत्येंद्र त्रिपाठी, डॉ. रजनी कोठारी, डॉ. डी. एन. धनागरे, डॉ. उत्तम भोईटे इत्यादी अनेक तज्ञांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यामुळेच आज भारतात समाजशास्त्र एक विकसित व लोकप्रिय शास्त्र म्हणून ओळखले जात आहे. या शास्त्राच्या अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत. त्यातील काही प्रमुख शाखा (१) ग्रामीण समाजशास्त्र (२) नागरी समाजशास्त्र (३) आदिवासी समाजशास्त्र (४) औद्यौगिक समाजशास्त्र (५) वैद्यकीय समाजशास्त्र (६) राजकीय समाजशास्त्र (७) धर्माचे समाजशास्त्र (८) शिक्षणाचे समाजशास्त्र (९) कुटुंबाचे समाजशास्त्र (१०) मूल्यांचे समाजशास्त्र (११) विकासाचे समाजशास्त्र (१२) लोकसंख्येचे समाजशास्त्र (१३) ज्ञानाचे समाजशास्त्र (१४) लघु समुहांचे समाजशास्त्र (१५) कायद्याचे समाजशास्त्र (१६) दुर्बल घटकांचे समाजशास्त्र (१७) कलेचे समाजशास्त्र (१८) पर्यावरणाचे समाजशास्त्र (१९) गुन्हेगारीशास्त्र (२०) सामाजिक चळवळींचे समाजशास्त्र इत्यादी होय. या शाखाव्यतिरिक्त अनेक उपशाखातुनही विविध बाबींचे सखोल अध्ययन केले जात आहे. तसेच समाजशास्त्राच्या अध्ययन सदर्भातील अनेक नवे दृष्टीकोन विकसित झाले आहेत.

**निष्कर्ष** :– आज भारतात समाजशास्त्राच्या अध्ययन – अध्ययनाची शतकपूर्ती झालेली आहे. या शंभर वर्षाच्या कालखंडात भारतात समाजशास्त्र एक विकसित व लोकप्रिय शास्त्र म्हणून नावारूपाला आलेले आहे. भारतात समाजशास्त्राला विकसित करण्यात डॉ.जी.एस. घुर्ये पासून ते नव संशोधकापर्यंत सर्वांनी मूलभूत स्वरूपाचे योगदान दिले आहे. त्यामुळे भारतात आज समाजशास्त्राच्या विविध शाखादेखील समृध्द झालेल्या आहेत. समाजशास्त्रात अध्ययनाचे अनेक नवे दृष्टीकोन विकसित झालेले आहेत. समाजशास्त्रीय संशोधनात देखील अनेक नव–नवीन तंत्रे पध्दती विकसित झाल्या आहेत. ज्यांच्या आधार घेऊन भारतीय समाजाचे सखोल व सुक्ष्म अध्ययन केले जात आहे. एकंदरित भारतात समाजशास्त्र विकासाच्या सर्वोच्च अवस्थेत आहे.

***संदर्भ ग्रंथ सूची:***


१. *Abraham M. Francis (1988), Modern Sociological theory An Introduction, Oxford University Press.*
२. *Bottmore, T. B. (1972), Sociology – A guide to Problem and literature, George Allon and Unwin Mumbai.*
३. *Broom and Selznick (1957), Sociology, Raw, Peterson and Company, Newyork.*
४. *Johnson Harry M. (1970), Sociology: A systematic introduction, Allied publishers, New Delhi.*
५. *Maciver R. M. and Page C. H. (1967), Society : An introductory analysis, Macmillan, London.*
६. *डॉ. आगलावे प्रदिप (२०११), समाजशास्त्रीय संकल्पना आणि सिध्दांत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
७. *डॉ. खडसे भा.कि. (२००९), समाजशास्त्र मूलभूत संकल्पना, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर*
८. *प्रा. डोईफोडे ज्योती (२००९), समाजशास्त्राची रूपरेषा, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.*
९. *डॉ. नाडगोंडे गुरूनाथ (२००१), समाजशास्त्राची मूलतत्वे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.*
१०. *डॉ. रावत हरिकृष्ण (२००३), समाजशास्त्रीय चिन्तक एवं सिध्दान्तकार, रावत पब्लिकेशन्स, जयपूर एवं नई दिल्ली.*

# ई – सिगारेट सामाजिक समस्या

**प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा जि. गडचिरोली

**प्रस्तावना :–** भारत हा तरुणांचा देश म्हणून जगात ओळखला जातो. मात्र हे तरुण कुठल्याही गुटखा, खर्रा, हुक्का, ई–सिगारेट यांच्या आहारी जात असल्याचे चित्र आज समाजासमोर दिसत आहे. या वाईट व्यसनांपासुन तरुणांनी वेळीच सावध असायला हवे अन्यथा भारत हा तरुणांचा देश व्यसनी तरुणांचा देश म्हणुन ओळखल्या जाईल. ज्या तरुणांच्या भरोशावर महासत्ता बनण्याचे स्वप्न आपण बघतो ते तरुण जर व्यसनांच्या आहारी गेले, तर महासत्ता कशी बनेल? समाज कुठे जाईल? याचा विचार होण्याकरीता प्रस्तुत संशोधन पेपरची निवड संशोधकाने केलेली आहे. द्रव्यरुपातील निकोटीनची विद्युत उपकरणाच्या माध्यमातून वाफ बनविली जाते आणि याचा धुम्रपानासाठी वापर केला जातो याला ई–धुम्रपान असे म्हटले जाते.

तंबाखुमध्ये आढळणाऱ्या निकोटीनचे सेवन इलेक्ट्रॉनिक उपकरणाद्वारे करण्याची पद्धत भारतात खासकरुन तरुण आणि उच्चवर्गीयांत रुजताना दिसुन येत आहे. बाजारात ई–सिगरेट, पेन–हुक्का हया नावाने 'इलेक्ट्रानिक निकोटीन डिलिव्हरी सिस्टम' उपलब्ध आहेत. पेनाच्या स्वरुपात दिसणाऱ्या हया उपकरणात सुरुवातीला निकोटीन हे द्रव्य स्वरुपात असते. त्यांचे रिफिलिंग करता येते. ह्या उपकरणाला बॅटरी असते त्यामुळे बॅटरीद्वारे उष्णता मिळाल्यावर निकोटीनचे वाफेत परिवर्तन होते. ई–सिगरेट, पेन–हुक्काद्वारे वाफ स्वरुपात निकोटीनचे होणारे सेवन हे इतर तंबाखुजन्य पदार्थाच्या सेवनाइतके हानिकारक आहे. त्यामध्ये ई–सिगारेट, फ्लेव्हर हुक्का, ई–शिशा इ. निकोटीनयुक्त उपकरणांचा समावेश आहे.

**ईएनडीएस :–** 'ईलेक्ट्रानिक निकोटीन डिलिव्हरी सिस्टीम' अंतर्गत (ईएनडीएस) असलेल्या ई–सिगारेट, ई–हुक्का सारख्या धुम्रपानाच्या साधनांचा युवकांकडून मोठया प्रमाणात वापर केला आहे. ई–सिगारेट, ई–सिंग, ई–व्हेप्स, ई–हुक्काज, व्हेप, पेन्स अशा अनेक साधनांचा ईएनडीएस मध्ये समावेश होतो. अमेरीकेमध्ये ई–सिगारेट ओढण्याचे प्रमाण प्रचंड वाढले असून ही सवय शालेय विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड वाढल्याचे दिसून आले. अमेरिकेत शालेय विद्यार्थ्याच्या ई–सिगारेट ओढण्याच्या प्रमाणात ७७.८ टक्के वाढ झाली आहे.

**ई– सिगारेट पुढील स्वरुपाची असते :–** १. ई–सिगरेटमध्ये तंबाखूचा वापर केला जात नाही. त्यातून राख तयार होत नाही आणि दातांवर डाग पडत नाही. २. ई–सिगरेटच्या टोकाला एल.ई.डी. लाईट असतो. सिगरेट ओढतांना खुल्या सिगरेटप्रमाणे प्रकाशमान होते. ३. ई–सिगरेटमध्ये बॅटरीचा समावेश असतो. ४. खऱ्या सिगारेट सारखा धूर येत असल्याने सिगारेटचं व्यसन सोडण्यासाठी प्रयत्नशिल लोकांना ई–सिगारेटचा पर्याय दिला जातो. ५. ई. सिगरेटचा आकार व बाह्य स्वरुप अत्यंत आकर्षक असते. ६. खऱ्या सिगरेटसारखा आकार केला जातो.

ई–सिगरेट, पेन–हुक्क्यामध्ये निकोटीनचे प्रमाण हे सामान्य धुम्रपाणापेक्षा १४.८ ते ८७.२ इतके अधिक असते. २० सिगरेटमध्ये जेवढे निकोटीन आढळते तेवढे एका ई–सिगरेट, पेन–हुक्कयाच्या रिफिलमध्ये असते. ई–सिगरेट, पेन–हुक्क्यामध्ये विविध प्रकारचे विषारी कण असतात तसेच वापरादरम्यान निकोटीनचे विसंगत प्रमाणात वितरण होत असते त्यामुळे फुफ्फुसांच्या विकाराचे प्रमाण वाढत आहे. डायएसीटाइल आणि एसीटाइल प्रोपिलीन ही रसायने स्वादयुक्त ई–सिगरेट मध्ये मोठया प्रमाणात आढळतात. या ई–सिगारेट मध्ये– १.**ग्लॉयकोमिस्ट :–** ई–सिगरेट, पेन–हुक्क्यामध्ये धुके निर्माण करण्यासाठी वापरले जाते. २. **निकोटीन :–** कीटक मारण्यासाठी वापरले जाते. ३. **एसीटाइल:–** ई – सिगरेट, पेन, हुक्क्यामध्ये गोड स्वाद निर्माण करणारे रसायन ज्यामुळे फुफ्फुसांमध्ये वेगवेगळया आजारांची संख्या वाढते. ४. निकेल, टिन आणि लेड सारखे जड धातु. ५. विविध कर्ककारक रसायने. ६. **अक्रोलीन– :** एक जंतुनाषक प्रामुख्याने षेतातील तण नश्ट करण्यासाठी वापरले जाते. ७. एसीटाइल प्रापिलीन, इत्यादी रासायनिक घटक ई – सिगारेट मध्ये असतात.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार धुम्रपान करणाऱ्यांची संख्या वाढते आहे. ई–सिगरेट ओढणाऱ्यांची संख्या २०११ मध्ये ७० लाख होती तर २०१८ मध्ये हे प्रमाण वाढून ४.१ कोटी झालं आहे. २०२२ पर्यंत ही संख्या साडपाच कोटी (५.५० कोटी ) होईल अषी चिन्ह आहेत. भारतात ई–सिगरेट व धुम्रपान करणाऱ्यांची संख्या साधारणत: एक लाख नव्वद हजार इतकी आहे आणि पारंपारीक धूरकांडयातून धूर काढणाऱ्या /तंबाखू खाणाऱ्यांची संख्या २६ कोटी ७० लाख इतकी आहे.

बहुतांश युवक केवळ दिखाऊपणा करण्यासाठी आणि इतरांवर छाप पाडण्यासाठी ई–सिगारेटचा वापर करतात. यातील अनेकांना तर ई–सिगारेटच्या दुष्परिणामांची माहितीही नाही. सलाम बॉम्बेच्या उपाध्यक्षा शेरींग भूतीया यांच्या मते सुरुवातीला तरुण केवळ शायनिंगसाठी ई–सिगारेट हातात घेतात, मात्र ती आपला कब्जा कधी घेते हे त्यांना कळत नाही. एकदा का ते या व्यसनात सापडले की नकळत सामान्य सिगरेटकडे वळतात. दिल्लीच्या मयुर विहार मधिल एका खाजगी शाळेने एक सर्वेक्षण केले. दहावी आणि त्यावरील वर्गात घालण्यात आलेल्या आकस्मिक धाडीत एका दिवशी ई–सिगारेटची किमान दिडशे उपकरणे वर्गावर्गातून आढळलीत. गुडगावच्या एका शाळेतून निलंबित करण्यात आलेल्या ईशान नावाच्या दहाव्या वर्गातला विद्यार्थी त्याच्यावर सुरु असलेल्या उपचारादरम्यान सांगतो की, तो गेल्या काही वर्षापासून तो ई–सिगरेट ओढतोय. तोच नव्हे त्याच्यासारखी कितीतरी मुले त्याला ठाऊक आहेत जी धुम्रपान करतात. तंबाखूच्या दुष्परीणामांची लांबलचक यादी पुढे करुन सिगारेटचा पर्याय उभा करणाऱ्यांनी तरुणाईचे अस्तित्व धोक्यात आणले आहे. धुम्रपानाची सवय सोडण्याच्या या नव्या प्रयोगातून कित्येक लोक नव्याने व्यसनाला बळी पडत आहेत. अमेरीकेत तारुण्याच्या उंबरठयावर असलेले विद्यार्थी मोठया प्रमाणात आजारी पडत असल्याचे त्यांना श्वसनसंस्थेशी संबंधीत रोगाने घेरले असल्याने ध्यानात येताच तिथल्या सरकारने औद्योगिक पिछेहाटीचे आपल्या व्यवसायाची चिंता न करता सरसकट ई–सिगरेट व धुम्रपानाच्या अन्य उपरकरणावर बंदी जाहिर केली. आपल्या देशात या ई–सिगरेटवर बंदी घालण्याचा निर्णय घेवून दि. १८ सप्टेंबर २०१९ ला अध्यादेश निघाला.

जगभरात तंबाखू सेवनावरील Globle Adult Tobacco Survey या सर्वेक्षणानुसार २०१६–१७ मध्ये फक्त ०.०२ टक्के भारतीय ई–सिगारेट्स वापरायचे, भारतात १५० ते २००० रुपयापर्यंतच्या सिगारेट्स उपलब्ध आहेत असे ईकॉनॉमिक टॉईम्स ने म्हटले आहे.

धुम्रपानाची समस्या सोडविण्यात ई–सिगरेट अयशस्वी ठरली असून शाळकरी मुलांमध्ये याचं फॅड वाढलं आहे असे अर्थमंत्री

निर्मला सितारामन यांनी सांगीतलं म्हणूनच ई–सिगरेटच उत्पादन, आयात–निर्यात, वाहतूक, विक्री साठवणूक आणि जाहिरात या सगळयांवर बंदी घालण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तरुणांना ई–सिगरेट कुल वाटते, त्याची किट आकर्षक आहे. हे युवावर्गाला आकर्षित करतं. ई–सिगरेटच्या वापराने अमेरिका तसेच अन्य काही देशात मृत्यूही आढळले आहेत. ई–सिगरेटमध्ये निकोटीन असते. त्याचा गंभीर परिणाम होतो. हे व्यसन टाळणं कठीण आहे असं सितारामन यांनी सांगितलं.

ई–सिगरेटचे उत्पादन, निर्मिती, आयात–निर्यात, वाहतूक, विक्री, ऑनलाईन विक्री विवरण आणि जाहिरात हे सर्व दखलपात्र गुन्हा ठरणार आहेत. हा गुन्हा पहिल्यांदा केल्यास एक वर्षापर्यंत तुरुंगवास किंवा एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतील. पुन्हा हा गुन्हा केल्यास तीन वर्ष तुरुंगवास किंवा ५ लाख रु. दंडाची शिक्षा होवू शकते. साठवणुकीसाठी देखील सहा महिने तुरुंगवास किंवा ५० हजार रु. दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतात.

ई सिगरेटवर बंदी घालण्यासाठी देशाच्या २४ राज्यातील सुमारे १०६१ डॉक्टरांनी पुढाकार घेवून मार्च महिण्यात पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहिले होते. विविध आरोग्य सेवांशी निगडीत असलेल्या देशभरातील ३० संस्थांनी एकत्रीत येवून ई–सिगरेटच्या विरोधात लढा पुकारला होता. या संघटनांनी केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाशी देखील संपर्क केला होता.

कॅन्सर हृदयविकार, रक्त वाहिण्यांचे आजार, फुफ्फुसाचे आजार, दमा, अस्थमा, किडणी खराब होणे, अॅसीडीटी, आतडयांचे आजार इत्यादी आजार ई–सिगरेटमुळे होवू शकतात. ४०० ई–सिगरेटचे ब्रॅन्ड्स, १५० फ्लेव्हर, १० कोटी धुम्रपानाचे व्यसन असणारे भारतीय व लाखो दरवर्षी तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे मृत्यू होतात.

ई–सिगरेट वरील बंदीच्या निर्णयामुळे लोकांना विशेषत: युवक आणि मुलांना ई–सिगरेटच्या व्यसनापासून दूर ठेवण्यास मदत मिळेल असा सरकारचा नारा आहे. हा ई–सिगारेट व तंबाखूजन्य बंदीचा अध्यादेश लागू झाल्यामुळे सरकारच्या तंबाखूनियंत्रणाच्या प्रयत्नांना बळ मिळेल आणि तंबाखूचा वापर कमी करण्यास मदत होईल. तसेच आर्थिक भार आणि आजारात घट होईल, असे सरकारच्या वतीने सागण्यात आले आहे. वास्तविक ई–सिगारेटीवर बंदी घालण्याबाबत विचार करण्याची सूचना सर्व राज्यांना २०१८ मध्येच करण्यात आली होती.

**ई–सिगारेटचे दुष्परिणाम :–** मळमळणे, पोटात दुखणे, डोळयाला जळजळ होणे असे धोके असतात. तरी अतिप्रमाणात घेतल्यानंतर रक्तदाब वाढणे, हृदयाचे ठोके वाढणे, काही जणांना आकडी येण्यासारखेही त्रास होण्याची शक्यता असते. ई–सिगारेट आणि सिगारेटचे प्रत्यक्ष मानसांवर केलेल्या अभ्यासांची संख्या मोजकीच असली तरी प्राणी किवां अन्य घटकांवर केलेल्या अभ्यासातून ई–सिगारेटमधील ई–ज्युसमुळे श्वसनयंत्रणा पोखरत जाते. भविष्यात सीओपीडी, ब्रॉन्कायटिस यासारखे श्वसनाचे आजार जडण्याची शक्यता असते. ई–सिगारेटचे फुफ्फुस, हृदय, मुत्रपिंड आणि यकृतावर गंभीर परिणाम होतात. श्वसननलिकेवरील आवरणावर परिणाम होवून विविध घातक घटकांपासून संरक्षण करण्याची क्षमता कमी होते. अशा रुग्णांमध्ये न्युमोनिया होण्याची शक्यता असते. फुफ्फुसाचे कार्य बिघडले तसेच निकोटीनसह ई–सिगारेटमध्ये असलेल्या अन्य घटकांमुळे कर्करोग होण्याची शक्यता असते. त्यांनी या बाबत इंडियन काऊन्सील ऑफ मेडिकल रिसर्च ने प्रसिध्द केलेल्या श्वेतपत्रिकेचा संदर्भ दिला. त्यानुसार, ईलेक्ट्रानिक निकोटीन डिलिव्हरी सिस्टीम किंवा ई–सिगारेट आणि तत्सम साधनांमध्ये निकोटीनयुक्त द्रावनाचा वापर केला जातो. या पदार्थाचे व्यसन सहजपणे जडते. त्यांच्यात आरोग्याला हानिकारक घटकांचा वापर केला जातो. त्यामुळे अशा उत्पादनांवर बंदी घालण्याची शिफारस या श्वेतपत्रिकेत करण्यात आली होती.

सलाम बॉम्बे फॉऊंडेशनच्या मुंबईमध्ये नव्या प्रकारच्या तंबाखूच्या वापराची माहिती घेण्यात आली. यात ३०० पेक्षा अधिक युवकांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात भाग घेणाऱ्या ७३ टक्के जणांनी ई–सिगारेट माहित असल्याचे धक्कादायक बाब समोर आली. यातील ३३ टक्के युवकांनी आयुष्यात कधी न कधी तिचे सेवन केले असल्याचेही सांगीतले. विशेष म्हणजे यातील ५६ टक्के तरुणांना ई–सिगारेट ही अन्य तबाखूजन्य उत्पादनापेक्षा कमी हानिकारक असल्याचे वाटते. ई–सिगारेट मुळे मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचे पुरावे नोदविण्यात आले आहेत., असे 'आयसीएमआर' च्या अहवालात ठळकपणे नमुद करण्यात आले आहे. यात डीएनएची हानी होणे, कर्करोगाला आमंत्रण, पेशीय, रेणूय आणि प्रतिरोधात्मक विषारी घटकनिर्मिती, श्वसन, हृदय, चेतासंस्थेचे विकार, आणि गर्भधारणा, बाळ आणि मुलाच्या मेंदूवर होणारे विपरीत परिणाम यांचा समावेश आहे. किशोरावस्थेत निकोटीनशी संबंध आल्यास शिकण्याची क्षमता, स्मृती आणि एकाग्रता यांच्यावर दुष्परिणाम होवू शकतो. असे आरोग्यमंत्र्यांनी निदर्शनास आणले. याशिवाय आरोग्य मंत्रालयाने नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या समितीनेही ई–सिगारेट हानीकारक असल्याचा ठोस निष्कर्ष काढला आहे असे त्यांनी सांगितले.

पारंपारिक सिगारेट उत्पादकांना फायदा व्हावा म्हणून ई–सिगारेटवर बंदी घालण्यात आल्याचा आरोप उद्योजकांच्या काही गटांकडून होत आहे. त्यात कोणतेही तथ्य नाही, असे हर्षवर्धन म्हणाले. आरोग्यविषयक निकषांना सामोरे जावे लागू नये या साठी ई–सिगारेट उत्पादकांकडून आपली उत्पादने ही 'औषधे आणि सौंदर्य प्रसाधने' कायद्याच्या कक्षेत येत नसल्याचा दावा जगभरात केला जातो. याकडे त्यांनी लक्ष वेधले. भारतातील तंबाखू विरोधी मोहिमेच्या उद्देशाला ई–सिगारेटच्या प्रसारामुळे बाधा येण्याची चिन्हे दिसू लागली होती. या मुळे ई–सिगारेटचा देशातील ग्राहक मर्यादित असतांनाच तिच्यावर अध्यादेशाद्वारे बंदी घातल्याने ती उपयुक्त ठरेल, असा दावा आरोग्यमंत्र्यांनी केला.

आपल्या देशात ई–सिगारेट बंदीचा अध्यादेश निघालेला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. मात्र जोपर्यंत ई–सिगारेट ओढणाऱ्यांची माणसिकता बदलणार नाही तोपर्यंत हा व्यसन सुटणार नाही म्हणून वेळीच सावध होणे आवश्यक आहे. आपला समाज व्यसनमुक्त झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने देशाचा सर्वांगिण विकास होणार नाही असे संशोधकाला वाटते.

*संदर्भ ग्रंथ सुची :–*

१. *सलाम मुंबई फाऊंडेषन तंबाखुमुक्त आरोग्यसंपन्न शाळा अभियान महाराष्ट्र माहिती पुस्तिका.*
२. *Coniewicz et al., 2013; Elssenberg, 2010; cheah et al., 2014; Kirschner et al., 2013*
३. *Ramoa et al., 2016*
४. *CDC, 2019; USDHHS, 2016; Chen et al., 2015; Klenhuis et al., 2015,*
५. *Cai and Wang, 2017*
६. *दै. तरुण भारत*
७. *दै. लोकसत्ता*
८. *दै. नवराष्ट्र*
९. *www.ecigarettes.com*

# भारतामधील समाजशास्त्राच्या विकासात समाजशास्त्रज्ञांचे योगदान

**प्रा. डॉ. बिरादार प्रतिभा रंगराव**, समाजशास्त्र विभाग, माऊली महाविद्यालय वडाळा ता. उ. सोलापूर जि. सोलापूर. मो. ९०११७७३६७०

**प्रस्तावना** — १७ व्या व १८ व्या शतकात यूरोपमध्ये बौध्दीक, आर्थिक, राजकिय व सामाजिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आले त्याच बरोबर फ्रेंचराज्यक्रांती, औद्योगिकक्रांती, नागरीकरण, भांडवलशाही व साम्राज्यवादाचा उदय यामूळे समाज जिवनात प्रचंड बदल झाला. धर्माचा प्रभाव कमी झाला. व्यक्तीमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोण निर्माण झाला. त्यातूनच १९ व्या शतकामध्ये समाजशास्त्राचा उदय झाला. समाजशास्त्राचे जनक ऑगस्ट कॉम्ट यांनी समाजशास्त्राला शास्त्राचा दर्जा प्राप्त करुन दिला. त्यांनी सामाजिक विचाराला शास्त्रीय आकार देवून समाजशास्त्राचा उदय केला. सर्व प्रथम अमेरिकेतील येल विद्यापीठामध्ये १८७६ पासून समाजशास्त्र एक विषय म्हणून अभ्यासला जावू लागला. त्यानंतर फ्रांस, इंग्लंड व १९१४ मध्ये भारतात हा विषय शिकविण्यास सूरवात झाली. १९१७ मध्ये सर्वप्रथम कलकत्ता विद्यापीठात प्रो. बजेंद्रनाथ सील व ए.आर. वाडीया यांच्या प्रयत्नाने स्वतंत्र समाजशास्त्र विभाग सूरु केला. त्यानंतर मूंबई विद्यापिठात प्रो. पेटीक गिडीस यांच्या अध्यक्षतेखाली १९१९ मध्ये स्वतंत्र समाजशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली. १९२४ पासून डॉ. जी. एस. घूर्ये यांची विभागप्रमूख म्हणून नियूक्ती झाली. १९२१ मध्ये लखनौ व काशी विद्यापीठामध्ये तर १९२३ मध्ये म्हैसूर व आंध्र विद्यापीठात समाजशास्त्र विषयाच्या अध्यापनाला सूरवात झाली. स्वातृंत्र्यानंतर भारतात समाजशास्त्राच्या विकासाला गती मिळाली.

**संशोधनाचा उद्देश**— १. साहित्याचा आढावा घेणे. २. भारतीतील समाशास्त्राचा उगम आणी विकासाचा थोडक्यात आढावा घेणे. ३. भारतातील समाजशास्त्राच्या विकासात भारतीय समाजशास्त्रज्ञाचे येदान स्पष्ट करणे.

**तथ्यसंकलन** — प्रस्तूत संशोधन पेपर तयार करतांना दूय्यम तथ्य संकलनाचा आधार घेण्यात आला.

**भारतामधील समाजशास्त्राचा व उगम व विकास** — भारतामध्ये प्राचीन काळापासून समाजाचा अभ्यास झालेला दिसून येतो. पण यामध्ये वस्तूनिष्ठतेचा अभाव दिसतो. ब्रिटिश कालखंडात अनेक ब्रिटिश अभ्यासकांनी भारतीय समाजाचे अध्ययन करुन पूष्कळ ग्रंथ लिहले. त्यांचे हे योगदान भारतातील समाजशास्त्राच्या विकासाच्या सूरवातीच्या काळात वैशिष्ट्यपूर्ण वाटत असले तरी त्यांचा अभ्यास हा वर्णनात्मक स्वरुपाचा होता, त्यामध्ये समाजशास्त्रीय दृष्टीकोणाचा आभाव होता. भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनाची सूरवात होण्यापूर्वी डॉ. एस. व्ही. केतकर यांनी इंग्लंडमध्ये जावून 'भारतातील जातीचा इतिहास' व 'समाजशास्त्र' हे दोन ग्रंथ लिहले. डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी अमेरिकेच्या कोलंबीया विद्यापीठात 'भारतातील जातीची घडण, उत्पत्ती आणी विकास' हा संशोधन पेपर सादर केला. या दोन समाजशास्त्रज्ञानी सर्वप्रथम समाजशास्त्रीय दृश्टिकोणातून भारतीय समाजाचा अभ्यास केला. भारतातील समाजशास्त्राच्या अभ्यासात यांनी महत्वाचे योगदान दिले.

१९१४ पासून भारतात समाजशास्त्राच्या अभ्यासाला सूरवात झाली असली तरी स्वातंत्र्यापूर्वी भारतात या विषयाचा फारसा विस्तार झाला नव्हता. स्वातंत्र्यानंतर भारतात या विषयाचा विकास जलद गतीने झाला. भारतातील जवळपास सर्वच विद्यापीठामध्ये आज समाजशास्त्र हा विषय शिकविला जातो. त्याच प्रमाणे 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई', 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस आग्रा', जे. के. इन्स्टिट्यूट ऑफ सोशियोलॉजी अॅड सोशल वर्क्स लखनौ इ. संस्थेच्या माध्यमातून अध्ययनाला व संशोधनाला चालना दिली जात आहे. देशपातळीवर समाजशास्त्र विषयाचे संघटन बांधून व देशासमोरिल महत्वपूर्ण समस्या, प्रश्नावर चर्चा घडून आणण्याचे कार्य इंडियन सोशॉलॉजिकल सोसायटीच्या माध्यमातून केले जाते. राष्ट्रीय स्तरावरील संशोधनाच्या क्षेत्रात सोशॉलॉजिकल बुलेटिन प्रकाशित होते.

**भारतीय समाजशास्त्रज्ञाचे योगदान** — भारतात समाजशास्त्राच्या विकासात अनेक शास्त्रज्ञांनी योगदान दिलेले आहे. काही समाजशास्त्रज्ञांचा थोडक्यात आढावा पुढिल प्रमाणे.

**१. डॉ. जी. एस. घुर्ये** — भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली भारतात समाजशास्त्र अध्ययनाची एक पिढी विकसीत झाली. प्राच्यविद्याच्या दृष्टीने त्यांनी भारतीय समाजशास्त्राला विकसित केले. डॉ. घुर्ये यांनी भारतीय समाजशास्त्रामध्ये विविध घटकांचा अभ्यास केला. भारतातील जातीव्यवस्थेचा, आदिवासी समाजाचा, गामीण समाजाचा, सामाजिक ताणतणावाचा अभ्यास केला. 'कास्ट अॅड रेस इन इडीया' या ग्रंथामध्ये त्यांनी व्याख्या न करता जातीची प्रमूख सहा वैशिष्ट्ये सांगीतली. अखिल भारतीय स्तरावर त्यांनी 'इंडियन सोशॉलॉजिकल सोसायटीची 'स्थापना केली.

**२. डॉ. राधाकमल मुखर्जी** — डॉ. राधाकमल मुखर्जी यांनी सामीजिक मूल्य आणि सामाजिक परिस्थीती संबंधी महत्वपूर्ण विचार मांडले आहेत. मानवि समाजावर नैतीक मूल्याचा प्रभाव कसा पडतो याचे त्यांनी सखोल अध्ययन केले. अनेक ग्रंथाच्या लिखानातून त्यांनी समाजशास्त्राच्या विकासात मोलाची भर घातली.

**३. डॉ. एम. एन. श्रीनिवास** — डॉ. श्रीनिवास यांनी भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाचा सखोल अभ्यास करुन सांस्कृतिकरण, पाश्चिमात्यीकरणाची महत्वपूर्ण संकल्पना मांडली. जातीच्या अध्ययनातून त्यांनी 'प्रभावि जातीची' संकल्पना मांडली. अनेक ग्रंथाच्या लिखानातून समाजशास्त्राच्या विकासात त्यांनी मोलाची भर घातली.

**४. डॉ. एस. सी. दूबे** — मध्यप्रदेशमध्ये स्थलांतरीत शेती करणा—या 'कमार' जातीचा अभ्यास करुन समाजशास्त्रात प्रवेश केला. ग्रामीण जीवन, सामूदायीक विकास, आधूनिकीकरण, परिवर्तन इ. विषयावर लेखन केले. अनेक ग्रंथाच्या लिखानातून त्यांनी समाजशास्त्राच्या विकासात मोलाची भर घातली.

**५. डॉ. इरावती कर्वे** – डॉ. कर्वे यांनी संस्कृती, संयूक्त कुटूंब, जात, नातेदारी, इ. घटकांचे सखोल अध्ययन केले. त्यांनी भौतिक आणि अभौतिक संस्कृतीचा अर्थ स्पष्ट केला. त्यांनी जातीला अंतर्विवाही गट मानला. संयूक्त कुटूंबाची व्याख्या करुन त्याचा अर्थ स्पष्ट केला.  अनेक ग्रंथाच्या लिखाणातून समाजशास्त्राच्या विकासात त्यांनी मोलाची भर घातली.

**६. डॉ. ए. आर. देसाई** – डॉ. देसाई यांनी मार्क्सवादी दृष्टीकोणातून भारतीय समाजाचा अभ्यास केला. भारतातील राष्ट्रवादाच्या विकासात सामाजिक व धार्मिक चळवळीचे मुल्यमापन केले. त्यांनी भारतीय राज्य, कृषक समाजव्यवस्था, लोकशाहितील अधिकार, नागरीकरण, कृषक आंदोलन, इ. विषयावर त्यांनी महत्वपूर्ण लेखन केले. अनेक ग्रंथाच्या लिखानातून समाजशास्त्राच्या विकासात त्यांनी मोलाची भर घातली

**७. डॉ. डी. पी. मूकर्जी** – डॉ. मुकर्जी हे मार्क्सवादी असून त्यांनी भारतीय इतिहासाचे व्दंव्दात्मक प्रक्रियेव्दारे विश्लेषण केले. परंपरा हा त्यांच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू होतो. परंपरेचे प्रकार, स्तर व परिवर्तनाचे समर्पक विश्लेषण केले आहे. परंपरा व आधूनिकतेला परस्पर पूरक माणून त्यांनी भारतीय समाजाचा अभ्यास केला. अनेक ग्रंथाच्या लिखानातून समाजशास्त्राच्या विकासात त्यांनी मोलाची भर घातली.

**८. डॉ. के. एम. कपाडीया** – डॉ. कपाडीया यांनी हिंदू विवाह, कुटूंब व नातेदारीच्या संदर्भात अध्ययन केले आहे. यांनी हिंदू विवाहाला संस्कार रुपात मानले. त्यांनी दक्षिण गुजरातच्या खेड्यामधील विकासाची प्रक्रिया व जातीमध्ये होणा–या परिवर्तनाचा अभ्यास करुन समाजशास्त्राच्या विकासात योगदान दिले.

**९. इतर समाजशास्त्रज्ञ** – वरील समाजशास्त्रज्ञासोबतच भारतात समाजशास्त्राच्या विकासामध्ये एस. व्ही. केतकर, डॉ. एम. एस. गोरे, डॉ.योगेंद्र सिंग, प्रो. रामनारायन सक्सेना, डॉ. वाय. बी. दामले, प्रो. योगेंद्रसिंह, डॉ. पंढरीनाथ प्रभू, डॉ. विलास संगवे, डॉ. पू. ल. भांडारकर, डॉ.डी. एन. धनागरे, डॉ. उत्तम भोईटे इ. अनेक समाजशास्त्रज्ञानी योगदान दिले. त्याच प्रमाणे वर्तमान काळामध्ये देखिल अनेक समाजशास्त्रज्ञ महत्वपूर्ण योगदान देत आहेत.

**सारांश** – भारतामध्ये समाजशास्त्राच्या अभ्यासाला आज शंभर वर्ष पुर्ण झाले असून स्वातंत्र्यापूर्वी भारतात या विषयाचा फारसा विस्तार झाला नव्हता. परंतू स्वातंत्र्यानंतर भारतात या विषयाचा विकास जलद गतीने झाला आहे यासाठी अनेक समाजशास्त्रज्ञांचे योगदान महत्वपुर्ण ठरले आहे.

*संदर्भ ग्रंथ –*

1. *समाजशास्त्र संकल्पना आणि सिध्दांत – डॉ. प्रदिप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.*
2. *समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना – डॉ. सर्जेराव साळूंखे, नरेंद्र प्रकाशन पुणे.*
3. *समाजशास्त्रीय चिंतन एंव सिध्दांतकार – डॉ. रावत हरिकृष्ण, रावत पब्लीकेशन जयपूर.*
4. *अभिजात समाजशास्त्रीय विचार– डॉ. प्रदिप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.*
5. *समाजशास्त्र परिचय – डॉ. दिलीप खैरनार, डायमंड पब्लिकेषन्स पुणे.*

# भटक्या–विमुक्त जमातींच्या चळवळींची विचारसरणी

**डॉ. अर्जुन पांडूरंग जाधव,** दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, जि.कोल्हापूर.

डार्विनच्या मतानुसार ''तोच 'जीव' सृष्टी जिवंत राहू शकतो, जो 'अस्तित्वासाठी' संघर्ष करतो.'' डार्विनचा हा नियम मानवी समाजालाही तंतोतंत लागू पडतो. कारण मानवी समाजामध्ये अनेक श्रेष्ठ–कनिष्ठ, उच्च–निच्च अशा वेगवेगळ्या आधाराचे मानवी समुदाय आहेत. अर्थातच, जो समुदाय बलवान असतो, तो समुदाय कमकुवत किंवा कनिष्ठ समुदायावर आपले वर्चस्व निर्माण करतो. अशा परिस्थितीत कमकुवत किंवा कनिष्ठ समुदायाला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. परिणामी जो संघर्ष करतो तोच टिकतो हा मानवी समाजाचाही इतिहास आहे.

ज्या समुदायाला आपल्यावर अन्याय होत आहे याची जाणीव होते. याच जाणिवेतून समाज संघटित होतो व आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करण्यासाठी प्रवृत्त होतो. शासन किंवा प्रशासनही संघर्ष करणाऱ्या समाजाची दखल घेत असते. उदाहरणार्थ ब्रिटिशांना भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीची दखल घ्यावी लागली. त्याचबरोबर आदिवासी चळवळ, शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, दलित चळवळ, महिला चळवळ यासारख्या अस्तित्वासाठी उभ्या राहिलेल्या चळवळींची दखल शासनकर्त्यांना घ्यावी लागली आहे, हा इतिहास आहे. या चळवळी साहित्यातूनही आपला विद्रोह मांडत आल्या आहेत. त्यामुळे अस्तित्वासाठीच्या चळवळींमधून अनुयायांपुढे एक दिशा ठेवली जाते. या चळवळीमुळेच आदिवासी, कामगार, दलित, शेतकरी, महिला यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले, त्यांच्या प्रागतिक विचारांची सुरुवात झाली.

भटक्या–विमुक्तांची चळवळ ही गेली ४ ते ५ दशके स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी संघर्ष करीत आहे. मात्र या चळवळीची दखल शासनाकडून घेतलेली दिसून येत नाही. अगदी इतिहासकार, साहित्यिक, सामाजिक चळवळीचे अभ्यासक तसेच परिवर्तनवादी सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडूनही 'भटक्या–विमुक्तांची' चळवळ दुर्लक्षित राहिली आहे. भटक्या–विमुक्तांची ही चळवळ देशभर सुरू आहे. तिचा प्रभाव कमी–अधिक असला तरी चळवळ सुरू आहे.

'भटक्या–विमुक्त' चळवळीच्या उदयाकरिता वेगवेगळ्या विचारसरणी कारणीभूत ठरल्या. त्या विचारसरणीचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

१. **साम्यवादी विचारसरणीतून निर्माण झालेल्या चळवळी :–** १९५२ नंतर भटक्या–विमुक्तांची शिक्षण घेतलेली पहिली पिढी, या पिढीला आपल्या समाजावरील व आपल्यासारख्याच इतर जमातींवर अन्याय–अत्याचाराची जाणीव होऊ लागली. हा अन्याय–अत्याचार दूर झाला पाहिजे ही भावना तीव्र झाली. यामागील प्रेरणा त्यांना त्यांच्या शिक्षणातून व कामगार संघटनांच्या चळवळीतून मिळाल्याचे आढळून येते. लक्ष्मण गायकवाड हे एका सुतगिरणीमध्ये कामगार म्हणून काम करीत होते. सुतगिरणीमध्ये काम करित असताना त्याठिकाणी असणारी कामगाराची संघटना, त्या संघटनेवरील मार्क्सवादी विचारांचा प्रभाव, त्या संघटनेच्या कार्यपद्धतीचा व मार्क्सच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि या प्रभावातून त्यांनी आपल्याही समाजावरील अन्याय दूर करण्यासाठी एखादी संघटना असावी. म्हणून 'वडार पाथरवट समाज संघटना' स्थापन केली. नंतर इतर जमातींचे लोक उदाहरणार्थ कैकाडी यांना एकत्रित करून त्यांनी भटक्या–विमुक्तांची संघटना स्थापन केली व १९७६ ला पहिला मोर्चा काढला. थोडक्यात जी पहिली पिढी शिकली, त्यांच्यात अन्यायाची जाणीव झाली या लोकांनी इतर कामगार संघटनाच्या चळवळीचे अवलोकन केले. याच काळामधील मार्क्सवादी विचारांनी प्रभावित कामगार संघटना अधिक प्रभावी होत्या. या प्रभावातूनही भटक्या–विमुक्तांच्या चळवळीचा उदय झाल्याचे आढळून येते.''

२. **फुले व आंबेडकरी विचारातून उदयास आलेल्या चळवळी :–** महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक प्रभावातून १९७२ मध्ये दलित पँथरची स्थापना झाली. ही संघटना अधिक आक्रमकपणे कार्यरत होती. या चळवळीचा प्रभाव अनेक दलितांमधील समुदायांवर पडला. तसाच तो भटक्या विमुक्त जमातीच्या समुदायावरही पडलेला दिसून येतो. ही चळवळ विशेषत: मुंबई, औरंगाबाद, नागपूर या ठिकाणी अधिकप्रभावी होती. मुंबईमध्ये ग्रामीण भागातून आलेल्या तरुणांवर या संघटनेचा विशेष प्रभाव होता. मुंबईमध्ये या चळवळीच्या प्रेरणेतून भटक्या–विमुक्तांच्या चळवळीची सुरुवात झाली. बाळकृष्ण रेणके यांच्यासारखे तरुण मुंबईमध्ये आपल्या समाजबांधवांना संघटित करण्यासाठी ज्या दिवशी काम बंद आहे, त्यादिवशी झोपडपट्ट्यातून फिरायचे. कमवा आणि शिका या योजनेमधून १९६२ ला पदवीधर असलेले रेणके दादर रेल्वे स्टेशनवर रहायचे, त्यामुळे त्यांची रेल्वेच्या लोकांची ओळख झाली. पदवीधर असल्याने लोकांची सहानुभूती मिळाली. झोपडपट्ट्यांमधून फिरताना त्यांना काही शिक्षित लोक मिळाले, काही नोकरी करणारे भटक्यांचे लोक मिळाले. दलितांवरील अन्यायाविरुद्ध 'दलित पँथर' संघर्ष करीत आहे हे बघून भटक्यांसाठी काही करावे असे वाटू लागले आणि रेणकेंनी भटक्या विमुक्तांच्या चळवळीस सुरुवात केली. पुढारी, स. का. पाटलांसह लोक चाळीचाळीत हात जोडून लोकांना विनंती करत होते की मतदानाला चला. लोक गेले नाहीत. दलित पँथरने आवाहन केले म्हणून नायगाव भागात जवळजवळ ५० टक्के दलित्तोतर समाज आहे पण सर्वच समाजावर दलित पँथरच्या आवाहनाचा परिणाम झाला. रोजा देशपांडे या डांगेच्या कन्या निवडून आल्या. या घटनेने रेणकेंना आत्मचिंतन करायला भाग पाडले. एकेका जमातीचे संघटन करून काही उपयोग होणार नाही. त्यावेळेस बंजाराची संघटना, वडारांची संघटना, कैकाड्यांचीसुद्धा संघटना, भोईची संघटना होती. या एकेका जातीच्या संघटना, या संघटना काय परिणाम करतायत सरकारवर, सरकारच्या धोरणावर, बाबासाहेब आंबेडकरांनी जे सांगितले त्या दृष्टिकोनातून धोरण ठरवल्यावर या काय करताहेत. या स्वतंत्र संघटना त्याचा परिणाम शून्य होता. उलट या सगळ्या संघटना ब्राह्मण्यवादी आहेत असे रेणकेंना वाटू लागले. भटक्यांच्या वेगवेगळ्या संघटना समाजाचे मेळावे घेतात. त्याचबरोबर ते सत्यनारायणाची पूजापण करतात. अंबाबाईची पूजापण करतात, गोंधळपण घालतात. जागरणपण करतात. हे सगळे करतात मात्र यांना स्वत:च्या जातीची खूप अस्मिता आहे. या देशातील दलित भटक्यांचे प्रश्न सोडवायचे तर जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत असे डॉ. आंबेडकर सांगतात. अशा परिस्थितीत दलितांमध्ये महार ही जात प्रबळ आहे, जागृत आहे. दलित पँथर प्रभावी आहे परंतु, एकाच जातीचं संधान आहे.

त्यावेळेस सहा कामगारांची कमिटी होती भटक्या–विमुक्तांच्या कल्याणावर. कारण १९६० भटक्या विमुक्तांचं एक वेगळं डिपार्टमेंट ६०–६१ ला महाराष्ट्र सरकारने तयार केले कालेलकर आयोगाच्या

शिफारशीप्रमाणे. कालेलकर आयोगाचा अहवाल केंद्र सरकारने स्विकारला नाही. १९६०—६१ ला भटक्या—विमुक्तांची एक स्वतंत्र यादी महाराष्ट्र सरकारने केली 'खाडे कमिशन' नेमून आणि त्या यादीप्रमाणे आणि त्या कमिशनच्या शिफारशीप्रमाणे ४ टक्के रिझर्व्हेशन ठेवून एक वेगळी कॅटॅगरी तयार केली आणि मग ६०—६१ पासून याचे काय होतेय, सरकारनी काय ठेवलेय, काय योजना आहेत, पैसा किती ठेवलाय, लोकांपर्यंत जातो किती, लोकांचे कल्याण किती झाले. याचे परीक्षण करण्यासाठी ते एक कमिटी नेमण्याचा निर्णय होता. सहा लोकांची कमिटी. त्या कमिटीचे अहवाल म्हणजे डोंगर पोखरून उंदीर काढल्यासारखे. प्रत्यक्षात काहीच नाही नुसता देखावा आहे असा त्या कमिटीचा अहवाल होता. त्याचा आधार घेऊन, बाळकृष्ण रेणके यांनी मुंबईतल्या झोपडपट्टीची परिस्थिती बघून, भटक्या—विमुक्तांवर अन्याय अत्याचाराचे प्रकरण बघून, मग एक दीर्घ लेख लिहिला. महाराष्ट्र टाईम्समध्ये शनिवारी पूर्वार्ध आणि रविवारी उत्तरार्ध अशा दोन सदरामध्ये लेख प्रसिद्ध झाला. विशेष म्हणजे रविवारी गोविंद तळवलकरांनी त्याच्यावर अग्रलेख लिहिला की या महत्त्वाच्या समाज घटकाकडे शासनाचे आणि समाजाचे दुर्लक्ष झाले.

त्यानंतर बाळकृष्ण रेणके यांनी मुंबईत सकाळ, नवाकाळ, महाराष्ट्र टाईम्स, नवशक्ती या वर्तमानपत्रामध्ये भटक्या—विमुक्तांच्या प्रश्नावर लिहिणे सुरू केले.

वृत्तपत्रातील लेखामुळे भटक्या—विमुक्तांचे शिक्षीत असे एकत्र येऊ लागले. त्यातून एक हौसिंग सोसायटी स्थापन झाली. त्यावेळी मुंबईत हौसिंग सोसायटी कैकाड्यांनी केली, बंजाऱ्यांनी केली, भोईनी केली. पण हे भिक्षेकरी आणि जे विमुक्त त्यांना वाली नाही. मात्र, बाळकृष्ण रेणके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि मुंबईच्या इतिहासातली ही पहिली स्पेशल केस आणि शेवटची स्पेशल केस केली. लो इन्कमच्या लोकांना हाय इन्कम ग्रुपची सोसायटी मिळाली. चुना भट्टीशेजारी सगळे न्यायाधीश आणि मंत्री लोक होते. म्हणजे पी. के. सावंत, नाईक न्यायाधीश, खताळ पाटील मंत्री हे भटक्यांचे शेजारी बनले. या सर्व प्रकरणानंतर रेणके यांनी संघटन करायचे ठरविले पण ते एका जातीचे संघटन करायचे नाही वेगवेगळ्या जातींचे संघटन करायचे. संपूर्ण भटक्या—विमुक्त जमातींचे. गोंधळी असो, रामोशी असो, कैकाडी असो त्या सर्वांचे प्रश्न समान आहेत. असे जे प्रश्न आहेत ते घेवून आपण या सगळ्या भटक्या—विमुक्तांची एक संघटना करावी या उद्देशाने कार्यकर्ते एकत्र केले आणि मग एक अधिवेशन घ्यायचा विचार केला. बर्वे खासदार, भूई समाजाचे, दौलतराव भोसले की जे समाजवादी पक्षाचे आहेत. समाजवादी पक्ष आणि शिवसेनेच्या युतीतून ते निवडून आलेले आहेत, मुंबई महापालिकेतून. मग यांना सगळ्यांना भेटण्याची मोहिम काढली. नायगावच्या म्युनिसिपालीटीच्या क्वॉर्टर्समध्ये नगरसेवक म्हणून राहत होते. मात्र त्यांचा जातीच्या संघटनेवर विश्वास नव्हता. त्यांचा जातीय संघटना करण्यास विरोध होता. त्यामुळे त्यांनी सहभागाबाबत नकार दिला. परंतु, मधुकर दाभोळकर यांनी विश्वासात घेऊन बाळकृष्ण रेणके व त्यांचे सहकारी त्यांना पुन्हा भेटले आणि त्यांनी बर्वे यांना पटवून दिले की हे एकजातीय संघटन नाही तर अनेक भटक्या विमुक्त जमातींचे एकत्रित संघटन आहे. त्यानंतर त्यांनी भटक्यांच्या अधिवेशनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. अधिवेशन घ्यायचे ठरवले. ते अधिवेशन घ्यायलाही तयार झाले आणि ९ जानेवारी १९७२ ला पहिली राज्यव्यापी ऐतिहासिक परिषद झाली. (मुलाखत — बाळकृष्ण रेणके, दि.१९/११/२०१५, मुंबई.)

अशा तऱ्हेने मुंबई शहरामध्ये भटक्या—विमुक्तांच्या चळवळीला मा. बाळकृष्ण रेणके यांच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली.

**३. साहित्य क्षेत्रातून निर्माण झालेल्या चळवळी :—** भटक्या विमुक्त जमातींच्या साहित्यकृतीवर दलित साहित्यिकांचा लेखनाचा प्रभाव होता. त्यामुळे दलित साहित्य समजावून घेणे आवश्यक आहे. दलित साहित्याचा उदय हा १९६० नंतरचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गेल्यानंतर दलितांना स्वत:ची अस्मिता निर्माण करण्याची नवे आव्हान त्यांच्यापुढे होते. प्रस्थापितांच्या अन्यायाविरुद्ध लढा देणे आवश्यक होते. हा लढा रक्तपाताचा होणे शक्य नव्हते. परंतु, लढा देणे आवश्यक होते. दलितांच्या जीवनावर दलितांचे होणारे शोषण याला वाचा फोडणे आवश्यक होते.

अन्यायाच्या विरुद्ध दलितांच्या मनात चिड होती. त्यासाठी त्यांना बंडाची आवश्यकता होती. ते बंड दलितांनी साहित्यांच्या माध्यमातून व्यक्त करण्यास सुरुवात झाली.

प्रस्थापित हिंदू समाज व्यवस्थेने माणसाला माणूस म्हणून स्थान न देता त्यांच्यात अमानुष अशी विषमता निर्माण करून ठेवली होती. तेंव्हा या अत्याचाराला विरोध करण्यासाठी शब्द आणि साहित्याला शस्त्र बनविले आहे. म्हणून दलित साहित्यिकांची जबाबदारी प्रकट करताना आण्णाभाऊ साठे यांनी म्हटले आहे की, 'आम्ही दलित साहित्यिकांनी दलितांना वास्तव जगण्याच्या सर्व जुलुमातून मुक्त करणारे साहित्य निर्माण केले पाहिजे.'

शत्रुवर विजय मिळविण्यासाठी शस्त्रांपेक्षा विचार व्यक्त करून समाजमनावर बिंबवणारे शब्दबळ हे मोठे शस्त्र आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शब्दबळाचा वापर करून शत्रुला घायाळ करण्याचा प्रयत्न सतत केला होता. तसेच पुढे आण्णाभाऊ साठे यांनी त्याच शब्द सामर्थ्याची जाणीव ठेवून समाजप्रबोधनासाठी लेखन माध्यम उपयुक्त असल्याचे दलित साहित्यिकांना सांगितले आणि स्वत: प्रचंड लेखन केले.

पिढ्यानुपिढ्या, किंबहुना शतकानुशतके पशूंसारखे लाजिरवाणे जीवन जगावे लागल्याबद्दलच्या, साचलेल्या क्रोधाचा उद्रेक म्हणजे हे दलित साहित्य होय.

दलित साहित्यामध्ये आत्मचरित्रे हा साहित्यप्रकार अधिकप्रभावी ठरला आहे. कारण त्यातील केवळ दारिद्रयाचेच नव्हे तर अत्याचार, लैंगिक शोषण, मानहानीच्या सत्य घटना इतक्या विलक्षण होत्या की, इतर साहित्यिकांना वाटले की, असेही जीवन जगणारा माणूस भारतात आहे? आणि त्यांची त्यांना माणुसपणाची लाज वाटू लागली.

दलित आत्मचरित्रे, कविता या साहित्यकृतीतून दलितांना जाणिव करून दिली की, गुलामांपेक्षाही हीन जीवन आपण जगत आहोत. याला आपणच कसे जबाबदार आहोत हेही ते साहित्यात मांडायला विसरले नाहीत. यामुळे बाबासाहेबांचा एक हेतु पूर्णत्वास जाताना दिसत होता, तो म्हणजे बाबासाहेब म्हणत, 'गुलामाला गुलाम असण्याची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करेल' आणि सत्यात तसेच घडत आले. दलित साहित्यातून सामाजिक चळवळींना संजिवनी देण्याचे कार्य करीत आहेत. हे दलित साहित्याने केले.

दलित साहित्य चळवळीमध्ये अग्रभागी होते ते आण्णाभाऊ साठे त्यांच्या लेखनकार्याला संयुक्त महाराष्ट्राचा पहिला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला.

तुकाराम भाऊराव साठे ऊर्फ अण्णाभाऊ साठे हे मराठी लेखक व समाजसुधारक होते. वर्गविग्रहाचे तत्वद्गत सर्वसामान्य जनांपर्यंत पोहचविणारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला सिद्धहस्त कादंबरीकार, लोकनाट्यकार म्हणून

त्यांची प्रतिमा आहे. ग्रामीण ढंगातील रांगड्या तमाशाला 'लोकनाट्य' हे बिरुद शाहीर आण्णाभाऊ साठे यांनी दिले. आण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांद्वारे जनजागृतीसाठी प्रयत्न केले. आण्णाभाऊ साठे म्हणजे जातींच्या उतरंडीमुळे शिक्षणापासून, समग्र विकासापासून वंचित राहिलेले मातंग समाजातील एक समृद्ध व्यक्तिमत्व होते. वैयक्तिक दु:खांचा विचार न करता आपले विचार, कार्य व प्रतिमा यांच्या साहाय्याने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारे लोकशाहीर होते.

आण्णाभाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, ८ पटकथा, ३ नाटके, एक प्रवासवर्णन, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्य, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले. या साहित्यांमुळे दलित समाजामध्ये चैतन्य निर्माण झाले होते. या साहित्यकृतीमध्ये माकडीचा माळ १९६९, चिखलातील कमळ १९६९, फकिरा, अलगूज, अहंकार, आग, आघात यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

दलित साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणात आत्मकथांच्या माध्यमातून दलितांचे जीवन पुढे आले. मनुष्यप्राणी असेही जीवन जगतो आहे, याची जाणीव झाली. ही जाणीव सर्व स्तरातील वाचकांना जशी झाली तशीच ती दलितांमधील शिकलेल्या पिढ्यांनाही झाली. दलित तरुण वाचकांना त्यांच्या मरण समान जीवन जगण्याची जाणीव झाली. यामुळे दलित तरुणांमध्ये अन्यायाच्या विरोधात बंड करण्याची प्रेरणा मिळाली. या साहित्यामध्ये बलुतं – दया पवार, आठवणींचे पक्षी – प्र. ई. सोनकांबळे, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे – माधव कोंडविलकर, जिणं आमुचं – बेबी कांबळे, मला उध्वस्त व्हायचंय – मल्लिका अमरशेख, माझ्या जन्मालाची चित्तरकथा – शांताबाई कांबळे, अक्करमाशी – शरणकुमार निंबाळे, काट्यावरची पोटं – उत्तम तुपे, आमचा बाप आन आम्ही – नरेंद्र जाधव, अंत:स्फोट – कुमुद पावडे, तराळ–अंतराळ – शंकरराव खरात, ढोर – भगवान इंगळे ही आणि इतर. (विकीपिडीया – १५ फेब्रुवारी, २०१७)

दलितांच्यामध्ये नवचैतन्य निर्माण करणाऱ्या साहित्य चळवळीचा प्रभाव भटक्या विमुक्तांतील शिक्षित तरुणाच्यांवर मोठ्या प्रमाणात पडत होता. या प्रभावातून लक्ष्मण माने, भीमराव गस्ती, मोतीराज राठोड, बाळकृष्ण रेणके, लक्ष्मण गायकवाड ही साहित्यिकांची पिढी निर्माण झाली. यांच्या साहित्यातून भटक्या विमुक्त जमातींचे वास्तव जीवन जगासमोर येण्यास सुरुवात झाली. एक असा वर्ग भयाण दारिद्रयात जीवन जगत आहे. हे चित्र या साहित्यातून पुढे आले. यामुळे समाजप्रबोधन होण्यास सुरुवात झाली.

भटक्या विमुक्तांचे लेखक आणि त्यांचे साहित्य पुढीलप्रमाणे,

महाराष्ट्र राज्यातील बहुतांशी दैनिक, साप्ताहिकातून प्रा. मोतीराम राठोड यांनी भटक्या–विमुक्त जमाती, आदिवासींच्या प्रश्नावर विस्तृत लेखन केले. गुन्हेगार जमाती कायदा आणि त्यांचा इतिहास यांनी प्रथम शोधून काढला जवळपास पन्नास जाती तत्सम जमाती यांची माहितीचे लेखन केले. कित्येक कार्यकर्त्यांना आपले प्रश्न लिहिण्यास प्रोत्साहन दिले. फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारावर बोलणारे कार्यकर्ते तयार केले, यांच्या प्रोत्साहनामुळे लेखन, वाचनाची प्रक्रिया भटक्यामध्ये सुरू झाली. ते अनेक साहित्य संमेलनात सहभागी झाले आणि त्यातून त्यांनी अनेक व्यासपीठात भटक्या विमुक्तांबद्दलचे विचार व्यक्त केले. लोकांमध्ये जागृती घडवून आणली, नामांतर चळवळीत प्रा. राठोड याचे घर महाराष्ट्राचे कार्यालय होते. या लढयात प्रा. राठोड तीन दिवस जेलवासी झाले. मंडल आयोगाची चळवळ महाराष्ट्रात सर्वप्रथम प्रा. राठोडांनी सुरू केली. प्रा. राठोडाच्या रूपाने भटक्यांना खंबीर नेतृत्व मिळाले, भटक्यांना लिहायला, बोलायला शिकवले बहुजनाची चळवळ बहुजनांना सोबत घेऊन व्यापक केली.

१९५२ नंतर भटक्या–विमुक्तांच्यामधील पिढीला दलित साहित्य जवळचे वाटू लागले. साहित्याने ते देखील प्रभावित झाले आणि त्यातून १९८० नंतर भटक्या–विमुक्तांच्या आत्मकथनांना सुरुवात झाली. २५ डिसेंबर १९८० लक्ष्मण माने यांचे उपरा प्रकाशित झाले. या आत्मकथनामुळे भटक्या–विमुक्तांच्या जीवनाचे चित्रण जगासमोर आले आणि साहित्यक्षेत्र ढवळून निघाले. १९८३ ला दादासाहेब मोरे यांचे गबाळ, १५ ऑगस्ट १९८७ ला लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या', २०१२ मध्ये भीमराव गस्ती यांचे 'बेरड'. या आत्मकथनांमुळे भटक्या–विमुक्तांच्यातील लेखकांना एक नवीन चेहरा प्राप्त झाला. त्यांना मोठी प्रसिद्धी मिळाली. या लेखकांनी पुढे भटक्या–विमुक्तांचे संघटन उभे केले. आणि हे संघटन गेली ३०–३५ वर्षे प्रभावीपणे काम करीत आहे. १९८० नंतर लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, भीमराव गस्ती भटक्या–विमुक्तांना प्राप्त झालेले असामान्य नेतृत्व होय. यामुळे भटक्या–विमुक्तांना चेहरा प्राप्त झाला.

**४. समाजवादी विचारसरणीतून निर्माण झालेल्या चळवळी:–** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९४७ ला राष्ट्रसेवादल स्वतंत्ररित्या समाजवादाचा प्रसार भारतभर करीत होती. राष्ट्रसेवा दलाचा समाजवादी विचार कोल्हापूरमध्ये अधिक होता. माधवराव बागल, रविंद्र सबनिस, बापूसाहेब पाटील यांच्यावर राष्ट्रसेवा दलाचा प्रभाव होता. यांच्या सोबतीने व समाजवादी विचाराचा अंगीकार करून मा. लक्ष्मण माने, मा. व्यंकाप्पा भोसले हे सेवादलांमधील सक्रीय कार्यकर्ते बनले. पुढे त्यांनी भटक्या–विमुक्तांची चळवळ उभी केली. या नेतृत्वाने १९८० नंतर विविध आंदोलने, चळवळी, निषेध मोर्चे या माध्यमातून भटक्या–विमुक्तांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम व भटक्या विमुक्तांना चेहरा देण्याचे कार्य केले. या नेतृत्वाने भटक्या–विमुक्तांच्या चळवळीचा लढा एवढा तीव्र केला की, शासनाने भटक्या–विमुक्तांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी काही प्रमाणात प्रयत्न करण्यास सुरुवात झाली.

''बापूसाहेब पाटील, सुरेश शिपुरकर यांच्याशी बोलणं झालं आणि साधनेला पाठींबा देण्यासाठी मोठा मोर्चा काढावा असं ठरलं. बाबुराव परितेकर प्रा. माणगावकर, डॉ. सुदाम चौगुले शिपुरकर सारी मंडळी कामाला लागली. कोल्हापूर म्हणजे वसतिगृहांची नगरी. प्रत्येक जातीसाठी वसतिगृह, प्रत्येक कॉलेज आणि हायस्कूलसाठी वसतिगृह वसतिगृहात सध्यातरी बी. सी. मुलं जास्त आणि म्हणून बैठका घेत फिरू लागलो. दलितांची कैफियत मांडू लागलो. राजा ढाले आणि 'साधने' साठी दोन–दोन वाजेपर्यंत माणगांवकर आणि मी फिरू लागलो'' (लक्ष्मण माने, १९८०, पृ.क्र.२०).

**५. मूलतत्ववादी विचारसरणीतून निर्माण झालेल्या चळवळी :–** बेळगाव व कोल्हापूर जिल्ह्यातील बेरड समाजाच्या समस्यांसाठी निकराचा लढा देणारे, भीमराव गस्ती हे हैद्राबादमध्ये असताना त्यांचा संघाशी संबंध आला. एम. टेक., पीएच.डी. अशा उच्च पदव्या प्राप्त केलेले गस्ती नोकरी सोडून पूर्णवेळ आर. एस. एस. चे स्वयंसेवक बनले.

बेळगाव जिल्ह्यातील यमनापूर या गावी बेरड रामोशी समाजात गस्तींचा जन्म झाला. बहुतांश निरक्षर आणि अडाणी असलेल्या समाजाच्या कपाळावर गुन्हेगारी जमातीचा शिक्काही मारला गेला होता. त्यामुळे दिवसातून तीनवेळा पोलीस ठाण्यावर हजेरी देण्याचे बंधन, तरीही कुठेही चोरी–दरोडेखोरी झाली तर पोलिसांनी पुरुष

मंडळींना उचलून नेणे, त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती करणे, अकारणच समाजात तोंड लपवून हिंडण्याची वेळ येणे, कमालीचे दारिद्रय हे बेरड समाजाचे प्राक्तन होते. अज्ञान तर इतके की, या अन्यायाची खंत वाटण्याऐवजी 'हेच आपले नशीब आहे' अशा समजुतीने पिढ्यानपिढ्यांपासून मनात घर केलेले. प्रारंभी गस्तींचीही समजूत अशीच होती. परंतु, शिक्षणाच्या निमित्ताने जसजसे विस्तृत क्षेत्रात वावरणे, निरीक्षण, वाचन इत्यादी सुरू झाले तसतशी या अन्यायग्रस्ततेची बोच तीव्रपणे जाणवू लागली. स्वतः अशिक्षित असलेल्या वडिलांनी गस्तींना शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. शिक्षणात कुठे खंड पडला नाही. बेळगावातच शालेय शिक्षण, राजा लखमगौडा विज्ञान संस्थेमधून विशेष गुणवत्तेसह बी. एस्सी. झाल्यानंतर हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठात जीवशास्त्र विषयात एम. एस्सी केली. त्याचवेळी अभ्यास करीत असताना मॉस्को येथील लुमुंबा विद्यापीठाची दरमहा शंभर रूबल्सची पाठ्यवृत्ती गस्तींना इस्कस या संस्थेमार्फत मिळाली आणि दोन वर्षे गस्ती मॉस्को येथे अध्ययनासाठी राहिले. तेथे जीवशास्त्रातील एम. टेक. ही पदवी मिळाली. तेथेच जीवशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी प्राप्त केली.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नॅशनल जिऑलॉजिकल रिसर्च सेंटरमध्ये रिसर्च असिस्टंट म्हणून त्यांनी काम केले. याच दरम्यान दारिद्रय आणि अज्ञान यांनी गांजलेला, सतत अत्याचार सहन करणारा, पिढ्यांपासून पोलिसी अन्यायाचा जाच सहन करणारा, अस्थिर, शोषित, दुर्लक्षित, तुच्छतेचे जीवन जगणारा आपला समाज त्याचे उन्नयन करण्याची जबाबदारी आपलीच आहे. आपली बुद्धिमत्ता, शिक्षणामुळे मिळालेली सामाजिक प्रतिष्ठा याचा उपयोग केवळ व्यक्तिगत प्रगती–समृद्धीसाठी करण्यापेक्षा समाजासाठी करावा अशा विचारातून गस्ती समाजकार्याकडे वळले. मात्र हैदराबातच्या वास्तव्यात त्यांचा 'गीता आश्रम' शी संबंध आला. त्यातून रा. स्व. संघाशी संबंध आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आदिंच्या कार्याचा व कर्तृत्वाचा परिचय, याच काळात गस्तींच्या वाचनात रॉबर्ट स्वेल यांचे 'Forgotten Empire' आणि कृष्णस्वामी अय्यंगार यांचे 'The History of Vijaynagar Empire' हे दोन ग्रंथ आले. या दोन्ही ग्रंथातून बेरड–रामोशी समाजाचा उज्ज्वल इतिहास डोळ्यासमोर उलगडला गेला. बेरड समाज स्वतःची ओळख विसरला आहे. या समाजाने स्वत्व आणि सत्व गमावले आहे, त्याची पुर्नजागृती करायला हवी याची जाणीव झाली आणि चांगल्या पगाराची नोकरी सोडून गस्ती राष्ट्रीय स्वयं संघाच्या सहकार्याने भटक्यांच्या चळवळीत उतरले.

बेरड जमात ही ब्रिटीशांनी 'गुन्हेगार' ठरविलेली जमात! या जमातीचा इतिहास थेट इ. स. १३३० च्या विजयनगर साम्राज्याच्या इतिहासाशी भिडतो. हरिहर आणि बुक्कराय यांच्यापैकी बुक्कराय हा बेरड समाजाचा होता. याची राणी मुखांबिका ही श्रावणकोरच्या दोराईस्वामी या बेरड जमातीतील व्यक्तीची मुलगी होती. इ. स. १३३० ते १६६५ इतका प्रदीर्घ काळ विजयनगरवर बेरड घराण्यातील वीर पुरुष राज्य करीत होते. कृष्णदेवराय हा राजा बेरड जमातीचा होता. त्याच्याच काळात विजयनगर राज्याचा परमोत्कर्ष साधला गेला. दक्षिण भारतात बेरडांची ३६ संस्थाने होती. शहाजी महाराजांचा सारा कालखंड कर्नाटकात गेला, त्यांचे संपूर्ण सैन्य बेरडांचेच होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात पेरलेल्या स्वराज्याच्या स्वप्नाची प्रेरणा विजयनगरच्या साम्राज्यातूनच प्राप्त केलेली होती. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील अत्यंत महत्त्वाचे हेरखाते बेरड/रामोशी जमातीच्या बहिर्जी नाईकने सांभाळले. स्वतःचा जीव जोखमीत घालून आग्रा येथून सुटका करून घेण्यात शिवाजी महाराजांना सहाय्य करणारा हिरोजी फर्जंद बेरड होता. पेशवाईचा अस्त झाल्यानंतर इंग्रजी अंमलात एकामागून एक संस्थाने खालसा होऊ लागली. सैनिक बेकारीच्या खाईत लोटले गेले. उत्तर कर्नाटक आणि महाराष्ट्रात असलेल्या संस्थानिकांच्या सैन्यात बहुतांशी सैनिक बेरड रामोशी समाजाचे होते. त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. कित्तूरची राणी चेन्नम्मा हिने बेरडांच्या वतीने ब्रिटीशांशी झुंज दिली. याच काळात हा समाज जंगलवासी झाला. ब्रिटीशांवर छापे घालण्याच्या कामामुळे त्याच्यावर दरोडेखोरीचा शिक्का बसला. उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात रामोशांचे बंड झाले. क्रांतीवीर वासुदेव बळवंतांच्या बंडामध्ये मांगाबरोबर रामोशीही होते. १८५७ च्या स्वातंत्र्य समरातही हा समाज त्वेषाने लढला. त्यामुळे ब्रिटिश शासनाची वक्रदृष्टी त्यांच्यावर होती. डोंगर–दऱ्यांचा आश्रय आणि दारू गाळणे, चोरी करणे त्यांचे उपजीविकेचे साधन बनले. या लढावू जमातीचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रजांनी १८७१ साली गुन्हेगारी कायदा संमत केला. या कायद्यांतर्गत समाजातील पुरुषांना दिवसातून तीनदा पोलीस ठाण्यावर हजेरी देण्याची सक्ती लागू केली गेली. ती थेट १९५७ पर्यंत चालू होती. सेटलमेंटमध्ये बेरड समाज अन्य भटक्या जमातींच्या बरोबर बंदिस्त झाला.

स्वातंत्र्यानंतर रामोशी बेरडांची अवहेलना आणि भटक्या बांधवांची विटंबना चालूच राहिली. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित मुक्तीच्या लढ्याचीही व्याप्ती भटक्या समाजापर्यंत पोचू शकली नाही. पारधी, कैकाडी, गोंधळी, वडार, कोल्हाटी, डोंबारी, बेरड, रामोशी यासारख्या असंख्य भटक्या जमाती झुंजार, लढाऊ असूनही हा समाज रानावनात–दऱ्याखोऱ्यातच भटकत राहिला. स्वातंत्र्याचे, प्रगतीचे, समृद्धीचे वारे त्यांच्यापर्यंत पोहोचले नाही. कुठेही चोरी झाली, दरोडा पडला तर गावातल्या बेरडांना पोलीस उचलून नेत व त्यांचा अमानुष छळ करीत. पोलीस अत्याचाराने काही रामोशांचे मृत्यू होत असत. १९६६ साली इंडॉल कंपनीने बेळगावच्या आसपासच्या परिसरातून सुमारे १६०० एकर जमीन संपादन केली होती. यात अनेक जातीधर्माच्या लोकांच्या जमिनीचा समावेश होता. जवळपासच्या ७–८ खेड्यातून हे जमिनीचे हस्तांतरण झाले परंतु, त्याचा फारसा मोबदला लोकांना मिळाला नव्हता. शेती हेच रोजीरोटीचे साधन होते व तेही हिरावून घेतले गेल्यामुळे बेरोजगारी व उपासमारीची पाळी आली होती. समाज असंघटीत असल्यामुळे या अन्यायाविरोधात कोणी आवाजही उठवत नव्हते. हाच प्रश्न हाती घेऊन गस्तींनी समाज संघटीत करायला सुरुवात केली. या अन्यायग्रस्तांचे गाऱ्हाणे घेऊन आम्ही इंडॉलच्या व्यवस्थापनाकडे गेलो. कलेक्टरांना निवेदन दिले. हळूहळू संघटित चळवळीचा दबाव वाढू लागला. तलाठी, मामलेदार यांच्या गाठीभेटी घेऊन जमिनीची कागदपत्रे तयार करून घेतली. त्या आधारे इंडॉल कंपनीकडे नुकसान भरपाई नको, तर अन्यायग्रस्तांना कंपनीत नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत असा आग्रह धरला. त्यासाठी अर्ज, विनंत्या, धरणे, मोर्चे असे आंदोलन सर्व मार्ग चोखाळले. या चळवळीत समाजाचे सर्व अन्यायग्रस्त घटक समाविष्ट झाले होते. त्या चळवळीतील विधायकतेमुळे यश मिळत गेले. सुमारे १३०० लोकांना काम मिळाले. शेकडो कुटुंबांना नुकसान भरपाई मिळाली. एक लढा यशस्वी झाला. भटक्यांच्या चळवळीला बळ मिळाले.

१९७५ च्या जून महिन्यात देशात आणिबाणी लागू झाली. वास्तविक गस्ती सामाजिक चळवळीत होते. पण ते राष्ट्रीय स्वयं संघाशी संबंधित होते. त्यांना अटक झाली. १९ महिने गुलबर्गा येथे कारावास घडला. तुरुंगात असताना बेळगावचे श्री. राम आपटे व

धारवाडचे श्री. वामनराव देशपांडे यांच्याशी संबंध आला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा प्रभाव गस्तींवर पडला. गस्तींच्या चळवळीमुळे शेकडो हातांना काम मिळाले. पण या विधायक कामाला प्रसिद्धी मात्र मिळाली नाही. या सीमा प्रश्नावरील लढ्यात लाठी हल्ला झाला तरी मोठी बातमी होई. उलटपक्षी बेरडांना गोळ्या घालून ठार मारले तरी ती बातमी होत नसे. ही चळवळ समाजासाठी आहे. आपण हक्कासाठी भांडतो, झगडतो आहोत याचे भान ठेवून लोकसंघर्ष समितीच्या माध्यमातून भटक्यांचा संघर्ष चालू होता. या चळवळीचे फलित म्हणजे बेरड जमातीमधील लोकांना अन्यायाची जाणीव झाली तर त्याविरूद्ध लढा देता येतो हे त्यांच्या लक्षात आले. रोजगार मिळाल्यामुळे हजारो बेरड लोकांना सुखसमृद्धीची कवाडे खुली झाली. चोर, दरोडेखोर म्हणून गणल्या गेलेल्या समाजाला जीवन जगण्याचे साधन मिळाले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळले व पुढची पिढी शिक्षणाच्या प्रक्रियेत सामील झाली. आर्थिक उन्नतीचे मार्ग मोकळे झाले. हे परिवर्तन चळवळीमुळे घडून आले.

१९७७ साली कारावासातून सुटका झाल्यानंतर देखील हैदराबाद येथील संशोधन संस्थेने गस्तींना सन्मानाने नोकरीत परत बोलावले. पण आता नोकरी करणे शक्य नसल्याने नोकरीचा राजीनामा देऊन गस्तींनी सार्वजनिक कार्याची दिशा पक्की केली.

१९७७ नंतर खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळ उभी राहिली. गस्तींनी बेळगाव, विजापूर, कोल्हापूर, सांगली या भागात जेथे जेथे बेरड–रामोशी समाजाची वस्ती आहे तेथे दौरा केला. या भागातील बेरडांची दु:खं, दैन्यावस्था पाहिली. हा समाज देव आणि धर्म मानणारा आहे, वचनाला पक्का आहे. पोटाला पुरेसे मिळत नाही म्हणून गुन्हेगारीकडे तो वळला आहे. गुन्हेगारी ही त्याची वृत्ती नाही. परिस्थितीने त्याला तसे बनवले. प्रकल्पग्रस्त भागातील प्रश्न वेगळे आहेत. डोंगराळ भागातील प्रश्न वेगळे आहेत. डोंगराळ भागात पाळेगार, ठाकूर, देशमुख हे प्रामुख्याने वेठबिगारी व शेतमजुरी करतात. काही अल्पभूधारक आहेत. खेड्यापाड्यातून जात पंचायतीचे वर्चस्व होते. मात्र या भागात विकासाचे काम होत नव्हते. या समाजाच्या नीति–अनीतिच्या कल्पना सैल होत्या. बेरडांच्या बायका पळवून नेल्या तरी त्याचे कोणाला काही वाटत नसे. रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचा समाजावर वरचष्मा होता. तर जातपंचायतीच्या परंपरागत दृष्टिकोनामुळे त्रासच जास्त होता. ही परिस्थिती पाहिल्यानंतर गावागावातील समजदार व प्रतिष्ठित समाजबांधवांशी बोललो. समाजाला सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांविषयी, अन्यायाविषयी चर्चा होऊ लागली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही आम्हाला पोलिसांच्या लाथा आणि गोळ्या खाव्या लागतात. असे प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण केले. यातून आपल्या समाजाला बाहेर काढले पाहिजे, गावोगावच्या समाजबांधवांची एक बैठक यमुनानगर येथे आयोजित केली. इंडॉलच्या प्रकल्पग्रस्तांचे जे पुनर्वसन झाले, जे परिवर्तन झाले ते सारे या प्रतिनिधींना प्रत्यक्ष पहावयास मिळाले. भाषणे, चर्चा यांनी ते साध्य होऊ शकणार नाही ते या प्रत्यक्ष उदाहरणाने साध्य झाले. प्रथम पोलिसी अत्याचाराविरुद्ध लढा देण्यासाठी सर्वांना सिद्ध केले. त्यांना शेतीचे शिक्षण दिले. शासनाकडे डोंगराळ पडीक जमिनीची मागणी केली. त्यासाठी मोर्चे, निवेदने, धरणे यासारखे सनदशीर मार्ग अवलंबिले. १९७८ ते १९८२ पर्यंत या चळवळीचे जे स्वरूप राहिले त्यामुळे पोलिसी अत्याचार कमी झाले. समाजात अन्यायाविरुद्ध जागृती उत्पन्न झाली. दारू गाळणे, चोऱ्या करणे हे पारंपरिक धंदे कमी झाले.

शासनाकडून जमिनी मिळाल्यामुळे रोजगार वाढला. कष्ट करण्याची सवय लावली. मैलोनमैल चालत जाण्याची शिकवण दिली. काहीही आयते वा फुकट घ्यायचे नाही, कष्ट करूनच रोजीरोटी मिळवायची हे त्यांच्या मनावर ठसविले. हळुहळू शिक्षणाकडे ओढा निर्माण होईल यासाठी प्रयत्न केले. त्यांच्यात संस्काराची ओढ निर्माण झाली. कार्य प्रत्यक्षात उभे राहण्यासाठी काही रचना उत्पन्न करणे आवश्यक होते. गाव समिती, त्यातून गाव प्रतिनिधी, ५ गावांचा एक गट, ५ गटांचा १ विभाग व विभाग प्रतिनिधींची केंद्रीय समिती अशी ती रचना होती. औपचारिक संघटन व पदाधिकारी अशी रचना नव्हती, कारण त्यात पुढेमागे लाभ, पदे–मालमत्ता यावरून फाटाफूट होण्याची व मूळ उद्दीष्ट बाजूला पडण्याची शक्यता होती. ही कार्यकर्त्यांनी स्वयंप्रेरणेने चालविलेली सामाजिक चळवळ राहिली पाहिजे यावर सर्वांनी भर दिला. अत्याचार मुक्ती, शेती, शिक्षण, पुनर्वसन व रोजगार या चळवळीच्या पंचसुत्रीने कार्यकर्त्यांच्या विचाराला व कार्याला दिशा मिळाली. संघटीत शक्तीचे चांगले परिणाम दिसू लागले. प्रकल्पग्रस्त, डोंगराळ भागातील वस्ती, स्त्रिया यांच्या प्रश्नांचे स्वरूप वेगवेगळे होते. त्यामुळे त्यांच्या चळवळींचे स्वरूपही वेगळे राहीले. उत्तर कर्नाटक, कोल्हापूर व सांगली येथे या समाजाची संख्या मोठी होती. त्यामुळे जमिनीचे लढे या भागात लढले गेले. कोल्हापूर जिल्ह्यात याचे प्रमाण सर्वात जास्त होते. एका बाजूला पोलिसी अत्याचारापासून मुक्ती व दुसऱ्या बाजूला रोजगार मिळवून देणे अशा दुहेरी पद्धतीने ही चळवळ पुढे जात राहिली. १९८३ पासून या समाजाचा समावेश अनुसूचित जमातीत करून घेण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले. १९८५ साली रामकृष्ण हेगडे मुख्यमंत्री असताना याविषयीचा ठराव विधानसभेत संमत झाला. १९८९ साली तत्कालीन पंतप्रधान श्री. राजीव गांधी बेळगावला आले तेव्हा हजारो समाजबांधवांनी त्यांच्यासमोर शांततापूर्ण निदर्शने केली. चंद्रशेखर व देवेगौडा यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात म्हणजे १९९१ साली या समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश व्हावा यासाठी केलेली चळवळ यशस्वी झाली. शिक्षण व नोकरी यात आरक्षणामुळे संधी उपलब्ध झाल्या. चळवळीने मार्ग आखून दिला. चळवळ चिकाटीने चालविल्यामुळे अनेक प्रश्न सुटले, अनेक प्रश्न मार्गी लागले.

१९८७ पर्यंत बेरड समाजात काम करणारा कार्यकर्ता म्हणून प्रतिष्ठा लाभली. ज्ञान प्रबोधिनी या स्वरूपवर्धिनीचे संचालक व रा. स्व. संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक यशवंतराव लेले यांची या काळात गस्तींची ओळख झाली. त्यांनी सामाजिक कार्याची जी दृष्टी गस्तींना दिली. त्यामुळे चळवळीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलून गेला. भीमराव गस्ती हिंदूत्वाकडे वळले. यशवंतराव लेले अत्यंत कडक. त्यांच्या सहवासात सामाजिक कार्यासंबंधी गस्तींच्या कल्पना स्वच्छ व स्पष्ट होत गेल्या. सरकारी मदतीशिवाय व लोकसहभागातून जीवनाचा विकास करण्याचे व त्यासाठी पडेल ते कष्ट करण्याचे महत्त्व कळाले. 'उत्थान' संस्थेच्या मार्फत सुरू झालेल्या चळवळीचे दोन भाग आहेत. एका भागात या भटक्या समाजाला स्थैर्य मिळवून देण्यासाठी सरकारी योजनांच्या माध्यमातून घरे बांधून दिली. त्यांना छोटे–मोठे व्यवसाय व रोजगार उपलब्ध करून दिले. दुसऱ्या बाजूला मामलेदार, जिल्हाधिकारी, मंत्री, मुख्यमंत्री यांच्या कार्यालयावर व्यावहारिक मागण्या घेऊन मोर्चे काढले. संघर्ष उभा केला. पोलिसांच्या विरोधातही संघर्ष होता. (मुलाखत – भिमराव गस्ती, कुबनूर, बेळगाव.)

**सारांश** :– १९७८ ते १९८७ हा कालखंड बेरड समाजाच्या चळवळीचा धगधगता कालखंड होता. हजारो समाजबांधवांचे इतके शिस्तबद्ध मोर्चे कोणी कधीच पाहिले नव्हते. कायदा तोडणे नाही, दगडफेक नाही पण आपल्या न्याय मागण्यावर ठाम, यातून चळवळीची वीण घट्ट होत गेली. यशवंतराव लेले यांच्या

सहवासातून चळवळ ही संस्कारित असली पाहिजे याचा बोध झाला. ही संस्कारमालिका रा.स्व. संघाच्या माध्यमातून सहज उपलब्ध आहे, हे लक्षात आले. त्यातून गस्ती संघाकडे गेले आणि आज त्यांचे अवीचल निष्ठेत रूपांतर झाले आहे. गस्तींच्या कामाचे मोल ओळखून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांना सामाजिक कार्याची दृष्टी दिली. यामुळे गस्तींना स्वत:ला व कार्यकर्त्यांना लाभ झाला असा दावा गस्ती करतात. एकंदरीत, सीमाभागात गस्तीमुळे भटके राष्ट्रीय स्वयं संघाच्या माध्यमातून चळवळ करू लागले. तर महाराष्ट्रात इदाते वगैरे राष्ट्रीय स्वयं संघाचा विचार भटक्यांच्यात घेऊन गेले. परिवर्तनाच्या चळवळीमध्ये 'सैनिक' निर्माण करण्याऐवजी गस्ती हे राष्ट्रीय स्वयं संघामध्ये गेल्याने त्यांनी भटक्यांच्या चळवळी 'सेवक' निर्माण केले.

भटक्या विमुक्तांच्या चळवळीचा इतिहास हा १७ व्या शतकापासून सुरू झाल्याचे दिसते. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी जो आदिवासी समाज हा आपल्या क्षेत्रात जीवन जगत होता. या जगण्याचा आधार हा जंगल होता. जंगलाच्या साहाय्याने जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या जीवनावर ब्रिटिश सरकारने आक्रमण करण्यास सुरुवात केली. या आक्रमणास विरोध करण्यातून भटक्या विमुक्तांची चळवळीची सुरुवात झाली.

आक्रमक आदिवासींचा बंदोबस्त करण्यासाठी ब्रिटिशांनी गुन्हेगारी जमाती म्हणून कायदे केले. या कायद्यांना जमातींनी विरोध केलाच तसे भारतीय न्यायव्यवस्थेमधील न्यायाधिश यांनीही या अमानवी कायद्यांना विरोध केला होता. न्यायाधिश या बुद्धिजीवी वर्गाचे लक्ष जेंव्हा १८७१ च्या गुन्हेगार कायदा आणि त्यातील तरतुदीकडे गेले. तेंव्हा भटक्या विमुक्तांच्या चळवळीला एक विधायक दिशा मिळत गेली. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले होते. तरीही तीन तारेच्या कंपाऊंडमध्ये डांबून ठेवलेल्या जमातींना स्वातंत्र्यप्राप्त झाले नव्हते. या जमातींना आता तरी स्वातंत्र्य देण्यात यावे. यासाठी वसाहतीमधील पहिली पिढी आक्रमक झाली आणि १९५२ ला गुन्हेगार जमाती कायदा रद्द करण्यात आला. परंतु, प्रत्यक्षात १९६० ला तीन तारेच्या तुरूंगातून भटक्या विमुक्तांची सुटका करण्यात आली.

१९६० ला तीन तारेच्या तुरुंगातून सुटका करण्यात आली. परंतु, या जमातींना मुक्त केल्यानंतर या जमातींना नागरी सुविधांचे काय याचा विचार मात्र शासनाने केला नव्हता. हे खेदजनक होते

१९६० ला तीन तारेच्या तुरुंगातून मुक्त झालेल्या विमुक्त–जमातींच्या पुढे नवीन आव्हाने, नवीन समस्या निर्माण झाल्या. या जमातींचे जगण्याचे अस्तित्व नाकारले गेले. १९६० नंतर उद्‌भवलेल्या नवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी भटक्या विमुक्तांच्यातील साक्षर लोक ज्यांना जो मार्ग आणि विचारधारा जवळची वाटेल किंवा या विचारधारेमुळे आपल्या समाजाचे प्रश्न मार्गी लागतील वा आपल्या समाजाच्या प्रश्नांचे निराकरण होईल. त्या–त्या विचारधारेचे पाईक होण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला.

राष्ट्रीय सेवादल, समाजवादी, राष्ट्रीय सेवक संघ या समाज विचारांच्या विद्यापीठांकडे भटक्या विमुक्तांचे लोक वळले आणि या विचारांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्रिय झाले.

*संदर्भ :–*


१. *डॉ.जे.बी.अंबेकर, द ट्राईबल सिटयुएशन इन महाराष्ट्र ;अप्रकाशित निबंधद्ध, पृ.क्र.८.*
२. *व्ही. राघवय्या; १९६८, 'नोमॅड', पृ. क्र. १७३, १७४, प्रकाशन– भारतीय आदिम जाती सेवक संघ, सिकंदराबाद.*
३. *लक्ष्मन माने, १९९७, 'विमुक्तायन', पृ. क्र. १२५, प्रकाशन– यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.*
४. *कित्ता, पृ. क्र. १२६.*
५. *कित्ता, पृ. क्र. १२७.*
६. *कित्ता, पृ. क्र. १३०.*
७. *कित्ता, पृ. क्र. १३२, १३३.*
८. *भीमराव जाधव, २०१३, 'कथा काटेरी कुंपणाची', पृ. क्र. ६१, अनुबंध प्रकाशन, पुणे.*
९. *मोतिराज राठोड; २००५, 'गुन्हेगार जमाती कायदा आणि परिणाम', पृ. क्र. ३६, प्रकाशक– दुर्गादास गिरी, जालना.*
१०. *मुलाखत, बाळकृष्ण रेणके, दि. १९/११/२०१५, मुंबई.*
११. *विकीपिडीया, दि. १५/०२/२०१७.*
१२. *लक्ष्मन माने, १९८०, 'उपरा', पृ. क्र. २०, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.*
१३. *मुलाखत, भीमराव गस्ती, कुबनूर, बेळगाव.*

# ग्रामविकास कार्यक्रमविषयक स्थानिक प्रशासकीय यंत्रणेचा दृष्टीकोन

**डॉ. साहेबराव हिवाळे**, समाजशास्त्र विभाग, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि. औरंगाबाद. email: sahebhiwale@gmail.com

**सारांश** : ग्रामीण विकासाचे महत्त्व आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना लोकशाही मार्गाने साध्य करण्यासाठी सरकारने नियोजनबद्ध विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आणि त्यादृष्टीने विविध योजना राबविलेल्या आहेत. परंतू या योजनाची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होते किंवा नाही? तसेच लोक त्यास प्रतिसाद कशा पद्धतीने देतात? या सर्व बाबींचा उलगडा होण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधन लेखाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला आहे. शासकीय पातळीवर ग्रामविकासाच्या योजना आणि कार्यक्रम शासकीय कर्मचारी अणि अधिकारी वर्गाच्या अधिकारात असतात.प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याकरीता प्रशासकीय वर्गाचा सहभाग असल्याशिवाय हे कार्य शक्य होत नाही. शासनाच्या प्रत्येक योजनेत अणि कार्यक्रमात शासकीय कर्मचारी वर्ग अणि अधिकारी वर्ग समाविष्ट असतो. नव्हे तो एक भागच असतो. परंतू अशा प्रसंगी पूर्णपणे सहभाग अणि योगदान असणे कार्यक्रमाच्या यशस्वीतेच्या दृष्टिने आवश्यक असते. अनेक प्रशासकीय कर्मचारी आणि अधिकारी वर्ग देखील अधिकच्या लोकसंपर्कामुळे अशा कमातून स्वत:ची सूटका करून घेणे पसंत करतात. काही लोक केवळ कर्तव्याचा भाग म्हणून सहभाग नोंदवतात. तर काही लोक पूर्णपणे सहभागी होतात. प्रत्यक्ष क्षेत्रावर कार्य करावयचे असेल तर ते जिकरीचे वाटते त्यामूळे जास्तीत जास्त प्रशासकीय वर्गातील लोक कार्यालयीन सहभागालाच प्राध्यान्य देतात.

**प्रस्तावना:** प्राचीन तसेच मध्ययुगीन काळात भारतीय खेडी राजकीय दृष्टया व आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण होती. ग्रामीण समाजजीवन एकसंघ होते आणि सामूहिक हिताला प्राधान्य दिले जात होते.भारतीय समाजाची दुरावस्था ब्रटीश राजवट प्रस्थापित होण्याबरोबर वाढत गेली. कारण 'ब्रिटीश राजवटीपूर्वी या देशातील ग्रामीण समाज स्वतंत्र, स्वायत्त व स्वयंपूर्ण होता.''[१] ब्रिटीश राजवटीच्या काळात येथील ग्रामीण समाजाच्या अधोगतीला प्रारंभ होऊन समाजाचे विघटन होऊ लागले. व्यक्ती समूह केंद्रीतेकडून आत्मकेंद्रीत बनू लागले. या ग्रामीण समाज जीवनाच्या विकासासाठी वेगवेगळया पातळीवर प्रयत्न सुरू झाले. ते स्वातंत्र्यपूर्व काळातील इटावा प्रोजेक्ट, फरिदाबाद कॅम्प, फिरका प्रोजेक्ट इत्यादींच्या रूपाने दिसून येतात. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण समाजाचा मागसलेपणा दूर करण्यासाठी आणि समाजातील विविध सामाजिक समस्याचे निराकरण करण्यासाठी उपाय योजना करणे शासकीय पातळीवर आवश्यक होते. जवळपास ऐंशी टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास होती. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हते. कारण येथील ग्रामीण समाजाचा विकास म्हणजे पर्यायाने देशाचा, राष्ट्राचा विकास असेच सूत्र होते. ग्रामीण समाजातील दारिद्रिय, बेकारी, निरक्षरता, अज्ञान, रोगराई यासारख्या भंयकर समस्यांचे निमूर्लन केल्याशिवाय देशाचा विकास होणे असंभव होते.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत शोध निबंध पूर्ण करतांना अभ्यासकाने समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे. तथ्य संकलनासाठी प्रथम आणि दुय्यम अशा दोन्ही स्त्रोतांचा आधार घेतलेला आहे. प्राथमिक स्त्रोतांतर्गत ग्रामविकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणी प्रक्रियेत सहभागी असणारे एकूण ५० उत्तरदात्यांची सहेतूक नमुना निवड पध्दतीच्या साह्याने निवड करून त्यांच्याकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून तथ्य संकलित केलेली आहेत. त्याचप्रमाणे दुय्यम स्त्रोतांतर्गत संदर्भग्रंथ, अहवाल, इत्यादींचा वापर केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये:** १. प्रस्तुत शोधनिबंध खालील उद्दिदष्टे नजरेसमोर ठेऊन पूर्ण करण्यात आला आहे. २. ग्रामविकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणी प्रक्रियेचा अभ्यास करणे. ३. ग्रामविकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणी प्रक्रियेत येणाऱ्या मानवनिर्मित अडचणींचा अभ्यास करणे. ४. ग्रामविकास कार्यक्रमात स्थानिक नेतृत्वाच्या सहभागाची आवश्यकता तपासणे. ५. सिमांतिक समूहाचा ग्रामविकास कार्यक्रमाविषक प्रेरक घटक आणि प्रतिसाद तपासणे. याप्रमाणे संशोधनाची उद्दिष्टये निश्चित करून निष्कर्षापर्यंत जाण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीच्या व तार्कीकतेच्या आधारावर तथ्य संकलित करून वस्तुनिष्टपणे त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**ग्रामीण विकास** : ग्रामीण क्षेत्र अनेकार्थाने शहरी क्षेत्रापेक्ष भिन्न आहे. सर्वप्रथम ग्रामीण क्षेत्राची स्थिती, नातेसबंधाची व्यवस्था आणि नातेसंबंध व कुटुंब संस्था यातील सहसंबंधाच्या माध्यमातून निवासी क्षेत्र निर्माण झाले तेच पुढे ग्रामीण म्हणून ओळखले जावू लागले. एक कटू सत्य असे आहे की,''शहरी क्षेत्राचा विकास ग्रामीण क्षेत्राच्या किंमतीवर झालेला आहे.''[२] आधुनिक काळात मात्र नगर संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळे ग्रामीण क्षेत्राची अवहेलना होत आहे.

वास्तवत: ग्रामीण विकास हा विषय जुनाच आहे परंतू सातत्याने नवनवीन मुद्दे व विचारांच्या समावेशमुळे त्याचे नवीन आयाम समोर येत आहे. ग्रामीण विकासाची जुनी परिभाषा गावातील एकरूप समूहाच्या रूपाने पाहिली जात होती. या अज्ञानामुळेच ग्राविकास कार्यक्रम सुरूवातीच्या काळात अयशस्वी ठरलेत. जमीनदार, सावकार व प्रभुत्त्वशाली लोकांनीच ह्या कार्यक्रमांचा फायदा घेतला. उपेक्षित समूह मात्र उपेक्षितच राहिला.[३] कोप्प या अभ्यासकाने तर ग्रामीण विकासाला अशा प्रक्रियेच्या रूपाने परिभाषित केले आहे की, ''ज्याचा उद्देश, सामूहिक प्रयत्नाद्वारे शहरी क्षेत्रापासून बाहेर राहणाऱ्या लोकांची अवस्था सुधारणे तसेच त्यांना त्यांच्या उद्दिष्टांप्राप्ती साठी आवश्यक संधी उपलब्ध करून देणे हा आहे.''[४] पुढे ते असेही म्हणतात की, ग्रामीण विकासाचे अंतिम उद्दिष्ट लोक आहे. पायाभुत संसाधने नव्हे, त्यांच्या मतानुसार, ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट असे असावयास हवे की ज्या अंतर्गत लोकांसमोर अनेक पर्याय खुले असले पाहिजे.

**लोकसहभाग:** ग्रामीण विकास एकांगी विचार करून अशक्य आहे. विकास कार्यक्रमात जो पर्यत लक्षित समूहातील लोक सहभागी होत नाही तो पर्यंत विकास कार्यक्रमाला व प्रक्रियेला गती प्राप्त होत नाही. प्रस्तुत अध्ययनामध्ये, 'लोकसहभाग' या संकल्पनेस अशा प्रक्रियेच्या रूपाने विचारात घेतले आहे की, समाजात दूर्लक्षित, व्यक्ती, उदासिन व्यक्ती जो आजपर्यंत दैववादावर विश्वास ठेवत आला आहे. कर्मवादावर किंवा विज्ञानवादावर त्यांचा विश्वास नाही किंवा त्यास या घटना माहिती सुद्धा नाही. परंतू ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन पूर्णत: बदलले आहे. त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण झाली आहे आणि वर्तमान काळात हे व्यक्ती ग्राम विकासाच्या कार्यक्रमात किंवा योजनेत सहभागी होत आहेत. त्यास प्रतिसाद देत आहे. शेवटी असेच म्हणावे लागेल की ग्राम विकासाच्या प्रक्रियेतील सामान्य किंवा लक्षित व्यक्तिची भूमीका, स्थनिक नेतृत्त्वाची भूमिका आणि

अंमलबजावणीच्या स्तरावर प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची सक्रीय भूमिका म्हणजेच लोकसहभाग समजण्यात येईल.

लोकसहभाग हा केवळ प्रतिसादाच्या किंवा लाभार्जन या स्वरूपातीलच नव्हे तर काही वैयक्तिक लाभाचे ग्रामविकासात्मक कार्य असेल तेव्हा अशा कार्यक्रमात आर्थिक अंशदान देखील महत्त्वाचे ठरते. हे कार्यक्रम आर्थिक अशंदानाशिवाय किंवा भांडवलाशिवाय अपूर्ण असतात. तेव्हा अशा ग्रामविकासपूरक कार्यक्रमास दिलेला प्रतिसाद, त्यांचा घेतलेला लाभ व त्यातून साधलेला विकास पर्यायाने ग्रामीण विकास. ही सर्व प्रक्रिया 'लोकसहभाग' या संकल्पनेत अपेक्षित आहे. हे लक्षित समूहाच्या संदर्भाने योग्य आहे. परंतू स्थानिक नेतृत्वाच्या दृष्टेपणाशिवाय ग्राम विकासाच्या योजना राबविणे, योजना अथवा कार्यक्रम पदरात पाडून घेणे व त्यांची यशस्वीपणे अंलबजावणी करणे हे सर्व कार्य स्थानिक नेतृत्व किती सक्षमपणे करतात यावर त्यांचा ग्राम विकास कार्यक्रमातील सहभाग ठरतो. ग्रामीण लोक उपेक्षित आहेत, स्थानिक नेतृत्त्वाचा दृष्टेपणा व कार्यतत्परता देखील असेल परंतू या विकासाच्या योजना व कार्यक्रम पूर्णपणे शासकीय स्तरावरून शासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात येतात. तेव्हा शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा ग्राम विकासाच्या योजना अथवा कार्यक्रमाप्रती दृष्टिकोन काय आहे? व ते भूमिका कशा प्रकारे निभावतात यावर त्यांचा सहभाग निश्चित होतो.

ग्रामीण विकासासाठी तिन्ही स्तरावरील लोकांच्या म्हणजेच प्रशासकीय स्तरावरील लोक, स्थानिक नेतृत्व आणि सामान्य ग्रामीण लोक यांचा सक्रीय सहभाग असल्याशिवाय, कुठल्याही ग्रामीण विकासाची योजना किंवा कार्यक्रम निश्चित ध्येयापर्यंत जावू शकत नाही.

**लोकसहभागाची आवश्यकता:** भारतामध्ये ग्रामीण समुदायाच्या विकासासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न झालेले आहेत. स्वातंत्र्यानंतर देखील देशाची सर्वांगीण प्रगती घडून आणण्याच्या उद्देशाने व लोकशाही मार्गाने कल्याणकारी राज्याची निर्मिती करणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारत सरकारद्वारे नियोजनबध्द विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्याचाच भाग म्हणजेच पंचवार्षिक योजना होय. देशात पहिली पंचवार्षिक योजना १९५१ मध्ये सुरू करण्यात आली होती. पंचवार्षिक योजनांची यशस्वी वाटचाल ही पूर्णत: ग्रामीण विकासावर अवलंबून आहे याची जाणीव भारतातील राज्यकर्त्यांना व विचारवंतांना लवकरच झाली. कारण भारतातील ८० टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्यास असल्याने जोपर्यंत ग्रामीण समाजाचा मागासलेपणा दूर होऊन त्यांच्या विकासाला चालना मिळत नाही तो पर्यंत देशाची सर्वांगीण प्रगती होणे शक्य नाही. ''तेव्हा पंचवार्षिक योजनांना गती प्राप्त करून देण्यासाठी व देशाचा विकास घडवून आणण्यासाठी सरकारने २ ऑक्टोबर १९५२ रोजी समुदाय विकास कार्यक्रमांना सुरूवात केली.''[५] समुदाय विकास कार्यक्रमास सुरूवात होणे खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाच्या क्षेत्रामध्ये क्रांतीकारक योजना होती. परंतू काही कालावधी नंतर या कार्यक्रमाचे फलित बघितले तेव्हा समोर आलेली माहिती अतिशय महत्त्वाची होती आणि ती म्हणजे प्रस्तुत कार्यक्रम समाजाच्या अंतिम घटकांपर्यंत पोहचण्यास आलेले अपयश. या अपयशाची कारणमिमांसा केल्यानंतर निश्चित लोकसहभागाची आवश्यकता काय आहे? याची जाणीव होते.

**कार्यक्रम अंमलबजावणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी आणि दबाव:** शासकीय कर्मचारी ग्रामविकासाचे कार्यक्रम राबवितांना पूर्णपणे मुक्त नसतातच. त्यांच्यावर कायद्याचे नियंत्रण असते. असे नियंत्रण असणे आवश्यक असले तरी अनेकदा या बाबी अतिरेक करतात. त्यामुळे प्रशासकीय कर्मचाऱ्यांना ग्रामविकास कार्यक्रम राबवितांना अनेक अडथळयांचा सामना करावा लागतो. प्रशासकीय रचनेमध्ये समाविष्ट असलेले स्थानिक नेतृत्व देखील अधिक प्रमाणात स्वार्थासाठी असे अडथळे निमार्ण करतात आणि अनेकदा दबाव तंत्राचाही वापर करतात. यामध्ये गावचा सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतचे इतर सदस्य, नागरीक, वरिष्ठ अधिकारी इत्यादींचा समावेश असतो. अशा प्रकारे अडचणी आणि दबावाची वास्तविक पातळी काय आहे? हे तपासण्यासाठी ग्राविकास कार्यक्रमातील सहभागी प्रशासकीय लोकांच्याकडून माहिती प्राप्त करुन त्याविषयीचे विवरण खालील तक्त्यात नमूद केले आहे.

तक्ता क्र. १

ग्रामविकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत येणारे अडथळे

| अ. क्र. | अडथळा निमार्ण होतो काय? | अडथळा/दबाव निर्माण करणारे | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | नाही | | १७ | ३४ टक्के |
| २ | होय | सरपंच | १० | २० टक्के |
| | | वरीष्ठ अधिकारी | १० | २० टक्के |
| | | इतर सदस्य | १२ | २४ टक्के |
| | | मजूर | ०१ | ०२ टक्के |
| एकूण | | | ५० | १०० टक्के |

ग्रामविकासाच्या कार्यक्रमात प्रशासकीय स्तरावरुन सहभाग घेतांना प्रशासकीय कर्मचारी आणि अधिकारी वर्गास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत अडथळा येत नसल्याचे केवळ १७, (३४ टक्के) उत्तरदाते म्हणतात्. ज्या उत्तरदात्यांना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत अडथळे येत नाहीत असे प्रशासकीय कर्मचारी व अधिकारी प्रभावी असून संघटनात्मक स्तरावर त्यांचा प्रभाव आहेत व त्याचप्रमाणे हे कर्मचारी आणि अधिकारी ज्या गावाच्या संबंधित आहेत. एकतर त्या गावातील सरपंच आणि ग्राम पंचायतचे इतर सदस्य प्रभावहीन असल्यामुळे ते सक्रीय नसतात. बहुतांश म्हणजेच ५०पैकी ३३, (६६ टक्के) उत्तरदात्यांना ग्रामविकासाशी संबंधीत कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना अडथळा आणि दबाव येत असल्याचे दिसून येते. त्यात सर्वाधिक दबाव आणि अडथळा आणणाऱ्याचे प्रमाण ग्रामपंचायत सदस्याचे असून ते १२, (२४ टक्के) इतके आहेत. त्याखालोखाल सरपंच आणि वरीष्ठ अधिकारी हे देखील त्यांच्या हितसंबंधासाठी दबाव आणि अडथळा निर्माण करतात. त्याचे प्रमाण प्रत्येकी १०, (२० टक्के) असल्याचे आढळून आले आहे. तर अल्पप्रमाणात मजूर वर्ग देखील कार्यक्रमाच्या अमंलबजावणी प्रक्रियेत अडथळा आणि दबाव निमार्ण करत असल्याचे १, (२ टक्के) प्रशासकीय उत्तरदाते सांगतात.

यावरुन असे सिद्ध होते प्रशासकीय लोक ग्रामविकासाचे कार्य करत असतांना त्यांच्या कार्यात वरीष्ठ अधिकारी आणि गावचा सरपंच हे बहुतेक वेळा जबाबदार कर्मचाऱ्यांना वेठीस धरतात.

**ग्रामविकासाच्या योजना व कार्यक्रमासंबंधी निर्णय प्रक्रियेत सामान्य लोकांचा सहभाग:** ग्रामविकासाच्या योजना अथवा कार्यक्रम अंमलबजावणी जरी पूर्णपणे कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर सोपविलेली असली तरी ते मनमानी निर्णय घेवू शकत नाही. तर स्थनिक लोकांच्या गरजा, स्थानिक संसाधने इत्यादींच्या विचार करुनच कार्यक्रम राबविणे आवश्यक असते. अशा वेळेस निर्णय प्रक्रियेत सामान्य लोकांना देखील समाविष्ट करुन घ्यावे लागते. परंतू सामान्य लोकांचा अनुभव, शैक्षणिक स्तर व त्यांच्यातील निर्णयक्षमता इत्यादीमुळे योग्य निर्णय होईलच यांची शाश्वती नसते.

उलट प्रशासकीय कर्मचारी वर्गास त्रास होण्याची शक्यता अधिक असते.

ग्रामविकासाच्या कार्यक्रमात पंचायतराजचे सदस्य, गावातील मजूर आणि प्रशासकीय यंत्रणा म्हणजेच प्रशासकीय कर्मचारी लोक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जबाबदार असतात. तेव्हा अन्य घटकांचा म्हणजेच स्थानिक राजकीय नेतृत्वाचा आणि विकासाच्या दृष्टीने ज्यांना रोजगार उपलब्ध करून दिल्या जातो अशा मजूरांचा सहभाग अथवा प्रतिसाद असणे आवश्यक आहे. त्याशिवाय ग्रामविकासाचे कोणतेही कार्य शक्य नाही. परंतू या तिन्ही घटकांचा समन्वय साधन्याचे कार्य प्रशासकीय कर्मचारी वर्गाच्या सक्रीय सहभागावर अवलंबून असते. त्यादृष्टिने माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे व त्या संबंधी वास्तवता खालील प्रमाणे विशद करण्यात आली आहे.

तक्ता क्र.२

ग्रामविकास कार्यक्रमात पंचायतराज सदस्य आणि मजूरांचा सहभाग

| अ. क्र. | सहभाग | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | समाधानकारक | १३ | २६ टक्के |
| २ | असमाधानकारक | २८ | ५६ टक्के |
| ३ | केवळ सदस्यांचा चांगला | ०४ | ०८ टक्के |
| ४ | केवळ मजूरांचा चांगला | ०५ | १० टक्के |
| एकूण | | ५० | १०० टक्के |

एकूण ५० उत्तरदात्यापैकी १३, (२६ टक्के) उत्तरदाते म्हणतात की, ग्रामविकास कार्यक्रमातील स्थानिक नेतृत्व आणि ग्रामीण लोकांचा सहभाग समाधानकारक आहे. बहुतांश म्हणजेच २८, (५६ टक्के) उत्तरदाते मात्र स्थानिक नेतृत्व आणि सामान्य लोकांच्या ग्रामविकास कार्यक्रमातील लोकसहभागाबद्दल असमाधान व्यक्त करतात. ४, (८ टक्के) उत्तरदाते म्हणतात की, अशा कार्यक्रमातील केवळ स्थानिक नेत्यांचाच सहभाग चांगल्या प्रमाणात असतो. सामान्य ग्रामीण लोक मात्र प्रतिसाद देत नाहीत तर ५, (१० टक्के) उत्तरदाते प्रशासकीय लोक म्हणतात की, केवळ सामान्य ग्रामीण लोकांचा ग्रामविकास कार्यक्रमातील सहभाग चांगल्या प्रकारे असतो.

यावरून असे स्पष्ट होते की प्रशासकीय उत्तरदात्या लोकांच्या अपेक्षेप्रमाणे सामान्य ग्रामीण लोक आणि स्थनिक नेतृत्त्व करणारे लोक देखील समाधानकारक स्तरापर्यंत ग्राम विकास कार्यक्रमात सहभागी झालेले दिसत नाही. हा सहभाग वाढविण्यासाठी प्रेरक घटक महत्त्वाचा असतो.

प्रशासकीय कर्मचारी म्हणजेच ग्राम स्तरावर ग्रामसेवक अथवा ग्रामविस्तार अधिकारी यांच्याकडे जेव्हा ग्रामविकासाच्या कार्यात लोकसहभागासाठी प्रेरक घटक कोणते? हे जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारला तेव्हा विविध प्रेरक घटक असल्याचे दिसून आले. त्यामध्ये पैसा, जागरूकता, शिक्षण, त्याचप्रमाणे इतर घटक की ज्यामध्ये लोकजागृती, अनुकरण इत्यादींचा समावेश आहे. म्हणजेच ग्रामविकास कार्यात ज्या लोकांनी सहभाग घेतलेला आहे त्यांनी कोणत्या घटकास प्रेरीत होऊन घेतला आहे? हे प्रशासकीय उत्तरदात्या कर्मचारी वर्गाकडून जाणून घेतले असता खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

तक्ता क्र. ३

ग्रामविकास कार्यक्रमातील सहभागासाठी प्रेरक घटक

| अ. क्र | प्रेरक घटक | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पैसा | १५ | ३० टक्के |
| २ | जागरूकता | १८ | ३६ टक्के |
| ३ | शिक्षण | १० | २० टक्के |
| ४ | जागरूकता/शिक्षण | ०७ | १४ टक्के |
| एकूण | | ५० | १०० टक्के |

एकूण ५० पैकी १५, (३० टक्के) उत्तरदात्यांना असे वाटते की ग्रामविकास कार्यक्रमातील सहभागासाठी लोकांना प्रेरणा देणारा घटक आर्थिक स्वरूपाचा फायदा आहे. म्हणजेच या उत्तरदात्यांच्या मते, स्थानिक नेत्यांना व ग्रामस्थांना जर आर्थिक फायदा होत असेल तर कार्यक्रमातील लोकांचा सहभाग निश्चित वाढतो. १८, (३६ टक्के) उत्तरदात्यांना असे वाटते की, ग्रामविकास कार्यक्रमातील लोकसहभागासाठी जागरूकता हा घटक प्रेरक ठरत आहे. १०, (२० टक्के) उत्तरदाते असे म्हणतात की, 'शिक्षण' हा घटक लोकसहभाच्या अनुषंगाने प्रेरक असून शिक्षणामुळे लोकांना सहभागाची जाणीव होते. तर ७, (१४ टक्के) उत्तरदात्यांना असे वाटते जागरूकतेबरोबरच शिक्षण देखील ग्रामविकास कार्यक्रमातील लोकसहभागासाठी प्रेरक ठरत आहेत.

म्हणजेच ग्राविकास कार्यक्रमात लोकांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आश्यक वाटते.

**सिमांतिक समूहातील लोकांचा ग्रामविकास कार्यक्रमातील सहभाग:** परंपरागत जाती व्यवस्थेच्या उतरंडीवर छोटया आणि एकरूप समूहाचे स्थान अतिशय कनिष्ठ स्तरावर राहिले आहे. असे जातीय समूह कनिष्ठ स्तरावर राहिलेले असल्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टया त्याची अवस्था हालाखीची असते. स्व मालकीची जमीन देखील अशा समूहाकडे असत नाही. त्यामुळे उदारनिर्वाहासाठी हया समूहांना शेतमजूर, वेठबिगार व अन्य प्रकारची असंघटीत क्षेत्रातील कनिष्ठ स्वरूपाची कामे करावी लागतात. महाराष्ट्र आणि आता संपूर्ण देशातील ग्रामीण भागात रोजगाराच्या संधीसाठी रोजगार हमी योजना कार्यन्वित असल्यामुळे अशा योजनाचा माध्यमातून अथवा कार्यक्रमाच्या माध्यमातून मनुष्यबळाचे कार्य करण्यासाठी कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या समूहामध्ये सिमांतिक समूहाचे प्रमाण किंवा या समूहातील लोकांचे प्रमाण अधिक असते काय? हे प्रशासकीय कर्मचारी वर्गाकडून जाणून घेतले असता प्राप्त होणारी माहिती खालील प्रमाणे दिसून आली.

तक्ता क्र. ४

ग्रामविकास कार्यक्रमात सिमांतिक समूहातील लोकांचा सहभाग

| अ. क्र. | सहभाग अधिक प्रमाणात असतो काय ? | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १६ | ३२ टक्के |
| २ | नाही | २५ | ५० टक्के |
| ३ | सांगता येत नाही | ०९ | १८ टक्के |
| एकूण | | ५० | १०० टक्के |

एकूण ५० पैकी केवळ १६, (३२ टक्के) उत्तरदात्यांनाच सिमांतिक समूहाचा किंवा समूहातील लोकांचा सहभाग ग्रामविकास कार्यक्रमात अधिक प्रमाणात असतो असे वाटते, तर २५, (५० टक्के) उत्तरदात्यांना मात्र अशा सिमांतिक समूहाचा अथवा समूहातील लोकांचा सहभाग ग्रामविकास कार्यक्रमातील रोजगार पूरक कार्यक्रमात नसल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे ह्या सिमांतिक समूहाचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन 'मजूरी' करणे हे आहे. त्यांना वर्ष भर रोजगारासाठी मजूरी करावी लागते. ग्रामविकासाचा कोणताही कार्यक्रम अथवा योजना वर्षभर रोजगाराची हमी देत नाही व मजूरी दर देखील प्रचलित श्रम बाजारापेक्षा कमी असल्यामुळे असे सिमांतिक समूह ग्रामविकास कार्यक्रमावर पूर्णपणे अवलंबून न राहता ते श्रम बाजारात असंघटीत क्षेत्रात रोजगार प्राप्त करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांचा ग्रामविकास कार्यक्रमातील सहभाग कमी प्रमाणात असतो. याविषयी तर ९, (१८ टक्के) उत्तरदात्यांना सांगता येत नसल्याचे देखील दिसून आले.

म्हणजेच ग्रामविकास योजना व कार्यक्रमातील रोजगारात सातत्याचा अभाव असतो व त्याचप्रमाणे मजूरीचा दर उपलब्ध श्रम बाजारापेक्षा कमी असतो त्यामुळे खरे गरजवंत लोक अशा कार्यक्रमापासून दूर जातात.

**लोकसहभाग आणि निर्णय प्रक्रिया संबंध:** कोणत्याही घटनेच्या अनुषंगाने निर्णय प्रक्रियेत एक हाती सत्ता असेल तर निर्णय प्रक्रिया गतिमान असते. परंतू ग्रामविकासाचा व्यापक व उदात्त हेतू असल्यामुळे ग्रामविकास कार्यक्रमाविषयी एकहाती निर्णय प्रक्रियेत प्रत्येक टप्यावर नियंत्रण असते. अशा प्रसंगी ग्रामविकासाच्या कार्यक्रमासंबंधी निर्णय प्रक्रियेत लोकांना सामावून घेतल्यास किंवा सहभागी करून घेतल्यास प्रशासकीय कर्मचारी वर्गाच्या मते, काय फरक पडतो? म्हणजेच अधिक प्रमाणात लोकसहभाग असेल तर निर्णय प्रक्रिया मंदावते काय? हे जाणून घेतले असता खालील प्रमाणे प्रतिसाद प्राप्त झाला आहे.

तक्ता क्र. ५

ग्रामविकास कार्यक्रमातील लोकसहभाग आणि निर्णय प्रक्रिया

| अ. क्र. | लोकसहभागाचा परिणाम | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निर्णय प्रक्रियेचा वेग मंदावतो | २७ | ५४ टक्के |
| २ | निर्णय प्रक्रिया गतिमान होते | १८ | ३६ टक्के |
| ३ | सांगता येत नाही | ०५ | १० टक्के |
| एकूण | | ५० | १०० टक्के |

ग्रामविकास कार्यक्रमात अधिक प्रमाणात लोकसहभाग असेल तर निर्णय प्रक्रियेचा वेग मंदावतो असे, एकूण ५० पैकी सर्वाधिक म्हणजे २७, (५४ टक्के) उत्तरदात्यांना वाटते. १८, (३६ टक्के) उत्तरदात्यांचे म्हणणे मात्र या उलट आहे कारण त्यांच्या मते, अधिकच्या लोकसहभागामुळे ग्रामविकास कार्यक्रमाची निर्णय प्रक्रिया मंदावत नाही तर ५, (१० टक्के) उत्तरदाते म्हणतात की याबद्दल काही निश्चित सांगता येत नाही.

म्हणजेच बहुतांश उत्तरदात्यांच्या मते, ग्रामविकास कार्यक्रमातील विविध टप्यावर लोकांचा सहभाग अधिक प्रमाणात असेल तर प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घ्यावे लागते. सर्वांचेच एकमत होत नाही, तेव्हा ग्रामविकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणी प्रक्रियेत समाविष्ट झालेल्या लोकांचा उद्देश व्यक्तिनिष्ठ भिन्न असू शकतो तेव्हा अशा प्रसंगी देखील निर्णय प्रक्रियेला अडवून धरले जाते कारण या ठिकाणी वैयक्तिक हित आणि प्रतिष्ठा आडवी येत असते. त्यामुळे अधिक प्रमाणात लोकसहभाग असेल तर ग्रामविकासाच्या योजनेची व कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रक्रिया मंद होते कारण निर्णय प्रक्रियेला गती मिळत नाही.

तक्ता क्र. ६

प्रत्यक्ष आर्थिक लाभाच्या कार्यक्रमात लोकसहभागाची स्थिती

| अ. क्र. | सहभागाचे प्रमाण | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अधिक असतो | ४२ | ८४ टक्के |
| २ | कमी असतो | ०५ | १० टक्के |
| ३ | सांगता येत नाही | ०३ | ०६ टक्के |
| एकूण | | ५० | १०० टक्के |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, प्रत्यक्ष आर्थिक लाभाच्या ग्रामविकास कार्यक्रमात लोकसहभागाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी एकूण ५० जबाबदार प्रशासकीय कर्मचारी यांना प्रश्न विचारून वास्तवता जाणून घेतली, तेव्हा एकूण ५० उत्तरदात्यापैकी ४२, (८४ टक्के)उत्तरदात्यांनी असे म्हटले की प्रत्यक्ष आर्थिक लाभाच्या कार्यक्रमात लोकसहभाग अधिक प्रमाणात असतो. तर केवळ ५, (१० टक्के) उत्तरदात्यांनाच हे मान्य नाही. कारण त्यांच्या मते प्रत्यक्ष आर्थिक लाभाच्या कार्यक्रमात लोकसहभाग कमी प्रमाणात असतो. तर ३, (६ टक्के) उत्तरदाते मात्र याबद्दल सांगता येत नसल्याचे म्हणतात. प्रत्यक्ष आर्थिक लाभ प्राप्त होतो. त्यांना दिर्घकालीन वाट पाहण्याची गरज नसते. तेव्हा अशा कार्यक्रमात लोकसहभाग अधिक प्रमाणात दिसतो. एखाद्या लाभार्थी किंवा ग्रामीण व्यक्तीला ग्रामविकासाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक लाभ झाला की, त्याप्रमाणेच इतरांना असा लाभ मिळावा ह्या हेतूने प्रेरित होऊन लोकसहभागाच्या प्रमाणात वाढ होत जाते.

**निष्कर्ष** : प्रस्तुत शोधनिबंधाचे खऱ्या अर्थाने जे फलीत अभ्यासांती समोर आले आहेत. त्यांची मांडणी निष्कर्ष रुपाने पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे. १. ग्रामविकासाच्या कार्यक्रमाची प्रशासकीय पातळीवरून अंमलबजावणी करतांना गावातील राजकीय नेतृत्व प्रशासनास वेठीस धरते. यामध्ये गावातील सरपंच व इतर ग्रामपंचायत सदस्य यांचा वाटा मोठा असतो. असे प्रस्तुत अध्ययनावरून दिसून आले. ६४ टक्के उत्तरदात्यानी अशा आशयाचे मत व्यक्त केले आहे. २. ग्रामविकास कार्यक्रमाचा हेतू हा दारिद्र निर्मूलन आणि रोजगार निर्मिती राहिला आहे. परंतू ५६ टक्के उत्तरदात्याच्या मते, या कार्यक्रमात लक्षित समूहाचा सहभाग असमाधानकारक आसल्याचे दिसून आले आहे. ३. ग्रामविकास कार्यक्रमातील असमाधानकारक सहभागाची कारणमिमांसा करतांना, जास्तीत जास्त लक्षित समुहाचा सहभाग वाढविण्यासाठी प्रेरक घटक म्हणून ७० टक्के उत्तरदात्यांनी शिक्षण आणि कार्यक्रमाविषयी जागरूकता या घटकांस महत्त्व दिले आहे. म्हणजेच ग्रामविकास कार्यक्रमात लोकसहभाग वाढविण्यासाठी शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. ४. ग्रामविकासाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना स्थानिक संसाधने आणि गरजा यांचा मेळ घालणे अपेक्षित असते. तेव्हा अशा वेळेस ग्रामसभेची भूमिका महत्त्वाची ठरते. ग्रामसभा म्हटले की, गावातील प्रत्येक नागरीक त्याचा सदस्य असतो, त्याचप्रमाणे ग्रामपंचायतचा ठराव यासारख्या प्रक्रियेने वेग मंदावतो व वेळेत किंवा प्रासंगिक ग्रामविकासाचे कार्यक्रम राबवतांना अडचणी निर्माण होतात. असे ६४ टक्के उत्तरदात्याने सांगितले आहेत. ५. प्रत्यक्ष आर्थिक लाभाच्या कार्यक्रमात लोकसहभाग अधिक प्रमाणात असतो व अशा कार्यक्रमास लगेच प्रतिसाद मिळतो असे ५० टक्के उत्तरदाते सांगतात. म्हणजेच व्यक्तीगत आर्थिक फायदा असेल तर लोकांच्या सहभागाचे प्रमाण वाढते परंतू राष्ट्र हिताच्या किंवा सार्वजनिक हिताच्या कार्यक्रमात मात्र लोक अपेक्षेप्रमाणे सहभागी होत नाही किंवा प्रतिसाद देखील देत नाही.

*संदर्भ :*


१. *पाटील व्ही, चुनखडे एन, (१९९०),ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ.क्र.१०४*

२. *Mehat S.R., (1984), Rural Development Policies and Programmes: A Sociological Perspective, New Delhi, Sage Publication, Page No.13*

३. *Maheshwari Shriram, (1985), Rural Development In India: A Public Approach, Sage Publication, New Delhi Page No.16*

४. *Jams H. Copp., (Dec.1972), Rural Sociology and Rul Development Pag No.515,33*

५. *पाटील व्ही, चुनखडे एन, (१९९०), ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ.क्र.१५४*

६. *Roy C.N., (March 1985), Rul Development Programme in India, Man & Development Vol.-I, Page No. 76-77.*

# महाविद्यालयीन स्तरावरील समाजशास्त्र अभ्यासक्रमाविषयी शिक्षकांची असलेली मानसिकता

**डॉ. मंजुषा मोतीराम नळगीरकर,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

**प्रस्तावना:—** समाजशास्त्र हे अलीकडच्या कळात विकसित झालेले एक शास्त्र असून अधिक वेगाने त्याचा विकास होत आहे असे दिसून येते. समाजशास्त्राला वैज्ञानिक दर्जा आहे. समाजशास्त्राकडे एक उपयोजित शास्त्र म्हणूनही बघितले जाते. समाजशास्त्र समाजाची उभारणी करण्यासाठी तसेच समाजशास्त्र सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करते. म्हणून समाजशास्त्राचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य रीतीने त्याचे अध्यापन करण्याची जबाबदारी समाजशास्त्राच्या शिक्षकांवर अवलंबून असते. अध्यापनाची परिणामकारकता मुख्यत्वे करून शिक्षकाची कार्यक्षमता (शैक्षणिक समर्थता वा सक्षमता) व विश्वासार्हता आणि अध्ययन करण्याच्या तयारीवर अवलंबून असते. अध्यापन हे अनेक चलांशी संबंधित आहे. ज्यात प्रामुख्याने अनेक बाबींचा समावेश होतो. जसे की, अभ्यासक्रमाचे स्वरूप, समाजशास्त्राच्या अध्यापनाचे स्तर (उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर, एफ.फिल., पीएच. डी. आणि व्यावसायिक अभ्यासक्रम), अध्यापनाचे माध्यम, उपलब्ध शैक्षणिक साहित्य, शिक्षक व विद्यार्थांची गुणवत्ता. या सर्वांचा कमीअधीक प्रमाणात अध्यापनावर प्रभाव पडतो. असे असले तरी समाजशास्त्र अध्यापनावर प्रभाव पाडणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे पदवी व पदव्युत्तर स्तरावरील समाजशास्त्राचा अभ्यासक्रम.

समाजशास्त्र अभ्यासक्रमाचा व अध्यापनाचा विषयाच्या विकास व गुणवत्तेशी घनष्ठि संबंध आहे. महाराष्ट्रातील इतर विभागांपेक्षा मराठवाडा विभागात समाजशास्त्र विषयाचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची तसेच अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचीही संख्या अधिक दिसून येते. यास्तव मराठवाडा विभागात समाजशास्त्र विषयाच्या अध्यापकांची पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाविषयी काय मानसिकता आहे, हे तपासणे हा या अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

**संशोधन पद्धती:—** प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी अन्वेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला.

**नमूना निवड व तथ्य संकलन:—** प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी सहेतुक व सोयीस्कर नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून मराठवाडा विभागातील पदवी व पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करणाऱ्या समाजशास्त्र विषयाच्या कायमस्वरूपी अध्यापकांना प्रश्नावली मार्फत काही विधानांसंबंधी अभिप्राय मागविण्यात आला होता. ज्याला ९२ शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

**तथ्य विश्लेषण:—** विधानाच्या माध्यमातून एखाद्या घटनेचा अभ्यास वा त्याचे विवेचन आणि विश्लेषणही केले जाऊ शकते. बऱ्याच वेळेस ते सार्वत्रिक स्वरूपाचे असू शकते. विधानाची पडताळणी करून पाहणे आवश्यक असते. अशाच प्रकारची काही विधाने विद्यमान समाजात समाजशास्त्र शविषयाच्या संबंधी आढळून येतात. त्यापैकी खालील आठ विधाने जी अभ्यासकांच्या (धनागरे डी. एन, नादराजाह एम, बेते आंद्रे, मदन टी. एन, राव एम. एस. ए, रेगे शिर्मिला, लक्ष्मन्ना सी, शाह ए. एम, सिंग योगेंद्र. इ) विविध अभ्यासांतून मांडण्यात आलेली आहेत, त्यांचा विचार येथे केलेला आहे. ही विधाने प्रामुख्याने अभ्यासक्रम आखणीच्या बाबतीत, गाईडचा विद्यार्थी आणि शिक्षकांकडून सर्रास होणारा वापर, शिक्षणाचे माध्यम, तुलनात्मक पद्धतींचा वापर, मुळ इंग्रजी लिखाणाचे भाशांतर इ. विषयांबाबतीतील होती आणि त्यावर अध्यापकांचे मत विचारले होते. दुसऱ्या आणि नेमक्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे ते या विधानाशी कितपत सहमत आहेत अशी विचारणा करण्यात आलेली होती.

**विधान १: अभ्यासक्रमाची आखणी मुख्यत: उपलब्ध असणारी पुस्तके आणि शिकवण्याचे साहित्य लक्षात घेऊनच केले जावे. —** मराठवाड्यातील विद्यापीठात पदवी व पदव्युत्तर स्तरावरचा अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांतील बराच असा भाग अंतर्भूत असतो, ज्या संदर्भात अध्यापन साहित्य व पुस्तके महाविद्यालयात उपलब्ध नसतात, त्यामुळे शिक्षकांना अध्यापनात अडचणी निर्माण होऊ शकतात. म्हणून अभ्यासक्रमाची आखणी मुख्यत: उपलब्ध असणारी पुस्तके आणि शिकविण्याचे साहित्य लक्षात घेऊनच केली जावी असा प्रकारचा एक विचार आहे. या संदर्भात शिक्षक उत्तरदात्यांना त्यांची मते विचारली असता ८९ उत्तरदात्यांनी आपली मते नोंदविली तर दोन उत्तरदात्यांनी ती अनुत्तरित ठेवलेली आहेत. ज्या उत्तरदात्यांनी मत व्यक्त केलेले आहे त्या ८९ उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक २९ (३१.५२ टक्के) व २८ (३०.४३ टक्के) शिक्षक उत्तरदात्यांनी अनुक्रमे सहमत व पूर्णपणे सहमत मत दर्शविले आहे. ०२ (०२.१७ टक्के) उत्तरदात्यांनी निश्‍चित सांगता येत नाही असे मत नोंदविले आहे. वरील मतांशी असहमत व पूर्णपणे असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे १९ (२०.६५ टक्के) व ११ (११.३५ टक्के) आहे. तुलनेने बहुतांशी उत्तरदात्यांनी वरील विधानाच्या बाबतीत अनुकूलता दर्शविलेली आहे. अभ्यासक्रमाच्या बाबतीत संबंधित ग्रंथांची जी अनुपलब्धता सांगण्यात येते ती साधारणपणे प्रादेशिक भाषेमधील असा त्याचा अर्थ आहे.

अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली असते. किंबहुना अपेक्षा अशी आहे की, संबंधित विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनी त्याबाबतीतील ग्रंथांची व लेखांची माहिती मिळवावी. अर्थात प्रयत्न केल्यास त्यावरील साहित्य मिळू शकते. इंटरनेट माध्यमातून ती बऱ्याच मोठया प्रमाणात संकलित होऊ शकते. तेव्हा वरील विधानास अनुकूलता दर्शविणाऱ्या उत्तरदात्यांना याबाबतीत जाणीवपूर्वक प्रयत्न करावे वाटत नाही. अर्थात मिळणारे साहित्य मोठया प्रमाणात इंग्रजीमधून असल्याने त्याबाबत फार विचार करण्याची त्यांना गरज वाटत नसावी असाही अर्थ निघू शकतो. मराठी भाषेतून साहित्य उपलब्ध असल्यासच त्याचा अभ्यासक्रमात समावेश करण्याचा विचार कदापि पटणारा नाही.

**विधान २: गाईडचा वापर परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांपुरताच मर्यादित आहे असे नाही तर तो वर्गात शिकविण्याच्या तयारी करणाऱ्या शिक्षकाच्या मध्येही मोठया प्रमाणात आहे. —** भारतातील समाजशास्त्राचा अध्यापनाचा दर्जा कसा आहे. यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या समितीने वेळोवेळी संशोधन करून अहवाल प्रकाशित केलेले आहेत. त्यात एक मुद्दा असा मांडला गेला आहे की, विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासासाठी व परीक्षेसाठी गाईडचा मोठया प्रमाणात वापर केला जातो. तसेच शिक्षकांमध्येही अध्यापनासाठी गाईडचा वापर केला जातो. मराठवाडयातील समाजशास्त्राच्या उत्तरदात्यांची या बाबतीत प्रतिक्रिया काय आहे हे येथे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. ज्यात वरील मताशी पूर्णपणे असहमत आणि असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. ते अनुक्रमे ३७ आणि २६ आहे. निश्‍चित सांगता येत नाही आणि अनुत्तरित याचे प्रमाण अनुक्रमे १५ आणि ०१ आहे. या उत्तरदात्यांनी याचे उत्तर देण्याचे सोयीस्करपणे

टाळलेले दिसून येते. या दोन्हीच्या तुलनेत पूर्णपणे सहमत व सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अतिशय अल्प आहे. नकारात्मक अशी प्रतिक्रिया ६३ (६८.४८ टक्के) उत्तरदात्यांनी दिलेली आहे. शिक्षक उत्तरदात्यांनी गाईड वापरणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षकांबद्दलच्या सर्वसामान्य धारणा आहेत असे न घेता त्यांनी स्वत:बद्दल (ते स्वत: अध्ययनाच्या तयारीसाठी गाईड वापरतात का?) ते घेतलेले असावे म्हणून मोठया प्रमाणात प्रतिकूल प्रतिक्रिया आलेली आहे असा सरळ सरळ अर्थ निघतो. याबाबतीत एकंदरीतच शिक्षक समुदायासाठी तो योग्य नाही म्हणून त्याबाबतीत त्यांनी त्याचा विरोध म्हणून तसे मत नोंदविलेले दिसून येते. कारण वरील विधान एका सर्वेक्षणातून आलेले आहे. गाईड वापरणारे असंख्य आहेत म्हणूनच बाजारात ती मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत हेच इथे सांगावयाचे आहे. प्रस्तुत अभ्यासातील बहुसंख्य उत्तरदाते ती सर्वसामान्य धारणा मान्य करीत नाहीत ही वेगळी बाब आहे.

**विधाने ३: अध्यापनाच्या दृष्टिकोनातून विषयाचे अभ्यासक्रम अवास्तव व व्यवस्थापन न करता येण्यासारखे असू नयेत.** — या संदर्भात मत विचारले असता ९२ उत्तरदात्यांपैकी ९० उत्तरदात्यांनी आपले मत नोंदविले ज्यात सर्वाधिक ५२ (५६.५२ टक्के) उत्तरदात्यांनी वरील विधानाला पूर्णपणे सहमती दर्शवली. त्याखालोखाल ३१ (३३.६९ टक्के) शिक्षक उत्तरदात्यांनी सहमती दर्शविली. अल्प प्रमाणातील ०५ (०५.४३ टक्के) उत्तरदात्यांनी असहमती दर्शविली.

बऱ्याच वेळेस अभ्यासक्रमात जो भाग शिकविण्याचा असतो तो दिल्या गेलेल्या वेळेत होतो किंवा नाही याचा विचार केलेला नसतो किंवा त्यात मोजक्या आणि महत्त्वपूर्ण बाबी लक्षात न घेता मोठया प्रमाणात व्यापकता असते अशा प्रसंगास अनुसरून ही मते उचित अशी आहेत.

**विधान ४: सिद्धांत व पद्धतीच्या अनुषंगाने असलेला अभ्यासक्रम हा पदव्युत्तर स्तरावरच असावा.** — पदवी समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात सिद्धांत व पद्धतीचा समावेश केलेला असतो. त्याची ओळख विद्यार्थ्यांना होणे आवश्यक असते. ते शिकविणे नको कारण पदवीपेक्षा पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी सिद्धांत व पद्धतीचा अभ्यासक्रम चांगल्या पद्धतीने आकलन करू शकतात तसेच हा अभ्यासक्रम पुढे ज्यांना एम. फिल., पीएच. डी. करावयाचे आहे त्यासाठी तो उपयुक्त ठरू शकतो म्हणून सिद्धांत व पद्धतीच्या अनुषंगाने असलेला अभ्यासक्रम हा पदव्युत्तर स्तरावरच असावा अशी एक धारणा असते. त्यादृष्टीने वरील विधान दिलेले आहे. यासंदर्भात ९२ उत्तरदात्यांपैकी ८८ उत्तरदात्यांनी आपली मते नमूद केली, ज्यात सहमत व पूर्णपणे सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे २६ (२८.२७ टक्के) व १९ (२०.६६ टक्के) आहे. असहमत व पूर्णपणे असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे २५ (२७.१७ टक्के) व ११ (११.९६ टक्के) आहे.

**विधान ५: पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमाचे शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच असावे.** — समाजशास्त्र हा विषय जेव्हा पदव्युत्तर स्तरावर शिकविला जातो तेव्हा या विषयाचे मूलभूत, सखोल आणि सविस्तर ज्ञान विद्यार्थ्यांना असावे या दृष्टिकोनातून ते देणे अपेक्षित असते. समाजशास्त्राचे मूलभूत ज्ञान व मांडणी इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध आहे. त्यामुळे पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमाचे शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच असावे अशी एक सर्वसाधरण धारणा यासंदर्भात दिसून येते. ९२ उत्तरदात्यांपैकी ९१ उत्तरदात्यांनी आपली मते नोंदविली. वरील विधानाशी सहमत व पूर्णपणे सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण जवळपास सारखेच आहे. त्यातील संख्या अनुक्रमे २१ आणि २२ आहे. वरील विधानांशी सहमत व पूर्णपणे सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे ३२ व १३ आहे. यावरून असे म्हणता येईल की ज्यांनी आपली मते नोंदविली त्या उत्तरदात्यांमध्ये अनुकूल आणि प्रतिकूल असणाऱ्या संख्या थोडया फरकाने सारखीच आहे. सरासरी ५० टक्के उत्तरदात्यांना पदव्युत्तर अध्यापनाचे इंग्रजी माध्यम असावे असे वाटते व ५० टक्के उत्तरदात्यांना इंग्रजी माध्यम नसावे असे वाटते. इंग्रजी भाषेतून असलेले विपुल साहित्य व मराठीतून दर्जेदार ग्रंथांची दुर्मिळता या वस्तुस्थितीची जाणीव असूनही इंग्रजी माध्यमाला नकारात्मकता दर्शविणाऱ्या शिक्षक उत्तरदात्यांच्या असहमतीमागे असलेली कारणे प्रामुख्याने दोन असावीत. एक तर या शिक्षक उत्तरदात्यांना पदव्युत्तर शिक्षण इंग्रजी माध्यमातून शिकविण्यासाठी व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी जास्तीची तयारी करावी लागणार आणि ती तयारी करण्याची त्यांची मानसिकता दिसून येत नाही. दुसरे असे की, पदव्युत्तर वर्गास प्रवेश घेणारे विद्यार्थी मराठी माध्यमातून आलेले असल्याने या विद्यार्थ्यांना अतिशय वेगळया प्रसंगांना सामोरे जावे लागणार परिणामत: त्याचा अभ्यासावर परिणाम होणार किंवा ते या विषयास आज जे बहुसंख्याकांनी प्रवेश घेतात ते येणार नाहीत ही भीती असावी.

**विधान ६: विद्यार्थ्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन व्यापक होण्यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि प्रादेशिकता अभ्यासताना तुलनात्मक दृष्टिकोनावर भर द्यावा.** — विशिष्ट घटनांच्या अभ्यासात जे विविध दृष्टिकोन पद्धतीशास्त्राचा भाग म्हणून अवलंबिले जातात त्यात व्यक्त घटनांचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व प्रादेशिकतेच्या स्तरावर योग्य आकलन होण्यासाठी तुलनात्मक पद्धतीचा अवलंब व्हावा वा भर देण्यात यावा असा एक आशय या विधानाचा आहे. या संदर्भात ९२ उत्तरदात्यांपैकी ९१ उत्तरदात्यांनी आपली मते मांडली. वरील विधानाशी पूर्णपणे सहमत व सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक अनुक्रमे ४७ (५१.०९ टक्के) व ३९ (४२.३९ टक्के) आहे. म्हणजे ८६ उत्तरदात्यांनी अनुकूल असे मत दर्शविलेले आहे. याउलट वरील विधानाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे.

**विधान ७: आजच्या स्पर्धेच्या जगात विविध स्तरांवरील पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या बाबतीत देशपातळीवर अभ्यासक्रमाच्या बाबतीत एकसारखेपणा (न्दपवितउपजल) असणे आवश्यक आहे.** — यासंदर्भात ९२ उत्तरदात्यांपैकी ९० उत्तरदात्यांनी आपली प्रतिक्रिया दिली. ज्यात सर्वाधिक ५२ (५६.५२ टक्के) उत्तरदात्यांनी वरील विधानाला पूर्णपणे सहमती दर्शविली. त्या खालोखाल २४ (२६.८ टक्के) उत्तरदात्यांनी सहमती दर्शविली. असहमत व पूर्णपणे असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे ०८ (८.६९ टक्के) व ०२ (२.१८ ) आहे.

राष्ट्रीय, राज्य व प्रादेशिक स्तरावर अभ्यासक्रमाची रचना विविध स्वरूपाची असते. त्यावेळेस विविध स्तरांवर विद्यार्थी स्पर्धेच्या बाबतीत मागे पडतात जसे की प्रादेशिक स्तरावर असलेल्या विद्यापीठात विद्यार्थी ग्रामीण भागांतून आलेले आहेत. त्यांची बऱ्याच बाबतीत आकलन क्षमता विशिष्ट प्रकारची असेल असे गृहीत धरून अभ्यासक्रम आखले जातात. त्यांना सहज समजेल, उमजेल वा पचनी पडेल वा झेपेल असा अभ्यासक्रम तयार करण्याकडे बऱ्याच अभ्यास मंडळांचा कल असतो व त्या पद्धतीने तो केलाही जातो. अशा विद्यापीठातून तयार झालेला विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर इतरांच्या स्पर्धेत उतरतो त्यावेळेस तो कमी पडतो. पण ग्रामीण वा

मागसलेली पार्श्वभूमी या सबबीखाली अभ्यासक्रम अतिशय वेगळया पद्धतीचा आखण्याचे टाळावे व त्याला स्पर्धेच्या दृष्टिकोनातून इतरांच्या बरोबर आणावे म्हणून देश पातळीवरील अभ्यासक्रमाच्या बाबतीत समानता असावी असा जो एक हेतू या विधानात आहे त्यास ७६ उत्तरदात्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. अनुभवांच्या पातळीवर मराठवाडा विभागात असे दिसून येते की, बहुतांशी शिक्षक ग्रामीण आणि मागासलेल्या भागांची सबब पुढे करून अभ्यासक्रम जास्तीत जास्त सोपा असावा असे मत मांडताना दिसतात. अभ्यास मंडळाच्या काही सदस्यांना (अभ्यासाचा भाग म्हणून नाही तर स्वतंत्रपणे) विचारले असता त्यांनी ही बाब प्रकर्षाने जाणवते असे सांगितले आहे. सध्या विद्यापीठ अनुदान आयोगाकडून राष्ट्रीय स्तरावरील जे समाजशास्त्र विषयाचे अभ्यासक्रमाचे मॉडेल आलेले त्याचा आधार घेऊन मोठया प्रमाणात बदल होताना दिसून येतात. ज्यामुळे विविध स्तरांवर जे अंतर दिसून येते ते कमी होईल अशी अपेक्षा आहे.

**विधान ८: प्रादेशिक स्तरावर समाजशस्त्राच्या अध्यापनासाठी संबंधित विषयावरील मूळ इंग्रजी लिखाणाचे मराठी भाषांतर होणे अत्यंत गरजेचे आहे. –** मराठवाडयात काहींचा अपवाद वगळता जवळपास सर्वच ठिकाणी पदवी व पदव्युत्तर स्तरावरील समाजशास्त्राच्या अध्यापनाचे माध्यम मराठी आहे. या पार्श्वभूमीवर या विधानाला जवळपास सर्वच (८९) उत्तरदात्यांनी अनुकूलता दर्शविलेली आहे हे विशेष. एका बाजूला देश पातळीवर अभ्यासक्रम सारखा असावा या विधानाच्या बाबतीत त्याची मिळालेली प्रतिक्रिया तर दुसऱ्या बाजूला शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच असावे या विधानाला असणारा प्रतिसाद हे लक्षात घेता उत्तरदात्यांची निश्चित भूमिका काय आहे याचा अंदाज घेणे अतिशय अवघड बाब आहे. तथापि अतिशय पहिले विधान जे की साहित्याची उपलब्धतेबद्दल आहे त्याबाबतीत उत्तरदात्यांचे मत लक्षात घेता ही बाब स्पष्ट होते की, शिक्षक उत्तरदात्यांना अध्यापनाच्या बाबतीत विशेष तयारी वा जास्तीचे कष्ट घेण्याची मानसिकता जाणवत नाही. त्याच वेळेस शिक्षकाच्या अस्मितेबाबत थोडी फार वास्तविकता सांगितल्यास अतिशय संवेदनशील झालेले दिसून येतात (या बाबी अतिशय ताकदीने नाकारता) व त्याची प्रचिती विधान क्रमांक दोनला दिलेल्या प्रतिक्रियांवरून दिसून येते.

वरील चर्चेवरून असे निदर्शनास येते की, मराठवाडयातील बहुसंख्य शिक्षकांना पदवी व पदव्युत्तर स्तरावरील समाजशास्त्र अभ्यासक्रमात बदल वा सुधारणा व्हावी असे वाटते. परंतु अभ्यासक्रम ठरवितांना बहुतेकदा अभ्यास मंडळ शिक्षकांच्या प्रतिक्रिया मागवत नाही त्यावर चर्चा ही करत नाही. याचाच अर्थ अभ्यासक्रम ठरवितांना केवळ अभ्यास मंडळाचीच भूमिका महत्त्वाची ठरते.

जर समाजशास्त्र विषयाचा गुणात्मक दर्जा उंचवायचा असेल तर त्याच्या अभ्यासक्रम व अध्यापनाच्या दर्जात सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी राष्ट्रीय, राज्य आणि विभागिय पातळीवर होणाऱ्या अधिवेशन वा परिषदांच्या माध्यमातून अभ्यासक्रमावर चर्चा झाल्यास अनेक बाबी साध्य होतील. मात्र हे समाजशास्त्र विषय शिक्षकांच्या तीव्र इच्छाशक्तीवर तसेच त्यांची मानसिकता बदलण्यावर अवलंबून आहे.

*संदर्भ सूची:–*


१. *धनागरे, डी. एन. १९९३. थिम्स अ‍ॅण्ड पर्स्पेक्टव्ह इन इंडियन सोशिऑलॉजी, जयपूर अ‍ॅण्ड न्यू दिल्ली : रावत पब्लिकेशन्स.*

२. *नादराजाह, एम. १९९६. 'नोटस् ऑन टीचिंग सोशिऑलॉजी', सोशिऑलॉजिकल बुलेटिन, ४५ (२):२३३–२५३.*

३. *बेते, आंद्रे. १९७३, 'द टीचिंग ऑफ सोशिऑलॉजी इन इंडिया', सोशिऑलॉजिकल बुलेटिन, २२ (२):२१६–२३३.*

४. *मदन, टी. एन. १९७४. 'टीचिंग ऑफ सोशिऑलॉजी इन इंडिया : सम कॉमेंटस', सोशिऑलॉजिकल बुलेटिन, २३ (१):११३–११८.*

५. *राव. एम. एस. ए. १९७८. रिपोर्ट ऑन दी स्टेटस् ऑफ दी टीचिंग ऑफ सोशिऑलॉजी अ‍ॅण्ड सोशियल अ‍ॅन्थ्रापॉलॉजी. न्यू दिल्ली: यु.जी.सी.*

६. *रेगे, शिर्मिला. १९९४. 'इफ धिस इज टयूसडे इट मस्ट बी सोशिअल रोल्स सोशिऑलॉजी अ‍ॅण्ड चॅलेंज ऑफ जेण्डर स्टडीज', ई.पी.डब्ल्यू., २९ (१९): १९५९.*

७. *लक्ष्मन्ना, सी. १९७४. 'टीचिंग अ‍ॅण्ड रिसर्च इन सोशिऑलॉजी इन इंडिया', सोशिऑलॉजीकल बुलेटिन, २३ (१): १–१३.*

८. *शाह, ए. एम. १९९४. 'सम रिफ्लेक्शन ऑन सोशिऑलॉजीकल रिसर्च अ‍ॅण्ड टीचिंग इन इंडिया', सोशिऑलॉजिकल बुलेटिन, ४३ (१): १–८.*

९. *सिंग, योगेंद्र. १९९६. 'सोशिऑलॉजी अ‍ॅण्ड दी इमर्जिंग चॅलेंज ऑफ चेंज', सोशिऑलॉजिकल बुलेटिन, ४५ (१): १–१४.*

# भारतीय प्रसार माध्यमातील जातीवाद

**डॉ. प्रदिप एच. गजभिये**, नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड, ता. नरखेड, जि. नागपूर. मो.नं. ९८२२९९१३१४

**प्रस्तावना** – लोकशाही मध्ये प्रसार माध्यमांना चौथा स्तंभ मानले जाते. आधुनिक प्रसार माध्यमे वेळोवेळी अव्यवहारीक वर्तन करीत असतात. पत्रकारीतेच्या क्षेत्रात अनुसूचीत जाती जमातीच्या प्रतिनिधींची अनुपस्थिती मुळे त्यांच्या संबंधीत घटनावर परीणाम जाणवतो. त्या घटनांची माहीती छापल्या जात नाही. कारण मिडीयावर ज्यांचा प्रभाव आहे असे लोक पुर्वग्रहदुषीतपणामुळे कोणतीही घटना छापत नसतात. लोकमत निर्माण करण्यामध्ये मिडीयाची भुमिका महत्वपुर्ण असते. अनुसूचीत जाती जमातीच्या लोकांना योग्य न्याय मिळावा म्हणून कोणत्याही प्रकारचे सहकार्य मिडीयाकडुन केल्या जात नाही. कारण मिडीया संस्थानामध्ये वर्तमानपत्रीका, रेडियो, टेलीविजन या क्षेत्रात मागासवर्गीय लोकांची विशेष अनुपस्थिती होय. या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची भागीदारी नसणे म्हणजेच एक प्रकारची अघोषीत बंदी आहे. दलीतांच्या दृष्टीकोनाबद्दल सुध्दा अघोषीत सेनसारशीप लावली जाते म्हणून भारतीय प्रसार माध्यमे अलोकतांत्रीक झालेली आहे. देशाची २५ टक्के लोकसंख्या अनुसुचित जाती जमाजीची आहे हा उपेक्षित शोषित वर्ग असून त्यांच्या आर्थिक सामाजीक, शैक्षणिक समस्यांना कोणत्याही प्रकारचे स्थान दिले जात नाही. आज मोठया प्रमाणात भयावह स्थिती दिसत असून प्रसारमाध्यमांमध्ये मोठया प्रमाणात जातीवाद, संप्रदायवाद आढळुन येत असल्याचे दिसून येत आहे. जातीवाद नष्ट करण्यासाठी जनांदोलन करण्याची आवश्यकता असून मिडीयामध्ये मागासवर्गीय दलीत ओबिसींना योग्य प्रतिनिधीत्व देणे आवश्यक आहे.

**स्वातंत्र्यांनंतर मागासवर्गीयांची स्थिती** – १. प्रत्येक तासामागे २ अनुसूचित जाती जमातीच्या लोकांवर जातीवादाची घटना घटते. २. प्रत्येक दिवसाला ३ दलित महीलांवर बलात्कार होतो. ३. प्रत्येक दिवासाला २ दलित आदिवांसीची हत्या वा घरे जाळली जाते. ४. ८४ टक्के अनुसूचित जाती जमातीची मुले कुपोषीत आहेत. ५. फक्त २७ टक्के दलित स्त्रियांची प्रसुती दवाखान्यात केली जाते. ६. एक तृतीयांश लोकांना विज पाणी या मुलभूत सुविधा मिळत नाही. ७. ३३ टक्के लाकांच्या घरी आरोग्य कर्मचारी जात नाही. ८. २७ टक्के घटनांबद्दल दलीत लोकांना प्रवेश मिळत नाही. ९. ३७ टक्के विद्यार्थ्यांना सामुहीक जेवणात वेगळे बसविले जाते. १०. ४८ टक्के गावातील लोकांना नळावरून व विहरीवरून पाणी भरू दिल्या जात नाही.

**यूनिसेफ रिपोट्र नुसार** – १. ३० टक्के मुले शाळेत जात नाही. २. देशात अनेक विद्यापिठ असून सुध्दा ४० टक्के लोक निरक्षर आहेत.

**प्रचार माध्यमसंचा मागासवर्गीयाप्रती बेजबाबदार वर्तन** – १. वर्तमानपत्रात जातीवाद. २. ओबीसी आरक्षणाच्या बाबतीत इलेक्ट्रानिक मिडीयाची बेईमानी, ओबीसी आरक्षण विरोधात मोठया प्रमाणात बातम्या देणे. ३. वर्षभर लोकांना फालतु गोष्टी दाखविण्यावर भर दिला जातो. त्यामुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ प्रसार माध्यमे बेजबाबदारीचे वर्तन करतात लोकांच्या हिताच्या अधिकाराबद्दल कुठलिही माहीती प्रसारीत करीत नाही तर महत्वहीन गोष्टींना महत्व दिला जातो.

एकदा भारतात ब्रिटीश पत्रकार आल्यावर त्यांना मिडीयामध्ये दलित मागासवर्गीय किती लोक आहेत याची माहीती घ्यायची होती. त्यांना एक दलित पत्रकाराचा शोध या नावाने लेख पेपर मध्ये प्रकाशित करावा लागला तेव्हा त्यांना ६८६ पत्रकांरामध्ये ४५४ उच्च जातीचे तर बाकी २३२ लोकांनी आपले नाव सांगितले नाही. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर पत्रकारीतेमध्ये एकही पत्रकार दलित आढळुन आला नाही त्यामुळे या क्षेत्रावर उच्च जातीच्या लोकांचा किती प्रभाव व वर्चस्व असल्याचे दिसुन येते.

**प्रसार माध्यमातील जातीवाद** – आणिबाणीच्या काळानंतर मिडीया चा सांप्रदायीकरण जातीवादी आणि गुन्हेगारीकरण व्हायला सुरूवात झाली. भारताची प्रसारमाध्यमे हिंदु मिडीया झाली. ओबीसी आरक्षण विरोधात सवर्ण विद्यार्थ्याचे आंदोलन, बाबरी मस्जीद वाद यामुळे सांप्रदायीकरण, जातीवाद, गुन्हेगारीकरण पुर्णत: करण्यात आले. भारतातील हिंदी मिडीया पुर्णता हिंदु मिडीया बनला. या मिडीयाने भारतातील महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, लाचलुचपत, गुन्हेगारी या सर्व बाबी दलित आदिवासी व ओबींसींना देण्यात येणाऱ्या आरक्षणामुळे निर्माण झाल्या या प्रकारचे कारण सांगितले जाउ लागले. धर्मपरिवर्तन, धर्मनिरपेक्षता आणि भारतीय संविधावर वैचारीक आक्रमण विविध मुद्‌यांच्या आधारे करण्यात येउ लागले.

भारतीय मिडीया, भारतीय लोकशाहीचा एक स्तंभ आहे. मुस्लीम व अन्य धर्मामध्ये जाती, वर्ण व्यवस्था, भेदभाव नाही, भारतातील सार्वजनिक संस्था व सरकारांवर भारतीय संविधानातील समता, स्वांतंत्र, बंधुता व न्याय, धर्म निरपेक्षता पुर्णपणे लागु आहे.

भारतीय समाज व्यवस्थेत १. व्यवहारामध्ये भेदभाव आणि विषमतावादी वर्तन आढळुन येतात परंतु सैध्दांतीक दृष्टीकोनातुन समता धर्मनिरपेक्षता लागु आहे. २. जे लोक स्वत: विषमतावादी, जातीवादी, धर्मवादी विचाराचे आचरण करतात त्याच लोकांवर न्यायालयामध्ये सरकारी संस्थामध्ये शासकीय पातळीवर भारतीय संविधानातील समता आणि धर्मनिरपेक्षता मुल्य लागु करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे.

भ्रष्टाचारी नेता लोक आपल्या सोबत भ्रष्ट आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांसोबत साठगाठ आहे असे वोहरा समीतीचे निष्कर्षातुन स्पष्ट होते. औद्योगिक क्षेत्रात अनेक कारणांमुळे बदल घडकुन आले. एका नवीन समुहकरणाची सुरूवात झाली पुर्वी वस्तुच्या उत्पादनावर आधारीत ओद्योगिकरणाचे साम्राज्य होते. उदा. स्टील उद्योग, सीमेंट उद्योग, खाद उद्योग इत्यादी वर्तमान परिस्थीतीमध्ये ओद्योगिक समुहाची जागा घरानेशाहीने घेतली आहे. ज्याप्रमाने टाटासमुह, सहारा समुह इ. या समुहाने आपल्या

उद्योगधंद्याची सुरक्षा करण्यासाठी स्वत:चे प्रकाशन संस्थाने आणि मिडीया विकसीत केलेला आहे. त्याचा परिणाम भारतीय राजकारणात मोठया प्रमाणात पडल्याचे दिसुन येते. राजकीय नेते विशिष्ट अशा जाती, समुदायाशी जुडलेले असतात त्यांचा त्यांना मतांच्या माध्यमातुन फायदा होतो. प्रकाशन समुह सुध्दा या मंत्र्यांचा, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री याची बाजु घेतात तसेच त्यांच्या जातीची सुध्दा बाजु घेत असतात.

प्रसारमाध्यमे आपली समाजसेवेची, देशसेवेची भावना सोडुन, एक समुह विशेष, जाती विशेष, संप्रदाय विशेषांच्या भावनेशी जुडतात. हीच भावना दुसऱ्या लोकांच्या विरूध्द वर्तन करीत असल्याचे दिसुन येते. यामधुन जातीवादी व सांप्रदायीकता दिसून येते.

भारतीय प्रसारमाध्यमे उच्च सवर्ण जातीच्या लोकाची मोठया प्रमाणात बाजु उचलुन धरतात. त्यांच्या हिताचे संरक्षण करण्यात येते. याप्रकारचे प्रमुख ध्येय असल्याचे दिसून आले उदा. अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थानात अनुसूचित जाती जमातीचा विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणातील आरक्षण समाप्त करण्यात यावे आणि मेरीटवर आघारीत प्रवेश देण्यात यावा या प्रकारची बातम्या सतत प्रचारीत व प्रसारीत करण्यात या मिडीयाची महत्वाची भुमिका होती ही भुमिका जातीवादी स्वरूपाची असल्याचे दिसून आले आहे.

संविधानातील आरक्षणामुळे अनुसूचित जाती जमातीचे लोक कार्यपालीका व विधायीका मध्ये आले. परंतु लोकशाहीच्या व्यवस्थेमधील मिडीया हा चौथा स्तंभ आहे यात अजूनही या लोकांचा पाहीजे त्या प्रमाणात प्रवेश झालेला नाही. दोन चार लोक भारतीय मिडीयात आढळुन येतील या लोकाची भागिदारी नगन्य स्तरावर आहे. मिडीया स्टडी गृप च्या सर्वेतील अध्ययनामुळे जे तथ्य प्राप्त झाले ते खरोखर चितांजनक स्वरूपाचे आहेत. भारतातील प्रिंट मिडीया असो की इलेक्ट्रानिक मिडीया यामध्ये उच्च जातीच्या लोकांची हिस्सेदारी ७१ टक्के आहे. ज्यांची एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात फक्त ८ टक्के लोकसंख्या आहे. त्यामुळे मिडीयातील उच्च पदावर त्यांचाच कब्जा असल्याचे दिसुन येते.

मिडीयातील सवर्ण व्यवस्थाचे समर्थक लोक दलित, ओबीसी, आदिवासी सोबत दुय्यम दर्जाची वागणूक देत असतात. त्यामुळे सरकारी व गैरसरकारी मिडीयामध्ये दलित, ओबिसी पत्रकारांसोबत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष जातिगत भेदभाव करीत असल्याचे दिसून येते. जातीगत लॉबी येथे सुध्दा सक्रीय असल्याचे दिसुन येते. सरकारी मिडीयामध्ये उच्च पदावर व निर्णय घेण्यात येणाऱ्या पदावर मागासवर्गीयांची संख्या उच्च जाती व वर्णाच्या लोकांपेक्षा खुपच कमी आहे.

समाजव्यवस्थेतील व्याप्त मजबुत वर्णवादी जातीवादी व्यवस्था समुळ नष्ट करण्यासाठी जनआंदोलनची आवश्यकता आहे. जनांदोलनाशिवाय जातीवाद नष्ट होउ शकत नाही जो पर्यंत प्रसारमाध्यमे मोठया प्रमाणात मागासवर्गीय लोकांना सहभागी करून घेतले जात नाही तो पर्यंत जातीवाद नष्ट होणार नाही यासाठी मिडीयामध्ये मागासवर्गीय लोकांना योग्य प्रतिनिधीत्व देणे आवश्यक आहे.

*संदर्भ*

*१. इन सर्च ऑफ ए दलित जर्नलिस्ट (एक दलित पत्रकार की खोज) मे पायनियर १६ नवम्बंर १९९६ नई दिल्ली*

*२. द रेप ऑफ जस्टिस इन भॅवरी केस मधु दंडवते ७ फरवरी १९९६*

*३. द दलित कंट्रोवर्सी पार्ट१ आर राणाकृष्णन ९ जनवरी १९९६*

*४. मीडीया और दलित एस एस गौतम गौतम बुक सेन्टर दिल्ली.*

# आधुनिक भारतातील स्त्री भ्रुणहत्या

**डॉ. हेमंत सोनकांबळे**, महात्मा जोतीबा फुले कला, विज्ञान महाविद्यालय, गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड

**प्रस्तावना :—** स्त्री भ्रुणहत्या हा केवळ महाराष्ट्र किंवा भारताचा चिंतेचा विषय नसून जगभराचा चिंतेचा विषय ठरावा अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. जगातील बहुतांश समाज पुरूषप्रधान असल्याने मुलींच्या तुलनेत मुलांना अधिक महत्व दिल्या जाते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा आणि मुलगी म्हणजे परक्याचे धन मानले जाते. त्यामुळे मुलगाच पाहिजे ही मनोवृत्ती वाढत आहे. पितृसत्ताक व्यवस्थेने विषमतावादी सामाजिक संरचना निर्माण करून पुरूषांना अनुकुल नियमने, मुल्ये, प्रमाणके, दर्जा व भुमिका, सामाजिक संस्थांची निर्मिती केली. पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीभृण हत्यांना चालना मिळत आहे. केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियाई देशांमध्ये हीच मानसिकता आहे. प्रसुतिपूर्व गर्भलिंग निदान करून गर्भातील अपत्य मुलगी असेल तर गर्भपात करण्याचे प्रमाण जास्त असल्याचे लॅन्सेट या जर्नलमध्ये प्रसिध्द झालेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. टोरेटो विद्यापीठातील प्रभात झा यांनी केलेल्या पाहणीतुन हा निष्कर्ष काढला आहे. १९८० ते २०१० या तीस वर्षाच्या कालावधीत सुमारे ४० लाख ते सव्वा कोटी मुलींना जन्माला येण्यापूर्वीच संपविण्यात आल्याचेही दिसून आले आहे.

भारतातील स्त्रीभृणहत्येस ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेली दिसून येते. भारतात स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडात विविध कारणांमुळे स्त्रीभृण हत्या घडून आल्या व आजही घडून येत आहेत. भारतात हुंडा पध्दती अस्तित्वात आहे. हुंडा देणे व घेणे हे समाजमान्य आहे. मुलींचा विवाह करण्यासाठी हुंडा द्यावा लागतो. त्यामुळे देखील स्त्रीभृण हत्येस चालना मिळत आहे. तसेच स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार व शोषणात वाढ झाली आहे. समाजात वावरतांना स्त्रीयांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. कारण छेडछाड, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार यासारख्या घटना दररोज घडत आहेत. पुरूषांची संकुचित मानसिकता व पारंपरिक विचारसरणीमुळे स्त्रीयांवर होणारे अत्याचार वाढत आहेत. त्यामुळे पालकांना मुलगी नकोशी झाली आहे. परिणामी आईच्या गर्भात असतांनाच गर्भलिंग तपासणी केली जात आहे. गर्भातील अर्भक मुलीचे असल्यास त्याची गर्भातच हत्या केली जात आहे. विशेष म्हणजे यामध्ये स्त्रीया देखील सहभागी असतात. स्त्री भृणहत्या होण्यासाठी स्त्रीयांची भूमिका देखील जबाबदार आहे. स्वत: एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीची शत्रू बनली आहे. त्यामुळे सर्वप्रथम स्त्रीयांनीच स्त्रीभृण हत्या थांबविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. स्त्रीयांमध्येही अन्याय सहन करण्याची गुलामी प्रवृत्ती निर्माण झाली आहे. स्त्रीयांतील बंडखोर वृत्तीचा अभाव असल्याने अप्रत्यक्षपणे स्त्रीभ्रुण हत्येस प्रोत्साहन मिळत आहे. सध्याचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. परंतु तंत्रज्ञानाचा दुरूपयोग करून स्त्रीभृण हत्या केल्या जात आहेत. त्यामुळेच प्रत्येक जनगणनेनुसार जाहीर होणारे स्त्री पुरूष लिंग गुणोत्तर प्रमाणात तफावत असलेली दिसून येते.

स्त्री भृणहत्या एक गंभीर समस्या असल्याने याचे विपरीत परिणाम स्त्रीयांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर होत आहेत. स्त्री भृण हत्येमुळे स्त्री पुरूष लिंग गुणोत्तर प्रमाणात तफावत निर्माण होत आहे. स्त्री पुरूष लिंग गुणोत्तर प्रमाण असेच राहत गेले तर स्त्री पुरूषातील समतोल बिघडेल व परिणामी समाजाचे संतुलन धोक्यात येईल. स्त्रीभ्रुण हत्येमुळे सामाजिक संरचनेचे विघटन होत आहे. स्त्री भृणहत्या अशाच होत राहिल्या तर बहुपतीत्वाची प्रथा रूढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुरूषांच्या तुलनेत स्त्रीयांची संख्या कमी होत गेली तर स्त्रीयांसाठी युध्द होतील. पुरूषांना अनिच्छेने संन्यास घ्यावा लागेल. स्त्रीयांच्या व्यापारात वाढ होईल. वंश सातत्यास बाधा निर्माण होईल. श्रमविभाजनावर विपरीत परिणाम होतील. तसेच आर्थिक विकासास बाधा निर्माण होईल परिणामी स्त्रीविषयक समस्यात वाढ होईल. स्त्रीभृण हत्येची

**स्त्रीभृण हत्येची संकल्पना :—** तत्रज्ञानाचा दुरूपयोग करून गर्भातच स्त्री अर्भकाची हत्या करणे म्हणजेच स्त्री भृणहत्या होय. भृण म्हणजे गर्भ आणि भृणहत्या म्हणजे गर्भाची हत्या होय. स्त्री भृणहत्या म्हणजे मुलीच्या गर्भाची हत्या करणे होय. भारतीय समाज पुरूषप्रधान असल्याने येथे मुलीच्या तुलनेत मुलाला अधिक महत्व दिल्या जाते. धार्मिक दृष्टीकोणातून मोक्ष प्राप्तीसाठी मुलगा आवश्यक मानला जातो. त्यामुळेच पुत्र प्राप्तीच्या हव्यासापोटी मातेच्या गर्भातच स्त्री अर्भकाला मारले जाते. त्यालाच स्त्री भृणहत्या असे म्हणतात. स्त्री भृणहत्येमूळे पुरूषांच्या तुलनेत स्त्रीयांचे प्रमाण सातत्याने घटत आहे. त्यामुळे स्त्री भृणहत्या एक ज्वलंत सामाजिक समस्या बनली आहे. भृणहत्या म्हणजे 'प्रसुतीपुर्व लिंगनिदान करून कन्येचा गर्भ असल्यास गर्भावस्थेतच तो नष्ट करणे' होय. नवीन वैज्ञानिक तंत्राचा वापर करून जन्माआधिच गर्भात स्त्रिलिंगाची हत्या करणे यालाच स्त्री— भृणहत्या म्हणतात ''गर्भलिंग निदान चाचणी करून स्त्रीभृण असल्याचे सिध्द झाल्यास जन्माला येणाच्या अगोदरच स्त्रीभृण संपविल्या जाते. त्याला स्त्रीभृण हत्या असे म्हणतात. थोडक्यात तंत्रज्ञानाचा दुरूपयोग करून गर्भातच स्त्री अर्भकाची हत्या करणे म्हणजेच स्त्री भृणहत्या होय. भृण आणि भृणहत्या म्हणजे गर्भाची हत्या होय.

**स्त्रीभृण हत्येची ऐतिहासिक पार्श्वभूमी :—** भारतातील स्त्रीभृण हत्येस ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. भारतात स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडात विविध कारणांमुळे स्त्रीभृण हत्या घडून आल्या व आजही घडून येत आहेत. ''स्त्रीभृण हत्या ही क्रुर प्रथा प्रथम मध्ययुगीन भारतात अस्तित्वात होती. तसेच ती काही जमाती पुरतीच मर्यादित होती. त्यावेळी राजपुत जमातीत मुलींचा विवाह अत्यंत खर्चीक असल्याने विवाह नाही केला तर सामाजिक अप्रतिष्ठा होते व धर्माज्ञांचे उल्लंघन होते म्हणुन जन्माला आल्याबरोबर मुलींना ठार मारण्यात येई. तर काही माता नवजात मुलीला स्तनपानाशिवाय ठेवून किंवा स्तनांना अफू लावून मारीत. ही प्रथा इ.स. १७८९ मध्ये वाराणसी प्रांतातील राजकुमार व राजवंशी या जमातीत होती. इ.स. १९७५ व १८०४ च्या कायद्याने बालहत्या खून आहे असे जाहीर केले. तरी सुध्दा कच्छ आणि गुजरात मधील जडेज राजपुतात ही पध्दत होती. जडेज कुटुंबातून सुमारे २०,००० मुलींना दर वर्षी ठार मारण्यात येत असे. ही प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न गव्हर्नर लार्ड हॉडीगने केला. पुढे भारत सरकार व कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने दखल घेवून इ. स. १८७० साली मानवाधिकाराच्या ५० व्या वर्धापन दिनी लिंग भेदावर आधारित हिंसाचार नाहीसा करण्याची मोहिम सुरू केली परंतु वास्तव उलटेच आहे. इ.स. १९८१ च्या जनगणनेनंतर प्रथमच देशात लिंग गुणोत्तर चर्चेस प्रारंभ झाला. स्त्री—भृण हत्येला धार्मिक आधार असलेला दिसून येतो.

**स्त्रीभ्रूण हत्या एक सामाजिक समस्या :—** समाजातील मुलींचे घटते प्रमाण व सातत्याने होणाऱ्या स्त्रीभ्रूणहत्या ही अत्यंत गंभीर सामाजिक समस्या असून या समस्येला वेळीच प्रतिबंध घालणे गरजेचे आहे. स्त्रीभ्रूणहत्या ही सध्याच्या समाजातील एक ज्वलंत समस्या बनल्याने या समस्येकडे सरकारचे लक्ष वेधले आहे. त्यामळेच सरकारने विविध कायद्यांची निर्मिती करून शासकीय योजना घोषित केल्या आहेत. याबरोबरच समाजसुधारक लोकसंख्याशास्त्रज्ञ, अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ इत्यादींचे लक्ष वेधले आहे. नयना आगलावे यांच्या मते, ''देशातील स्त्रीभ्रूणहत्या ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. ग्रामीण,शहरी, सुशिक्षित—अशिक्षित किंवा उच कनिष्ठ, जात—धर्म—वर्ग या पैकी कशाचेही बंधन नाही असे मत मांडले आहे. डोंबे कल्पना, घुगे संगिता यांनी पुढील मत व्यक्त केले, '' स्त्रीभ्रूण हत्या ही वर्तमान काळातील एक ज्वलंत सामाजिक समस्या असून याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे :— १.** स्त्रीभ्रूण हत्येचे संरचनात्मक स्त्रोत आणि स्वरूप जाणून घेणे. २. स्त्रीभ्रूण हत्या आणि लिंग गुणोत्तर यांच्यातील सहसंबंध जाणून घेणे. ३. स्त्रीभ्रूण हत्येसाठी पितृसत्ताक व्यवस्था जबाबदार आहे का हे जाणून घेणे. ४. स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधात्मक कायद्यांचा आढावा घेवून उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :—** प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी संशोधकाने पुढील गृहितकृत्ये निश्चित केलेली आहेत. १. लिंगभेदावर आधारित सामाजिक संरचना स्त्रीभ्रूण हत्येस चालना देते. २. पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण वाढत आहे. ३. स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधात्मक कायदे स्त्रीभ्रूण रोखण्यासाठी अपयशी ठरत आहेत.

**तथ्य संकलन पध्दती :—** प्रस्तुत विषयाचा अभ्यास करतांना माहिती संकलनासाठी म्हणजेच तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलन साधनांचा अवलंब करण्यात आला आहे. हे संशोधन गुणात्मक व संख्यात्मक पध्दतीने केले आहे. म्हणूनच निरीक्षण, मुलाखत या पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच संशोधनासाठी परिपुर्ण माहिती मिळविण्यासाठी द्वितीय तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब केला आहे. यामध्ये ऐतिहासिक कागदपत्र, शासकीय, निमशासकीय अहवाल, आकडेवारी, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालीके, समाजशास्त्रीय संशोधन, शोधप्रबंध व इंटरनेट इ. साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्य संकलनाची साधने आणि तंत्रे :—** सामाजिक संशोधनात संशोधनाची तंत्रे व साधने निश्चित केल्यास संशोधन प्रक्रिया अधिक गतीने पार पडते. म्हणूनच तथ्य संकलनाची साधने व तंत्रे निवडणे ही सुध्दा एक महत्वाची पायरी मानली जाते. नमुना निवडीनुसार निवडलेल्या उत्तरदात्यांशी संपर्क साधून अनुसूचीद्वारे प्रश्न विचारून वस्तुनिष्ठ तथ्य संकलन करण्यात आले. द्वितीय आधार सामग्री म्हणून जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समायोजन महाराष्ट्र राज्य जिल्हा गॅझेटिअर, लोकराज्य मासिक, इंटरनेट, वर्तमानपत्रे, अहवाल, विद्यापीठ ग्रंथालयातील साहित्य, नियतकालीक, शोधप्रबंध, पुस्तके इ. द्वितीय आधार सामग्रीचा आधार घेण्यात आला.

**स्त्रीभ्रूण हत्या व लिंग गुणोत्तर यांच्यातील सहसंबंध :—** जन्माच्या वेळेचे लिंग गुणोत्तर (Sex Ratio at Birth) जन्मत: मुला मुलींचे दर हजारी प्रमाण पाहणे वय ० ते ०६ वयोगटातील लिंग गुणोत्तर (Sex Ratio at 0 to 06 age) सहा वर्षाखालील मुला मुलींचे दर हजारी प्रमाण पाहणे, लिंग गुणोत्तर (Sex Ratio) सर्वसामान्य लोकसंख्येतील दर हजार पुरूषांमागे स्त्रीयांचे प्रमाण पाहणे सन २००१ ते २०११ च्या जनगणनेतील लिंग गुणोत्तर प्रमाणाची तुलना केल्यास यातील तफावत सहज लक्षात येते. जगातील दर हजार पुरूषामागे स्त्रीयांची संख्या २००१ मध्ये ९८६ व २०११ मध्ये ९८४ आहे. भारतातील लिंग गुणोत्तर प्रमाण ० ते ६ वयोगट दर हजार मुलांच्या प्रमाणात मुलींची संख्या २००१ मध्ये ९२७ व २०११ मध्ये ९१४ आहे. भारतातील लिंग गुणोत्तर प्रमाण ० ते ६ वयोगट दर हजार पुरूषांमागे स्त्रीयांचे प्रमाण मुलींची सख्या २००१ मध्ये ९३३ व २०११ मध्ये ९४० आहे. महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर प्रमाण ० ते ६ वयोगट दर हजार मुलांच्या प्रमाणात मुलींची संख्या २००१ मध्ये ९१३ व २०११ मध्ये ८८३ आहे. महाराष्ट्रातील लिग गुणोत्तर प्रमाण ० ते ६ वयोगट दर हजार पुरूषांमागे स्त्रीयांचे प्रमाण २००१ मध्ये ९२२ व २०११ मध्ये ९२५ आहे.

**स्त्रीभ्रूण हत्येसंबंधी कायदे :—** सर्वप्रथम १९७१ साली वैद्यकीय गर्भपात कायदा (Medical Terminition of Pregnancy Act 1971) करण्यात आला. त्यानुसार कोणताही गर्भपात कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला. गर्भलिंग चाचणी प्रतिबंधक अधिनियम कायद्याविषयी माहिती असणे महत्वाचे आहे. १९७६ साली भारत सरकारने गर्भजल चाचण्यावर बंदी आणली. सन १९८८ मध्ये सर्वप्रथम महाराष्ट्रात स्त्रीभ्रूण हत्या बंदी कायदा लागू करण्यात आला. १९९४ साली संपूर्ण भारतात गर्भजल चाचणीवर निर्बंध घालणारा कायदा (PNDT : Pre –natal Diagnostic Techniques-Act) लागू झाला. स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. या कायद्यातील त्रुटी पळवाटा लक्षात घेवून सन २००३ साली त्यामध्ये आवश्यक दुरूस्ती करून 'गर्भधारणापुर्व आणि प्रसवपूर्व लिंग निवडीस प्रतिबंध अधिनियम २००३' हा कायदा २० जानेवारी २००३ मध्ये अंमलात आला. भारतीय संविधानाने अनुच्छेद क्र. ३१२ ते ३१६ या अंतर्गत गर्भपात व गर्भजल परीक्षण आणि भ्रूणहत्या इ. संदर्भात तरतुदी नमूद केल्या आहेत.

**शासनाची भूमिका :—** प्रथमच भारत सरकारने अधिकृतरीत्या देशातील घटत्या बाल लिंग गुणोत्तरासाठी लिंगभेदात्मक गर्भपातांना, स्त्रीभ्रूण हत्येला जबाबदार धरले. कायद्याचा भंग केल्यास शिक्षेची तरतुद केली. महाराष्ट्र शासनाने नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रे व वेबसाईटच्या माध्यमातून जोडली आहेत. स्त्रीभ्रूण हत्येला आळा घालण्यासाठी शासनाने विविध कार्यक्रम व योजनांची सुरूवात केली आहे. ज्यामध्ये सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, बालिका समृध्दी योजना, समेतिक बालविकास योजना, कस्तुरबा गांधी बालिका आवासीय योजना, लाडली योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ योजना इ. अत्यंत महत्वाच्या योजना राबविल्या जात आहेत. स्वयंसेवी संस्था शासनासमवेत स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी योगदान देतांना दिसत आहेत. विविध प्रकारचे उपक्रम राबवून याबाबत समाजात जाणीव जागृती निर्माण केली जात आहे. जसे 'पहिल ताट तीला', 'चला मुलीचे स्वागत करूया', 'नकोशी होतेय हवीशी', राखीसाठी बहीण हवी, 'तिला वाचवा भविष्य घडवा', 'वाचाल तरच वाचाल' यासारखे नाविण्यपुर्ण उपक्रम राबविले जातात.

**स्त्रीभ्रूण हत्यांबाबत स्वयंसेवी संघटनांची भूमिका :—** स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांनी याबाबत अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडली आहे. विशेषत: स्त्री पुरूष

लिंग गुणोत्तरात समानता निर्माण करण्यासाठी व स्त्रीभ्रूण हत्यांना प्रतिबंध घालण्यासाठी स्वयंसेवी संघटना प्रयत्न करत आहेत. ज्यामध्ये लाडली, मिशन आरोग्य, दृष्टी फाउंडेशन ट्रस्ट, मदुराई हेल्थ ॲण्ड लेप्रोसी रिलीफ सेंटर, युथ विरांगणा, ॲडॉकेसी, फोगसी फाउंडेशन ट्रस्ट, युवा परिवर्तन अकॅडमी, अबुरी फाउंडेशन ट्रस्ट, नोबेल फाउंडेशन टस्ट इ. स्वयंसेवी संघटना राष्ट्रीय पातळीवर स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी कार्य करत आहेत.

**सैध्दांतिक आधार :–** प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने अमर्त्य सेन यांनी माडलेल्या 'हरवलेल्या स्त्रीयांचा सिध्दांत' (Theory of Missing Women's) या सिध्दांताचा आधार घेतला आहे. हा सिध्दांत अमर्त्य सेन यांनी मांडला. त्याच्यामते, ' मागील दशकात जगातील बहुसंख्य राष्ट्रात पुरूषांच्या तुलनेत स्त्रीयांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. याला आळा घालण्यासाठी विविध देशांनी कायदे केले. परंतू लिंग गुणोत्तरातील तफावत वाढतच आहे. यासाठी स्त्रीभ्रूण हत्या कारणीभूत आहेत. मागील दोन दशकात जवळपास एक कोटी स्त्रीभ्रूणहत्या झाल्या आहेत. भारतात देखील वंशाचा दिवा म्हणून मुलींच्या तुलनेत मुलांना अधिक महत्व दिल्या जाते व मुलांच्या हव्यासापोटी स्त्री अर्भकाची आईच्या गर्भातच हत्या केली जात आहे. (Sex Selective abortion) द्वारे स्त्रीभ्रूणाचा जीवन जगण्याचा मानवी अधिकार हिरावून घेतला जात आहे. दुर्देवाने काही डॉक्टर्स पैश्याच्या हव्यासापोटी गर्भपात कायद्याचा दुरूपयोग करून स्त्रीभ्रूणहत्येस चालना देत आहेत. अमर्त्य सेन यांनी न्यूयॉर्क येथे सादर केलेल्या 'More than 100 million women are missiong (1990) या शोधप्रबंधात जागतिक पातळीवरील स्त्री पुरूष लिंग गुणोत्तरात निर्माण झालेली तफावत दर्शविली आहे. अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्यामते 'स्त्री पुरूष प्रमाणातील असमानता देशाच्या विकासाला घातक असून केंद्र व राज्य सरकारांनी सर्वप्रथम हे प्रमाण समान करण्यासाठी ठोस उपाय करावेत. अर्थात स्त्रि–पुरूष प्रमाणातील असमानता हा देशाच्या विकासात येणाऱ्या अडचणी पैकी एक अत्यंत महत्वाची अडचण आहे. स्त्री–पुरूष प्रमाणातील तफावत दूर करणे गरजेचे आहे. ते देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांच्या म्हणण्यानुसार भारताने आतापर्यंत ३७ दशलक्ष मुली हरवल्या आहेत. बालिकांच्या आरोग्याकडे आणि विकासाकडे बुध्दीपुरस्सर दुर्लक्ष केले जात आहे असे जागतिक आरोग्य संघटनेचेही म्हणणे आहे.

अमर्त्य सेन यांनी Missing Women's ही संकल्पन मांडल्यानंतर स्त्रीवादी विश्वात एक चर्चा सुरू झाली. यातून पुढे Body Perspective आणि Reproductive Health and Human Rights या संकल्पना स्त्री अध्ययन क्षेत्रात विकसीत झाल्या. तसेच मानवी अधिकार आणि लिंगभाव (Human Rights & Gender) या दृष्टीकोणातून अनेक स्त्रीवादी अभ्यासकांनी स्त्रीचे शरीर (Body) हे तिचे आहे. तिच्या शरीरावर फक्त तिचाच अधिकार आहे. जैविकदृष्टया स्त्रीयांकडे पुनर्उत्पादनाची क्षमता असली तरीही आज भारतीय समाजातील पुरूषप्रधान समाज आणि शासन व्यवस्थेने स्त्री ही बालकांना जन्म देणारी यंत्रणा आहे असा निष्कर्ष काढलेला दिसून येतो. देशाचे लोकसंख्याविषयक धोरण ठरवितांना स्त्रीयांचे अधिकार, प्रजनन क्षमता, मत, भूमिका विचारात घेतल्या जात नाहीत. स्त्रीला मुलगा हवा किंवा मुलगी हवी, किती मुलांना जन्म द्यायचा अथवा मुल नकोच, याबाबतचे सर्व शारीरिक व प्रजनन अधिकार स्त्रीकडे नसलेले दिसून येतात. त्यामुळेच पुरूषप्रधान मानसिकता आणि शासकीय धोरणाने स्त्रीयांच्या शरीराचा बालकांना जन्म देणारी यंत्रणा म्हणुन उपयोग केलेला दिसून येतो. याच पुरूषप्रधान मानसिकतेस व शासकीय धोरणास क्रांतिकारी स्त्रीवादी व मानवाधिकारी यांनी स्त्रीभ्रूण हत्येस विरोध दर्शविलेला दिसून येतो. पुरूषप्रधान मानसिकतेतून गर्भलिंगधारणा सर्रासपणे नवीन तंत्रज्ञानाच्या सहायूयाने शिक्षित, अशिक्षित, ग्रामीण, शहरी अशा समाजाच्या सर्वच स्तरात स्त्रीभ्रूण हत्या होतांना दिसून येतात. या पार्श्वभूमिवर प्रस्तुत अध्ययनाचे अवलोकन केल्यास आपणास स्त्रीभ्रूण हत्या या समस्येचे स्वरूप स्पष्ट होतांना दिसून येते. म्हणूनच प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने अमर्त्य सेन यांनी मांडलेल्या 'हरवलेल्या स्त्रीयांचा सिध्दांत' या सिध्दांताचा वापर घेतला आहे.

अमर्त्य सेन यांनी 'More than 100 Million Women are Missing' हे पुस्तक १९९० मध्ये न्यूयार्क येथे प्रकाशित केले. अमर्त्य सेन हे प्रसिध्द भारतीय अर्थशास्त्रज्ञ आहेत. ज्यांनी नोबेल पारितोषिक जिंकून जगामध्ये नावलौकिक केला आहे. त्यांनी जागतिक पातळीवरील स्त्री–पुरूष लिंगगुणोत्तरातील तफावत स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, ''जगातील विकसीत अविकसीत आणि विकसनशील अशा सर्वच देशात स्त्री–पुरूष लिंगगुणोत्तरात तफावत असलेली दिसून येते. कारण जगातील बहुतांश देशात पितृसत्ताक व्यवस्था असल्याने मुलीच्या तुलनेत मुलांना अधिक महत्व दिल्या जाते. त्यामुळेच मुलाच्या हव्यासापोटी मुलींची आईच्या गर्भातच हत्या केली जात आहे. परिणामी लाखो मुली जन्माला येण्याच्या आधीच बेपत्ता होत आहेत.

**संदर्भ ग्रंथसूची :–**


*१. आहुजा राम,२००४, सामाजिक अनुसंधान, रावत पब्लिकेशन, दिल्ली.*
*२. कव्हे अर्चना, २०१३, स्त्री–भ्रूणहत्या कारणे व उपाय, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.*
*३. कांकरिया सुधा, २००६, स्त्री जन्माचे स्वागत करा, मान कन्हैया टस्ट, अहमदनगर.*
*४. कांबळे सी.टी., प्रा. पवळे टी. एस., २०१०, भारतातील सामाजिक चळवळीची रूपरेषा, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, नांदेड.*
*५. देवकर गजानन, २०१४, स्त्रीभ्रूण हत्या : चिंता आणि चिंतन, संपादित ग्रंथ, अलंकार प्रकाशन, उमरी.*
*६. नाईकवाडे शेषराव, दिलीप पाईकराव, २०१४, स्त्रीभ्रूण हत्या सामाजिक वास्तव, अलंकार प्रकाशन, उमरी.*
*७. भागवत विद्यूत, २०११, लिंगभाव अभ्यास भारतातील सिध्दांकन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अभ्यास केंद्र, पुणे.*
*८. Dr. Amarth Sen, 1990, Theory of Missiong Women, Female Foeticide : A Critical Study of legislative ueasures period (2001-06)*

# आदिवासी जमातीचे बदलते स्वरूप

**मनोहर भी. येरकलवार,** समाजशास्त्र विभाग, डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

**प्रस्तावना :—** मानवी समाजाच्या आदिम अवस्थांचा विचार केल्यास आपणास असे दिसून येते की, मानव प्राणी हा फार पूर्वीपासून जंगल, दऱ्या, खोरी, पर्वत, नदी, नाले व घनदाट अरण्य या परिसरात वास्तव करुन आपली उपजिविका भागवित होता. हळूहळू मानवी समाजाची प्रगती होत गेली. एकीकडे मानव प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत अत्युच्छ शिखरावर जाऊन पोहचला तर त्याच मानवी समूहातील काही मानव स्वत:च्या प्रगतीपासून व विकासापासून वंचित राहीले. त्यांचे वास्तव्य आहे त्याच अवस्थेत, त्याच ठिकाणी जंगलात, घनदाट अरण्यात व इतर मानवी वस्तीपासून दूर अलिप्त राहीले. विकासाची संकल्पना त्यांना कळालीच नाही. तसेच तो इतरांसोबत राहुन स्वत:ला परिवर्तनाच्या प्रक्रियेत सामावुन घेतला नाही. जसा आहे त्याच अवस्थेत जीवन कंठीत राहीलेला समुदाय म्हणजेच आदिवासी जमाती होत.

आर्यांच्या आगमनापूर्वी म्हणजेच इ.स. पूर्व १५०० या काळात नागर संस्कृती माहीत नसलेल्या भटक्या टोळ्यांचा भारतीय सिंधू संस्कृतीवर जो आघात झाला, त्या पूर्वीचे लोक म्हणजे आदिवासी सिंधू संस्कृतीचे लोक आर्यापेक्षा सुसंस्कृत होते. परंतू त्यांना निषाद, किरात, शबर, कावळ्याहून काळे, नरभक्षक, धरतीचे काळे पुंज इत्यादी हिणकस नावांनी त्यांचा उल्लेख केल्या जात असल्याचे उल्लेख वेद, उपनिषद व पुराणांत आढळुन येते. आर्यांच्या टोळ्यांचे आगमन झाल्यानंतर त्यांना या उपखंडातील पर्यावरणाच्या ऋतूमानाची माहीती नव्हती. त्यांना पंजाबातील नद्यांच्या उन्हाळी महापूरांची माहिती नसल्यामुळेच जागोजागी आर्यांची गावे पुरात सापडली. "इंद्र संस्कृतीची स्थापना झाल्यानंतर गावोगावचे शबर, किरात, निषाद व नागलोक भयभीत झाले. भितीने ह्या लोकांच्या अनेक टोळ्या निरनिराळ्या प्रदेशात पळून गेल्या. विंध्य, सातपुडा पर्वत ओलांडुन ते तापी, नर्मदेच्या खोऱ्यात स्थिरावले. त्यांनी 'सरमक' राज्य स्थापिले ते इ. स. पूर्व ६०० ते इ. स. पूर्व ३०० पर्यंत होते."[१] अशा प्रकारे हे स्वाभीमानी, सुसंस्कृत, प्रामाणिक, स्वयंपूर्ण असणारे मुळनिवासी लोक जंगलाचा सहारा घेऊन अदृश्य स्वरुपात अनेक वर्ष जीवन कंठीत होते.

आदिवासींच्या टोळ्या व आर्यांच्या टोळ्या यांच्यात जवळपास तिनशे वर्षे लढाया झाल्या. या लढायात आदिवासींच्या काही टोळ्या हरल्यानंतर आदिवासींमधील काही गट आर्यांना मिळाले व त्यांनी आर्यांशी मिळते—जुळते घेतले. यातूनच पुढे आर्यांनी वर्णव्यवस्थेच्या माध्यमातून समाजव्यवस्थेचा पाया रचला. पण जे आदिवासींचे स्वाभिमानी गट होते त्यांनी आर्यांपासून अलिप्त व दूर जंगलात राहणेच पसंत केले. परंतू आर्यांशी शरणागती पत्करुन त्यांच्याशी मिळतेजुळते घेतले नाही. तेच गट व समाज आज मुळनिवासी किंवा आदिवासी म्हणून ओळखला जावू लागला आहे. "वर्णव्यवस्थेत अडकलेल्या व आर्यांशी जुळवून घेतलेल्या आदिवासी गटांनी स्वत:ला आदिवासी म्हणवून घेणे पसंत केले नाही. यावरुन हे सिद्ध होते की, आर्यांची गुलामगीरी स्विकारणाऱ्या जाती आदिवासी नाहीत. परंतू ज्या जमाती ब्राम्हणांचे गुलाम नाहीत ते आदिवासी जमाती म्हणून ओळखल्या जातात."[२] अशा प्रकारे प्राचिन काळापासून इथल्या भूमीवर आनंदाने एकत्र राहणाऱ्या या मुलनिवासी गटांचे जाती व जमाती अशी विभागणी झालेली असल्याचे दिसून येते.

भारताच्या प्राचिन इतिहासात आर्य, द्रविड, दास आणि नाग लोक यांचे उल्लेख सापडतात. वैदिक साहित्यात नाग लोकांनाच 'दास' असे संबोधले जात होते. नाग हे पुरातन लोक होते. त्यांची अनेक ठिकाणी राज्ये होती. दक्षिण भारतातील द्रविड आणि नाग ही एकाच वंशातील लोकांची नावे आहेत. म्हणजेच उत्तर भारतातील नाग किंवा असूर लोक आणि दक्षिण भारतातील द्रविड लोक हे एकाच वंशाचे असल्याचे सिद्ध झाले आहे. याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले मत नोंदवतांना म्हणतात, "दक्षिण भारतातील द्रविड लोक आणि उत्तर भारतातील नाग किंवा असूर लोक हे एकाच वंशाचे आहेत. द्रविड व नाग ही एकाच वंशातील लोकांची वेगवेगळी नावे आहेत. द्रविड हे त्या लोकांचे भाषिक नाव आहे. या सर्व पुराव्यावरुन आदिवासी हे पूर्वीचे नागवंशीय होते हे तर पूर्णपणे सिद्ध होतेच परंतू नागवंश भारतात उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पसरलेला होता हेही समजून येते. तसेच दुसरे असे की, भारतातल्या आदिवासी संस्कृतीतून बाहेर पडलेल्या महार, मांग, ढोर इ. जातींचा समाजसुद्धा नागवंशीय असून पूर्वीचे आदिवासीच होत."[३] अशा प्रकारे नागलोकांची भूमी म्हणजेच नागपूर होय. याच भूमिमध्ये भारतातील खूप मोठा आदिवासी समूदाय या परिसरामध्ये एकवटलेला असल्याचे दिसून येते.

आर्यांच्या नंतर पर्शियन, ग्रीक, शक, हून आणि मध्य आशियातील अनेक भटक्या जमातींचे लोक वायव्य दिशेकडून भारतात आले. त्यानंतरच्या काळात अरब, इराणी, पूर्व आफ्रिकेतील ॲबिसीनियन, बर्माचे तिबेटो—बर्मन आणि अराकन प्रदेशातून छोटे—छोटे समूह एकापाठोपाठ एक येत राहीले व ते केवळ भारतातील संपत्तीची लुट करण्याच्या उद्देशांनीच आले होते. भारतात कायमस्वरुपी वास्तव्य करण्याची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. त्यांच्यानंतर आठव्या शतकात मुघलांनी स्वाऱ्या केल्या आणि अखेरीस मुघल साम्राज्य स्थापन करुन त्यांनी आपल्या कारवाया चालूच ठेवल्या. या कालावधीत आदिवासींची अनेक प्रदेशामध्ये राज्ये स्थापन झालेली होती. त्यांच्या अनेक संस्कृती विकसीत झाल्या होत्या त्यामध्ये गोंडाची व भील्लांची संस्कृती फारच प्रसिद्ध होती. त्यांची स्वत:ची स्वतंत्र राज्यही होते.

भारतातील विविध विभागातील आदिवासी राजांना मोगलांचे आणि काही ठिकाणी स्थानिक सत्ताधिशांचे आव्हान झेलावे लागले. त्यामुळे त्यांच्या स्वामित्वाचा फार मोठ्या प्रमाणामध्ये पतन झाले. मुघलांनी आदिवासी राजांचे फार मोठ्या प्रमाणामध्ये छळ केला. मुघलांनी छोटा नागपूर आणि इतर भागातील गोंड, मुंडा, भील, ओरॉन आणि हो या आदिवासी जमातींच्या लोकांचा छळ केला. त्यांना इस्लाम धर्म स्विकारण्याची जबरदस्ती करण्यात आली. ज्या जमातीच्या लोकांनी मुघलांना विरोध केला त्यांचा छळ करुन त्यांना अमानवी वागणूक देण्यात येवू लागली. आदिवासी गोंड राज्यकर्त्यांची गोंडवन प्रदेशावर दोनशे वर्षापासून सत्ता होती, चांदा व अन्य भागातील त्यांची सत्ता उतरणीला लागल्यामुळे त्यांना मुघल आणि मराठ्यांचा या दुहेरी हल्ल्याचा सामना करावा लागला त्यामुळे आठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत गोंड राजाची राजसत्ता संपुष्ठात आली. त्यामुळे आदिवासी जमातीचे मोठ्या प्रमाणात जबरदस्तीने धाक दाखवून इस्लामीकरण घडून आले.

आठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटीशांनी संपूर्ण भारतावर आपला कब्जा केला. वसाहतवादी धोरण राबवून संपूर्ण भारतावर आपली स्थिती मजबूत करण्याच्या उद्देशाने त्यांनी आदिवासी क्षेत्रामध्ये घुसण्याचा जोरदार आणि गंभीर प्रयत्न केल्याचे दिसून येते.

आपल्या पारंपारिक वस्तीस्थानावरचे कोणतेही अतिक्रमण आदिवासींना खपणारे नव्हते, त्यामुळे अशा प्रसंगी सशस्त्र उठावाशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे आदिवासीं जमातींनी इंग्रजांच्या विरोधात उठाव केला. त्यामुळे इंग्रजांना यातला निरर्थकपणा लक्षात आला म्हणून त्यांनी आदिवासी क्षेत्रांना अनियंत्रित क्षेत्रे म्हणून घोषीत केले आणि आदिवासींच्या पारंपारीक प्रशासन व्यवस्थेला मान्यता दिली. या माध्यमातून आदिवासींना मदतीचा हात दिला आणि त्यातून त्यांच्यावर प्रेमाने व आपूलकीने त्यांच्यामध्ये मावनतेचा संदेश देऊन धर्मप्रचारकांना आदिवासी क्षेत्रामध्ये आदिवासींचे ख्रिश्चन धर्मामध्ये धर्मांतर करुन आपल्या कारवाया वाढविण्याच्या उद्देशाने प्रोत्साहन दिले. काही ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी आदिवासींसाठी शिक्षण व आरोग्याच्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी आदिवासी विभागामध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शाळा व दवाखाण्याची सोय करून आदिवासी जमातींना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले.

त्यानंतरच्या काळात आदिवासी जमातींच्या लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा, अशिक्षितपणा, भोळेपणा, लाजाळूपणा याचा गैरफायदा घेऊन आदिवासी विभागात काम करणारे कंत्राटदार, दलाल, जमीनदार, महसुली अधिकारी, वनरक्षक, पटवारी, पोलीस अधिकारी या आदिवासींची पिळवणूक करणाऱ्या लोकांचा नविन वर्ग उदयास आला आणि त्यांनी आदिवासी लोकांचे शोषण करुन त्यांची पारंपारिक, सामाजिक, सांस्कृतीक आणि आर्थिक व्यवस्था खिळखिळी करुन टाकली. काही लोकांनी त्यांचे शारीरिक, मानसिक छळ करुन त्यांचे लैंगीक शोषणही केले. त्यांच्या सुपीक जमिनी नविन स्थलांतरित लोकांनी बळकावून घेतल्या. अशा प्रकारे जंगलामध्ये स्वयंपूर्ण असणारे व आनंदी जीवन जगणारे आदिवासी या सभ्य लोकांकडून होणाऱ्या सततच्या पिळवणूकीमुळे, छळामूळे आणि शोषणामुळे अक्षरश: दुर्बल अवस्थेत जावून पोहचले आहेत. त्यामुळे त्यांना यातून बाहेर पडणे फार जिकरीचे होत आहे.

भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशांने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेमध्ये लिखीत स्वरूपात अनेक प्रकारच्या विकासात्मक तरतुदी करून ठेवलेल्या आहेत. परंतु अजुनही ग्रामीण भागातील काही आदिवासी समूदायाला याची पुसटशी कल्पनादेखिल नाही. बाबासाहेबांनी सांगितलेला मुलमंत्र त्यांच्यापर्यंत पोहचलाच नाही. म्हणूनच आज अशी त्यांची दयनिय स्थिती आपणास दिसून येते. आज आदिवासी समुदायाच्या विकासासाठी घटनात्मक तरतुदीच सहाय्यक ठरत असल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे आदिवासींच्या जीवन विकासासाठी वेगवेगळ्या पद्धतीने लोकशाहीभिमुख शासन व प्रशासनही प्रयत्नशील असलेले दिसून येते. त्यामुळे आदिवासीच्या भौतिक व सामाजिक जीवनात बरेच बदल झाले असल्याचे दिसून येते.

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून आदिवासी जमातीचे संरक्षण आणि विकासाकरीता घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. आदिवासी जमातीचा जलद गतीने विकास करण्यासाठी क्षेत्रनिहाय तसेच कुटुंबनिहाय विकासात्मक कार्यक्रम चालविण्याची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारने घेतली आहे. त्यासाठी महाराष्ट्रात स्वतंत्र आदिवासी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. शासनाच्या विविध विकासाच्या उपाययोजनांमुळे आदिवासींच्या समस्यांचे निराकरण करण्यात येत असून त्यामुळे त्यांच्या विकासाला चालना मिळत आहे. त्या माध्यमातून आदिवासी जमातीतील लोकांचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, व्यवस्थेमध्ये सहभाग वाढत आहे. त्या माध्यमातून त्यांच्यामध्ये विकासात्मक दिशेने सामाजिक परिवर्तन होतांना दिसून येते. हळू हळू त्यांच्या समस्येचे निराकरण होवून ते इतर समाजाच्या संस्कृतीप्रमाणे आचरण करून आपल्या जमातीतील अनावश्यक प्रथा, परंपरा, चालीरितीमध्ये बदल घडवून आणत आहेत. अशाप्रकारे या वेगवेगळ्या शासकीय योजनांच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या सामाजिक संरचनेमध्ये परिवर्तन होतांना दिसून येते.

आदिवासी म्हणजे नागर संस्कृतीपासून खुप दूर व अलिप्तपणे राहुन निसर्गातील वनस्पती, कंदमुळे, फळे, पाने खाऊन स्वयंपूर्ण जीवन जगणारा समुदाय होय. निसर्गातील उत्पादन साधनावर त्यांची उपजिविका भागत असल्यामुळे तो इतर नागर समाजाशी त्यांचे कोणत्याच प्रकारचे संबंध निर्माण झाले नाहीत. त्यामुळे तो त्याच घनदाट अरण्यामध्ये आपल्या मुलभूत गरजा भागवून आनंदाने जीवन कंठीत होता. सबंध जगातील आदिवासी समुदायांचा निवास हा असा दुर्गम व घनदाट अरण्यात, डोंगराळ प्रदेशात असल्याचे दिसून येते. आदिवासी समूहाच्या संदर्भाने भारतीय स्मृतीकोशात म्हटले आहे की, 'आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव समाज सोडून, त्याच्याही पूर्वी भारतात राहणाऱ्या किंवा बाहेरच्या देशांतून येऊन व पर्वताच्या सान्निध्यात स्थायिक झालेल्या जमातींना वन्यजमाती किंवा आदिवासी जमाती असे म्हणतात.

मानवी प्राण्यांची भ्रमंती अवस्था संपुष्ठात आल्यानंतर माणुस कोठे ना कोठेतरी स्थिर होऊ लागला. सतत प्रयत्नशील असणाऱ्या मानवाने उदरनिर्वाहाची विविध प्रकारची साधने शोधून काढली व निश्चित अशी साधने मिळाल्यानंतर त्यांच्या आयुष्याला स्थिरता लाभली. प्राचिन आद्यपाषाण युगापासून ते धातु युगापर्यंतच्या मानवाचा विकास हेच दर्शविते की, जगाच्या कोणत्या ना कोणत्या तरी भूभागावर मानव प्राणी आपले पाय रोवून स्थिरावू लागला. "काही जमातींनी निसर्गाचे वरदान लाभलेल्या मोजक्या लोकवस्तीची खेडी पसंद केली तर काही जमातींनी सुधारलेल्या व उद्योगधंद्यांनी बहरुन गेलेल्या शहरांत वस्ती करण्यास पसंती दिली पण काही भूमीपुत्रांनी या सर्व लोकवस्तीपासून दूर व दुर्गम असलेल्या डोंगरकपाऱ्यात, नद्यानाल्यात, कडेकपारीवर, पर्वतरांगात, घनदाट जंगलात आपला मुक्काम ठोकला."[४] व त्याच जंगल परिसरात राहुन आपली उपजिविका भागवू लागले. धरतीची लेकरे म्हणून ज्यांचा सर्वार्थाने उल्लेख करता येईल, अशा प्रकारे आनंदी जीवन जगणाऱ्या आदिवासी समुदायाची दुनियाच फार निराळी आहे.

नैसर्गिक पर्यावरणाच्या सानिध्यात राहणाऱ्या, आपल्याच रुढी, प्रथा, परंपरा व संस्कृतीला पालीसारखे चिकटून राहणाऱ्या व फळाफुलांच्या व झाडपाल्यांच्या चविने समाधानी होणाऱ्या व वन्यप्राण्यांच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या लोकांचे जीवन हे स्वछंदी पाखरासारखे असते. आदिवासी विषयी कोणाला सहानुभूती वाटते, कोणाला करुणा वाटते तर कोणाला त्यांच्याजवळ जायला भीती वाटते, तर काहींना त्यांच्याबद्दल तुच्छता वाटते, काहींना निसर्गाची भोळीभाबडी लेकरे वाटतात तर काही जनांना अंधश्रद्धेचे बळी वाटतात. एके काळी या समुहाला एक वेगळा व अलग समूह मानण्याची प्रवृत्ती होती. त्यामुळे ते विकासाच्या मुख्य प्रवाहापासून खूप दूर गेले होते. महाभारत, कौटील्याचे अर्थशास्त्र, रामायण अशा प्राचिन ग्रंथामधून या वन्य जमातीविषयीचा उल्लेख आढळून येतो. मात्र त्या जमातींचा अभ्यास करावा, त्यांना मुख्य प्रवाहाशी जोडून त्यांच्यामध्ये विकास घडवून आणावे असे कोणाला वाटल्याचे मध्ययुगीन कालखंडात दिसुन येत नाही.

भारतीय आदिवासींच्या अध्ययनाची सुरूवात खऱ्या अर्थाने भारतात ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर ब्रिटीश अधिकारी, ख्रिश्चन धर्मप्रसारक, अभ्यासक व संशोधकांनी केलेला आहे. त्यात

प्रामुख्याने रसेल, हिरालाल, स्टेफन फॅक्स, व्हॅरियर एल्व्हिन, फ्यूरर हेमनडार्फ, रिसले, लॅस्ली, शूबर्न, स्टेफन फॅक्स, रेव्ह. हिस्लॉप, रिचर्ड टेंपल व ग्रिगसन यांसारख्या पाश्चात्य अभ्यासक व संशोधकांनी या जमातींचा सर्वांगीन अभ्यास करुन ग्रथनिर्मिती करून ठेवली आहे. तसेच डॉ. बी. एच. मेहता, डॉ. इरावती कर्वे, सेतु माधवराव पगडी, डॉ. शामराव हिवाळे, डॉ. हिरालाल शुक्ल, पं. प्रयागदत्त शुक्ल, डॉ. भाऊ मांडवकर, डॉ. एस. आर. मुरकुटे, डॉ. भा. रा. अंधारे, डॉ. गोविंद गारे, रामभरोस अग्रवाल, केदारनाथ ठुसू, सुशीला सामद, जयपाल सिंह मुंडा, रघुनाथ मुर्मु, एलिस एक्का, रामदयाल मुंडा, निर्मला पुतुल, वंदना टेटे, गंगा सहाय मीना, रोज केरकट्टा, वाहरू सोनवने, उषाकिरण आत्राम, व्यकंटेश आत्राम, डॉ. विनायक तुमराम, बाबाराव मडावी, डॉ. शैलजा देवगावकर व इतरही बरेच काही भारतीय अभ्यासक व संशोधकांनी या जमातींचा सर्वांगीन अभ्यास करुन ग्रथनिर्मिती करून ठेवली आहे. त्यामुळे अनेक पत्रकार, सामाजीक कार्यकर्ते, अभ्यासक व संशोधक यांचे लक्ष भारतीय आदिवासींकडे गेले त्यांनी भारतातील आदिवासी जमातींचा शोध घेऊन त्यांच्या उत्थानासाठी कार्य करण्यास सुरुवात केली आहे.

आदिवासी समाज हा इतर सुधारलेल्या समाजाच्या तुलनेत निर्धन, निरक्षर असतील, त्यांचे राहणीमान मागासलेले व रानटी असेल परंतु ते असंस्कृत कधिच नव्हते आणि आज सुद्धा नाहीत. त्यांची आचार, विचार पद्धती व समाजव्यवस्था, न्यायव्यवस्था, कुटुंबव्यवस्था खरोखरच वाखाणण्यासारखी आहे. त्यांची स्वत:ची अर्थपूर्ण अशी संस्कृती आहे. त्यांना स्वत:ची बोलीभाषा आहे. रितीरिवाज, दैवत, धर्मविधी, सण समारंभ, लोककला व साहित्यकलाही आहे. त्याचबरोबर त्यांच्या नीतिनियमांचे व प्रथा परंपरांचे काटेकोरपणे पालन करणे हे त्यांच्या समाज सातत्याचे एक प्रमुख कारण आहे. हे सुद्धा अनुभवास येते. तेव्हा आदिवासी समाज हा 'अतिप्राचिन समाज किंवा अप्रगत व गौण समाज' म्हणून संबोधणे संयुक्तीक ठरणार नाही. अशा प्रकारे या आदिवासी समाजाला वेगवेगळ्या लोकांनी त्यांना मुळनिवासी ऐवजी वनात राहणारे वनवासी म्हणून हेटाळणी करण्याचे धोरण अवलंबविले आहे. त्यातुनच काही सुज्ञ जानकार आदिवासींनाही आपल्या स्थानांचे महत्व समजले व आपल्या जमातीच्या हक्काची व अधिकाराची जाणीव जागृत होवू लागल्यामुळे त्यांनी मुलनिवासींचे दावे करु लागले आहेत. इथुनच खऱ्या अर्थाने आदिवासी व गैरआदिवासींच्या आंदोलनाला सुरुवात झाली. कांही गैरआदिवासी लोकांनीही आदिवासींच्या सवलतींचा व आरक्षणाचा फायदा आजपर्यंत उचलत आल्याचे चित्र दिसून येते.

बहुसंख्य आदिवासी जमातीचे लोक अत्यंत दुर्गम, डोंगराळ भागात, अरण्यात, जंगलात, शहरापासून लांब राहतात. तरी पण उरदनिर्वाहाची भ्रांत असलेल्या या लोकांचे सामाजिक, सांस्कृतीक, आर्थिक जीवनमान परिपूर्ण आहे. रक्तसंबंधाना विशेष महत्व देणारे हे आदिवासी जमातीचे लोक सामूहिक जीवनात वैयक्तिक आकांक्षा ठेवत नाहीत. निसर्गाच्या सतत सहवासात राहून स्वछंदी व आनंदमय जीवन जगत असतांना अनेक चांगल्या वाईट घटनेच्या माध्यमातून अनुभव घेऊन प्रवाहासोबत पूढे जात आहेत. सतत प्रगतीच्या दिशेने वाटचाल करित असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनामध्ये सतत परिवर्तन होत आहे. कारण परिवर्तन हा सृष्टिचा नियम आहे. त्यामुळे या आदिवासी जमातीमध्ये झालेल्या सकारात्मक परिवर्तनासोबतच कांही प्रमाणात नकारात्मक परिवर्तनही होत असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :—** आजच्या काळात आदिवासी जमातींच्या लोकांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विकास योजनांच्या कार्यान्वीकरणामुळे अनेक आदिवासी समुदाय विस्थापित झाले आहेत. तसेच त्यांना पुनर्वसनासंबंधीच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यांच्यासमोर अज्ञान, दारिद्रय, बेकारी, ऊपासमार, कुपोषण, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, वेठबिगारी, भूमिहिनता व स्वास्थाविषयीच्या अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. शासनाकडून आदिवासी जमातींच्या विकासाच्या नावाखाली अनेक योजना कार्यान्वीत करण्यासाठी आदिवासी भागात अनेक शासकीय अधिकारी, कर्मचारी, संशोधक, समाजसुधारक, धर्मप्रचारक, ठेकेदार, व्यापारी, पोलीस कर्मचारी, वनकर्मचारी यांचा संचार वाढलेला आहे. त्यामूळे आदिवासी समाजाचे शोषण थांबण्याऐवजी वरचेवर वाढतच आहे. या जमातीला मुख्य प्रवाहात आनण्यासाठी शासकीय स्तरावरून अनेक विकासात्मक योजना आखल्या जातात. परंतू या योजनांची आखणी व आमलबजावणी करतांना या जमातींच्या समस्या त्यांच्याच नजरेतून समजण्याची प्रक्रीया होत नाही. त्यामुळे त्यांच्या परिस्थितीत सुधारणा होतांना दिसत नाही.

बदलत्या काळाचा परिणाम आदिवासी जमातीमध्येही कांही बदल घडविण्यास कारणीभूत ठरल्याचे दिसून येते. आजचा हा संगणकाचा व तंत्रज्ञानाचा काळ फार झपाटयाने बदलत आहे. या बदलत्या काळानूसार प्रत्येक समाजामध्ये काहीनाकाही बदल होत आहे. याला आदिवासी जमातही अपवाद नाही. जागतिकीकरणाच्या वेगवान लाटेमध्ये आपल्या रूढी, परंपरा, धर्म व संस्कृती लोप पावण्याचा धोका निर्माण होत आहे. तसेच या जमातीचा इतिहास, अस्तित्व व ओळख मिटवून टाकण्यास कांही गैर आदिवासी संस्था व संघटना सक्रीय झाल्या आहेत. तेव्हा या आदिवासी जमातीच्या लोकांना पावलोपावली अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे. अशा वातावरणात आपल्या जमातीच्या संघटना क्रियाशिल करून येणाऱ्या समस्यांचा निकराने सामना करणे व त्यात यशश्वी होणे हे या आदिवासी जमातीपूढील फार मोठे आव्हान आहे. तेव्हा ही पिढी जर वेळीच सावध झाली नाही तर स्वत: सकट आपल्या जमातीलाही खोल गर्तेत लोटल्याशिवाय राहणार नाही. असे विदारक चित्र येणाऱ्या काळात दिसून येते.

*संदर्भ सुची :—*


*१. गारे, गोविंद (२०००) 'बदलाच्या उंबरठ्यावर कोकणा आदिवासी', श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृ. क्र. १ व २.*

*२. गायकवाड, दिपक. (२००५) 'आदिवासी चळवळ स्वरुप व दिशा', सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ८.*

*३. गायकवाड दिपक (२००५) 'आदिवासी चळवळ स्वरुप व दिशा', सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ९.*

*४. नाडगोंडे, गुरुनाथ. (२००३). 'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ०१.*

# सायबर गुन्हा आणि सायबर सुरक्षितता एक अध्ययन

**डॉ. ज्योती अरविंद पोटे, *समाजशास्त्र विभाग,*** पी. डी. कारखानीस महाविद्यालय, अंबरनाथ

**गोषवारा** : तंत्रज्ञान हा आता मानवी जीवनाचा अपरिहार्य भाग बनला आहे. आज तंत्रज्ञानामुळे जग प्रचंड वेगाने बदलत आहे. आणि जवळही येत आहे. विसाव्या शतकामध्ये संगणक तंत्रज्ञानाने मोठा बदल घडवून आणला. संगणक तंत्रज्ञान हे भारताच्या कानाकोपऱ्यात पोहचले. संगणक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे माहिती तंत्रज्ञानाचा उदय झाला. बहुतांश व्यक्ती संगणकाचा वापर करु लागले. १९९० च्या दशकात चौथ्या पिढीतले संगणक उदयास आले. इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचा स्फोट झाला. त्याचा योग्य वापर करुन घेणे हे सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे.

प्रस्तुत अध्ययनामध्ये सायबर शिक्षण विषयक संकल्पना म्हणजे सायबर गुन्हा व त्यांचे विविध प्रकार, सायबर सुरक्षा आणि सायबर कायदा यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. मुख्यशब्द — सायबरस्पेस, सायबर गुन्हा, क्रिप्टोग्राफी, सायबर सुरक्षितता.

**प्रस्तावना** :—आज संपूर्ण जग संगणकाच्या अवतीभोवती फिरताना आपल्याला दिसून येत आहे. संगणक ही एक शक्ती म्हणून प्रत्येकजण तिचा वापर संपूर्ण मानवाच्या कल्याणासाठी करताना दिसतो. संगणकामुळे शिक्षणापासून ते संरक्षणापर्यंत सर्वच क्षेत्रात गती आलेली आढळून येते, संगणकाच्या सहाय्याने इंटरनेटद्वारा उपलब्ध सर्व स्त्रोत यांचा दैनंदिन जीवनात वापर केला जातो. सायबर स्त्रोत म्हणजे ई—मेल, ऑनलाईन ॲपलिकेशन्स होय. ज्यामुळे मानवाला अनेक गोष्टी सहज आणि सोप्या पध्दतीने हाताळता येऊ लागल्या आहेत.

थोडक्यात आजच्या डिजिटल युगात मानवाची प्रगती दिवसेंदिवस गुणवत्तापूर्ण व फायदेशीर होत चालली आहे. मानवाने शिक्षण, आरोग्य, संरक्षण, बँकिंग, राजकारण अशा सर्वच क्षेत्रात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करुन कामामध्ये सहजता निर्माण केलेली आढळून येते.

**संशोधनाचा उद्देश** : १. सायबर गुन्हयाची संकल्पना स्पष्ट करणे. २. सायबर गुन्हयाचे स्वरुप जाणून घेणे. ३. सायबर सुरक्षिततेचे उपाय जाणून घेणे. ४. माहिती तंत्रज्ञान कायदा जाणून घेणे.

**गृहितकृत्ये** : १. सायबर गुन्हेगारीत सातत्याने वाढ होत आहे. २. ज्या व्यक्तीसोबत सायबर गुन्हे घडतात त्यांना त्याबद्दल माहिती व जाणीव नसते.

**तथ्यसंकलन** : प्रस्तुत अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोताच्या आधारे तथ्य संकलन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भग्रंथ, वर्तमानपत्र, मासिके संशोधनपर लेख आणि वेबसाईट यांचा आधार घेण्यात आला आहे.

२१व्या शतकात संगणक आणि सोशल मिडियाला पर्याय नाही. आज जवळजवळ सगळेच व्यवहार संगणकाच्या सहाय्याने केले जातात. संगणक व इंटरनेटच्या प्रगतीने इलेक्ट्रॉनिक डाटा ट्रान्सफर केला जातो. तसेच ई—बँकिंग, पेपरलेस ऑफिस सारखी संकल्पना जेथे महत्वाची माहिती कागदावर न ठेवता ई—डॉक्युमेंटच्या स्वरूपात असते. अशा व्यवहारांमध्ये संगणक, संगणकाचे नेटवर्क, ईलेक्ट्रॉनिक डाटा स्टोरेज, मेसेजिग पध्दत व इतर संबंधित उपकरणे याला 'सायबर सोसायटी' म्हणतात. सायबर सोसायटीत जे गुन्हे घडतात त्याला 'सायबर गुन्हे' असे म्हणतात.

सायबर गुन्हा हा पारंपारिक गुन्हयाप्रमाणेच असतो. फक्त तो सायबर स्पेस मध्ये इलेक्ट्रॉनिक व संगणकिय वातावरणात केलेला असतो म्हणून त्याला सायबर गुन्हा म्हणतात. थोडक्यात संगणकीय क्षेत्रांमध्ये केलेल्या गुन्हयांना सायबर गुन्हे असे म्हणतात.

सायबर गुन्हे करणाऱ्यांना सायबर गुन्हेगार म्हणतात. तंत्रज्ञानाची प्रगती जेव्हा होत असते, त्यावेळेस त्याचे अनेक फायदे असतात. परंतु अशा तंत्रज्ञानाचा गैरफायदा घेणारे आणि अनैतिक मार्गांचा वापर करणाऱ्यांमुळे अनेक धोके निर्माण होतात. गुन्हेगारी वृत्तीच्या व्यक्ती अशा तंत्रज्ञानाचा वापर करुन गुन्हे करतात.

**सायबर गुन्हयाचे प्रकार** :

**सॉफ्टवेअर पायरसी** : संगणक वापरासाठी तयार केलेले कायदेशीर सॉफ्टवेअर म्हणजे लायसेन्स सॉफ्टवेअर वापरायचे असते. परंतु बहुतेक व्यक्ती अशी लायसन्स सॉफ्टवेअर वापरत नाहीत. तर ते बेकायदेशीरपणे सॉफ्टवेअर कॉपी करुन वापरतात. कॉपी केलेल्या सॉफ्टवेअरला पायरेटेड सॉफ्टवेअर म्हणतात. असे सॉफ्टवेअर तयार करणे अथवा वापरणे गुन्हा आहे. तसेच पायरेटेड सॉफ्टवेअरमुळे डाटा खराब होण्याची भिती असते.

**हॅकिंग व क्रॅकिंग** : हॅकिंग म्हणजे नियमांचे उल्लंघन करणे किंवा बेकायदेशीर पध्दतीचा अवलंब करणे. सायबर गुन्हयामध्ये संगणक, नेटवर्क किंवा वेबसाईटची सुरक्षितता भेदणे व त्यामधिल माहिती बदलणे, चोरी करणे, किंवा संगणक प्रणाली खराब करुन त्यामध्ये बिघाड करणे यास हॅकिंग असे म्हणतात.

तसेच क्रॅकिंग हा देखील सायबर गुन्हयाचा प्रकार आहे. यामध्ये सुरक्षिततेचा पासवर्ड क्रॅक केला जातो. म्हणजेच पासवर्ड शिवाय संगणक व संगणक प्रणालीचा वापर करतात. ज्या संगणकावरील गोपनीय माहितीची चोरी करायची आहे. त्यावर रेडीमेड प्रोग्रॅम वापरतात हॅकर हल्ला चढवितात यामागचा हेतू स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रेडीट कार्डावरील माहिती मिळवून त्या अकाऊंटवरील पैसे काढून घेणे हा असतो.

**सायबर स्टॉकिंग** : यामध्ये एखाद्याची माहिती मिळवून त्याला धमक्या देऊन व मेल पाठवून त्रास देणे म्हणजे सायबर स्टॉकिंग होय.

**डिनायल ऑफ सर्व्हिस ॲटक** : नेटवर्कची सुविधा बंद करण्यासाठी नेटवर्कचे बॅन्डविथ फलड करतात. असंख्य व फार मोठे मेल पाठवून मेल बॉक्स भरुन टाकतात. यामुळे नेटवर्कमधील ट्राफीक जाम होते व कम्युनिकेशन थांबते.

**व्हायरस डेसीमिनेशन** : व्हायरस म्हणजे संगणक बाहय सूचना संगणकात प्रवेश करुन बिघाड करतात. माहितीची नासधूस करतात असा प्रोग्राम संगणक तज्ञ वाईट हेतूनेच तयार करतात.

**आय. आर. सी. क्राईम** : इंटरनेटवर सध्या चॅटरुम उपलब्ध आहेत. यामध्ये चॅट करणारी व्यक्ती खोटी माहिती सांगून दुसऱ्याला फसवू शकते. अशी चॅटरुममध्ये खोटी माहिती देऊन इतरांना फसविण्याचे प्रकार वाढले आहेत. या गुन्हेगारीला आय. आर. सी. क्राईम असे म्हणतात.

**क्रेडीट कार्ड फ्रॉड** : यामध्ये क्रेडीट कार्डाचा बेकायदेशीर वापर करुन खरेदी करण्याचे गुन्हे केले जातात.

**नेट एक्स्ट्रॉशन** : कंपनीचा गोपनीय व महत्वाचा डाटा चोरी करुन त्यापासून पैसे मिळविले जातात. किंवा कंपनीकडूनच पैसे मागितले जातात.

**फिशिंग**: यामध्ये वेगवेगळया प्रकारचे मेल पाठवतात व लोकांची पर्सनल माहिती मिळवतात अनावधानाने मेलला उत्तर देताना बॅक अकाऊट नंबर, पासवर्ड पाठविला जातो. नंतर त्याचा गैरवापर होतो.

**चाईल्ड पोर्नोग्राफी** : लहान मुलांना फसवून त्यांना बीभित्स चित्र, वाङमय, चित्रफीत पाठविल्या जातात. यामध्ये लहान मुलांचे मेल एड्रेस मिळवतात. चॅट मध्ये खोटी माहिती सांगून मुलांचा विश्वास संपादन करतात. त्यांना घराबाहेर भेटण्यास सांगतात व अशा भेटींमध्ये त्यांच्याकडून अनैतिक लैंगिक गोष्टी करवून घेतात.

सायबर गुन्हयाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालेले आहे. हे पुढील आकडेवाडीवरुन निदर्शनास येते.

देशात २०१३ मध्ये सर्वाधिक सायबर गुन्हे दाखल झालेली राज्य पुढीलप्रमाणे : केरळ – ३१२, बंगाल – ३०९, उत्तरप्रदेश – २४९, मध्यप्रदेश – १९७, हरियाणा –१८२, राजस्थान –१५४, महाराष्ट् –५६१, आंध्रप्रदेश – ४५४, आणि कर्नाटक – ४३७.

तसेच महाराष्ट्रातील २०१५ ते २०१८ पर्यंतचा सायबर गुन्हेगारीची संख्या सुध्दा लक्षणिय आहे. २०१५ मध्ये २०९५, २०१६ मध्ये २३८०, २०१७ मध्ये ४०३५ तर २०१८ मध्ये ३२२२ सायबर गुन्हयाची नोंद आहे.

वरील गुन्हयांच्या प्रकारांवरुन आणि आकडेवारी वरुन सायबर गुन्हयाची व्याप्ती किती मोठी आहे हे लक्षात येते. अशा या सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी सायबर सुरक्षितता अत्यंत महत्वाची आहे.

**सायबर सुरक्षितता** : ''संगणकावर होणारा गुपचूप हल्ला किंवा अनधिकृत घटकांकडून झालेली संगणक प्रणालीची अतोनात हानी आणि त्याचेच संरक्षण करणे म्हणजे सायबर सुरक्षितता (Cyber Security) होय.''

**१ क्रिप्टोग्राफी** : सायबर सुरक्षिततेसाठी वापरले जाणारे एक महत्वाचे तंत्र म्हणजे क्रिप्टोग्राफी होय. क्रिप्टोग्राफी ही लेखनातील एक सांकेतिक लिपी आहे. हया लिपीचा वापर हा महत्वाचे किंवा गुप्त लेखन लपवून ठेवण्यासाठी केला जातो. क्रिप्टोग्राफीला मराठीत कूटलेखन असे म्हणतात. या शब्दाचा अर्थ लपलेला किंवा लपवलेला असा होतो. याचाच अर्थ क्रिप्टोग्राफी म्हणजे गुप्त माहितीचा अभ्यास होय. प्रगत देशांमध्ये एटीएम कार्ड, कॉम्प्युटर पासवर्ड इत्यादीसाठी क्रिप्टोग्राफी हे तंत्र वापरले जाते. क्रिप्टोग्राफीचा जास्त वापर हेरगिरी करण्यासाठी, सैन्याला संदेश पाठवण्यासाठी केला जातो. सायबर स्पेस मध्ये असलेल्या सूचना हॅकिंग तंत्राद्वारे चोरली जाण्याची शक्यता असते. त्यासाठी क्रिप्टोग्राफी हे तंत्र अत्यंत महत्वाचे आहे.

**२ सायबर गोपनीयता : फायरवॉलचे महत्व**: इंटरनेट वापरताना माहिती शोधणारा तुमचा संगणक, माहिती स्त्रोत उपलब्ध करणारा संगणक, इंटरनेट तंत्रज्ञान आणि दळणवळण तंत्रज्ञान यांचा समावेश होता. माहितीचा शोध घेताना तुमच्याकडे येणारे माहिती शोध घटक हे दळणवळण माध्यमातून प्रवास करीत असतात. कोणत्याही क्षणी ते हजारो विनाशकारी व्यक्तीच्या, विषाणूंच्या तसेच दुषित संगणकाच्या संपर्कात येतात. सुरक्षिततेतील त्रुटीमुळे तुमच्या संगणकाचे नियंत्रण एखादया सायबर विघातक शक्तीच्या हाती केव्हाही जाण्याची शक्यता असते. असे असले तरी असे धोकादायक घटक शोधून काढणे आणि आपल्या संगणकापर्यंत येण्यापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी तंत्रज्ञान साधन म्हणजे फायरवॉल होय. फायरवॉल ही एक अज्ञावली असून ती दळणवळणाकडे लक्ष देणे व धोकादायक महितीचे घटक शोधून काढून त्यांना थांबविण्याचे काम करते.

**३ संगणक आय. पी. मुळे धोका**: इंटरनेट वापरातील मुख्य धोका हा तुमच्या इंटरनेट विश्वातील (IP Address) मुळे होत असतो. आपण जेव्हा इंटरनेट सर्फिंग करत असतो तेव्हा तुम्ही कोणत्या माहितीचा शोध घेत आहात हे बाहय जगास समजते. याशिवाय I P Address शी निगडीत गोष्टी संज्ञेबरोबर तुमच्या संगणकाची ओळख लक्षात ठेवतात. तसेच तुमच्या माहितीचा तपशील कुकीज सारख्या बाहय जाहिरातकर्त्यांना उपलब्ध करुन देतात. या कुकीजना एकदा का तुमच्या संगणकाचा पत्ता समजला की जेव्हा जेव्हा तुम्ही इंटरनेटवर माहिती शोधाल तेव्हा तेव्हा जाहिरात वजा माहितीचे तुकडे तुमच्याकडे कुकीज पाठवित राहतात. त्यामुळे तुमची संगणक सुरक्षितता धोक्यात येते. यासाठी अनॉनिमायझर्सचा वापर केला जातो.

**अ) इंटरनेट अनॉनिमासझार्स** : इंटरनेट अनॉनिमायझार्स या अशा प्रकारच्या सेवा आहेत. की ज्यामुळे तुमचे वेब ब्राऊजर सुरक्षित गुपित ठेवले जातात. तुम्हाला हवी असलेली वेब साईट सर्फ करण्याचे काम ते करतात व हवी असलेली माहिती तुमच्या ब्राऊजरवर सादर करतात. या जोडणीमुळे तुम्ही इंटरनेटवरुन कोणती वेबसाईट शोधलीत व काय माहिती मिळवलीत याबाबत गुप्तता राखली जाते.

**ब) इंटरनेट वातावरणात विषाणूचा** (Virus) मोठया प्रमाणावर व सहज होऊ शकतो. माहिती डाऊनलोड करताना किंवा ई–मेलच्या माध्यमातून विषाणू (virus Internet worms) तुमच्या संगणकात येऊन राहतात. यामुळे माहितीला धोका पोहचतो यासाठी

अ. इंटरनेट माध्यमातून व्हायरसचा शिरकाव होऊ नये यासाठी ॲन्टिव्हायरस पॅकेजेस उपलब्ध आहेत. ब. विशेषत: विन्डोज आधारित काम करणाऱ्या पी. सी. च्या बाबतीत काळजी घेणे आवश्यक आहे. ॲन्टीव्हायर्स संगणकात प्रस्थापित करुन दरवर्षी त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक असते.

**४ सायबरव्दारे होणाऱ्या व्यवहारातून धोका** : सायबरच्या माध्यमातून आपण अनेक आर्थिक महत्वाचे व्यवहार करत असतो. व्यावसायिक व गोपनीय स्वरुपाची कामे ही करत असतो. नेट बॅकिंग, ऑन लाईन शेअर खरेदी, व्यापाराचे सौदे, ऑनलाईन गुंतवणूक इत्यादी सर्व कामामध्ये आपण आपला तपशील तर नोंदवतोच त्याच बरोबर आपल्या बॅक खात्याचा तपशील, क्रेडीट कार्ड क्रमांक, आधारकार्ड क्रमांक तसेच महत्वाच्या व्यवहारासंबधी आय. टी. पासवर्ड नोंदवत असतो. अशा तपशीचा गैरवापर होऊ शकतो यासाठी पुढील प्रमाणे काळजी व सुरक्षा घ्यावी.

अ. आपल्या व्यक्तीगत माहितीवर कोणाची नजर तर नाही ना याची खात्री करावी. वैयक्तिक संगणकाशिवाय इतर संगणकावर महत्वाची कामे करताना जागृत असावे. ब. ज्या वेबसाईटच्या आधारे आपण आर्थिक व गोपनीय व्यवहार करत असू ती वेबसाईट याबाबत सुरक्षितता (Internet Privacy) पुरवितात का याची खात्री करुन मग असे व्यवहार करावेत.

**क. अंदाज लावण्यास कठीण असा पासवर्ड वापरा**: पासवर्ड गुप्त असावा, पासवर्ड लिहीताना जन्मतारीख व नाव यांचे मिश्रण करुन पासवर्ड तयार करु नये. कारण आपल्याला ओळखणाऱ्या व्यक्ती तर्क लावून तुमचे ई–मेल अकांऊट पाहू शकतात. एकदा वापरलेला पासवर्ड दुसऱ्या ई–मेल अकाऊंटसाठी वापरु नका दर तीन महिन्याने पासवर्ड बदलणे.

याचबरोबर अज्ञात स्त्रोताकडून आलेला ई–मेल न वाचणे. स्पाम मेलला कधीही उत्तर देऊ नये तसेच अश्लिल वेबसाईटसना प्रतिबंध करण्यासाठी पोर्नोग्राफी फिल्टरिंगचा वापर करणे आवश्यक आहे.

**सायबर कायदा** :— ऑक्टोबर २००० पासून माहिती तंत्रज्ञान कायदा भारतात अंमलात आला. या कायदयाचा मुख्य उद्देश हाच होता की, ई—व्यवहारांना महत्व देऊन त्याला कायदेशीर मान्यता प्राप्त करुन देऊन जागतिक प्रवाहात भारताला आणणे हा होता.

**सायबर कायदयाचे फायदे** : क्रेडीट कार्ड ऑनलाईन पध्दतीमुळे व्यवहार सुरळीत, कमी वेळेत व कार्यालयात न जाताही पार पाडणे शक्य झाले आहे. महत्वाची बाब म्हणजे इंटरनेटच्या माध्यमातून होणारे व्यवहार नाकारले जाऊ शकत नाही. उदा. ई—मेलद्वारे केले जाणारे पत्र व्यवहार, आर्थिक व्यवहार, बँकिंग व्यवहार इत्यादी. यानुसार होणाऱ्या व्यवहारांची विश्वासहार्यता असते. त्यास कायदयाने मान्यता प्राप्त झाली आहे.

या कायद्यानुसार काही विशिष्ट रोजगारासंदर्भातील अर्ज ग्राहय धरले जातात दुसऱ्या संस्थेशी केलेले पत्र व्यवहार आणि व्यवसायिक व्यवहार ग्राहय धरले जातात. मात्र अट ते शासकीय स्वरुपात आणि शासन अधिकृत व्यवहार असायला हवेत. महत्वाची बाब म्हणजे सुरक्षिततेच्या संदर्भातील नियमांचे पालन व्यवस्थितरित्या केले जात असल्यामुळे इलेक्ट्रानिक देवाण घेवाणीच्या व्यवहारांना विशिष्ट स्थान प्राप्त झाले आहे.

**समाजिक प्रसारमाध्यमासाठीच्या आय. टी. कायद्यातील तरतूदी** : महिती तंत्रज्ञान नियम २००० आणि सायबर विनिमय अपील न्यायाधिकरण २००० हा कायदा सायबर गुन्हेगारीला आळा बसावा म्हणून संमत केला गेला. या गुन्हयासाठी भारतीय दंडसंहितेप्रमाणे गुन्हेगारास कारावास व दंड करण्याची तरतूद आहे. त्यातील काही तरतूदी पुढील प्रमाणे —

**कलम ६६ अ** — एखाद्यास बदनामीकारक, खोडकर संदेश पाठविणे किंवा एखादी खोटी माहिती पसरविणे ज्यामुळे कुणाची कुंचबणा होणे. धोका निर्माण होऊन त्रास, मानहानी, इजा होणे, आकस, शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता असते. किंवा व्देषभावना वाढीस लागू शकते किंवा एखादया संदेशाचे मूळ स्त्रोत लपविणे किंवा खोटे भासविणे अशा कृती केल्यास तीन वर्षे कैद आणि दंडाची तरतूद आहे.

**कलम ६६ सी** — दुसऱ्याचा पासवर्ड चोरी करणे. त्याच्या परवानगीशिवाय वापरणे, डिजिटल हस्ताक्षर व फिंगर प्रिंटचा गैरवापर यासाठी तीन वर्षे कैद व एक लाखापर्यंत दंडाची तरतूद आहे.

**कलम ६६ डी** — दुसऱ्याचा डयुप्लिकेट आय. डी., मेल आय. डी., प्रोफाईल तयार करणे, वेबपेज चोरी करणे, दुसऱ्याच्या नावाने एस.एम.एस. पाठविणे, फसविण्याच्या हेतूने ई—मेल पाठविणे. यामध्ये ३ वर्षे शिक्षा आणि एक लाखांपर्यंत दंड होऊ शकतो.

**कलम ६६ ई** — चोरुन कुणाचे अश्लिल फोटो, व्हिडीओ तयार करणे व ते इंटरनेटवर टाकणे यामध्ये तीन वर्षे शिक्षा व एक लाखापर्यंत दंडाची तरतूद.

**कलम ६७ बी** — चाईल्ड पोर्नोग्राफीमध्ये पाच वर्षे शिक्षा आणि दहा लाखांपर्यंत दंडाची तरतूद.

**कलम ६७ सी** — इंटरनेट, संगणकाचा वापर करणाऱ्या प्रत्येक युजरचे रेकॉर्ड ठेवणे बंधनकारक आहे. जर रेकॉर्ड ठेवले नाहीत तर गुन्हा समजला जाईल. यासाठी तीन वर्षे शिक्षा व एक लाखापर्यंत दंडाची तरतूद.

**कलम ६९** — मोबाईल सेवा सुविधा प्रदान करणाऱ्या कंपन्यांनी मास्टर की सरकारला देणे बंधनकारक केले आहे. असे न केल्यास यामध्ये सात वर्षे सक्त मजुरीची शिक्षा आहे.

तंत्रज्ञानातील होणाऱ्या बदलामुळे सध्या गुन्हयांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने सायबर कायदयाचे महत्व वाढले आहे. तसेच न्यायालयीन खटल्यांमध्ये बाजू मांडण्यासाठी पुरावा म्हणून सायबर कायदयाचे महत्व वाढत आहे. संगणक हॅकिंग, ई—कॉमर्स आणि व्यवसायाच्या रक्षणासाठी डिजिटल स्वाक्षरीचे संरक्षण यासारख्या खटल्यांमध्ये व याच्याच जोडीला बौध्दीक संपदा किंवा कॉपीराईट सारख्या प्रकरणांमध्ये सायबर कायदा महत्वाची भूमिका निभावत आहे.

**निष्कर्ष** :— १. सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी सायबर शिक्षण आवश्यक आहे. २. सायबर सुरक्षितेचे उपाय योजले तर सायबर गुन्हेगारीला प्रतिबंध घालणे शक्य होईल. ३. आज सर्व व्यवहार हे डिजिटल स्वरुपात होत असल्यामुळे आणि डिजिटल इंडिया हे आपले ध्येय असल्यामुळे सायबर शिक्षण ही काळाची गरज झाली आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


१. *भोसले व डोणे (२००९), शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, फडके प्रकाशन, कोल्हापूर.*
२. *संगोलेकर अरुण (२०११), नवीन जागतिक समाजातील विचारप्रवाह, इनसाईड पब्लिकेशन , नाशिक*
३. *सरवदे प्रज्ञा (२००५), ज्ञानगंगोत्री त्रैमासिक (डिसें—फेब्रुवारी), इंटरनेट सर्फिंग सुरक्षिततेचे*
४. *उपाय (पान नं ६८—७५),याशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ, नाशिक*
५. *https://www.maemaharshtra.com/Lkks'ky&fefM;k lk;cj xqUgs*
६. *https://www.maemaharshtra.com/dk;ns lks'ky feMh;kps*
७. *https://www.manacgetalks.com/789/what-is-cybercrime/*
८. *https://gogalmadane.blogspot.com/2016/09/blog-post.htmlcybercrime*
९. *https://www.loksatta.com/techknow-news/social-media-and-cyber-security-152639/*

# भारतातील ग्रामीण विकास

**डॉ. श्रीराम खाडे,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, जि. यवतमाळ.

**प्रस्तावना :—** ग्रामीण विकास हा शब्द जगभरात प्रचलित आहे. पृथ्वी वरील बहुतेक लोक ग्रामीण भागात राहतात. भारतातील बहुसंख्य लोक (७२ टक्के) ग्रामीण भागात राहतात. म्हणून खऱ्या अर्थाने विकास करणे ही या बहुसंख्य लोकांच्या मुलभूत गरजांच्या संबधाशिवाय अपेक्षित नाही. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात, ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या अद्याप ही पोषण, चांगले शिक्षण, योग्य संप्रेषण आणि सामाजिक न्यायापासुन वंचित आहे. म्हणून विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांमध्ये ग्रामीण विकास महत्वपुर्ण आहे.

तथापि, आजपर्यंत ग्रामीण विकासाची कोणतीही सार्वभौम अशी स्विकार्य व्याख्या नाही. संकल्पना म्हणून, ग्रामीण विकास व्यापक आणि बहुआयामी आहे. याचा अर्थ ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या जीवणामध्ये गुणवत्ता आणि संबंधित क्रिया कलापांच्या माध्यमातुन गुणवत्ता सुधारणे होय. एक घटना म्हणून ग्रामीण विकास हे विविध शारीरिक, तांत्रिक, आर्थीक, सामाजिक, सांस्कृतीक आणि संस्थात्मक घटकांमधील परस्पर संवादाचे परिणाम आहे. उदा. जर आपण शेती विषयक क्रियाकलापांद्वारे ग्रामीण भागाचा विकास करू इच्छितो तेव्हा शेतकऱ्यांच्या पारंपारिक शेतीमध्ये बदल करण्याचा विचार करण्याची गरज आहे. पिकांची निवड, शेतीची यंत्रणा, खते आणि किटकनाशकांचा वापर, अल्पसंख्यकांसाठी विशिष्ट योजना तयार करणे, आधुनिक शेतीमधील क्षमता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, रस्ते आणि दळणवळण यंत्रणा, विजेची तरतुद, बाजार इ. मध्ये सुधारणा करणे, अपेक्षीत आहे.

**ग्रामीण विकासाचा अर्थ आणि परिभाषा :—** रॉबर्ट चेंबर्स (१९८३) यांनी असे म्हटले की, "ग्रामीण विकास हा एक विशिष्ट समुह, गरीब ग्रामीण स्त्रिया आणि पुरूषांना त्यांच्या स्वत:च्या आणि मुलांना आवश्यक असलेल्या गोष्टींबद्दल अधिक मिळविण्यासाठी सक्षम करण्याचे एक धोरण आहे. ग्रामीण भागात विकासाठी ग्रामीण विकासाच्या अधिक फायद्यांची मागणी आणि नियंत्रण ठेवणाऱ्या प्रत्येकामध्ये गरिबांना प्रत्यक्ष मदत करणे यात समाविष्ट आहे. या समुहामध्ये लहान शेतकरी, भाडेकरी आणि भूमिहीन यांचाही समावेश आहे."

**ग्रामीण विकास संकल्पनेचे विश्लेषण :—** जागतिक बँकेच्या (१९७५) ग्रामीण भागाच्या विकसासाठी ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा करण्यासाठी एक योजना बनविली गेली आहे. आणि विशेषत: ते ग्रामीण आणि गरीब शेतकऱ्यांसह भाडेकरी आणि भूमिहीन मजुरांकडे लक्ष केंद्रित करते. ग्रामीण विकास हा विविध कार्यक्रम आणि प्रकल्पांद्वारे राबविला जातो. ग्रामीण लोकांच्या विकासाची प्रक्रिया गतिशील केल्यास ज्यायोगे देशातील आत्मनिर्भर नागरिक बनू शकतील. विविध एजन्सी आणि संस्था, स्थानिक लोक सामील करून हे काम केले जाते. ग्रामीण भागातील रोजगार शोधणाऱ्या लोकांमध्ये सर्वात जास्त गरिबांना विकासाचे फायदे समाविष्ट आहे. या गटामध्ये लहान शेतकरी, भाडेकरी आणि भूमिहीन यांचा समावेश आहे. एक घटना म्हणून, ग्रामीण विकास हे विविध शारीरिक, तांत्रिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि संस्थात्मक घटकांमधील परस्पर संवादाचे अंतिम परिणाम आहे. एक धोरण म्हणून, ग्रामीण लोकांच्या, गरिबांच्या विशिष्ट गटाचे आर्थिक आणि सामाजिक कल्याण सुधारण्यासाठी आराखडा तयार केलेला आहे. रॉबर्ट चेंबर्स (१९८३) यांनी परिभाषित केले की, "ग्रामीण विकास हा एक विशिष्ट समूह, गरिब ग्रामीण स्त्रिया आणि पुरूषांना सक्षम बनविण्याचे धोरण आहे. जेणेकरून त्यांना व त्यांच्या मुलांना त्यांच्या गरजेच्या आणि गरजेपेक्षा जास्त मिळू शकेल. ग्रामीण जीवनातील रोजगाराची मागणी करण्यासाठी आणि ग्रामीण विकासाच्या अधिक फायद्यासाठी त्यांच्यावर नियंत्रण ठेवणाऱ्यांमधील गरिबांना मदत करणे यात समाविष्ट आहे. या गटामध्ये लहान शेतकरी, भाडेकरी आणि भूमिहीन यांचा समावेश आहे.

ग्रामीण विकास ही नैसर्गिक आणि मानवी संसाधने, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, संस्था, सरकारी धोरणे आणि कार्यक्रम ग्रामीण भागातील आर्थिक वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी आणि ग्रामीण जीवनाच्या गुणवत्तेस सुधारण्यासाठीची एक प्रक्रिया आहे. आत्मनिरोगी ग्रामीण विकासाचे अंतिम उद्दिष्ट हे ग्रामीण गरिबांच्या आणि ग्रामीण भागातील लोकांच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणणे होय.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :—** १) जागतिकीकरणानंतर भारतातील ग्रामीण विकासाची दिशा तपासणे. २) ग्रामीण विकासासाठी भारत सरकाने सुरू केलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :—** प्रस्तुत संशोधन पेपर हा फक्त दुय्यम साधनावर अभ्यासलेला असुन सदर संशोधन पेपर तयार करण्यासाठी विविध पुस्तके, शेतीविषयक मासिके, वृत्तपत्र, वेबसाईट विविध प्रकारचे शासनाचे अहवाल इ. चा उपयोग करण्यात आला आहे.

**भारत सरकारच्या ग्रामीण विकासासाठीच्या काही योजना:—**

१) **प्रधानमंत्री ग्राम सडक योजना :—** २५ डिसेंबर २००० रोजी तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सुरू केली आहे. ही योजना ग्रामीण भागातील सर्व वस्त्यांना व षहरांना एकमेकांशी जोडण्याचा प्रयत्न करते. यामुळे ग्रामीण लोकांचा आर्थिक आणि सामाजिक सेवामध्ये प्रवेश वाढवून त्यांचे दारिद्रय कमी करण्यास मदत करते. या योजनेमुळे ग्रामीण लोकांना जगभरात कनेक्ट होण्याची संधी मिळते. त्यामुळे ही योजना त्यांना चांगले जीवन जगण्यास मदत करते. जवळपास ८२ टक्के रस्ते २०१७ पर्यंत बांधले गेले असल्यामुळे ग्रामीण भागांना शहरांमध्ये यशस्वीरित्या जोडले आहे. उर्वरित वस्त्या २०१९ पर्यंत रस्त्याला जोडली जातील. ही योजना १४ व्या वित आयोगाच्या शिफारशी नंतर राज्य आणि केंद्र सरकार यांच्या सुयुक्त विद्यमाने राबविली जाते.

२) **दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना :—** ही योजना ग्रामीण जीवनशैली अभियानाचा एक भाग आहे. ग्रामीण युवकांच्या करियरच्या आकांक्षा आणि ग्रामीण कुटुंबाच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्याचा हेतू या योजनेचा आहे. २५ सप्टें २०१४ रोजी ही योजना सुरू झाली असुन या योजनेचा लाभ गरिब कुटुंबातील १५ ते ३५ वयोगटातील तरूणांना दिला जातो. यासाठी १५०० कोटी रूपयाची तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे रोजगार क्षमता वाढविण्यास मदत होईल. ही योजना ५६८ जिल्ह्यामध्ये २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये आणि ६२१५ गटांमध्ये तरूणांचे जीवन बदलणारी आहे. सरकारी अहवालानुसार आतापर्यंत २.७ लाख उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले असुन सुमारे १.३४ लाख उमेदवारांना नोकऱ्या देण्यात आल्या आहे.

३) **स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना/राष्ट्रीय ग्रामीण जीवनरेखा मिशन :—** स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, जी

नवीन राष्ट्रीय जीवन शैली अभियानाची पुनर्रचना करण्यात आली आहे. ही योजना २०११ मध्ये सुरू करण्यात आली असून या योजनेला आजीविका म्हणूनही ओळखली जाते. देशभरातील महिला स्वयंगटाला सशक्त करण्याचा हेतू या योजनेचा आहे. या योजनेअंतर्गत, सरकार ७ टक्के व्याजदराने ३ लाख रूपयाचे कर्ज प्रदान करते आणि परत फेड च्या वेळी ४ टक्के पर्यंत कमी केले जाऊ शकते. ग्रामीण गरिब लोकांसाठी प्रभावी असा प्लॅटफार्म तयार करण्याचा हेतु या योजनेचा आहे. यामुळे आर्थिक सेवामध्ये त्यांना प्रवेश घेता आला. शिवाय त्यांचे घरगुती उत्पन्न वाढविण्यात मदत झाली. यामुळे गरिबांच्या क्षमतेचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देते जेणेकरून ते देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात सहभागी होऊ शकतील.

४) **पंतप्रधान ग्रामीण विकास शिष्यवृत्ती (फेलो) योजना :—** पंतप्रधान ग्रामीण विकास शिष्यवृत्ती योजना ही ग्रामीण विकास मंत्रालयाने सुरू केलेली योजना आहे. जी राज्य सरकारच्या सहकार्याने कार्यान्वित केली गेली आहे. देशाच्या अविकसित आणि दुरस्थ भागात जिल्हा प्रशासनाला अल्पकालीन सहाय्य पुरविण्याचे दुहेरी ध्येय या योजनेचे आहे.

५) **राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा :—** २००५ च्या नॅशनल रूरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी अॅक्ट च्या अनुसार, आर्थिक वर्षात शारिरीक श्रम करण्यास इच्छुक असणाऱ्या ग्रामीण भागातील अकुशल प्रौढांना १०० दिवसांची रोजगाराची हमी दिली जाते. हा कायदा काम करणाऱ्या लोकांना सन्मानाने जगण्यासाठी त्यांचे मुलभूत अधिकार संबोधित करतो, जर एखाद्या व्यक्तीला १५ दिवसाच्या आत रोजगार मिळत नसेल तर तो बेरोजगारी भत्ता घेण्यास पात्र आहे. या योजनेत भ्रष्टाचार कमी करण्यासाठी या कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

६) **संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना :—** गरीबांना रोजगारासाठी २००१ मध्ये संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरू करण्यात आली. दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या आणि त्यांच्या पौष्टिक स्तरावर सुधारणा करणाऱ्या लोकांमध्ये अन्न पुरविण्याचा हेतु आहे. या योजनेमध्ये कंत्राटदारांचा किंवा मध्यस्थांचा रोजगार समाविष्ट नाही.

७) **सर्व शिक्षा अभियान :—** २००० मध्ये माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सर्व शिक्षा अभियानाची सुरूवात केली. शिक्षण हा मुलांचा मुलभूत अधिकार आहे. ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्य आणि केंद्र सरकार या प्रकल्पाचा खर्च सामायिक करतात.

८) **सांसद आदर्श ग्राम योजना:—** सांसद आदर्श ग्राम योजना भारत सरकारद्वारा २०१४ मध्ये सुरू करण्यात आलेला एक ग्रामीण विकास प्रकल्प आहे. ज्यामध्ये प्रत्येक संसद सदस्याने तीन गावांची जबाबदारी घेऊन गावांचा व्यक्तीगत, मानवी, सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक विकासाची काळजी घ्यावी यामुळे गावातील जीवनशैली तसेच जीवनशैलीची गुणवत्ता सुधारली जाईल उपरोक्त प्रकल्पासाठी कोणत्याही प्रकारचा निधी पुरविल्या जात नाही कारण विद्यमान योजनांमधून पैसे उभे केले जाऊ शकतात.

९) **राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम :—** राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम म्हणजे संविधानाच्या अनुच्छेद ४१ आणि ४२ मधील निर्देशिक तत्वांची पुर्तता दर्शवितात. जे म्हणते की, नागरिकांना आजारपण, बेरोजगारी, आर्थिक क्षमतेच्या मर्यादेपर्यंत वृध्द व्यक्तींना मदत करणे हे राज्यांचे कर्तव्य आहे. ही मुलतः भारत सरकारची प्रायोजित योजना आहे जी पेंशनच्या स्वरूपात अपंग असणाऱ्या विधवा, वृध्द व्यक्तींना मदत करते. ही योजना १५ ऑगस्ट १९९५ रोजी कार्यान्वित करण्यात आली.

१०) **प्रधानमंत्री आवास योजना :—** इंदिरा आवास योजना नवी दिल्लीमध्ये २०१६ मध्ये प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना म्हणुन सुधारित झाली असुन भारत सरकारकडुन ग्रामीण गरीब लोकांना निवास प्रदान करण्यासाठी ही योजना कार्य करते २०२२ पर्यंत सर्व नागरिकांना घर प्रदान करणे या योजनेचा उद्देश आहे. घरे बांधण्याची किंमत केंद्र आणि राज्याद्वारे सामायिक दिली जाते. दिल्ली आणि चंदीगड वगळता संपुर्ण भारतातील ग्रामीण भागात ही योजना लागू केली गेली आहे. या योजनेअंतर्गत घरांमध्ये शौचालय, विज कनेक्शन, पिण्याचे पाणी कनेक्शन, एलपीजी कनेक्शन इत्यादी मुलभूत सुविधा असतील. वितरित केलेले घर पती व पत्नीच्या नावाने संयुक्त केले जातील.

११) **अंत्योदय अन्न योजना :—** २००० मध्ये माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सुरू केलेल्या अंत्योदय अन्न योजनेचा उद्देश अनुदानाच्या दराने सुमारे दोनकोटी लोकांना अन्न पुरवठा करणे या योजनेनुसार दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना ३५ किलो अन्नधान्य देण्यात येते. तांदुळ ३/किलोच्या दराने आणि २/किलोच्या दराने गहु देण्यात येतात. प्रथमतः राज्यस्थानमध्ये सुरू केलेली ही योजना आता भारतातील सर्व राज्यांमध्ये लागू केली गेली आहे.

**सारांश :—** उपरोक्त योजना भारत सरकार आणि राज्य सरकारद्वारा राबविण्यात आल्या असुन या योजनांच्या माध्यमांतुन गरिब ग्रामीण समुदायाचा विकास आणि प्रगती साधता येईल. अशाप्रकारे ग्रामीण विकासाचे आपले लक्ष अनेक प्रकारे परिभाषित केले जाऊ शकते. तथापि, यशस्वी ग्रामीण विकासाचा उद्देश ग्रामीण हस्तक्षेपांच्या माध्यमातुन तंत्रज्ञानाचा हस्तक्षेप करून, नवीन आणि जुन्या संस्था आणि संघटनांना त्यांची क्षमता निर्माण करण्यासाठी, चांगल्या संप्रेषण सुविधा प्रदान करणे आणि सरकारी धोरणे आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, सुधारणा किंवा बळकटी देण्याकरीता गरीब ग्रामीण लोकांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणे असा आहे.

आपल्या देशाच्या ग्रामीण भागाचे उन्नतीकरण करण्यासाठी, ग्रामीण विकास मंत्रालय आणि ग्रामीण विकास विभाग आणि ग्रामीण स्त्रोत विभाग यांच्या समन्वयाने भारत सरकार विविध योजना पुढे चालवित आहे. ह्या योजना ग्रामीण भारतातील नागरिकांना लाभ देण्यासाठी तयार केल्या गेल्या आहेत. ज्या शेवटी दीर्घ काळातील भारतीय अर्थ व्यवस्थेचे मजबूत खांब बनतील.

*संदर्भ :—*

*१. www.rural development com.in*
*२. www. government scheme for rural development.com*
*३. www.rural development in India affer LPG.Com.*
*४. www. goggle.com.*
*५. विविध वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके आणि षासनाचे अहवाल इ.*

# ई–साक्षरता : शिक्षण क्षेत्रातील नवप्रवाह

**डॉ. नलिनी बोरकर,** समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोलपंप, जवाहरनगर, भंडारा. मो. ९४२१२४०९६३

**प्रस्तावना :–** मागील काही वर्षापासून ई–साक्षरता हा एक परवलीचा शब्द झालेला आहे. इ. स. २००१ एक साली केलेल्या पहाणीनुसार ६५ टक्क्याहून थोडी अधिक जनता साक्षर आहे. पण केवळ साक्षर असणे म्हणजेच ई–साक्षर असणे असे नाही. शिकावे कसे व त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा हे शिकलेली व्यक्ती म्हणजे ई–साक्षर व्यक्ती होय.

आज संगणक, इंटरनेट व संवाद तंत्रज्ञान यात वेगाने प्रगती होत आहे. याचे ज्ञान घेण्यासाठी लहानापासून मोठयापर्यंत, सर्व उत्सुक आहेत. दररोज नवनवीन तंत्रज्ञान विकसीत होत आहे आणि निरनिराळी सॉफ्टवेअर आणि त्यांचे प्रोग्राम, माहिती प्रणाली यांचे ज्ञान देखील अवगत असणे गरजेचे होवून बसले आहे. दैनंदिन जिवनात देखील रेल्वे, बस, प्लेन चे आरक्षण करण्यासाठी बॅंकेमध्ये किंवा इतर कार्यालयीन कामासाठी संगणक प्रणालीचा उपयोग केला जातो आहे. हे त्यांचे कार्य कसे चालते हे जाणून घेणे प्रत्येकाला आवश्यक झालेले आहे. 'जी व्यक्ती नाही ई–साक्षर, ती समजावी निरक्षर' अशी नवीन म्हण आता रूढ झाली आहे. कारण दैनंदिन व्यवहारात देखील क्रेडीट कार्डस्, डेबिट कार्डस्, एटीएम वगैरे ई–बॅंकींग, ई–कॉमर्स, ई–लर्निंग (अध्ययन) हे शब्द सर्रास वापरले जात आहेत. सर्वच शासकीय कर्मचाऱ्यांना संगणक शिक्षण आवश्यक केले आहे. ई–मेल पाठविणे हे सर्व संदेश वहनासाठी आवश्यक आहे (डॉ. प्रमोद फटिंग, वर्षा ठाकरे, नरेंद्र बागडे –२०१३–०५). हे सर्व कां आवश्यक आहे कारण इलेक्ट्रानिक आधारीत नवनवीन माहितीचे स्त्रोत निर्माण होत असतांना त्यांचा उपयोग करून घेण्याचे कौशल्य आत्मसात केल्याशिवाय ज्ञानाच्या प्रचंड खजिन्यापर्यंत आपल्याला पोहचता येणार नाही. त्यासाठी ई–साक्षरता अत्यंत गरजेची बनलेली आहे.

**ई–साक्षरतेसाठी मूलभूत बाबींचे ज्ञान :–** ई–साक्षरतेसाठी काही मूलभूत बाबींचे जुजबी का होईना ज्ञान असणे आवश्यक आहे. प्राथमिक स्वरूपाचे हे ज्ञान असल्याशिवाय इ–लर्निंग व ई–साक्षरता घडून येणे शक्य नाही. १) संगणकाबाबतची माहिती, २) इंटरनेटची ओळख, ३) वेब साक्षरता, वेब ॲड्रेस, ४) माध्यमांची साक्षरता, बहुविध माध्यमे, Animation, सीडी रोम इ. ५) इलेक्ट्रानिक प्रलेखांची विविध रूपे, ६) डिजीटल फोटोग्राफी, ७) डी. व्ही. डी., ८) पावर पॉईंट व्दारे सादरीकरण, ९) मोबाईल व एस.एम.एस., १०) ई–मेल, ११) बॅंकींगसाठी इंटरनेटचा उपयोग, १२) प्राप्तीकर विवरणे इंटरनेटवरून पाठविणे, १३) रेल्वे आरक्षण, १४) ई–तिकिट घेणे, १५) फॅक्स पाठविणे, ही यादी अजूनही लांबवता येईल परंतू प्रामुख्याने संगणक व इंटरनेट या सर्वात प्रमुख बाबी आहेत.

**इंटरनेट – माहितीचे महाजाळे :–** इंटरनेट, दूर संवादन व इतर प्रसार माध्यमांमुळे जगात कोठेही उपलब्ध असलेली माहिती विविध स्वरूपात विविध ठिकाणी विखुरलेली असते. निरनिराळया 'सर्व इंजिन्सचा' उपयोग करून ती शोधावी लागते. तीचे आशय विश्लेषण करून योग्य तऱ्हेने संघटन व संचयन करता आले तर हवी तेंव्हा ती माहिती मिळविणे सहज शक्य होईल. त्यामुळे इंटरनेट ही जादुयी दुनिया आहे. यात माहितीचा प्रचंड खजिना दडलेला आहे. फक्त त्यां खजिन्यापर्यंत पोहचण्याचा मार्ग ई–साक्षरतेच्या माध्यमातून शोधावा लागतो.

**ई–साक्षरता वाढविण्यासाठीचे प्रयत्न :–** संगणकाचा वापर आज जिवनाच्या प्रत्येक क्षेत्रात केला जातो आहे. मानवी जीवन सहज–सोपे करण्यासाठी संगणकाने खुप हातभार लावला आहे. बाजारहाट, हवामानाचे अंदाज, बी–बीयाणे, शेती प्रक्रियेची मांडणी, प्रौढ साक्षरता, कार्यालयीन व बॅंकेतील कामे इत्यादी दैनंदिन महत्वाच्या कामासाठी ई–साक्षरतेची गरज लक्षात घेवून www.com.unisa.edu.au/cc./papers/non-referred/sween.html हे संकेतस्थळ उपलब्ध आहे (शरद भट – २००८–३५).

ई–साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी शासकीय स्तरावरसुध्दा काही प्रयत्न करण्यात येत आहेत. उदा. मध्यप्रदेशात ज्ञानदूत (GYANDOOT) तर महाराष्ट्रात नॅशनल इन्फर्मेटिक्स सेंटरद्वारा वारणा वाथर्ड व्हिलेज, तर अशाचप्रकारचे काही, प्रकल्प कर्नाटक व तामिळनाडू राज्यात देखील राबविल्या जात आहेत. ही वाटचाल पहातादेखील अशा रितीने ई–अज्ञानाच्या अधांरातून प्रकाशाकडे वाटचाल करण्याचे प्रयत्न मोठया प्रमाणावर होतील असा विश्वास बाळगण्यास हरकत नाही.

**तंत्रज्ञानाची प्रगती व वाटचाल :–** संगणकाचा आकार दिवसेंदिवस लहान होत चालला आहे तरीही त्यांच्या कार्यक्षमतेत व शक्तीमध्ये कमालीची वाढ होत आहे. लॅपटॉप व तळहाताएवढे संगणक तयार झालेले आहेत. प्रचंड असलेल्या वेगवेगळया प्रकारचे आणि आकाराचे डेटा काही क्षणात प्रक्षेपीत करण्यास सक्षम असणारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नेटवर्क डेटाबेस तयार झालेले आहेत. अधिकाधिक माहिती साठवून ठेवण्याचा ऑप्टीकल डिजीटल डिस्क उपलब्ध होण्याची शक्यता आहे. सध्या ओडीडीज २.६ गिगाबाईटस् ते ३.९ गिगाबाईटस् इतका विशाल डेटा एकस्तरीय सीडी प्लेटवर संग्रहीत करता येतो. म्हणजेच १८०० ते १७०० फ्लॉपी डिस्कच्या बरोबरीची त्याची संग्रह क्षमता असते. सीडी रोम ची जागा माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील डिजीटल व्हिडीओ डिस्क्स घेत असून बहुविध माध्यमीय सीडीपेक्षा देखील त्यांची क्षमता कित्येक पटीनं जास्त आहे. दररोज तंत्रज्ञानात नवनवीन संशोधने होत आहेत आणि नवनवीन गॅझेटची भर पडत आहे.

**ई–साक्षरते चे फायदे:–** ई–साक्षरता काळाची व मानवी समाजाची गरज बनलेली आहे ते तीच्या खालील फायद्यांमुळे :–

माहिती क्रांतीमुळे शिक्षण, बॅंकिंग, वाणिज्य, शॉपींग, करमणूक, प्रशासन इत्यादी क्षेत्रात खूपच प्रगती झालेली आहे. या प्रत्येक शब्दापुढे 'इ' हा प्रत्यय लागलेला आहे. संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून अनेक अक्टीव्हिटीज करणे सहज शक्य झाले. सीडी रॉम, डिव्हिडी यांच्या माध्यमातून इ–कॉन्फरन्सच्या द्वारे शिक्षण प्रदान करण्याचे कार्य द्रुत गतीने होवू लागले. यातून शिक्षण घेणारे विद्यार्थी इ–ग्रंथालयांच्या व इंटरनेटच्या माध्यमातून शिकू लागले व परिक्षा सुध्दा देवू लागले. टेलिमेडीसिन व टेलेमडिसिन किंवा टेलेरेडीओग्राफी नेटवर्कच्या मदतीने आरोग्य सेवा प्रदान करणाऱ्या संस्था प्रतिमा तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तसेच आजारांचे अगोदरचे अहवाल पडताळणे, त्या माहितीच्या आधारे रूग्णांच्या आजारांचे निदान बिनचुक करणे इत्यादी सहज शक्य झाले आहे.

उत्पादकांना वाढविणे, वस्तुचा खप वाढविणे, इ–खरेदी, व्यापार, परदेशी कंपन्यांसी वाटाघाटी इत्यादी इ–साक्षरतेमुळे शक्य झाले. भारतात राहूनही परदेशी कंपण्यांशी संपर्कात राहून नोकरी, उद्योग व्यवसायासाठी इ–साक्षरता वरदान ठरत आहे.

**ई–साक्षरतेचा प्रचार व प्रसार :–** समाजातील नवीन पीढीला सुसंस्कृत बनविण्याचे काम शिक्षण करीत असते. आजची नवीन

पीढी पारंपारीक शिक्षणाच्या स्त्रोतांना कंटाळली आहे. तीला संगणकाचे व मोबाईलचे वेड लागले आहे तर याच माध्यमांचा उपयोग करून शिक्षण अधिक सोपे आणि अधिक आंनददायी बनविता येवू शकते हे दाखवून दिले पाहिजे. इंटरनेट हे प्रभावी आणि व्यापक असे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. इथे कोणीही यावे आणि त्याला हवे ते ज्ञान मिळवावे. हे व्यासपीठ सर्वासाठी खुले आहे. त्यामुळे सर्वजग हेच एक शिक्षणसंस्था झालेले आहे.

मुद्रित पुस्तकांच्या किंमती वाढलेल्या आहेत. छपाई खर्च वगळता पुस्तक विक्रेत्यांना कोणतेच प्रॉफीट होत नाही अशी त्यांची ओळख असते. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने माहितीचे हस्तांतर होणे ही आजच्या काळाची गरज आहे. आजच्या युगात इंटरनेट सारखा शिक्षण देणारा दुसरा स्वस्त माध्यम उपलब्ध नाही.

**ई–साक्षरतेची साधने :–** ई–साक्षरतेची साधने म्हणून खालील साधनांचा वापर केला जातो.

इलेक्ट्रॉनिक मुद्रित, दृकश्राव्य माध्यमांचे एकत्रिकरण करून संगणकाच्या द्वारे ऐकता, पाहाता येतात अशा माध्यमांचा संगम केला की त्यात बहुविध माध्यमे म्हणता येतात. माहितीचा प्रसार करीत असतांना विविध माध्यमांचा उपयोग होत असतो म्हणून त्यांना मल्टीमिडीया किंवा बहुविध माध्यमे ही संज्ञा रूढ झाली आहे. बोलणे, ध्वनी, संगीत, चित्रपट, चित्रे, सजीवचित्रे, आकृत्या, आलेख, छायाचित्रे वगैरे सर्व गोष्टींचा समावेश बहुविध माध्यमात होतो.

**शैक्षणिक कार्यासाठी बहुविध माध्यमे :–** बहुविध माध्यमांचा वापर करून संगणकावर आवाज, संगीत, भाषण, गप्पागोष्टी, सजीव भासणारे कार्टुनस्, प्राणी प्रतिमा तयार करता येतात. तसेच मुद्रित मजकूर, आकृत्या, आलेख, सर्व बांबींचे एकत्रीकरण म्हणजे मल्टीमिडीया होय. मल्टीमिडीयाचा वापर मनोरंजनासाठी तर मोठया प्रमाणावर केला जातोच आहे. परंतू एखाद्या विषयाची सखोल मांडणी करणे, प्रश्नांची उकल करणे, निरनिराळया विषयाचे शिक्षण देणे यासाठी सुध्दा भरपूर उपयोग होतो. या माध्यमांचा उपयोग करून विषय समजावून सांगणे, बहुरंगी चित्रमय रूपात सांगण्यासाठी सीडी रॉम उपलब्ध करणे याशिवाय तुम्हाला हवे असलेले प्रोग्रॅम मल्टिमिडीया संगणकावर वापरून लिहू शकतो. जाहीरात क्षेत्रासाठी तर बहुविध माध्यमे मोठे वरदानच ठरले आहे.

**बोलके ग्रंथ :–** निरनिराळया तऱ्हेचे चित्रमय ग्रंथ देखील बहुविध माध्यमांच्या रूपात उपलब्ध आहेत. संगणकावर हे ग्रंथ वाचल्यास त्यातील चित्रे बोलतात, हसतात, धावतात. विज्ञान विषयक बहुविध माध्यम वापरलेला कोष असेल तर हालचाल करणाऱ्या आकृत्या व छायाचित्रे, सजीव भासणांऱ्या रासायनिक द्रव्य दुसऱ्या रासायनिक द्रव्यात मिसळले तर ज्या हालचाली होतात त्या सर्व दाखवता येतात. याखेरीज पदार्थ विज्ञान, गणित, जीवशास्त्र हे विषय देखील या तंत्राव्दारे सहजपणे समजावून सांगता येतात. मात्र हे काम करण्यासाठी बहुविध मल्टिमिडीया सॉफ्टवेअरचा उपयोग करावा लागतो. अशा तऱ्हेचे सॉफ्टवेअर विकसीत होत असतात.

**सीडी रॉम चे फायदे :–** संग्रहाची संख्या व गुणवत्ता सी रॉम मुळे वाढते. पारंपारिक ग्रंथ किंवा नियतकालिकातून माहिती शोध उपभोक्ता संगणकाच्या सहाय्याने स्वत: घेवू शकतो. संग्रहाची क्षमता वाढते. उदा. एनसायक्लोपिडीया ब्रिटानिकाचे ३० खंड केवळ एका सीडी मध्ये राहू शकतात. (शरद भट २००८–३९). पारंपारिक माहिती स्त्रोतांच्या तुलनेत त्यांची किमंत कितीतरी कमी असते. ज्ञानाचे हे स्वरूप खूप टिकावू असते, लवकर खराब होत नाही. मल्टीमिडीया चा वापर करून माहितीचे सादरीकरण प्रभावीपणे करता येते. सी–रॉम सुविधा असलेल्या निरनिराळया केंद्राचे जाळे तयार करून एकाच वेळी अनेक उपभोक्ते माहिति संचयाचा उपयोग करू शकतात. नियतकालीकांचे मागिल वर्षाचे खंड तसेच विश्वकोषासारखे अनेक खंड असलेले ग्रंथ, सीडी रॉम स्वरूपातील तालिका, विविध ग्रंथातील स्त्रोतांचा सामायिक उपयोग करण्यासाठी सोयीच्या असतात.

**इलेक्ट्रानीक प्रलेख :–** छापील स्वरूपाचे, मुद्रित स्वरूपातील प्रलेख सर्वांच्याच परिचयाचे आहेत. परंतू माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दूरसंवादन किंवा प्रक्षेपण तंत्रज्ञान यामध्ये झालेल्या प्रगतीमुळे आज इलेक्ट्रानिक प्रलेख प्रचारात आले आहेत हे प्रलेख वाचायला, ऐकायला संगणकाची गरज असते ते ऑनलाईन किंवा ऑफलाईन वाचता, ऐकता येतात. काही इलेक्ट्रानिक प्रकाशने वास्तविक स्वरूपात हाताळायला मिळत नसली तरी ते संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून वापरता येतात. नियतकालीक, ग्रंथ, अभ्यासक्रमावर आधारीत सीडीज इत्यादी स्वरूपातील लेखन इंटरनेटवर उपलब्ध आहे.

**ऑफलाईन प्रकाशने :–** प्रलेखांच्या प्राकृतिक स्वरूपात ही प्रकाशने उपलब्ध नसली तरी त्यांची नोंद, तालिका, लेखन, प्रलेखनात, प्रकाशक, प्रकाशनवर्ष वगैरे माहिती सकट करता येते. उदा. सीडी–रॉम स्वरूपातील विश्वकोष, सीडी–रॉम स्वरूपातील नियतकालिके इत्यादी. याशिवाय व्हिडीओ टेप्स, टेले–टेक्स्ट, मल्टिमिडीया या सर्वांचा समावेश या प्रकाशनात होतो. ऑफलाईन प्रकारात सीडी–रॉम जास्त प्रचारात असून त्याचा कॉम्पक्ट डिस्क रीड ओन्ली मेमरी याचा सीडी रॉम हा संक्षेप होय.

**ऑनलाईन प्रकाशने :–** ही प्रकाशने इलेक्ट्रानिक माध्यमात यंत्रिय वाचनीय स्वरूपात उपलब्ध असून ऑनलाईन वाचता किंवा मुद्रीत करता येतात. उदा. इलेक्ट्रॉनिक नियतकालिके किंवा ऑनलाईन डेटाबेस किंवा वर्ल्ड वाईड वेब (जागतीक विस्तारीत जाळे). उदा. १) इंटरनेटवर ऑनलाईन उपलब्ध शब्दकोष. २) इंटरनेटवर ऑनलाईन उपलब्ध नियतकालिक ३) इंटरनेटवर ऑनलाईन उपलब्ध एखाद्या संस्थेचे, कार्यालयाचे किंवा विद्यापीठाची माहिती देणारे होमपेज. इलेक्ट्रानिक प्रकाशने ही एकतर केवळ ऑनलाईन उपलब्ध असतात किंवा अभिलिखित व शिवाय डिजीटल स्वरूपात अशा तीन प्रकारे उपलब्ध असतात. कधीकधी इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रलेखांचे देखील मुद्रित स्वरूपात रूपांतर उपलब्ध होते.

**दृकश्राव्य प्रलेख व इलेक्ट्रानिक प्रकाशने :–** हल्ली कित्येक प्रलेख हे मल्टिमिडीया चा उपयोग करून स्थीरचित्रण, सजीव हालचाल करणारी चित्रे, ध्वनी आणि दृष्य या सर्वांचा एकत्रित उपयोग करून किंवा प्रत्येक स्वतंत्र स्वरूपात देखील मिळू शकतात व कधीकधी दृकश्राव्य व इलेक्ट्रानिक प्रकाशने त्यांचा थोडा सुक्ष्म अभ्यास करून ओळखता येतात.

**आभासीय प्रलेख :–** सर्व प्रकारची पत्रे, वृत्तांत, पारंपारिक स्वरूपात इमेल च्या सहाय्याने पाठविता येतात.

**इलेक्ट्रानिक प्रकाशने :–** इलेक्ट्रानिक प्रकाशनांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. १) इलेक्ट्रानिक नियतकालीके, २) इलेक्ट्रानिक ग्रंथ, ३) इलेक्ट्रानिक वाचीय मजकूर, ४) इलेक्ट्रॉनिक प्रतिमा, आकृत्या इत्यादी. ही सर्व प्रकाशने म्हणजे त्यांच्या मुद्रित स्वरूपाचेच प्रतिबिंब असू शकते किंवा केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपातच उपलब्ध असतात. पण ती मूद्रित स्वरूपात पण उपलब्ध असतात. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिध्द झालेल्या प्रकाशनांचे त्यांच्या कागदावर मुद्रित केलेल्या पारंपारिक प्रकाशापेक्षा निश्चितच काही फायदे असतात. इलेक्ट्रानिक स्वरूपातील प्रकाशने केव्हांही म्हणजे दिवस रात्र व कुठेही वापरता येतात. एकाच वेळी अनेक लोक

त्याचा उपयोग करू शकतात, वाचू शकतात एवढेच नव्हे तर दुसऱ्या प्रकाशनातील काही प्रकरणांशीदेखील संबंध जोडून नवीनच प्रकाशन निर्मित करू शकतात. सर्वात महत्वाचा फायदा म्हणजे इलेक्ट्रॉनिक प्रकाशनांची बांधणी करण्याची गरज नसते त्यामुळे बाईडिंगचा खर्च वाचतो. परंतू याचा अर्थ असा नाही की इलेक्ट्रॉनिक प्रकाशनाच्या काही समस्या नाहीत. मुल्य निर्धारण, खरेदी, कॉपीराइट जुन्या प्रकाशनांचा संग्रह करणे, प्राप्त केलेल्या प्रकाशनाचा पुर्ण उपयोग किंवा दुसरी प्रत काढण्यासाठी येणाऱ्या कायदेशीर व प्रात्यक्षिक अडचणी देखील असू शकतात. तसेच काही नियतकालिके थोडया काळासाठी इंटरनेटवर विनामूल्य उपलब्ध होतात त्यानंतर मात्र फी भरली तरच ती उपलब्ध होतात. म्हणजे निरंतर उपलब्ध नसतात.

**इंटरनेटच्या उपयोगात झालेली वाढ :—** भारतामध्ये आज १२० मिलियन व्यक्ती इंटरनेटचा वापर करीत आहेत. हा आकडा लवकरच २०० मिलियन एवढा होईल. इंटरनेटवर लोक किती खर्च करतात ही निश्चितपणे माहिती उपलब्ध नसली तरी सर्व इंटरनेट वापर कर्ते जवळ जवळ रोज दीड तास तरी त्याचा वापर करतात. यातील २० टक्के लोक ३ तासाच्या वर इंटरनेटवर घालवतात. ही सर्व आकडेवारी २००६ सालची आहे. आज घडीला हे प्रमाण खुप वाढलेले आहे.

आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. इ—लर्निंग किंवा इ—साक्षरता काळाची गरज झालेली आहे. समाजाला प्रगतीचे उच्च शिखर गाठायचे असेल आणि जगाशी बरोबरी साधायची असेल तर ई—साक्षरतेशिवाय पर्याय नाही.

*संदर्भ :*

*१. इलेक्ट्रानिक माहिती साधने — शरद गो. भट —२००८, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.*

*२. व्यावसायिक संदेशवहन आणि व्यवस्थापन — डॉ. प्रमोद फटींग, डॉ. वर्षा ठाकरे, प्रा. नरेंद्र बागडे — २०१३, सर साहित्य केंद्र नागपूर.*

# समाजशास्त्रीय संशोधनाची प्रासंगिकता

**डॉ. सरोज आगलावे,** सहयोगी प्राध्यापक, महिला महाविद्यालय, नागपूर

आधुनिक काळात सामाजिक विज्ञानात समाजशास्त्रीय अध्ययन करणाऱ्या विज्ञानांमध्ये 'समाजशास्त्र' या विषयाला अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. गेल्या काही वर्षात समाजशास्त्रातील संशोधनाचा आणि संशोधनपद्धतीचा इतर विज्ञानावर प्रभाव पडलेला प्रकर्षाने जाणवतो. आंतरवैज्ञानिक आणि आंतरशाखीय अभ्यास सुरू झाल्यामुळे विविध विज्ञानाच्या संशोधनास प्रोत्साहन मिळाले. इतर सामाजिक विज्ञानामध्ये जी संशोधने झालीत, त्या संशोधनांचा समाजशास्त्राशी बराच जवळचा संबंध राहिला आहे. समाजशास्त्राचा इतर विज्ञानाशी आलेल्या संबंधातूनच राजकीय समाजशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, वैद्यकीय समाजशास्त्र, शिक्षणाचे समाजशास्त्र, शरीराचे समाजशास्त्र यासारख्या शाखा उदयास आल्यात. या व्यतिरिक्त कायदा व न्यायशास्त्र या क्षेत्रावरही समाजशास्त्रीय प्रभाव पडला आणि न्यायतत्वशास्त्रात समाजशास्त्रीय संप्रदाय निर्माण झाले. तसेच गुन्हेगारशास्त्र आणि बळीस्थितीशास्त्र ही शास्त्रे उदयास येण्यास समाजशास्त्राचे मोठे योगदान आहे असेच म्हणावे लागेल. यावरून आपल्याला असे म्हणता येईल की समाजशास्त्राने इतर शास्त्रांना समाजाच्या विविध अंगाचा, स्थितींचा, व्यवहारांचा आणि समस्यांचा अभ्यास करण्यास नवी दिशा दाखविली आहे.

बदलत्या आधुनिक परिस्थितीने गुंतागुंतीच्या समाजात निर्माण झालेल्या समस्यांचे संशोधन समाजशास्त्राशिवाय दुसरे विज्ञान करू शकत नाही. त्यामुळे समाजशास्त्रीय संशोधनाच्या कक्षा दिवसेंदिवस विस्तारीत आहेत. सामाजिक परिवर्तनामुळे ग्रामीण, शहरी, आदिवासी समाजात झपाट्याने बदल होत आहे. बदलाच्या परिणामाबरोबरच अनेक समस्या देखील निर्माण होत आहे. हे बदल, ह्या समस्या समाजशास्त्राच्या संशोधकास संशोधन करण्याची प्रेरणा देत आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारलेल्या अर्थव्यवस्थेचा परिणाम समाजजीवनावर झाला. त्यामुळे व्यक्तीचे जीवन ढवळून निघाले. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिवर्तनाचा, परिवर्तनास कारणीभूत असलेल्या घटकांच्या बदलाने समाजशास्त्राच्या अभ्यासकाला, संशोधकाला स्वस्थ बसू दिले नाही. अनेक संशोधने जरी झाली असली तरी आजही समाजशास्त्रीय संशोधनाची मोठ्या प्रमाणात गरज आहे. समाजशास्त्रातील महत्वपूर्ण संशोधने शासनालाही मार्गदर्शक ठरू शकतात. आधुनिकीकरण आणि विकासाच्या प्रक्रियेत समाजात जे काही परिवर्तन होत असते त्या परिवर्तनाच्या समाजशास्त्रीय अभ्यास, संशोधन होणे गरजेचे आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून नागरी जीवनात निर्माण झालेल्या अनेक समस्या आहेत. ग्रामीण भागात आधुनिकीकरण आणि नागरीकरणामुळे निर्माण झालेलया समस्या असोत, किंवा संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या आदिवासींमधील समस्या असोत या सर्व समस्या संपूर्ण देशाला प्रभावित करीत असतात. अशा समस्यांवर संशोधन होणे गरजेचे असते. अशी संशोधने देशाला विकासाचा मार्ग दाखवीत असतात. त्याचप्रमाणे विषयाला देखील समृद्ध करीत असतात.

नागपूर विद्यापीठाचे योगदान त्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. विद्यापीठातील समाजशास्त्राच्या अभ्यासक आणि संशोधकांनी विविध समस्या आणि विषय घेऊन समाजशास्त्राला एक वेगळी शैक्षणिक उंची प्रदान केली आहे. नागपूर विद्यापीठात समाजशास्त्राच्या अभ्यासाला १९५५ च्या सुमारास सुरूवात झाली. या विभागात अनेक नामवंत विभागप्रमुख झालेत. नागपूर विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयाअंतर्गत अनेक विषयावर संशोधकांनी महत्वपूर्ण संशोधने केली आहेत. कधी सामाजिक समस्या तर कधी जाती–जमातीच्या समस्यांवर अध्ययन केलेत. विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील विभागाद्वारे देण्यात येणाऱ्या विविध स्थळांच्या भेटींमुळे समाजशास्त्र हा विषय विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय झाला आहे. विविध प्रवाहातील विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षांसाठी हा विषय आवडीने निवडतात. एकूणच हा विषय समाजाला दिशादर्शक ठरतो आहे. समाजशास्त्र या विषयाअंतर्गत पुढील विषयांवर संशोधने करता येऊ शकतात. कारण समाजशास्त्रीय संशोधनाचा व्याप आणि कक्षा सतत रूंदावत आहेत शहरी, ग्रामीण, आदिवासी क्षेत्रात होणाऱ्या घडामोडी, परिवर्तनामुळे संशोधनांची नवनवीन दालने संशोधकांसाठी खुली झाली आहेत.

**शहरी क्षेत्रातील संशोधनाचे विषय :–** स्वातंत्र्यापूर्व काळात ब्रिटिशांनी आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारताने विकासाच्या दृष्टीने जी विकासनिती, अर्थव्यवस्था स्वीकारली त्याचा परिणाम व्यक्ती, समाज, संस्कृतीवर होऊन शहरांमध्ये वेगाने परिवर्तन होऊ लागले. परंतु परिवर्तनाबरोबच नव्याने अनेक समस्या उदयास आल्या. त्या समस्या समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी हेरल्या. त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. गलिच्छ वस्त्या, रोजगाराच्या समस्या, तरूणांमधील व्यसनाधिनता, अपघाताच्या समस्या, मनोवैज्ञानिक समस्या, घटस्फोटाची समस्या, कुटुंब विघटनाची समस्या, महिलांची सुरक्षितता, महिलांची बदललेली भूमिका व दर्जा, जेष्ठ नागरिकांच्या समस्या, असहनशीलता, धार्मिक असुरक्षितता, शिक्षित पांढरपेशा वर्गाची उदासीनता, देह विक्रय करणाऱ्या व्यक्तींच्या समस्या, तरूणांमधील उदासीन वृत्ती व त्यातून होणाऱ्या आत्महत्या, शैक्षणिक समस्या, बदलती सांस्कृतीक–सामाजिक परिस्थिती, वाढती गुन्हेगारी आणि गुन्हेगारीच्या समस्या, रोजगारविषयक समस्या, अयोग्य सामाजिकरणातून निर्माण झालेली वाढती बालगुन्हेगारी, अनाथ–अपंगाच्या समस्या, वंचित घटकांच्या आर्थिक–सामाजिक समस्या, मुस्लिम महिलांमधील साक्षरता दर, त्याचा दर्जा व भूमिकेवर झालेला बदल, नोकरी करणाऱ्या महिलांची सुरक्षितता, स्थलांतरणाचा प्रश्न, शहरीकरण, कचरा, सांडपाण्याच्या विल्हेवाटीची समस्या, शुद्ध पाण्याची समस्या, आरोग्यविषयक प्रश्न, वाहतुकीची समस्या, पर्यावरण प्रदुषणाची समस्या, मिश्र संस्कृतीमुळे निर्माण

झालेले प्रश्न, अपुऱ्या पायाभूत सोयींचा अभव, दाट लोकवस्त्या, शहरांचे बदलते स्वरूप, शहरी–ग्रामीण संबंधाचा विकासावर परिणाम, नव्या व्यावसायिक संधी, संघटित–असंघटित क्षेत्रातून काम करणाऱ्या वर्गाचे जीवनमान, त्यांच्या स्थितीतील बदल यासारख्या समस्या संशोधकांना अभ्यासता येऊ शकतात. तशी बरीच संशोधने यावर झाली असली तरी आशा–आकांक्षा, मनोवैफल्य व त्यातून होणारे तणाव या अनुषंगाने विश्लेषण होणे गरजेचे आहे.

**ग्रामीण क्षेत्रातील संशोधनाचे विषय :–** आधुनिकीकरण आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेने ग्रामीण जीवन प्रभावित झाले. आणि बरीच परिवर्तने झालीत. दळणवळणाच्या सोयीमुळे आणि प्रामुख्याने राजकीय आणि आर्थिक प्रभावांमुळे शेतीक्षेत्रातील बदल व्हायला सुरूवात झाली. शेती करण्याच्या पारंपारिक पद्धती, पिकांच्या स्वरूपातील बदल, विविध अनुदाने, सबसिडीज, सहकारी संघटना, सामुहिक विकास योजना, पंचायत राज, महिलांच्या ३३ टक्के आरक्षणामुळे राजकारणात झालेला प्रवेश आणि त्यामुळे ग्रामीण जीवनात झालेला बदल, विकासाच्या शासकीय योजनांचा विकासावरील परिणाम, स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण, व्यसनाधिनता, अंधश्रद्धा, धार्मिक बदल, शैक्षणिक स्थिती, नागरीकरणाचा आणि आधुनिकीकरणाचा प्रभाव, ग्रामीण भागात शिरलेले नकली आधुनिकीकरण, परंपरागत मूल्यांमध्ये, जीवनपद्धतीत झालेला बदल, जोडव्यवसाय व व्यवसायाचे बदलते स्वरूप या सर्व विषयांचे वैज्ञानिक पद्धतीने संशोधन होणे आवश्यक आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे असे आपण अभिमानाने सांगत होतो परंतु आजची खेड्यांची अवस्था आम्हाला शरमेने मान खाली घालायला लावत आहे. त्याकरिता ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात संशोधन होण्याची आवश्यकता आहे. समाजशास्त्राच्या माध्यमातून ते शक्य आहे.

**आदिवासी क्षेत्रातील संशोधनाचे विषय :–** स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींकडे विशेष लक्ष देण्यात येऊ लागले. विशेष योजना आणि प्रशासकीय घटक निर्माण करून विकासाची यंत्रणा राबविण्यात आली. परंतु अज्ञानी आदिवासींना त्या योजनांचा लाभ मात्र मिळू शकला नाही. जंगलविषयक कायद्याने आदिवासींचे नैसर्गिक अधिकार हिरावून घेतले. संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या आदिवासींना विकासाच्या प्रक्रियेत आणण्यासाठी त्यांच्या समस्यांचा अभ्यास होण्याची गरज आहे. त्या अंगाने आदिवासींच्या संदर्भात समाजशास्त्राअंतर्गत महाराष्ट्रात अनेक संशोधने झाली आहेत. महाराष्ट्रातील आणि त्यातही विदर्भातील चंद्रपूर, अमरावती, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आदिवासी मोठ्या संख्येने रहातात. २००१ च्या जनगणनेनुसार अमरावती १३.६९ टक्के, यवतमाळ १९.२४ टक्के, चंद्रपूर १८.११ आणि गडचिरोली ३८.३५ टक्के लोकसंख्या होती. त्यामध्ये २० टक्क्याने वाढ झाली. त्यांच्यातील बदलाचा अभ्यास नव्या दृष्टीने होणे गरजेचे आहे.

गोंड राजघराण्याशी आपले नाते सांगणारी गोंड जमातीतील माडिया–गोंड या जमातीचे अतिमागास जमात म्हणून शासनाने नोंद केली आहे. गडचिरोली जिल्ह्यात २०११ च्या जनगणनेनुसार ही जमात गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळते. गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा साधा भोळा हा समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत गोंधळलेला दिसतो. या गोंधळासह त्यांचा परंपरा आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेतूनचा प्रवास सुरू आहे. संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेचा व त्याला कारणीभूत घटकांचा अभ्यास म्हणूनच आवश्यक ठरतो. जून्या परंपरा किती टिकवून ठेवल्या व नवीन काय स्वीकारले, सण, विवाह, रीरिवाज, रूढी, देवीदेवता, जादू, धर्मविधी, अंधश्रद्धा, जादूटोणा यासारख्या तांत्रिक व धार्मिक क्रिया, मुद्राप्रधान अर्थव्यवहाराचा त्याच्यावर झालेला परिणाम, सामाजिक व कौटुंबिक संघटन, सामाजिक जीवनातील संघटन, सामुहिकता व एकात्मता, या अतिमागास जमातीमधील कर्मठपणा, परंपरागत जीवनशैली, भाषा–पोषाखात झालेला बदल, राजकारणामागील नेतृत्व व सहभाग, नक्षलवादाचा प्रश्न, हिंदूकरणाचा प्रश्न, लिंगभेदावर आधारित श्रमविभाजनाची कारणे, व्यावसायिक बदल, राजकारणातील सहभाग, त्याच्यात मूळात असेलला प्रामाणिकपणा पण बाह्य जगाशी संपर्क आल्यानंतर त्यांच्यात आलेला लबाडपणा, शांतताप्रिय आदिवासी हिंसात्मक आंदोलनाकडे वाहून त्यांनी हातात शस्त्र का घेतले ? ग्रामीण किंवा शहरी भागात आदिवासींच्या स्थलांतरणामुळे त्यांच्या जीवनमानात झालेला बदल या सगळ्या गोष्टींचा, कारणांचा अभ्यास व्हायला हवा.

चंद्रपूर जिल्ह्यात गडचिरोली जिल्ह्यातही माडिया गोंड ही आदिवासी जमात आढळते. एकेकाळी महाराष्ट्रात गोंड राज्यातील बल्लाळपूर, चंद्रपूर आणि माणिकगड हे किल्ले आदिवासींच्या समृद्ध–संपन्न राज्याच्या इतिहासाला उजाळा देत आजही भग्नावस्थेत उभे आहेत. कालांतराने गोंड राज्याला उतरती कळा लागली. आज केवळ इतिहास उरला आहे. या प्रांतात गोंड आणि बौद्ध राजांनी बराच काळ राज्य केले. 'ब्लॅक गोल्ड सिटी' या नावाने परिचित चंद्रपूर जिल्ह्यातील माडिया गोंड, कोलाम जमातीमध्येही गडचिरोली जिल्ह्यतील माडिया गोंडासारख्याच समस्या आहेत. आणि परिवर्तनाची प्रक्रिया त्यांच्यातही सुरू आहे. त्यांच्या समस्यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

अमरावती जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा या दोन जिल्ह्यात वास्तव्य करणारी कोरकू ही आदिवासी जमात संपूर्ण महाराष्ट्राला सर्वपरिचित आहे ती कुपोषणामुळे. राजकीय हक्काबातची उदासीनता, प्रशासन, हिंदूकरण, स्वातंत्र्य–पारतंत्र्य माहित नसलेल्या या समाजाच्या अज्ञानाचा फायदा सर्वांनीच घेतला. महिलांना असलेले स्वातंत्र्य प्रगत विचाराचे लक्षण आहे. डोलारची सद्यस्थिती हा अभ्यासाचा विषय होऊ शकतो. प्राथमिक शाळा आणि अंगणवाड्या यांचे कार्य अभ्यासण्यासारखे आहे. स्वतंत्र शासनातर्फे विविध योजना आखल्या जातात. पण त्याचा त्यांना किती लाभ होतो हा संशोधनाचा विषय आहे.

यवतमाळ जिल्ह्यात कोलाम ही जमात म्हटले की, कुमारीमातांची समस्या आठवते. केळापूर झरी–जामणी, घाटंजी, वणी, राळेगाव, मारेगाव, कळंब या तालूक्यांमधून ही जमात वास्तव्यास आहे. मुख्य गावात न राहता गावापासून काही अंतरावर आपले वेगळे गाव म्हणजे पोड करून रहायला त्यांना आवडते. त्यांची स्वतंत्र न्यायपंचायत असते. गावबंधणी हा आगळावेगळा सण त्यांच्यासाठी फार महत्वाचा असतो. इतर सर्व सण निसर्गाशी

संबंधित असतात. द्रविडी वंशाचे कोलाम लोकांची भाषा कोलामी आहे. या जमातीत कोलामी दंडार नृत्याचा प्रकार प्रसिद्ध आहे. भाषेमधील बदल, व्यावसायिक समस्या, निरक्षरता, दारिद्र्य, अंधश्रद्धा, बेकारी, कुमारीमातांचा प्रश्न, कोलामांचे हिंदूकरण, त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आणि जीवनमानातील बदल, न्यायनिवाडा पद्धती, साक्षरता दर, शेतीविषयक समस्या, भाषेमधील बदल, सण, परंपरा, धार्मिक विधी, लग्नाविधी यामधील बदल, कृषिगीते, धार्मिक गीते, उत्सव गीते, कौटुबिक जीवनातील बदल, गोंदणपद्धती, राहणीमानातील बदल, कारणे, प्रेरणा यामधील बदलाचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

स्वातंत्र्यानंतरची इतकी वर्षे लोटल्यानंतरही आदिवासींच्या विकासा संदर्भात शासनाने विविध योजना राबविल्या. बराच निधी त्याच्या विकासावर खर्च केल्याचे दरवर्षी दाखविले जाते, मग आदिवासींचा विकास कुठे आहे? हा प्रश्न संशोधकांना पडला पाहिजे. त्यांच्यात किती, कोणते आणि कसे परिवर्तन झाले? त्यांच्या परिवर्तनाच्या प्रेरणा कोणत्या होत्या? त्यांचा विकास न होण्यामागची कारणे कोणती? शासन कुठे आणि का अपयशी ठरले? शासकीय योजनांचा लाभ आदिवासींना का मिळू शकत नाही? यानंतर शासनाची नीती काय असायला पाहिजे? यासंदर्भात शासनाला काय सुचना करता येतील? संशेधनातून निघालेले निष्कर्ष शासनासाठी कसे दिशादर्शक ठरू शकतील. याचा विचार करून समाजशास्त्राच्या अभ्यासकाने संशोधन करावे. समाजशास्त्रात संशोधनासाठी बरीच संघी आहे. विविध क्षेत्रे संशोधनासाठी आव्हाने देत आहे, खुणावत आहे. शिक्षण, संस्कृती, अपराध, विचलन, लिंगभेद, कुटुंब व विवाहसंस्थेच्या रचनेतील बदल, पर्यावरण, मिडीया, धर्म, जात, वर्ग, शहरी—ग्रामीण आदिवासी समाज, व्यवसाय, महिला, आरोग्य, समायोजन, हिंसा, सामाजिकीकरण, मूल्ये, आधुनिकीकरण, उत्तर आधुनिकीकरण, राजकारण, कायदा, गुन्हेगारी, लोकसंख्यावाढ, अनुसामाजिक समस्या, विचारधारेतील संघर्ष, एकात्मतेच्या समस्या, विकासाच्या समस्या असे अनेक विषय संशोधनासाठी निवडले जाऊ शकतात. या विषयांवर व्यापक अभ्यास व्हावयास पाहिजे. अभ्यास, चिंतन आणि मनन संशोधनाचा खालावत चाललेला दर्जा नक्कीच सुधारल्या जाऊ शकतो.

*संदर्भ ग्रंथ :—*


१. *आगलावे, प्रदीप, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१०.*
२. *आगलावे, प्रदीप, ग्रामीण आणि नागरी समाज, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९*
३. *बुरकुले, शीतल, भारतातील प्रमुख आदिवासी जमाती.*
४. *देवगावकर, ए. जी., महाराष्ट्रातील निवडक जाती—जमाती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१०.*
५. *देवगावकर, ए. जी., The Media of Bhamragad, International Publication, New Delhi*
६. *गारे, गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन*
७. *शाह, घनश्याम, भारतातील सामाजिक चळवळी : एक साहित्यिक परामर्श, सागे प्रकाशन, न्यू दिल्ली.*

# २९ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल

**डॉ. दीपक पवार,** सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन गोंडवाना विद्यापिठ संलग्नीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर यांनी आयोजित केलेले, चिंतनसभागृह, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापण प्रशिक्षण संस्था (वनामती), धरमपेठ, नागपूर येथ दिनांक १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी संपन्न झाले. सचिव या नात्याने अधिवेशनाचा अहवाल थोडक्यात देत आहे. या राष्ट्रीय अधिवेशनाचा मुख्य विषय "जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा भारतीय समाजावर प्रभाव" असा होता.

या राष्ट्रीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात उद्घाटन कार्यक्रम शुक्रवार दिनांक १८ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता संपन्न झाला. उद्घाटक म्हणून मा. डॉ. सिध्दार्थ विनायक काणे, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ, नागपूर हे लाभले होते. तर बिजभाषक म्हणून मा. डॉ. विवेककुमार, समाजशास्त्र विभाग प्रमुख, जवाहरलाल नेहरू विद्यापिठ, दिल्ली हे होते, प्रमुख अतिथी मा. डॉ. बी. के. स्वाई, समाजशास्त्र विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ, नागपूर हे होते आणि अध्यक्ष म्हणून मा. गिरीश गांधी, अध्यक्ष, वनराई, नागपूर लाभले होते. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात "नव सामाजिक समस्यांच्या उदयात सामाजिक माध्यमांची भुमिका" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचे प्रमुख वक्ता मा. डॉ. जगन कराडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर आणि अध्यक्ष मा. सुरेश द्वादशीवार, संपादक, दैनिक लोकमत हे होते. अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रात डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यान मालिकेत "सामाजिक चळवळी, प्रती चळवळी आणि माध्यमांची भुमिका" या विषयावर वक्ते म्हणून डॉ. उमेश बगाडे, औरंगाबाद, हे होते तर डॉ. शेख शब्बीर, नागपूर हे अध्यक्ष स्थानी होते.

शनिवार, दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी अधिवेशनाच्या सकाळच्या चवथ्या सत्रामध्ये प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्या शोध निबंधाचे सादरीकरण झाले. दुपारच्या पाचव्या सत्रामध्ये "सामाजिक माध्यमातून उदयास आलेल्या नवसमस्यांचे निराकरण" या विषया वरील परिसंवादा मध्ये प्रमुख वक्ते मा. मतीन भोसले, प्रश्णचिन्ह आश्रमशाळा, मंगरूळ चव्हाळा, अमरावती आणि डॉ.राजेंद्र गोणारकर, माध्यम शास्त्र संकूल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड, हे होते तर अध्यक्ष स्थानी प्रा. भाऊराव खोब्रागडे, नागपूर हे होते. या अधिवेशनाचा समारोप शनिवार, दिनांक १९ जानेवारी २०१९ ला दुपार नंतर झाला. या पुरस्कार वितरण व समारोपाच्या कार्यक्रमाला मुख्य अतिथी, 'माझे गांव माझे सरकार' ही चळवळ चालविणारे मा. देवाजी तोफा, आदीवासी समाजसेवक, मेंढा–लेखा ,जि. गडचिरोली, प्रमुख उपस्थिती मा. प्रा. देवेश कांबळे, सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था, चांदा आणि मा. प्राचार्य डॉ. अझिझुल हक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, ब्रम्हपुरी, यांची होती. अध्यक्षस्थानी मा. निवृत्त न्यायमुर्ती किशोर रोही, नागपूर खंडपिठ यांनी भुषविले.

या कार्यक्रमात डॉ. पी. जी. जोगदंड, माजी–समाजशास्त्र विभागप्रमुख, मुंबई विद्यापिठ, मुंबई व डॉ. आर. बी. पाटील, माजी–समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर या दोन मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच डॉ. स्मिता अवचार, समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ, औरंगाबाद यांना उत्कृष्ट महिला प्राध्यापिका' या पुरस्काराने गौरविण्यात आले. २०१९ चा कै. जय जोशी संदर्भ/क्रमिक ग्रंथ पुरस्कार डॉ. खंडेरावजी एस. काळे, कला वाणिज्य महाविद्यालय, कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर, यांच्या 'भारतीय सामाजिक चळवळी' या ग्रथांस देण्यात आला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार प्रा. डॉ. माधवी रेणावीकर, समाजशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापिठ, पुणे, यांना देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यासाठी डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार, मोहिनी प्रकाश कनकदंडे, संशोधक विद्यार्थिनी, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड यांना देण्यात आला. आणि डॉ. अनुराधा भोईटे उत्कृष्ट प्रकाशित लेख पुरस्कार प्रा. डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर यांना देण्यात आला. तसेच मा. निवृत्त न्यायमुर्ती किशोर रोही, मा. देवाजी तोफा, म. स. प. च्या अध्यक्षा–डॉ. सरोज आगलावे, सचिव–डॉ. दीपक पवार, कोषाध्यक्ष–डॉ. राहुल भगत, प्राचार्य डॉ. अझिझुल हक यांच्या हस्ते स्मृती चिन्ह व प्रमाणपत्रांचे वितरण करून सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन डॉ. राहुल भगत यांनी केले तर सचिव डॉ. दीपक पवार यांनी आभार व्यक्त केले व परिषदेची सांगता झाली.

**कार्यकारीणीच्या कार्यकाळातील विशेष बाबी/परिषदेचा विशेष अहवालः**

- कार्यकारीणीकडे कारभार हस्तांतरीत केला तेव्हा १११६ आजीवन सभासद होते, गेल्या दीड वर्षात नविन आजीवन सभासदांची भर टाकून आज एकूण आजीवन सभासदांची संख्या ११६२ आहे गेल्या काही वर्षात नविन प्राध्यापक भरती झाली नसतांना ४६ नविन आजीवन सदस्यांना मसप शी जोडु शकलो.
- मागील कार्यकारीणी कडून रूपये ८,८२,२८२/– आमच्याकडे हस्तांतरीत करण्यात आले होते त्यापैकी आम्ही फिक्स डिपॉझिट रूपये ८,००,०००/– केले. उरलेले रूपये ८२,२८२/–. त्यामध्ये विद्यमान कार्यकारीनीने आजीवन सभासद शुल्क, २९ व्या अधिवेशनाच्या आयोजनकर्त्यांकडून दहा टक्के मिळालेली रक्कम, काही झालेले एम. ओ. यू., अतिरीक्त वाढीव शुल्क रूपये ५००/–, प्रवास व इत्तर खर्चात बचत आणि विशेष म्हणजे समाजशास्त्र संशोधन पत्रिकेच्या छपाई व प्रकाशन खर्चात केलेली मोठी बचत यामुळे उत्पन्नात खुप मोठी भर टाकू शकलो आहे. २०१९–२० करीता फिक्स डिपॉझिट रूपये ९,००,०००/– केलेले आहे. आणि दिनांक ३१ डिसेंबर २०१९ ला बचत खात्यावरील शिल्लक रक्कम रूपये १,६९,०६५/– इतकी आहे. खर्च, वजा जाता पुढील कार्यकारीणी २०२०–२१ करीता रूपये १०,००,०००/–इतके फिक्स डिपॉझिट नक्कीच करू शकेल. इतकी भक्कम आर्थिक क्षमता तयार आहे.
- समाजशास्त्र संशोधन पत्रिका 'पिअर रिव्हियू जर्नल' झाले असुन आजीवन सभासदांचे शोध निबंध प्रकाशित करण्याकरीता मोठा प्लॅटफार्म उपलब्ध झाला आहे, या काळात प्रकाशित शोध निबंधाची संख्या व गुणवत्ता वाढविण्यात परिषद यशस्वी राहीली असे आम्हास वाटते.
- २०१८ ते २०२० या दोन वर्षाच्या कार्यकारीणीच्या काळात मराठी समाजशास्त्र परिषद अधिक लोकाभिमूख करण्यातही आम्ही यशस्वी राहीलो असेही आम्हास वाटते.

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबीविषयीचे निवेदन

(नियतकालिकांच्या नोंदणीसंबंधी नियम ८ प्रमाणे)

---


| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा— समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर. |
| २. | नियतकाल | : | वार्षिक (ISSN 2230-7745) |
| ३. | मुद्रकाचे नांव: | : | डॉ.राहुल भगत |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | समाजशास्त्र विभाग, एस. एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा — ४४१९१२ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | दर्शन कम्प्यूटर्स, तुमसर जि. भंडारा. ४४१९१२ |
| ५. | प्रकाशकाचे नांव | : | डॉ. राहुल भगत |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | स्तंभ क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नांव | : | डॉ. सरोज प्रदीप आगलावे |
| | पत्ता | : | समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर. |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ७. | मालकाचे नांव | : | मराठी समाजशास्त्र परिषद |
| | पत्ता | : | वरीलप्रमाणे |

मी डॉ. राहुल भगत असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

डॉ. राहुल भगत
प्रकाशक व मुद्रक

**या अंकाचे लेखक :**

डॉ. उत्तम भोईटे, डॉ. पी. जी. जोगदंड, डॉ. जगन कराडे, डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. शौनक कुलकर्णी, प्रा. संदीप चौधरी, डॉ. धनराज पाटील, प्रा. प्रियदर्शन भवरे, डॉ. एन. टी. कांबळे, डॉ. राजेंद्र बगाटे, प्रा. संजयकुमार कांबळे, डॉ. स्मिता अवचार, डॉ. नारायण चौधरी, डॉ. श्रीकांत गायकवाड, डॉ. बालाजी केंद्रे, डॉ. तात्याराव सोंडगे, डॉ. दादा मोटे, डॉ. बी. के. स्वांई, डॉ. भगवान मनाळ, डॉ. कालीदास भांगे, डॉ. दिपक पवार, डॉ. धारबा गणविर, डॉ. रामेश्वर मोरे, डॉ. रविंद्र विखार, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. साहेबराव हिवाळे, डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ. प्रदीप गजभिये, डॉ. हेमंत सोनकांबळे, प्रा. मनोहर येरकलवार, डॉ. ज्योती पोटे, डॉ. मोहन नगराळे, डॉ. श्रीराम खाडे, डॉ. नलिनी बोरकर, डॉ. सरोज आगलावे.

**प्रकाशक : मराठी समाजशास्त्र परिषद** **मूल्य : ₹ ५०**

डॉ. सरोज प्रदीप आगलावे/डॉ. राहुल भगत यांनी मराठी समाजशास्त्र परिषद या संस्थेकरीता हे वार्षिक दर्शन कंम्प्युटर्स, तुमसर येथे छापून मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर येथून प्रसिद्ध केले.